# सत्याग्रही समाजवाद

## आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह

# सत्याग्रही समाजवाद

## आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह

संपादक

**सुहास पळशीकर**

विद्यापीठ अनुदान आयोगाचा विशेष साहाय्य कार्यक्रम,
राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग,
पुणे विद्यापीठ

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.**

प्रथम आवृत्ती :
सप्टेंबर १९९४

मुद्रक :
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,
वाई

मुखपृष्ठ :
कला विभाग, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री
संचालनालय, मुंबई

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई

किंमत :
रु. २००/-

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षांचे निवेदन ... | एक |
| ऋणनिर्देश ... ... | तीन |
| प्रस्तावना ... ... ... ... | सात |
| धर्ममार्गावरील माझे वाटाडे ... ... ... | १ |
| **विभाग पहिला : समाजवाद** | |
| रशियन राज्यक्रांती आणि विश्वकुटुंबवाद ... ... | ११ |
| समाजसत्ताक लोकशाही पक्षाची आवश्यकता ... ... | २९ |
| व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला ... ... | ३५ |
| राष्ट्रीय सभा आणि समाजवाद ... ... | ४५ |
| [भारतातील] राष्ट्रवाद आणि समाजवाद ... ... | ५१ |
| शास्त्रीय समाजवाद ... ... ... | ५६ |
| चोरी आणि काम ... ... ... | ७८ |
| कम्युनिस्ट जाहिरनाम्याच्या चष्म्यातून ... ... | ८४ |
| डॉ. लोहिया आणि हिंदी समाजवाद ... ... | ९६ |
| समाजवाद आणि अराज्यवाद ... ... | १०४ |

| विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|

**विभाग दुसरा : गांधीवाद**

सत्याग्रह युद्धनीती ... ... ... ११७

सत्याग्रह आणि प्रजाधर्म ... ... ... १२५

सत्याग्रह आणि राज्यमीमांसा ... ... ... १२९

[सत्याग्रह, परिवर्तन आणि राजदंड] ... ... १३४

महात्मा गांधींची धर्मनिष्ठा ... ... ... १४७

गांधीवादाचे भवितव्य ... ... ... १५६

समाजवाद आणि अध्यात्म ... ... ... १६२

क्रांतिकारक धर्मपुरुष महात्मा गांधी ... ... १६८

समाजवादी क्रांतीला सत्याग्रही दीक्षा ... ... १७५

भूदान आंदोलन आणि सत्याग्रही समाजवाद ... ... १८२

भूदान यज्ञ आणि समाजवादी क्रांती ... ... १८९

भूदान आंदोलन : तत्त्वज्ञान, ध्येय व कार्यपद्धती ... १९९

ब्रह्मर्षी विनोबा ... ... ... ... २०४

भारतीय संस्कृती आणि महात्मा गांधी ... ... २०८

| विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| **विभाग तिसरा : सत्याग्रही समाजवाद** | |
| सत्याग्रह व समाजवाद ... ... ... | २१५ |
| सत्याग्रही समाजवाद ... ... ... | २२६ |
| गांधीवाद – समाजवाद ... ... ... | २३३ |
| गांधी आणि मार्क्स ... ... ... | २४७ |
| मार्क्स - गांधी [ प्रजासमाजवादी पक्षाच्या निमित्ताने ] ... | २८३ |
| भारतीय संस्कृतीचे अमृततत्त्व ... ... | २९८ |
| परिशिष्ट पहिले | |
| आचार्यांनी लेखन केलेल्या नियतकालिकांचे संपादक ... | ३३७ |
| परिशिष्ट दुसरे | |
| आचार्यांनी उल्लेखिलेली पुस्तके ... ... | ३३९ |
| सूची ... ... ... ... | ३४१ |

# निवेदन

आचार्य शं. द. जावडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता २६ सप्टेंबर, १९९४ रोजी होत आहे. त्या निमित्ताने आचार्य जावडेकरांच्या निवडक लेखांचा संग्रह महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित होत आहे. या लेखसंग्रहाचे संपादन पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रा. सुहास पळशीकर यांनी केले असून या निवडक लेखांच्या संग्रहाला त्यांनी चिकित्सक आणि विस्तृत प्रस्तावनाही लिहिली आहे.

जन्मशताब्दी अगर स्मृतीशताब्दी निमित्ताने मंडळाने आजवर अनेक विचारवंतांच्या आणि प्रतिभावंतांच्या समग्र वाङमयाचे प्रकाशन केले आहे तसेच निवडक लेखांचे संग्रहही यापूर्वी प्रसिध्द केले आहेत. मात्र, अनेक कारणामुळे जन्मशताब्दी अगर स्मृतीशताब्दी होऊन गेल्यानंतर अशा ग्रंथांचे प्रकाशन केले जाते. आचार्य जावडेकरांच्या या निवडक लेखसंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता होत असताना करावयाचे असा मंडळाचा निर्धार होता. संपादकांनी ठरलेल्या मुदतीत ग्रंथाचे हस्तलिखित मंडळास सादर केले नसते किंवा मुद्रिते वेळेवर तपासून दिली नसती तर हा ग्रंथ २६ सप्टेंबर रोजी प्रकाशित करणे मंडळाला शक्य झाले नसते. या ग्रंथाचे प्रकाशन ठरल्याप्रमाणे २६ सप्टेंबरला होईल अशी दक्षता शासकीय मुद्रणालयाच्या संचालकांनी आणि सहकाऱ्यांनी घेतली त्यामुळे हा ग्रंथ आधी योजिल्याप्रमाणे वेळेवर प्रकाशित होत आहे याचा मंडळातील माझ्या सर्व सहकाऱ्यांना, सदस्यांना तसेच कर्मचाऱ्यांना आनंद होत आहे.

आचार्य जावडेकरांनी विपुल लेखन केले आहे. त्यांचे अनेक लेख वृत्त-पत्रातून, मासिकातून प्रकाशित झाले असले तरी ते ग्रंथरूपाने उपलब्ध नाहीत. हे सर्व लेख उपलब्ध करून द्यावयाचे तर काही खंड प्रकाशित करावे लागतील. ते शक्य नसल्यामुळे या प्रकल्पाची सुरुवात म्हणून हा पहिला निवडक लेखांचा संग्रह प्रकाशित करण्याचा मंडळाने निर्णय घेतला. आयुष्यभर आचार्य जावडे-करांनी गांधीवाद आणि समाजवाद या विचारसरणीचे सूक्ष्म अध्ययन केले. मात्र ते महात्मा गांधींचा किंवा कार्ल मार्क्सचा शब्द अखेरचा अगर प्रमाण मानीत नसत. प्रा. पळशीकर, यांनी म्हटल्याप्रमाणे आचार्य जावडेकर हे गांधीवादाचे डोळस आणि सर्जनशील उपासक होते. त्यांनी सत्याग्रही समाजवाद हा आपल्या विचारसरणीचा पाठपुरावा निष्ठेने केला. त्यांच्या विचारसरणीमागे समन्वय साधण्याचा त्यांचा सतत प्रयत्न होता. आचार्य जावडेकरांच्या समृद्ध विचारविश्वाची ओझरती ओळख तरी या ग्रंथामुळे होईल असा विश्वास वाटतो.

**य. दि. फडके**

मुंबई,
दि. १५ ऑगस्ट, १९९४

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# ऋणनिर्देश

आचार्य शं. द. जावडेकर यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात त्यांच्या निवडक लेखनाचा हा संग्रह मराठी वाचकांना सादर करताना मला आनंद होत आहे. अशा प्रकारचे काम कोणाही एकाच्याच नावाने प्रसिद्ध होत असले तरी खरोखरी ते सांघिक काम असते. या लेखसंग्रहाच्या कामातही योजना आखण्यापासून मला अनेक मित्रांचे सहकार्य लाभले. या सहकार्यामुळेच आज हा लेखसंग्रह वाचकांपुढे येत आहे. प्रस्तुत लेखसंग्रह वाचकांना उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

लेखसंग्रहाची आखणी व निर्मिती यात अनेकांचा हातभार लागला असला तरी लेखसंग्रहातील उणिवा तसेच चुकांना सर्वस्वी मीच जबाबदार आहे. हे आरंभीच स्पष्ट करायला हवे.

आचार्य जावडेकर यांच्या सर्व लेखनाचा संग्रह पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयातील राज्यशास्त्राचे **प्रा. स. म. गोळवलकर** हे गेली काही वर्षे चिकाटीने करीत होते. आचार्यांचे नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झालेले बहुतेक सर्व लेखन त्यांनी नकलून घेतले होते. ऑक्टोबर १९९० पासून पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभागास महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया, राजकीय तत्त्वज्ञान आणि विकास प्रशासन यांच्या अभ्यासासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचा विशेष सहाय्य कार्यक्रम (Special Assistance Programme) मिळाला. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण व राजकीय चिंतन यांच्या अभ्यासाची साधने जमविणे विभागाला शक्य झाले.

या योजनेअंतर्गत आचार्यांचा अभ्यास करणे आम्हाला शक्य व्हावे म्हणून प्रा. गोळवलकर यांनी आचार्यांच्या लेखनाचा संग्रह विभागाकडे सुपूर्द केला. या संग्रहाच्या संकलन व प्रकाशनाचे प्रयत्न आम्ही करावेत अशी प्रा. गोळवलकरांची अपेक्षा होती. या लेखसंग्रहाच्या प्रकाशनाने ही अपेक्षा अंशतः पूर्ण होत आहे. प्रा. गोळवलकर यांचे परिश्रम आणि औदार्य यांमुळेच विभागाला हे काम करणे शक्य झाले. या लेखसंग्रहाचे काम चालू असतानाही प्रा. गोळवलकर यांनी वारंवार त्याची चौकशी करून मला प्रोत्साहन दिले. त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभागातील माझे सहकारी व स्नेही **प्रा. राजेंद्र व्होरा** आणि **प्रा. यशवंत सुमंत** हे दोघेही या लेखसंग्रहाच्या निर्मितीच्या श्रेयातील वाटेकरी आहेत. लेखांची प्राथमिक निवड करण्यात मला या दोघांचे सहकार्य मिळाले. शिवाय लेखसंग्रहाची प्रस्तावना वाचून प्रा. व्होरा व प्रा. सुमंत यांनी तीत अनेक महत्त्वाच्या दुरुस्त्या सुचविल्या. गेली अनेक वर्षे आम्ही तिघे एकत्र काम करीत आहोत. त्यांचे औपचारिक आभार मानणे त्यांना रुचणार नाही. पण या लेखसंग्रहाच्या निर्मिती-प्रक्रियेतील त्यांचे सततचे सहकार्य आणि प्रोत्साहन यांबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

लेखसंग्रहाचा प्रकल्प घेतल्यापासून तो हातावेगळा होईपर्यंतच्या काळात आमचे तत्कालीन विभाग प्रमुख **प्रा. व. कृ. क्षीरे** व सध्याचे विभाग प्रमुख **प्रा. गोपाळ गुरू** यांनी जे प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

आचार्यांचे लेखन विभागाकडे प्रा. गोळवलकरांनी सुपूर्द केल्यापासून त्याच्या प्रकाशनाचा आम्ही विचार करीत होतो. अखेरीस महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष **प्रा. डॉ. य. दि. फडके** यांच्याशी आम्ही चर्चा केली आणि त्यांच्या प्रोत्साहनाने मंडळाकडे प्रकाशनाविषयीचा रीतसर अर्ज केला. आचार्यांच्या शताब्दीच्या वर्षात मंडळाने हा संग्रह प्रकाशित करावा या आमच्या विनंतीला मंडळाने तत्परतेने प्रतिसाद दिला. प्रा. फडके यांनी वेळेचे बंधन घालून दिल्यामुळे ह्या संग्रहाचे काम वेळेत पूर्ण होऊ शकले. मंडळ व

प्रा. य. दि. फडके यांनी अशा प्रकारच्या लेखसंग्रहाचे महत्त्व ओळखून त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

लेखसंग्रहात आचार्यांचे प्रकाशित/अप्रकाशित लेखन समाविष्ट करण्याची अनुमती **श्री. प्रभाकरपंत जावडेकर** यांनी तत्परतेने दिली आणि लेखसंग्रहाच्या प्रकाशनाचा मार्ग मोकळा करून दिला. मी त्यांचा ऋणी आहे. त्याचप्रमाणे आचार्यांच्या 'जीवनरहस्य'मधील मजकूर या संग्रहात समाविष्ट करण्यास 'प्रसाद' प्रकाशनाचे **श्री. बापूसाहेब जोशी** यांनी संमती दिली. 'सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाले'च्या वतीने **श्री. अरविंदराव पोतनीस** आणि **डॉ. रत्नाकर महाजन** यांनी लेखन समाविष्ट करण्यास संमती दिली याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

आचार्यांचे विचार प्रकाशित व्हावेत अशी **डॉ. तारा भवाळकर** यांची मनापासून इच्छा होती. त्यांनी या कामाची सतत आस्थेने चौकशी केली.

लेखांची जुळवाजुळव, आचार्यांची दुर्मीळ पुस्तके मिळविणे, परिशिष्टे तयार करणे या कामांमध्ये **प्रा. राजेश्वरी देशपांडे** यांचे बहुमोल सहकार्य मिळाले. तसेच **गौरी नवरे, प्रा. नितिन बिरमल** व **प्रा. शुभराज बुवा** यांनीही तत्परतेने मदत केली. मुद्रण प्रतीच्या टंकलेखनाची जबाबदारी **श्री. संजय शिंदे** यांनी पार पाडली. सुबक व वक्तशीर मुद्रणाची जबाबदारी **व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई** यांनी उत्तम रीतीने पार पाडली. या सर्वांचा मी आभारी आहे.

सरतेशेवटी ह्या लेखसंग्रहाच्या कामात माझी पत्नी **रेखा पळशीकर** हिने केलेल्या सहकार्याचीही आवर्जून नोंद करावीशी वाटते.

*सुहास पळशीकर*

# प्रस्तावना

आचार्य जावडेकरांनी १९२० ते १९५५ या काळात विपुल लेखन केले. त्यांचे अनेक लेख त्या काळात पुस्तक किंवा छोटेखानी पुस्तिकांच्या रूपाने प्रकाशित झाले. परंतु या बहुतेक पुस्तिका आज दुर्मिळ झाल्या आहेत. विविध नियतकालिकांमध्ये विखुरलेले त्यांचे लेखनही अभ्यासकांना आज सहजगत्या उपलब्ध होत नाही. जुनी नियतकालिके अगदी मोजक्याच ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहेत. परिणामी त्या नियतकालिकांमधील आचार्यांचे लेखन काहीसे बाजूला पडले आहे. 'गांधीवाद', 'जीवनरहस्य', 'लो. टिळक आणि म. गांधी' यांसारखी त्यांची पुस्तकेही विक्रेत्यांकडे सहसा उपलब्ध नसतात. फक्त त्या त्या प्रकाशकांकडे या पुस्तकांच्या काही प्रती असतात. 'आधुनिक राज्यमीमांसा' (भाग १ व २) ह्याचीही तीच परिस्थिती आहे. वास्तविक आचार्यांचे लेखन आजही समाजवादाचे आणि गांधीवादाचे अभ्यासक तसेच तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्राचे विद्यार्थी यांना फार उपयुक्त आहे. त्याशिवाय महाराष्ट्रात पुरोगामी भूमिका घेऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीनेही या लेखनाचे महत्त्व आहे. महाराष्ट्रातील वैचारिक घडामोडींमध्ये जावडेकरांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी मांडलेल्या विचारांची माहिती कार्यकर्त्यांना असणे आणि त्या विचारांची चिकित्सा होणे आवश्यक आहे. आचार्यांच्या लेखनाचे हे महत्त्व लक्षात घेता त्यांचे अधिकाधिक लेखन सहजगत्या उपलब्ध होणे आवश्यक ठरते. या भूमिकेतून आचार्यांच्या वैचारिक कार्याची काहीशी कल्पना येईल अशा प्रकारचा त्यांच्या निवडक लेखनाचा हा संग्रह तयार करण्यात आला आहे. आचार्यांच्या वैचारिक कामगिरीचे आपल्याला विस्मरण

होऊ नये आणि त्यांनी जे विचार सुमारे चार दशकांपूर्वी मांडले त्यांची नव्याने चिकित्सा व्हावी हे या लेखसंग्रहाचे प्रयोजन आहे.

शंकर दत्तात्रय जावडेकर (२६ सप्टेंबर १८९४ ते १० डिसेंबर १९५५) हे आचार्य जावडेकर म्हणूनच ओळखले जात. पुण्याच्या टिळक महाराष्ट्र महाविद्यालयात त्यांनी काही काळ अध्यापनाचे कार्य केले. तेथील अध्यापकांना आचार्य ही उपाधी असे. त्यामुळे जावडेकर 'आचार्य' बनले. [या संबंधीचे दोन उल्लेख माधव लिमयांनी त्यांच्या जावडेकर चरित्रात केले आहे. पान १२ वर ते म्हणतात की, 'राज्यनीतिशास्त्र परिचय' या पुस्तकामुळे जावडेकर 'आचार्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. तर पुढे पान १४ वर ते म्हणतात, "मात्र 'राज्यनीतिशास्त्र परिचय' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध होऊन विद्वन्मान्य झाल्यामुळे टिळक महाविद्यालयाचे आचार्यपद त्यांच्याकडे चालून आले. . . ." (ऋषितुल्य जावडेकर, साधना, पुणे १९८७) यातील दुसरा उल्लेख वस्तुस्थितिनिदर्शक तर पहिला चरित्रनायकाबद्दलच्या आदराचा निदर्शक असावा असे दिसते.] एक काळ महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रात दबदबा असलेले हे नाव आज महाराष्ट्राला फारसे परिचयाचे राहिलेले नाही. आचार्यांच्या लेखनाचा आणि वैचारिक कार्याचा परिचय तर अगदीच कमी आहे. 'विस्मृतीच्या पडद्याआड जाऊ लागलेल्या' विचारवंतांमध्येच त्यांची गणना त्यांचे चरित्रकार माधव लिमये यांनीही केली आहे.

– एक –

आचार्यांचा जन्म त्यावेळच्या विशाळगड संस्थानातील मलकापूर येथे झाला. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. डेक्कन कॉलेजातून व नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बी.ए. झाले. गांधीजींच्या असहकार चळवळीत (१९२१) त्यांनी शिक्षण सोडले व ते इस्लामपूर येथे वडिलांकडे येऊन राहिले. पुढील काळात त्यांनी लेखन सुरू केले आणि अल्पावधीतच राजकीय घडामोडींचे विश्लेषक आणि राज्यशास्त्राचे अभ्यासक म्हणून ते ओळखले जाऊ लागले.

टिळक महाविद्यालयात काही काळ अध्यापन करण्याखेरीज जावडेकरांनी 'नवशक्ति', 'लोकशक्ति', 'नवभारत', 'साधना' इत्यादी वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्या संपादनाचे कामही वेळोवेळी केले. प्रकृतिअस्वास्थ्यामुळे १९३२ नंतरचा बहुतेक काळ त्यांना इस्लामपूर येथेच व्यतीत करावा लागला. मात्र प्रकृतीची साथ नसतानाही शक्य तेव्हा त्यांनी गांधींच्या चळवळीत भाग घेतला. १९३०, १९३२-३३ आणि १९४२–४४ असा तीन वेळा त्यांना तुरुंगवास घडला. आयुष्यभर आचार्यांनी लेखन आणि विचारप्रसाराचे कार्य अखंडपणे चालू ठेवले. या कार्याचा गौरव म्हणूनच १९४९ च्या पुणे येथील मराठी साहित्य संमेलनाचे त्यांना अध्यक्षपद मिळाले.

आचार्यांच्या मृत्युनंतर अनेक वर्षांपर्यंत त्यांचे चरित्र उपलब्ध नव्हते. त्यांच्या हयातीत संमेलनाध्यक्षपदाच्या निमित्ताने व मृत्युनंतर श्रद्धांजलीपर असे अनेक लेख प्रसिद्ध झाले होते. त्यांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा काहीसा परिचय होतो. आता माधव लिमये यांनी लिहिलेले 'ऋषितुल्य जावडेकर' हे चरित्र (साधना, पुणे, १९८७) डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्टच्या पुढाकाराने प्रसिद्ध झाले आहे. आचार्यांच्या जीवनातील घडामोडींच्या तपशिलांबाबत आणि काटेकोरपणाबाबत प्रस्तुत चरित्र अपुरेच आहे. पण जावडेकरांच्या आयुष्यातील ठळक घटना आणि त्यांची वैचारिक कामगिरी यांची या चरित्रात नोंद आहे. तसेच जावडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येण्याच्या दृष्टीनेही हे चरित्र उपयुक्त आहे. आचार्य जावडेकरांच्या लेखनाची यादी दोन परिशिष्टांच्या रूपाने सदर चरित्रात समाविष्ट केली आहे. आचार्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'साधना'ने १७ डिसेंबर १९५५ चा अंक हा खास श्रद्धांजली अंक काढला होता. त्यात दिलेल्या 'जीवनपरिचया'तही काही चरित्रविषयक तपशील मिळतात. या अंकातीलच काही लेखांची मिळून 'आचार्य जावडेकर' या नावाची छोटी (२४ पानी) पुस्तिका साधना प्रकाशनाने काढली होती. (तीवर प्रकाशनवर्षाचा उल्लेख नाही. पण ती मृत्युनंतर लगेच १९५५ मध्येच काढली असावी.) तीमध्ये आरंभी आचार्यांचा जीवनपट दिला आहे. तो या प्रस्तावनेच्या शेवटी उद्धृत केला आहे. मात्र अद्यापही आचार्यांचे अधिक तपशीलवार, अचूक चरित्र लिहिले जाणे आवश्यक आहे.

## समकालीन विचारप्रवाह

ज्या काळात आचार्यांनी आपले लेखन सुरू केले तो राजकीय धामधुमीचा काळ होता. गांधींची असहकाराची चळवळ आणि त्यानिमित्ताने अहिंसा, सविनय कायदेभंग यांची होऊ लागलेली चर्चा यांची पार्श्वभूमी या काल-खंडाला लाभली होती. महाराष्ट्राच्या राजकारणातील टिळक पक्षातील अनेकांना गांधींच्या नव्या चळवळीशी जुळवून घेणे अवघड जात होते. इथल्या सुशिक्षित वर्गात अहिंसा आणि सत्याग्रहाकडे काहीसे टवाळीने पाहण्याचीच वृत्ती त्या काळात होती. आचार्यांचे लेखन या सुमारास सुरू झाले. ते पुढे गांधींच्या चळवळीच्या बरोबरच वृद्धिंगत होत गेले. राजकारण आणि तत्त्व-चर्चा यांची फारकत त्या काळी झालेली नसल्याने राजकीय घडामोडींचे संदर्भ तात्त्विक चर्चेत अपरिहार्यपणे येत.

आचार्यांनी लेखन सुरू केले तेव्हा टिळकांच्या राष्ट्रवादी विचारांचा प्रवाह अस्तित्वात होता. त्याखेरीज सशस्त्र क्रांतिकारकांची विचारसरणीही काही समाजघटकांमध्ये लोकप्रिय होती. पुढील काळात कम्युनिझमची विचारसरणी भारतात उदयाला आली. १९३० नंतरच्या काळात समाजवादी विचार-प्रवाहाने काही मंडळी प्रभावित झाली. आक्रमक राष्ट्रवादी, साम्यवादी आणि समाजवादी असेही या विचारप्रवाहांचे ढोबळ वर्गीकरण करता येईल. वैचारिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही पातळ्यांवर यापैकी पहिल्या दोहोंचा गांधीविचाराशी सतत प्रतिवाद चाललेला दिसून येतो. गांधींना ठामपणे विरोध करणारी या काळातील आणखी एक महत्त्वाची शक्ती म्हणजे आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली अस्पृश्यांची चळवळ. आंबेडकरांनी केवळ गांधी आणि काँग्रेसच्या राजकारणालाच विरोध केला असे नाही. त्यांनी गांधी-प्रणीत हिंदुधर्मविषयक विचार आणि जातिप्रश्नाची—मुख्यत्वे अस्पृश्यतेच्या प्रश्नाची—गांधीवाद्यांची उकल यांनाही विरोध केला. मात्र या विचारप्रवाहाची फारशी दखल जावडेकर घेत नाहीत. तसेच त्याआधी सुरू झालेल्या ब्राह्मणेतर चळवळीचीही दखल घेत नाहीत, हे आपण पुढे पाहणार आहोतच.

अशा प्रकारे गांधींचे आणि त्यांच्या विरोधकांचे राजकीय तत्त्वज्ञान आणि स्वातंत्र्य लढ्यातील विविध टप्पे यांची पार्श्वभूमी आचार्यांच्या लेखनाला

लाभली आहे. शेवटच्या ७–८ वर्षांमध्ये स्वातंत्र्योत्तर पक्षीय राजकारण आणि गांधीवाद्यांचा पडता काळ यांचाही संदर्भ त्यांच्या लेखनाला लाभला आहे. हा सर्व उल्लेख करण्याचे कारण आचार्यांची बहुतेक सर्व मांडणी भारतीय राजकारण आणि भारतीय समाज यांच्या संदर्भात होते. निव्वळ अमूर्त तत्त्वचर्चा असे त्यांच्या चिंतन–लेखनाचे स्वरूप नव्हते. समाजाचे परिवर्तन आणि न्याय्य समाजाची उभारणी हेच त्यांच्या तत्त्वचिंतनाचे लक्ष्य होते. त्यामुळे अमूर्त तत्त्वे आणि समकालीन प्रश्न यांची सांगड घालूनच त्यांचे लेखन झालेले दिसते. विशेषतः भारतीय समाजात बदल घडवून आणण्याचे मार्ग कोणते आणि त्या काळात चालू असलेल्या विविध चळवळींचे बदलाच्या प्रक्रियेतील स्थान काय असेल याची जावडेकर चर्चा करतात. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला सातत्याने समकालीन भारतीय समाजकारण आणि राजकारण यांचा संदर्भ आहे. म्हणून १९२० ते १९५० या तीन दशकांमधील विविध राजकीय तत्त्वज्ञानांमधील वादप्रतिवादांचे भान ठेवले तर आचार्य जावडेकर यांच्या लेखनाचे स्वरूप आणि महत्त्व ध्यानात येते. या कालखंडातील आंतर-राष्ट्रीय घडामोडी आणि युरोपातील विविध तत्त्वप्रणाली यांचीही पार्श्वभूमी जावडेकरांच्या लेखनाला लाभली आहे. म्हणूनच बोल्शेविक क्रांती आणि मार्क्सवाद, नाझी राजवटी आणि फॅशिझम आणि युरोपातील चिद्वादी आणि अराज्यवादी विचारपरंपरा यांचे संदर्भ त्यांच्या लिखाणात येतात. या घटना आणि विचारांचा परामर्श घेतघेत त्यांनी आपली वैचारिक मांडणी केली आहे.

### विचारांची जडणघडण

घरातील आणि पुढे पुण्यातीलही टिळकभक्तीच्या वातावरणात आचार्यांची विद्यार्थिदशा गेली. तरुण वयात गांधींच्या असहकार चळवळीमधील लढाऊ बाणा भावल्याने त्यांनी एम.ए.चे शिक्षण सोडले. अशा प्रकारे तरुण वयातच टिळकांचा प्रभाव आणि गांधींचे आकर्षण यांचा त्यांनी अनुभव घेतला. परंतु त्यांचा स्वभाव कोणा एका महापुरुषाचे भक्त बनून शागिर्दी करण्याचा नव्हता. विद्यार्थिदशेतच त्यांनी राज्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांचे चौफेर वाचन केले होते. आपल्या प्रिय नेत्यांचे राजकारण, राजनीती, नीतिशास्त्र

आणि तत्त्वज्ञान यांच्या कसोटीवर घासून पाहण्यात त्यांना काही गैर वाटले नाही. परिणामी आचार्य जावडेकर हे टिळकवादी किंवा गांधीवादी न बनता स्वतंत्र बुद्धीने विविध तत्त्वज्ञानांचे परीक्षण आणि परिशीलन करीत राहिले. टिळकांचा प्रभाव असूनही त्यांनी आगरकरांचा अभ्यास वर्ज्य मानला नाही आणि गांधींच्या राजकारणाकडे आकर्षित होत असतानाही मार्क्सवादाचा तपशीलवार अभ्यास केला. त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे : 'माझ्या विचारांची वाढ भावनोद्रेकाने होत नसून चिंतन व चर्चा या मार्गांनी होत असल्याने तिच्यात एक संथपणा दिसून येतो. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत माझ्या विचारांत बरीच वाढ झाल्याचे मला दिसून येते, तथापि त्यात एकदम अनपेक्षित उलथा-पालथ अथवा आमूलाग्र विचारपरिवर्तन झाल्याचा मला कधी अनुभव आलेला नाही.' (**तुरुंगातील माझी विचारवाढ,** मनोहर, मार्च १९४५, पृ. १७). याच लेखाच्या आरंभी आपले जीवन 'विचारप्रधान' असल्याचा उल्लेख आचार्यांनी केला आहे. मात्र तरीही सभोवतालच्या चळवळींमधील चढउतार, त्यांच्या यशापयशातून येणारे अनुभव यांचाही त्यांच्या वैचारिक वाटचालीत मोठा वाटा होता हे त्यांनी स्वतःच मान्य केले आहे.

आपल्या वैचारिक वाटचालीच्या दरम्यान कोणते प्रभाव कसकसे पडले याची चर्चा **धर्ममार्गावरील माझे वाटाडे** या लेखात (सत्यकथा, एप्रिल १९४५) आचार्यांनी केली आहे. हा लेख या संग्रहाच्या आरंभीच घेतला असून त्यावरून जावडेकरांची वैचारिक बैठक पुरेशी स्पष्ट होते. या लेखाच्या आरंभीच ते म्हणतात, 'मनुष्याने जन्मभर एकाच व्यक्तीला गुरू बनवावे अथवा एकाच ग्रंथाचे प्रामाण्य मानून आपल्या उन्नतीचा मार्ग अनुसरावा अशी माझी प्रवृत्ती नाही'. टिळक आणि आगरकर तसेच मार्क्स आणि गांधी या परस्परविरोधी मानल्या गेलेल्या विचारवंतांचे ऋण आचार्यांनी सत्यकथेतील या लेखात मान्य केले असून आपण त्यांच्यापासून काय शिकलो हे स्पष्ट केले आहे. आगरकरांची धर्मचिकित्सा, मानवकेंद्री दृष्टी आणि विवेकनिष्ठा यांचा जावडेकरांवर प्रभाव पडला. लोकमान्य टिळकांच्या प्रभावामुळे भारतीय तत्त्वज्ञानाचे सार गीतेमध्ये शोधले पाहिजे असे त्यांचे मत बनले आणि गीतेच्या अभ्यासाचा त्यांनी पाठ-पुरावा केला. भारतीय संस्कृतीचें वेगळेपणही त्यांना टिळकांच्या विचारांच्या

अभ्यासातून जाणवले. ते म्हणजे इंद्रियसुखांच्या पलीकडे असणाऱ्या सात्विक सुखाचे अधिष्ठान. नेमक्या याच दोन मुद्यांमुळे त्यांना टिळक आणि गांधी यांच्या विचारांत भेदांपेक्षा साम्यस्थळेच जास्त आढळू लागली. ऐहिक जीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान असावे हे सूत्र आचार्यांच्या सर्व लेखनात सतत डोकावते ते या प्रभावामुळे. गीतेचे दाखले देऊन आणि तिचा अर्थ लावून भारतीय संस्कृतीची मांडणी ते करतात तीही टिळक–गांधींच्या प्रभावातूनच.

सत्यकथेतील उपरोल्लेखित लेखात त्यांनी म्हटल्याप्रमाणे आचार्य जावडेकर १९१८-१९ पूर्वीच समाजवादी बनले होते पण ते फेबियन समाजवाद्यांच्या अभ्यासातून. १९२६ ते १९३४ च्या दरम्यान त्यांनी मार्क्सवादाचे अध्ययन केले. मार्क्सचा भौतिकवाद, भांडवलशाहीची मीमांसा आणि सर्वस्पर्शी क्रांतीचा आग्रह यांनी जावडेकर प्रभावित झाले. ब्रिटिशांच्या प्रभावामुळे आपल्याकडील अनेक विचारवंतांचे मार्क्सकडे दुर्लक्ष झाल्याची टीकाही त्यांनी केली आहे. '....आमच्या राष्ट्रातील बुद्धिमंतांनी जर्मनीतील कांट हेगेलपासून नीत्शे-पर्यंतच्या सर्व तत्त्ववेत्त्यांचा अभ्यास केला, तरी मार्क्सचा अभ्यास केला नाही. ...हा सर्व आमच्या मागासलेपणाचा पुरावा आहे. मार्क्ससंबंधी माझी ही वृत्ती असून मार्क्सच्या अध्ययनाने मला एक नवी दृष्टी प्राप्त झाली असे वाटले.' **( धर्ममार्गावरील माझे वाटाडे )**

तुरुंगवासातील वैचारिक देवाणघेवाण आणि चळवळींचे पुनर्मूल्यांकन यांतूनही आचार्यांचे विचार आकार घेत गेले. या मुद्याची सविस्तर चर्चा त्यांनी 'मनोहर' मधील वर उल्लेख केलेल्या लेखात केली आहे. औपचारिक अध्ययन-अध्यापनापेक्षा तुरुंगातील चर्चांचे स्वरूप वेगळे असे. कमीअधिक भिन्न विचारांचे पण राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित झालेले कार्यकर्ते आपल्या चळवळीच्या संदर्भात विविध तत्त्वज्ञानांची तुरुंगात चर्चा करीत. अनुभवांची देवाणघेवाण होई. त्यामुळे तुरुंगात विचारांना जास्त वेगाने चालना मिळत असे याचा आचार्यांनी उल्लेख केला आहे. ते म्हणतात, 'तुरुंगातील जीवन हे बाहेरच्या नित्याच्या व्यवसायातील व्यवहारांपासून सक्तीनेच तोडलेले असल्याने माझ्यासारख्या संथवृत्तीच्या मनुष्याच्या विचारांतही थोडी अधिक जलद विचारवाढ होणे अगदी साहजिक आहे. त्यातून मी ज्या ज्या वेळी

तुरुंगात होतो त्या त्या वेळी बाहेर क्रांतिकारक चळवळी चालू असल्याने त्या चळवळींच्या आंदोलनांचा परिणाम माझ्याही विचारांवर होणे अपरिहार्यच होते, अर्थात प्रत्येक वेळी तुरुंगात जाताना माझे जे विचार होते त्यांचे स्वरूप बाहेर आलो त्यावेळी बरेच पालटलेले अथवा वाढलेले मला आढळून आले आहे. (**तुरुंगातील माझी विचारवाढ**, मनोहर, मार्च १९४५, पृ. १७–१८) त्यांच्या पहिल्या तुरुंगवासाच्या काळात भारतातील समाजवादाचा लढा सत्याग्रही मार्गांनीच चालविला जावा असे त्यांना वाटू लागल्याचा उल्लेख त्यांच्या 'जीवनपरिचया'त येतो. (आचार्य जावडेकर श्रद्धांजली विशेषांक, साधना, १७ डिसेंबर १९५५, पृ. ११) याला आचार्यांच्या सत्यकथेतील लेखातही दुजोरा मिळतो.

अशा प्रकारे आगरकर, टिळक, गांधी आणि मार्क्स या चार 'वाटाड्यां'चे मार्गदर्शन आचार्यांच्या वैचारिक जडणघडणीच्या मुळाशी होते. त्याचबरोबर त्यांची समन्वयबुद्धी आणि भावनेपेक्षा चिंतनाला प्राधान्य देणारा स्वभाव हाही ह्या जडणघडणीतील एक महत्त्वाचा घटक होता. राजकीय चळवळी आणि वैचारिक देवाणघेवाण हे इतर घटक होत. आचार्यांच्या वैचारिक जडण-घडणीचा वेध घेताना आणखी एका मुद्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

गीतेचे अध्ययन आणि टिळक–गांधींचा प्रभाव यांमुळे आचार्यांच्या तत्त्व-चिंतनाला भारतीय परंपरेचे अधिष्ठान लाभले. त्यांनी केलेली समाजचिकित्सा आणि परिवर्तनविचाराची मांडणी भारतीय परंपरा आणि तत्त्वज्ञान यांच्या आधारावर उभी असल्याचे दिसते. भारतीय परंपरेचा हा प्रभाव केवळ साधनेतील **कलियुगांतक जाबालगीता** (फेब्रुवारी ते एप्रिल १९५१) या लेख-मालेप्रमाणे शीर्षक, लेखाचे स्वरूप किंवा प्रतिकांपुरता मर्यादित नाही. तर भारतीय परंपरांची नवी मांडणी करून किंवा त्यांचे नवे अन्वयार्थ मांडून परिवर्तनविचाराला परंपरागत तत्त्वज्ञानात कसा वाव आहे हे ते दाखवून देतात. हे प्रयत्न रणनीतीच्या किंवा व्यूहरचनेच्या स्वरूपाचे नाहीत. भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांचा गाढ प्रभाव आणि धर्म, परंपरा व तत्त्वज्ञान यांचा आत्मप्रामाण्याने अर्थ लावण्याची गांधींची शिकवण यांच्या संयोगातून हे घडते.

### आचार्यांच्या लेखनाचे स्वरूप

आचार्यांचे सर्व लेखन प्रबोधन किंवा लोकशिक्षण या हेतूने झाले. राजकीय–सामाजिक कार्यकर्ते किंवा सामान्य जिज्ञासू वाचक डोळ्यापुढे ठेवून प्रतिपाद्य विषयाची अत्यंत सोपी मांडणी त्यांनी अनेक वेळा केलेली दिसते. वाद-विवेचन मालेसाठी त्यांनी लिहिलेले 'गांधीवाद' हे पुस्तक याचे उत्तम उदाहरण ठरेल. (प्रसाद प्रकाशनाने १९४१ मध्ये हे पुस्तक काढले. पुढे १९४९ मध्ये कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, यांनी त्याची दुसरी आवृत्ती काढली.) गांधी-वादाचा प्राथमिक परिचय करून देणे हा या पुस्तकाचा हेतू आहे. त्यासाठी गांधींच्या लिखाणातून विस्तृत उतारे देऊन आचार्यांनी अहिंसा, सत्याग्रहाचे तंत्र आणि व्यक्तिधर्म आणि समाजधर्माचा परस्पर संबंध यांची चर्चा केली आहे.

अशाच प्रकारे मार्क्सवाद आणि अराज्यवाद या तत्त्वप्रणालींचा परिचय त्यांच्या व्याख्यानमाला आणि लेखमालांमधून होतो. जिज्ञासू वाचकांसाठी लिहिताना विषयातील तांत्रिक गुंतागुंतीवर जावडेकर भर देत नाहीत हे खरे आहे. तरीही विषयाच्या स्पष्टीकरणासाठी आवश्यक असे सर्व बारकावे ते मांडतात. आपल्या वाचकाला काही किमान माहिती आहे आणि नसेल तर ती त्याने मिळवली पाहिजे हे गृहीत धरून त्यांच्या लिखाणात चर्चा केलेली असते. उदाहरणार्थ 'जीवनरहस्य' या त्यांनी लिहिलेल्या गांधी-चरित्रात ते सहजगत्या रुसोचा भाववाद आणि गांधींचा अंतःकरणवाद यांची चर्चा करतात. रुसोच्या भाववादात बुद्धी विवश होण्याचा जो धोका आहे तो गांधींच्या आत्मप्रामाण्यवादात संभवत नाही असे ते सांगतात आणि पुढे लगेच गांधींच्या कर्मयोगाची चर्चा करताना गांधी हे नीत्शेसारखे आसुरी कर्मयोगी नसल्याचा अभिप्राय नोंदवितात. (जीवनरहस्य, देशमुख आणि कं., पुणे, १९४९, पृ. ४४२–४३) सारांश, आपल्या वाचकाला विषय सोपा करून सांगतानाच विविध विचारधारांचाही परिचय त्याने करून घेतला पाहिजे हे त्यांनी गृहीत धरलेले असते. विषय सोपा करण्यासाठी त्यातील तात्त्विक आशयाला फाटा देण्याचा मार्ग त्यांनी कधीच अवलंबिला नाही.

राज्यशास्त्र, गांधीवाद, भूदान चळवळ, मार्क्सवाद, अराज्यवाद, राष्ट्रवाद, समाजवाद, भारताची राष्ट्रीय चळवळ, तिच्यामधील विविध वैचारिक प्रवाह,

धर्म आणि धार्मिक चिंतन इ. विषयांवर आचार्यांनी लेखन केलेले दिसते. त्याशिवाय क्वचित प्रसंगी अर्थशास्त्रावरही त्यांनी लिहिले. त्यापैकी **व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला** हा त्यांचा १९३४ मधील लेख या संग्रहात समाविष्ट केला आहे. त्याखेरीज फेब्रुवारी – मार्च १९५२ मध्ये त्यांनी केन्सचे चरित्र आणि विचार यांचा परिचय करून देणारे चार लेख 'साधने'त लिहिले. रस्किनच्या Unto this Last ह्या पुस्तकाचे 'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र' हे भाषांतर त्यांनी केले आहे. (सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९४५). माजी भारतमंत्री लॉर्ड ऑलिव्हिअर यांचा 'एशिया' या मासिकाच्या फेब्रुवारी १९३० च्या अंकातील लेख जावडेकरांनी अनुवादित केला असून **भिन्न मानववंशियांचे परस्परसंबंध : आर्थिक कारणांची मीमांसा** या शीर्षकानिशी तो फेब्रुवारी १९३० मध्येच लोकशिक्षण मासिकात प्रसिद्ध झाला.

सामाजिक व्यवहारांविषयीच्या चिंतनाचा एक भाग म्हणून जावडेकरांनी साहित्याचा विचार केला. त्यांनी साहित्याविषयी विस्ताराने अथवा सातत्याने लेखन केलेले नाही. पण मुंबई उपनगर साहित्य संमेलनातील त्यांचे अध्यक्षीय भाषण आणि त्यावरील ना. सी. फडके यांच्या टीकेला त्यांनी दिलेले उत्तर बरेच गाजले. सदर भाषण ( व त्यावरील चर्चा ) पुढे 'पुरोगामी साहित्य' या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. ( संध्या प्रकाशन, पुणे, १९४१ ). त्याचप्रमाणे मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातही ( १९४९ ) त्यांना आपले साहित्यविषयक विचार मांडण्याची संधी मिळाली. सामाजिक शास्त्रांचा अभ्यासक आणि सामाजिक चळवळींचा पाठीराखा साहित्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतो ते त्यांच्या या साहित्यविषयक विचारांमधून दिसते.

आचार्य जावडेकरांचे लेखन हे प्रामुख्याने विविध नियतकालिकांमधील लेखांच्या रूपाने झाले. आरंभीचा बराच काळ (१९२२–१९३८) 'लोकमित्र' आणि 'लोकशिक्षण' या मासिकांमधून त्यांच्या काही लेखमाला व अनेक लेख प्रसिद्ध झाले. पुढे १९३५ ते १९५० या काळात त्यांनी 'चित्रमयजगता'त सर्वात जास्त लिखाण केले. १९४७ च्या पुढील काळातील त्यांचे लेखन 'नवभारत'

आणि 'साधना' मधून प्रसिद्ध झालेले दिसते. याखेरीज 'विविधज्ञानविस्तार', 'लोकशक्ति', 'सह्याद्री', 'सत्यकथा', 'अखंड भारत' इ. नियतकालिकांतूनही त्यांनी लेखन केले. यांपैकी काही लेखमाला पुढे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या. त्याशिवाय 'शास्त्रीय समाजवाद' या विषयावरची त्यांची व्याख्यानेही पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. ह्या लेखमाला व व्याख्यानमालांखेरीज त्यांनी लिहिलेल्या छोटया-मोठया पुस्तकांमध्ये राजनीतिशास्त्रपरिचय (१९२६, गोवर्धन, पुणे), आधुनिक राज्यमीमांसा भाग १ व २ (लोकशिक्षण, पुणे, १९४० व १९४१) आणि लोकशाही (वादविवेचनमाला, पुणे, १९४०) या राज्यशास्त्र विषयक ग्रंथांचा समावेश होतो. तसेच गांधीवाद, जीवनरहस्य, महात्मा गांधींचे दर्शन (कोकाटे, पुणे, १९४८) हे गांधी व गांधीवादावरील ग्रंथ त्यांनी लिहिले. हिंदु–मुसलमान ऐक्य (सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९४५) हे तात्कालिक राजकीय संदर्भात हिंदु–मुस्लिम प्रश्नाची चर्चा करणारे पुस्तकही त्यांनी लिहिले आहे.

आचार्य जावडेकरांचा 'आधुनिक भारत' (सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९३८) हा ग्रंथ राष्ट्रीय चळवळीवर भाष्य करणारा एक दर्जेदार ग्रंथ म्हणून प्रसिद्ध झाला. या ग्रंथाखेरीज अन्य काहीही लेखन त्यांनी केले नसते तरीही भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे भाष्यकार म्हणून त्यांचे नाव नोंदले जाऊ शकले असते इतके या ग्रंथाचे महत्त्व आहे. अशा प्रकारे स्वतंत्र ग्रंथलेखन, नियतकालिकांमधील लेख, भाषणे, संपादन अशा चतुर्विध मार्गांनी आचार्य जावडेकरांनी वैचारिक जागृती आणि विचारपरिचयाचे कार्य जवळपास तीन तपांपर्यंत केले. त्यांच्या या वैचारिक कार्यामुळे महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात फार मोलाची भर पडली आहे.

मुख्यत: राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय चळवळ या विषयांमध्ये आचार्य जावडेकरांनी आपल्या लेखनाने भर घातली. समकालीन राजकारणाच्या संदर्भात राजकीय मूल्ये आणि तत्त्वप्रणाली यांचा अभ्यास कसा करावा याचा वस्तुपाठ त्यांच्या लेखनात मिळतो. त्याचप्रमाणे सामाजिक प्रश्नांचे विश्लेषण करताना वस्तुनिष्ठता, अनुभवगोचर दृष्टिकोन, चिकित्सक शास्त्रीयता यांच्याबरोबरच मूल्यविषयक विवेकाचेही भान ठेवणे कसे आवश्यक आहे हे त्यांच्या

लिखाणातून स्पष्ट होते. वर उल्लेख केलेल्या **व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला** या लेखातील टीकेचा प्रतिवाद करताना त्यांनी हा मुद्दा स्पष्ट केला आहे (पहा : या संग्रहातील 'व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला' या लेखातील 'टीकेचा परामर्श' या उपशीर्षकापुढील लेखांश). सामाजिक शास्त्रांच्या सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासाची पद्धती कशी असावी याचा वस्तुपाठ देणारा असा हा उतारा आहे. आचार्यांनी त्यांच्या संपूर्ण लेखनातच ही पद्धती अवलंबिलेली दिसते. अशा प्रकारे समकालीन प्रश्नांची दूरवरच्या आदर्शांच्या संदर्भात चिकित्सा आणि शास्त्रीय दृष्टी न सोडता नैतिक मूल्यविवेक ही आचार्यांच्या लेखनाची वैशिष्टये सांगता येतील.

आचार्यांचे सर्व लेखन मराठीत आहे. महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुण त्यांच्या डोळयांपुढे होता. त्याच्यासाठी त्यांनी मराठीतून लेखन केले. त्यांच्या 'आधुनिक भारता'चा सारांश त्यांनी स्वतःच इंग्रजीत करून दिल्याचा एक उल्लेख दत्तो वामन पोतदारांनी केलेला आढळतो. '... पुढे जावडेकरांच्याच पाठीस लागून या त्यांच्या ग्रंथाचे इंग्रजी सार त्यांच्याकडूनच तयार करवून भारत सरकारात दाखल केले. आमच्या संपादक मंडळात [स्वातंत्र्येतिहास संपादक मंडळात] त्याची फार वाखाणणी झाली.' (**आधुनिक भारतकाराची योग्यता,** नवभारत, जानेवारी १९५६, पृ. ५३) 'आधुनिक भारत'चे हे इंग्रजी सार शंभर पानी होते आणि ते लवकरच भारत सरकारतर्फे प्रसिद्ध होणार आहे असे 'साधने'च्या त्यांच्या श्रद्धांजलीपर अंकातील 'जीवनपरिचया'त म्हटल्याचे आढळते. (साधना, १७ डिसेंबर १९५५, पृ. ११), तर तो सारांश भारत सरकारने प्रसिद्ध केल्याचे माधव लिमये त्यांच्या जावडेकर चरित्रात सांगतात (ऋषितुल्य आचार्य जावडेकर, पृ. ९१). मात्र त्याविषयीचा तपशील त्यांनी दिलेला नाही.

हा सारांश वगळता जावडेकरांचे सर्व लेखन फक्त मराठीतच आहे. अत्यंत सोप्या आणि ओघवत्या मराठीत त्यांनी लेखन केले. राज्यशास्त्रातील आणि राजकीय तत्त्वज्ञानातील अनेक, इंग्रजी संज्ञांसाठी त्यांनी मराठी पर्याय वापरले. सामाजिक शास्त्रांची मराठी परिभाषा कशी असावी याचा आदर्शच त्यांनी वापरलेल्या पर्यायी संज्ञांमधून मिळतो. आपला मुद्दा सहजगत्या

समजला पाहिजे अशी आस्था असल्यामुळे त्यांच्या पारिभाषिक संज्ञा कोठेही क्लिष्ट किंवा बोजड होत नाहीत. उदा. कोणत्याही शासकीय समितीचा जाच नसल्यामुळे ते materialism साठी सहजगत्या 'अन्नब्रह्मवाद' ही संज्ञा प्रयोगादाखल वापरू शकले !

**टीका आणि प्रतिवाद**

आचार्यांची टीका आणि प्रतिवादही वैशिष्टचपूर्ण असत. सर्वसामान्यपणे आपल्या टीकाकारांचा प्रतिवाद त्यांनी अगदी सौम्यपणे केल्याचे आढळते. मात्र भाषा सौम्य असली तरी चुका दाखविण्यात परखडपणा आणि आपल्या मुद्याच्या समर्थनात ठामपणा असे. त्यांनी टीकाकाराला सणसणीत उत्तर दिल्याचे बहुधा एकच उदाहरण असावे. ते म्हणजे त्यांचे दीर्घकाळचे सहकारी शंकरराव देव यांच्या नवभारतातील लेखाला आचार्यांनी दिलेले उत्तर. नवभारतच्या डिसेंबर १९५२ च्या अंकात शंकरराव देवांनी **सर्वोदयाच्या साधनेची गुप्त सरस्वती** या शीर्षकाचा लेख लिहिला (पृ.३८–४८) विनोबांसारख्यांच्या रचनात्मक कार्याला जावडेकर पुरेसे महत्त्व देत नाहीत, सर्वोदयाचे महत्त्व कमी लेखतात अशी देवांची तक्रार होती. सर्वोदय कार्याला गुप्त सरस्वतीची उपमा देऊन ते म्हणतात, 'मला खेद याचाच वाटतो की, श्री. शंकररावांसारखे प्रज्ञावानही या गुप्त सरस्वतीचे दर्शन सामान्य जनतेला करून देण्याला समर्थ होत नाहीत.' (पृ. ४८) या लेखाला प्रत्युत्तर देणारा '**सर्वोदयाची सरस्वती आणि वस्तुनिष्ठ ऐतिहासिक दृष्टी**' हा लेख आचार्यांनी नवभारतच्या मार्च १९५३ च्या अंकात लिहिला. (पृ. १–१२) देवांचा आक्षेप अमान्य करताना आपणही रचनात्मक कार्याला महत्त्व देतो हे तर आचार्यांनी स्पष्ट केलेच पण देवांनी '...आपल्या विवेचनास गैरलागू किंवा प्रतिकूल ठरणारा म्हणून हा भाग वाचकांपुढे मांडला नसावा अशी माझी समजूत झाली आहे' असेही म्हटले. (पृ. २) तसेच '... राजकीय कर्मयोग आचरण्याचे कार्य आचार्य विनोबा यांनी आजपर्यंत केलेले नाही व यापुढेही ते गांधीजींच्या राजकीय क्षेत्रात उतरून आपल्या आत्मबलाने जागृती केलेली सामाजिक क्रांतीची मूर्ती घडविण्यात कितपत व कसा भाग घेतील ते मला अद्याप स्पष्टपणे दिसू शकत नाही.' (पृ. ३) असे मत नोंदविले.

काँग्रेसपक्षातून समाजवाद्यांची हकालपट्टी करण्याबद्दल दोघा शंकररावांचे आपसात मतभेद होते. काँग्रेसने समाजवाद्यांना पक्षातच सन्मानपूर्वक स्थान द्यायला हवे होते असे जावडेकरांचे मत होते. हे मतभेद या वादाच्या मुळाशी होते. जावडेकर ज्या 'नवभारत'च्या संपादक मंडळात होते त्याचे देव संचालक होते. तरीही आपले मतभेद स्पष्टपणे मांडून जावडेकरांनी खरमरीत शब्दात देवांच्या चुकीचे माप त्यांच्या पदरात टाकले. १९५२-५३ मधील या वादापूर्वी १९५० मध्येच जावडेकरांनी 'समाजवाद्यांना दूर ढकलण्याबद्दल' देवांवर टीका करणारा लेख 'साधने'त लिहिला होता. समाजवाद्यांना पक्षाबाहेर घालविल्यानंतर काँग्रेस हा एक परंपरावादी पक्ष बनला असून त्याचे नेतृत्व आपण करू शकू हा गांधीवाद्यांचा अहंकार भ्रामक आहे अशी त्यांनी टीका केलेली दिसते. आतातरी देवांनी समाजवाद्यांना पाठिंबा द्यावा, 'नाही तर आजपर्यंत घडलेली प्रमादपरंपरा यापुढेही तशीच चालू राहील' असा इशारा त्यांनी दिलेला आढळतो. (**श्री. शंकरराव देव यांचा विचारसंभ्रम,** साधना, ३० डिसेंबर १९५०, पृ. २).

देवांवरील टीकेचे हे प्रसंग सोडले तर एरवी मात्र जावडेकर भूदानाचे टीकाकार तसेच विनोबा, यांच्याशी असलेले मतभेद अगदी सौम्य भाषेत व्यक्त करताना दिसतात.

जावडेकरांचे लेखन सुरू झाले त्या काळात महाराष्ट्रातील टिळकपंथीयांना गांधींचे नेतृत्व पुरेसे मान्य झालेले नव्हते. पुढील काळात हिंदुमहासभा हा पक्ष महाराष्ट्रातील गांधीविरोधाची आघाडी सांभाळत होता. या गांधी-विरोधकांचे नेते तात्यासाहेब केळकर आणि सावरकर होते. त्यामुळे १९२२ ते १९४५ या काळात या दोघांच्या धोरणांवर आणि वक्तव्यांवर जावडेकरांनी वेळोवेळी सडकून टीका केलेली दिसते. **असंतोषात्मक टिळकभक्तीची मिमांसा** (लोकशिक्षण, ऑगस्ट १९३१), **लो. टिळकांचे विवेकी राजकारण आणि बॅ. सावरकरांची अविवेकी हुल्लडबाजी** (लोकशिक्षण, ऑगस्ट १९३९) हे लेख आणि त्यातील दुसऱ्या लेखावरील टीकेला प्रत्युत्तर देणारा **टिळक, सावरकर व गांधी – श्री इतिहासाभ्यासी, एम.ए. यांना प्रत्युत्तर** हा लेख (लोकशिक्षण, नोव्हेंबर १९३९) हे आचार्यांच्या कडक टीकेचे नमुने म्हणून

सांगता येतील. यांपैकी पहिले दोन्ही लेख आचार्यांच्या 'लो. टिळक व म. गांधी' (राजहंस, पुणे, १९४८) या पुस्तकात समाविष्ट झाले आहेत. सारांश, आचार्य जावडेकरांच्या लेखनाची शैली एकंदरीने शांत व गंभीर असली तरी प्रसंगी प्रतिस्पर्धी राजकीय विचारांचा प्रतिवाद करताना ती पुरेशी तिखट बनते आणि त्यांचा खरपूस समाचार घेताना दिसते. तरीही आचार्यांचे लेखन वाचल्यावर आपल्यावर छाप पडते ती मात्र त्यांच्या अनाग्रही आणि सौम्य शैलीतील विचारमंथनाचीच.

आचार्यांच्या लेखनातील विविधता आणि त्यांच्या लेखनाचा पसारा यांचा संक्षिप्त उल्लेख वर आलाच आहे. राजनीतिशास्त्रपरिचय (१९२६), आधुनिक भारत (१९३८), आधुनिक राज्यमीमांसा (दोन भाग, १९४० ते १९४१), लोकशाही (१९४०), गांधीवाद (१९४१), शास्त्रीय समाजवाद (१९४३), हिंदु – मुसलमान ऐक्य (१९४५), महात्मा गांधींचे दर्शन (१९४८), जीवन-रहस्य (१९४९) या पुस्तकांखेरीज जावडेकरांनी विविध विषयांवर मिळून अडीचशेच्या आसपास लेख लिहिले आहेत.

**प्रस्तुत लेखसंग्रहाविषयी**

या सर्व लेखनाच्या समग्र प्रकाशनातील व्यावहारिक अडचण लक्षात घेऊन त्यांच्या निवडक लेखनाचा संग्रह तयार करणेच योग्य वाटले. असा निवडक लेखसंग्रह तयार करताना सर्वच विषयांवरील आचार्यांच्या लेखनाला त्यात जागा देण्याऐवजी एकाच विशिष्ट विषयावरील त्यांचे लेखन घेतल्यास त्यात अधिक सूत्रबद्धता येईल असे वाटल्याने येथे फक्त गांधीवाद आणि समाजवाद यांविषयीच्या लेखनाचाच समावेश केला आहे. असे केल्याने त्यांनी इतर विषयांवर जे लेखन केले त्याचा स्वतंत्रपणे संग्रह करण्यास वाव राहील असाही त्यामागील विचार आहे.

नवा समाज घडविण्यासाठी जी सैद्धान्तिक बैठक आवश्यक आहे ती गांधीवाद आणि समाजवाद यांच्या संश्लेषणाने शक्य होईल असे आचार्यांना वाटत असे. या दोन्ही विचारप्रणालींविषयी त्यांनी स्वतंत्रपणेही बरेच लेखन केले आणि त्यांच्या संयोगातून जो 'सत्याग्रही समाजवाद' आकाराला येऊ

शकतो त्याविषयीही त्यांनी सातत्याने लिहिले. म्हणून प्रस्तुत लेखसंग्रहात समाजवाद आणि गांधीवाद यांच्याविषयी आचार्यांनी जे लेखन केले त्याचा समावेश केला आहे.

समाजवाद आणि गांधीवाद हे आचार्यांचे आयुष्यभराचेच चिंतनाचे विषय होते. त्यामुळे त्यावर त्यांनी केलेले लेखनही विपुल असून एखाद्या आटोपशीर लेखसंग्रहाच्या आवाक्याबाहेरचे आहे. वर दिलेल्या यादीतील या विषयावरील पुस्तके वगळता या विषयावरील लेखांची संख्या पाऊणशेच्या जवळपास भरते. त्यामुळे त्यातूनही निवड करणे भाग होते. अशा प्रकारे हा लेखसंग्रह दोन अर्थांनी निवडक लेखसंग्रह आहे. एक तर आचार्यांनी केलेल्या लेखनापैकी निवडक विषयावरील लेखनच येथे समाविष्ट केले आहे आणि दुसरे म्हणजे गांधीवाद आणि समाजवाद यांवरील आचार्यांचे निवडक लेखनच तेवढे या संग्रहात घेतले आहे.

अशी निवड करताना आचार्यांच्या मांडणीची सर्व वैशिष्टये वाचकांसमोर येतील याची काळजी घेतली आहे. वेगवेगळ्या कालखंडातील त्यांच्या लेखनातून उताऱ्यांची निवड केली आहे. मुख्य म्हणजे आचार्यांच्या विचारसूत्राचा परिचय होण्यात काही अडसर येणार नाही हे उद्दिष्ट ठेवूनच लेखनाची निवड केली आहे. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गाला गांधीवाद आणि समाजवाद या दोहोंचे महत्त्व पटविण्याचे—लोकशिक्षणाचे—कार्य हा आचार्यांच्या लेखनाचा हेतू होता. त्यासाठी ते एकाच वेळी अनेक नियतकालिकांमधून त्याच विषयावर लेख लिहीत. चालू घडामोडींचा अन्वयार्थ सांगतानाच तात्त्विक चर्चा करीत. त्यामुळे त्यांच्या अनेक लेखांमध्ये तेच—ते मुद्दे आढळतात. त्यांच्या शैलीचा भाग म्हणून आणि वाचकाला विषय समजावण्यासाठी एक गरज म्हणूनही त्यांचे लेखन अनेकवेळा काहीसे पाल्हाळीक, निरूपणात्मक आणि तपशिलांनी भरलेले आढळते. विस्तृत अवतरणे हेही त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय असे.

या लेखसंग्रहासाठी निवड करताना शक्यतो पुनरुक्ती होत असलेले लेख वगळले आहेत. तसेच मुख्यतः तात्कालिक राजकीय संदर्भावरच भर

देणारे लेखही समाविष्ट केलेले नाहीत. काही लेखमालांचे लेख येथे एकाच मथळ्याखाली घेतले आहेत. विविध नियतकालिकांमध्ये या विषयावर आचार्यांनी लिहिलेल्या लेखांपैकी जवळपास चाळीस लेखांना येथे स्थान दिले आहे. त्याखेरीज आधुनिक राज्यमीमांसा, शास्त्रीय समाजवाद, जीवनरहस्य आणि आधुनिक भारत या चार पुस्तकांमधील उतारेही घेतले आहेत. गांधीवाद आणि महात्मा गांधींचे दर्शन या दोन पुस्तकांतील चर्चा प्रामुख्याने परिचयात्मक असल्याने त्यातील उतारे येथे घेतले नाहीत. त्याचप्रमाणे 'आधुनिक राज्यमीमांसा' मध्ये शास्त्रीय समाजवादाची विस्तृत चर्चा आहे. पण येथे 'शास्त्रीय समाजवाद' या पुस्तिकेतील उतारे विस्ताराने घेतले असल्याने 'आधुनिक राज्यमीमांसा' मधील त्या विषयावरील उतारे घेतलेले नाहीत.

निवडलेल्या लेख/उताऱ्यांचेही आवश्यक तेथे संक्षेप केले आहेत. पुनरुक्ती, मोठी अवतरणे किंवा केवळ तात्कालिक राजकारणाची चर्चा असलेले भाग तेवढे वगळले आहेत. लेखसंग्रह आटोपशीर व्हावा आणि जास्तीत जास्त लेखांचा समावेश करता यावा या दृष्टीने असे संक्षेप करणे गरजेचे वाटले. मात्र असे संक्षेप करताना लेखनाचे मूळ सूत्र हरवणार नाही तसेच आचार्यांच्या विवेचनाला कोठेही विस्कळीतपणा येणार नाही, अर्थहानी होणार नाही याची दक्षता बाळगली आहे. प्रत्येक लेखाच्या शेवटी त्याचा मूळ संदर्भ दिला आहे.

### लेखसंग्रहाची रचना

या लेखसंग्रहाची सुरुवात आपली वैचारिक वाटचाल सांगणाऱ्या आचार्यांच्या लेखापासून केली आहे. आपल्या विचारकार्याकडे बघण्याची आचार्यांची दृष्टी, त्यांचे वैचारिक गुरु आणि विविध विचारपरंपरांच्या समन्वयाचे आचार्यांचे धोरण या लेखातून स्पष्ट होत असल्याने हा लेख आरंभी घेतला आहे. बाकीचे लेख तीन भागात विभागले आहेत. पहिल्यात समाजवादविषयक लेख आहेत, यात शास्त्रीय समाजवाद, लोकशाही समाजवाद, समाजवादी पक्ष इ. विषयांवरील लेखन आहे. दुसऱ्या विभागात गांधीवादावरील लेखन आहे. गांधींचे विचार, सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान, भूदान आणि सर्वोदय हे त्यातील मुख्य विषय

आहेत. तिसरा भाग हा गांधीवाद आणि समाजवाद यांच्या तुलनेचा आणि समन्वयाचा आहे. त्यात सत्याग्रही समाजवादविषयीचे लेखन आणि गांधी–मार्क्स विचारांची तुलनात्मक चिकित्सा यांचा अंतर्भाव आहे. प्रत्येक विभागातील लेख प्रसिद्धीच्या कालानुक्रमे संग्रहात दिलेले आहेत. लेखात जेथे काही भाग वगळलेला आहे तेथे ... अशा टिंबांनी त्याचा निर्देश केला आहे. बहुतेक सर्व शीर्षके व उपशीर्षके ही मुळातीलच असून ती कायम ठेवली आहेत. जेथे वेगळे उपशीर्षक/शीर्षक दिले आहे तेथे ते [ ] अशा कंसात दिले आहे. तसेच जेथे आचार्यांच्या लेखनाव्यतिरिक्त अन्य उल्लेख अथवा संपादकीय टीपा आहेत तेथेही [ ] असा कंस टाकून लहान टाईप वापरला आहे. लेखांचे संक्षेप करताना आवश्यक तेथे संपादकीय टीपांद्वारे संक्षेप केलेल्या मजकुरात काय मुद्दे आहेत याचा उल्लेख केला आहे. मुद्रणाच्या सोयीसाठी आचार्यांचे शुद्धलेखन मुळाबरहुकूम न घेता शुद्धलेखनाच्या नवीन नियमांप्रमाणे शुद्धलेखन करून घेतले आहे.

संग्रहाच्या शेवटी आचार्यांनी लेखन केलेल्या विविध नियतकालिकांचे त्या–त्या वेळचे संपादक आणि ज्या ग्रंथांचे संदर्भ आचार्य देतात त्यांचे प्रकाशनविषयक तपशील दिले आहेत.

### – दोन –

वयाच्या तिशीत जावडेकर मार्क्सवादाच्या पद्धतशीर अभ्यासाकडे वळले. लवकरच ते मार्क्सवादातील अनेक तत्त्वांचे समर्थक बनले. गांधींविषयीच्या त्यांच्या प्रथमपासूनच्या अनुकूल भूमिकेमुळे त्यांची भारतातील कम्युनिस्टांशी जवळीक होण्याचा प्रश्नच नव्हता. पण १९२८–२९ पासूनच्या त्यांच्या लेखनात मार्क्सवाद मराठी वाचकांना समजावून सांगण्याचा सतत प्रयत्न दिसतो. त्यांनी करून दिलेला मार्क्सवादाचा परिचय केवळ राज्यशास्त्राचा अध्यापक या नात्याने करून दिलेला नव्हता. रशियन राज्यक्रांतीवरील त्यांच्या लेखमालेपासूनच असे दिसते की, मार्क्सविचारातील बऱ्याच घटकांविषयी

त्यांनी वेळोवेळी आपली सहमती स्पष्टपणे व्यक्त केली आहे. इतकेच नाही तर भारतातही समाजवादी क्रांती घडून यायला हवी या मताचा त्यांनी पुरस्कार केलेला दिसतो. भांडवलशाही व्यवस्थेचे मार्क्सवादी विश्लेषण त्यांना मान्य होते. याचा अर्थ खाजगी मालकीवर आधारित उत्पादनपद्धती स्वार्थमूलक आणि शोषणप्रधान असते हे जावडेकरांना मान्य होते. अशा शोषणप्रधान व्यवस्थेत वरकड किंवा अतिरिक्त मूल्याचे हरण होते हा सिद्धान्तही त्यांनी स्वीकारलेला होता. याच भूमिकेतून १९३४ मध्ये त्यांनी **व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला** हा लेख लिहिला. त्याचप्रमाणे विरोधविकासी भौतिकवादाचा विचारही त्यांनी स्वीकारलेला दिसतो. मार्क्सच्या भौतिकवादाचे समर्थन करताना तो यांत्रिक भौतिकवादाहून वेगळा असल्याचे त्यांनी वारंवार प्रतिपादिले आहे. भौतिकवादात सर्वच घटनाक्रम हा पूर्वनिश्चित असतो, भौतिकवाद नियततावादी आहे, त्यात व्यक्तीच्या स्वतंत्र प्रेरणांना स्थान नसते असे आक्षेप या विचारावर घेतले जातात. त्यांचा परामर्श जावडेकर घेतात. किशोरीलाल मश्रुवाला यांच्या Gandhi and Marx या पुस्तकाच्या प्रस्तावनेत विनोबांनीही यासारखे आक्षेप घेतले तेव्हा नवभारतातून जावडेकरांनी त्याचा प्रतिवाद केल्याचे आढळते. **विरोधविकासी भौतिकवाद आणि इतिहासमीमांसा** या लेखात त्यांनी या मुद्याची सविस्तर चर्चा केली आहे (हा लेख या संग्रहात समाविष्ट केलेला नाही). 'मनुष्याच्या बुद्धीच्या अंगी बाह्य परिस्थितीचे प्रतिबिंब पाडून घेण्याचे व तिचे आकलन करण्याचे जसे सामर्थ्य आहे, तसेच त्या परिस्थितीचे गुणदोष विवेचन करण्याचे आणि तिच्यावर आपला प्रभाव पाडून आपणास अनुकूल स्वरूप प्राप्त करून देण्याचेही सामर्थ्य आहे हे मार्क्सवाद मोकळ्या मनाने मान्य करतो, पण हे मानवाचे विचारस्वातंत्र्य व क्रियास्वातंत्र्य यालाही भौतिक मर्यादा आहेत व त्या मर्यादा ओळखून मनुष्याला आपला इतिहास बनविता येईल असे मार्क्सला सांगावयाचे आहे." (**विरोधविकासी भौतिकवाद आणि इतिहासमीमांसा,** दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ, चित्रशाळा, पुणे, १९४७, पृ. १६६).

वर्गविहीन आणि राजदंडविरहित समाजाचे मार्क्सवादाचे ध्येयही जावडेकरांना मान्य आहे. ह्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी क्रांतिवादाची

गरज ते मान्य करतात. आर्थिक परिस्थितीतील बदलांप्रमाणेच उत्पादनसंबंधात आणि इतरही क्षेत्रात आमूलाग्र बदल असा त्यांचा क्रांतिवादाचा अर्थ आहे. या अर्थामध्ये ते माणसांच्या मनोवृत्तीतील बदल आणि सांस्कृतिक मूल्यांमधील बदल यांचाही अंतर्भाव करतात. राज्ययंत्र नाहीसे होण्यापूर्वी नियोजन आणि समाजसत्ताक उत्पादनपद्धती आवश्यक आहेत असे ते मानतात. मार्क्सवादाच्या अभ्यासाआधीच फेबियन समाजवाद्यांच्यामुळे आपण समाजवादी बनलो असे जरी जावडेकरांनी म्हटले असले तरी त्यांनी प्रत्यक्षात मात्र 'शास्त्रीय' समाजवादाचीच कड घेतली. 'भावनामय' समाजवादाचा त्यांच्यावर फारसा कधी प्रभाव पडलेला दिसत नाही.

**मार्क्सवादाची चिकित्सा**

शास्त्रीय समाजवादाची व्यापक उद्दिष्टे मान्य असूनही जावडेकर मार्क्सवादाची काटेकोर चिकित्सा करतात. मार्क्सवादाची नीती आणि धर्मविषयक भूमिका त्यांना मान्य नव्हती. त्याचप्रमाणे मार्क्सप्रणीत क्रांतितंत्राविषयीही त्यांचे मतभेद होते. हे मतभेद फेबियन किंवा लोकशाही समाजवादावर आधारलेले नसून गांधीवादावर आधारलेले आहेत हे लक्षात घ्यायला हवे. मार्क्सवादात नीती परिस्थितिसापेक्ष मानली असून नीतिमूल्ये कायमस्वरूपी मानलेली नाहीत. सामाजिक व्यवहारांचे अनेक मानदंड परिस्थितिसापेक्ष असणार हे जावडेकरांना मान्य आहे. पण अशा व्यवहारलक्षी मानदंडांच्या पलीकडे चांगल्या वाईटाच्या, सत् आणि असत् च्या, किंवा मंगल आणि अमंगलाच्या काही कायमस्वरूपी, मार्गदर्शक मूल्यकल्पना असतात आणि त्यांच्याआधारे एकूण मानवी व्यवहारांचे मूल्यमापन होऊ शकते अशी त्यांची धारणा होती. नैतिकता ही कालसापेक्ष, वर्गसापेक्ष किंवा उत्पादनप्रक्रियासापेक्ष असू शकत नाही असे त्यांचे म्हणणे होते. मार्क्सवादाच्या भौतिकवादी आणि वर्गवादी विश्लेषणात अशा प्रकारच्या स्थिर नीतिकल्पनेला स्थान नाही याविषयी जावडेकरांचा मार्क्सवादाशी मतभेद होता.

धर्माचे मार्क्सवादी विश्लेषणही त्यांना अपुरे आणि नकारात्मक वाटले. याचे कारण स्वतः जावडेकरांनी त्यांच्या सर्व विचारात धर्मकल्पना ही उन्नत आणि व्यापक अर्थाने वापरली आहे. सद्वर्तन, सार्वजनिक हितासाठी झटण्याची

आत्मप्रेरणा आणि चिकित्सक बुद्धी यांना ते धर्म मानतात. साहजिकच अशा धर्माला मार्क्सची टीका लागू होणार नाही. पण जावडेकरांची तक्रार अशी दिसते की मार्क्सच्या भौतिकवादी विश्लेषणात अशा आत्मप्रेरणेला पुरेसा वाव नाही, मार्क्सवाद या धर्मभावनेला गौण लेखतो. त्यामुळे प्रगल्भ क्रांतिशक्ती उभी राहण्यात अडथळा येतो. क्रांतीच्या ध्येयावर अविचल निष्ठा बाळगून समाजाला क्रांतिप्रवण करण्यासाठी व्यक्तीला स्फूर्ती देणारी धर्मभावना अस्तित्वात नसेल किंवा दुर्लक्षित असेल तर क्रांतीला जबरदस्तीचे 'हत्याग्रही' स्वरूप प्राप्त होते ही आचार्यांची भीती असावी. सत् तत्त्वाचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे असे ते मानीत. त्यामुळे मार्क्सवादातील निव्वळ शास्त्रीयता त्यांना पुरेशी वाटली नाही. भौतिक परिस्थितीइतकेच त्यांच्या लेखी ह्या धर्मभावनेचे महत्त्व आहे.

### अनियंत्रित कामगारशाहीचे आडवळण

मार्क्सवादी क्रांतितंत्रातील कामगारवर्गाची हुकूमशाही आणि हिंसाविषयक भूमिका हे मतभेदाचे अन्य दोन मुद्दे होत. अनियंत्रित कामगारशाहीला एके ठिकाणी जावडेकरांनी 'समाजसत्ताक लोकशाही मार्गातील एक आडवळण' असे म्हटले आहे (प्रस्तावना, वा. दा. मुंडले, कार्ल मार्क्स व त्याचे कार्य, १९४५, पृ. ११, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर). भांडवलशाही व्यवस्था असताना शोषित वर्ग आणि त्याचे पाठीराखे परिवर्तनाचे प्रयत्न सुरू करतात. अशा वेळी भांडवलदारवर्गाने जर आपले वर्चस्व राखण्याचा चंग बांधला तर शोषित वर्गाला राज्ययंत्र ताब्यात घेण्यावाचून अन्य मार्गच राहणार नाही. हे टाळण्यासाठी राज्यसंस्थेने कायदे करून उत्पादनसंबंध बदलण्याच्या दिशेने पावले टाकली पाहिजेत असे जावडेकरांचे म्हणणे होते. हा मार्ग लोकशाही समाजवादाशी मिळताजुळता आहे. जावडेकर या मार्गाचा गांधीवादी दृष्टीतून विचार करतात. परंतु या मांडणीतून ते निर्णायक वर्गसंघर्षाची वस्तुस्थिती आणि निकड अमान्य करतात की काय असा प्रश्न उद्भवतो. कारण राज्यसंस्थेच्या अशा मध्यस्थीची परिणती दोन्ही वर्गांचा प्रत्यक्ष हितसंघर्ष टाळण्यातच होते. भूदानावरील लेखनातही श्रीमंत वर्गाने आपखुषीने आपल्या हिताला मुरड घातली नाही तर इथे कम्युनिस्ट क्रांती होईल अशा प्रकारचा

सावधगिरीचा इशारा जावडेकर काहीवेळा देतात. वर्गसंघर्षाविषयीच्या भूमिकेतील संदिग्धतेबरोबरच कामगारवर्गाच्या राज्याबद्दलच्या जावडेकरांच्या साशंकतेला अन्य कारणेही आहेत. एकतर 'अनियंत्रित कामगारशाही' या कल्पनेतील नियंत्रणाचा अभाव लोकशाहीला मारक आणि अंतिमत: क्रांतीलाही घातक ठरणार ह्या भावनेतून जावडेकर या कल्पनेला विरोध करतात. दुसरे म्हणजे अशी कामगारशाही ही व्यवहारात कामगारांच्या पक्षाच्या सत्तेत रूपांतरित होणार हे बोल्शेविक रशियाच्या अनुभवावरून जावडेकरांना दिसत होते. अशी एकपक्षीय हुकूमशाही अमान्य असल्याने कामगारवर्गाच्या राज्याविषयी त्यांचे मार्क्सवादी विचाराशी मतभेद होते.

मार्क्सवादाची हिंसाविषयक भूमिका त्यांना पूर्णतया अमान्य होती. सशस्त्र क्रांतीचा मार्क्सवादी करीत असलेला पाठपुरावा, क्रांतीचे विरोधक दडपून टाकण्यासाठी होणारा हिंसेचा सढळ वापर आणि हिंसेविषयीची मार्क्सवाद्यांची न-नैतिक (a-moral) भूमिका या साऱ्यांनाच जावडेकरांचा विरोध होता. मार्क्सने सरसकट हिंसेच्या मार्गाचा पुरस्कार केलेला नाही याची त्यांना जाणीव होती. परंतु साध्य–साधन संबंधांविषयीची त्यांची भूमिका मार्क्सवाद्यांहून अगदी भिन्न होती. येथेही गांधीवादी भूमिकेतून ते मार्क्सवादाचे परिशीलन करताना दिसतात.

मार्क्सवादाने हिंसेच्या प्रश्नाविषयी नैतिक भूमिका घेतली नाही म्हणून त्याला दोष देत असतानाच मार्क्सच्या काळात अहिंसक क्रांतिशास्त्र अस्तित्वातच नव्हते याचे भान ते ठेवतात. त्यामुळे मार्क्सवादात अहिंसेचा पुरस्कार नाही म्हणून ते मार्क्सवाद त्याज्य ठरवित नाहीत तर फक्त मार्क्सवादी क्रांतितंत्रात फेरफार केले पाहिजेत व ते अहिंसक क्रांतिशास्त्र बनविले पाहिजे अशी भूमिका घेतात.

### स्टॅलिनचे मूल्यमापन

मार्क्सवादाविषयी हे मतभेद असूनही बोल्शेविक क्रांती आणि स्टॅलिन यांच्या यशापयशाचे जावडेकरांनी वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले आहे. रशियन राज्यक्रांतीवरील त्यांच्या १९२८–२९ मधील लेखमालेत त्यांनी बोल्शेविकांविषयी बरेच गौरवोद्गार काढलेले दिसतात (या लेखमालेतील काही भाग या संग्रहात

घेतला आहे.). **मार्शल स्टॅलिनचे कार्य आणि त्याचे स्वरूप** (सह्याद्रि, एप्रिल १९५३) या स्टॅलिनवरील मृत्युलेखात स्टॅलिनच्या क्रांतिकारक रणगाड्या-खाली चिरडलेल्यांचा उल्लेख करतानाच रशियन राष्ट्रउभारणीचे त्याचे कार्यही ते वर्णन करतात (हा लेख या संग्रहात घेतलेला नाही). मुख्य म्हणजे केवळ स्टॅलिनच्या व्यक्तिमत्त्वावर ते खापर फोडीत नाहीत आणि स्टॅलिन व ट्रॉट्स्की दोघांचीही विरोधकांबद्दलची भूमिका एकसारखी होती याचा निर्देश करतात. या मृत्युलेखात रशियात लोकशाही नाही याबद्दल भावनाधिष्ठित त्रागा न करता जावडेकर बोल्शेविक क्रांतीचा उदय आणि विकास यांचा आढावा घेतात. स्टॅलिनने जागतिक क्रांतीपेक्षा रशियन राष्ट्रवादावर भर दिला असा त्यांचा अभिप्राय आहे. कोरड्या, तर्ककठोर शास्त्रीयतेतून येणारा समाजवाद सक्तीचा असतो, त्याला न्याय आणि प्रेम या तत्त्वांची जोड द्यायला हवी असे जावडेकरांना वाटते. या दृष्टीने मार्क्सवाद अपुरा पडतो म्हणून त्याचे पुनर्मूल्यांकन व्हायला हवे असे ते यानिमित्ताने बजावतात : 'आज समाजवादाची अथवा समाजसत्ताक क्रांतीचीही मानवसंस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यकता आहे हे आम्हास मान्य आहे, पण त्या समाजवादाचा भूतदया, न्यायनिष्ठा अथवा पीडित जनतेसंबंधीचे प्रेम यांच्याशी काही संबंध नाही व ते एक शास्त्रीय सत्य आहे म्हणून नव्हे. तर त्याच्या उलट, मानवी अंत:करणातील भूतदया, न्यायनिष्ठा आणि प्रेमवृत्ती यांच्या विकासास तो समाजवाद व ती समाजवादी क्रांती पोषक होतील म्हणून मान्य आहे. समाजशास्त्र आणि सामाजिक क्रांतिशास्त्र यांची मानवी अंत:करणातील न्याय, दया व प्रेम या वृत्तीशी ताटातूट करण्याचा विचार मानवसंस्कृतीचा उद्धार करू शकणार नाही. याच्या उलट न्यायनिष्ठा, भूतदया आणि प्रेमवृत्ती यांच्या अधिष्ठानावर उभारलेले समाजशास्त्र व सामाजिक क्रांतिशास्त्र मानवाला हवे आहे.' (सह्याद्रि, एप्रिल १९५३, पृ. २१९–२०).

**भारतातील समाजवाद्यांना पाठिंबा**

बोल्शेविक धर्तीच्या मार्क्सवादाविषयीच्या या मतभेदांमुळे आचार्य जावडेकर 'लोकशाही समाजवादा'च्या पुरस्काराकडे वळले. मात्र युरोपातील लोकशाही समाजवाद्यांचा 'सनदशीर'पणावरील भर त्यांना अनाठायी वाटला. त्यामुळे

भारतातील लोकशाही समाजवाद्यांनी सत्याग्रही संघर्ष करावा अशी भूमिका त्यांनी घेतलेली दिसते. या मुद्याची अधिक चर्चा पुढे केलेली आहे.

भारतीय राजकारणातही त्यांनी प्रथमपासून काँग्रेसमधील समाजवाद्यांचा पाठपुरावा केला. पुढे ते प्रजासमाजवादी पक्षाचे पाठीराखे बनले. समाजवादी पक्षाची आवश्यकता प्रतिपादन करणारे दोन लेख या संग्रहाच्या पहिल्या भागात समाविष्ट केले आहेत. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने समाजवाद्यांना बाहेर पडण्यास भाग पाडले ही काँग्रेसची चूक झाली असे प्रतिपादन त्यांनी सातत्याने केले. प्रजासमाजवादी पक्ष स्थापन झाल्यावर त्याचे स्वागत करून हा पक्ष मार्क्स–गांधी दोघांच्याही अनुयायांचा मिळून बनलेला पक्ष असेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. मात्र 'शुद्ध सत्याग्रही हा राजकीय पक्षात असूच शकत नाही' या त्यांच्या भूमिकेमुळे (या मुद्याची चर्चा पुढे केली आहे) व्यवहारत: प्रजासमाजवादी पक्ष हा लोकशाही समाजवादी पक्षच असेल अशी मांडणी करणे त्यांना भाग पडते. खऱ्या गांधीवाद्यांना पक्षीय राजकारणात स्थान नाही असे ते मानीत असल्यामुळे राजकारण आणि पक्षीय धोरण यांत गांधी विचार आणि समाजवादाचा समन्वय कसा करायचा हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. त्यामुळे प्रजासमाजवादी पक्षात जेव्हा अंतर्गत संघर्ष उभा राहिला तेव्हा तो संघर्ष लोकशाही समाजवादी भूमिका भारतीय संदर्भात घेत असताना उभा राहणारा अपरिहार्य संघर्ष आहे का याचा उलगडा न करता केवळ व्यक्तिगत स्वभाववैशिष्ट्यांचा तो परिपाक आहे एवढेच जावडेकर म्हणू शकले (**प्रजासमाजवादी पक्षावरील गंडांतर,** साधना, १६ आणि २३ जुलै १९५५).

– तीन –

गांधींच्या पहिल्या असहकार चळवळीपासूनच जावडेकर गांधीवादाकडे ओढले गेले. सत्याग्रहामागील व्यवहार आणि तात्त्विक भूमिका यांचे अचूक आकलन त्यांना या सुमारासच झाले होते. या संग्रहातील 'सत्याग्रह युद्धनीती' हा लेख त्याचीच साक्ष देतो. मात्र आरंभीच्या काळातील त्यांचे गांधीवादाविषयीचे लेखन मुख्यत: टिळक–गांधी यांची तुलना करणारे होते. मागे

उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील टिळक अनुयायांना गांधीवादाचे महत्त्व समजावून सांगणे आणि त्यांना गांधींच्या चळवळीत येण्यास प्रवृत्त करणे हा या आरंभीच्या लेखनाचा हेतू होता. त्यामुळे टिळकांची रणनीती 'जशास तशी' असली तरी मुख्य ध्येय नि:शस्त्र क्रांती हेच होते आणि गांधींच्या सत्य आणि अहिंसा या उद्दिष्टांशी टिळकविचाराचा मतभेद नाही असे प्रतिपादन जावडेकर करताना दिसतात. या प्रकारचे लेख त्यांच्या 'लो. टिळक व म. गांधी' (सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे १९४६) या लेखसंग्रहात समाविष्ट केले आहेत. त्याच्या प्रस्तावनेतही टिळकपक्षाच्या नावाने गांधीयुगातील राष्ट्रसभेला जे विरोध करीत होते त्यांचे प्रयत्न खोडून काढण्यासाठी हे लेखन केल्याचे आचार्यांनी म्हटले आहे. 'राजकीय धोरण असो किंवा तत्त्वज्ञान असो, दोन्हीही बाबतींत महात्मा गांधींचे धोरण टिळकांच्या धोरणाशी पूर्णपणे विसंगत आहे असे म्हणणारांचा पक्ष खोडून काढून गांधींचे धोरण व तत्त्वज्ञान टिळकांच्या धोरणाचा व तत्त्वज्ञानाचा विकास अथवा पुढील पायरी होऊ शकते, हे दाखवून देणे हाच यांपैकी बहुतेक लेखांचा हेतू आहे' (पृ. २).

### गांधी विचाराचा समाजवादी अन्वयार्थ

टिळक आणि गांधी यांची तुलना करणारे लेखन वगळता गांधीवादावरील इतर सर्व लेखनात जावडेकर गांधीविचार समाजवादाच्या चौकटीत मांडतात. त्यांची गांधीवादाची मांडणी ही खरे तर सत्याग्रही समाजवादाचीच मांडणी आहे. गांधीविचार हा केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्यापुरता मर्यादित नाही हे त्यांनी स्पष्ट केले आहे : 'सत्याग्रह हा एक भौतिक युद्धाचा अहिंसक पर्याय आहे असे म. गांधी म्हणत असत. पण हा पर्याय राष्ट्राराष्ट्रातील युद्धांपेक्षा राष्ट्रांतर्गत वर्गयुद्धाच्या कामी अधिक त्वरित आणि सुलभतेने प्रभावी होऊ शकेल. . . . हे जर आपण ओळखले, तर म. गांधींचा सत्याग्रही संदेश आजच्या परिस्थितीत कसा अमलात आणावा याचेही ज्ञान आपणास होऊ शकेल.' अशी त्यांची सत्याग्रहाविषयीची भूमिका आहे. (**महात्मा गांधी आणि भगवद्गीता**, नवभारत, ऑक्टोबर १९५२, पृ. ९)

त्याचप्रमाणे गांधीवाद हा आध्यात्मिक उन्नतीवर अनाठायी भर देऊन भौतिकाचे अस्तित्व नाकारणारा विचार नाही असे आचार्यांचे ठाम प्रतिपादन

असे. पण जसे मार्क्सवाद्यांमध्ये केवळ भौतिकावरच भर देणारे लोक असतात तसे गांधीवाद्यांमध्ये काही जण भौतिकाला गौण लेखणारे असतात. त्यांच्यापासून गांधींची सोडवणूक करून गांधीविचार हा भौतिकाची चर्चा टाळीत नाही हे जावडेकरांना वाचकांवर ठसवायचे होते. त्यांच्या दुर्दैवाने गांधीवाद्यांमध्ये बरेच जण भौतिकाला हिणवणारे अध्यात्मवादी असत. त्यांच्यासंबंधी जावडेकर म्हणतात, 'केवळ भौतिक किंवा आर्थिक उन्नतीचा प्रश्न सोडविल्याने मानव संस्कृतीचे सर्व प्रश्न सुटतात हा भौतिकवाद्यांचा भ्रम आहे. त्याचप्रमाणे केवळ आत्मिक पुरुषार्थाचा प्रश्न सोडविल्याने सर्व प्रश्न सुटतील हा अध्यात्मवाद्यांचा भ्रम आहे. असा भ्रम बराच गांधीवाद्यांत दिसून येतो, हे डॉ. लोहिया यांचे मत बरोबर दिसते.

'हे खरे असले तरी गांधीवादाने भौतिक उन्नतीच्या प्रश्नालाही काही अंशी महत्त्व दिल्यामुळेच गांधीवादाने राजकीय व सामाजिक क्रांतीचे तंत्र शोधून काढले. तथापि भौतिक विकासाच्या प्रश्नाला द्यावे तितके महत्त्व गांधीवादी देत नसल्यामुळे त्यांची इतिहासमीमांसा भौतिकवाद्यांप्रमाणेच एकांगी बनते असे म्हणता येईल.' (**इतिहासाचे चक्र** पुस्तक परिचय, लेखांक तिसरा, साधना, २ जुलै १९५५, पृ. १०, डॉ. लोहियांच्या The Wheel of History वरील परिचयपर लेखमाला).

गांधींच्या विचारातील आध्यात्मिकता किंवा धर्मभावना आणि ऐहिकता यांचा संयोग जावडेकरांना महत्त्वाचा वाटतो. वरील अवतरणात त्यांनी म्हटल्याप्रमाणे ते गांधीवाद हे राजकीय-सामाजिक क्रांतीचे तंत्र मानतात. जर गांधीविचाराला ऐहिकाचे वावडे असते तर हा क्रांतिविचार त्यात आला नसता असे ते म्हणतात. गांधीवाद हे क्रांतितंत्र असल्यामुळेच गांधीविचाराप्रमाणे अर्थराज्यव्यवस्थेचे विश्लेषण जावडेकर करताना दिसतात. म्हणूनच त्यांच्या गांधीवादाच्या मांडणीत सातत्याने वर्गयुद्ध आणि शोषण यांची चर्चा केलेली आढळते. 'समाजधारणा करण्यासाठी समाजात अनेक वेळा क्रांती करावी लागते आणि जुनी समाजघटना मोडून नवी समाजघटना करावी लागते.' (**समाजरक्षण आणि समाजक्रांती,** वाल्मिकी आश्रमातील प्रवचने, सुलभ, पुणे, १९४७, पृ. ४२) अशी जावडेकरांची भूमिका होती. आधुनिक

समाजात भांडवलदार, जमीनदार विरुद्ध शेतकरी–कामकरी या वर्गांच्या हितसंबंधात संघर्ष उभा आहे आणि तो शेतकरी–कामकरी वर्गाला अनुकूल पद्धतीने सुटला पाहिजे असा आग्रह धरतानाच हे वर्गयुद्ध सत्याग्रही मार्गाने लढले पाहिजे अशी भूमिका ते घेतात. (**महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास,** प्रा. नलिनी पंडितांच्या पुस्तकाचा परिचय, पूर्वार्ध, साधना, ३० जुलै १९५५, पृ. ११) शेतकरी–कामकरी यांचा पक्ष 'न्यायाचा, नीतीचा अथवा धर्माचा' पक्ष आहे म्हणून प्रत्येक सत्याग्रही व्यक्तीने 'त्या पक्षाच्या बाजूस समाजातील सर्व संघटित आत्मबल आणून उभे केले पाहिजे' असा जावडेकरांचा आग्रह आहे (**सत्याग्रह आणि वर्गयुद्ध,** वाल्मिकी आश्रमातील प्रवचने, पृ. २७–२८). अशा प्रकारे जावडेकर गांधींचा सत्याग्रह हा वर्गयुद्धाचा एकमेव मार्ग ठरवितात. या सत्याग्रही वर्गयुद्धात अर्थातच हिंसेला स्थान नाही. उलट वर्गयुद्धातील हिंसा टाळण्यासाठीच सत्याग्रही मार्ग अवलंबिला पाहिजे असे ते म्हणतात.

शोषणाच्या प्रश्नाचीही त्यांनी गांधीवादी दृष्टीकोनातून मांडणी केलेली दिसते. अकष्टार्जित संपत्ती आणि धनसंग्रह ही शोषणाची दोन रूपे आहेत. समाजाच्या श्रमातून निर्माण होणारी संपत्ती श्रम न करणाऱ्या वर्गाकडे जाऊ लागते आणि कायदा या व्यवहाराला संरक्षण देतो. या वस्तुस्थितीची चर्चा जावडेकरांनी प्रस्तुत संग्रहातील **चोरी आणि काम** या लेखात केली आहे ती मुळातून वाचण्यासारखी आहे. **सत्याग्रहाचा अखंड क्रांतियज्ञ** या दुसऱ्या एका लेखात आचार्य म्हणतात : 'आजच्या समाजात चोरी आणि संग्रह यांची एकसारखी वाढ होत आहे. केवळ रात्री जाऊन घर फोडणे एवढा एकच चोरीचा प्रकार आता फारच जुना झालेला आहे. व्यापार, सावकारी, जमीन-दारी आणि कारखानदारी असे चोरीचे कायदेशीर प्रतिष्ठित मार्ग ज्यांना उपलब्ध आहेत, ते या जुन्या धोक्याच्या व अडाणी मार्गाने धनसंग्रह करण्याचे पसंत करीत नाहीत. त्यांनी संग्रहाचे उघड, कायदेशीर आणि प्रतिष्ठित मार्ग शोधून काढिले आहेत. हे सर्व मार्ग अन्यायाचे, परपीडेचे आणि परवंचनेचे आहेत. याबद्दल आता शहाण्या लोकांत मतभेद उरलेला नाही. आजच्या समाजात जो धनसंग्रह होतो तो कायदेशीर चोरीवाचून म्हणजे दुसऱ्याच्या कष्टाचे फळ लुबाडल्यावाचून होत नाही, आणि अशा चोरीच्या संग्रहाचे रक्षण

हिंसेवाचून होऊ शकत नाही ... ' (वाल्मिकी आश्रमातील प्रवचने, पृ. ३२). हाच मुद्दा 'आधुनिक राज्यमीमांसे'च्या दुसऱ्या भागातही येतो (पहा : या लेखसंग्रहातील **सत्याग्रह व समाजवाद** हा लेख). तेथे भांडवलशाही धनसंपादनाचे सत्याग्रही तत्त्वज्ञानाप्रमाणे समर्थन करता येत नाही असे आचार्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

## परिस्थितिपरिवर्तनाचा प्रश्न

हे 'नैतिक चौर्य' थांबविण्याचे सामर्थ्य सत्याग्रहात आहे असा त्यांना विश्वास होता. 'अहिंसक क्रांतिवाद हाच खरा शास्त्रीय क्रांतिवाद असून साम्यवाद्यांचा शस्त्रग्राही क्रांतिवाद हा अशास्त्रीय क्रांतिवाद आहे...' असा दावा ते करतात. (**आत्मवाद आणि आत्मराज्य,** नवभारत, जानेवारी १९५५, पृ. ४). अहिंसक क्रांतीमध्ये मतपरिवर्तन, हृदयपरिवर्तन आणि परिस्थितिपरिवर्तन या तीन मार्गांचा अंतर्भाव होतो असेही ते सांगतात. (उपरोक्त पृ. ५). तथापि परिस्थितिपरिवर्तन म्हणजे निश्चित काय आणि हृदयपरिवर्तनाहून ते कसे वेगळे असते हे मात्र पुरेसे स्पष्ट होत नाही. कारण परिस्थितिपरिवर्तनासाठी असहकार पुकारला तरी पुन्हा त्याचे लक्ष्य हृदयपरिवर्तन हेच राहते. येथे परिस्थितिपरिवर्तन म्हणजे विनाश्रम संग्रहाची इतिश्री किंवा नैतिक चौर्याची समाप्ती असे मानल्यास हे परिस्थितिपरिवर्तन कसे घडवायचे हा प्रश्न गांधीवादापुढे शिल्लक राहतोच. शुद्ध गांधीवादी तर या प्रश्नाकडे फारसे वळतच नाहीत. परंतु केवळ हृदयपरिवर्तनाने परिस्थिती पालटत नाही याची जाणीव आचार्य जावडेकरांना निश्चितच होती. नैतिक चौर्याला आज असलेली कायदेशीर आणि सामाजिक प्रतिष्ठा नाहीशी झाल्यास परिस्थितिपरिवर्तनाचा मार्ग खुला होऊ शकतो हे खरे पण त्याबरोबरच असंग्रहप्रधान उत्पादनसंबंधही अस्तित्वात यायला हवेत. तेही केवळ राज्यसंस्थेने प्रस्थापित केले म्हणून नव्हे तर समाजरचनेची आंतरिक गरज म्हणून घडायला हवे. या प्रकारच्या परिस्थितिपरिवर्तनासाठीचा सत्याग्रह कसा असेल याची चर्चा फारशी झालेली दिसत नाही. सामान्यपणे गांधीवादी मंडळी या मुद्याच्या संदर्भात विश्वस्त कल्पना आणि भूदान यांच्यापाशी येऊन थबकतात.

## विश्वस्त कल्पना आणि भूदान

आजच्या समाजातील धनसंग्रहावर विश्वस्त सिद्धान्त हा पुरेसा उपाय आहे असे आचार्यांना वाटत नाही. त्यांनी 'आधुनिक भारत'च्या शेवटच्या प्रकरणात म्हटल्याप्रमाणे ज्यावेळी धनार्जनाचे मार्ग न्याय्य असतात तेव्हा संपत्ती हा समाजाचा ठेवा मानून तिचा उपभोग घ्या हा उपदेश पुरेसा ठरतो. पण आज तशी परिस्थिती नाही. अफाट धनसंचयाच्या आजच्या काळात संपत्तिवानांना हजारो लोकांच्या जीवितावर सत्ताही मिळते. त्यामुळे सत्ता व संपत्तीचा लाभ संयमाने घ्या अशा उपदेशाने क्रांतीचे कार्य होऊ शकत नाही असे मत जावडेकरांनी नोंदविले आहे (पहा : या संग्रहातील **भारतीय संस्कृतीचे अमृततत्त्व** ह्या शीर्षकाचा लेख). नवभारतातील **गांधी आणि मार्क्स** या लेखमालेतही आचार्यांनी विश्वस्त कल्पनेतील अपुरेपणा स्पष्ट केला आहे. धनसंग्रहाचे मार्ग जर अन्याय्य आणि अनैतिक असतील तर असा धनसंग्रह करणाऱ्यावर 'विश्वस्त' म्हणून कसे विसंबायचे हा या सिद्धान्तातील पेच त्यांनी व्यक्त केला आहे. किंबहुना अशा धनसंग्रहावर समाजाने टाच आणून ती संपत्ती समाजाच्या ताब्यात घेतली पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन आहे. तसेच धनिक स्वयंप्रेरणेने आपल्या संपत्तीचा सामाजिक निधी म्हणून उपयोग करणार नाहीत ही शक्यताही ते लक्षात घेतात (पहा : या संग्रहातील **गांधीवाद : समाजवाद** हा लेख). वास्तववादी दृष्टीने विचार केला असता कोणते प्रश्न विश्वस्त सिद्धांताने सुटू शकतील व कोणते प्रश्न कायद्याने वा आर्थिक क्रांतीने सुटतील याचा उलगडा होतो असे या संदर्भात जावडेकर म्हणतात. या सर्व उल्लेखांवरून विश्वस्त कल्पनेचे जावडेकरांना फारसे आकर्षण नव्हते आणि त्या मार्गाने सामाजिक क्रांती घडण्याची त्यांना आशा वाटत नव्हती हे स्पष्ट होते.

पण विनोबांच्या भूदान आंदोलनाबद्दल मात्र आचार्यांची भूमिका अत्यंत अनुकूल होती. भूदान यज्ञ म्हणजे क्रांतीची सुरुवात आहे असे प्रतिपादन ते करतात. या लेखसंग्रहातील भूदानविषयक लेख पाहिल्यास असे दिसते की सर्वांगीण क्रांतीचे सामर्थ्य या चळवळीत होते असे त्यांना वाटत होते. या चळवळीने आचार्य इतके भारावून गेलेले दिसतात की त्यामुळे या चळवळीचे

टीकात्मक मूल्यमापन करणे त्यांना शक्य झाले नाही. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दोनतीन वर्षांत भूदान आणि संपत्तिदान चळवळ, सर्वोदयसंमेलने इ. गोष्टींविषयी आचार्यांनी वारंवार गौरवपर लेख लिहिलेले दिसतात. भूदानकार्यामुळे विनोबांचा त्यांनी 'ब्रह्मर्षी' म्हणून गौरवही केलेला दिसतो. 'ऋषितुल्य जावडेकर' या चरित्रात माधव लिमयांनी आचार्यांच्या या भूमिकेचा सविस्तर आढावा घेतला आहे (पृ. १४२–१५८). भूदानाविषयीची आचार्यांची भूमिका फारच उत्साही होती हे सांगतानाच लिमयांनी अशी एक शक्यता व्यक्त केली आहे की या पाठीमागे गांधीवाद्यांपुढील कोंडी हे एक कारण असू शकेल. स्वातंत्र्योत्तर काळात गांधीवादी वेगाने निष्क्रिय बनत गेले आणि सत्याग्रहवृत्तीपासूनही परावृत्त होत गेले. या वातावरणात भूदान आंदोलनामुळे कार्यकर्त्यांना अहिंसक परिवर्तनाचे एक दालन खुले झाले. यामुळे जावडेकरांच्या आशा नक्कीच पल्लवित झाल्या असणार. पण त्याखेरीज भारताच्या तत्कालीन परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना चैतन्य देणारा आणि गांधींच्या असंग्रहतत्त्वाला उजाळा देणारा भूदानाचा कार्यक्रम ही त्यांना गांधीवादातील मौल्यवान भर वाटली हेही महत्त्वाचे आहे.

भूदानाचे स्वागत करीत असताना हा विश्वस्तसिद्धांताचाच एक विस्तार आहे याकडे त्यांचे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते. आपण वर पाहिल्याप्रमाणे धनसंचयाचे मार्ग कोणते हा प्रश्न जर महत्त्वाचा असेल तर केवळ त्या धनाचा त्याग काही व्यक्ती करतात एवढ्याने ते समाजक्रांतीचे निदर्शक ठरत नाही. तसेच स्वतः आचार्यांनीच म्हटल्याप्रमाणे धनवान आपल्या धनाचा स्वेच्छेने सदुपयोग करण्याची किंवा 'निधी' म्हणून सांभाळ करण्याची शक्यताही कमीच असते. अशा परिस्थितीत केवळ काही जमीनदार काही जमीन देण्यास तयार झाले एवढेच पुरेसे ठरत नाही. या जमिनी बहुतेक वेळा कायदेशीर किंवा गैरकायदेशीर मार्गांनी आपल्याच कुळांपासून त्यांनी बळकाविल्या असणार. तेव्हा स्तेयातून केलेल्या संग्रहाचे दान हे 'यज्ञ' किंवा 'क्रांती' कसे ठरवायचे हा प्रश्न राहतोच.

दुसरे असे की भूदान चळवळीत विनोबा व इतर लहानमोठे नेते यांचे आवाहन वगळता स्थानिक जनतेच्या नैतिक आग्रहाचा भाग कितपत असे

हाही प्रश्न आहेच. म्हणजेच ज्याला 'सत्याग्रही संघर्ष' म्हणता येईल असा संघर्ष भूदानात कितपत अभिप्रेत होता ? ( येथे प्रत्यक्ष चळवळीत तो संघर्ष किती प्रमाणात होता हा प्रश्न नाही, तर भूदानाच्या तात्त्विक भूमिकेत संघर्ष किती अभिप्रेत होता हा प्रश्न आहे. ) विनोबांचा मुख्य भर नैतिक आवाहन, हृदयपरिवर्तन आणि वर्गहितसमन्वय यांवरच होता. सगळ्या जमिनी दान करून टाकणारे दाते त्यांना मिळाले असतीलही पण भूदान चळवळीचा भर गावातील भूमिहीनांना काही थोडी जमीन देण्यावर होता. त्याला साधन सामग्रीचे फेरवाटप म्हणता येणे अवघड आहे. भूदानाच्या भूमिकेची ही तात्त्विक मर्यादा आचार्य जावडेकरांनी लक्षात घेतली नाही असे म्हणावेसे वाटते. किंबहुना भूदान चळवळीच्या तात्त्विक बैठकीची चिकित्सा त्यांनी अजिबातच केली नसल्याचे दिसते.

कदाचित त्यांची आशावादी दृष्टी हे त्याचे एक कारण असेल किंवा विनोबांचा दृष्टिकोन सत्याग्रही संघर्षाला प्राधान्य देण्याचा नाही हे त्यांच्या पुरेसे ध्यानात आले नसेल. पण ज्या हिरिरीने त्यांनी भूदानाचे समर्थन आणि पाठपुरावा केला आहे ती लक्षात घेता भूदानामुळे सामाजिक क्रांतीला चालना मिळेल आणि शांततामय क्रांती घडून येईल याविषयी त्यांना खात्री वाटत होती हे नक्की.

### शुद्ध सत्याग्रही

गांधीवादी विचाराप्रमाणे अंतिमतः राज्ययंत्र नाहीसे झाले पाहिजे हे आचार्यांना मान्यच होते. मात्र राज्ययंत्र 'गळून पडण्याची' स्थिती प्राप्त होईपर्यंत राज्ययंत्राची आवश्यकता राहणार, दंडसत्तेची गरज राहणार हे त्यांनी स्पष्ट केले आहे. म्हणून ते एकाच वेळी दोन चळवळींचा पुरस्कार करताना दिसतात. एका बाजूला राज्ययंत्राचे नियंत्रण शोषणरहित एकवर्ग समाजाचा पुरस्कार करणाऱ्यांकडे जाण्यासाठीची चळवळ त्यांना स्वागतार्ह वाटते तर दुसरीकडे आत्मबल विकसित करणारी, राज्यावरील अवलंबित्व कमी करणारी आत्मवादी चळवळही त्यांना आवश्यक वाटते. म्हणूनच समाजात या दोनही प्रकारचे राजकारण चालणार असे ते म्हणतात. ज्यांना राज्ययंत्र सत्याग्रही मार्गाने नाहीसे करावयाचे आहे त्यांना त्या राज्ययंत्राच्या

व्यवस्थापनात जागा देण्यास जावडेकर तयार नाहीत. याचे कारण राज्ययंत्राचे व्यवस्थापन म्हणजे शस्त्रबल, हिंसा आणि सक्ती यांचा कमीअधिक अपरिहार्य वापर होय. 'शुद्ध सत्याग्रही' असे करू शकणार नाहीत. त्यांनी सत्ता–संघटनांच्या बाहेर राहून जनतेच्या आत्मिक उन्नतीसाठीची चळवळ करावी. पण ज्या गांधीवाद्यांना सत्तेचे राजकारण करावयाचे असेल त्यांनी काय करावे? आचार्यांचे उत्तर असे की त्यांनी एखादा स्वतंत्र पक्ष स्थापून किंवा लोकशाही समाजवादी पक्षात प्रवेश करून समाजवादी राजकारण करावे. म्हणजे समाजवादी कायदे घडवून आणावेत आणि समाजवादी कार्यक्रमासाठी चळवळ करावी. त्यांना आचार्य 'शबल सत्याग्रही' असे नाव देतात (**प्रजा समाजवादी पक्ष आणि मार्क्स–गांधी**, साधना, १ नोव्हेंबर १९५२).

शबल सत्याग्रहींनी समाजवादी राजकारण करावे, शुद्ध सत्याग्रह्यांनी शुद्ध गांधीवादी राजकारण करावे, मात्र योग्य तेथे 'शबल' सत्याग्रह्यांना पाठिंबाही द्यावा. ते सत्तेचा गैरउपयोग करतील तर विरोध करावा, असे आचार्यांचे प्रतिपादन आहे. 'शुद्ध' सत्याग्रह्यांनीही राजकारण करायचे आहे, सत्तासंन्यास म्हणजे राजकारण संन्यास नाही हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे, त्याचप्रमाणे आपण 'शुद्ध' सत्याग्रही आहोत ह्याचा त्यांनी अहंकारही बाळगू नये असे जावडेकर म्हणतात. (**सत्तेचे राजकारण आणि सेवेचे राजकारण**, साधना, १८ जून १९४९, पृ. ७) तथापि शुद्ध आणि शबल या शब्दांतच सत्याग्रह-निष्ठेची एक उतरंड सूचित होते, शिवाय कोण शुद्ध सत्याग्रही बनणार आणि कोण शबल सत्याग्रही हे कसे ठरणार? त्यात प्रकृतिभेद तर असेलच पण त्या पलीकडे जाऊन कोणाची सत्याग्रहनिष्ठा जास्त कडक आहे यावरही ते ठरणार. कारण शबल सत्याग्रहीला आपण राज्ययंत्रामार्फत काही करावे / करू शकतो असे वाटते तोपर्यंत त्याची सत्याग्रहनिष्ठा काहीशी उणी किंवा पातळच असणार. जावडेकरांनीच म्हटल्याप्रमाणे, 'सत्तेचे राजकारण आणि सेवेचे राजकारण यांपैकी कोणी कोणते करावे ते प्रत्येकाने आपआपल्या प्रकृतिगुणा-नुसार ठरवावे अथवा आपल्या अंगच्या आध्यात्मिक बळाच्या विकासानुसार ठरवावे...' (उपरोक्त) शुद्ध सत्याग्रहींचा आध्यात्मिक विकास अधिक झालेला असणार असेच यातून सूचित होते. निव्वळ जनहिताचे राजकारण

करणाऱ्या या लोकसेवकांनाच अन्यत्र आचार्यांनी यतिवर्गाची उपमा दिली आहे. **राजधर्म, प्रजाधर्म व यतिधर्म** (लोकशिक्षण, ऑक्टोबर १९३८) या लेखात यतिधर्माची चर्चा केली आहे : "यती म्हणजे धर्माचे जनक अथवा परब्रह्माचे उपासक होत . . . अर्थात 'यती' म्हणजे सत्यशोधक, सत्यप्रचारक व सत्यसंस्थापक होत." (पृ. २९५) ते पुढे सांगतात, 'रूढ विधिनिषेधांच्या पलीकडे जाऊन नवे विधिनिषेध घालून देण्याचे कार्य यतिवर्गाकडून व्हावयाचे असते. तथापि हे सत्यसंशोधनाचे व सत्यप्रस्थापनेचे कार्य यतिवर्ग हिंसेने करू इच्छित नाही, ही सत्यसंस्थापना तो अहिंसेने करीत असतो. अहिंसा म्हणजे प्रेम . . . पण प्रेमाने सत्याची प्रस्थापना करणाऱ्यास अपरिग्रहाचेही व्रत घ्यावे लागते. का? तर परिग्रहामुळे मोह उत्पन्न होतो आणि मोहामुळे सत्याला गौण स्थान प्राप्त होते.' (उपरोक्त पृ. २९५–२९६) अशा प्रकारच्या लोकसेवकांचे नियंत्रण राहिले तर आता राज्ययंत्राचा दुरुपयोग होणार नाही आणि भविष्यात त्या राज्ययंत्राचा निरास होण्यासाठी लागणारी आत्मिक शक्ती समाजात विकसित होईल असा जावडेकरांच्या मांडणीचा रोख आहे.

## सैतानी संस्कृतीचा विचार

जावडेकरांनी गांधींच्या विचारामधील अनेक पैलूंची चिकित्सा केली. पण एका पैलूचा त्यांनी फारसा उहापोह केलेला दिसत नाही. आधुनिक संस्कृतीची गांधींची समीक्षा हा तो पैलू होय. गांधींच्या 'हिंद स्वराज' मध्ये त्याची अगदी ठसठशीत मांडणी झाली आहे. आधुनिक पाश्चात्त्य संस्कृती ही भोग-प्रधान संस्कृती आहे. मानवाला पशुवत् बनविणारी अशी ती जीवनपद्धती आहे. असा गांधीजींच्या प्रतिपादनाचा रोख आहे. गांधींच्या ह्या मताची चर्चा जावडेकरांनी स्वतंत्रपणे केलेली नाही. युरोपची संस्कृती हिंसा आणि शस्त्रबलावर आधारित आहे म्हणून ती गांधींच्या मते सैतानी संस्कृती आहे असा उल्लेख **समाजवाद आणि अराज्यवाद** या लेखात येतो. पण आधुनिक विज्ञानाची शोषणशक्ती, भोगवादामुळे होणारा सांस्कृतिक ऱ्हास, नैतिकतेला येणारे दुय्यम स्थान यांच्याकडे जावडेकर विशेष लक्ष देत नाहीत. उलटपक्षी आधुनिक ज्ञानामुळे आज माणसाच्या दारिद्र्याचा मुकाबला करणे शक्य झाले आहे असेच त्यांना वाटते.

भारतापुढील मुख्य प्रश्न ऐहिक समस्या सोडविण्याचा असल्याने आता युरोपीय संस्कृतीला विरोध करणे त्यांना संयुक्तिक वाटले नसावे. त्याचप्रमाणे राज्यविहीन अवस्थेत अंतिमतः आत्मराज्य म्हणजे संयत सुखोपभोगच अभिप्रेत असल्याने त्यांनी आत्मराज्यावरच जास्त भर दिला असणेही शक्य आहे. संयम, अस्तेय आणि असंग्रह या तत्त्वांचा तर ते वारंवार पुरस्कार करतातच. पण असंग्रहावर उभारलेल्या समाजातही असंग्रह हा व्यक्तींच्या संदर्भात सूचित होतो. पण संपूर्ण समाजानेच कोणत्या प्रकारचे राहणीमान हे उद्दिष्ट मानावे, सार्वजनिक संग्रह किती करावा आणि ऐहिक सुखोपभोगाची मर्यादा कशी ठरवावी हे प्रश्न उरतातच.

जावडेकरांनी गांधींच्या युरोपीय संस्कृतीवरील टीकेची फारशी दखल न घेतल्यामुळे ऐहिक सुख, भोगवाद आणि आधुनिकता यांविषयी गांधींचा विचार पुढे नेण्याचे कार्य त्यांच्या विचारांतून होऊ शकले नाही. विशेषत: 'आधुनिक भारतीयत्वा'चा पुरस्कार करताना हे आधुनिक भारतीयत्व युरोपच्या भांडवली संस्कृतीला कसे सामोरे जाणार हाच स्वातंत्र्योत्तर भारतापुढचा यक्षप्रश्न आहे. त्याची उकल जावडेकर करीत नाहीत. ही उकल होत नाही तोवर भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा दावा परिणामकारक ठरू शकत नाही.

जावडेकरांच्या मांडणीत त्यांना जाणवले तेव्हा त्यांनी गांधी विचारातील त्रुटींवरही स्पष्टपणे बोट ठेवले आहे. वर आपण विश्वस्त कल्पनेविषयीचे त्यांचे विचार पाहिले आहेतच. **गांधी आणि मार्क्स** या लेखमालेत त्यांनी गांधीवादाविषयीच्या इतरही शंका नेमकेपणाने व्यक्त केल्या आहेत. समाजाची आजची कायदेशीर व्यवस्था कशी लावावी, अतिरेकी धनसंपादनाचे नियंत्रण कसे करावे, चोरालासुद्धा शिक्षा न करता आजचे राज्ययंत्र कसे चालवावे, यांसारख्या प्रश्नांविषयी गांधी आणि गांधीवादी यांची भूमिका संदिग्ध असल्याचे मत आचार्यांनी उपरोल्लेखित लेखात मांडले आहे. त्याचप्रमाणे सत्याग्रही लढ्याचे तंत्र वर्गविरोधाच्या कामी कसे उपयोगात आणावे हे गांधींच्या विचारात पुरेसे स्पष्ट होत नाही असे ते म्हणतात. त्याहीपुढे जाऊन वर्गलढा आपल्याला मान्यच नाही, अहिंसावाद्यांनी नेहमी वर्गसमन्वयाचेच धोरण बाळगले पाहिजे यासारख्या गांधींच्या उद्‌गारांचा उल्लेख करून त्यांवरून

गांधींच्या वर्गविग्रहविषयीच्या भूमिकेबद्दल संदेह निर्माण होतो असे ते सांगतात. गांधीवादातील ही प्रश्नचिन्हे ध्यानात घेऊन पुढे जाण्यावर जावडेकरांचा भर होता. हे प्रश्न गांधींच्या शब्दप्रामाण्याने सुटणार नाहीत, सत्याग्रही निष्ठेच्या लोकांनी स्वतंत्र बुद्धीने त्यांच्याविषयी निर्णय करायला हवा असे जावडेकरांना वाटते. म्हणून आपले मत ते स्पष्ट करतात : भारत स्वतंत्र होऊन भांडवलदार लोकशाही तेथे स्थापन झाल्यानंतर आता वर्गसमन्वयाचे धोरण सोडून देऊन सत्याग्रही पद्धतीने वर्गविग्रह चालविण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे.

– चार –

आचार्य जावडेकर हे गांधीवादाचे डोळस आणि सर्जनशील उपासक होते. म्हणून ते गांधींपाशी थांबले नाहीत किंवा गांधींच्या शब्दप्रामाण्यात अडकलेही नाहीत. गांधीजींच्या लिखाणावरून ते समाजवादी होते आणि राजकीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर सत्याग्रहाचे पुढील कार्य हिंदुस्थानात व जगात समाजवादाची स्थापना करणे हेच असावे असे गांधींनी प्रतिपादिले असते असे त्यांना वाटे. 'तथापि माझी स्वतःची मते मी म. गांधींच्या शब्दांच्या आधारे सिद्ध करू इच्छित नाही. ... मी स्वतःला 'सत्याग्रही समाजवादा'चा पुरस्कर्ता हे नाव घेतो....पण 'सत्याग्रही समाजवादा संबंधीची माझ्या मनातील कल्पना म. गांधींच्या कल्पनेशी जुळणारीच असेल, असे माझे म्हणणे नाही.' अशी त्यांची याविषयीची भूमिका होती. [ 'वादांचा प्रस्ताव', 'गांधीवाद : समाजवाद, भाऊ धर्माधिकारी (संपा.), महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९४९, पृ. ६–७, ह्या प्रस्तावनेतील काही भाग या लेखसंग्रहात गांधीवाद : समाजवाद या शीर्षकाच्या लेखात घेतला आहे. ]

**सत्याग्रही समाजवाद**

या भूमिकेतूनच त्यांनी 'सत्याग्रही समाजवाद' या आपल्या विचाराचा सातत्याने पाठपुरावा केला. जावडेकरांनी 'सत्याग्रही समाजवाद' या शीर्षकाचे लेख लिहिलेले असले तरी प्रत्यक्षात या विचाराची मांडणी त्यांनी दोन प्रकारे केलेली आढळते. आपण वर पाहिल्याप्रमाणे त्यांची गांधीवादाची बहुतेक सगळी मांडणी ही प्रत्यक्षात सत्याग्रही समाजवादाचीच मांडणी आहे. समाजक्रांती, धनसंचय आणि संग्रहाचा निरास यांची चर्चा आचार्यांनी गांधीवादावरील



H—335—D

लेखनात केलेली आढळते. सत्याग्रही मार्गाने समाजवाद स्थापावा हे आपण गांधींपासून शिकलो असे जावडेकर म्हणत. त्यामुळे त्यांची गांधीवादाची मांडणी ही सत्याग्रही समाजवादाचीच मांडणी असणे अगदी स्वाभाविक आहे. त्याखेरीज गांधी आणि मार्क्स यांचा तुलनात्मक अभ्यास करताना आचार्यांच्या लेखनात सत्याग्रही समाजवादाची चर्चा येते. या चर्चेत मुख्यतः गांधी आणि मार्क्स यांच्या विचारातील साम्ये, त्यांच्या विचारपद्धतींमधील वेगळेपणा आणि या दोहोंच्या अनुयायांना परस्परांकडून स्वीकारण्यासारख्या बाबी यांचा विचार केलेला दिसतो. गांधींची सत्याग्रही क्रांती मार्क्सवाद्यांच्या क्रांतिविचाराहून उजवी आहे असे आचार्यांचे मत असले तरी ते मार्क्सवाद पूर्णतः त्याज्य मानीत नव्हते. उलटपक्षी गांधींच्या विचाराला काही मार्क्सवादी तत्त्वांची जोड देणे आवश्यक आहे असेच त्यांचे मत होते हे **गांधी आणि मार्क्स** या लेखमालेवरून आणि **भारतीय संस्कृतीचे अमृततत्त्व** या 'आधुनिक भारतातील' शेवटच्या प्रकरणावरून दिसून येते.

समाजवादाचा प्रभाव जावडेकरांवर १९२० च्या सुमारासच पडला होता, हे आपण पाहिले. १९२६ नंतर त्यांचा कल मार्क्सवादाकडे झुकला. भारतातील समाजवाद सत्याग्रही स्वरूपाचा असेल आणि तसाच तो असावा असे आपले १९३० पासून मत झाल्याचा उल्लेख त्यांनी स्वतःच केला आहे (नवभारत, फेब्रुवारी १९५५ पृ. ३०). **म. गांधींचा धर्म आणि व्यवहार** या १९३१ मधील लेखात 'प्रत्येक राष्ट्रात समाजसत्ताक व्यवस्था कशी प्रस्थापित करावी हे प्रश्न सोडविण्याचे कार्य सत्याग्रही संप्रदायाच्या लोकांना करावे लागणार आहे.' असा ओझरता उल्लेख येतो (लोकशिक्षण, ऑक्टोबर १९३१, पृ. ६७३). याच लेखात पुढे अकष्टार्जित उत्पन्न मिळविण्याचे मार्ग मोकळे असू नयेत असे सांगून म. गांधींच्या अस्तेय कल्पनेत या तत्त्वाचा समावेश होतो असेही म्हटले आहे. पुढे १९३५ मध्ये चित्रमय जगत् मध्ये लिहिलेल्या **राष्ट्रीय सभा आणि समाजवाद** या लेखात अधिक स्पष्टपणे गांधीवाद व मार्क्सवाद यांचा समन्वय करणारे तत्त्वज्ञान भारतात फैलावेल असा उल्लेख येतो (हा लेख प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केला आहे). यावेळेपासून आचार्यांच्या सत्याग्रही समाजवादाच्या विचाराने निश्चित आकार

घेतला असे दिसते. पुढील दोन दशके आपल्या लिखाणाद्वारे त्यांनी हा विचार सातत्याने मांडला. सत्याग्रही समाजवादानेच खरा समाजवाद स्थापन होऊ शकेल व भारताचे जगातील श्रेष्ठ स्थान त्याला पुन्हा प्राप्त होईल असा विश्वास ते व्यक्त करताना दिसतात : 'आपले अहिंसाव्रत आणि क्रांतिनिष्ठा या दोहोंचाही सारखाच पुरस्कार व प्रतिपाल करणारा एक सत्याग्रही वर्ग अस्तित्वात येईल व तो आपल्या आत्मबलाने आणि लोकसेवेच्या तपश्चर्येने जनतेतील अनत्याचारी वृत्ती संघटित व प्रभावी करील अशी आशा मला वाटते. भारतीय समाजवाद हा सामान्यतः लोकशाही स्वरूपाचाच रहावा; त्याला अनियंत्रित एकपक्षसत्ता स्थापन करावी लागू नये आणि तशी एकपक्ष-सत्ता काही काल स्थापन झाली तरी तिला त्वरित लोकशाहीचे स्वरूप प्राप्त व्हावे हेच इष्ट आहे. हे घडावयाचे तर केवळ सनदशीर मार्गाने सामाजिक व राजकीय क्रांती घडू शकेल हा भ्रम सोडून दिला पाहिजे. जनतेला प्रत्यक्ष प्रतिकाराचे अनत्याचारी शिक्षण देत राहिले पाहिजे आणि समाजवादाचा उघड पुरस्कार करून सत्याग्रही वृत्तीने त्याची संस्थापना करण्याचे प्रयत्न सतत चालू ठेवले पाहिजेत. असे प्रयत्न करणारे नेते भारताला लाभले तर अद्यापि कोणत्याही देशात स्थापन न झालेली अशी समाजवादी लोकशाही या देशात स्थापन होईल, इतकेच नाही तर राज्यसत्तेच्या सर्व बंधनांतून मुक्त होऊन आत्मसत्तेच्या युगात प्रवेश करण्याची जी मानवी अंतःकरणाची अत्युच्च आकांक्षा तिच्या दिशेने भारताची प्रगती होत राहून समाजवादी भावी युगात या प्राचीन राष्ट्राकडे पुन्हा राष्ट्रगुरुत्वाचा मान येऊ शकेल अशी माझी निष्ठा आहे.' ( **आधुनिक भारताचा ध्येयवाद,** चित्रमय जगत्, जानेवारी १९४७, पृ. १० ).

**लोकशाही समाजवाद**

भारतात स्वातंत्र्यानंतर लोकशाही समाजवाद स्थापन व्हावा या अर्थाचे उल्लेख आचार्यांच्या लेखनात अनेक ठिकाणी आढळतात. परंतु तेवढ्यावरून त्यांना लोकशाही समाजवादाची विचारप्रणाली मान्य होती असे म्हणता येणार नाही. भारतीय समाजवादाची स्थापना होईपर्यंतच्या काळात येथे राजकीय लोकशाहीच राहावी असा त्यांचा रोख असे. सशस्त्र क्रांती किंवा

हिंसा या मार्गांनी समाजवाद स्थापन होऊ नये आणि त्याच्या स्थापनेनंतरही अनियंत्रित सत्ता निर्माण होऊ नये असे त्यांना वाटे. साम्यवादी पक्षांच्या मार्गांपासूनची आपली भिन्नता स्पष्ट करण्यासाठी ते लोकशाही समाजवादाचा पाठपुरावा करतात. मात्र लोकशाही समाजवादाचे तत्त्वज्ञान आणि सत्याग्रही समाजवाद यांत दोन अगदी ठळक बाबतीत भेद आढळतो. लोकशाही समाजवादाचा सगळा भर सनदशीर किंवा संसदीय राजकारण करण्यावर असतो. इतर राजकीय पक्षांप्रमाणेच समाजवादी पक्षाने राजकीय स्पर्धेत उतरून बहुमत मिळवायचे असते. ते न मिळाल्यास विरोधी पक्ष म्हणून संसदीय कामात सहभागी व्हायचे असते. जनवादी राजकारणासाठी संसदेच्या बाहेरचे चळवळीचे राजकारण करण्याचे या समाजवादाला वावडे असते. या भूमिकेवर आचार्यांनी टीका केलेली आढळते. ब्रिटिश समाजवादी फक्त सनदशीर राजकारणातच अडकून पडतात आणि क्रांतीला सोडचिठ्ठी देतात अशी आचार्यांची तक्रार आहे. **समाजसत्ताक लोकशाही पक्षाची आवश्यकता** या जुलै १९३१ च्या लोकशिक्षणमधील लेखात त्यांनी असे बजावले आहे की केवळ प्रौढ मताधिकाराने आर्थिक दास्य जात नाही. परोपजीवी मालकवर्गाकडून साधनसंपत्ती काढून घेण्यास प्रातिनिधिक राजकीय संस्था असमर्थ ठरतात, समाजसत्ताक पद्धती प्रस्थापित करण्यास हा मार्ग अपुरा आहे. इंग्लंडसारख्या देशात सार्वत्रिक संप परिणामकारक ठरू शकतो. पण 'बेकायदेशीर' आणि 'बेसनदशीर' या शब्दांना बुजणाऱ्या मजूर पुढाऱ्यांनी घाबरुन जाऊन हा मार्ग कधीच परिणामकारकपणे वापरला नाही. तसेच इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत समाजवादी मंडळींकडे मंत्रिपदे आली तरीही समाजसत्ताक ध्येयांच्या दिशेने तेथे ही प्रगती झाली नाही' (लोकशिक्षण, जुलै १९३१, पृ. ४८७–८८). तेव्हा समाजवादी चळवळीने सनदशीरपणाच्या घोळात न अडकता प्रसंगी कायदेभंगाचा अवलंब करून जनतेच्या चळवळी चालवल्या पाहिजेत असे आचार्यांचे मत होते.

आणखी एका बाबतीत सत्याग्रही समाजवाद आणि लोकशाही समाजवाद यांत भेद आहे. तो म्हणजे राज्यसंस्थेविषयीचे मूल्यमापन. लोकशाही समाजवादात राज्यसंस्था हे परिवर्तनाचे एक साधन मानण्याकडे कल असतो

किंबहुना राज्यसंस्था ही एक तटस्थ यंत्रणा असून बहुमताने ती समाजवाद्यांकडे आली की तिच्या नेतृत्वाखालीच समाजपरिवर्तनाची प्रक्रिया घडवून आणता येईल असा विश्वास असतो. हा विश्वास मार्क्सवाद्यांच्या 'राज्यसंस्था ही धनिकवर्गाची पक्षपाती असते' या मताहून तर भिन्न आहेच पण अलिकडे काही नवे मार्क्सवादी मानतात त्या राज्यसंथेच्या स्वायत्ततेच्या कल्पनेपेक्षाही वेगळी आहे. आचार्यांनी मार्क्सवादाचे राज्यसंस्थेविषयीचे हे मत फारसे कधी उचलून धरल्याचे दिसत नाही. पण तरीही राज्यसंस्थेची त्यांनी सातत्याने मूलग्राही मीमांसा केली. त्यानुसार राज्यसंस्था ही दंडशक्तीचे प्रतीक म्हणून अस्वीकार्य असून टप्प्याटप्प्याने राज्यसंस्थेचा निरास करून आत्मराज्य प्रस्थापित करणे हेच ध्येय आहे. राज्ययंत्र म्हणजे दमनयंत्र. ते धनिकांच्या हाती असेल तर कष्टकऱ्यांचे दमन करील. समाजवाद्यांना राज्ययंत्राचा ताबा मिळाला तर त्यांनी कष्टकऱ्यांचे दमन थांबवावे तसेच धनिकांना अनुकूल असे कायदेही अवश्य बदलावेत. पण खरे परिवर्तन घडवून आणण्याच्या कामी राज्ययंत्र उपयोगी नाही. मग भले ते समाजवाद्यांच्या हाती का असेना. म्हणूनच शुद्ध सत्याग्रह्यांनी सत्तेच्या—म्हणजे राज्ययंत्र ताब्यात घेण्याच्या—भानगडीत पडू नये असे त्यांचे म्हणणे असे. सत्याग्रही समाजवादाची ही भूमिका लोकशाही समाजवाद्यांहून अगदी वेगळी आहे. राज्ययंत्र कायम असेपर्यंत ते अधिकाधिक जनकल्याणासाठी वापरावे आणि त्यावरील अवलंबित्व उत्तरोत्तर कमी करीत जावे अशी दुहेरी रणनीती जावडेकर सुचवितात. राज्यसंस्थेच्या अशा मूल्यमापनाच्या मुळाशी मार्क्सवादापेक्षा युरोपीय अराज्यवाद आणि गांधीवाद या प्रेरणा अधिक प्रभावी आहेत. मात्र प्रातिनिधिक लोकशाहीला जावडेकर सरळसरळ 'भांडवली लोकशाही' असेच मानतात आणि ही पद्धती धनिकवर्गाचे हितरक्षण करते असे सांगतात हेही येथे लक्षात ठेवले पाहिजे.

### यती आणि क्रांती

सत्याग्रही समाजवादाच्या सर्व मांडणीवर भारतीय संस्कृतीचा प्रभाव आहे. म्हणूनच समाजवादाच्या संस्थापनेची जबाबदारी लोकसेवक 'यतीं'वर सोपवलेली दिसते. वर आपण यतिधर्माची चर्चा केलीच आहे. पण समाजवादी क्रांतीचे उद्गाते म्हणून लोकसेवकांचा किंवा यतींचा विचार करताना काही

श्न उभे राहतात. वर चित्रमय जगत् मधील जो दीर्घ उतारा दिला आहे त्यात आचार्य असे म्हणतात की जगात सर्वत्र अंध:कारमय परिस्थिती असतानाही एक सत्याग्रही वर्ग निर्माण होईल आणि आत्मबलाने जनतेला मार्ग दाखवील. धनिकांची सत्ता असलेल्या समाजात हा 'लोकसेवक वर्ग' कोठून व कसा तयार होईल हा प्रश्न अनुत्तरित राहतो. ही मांडणी करीत असताना बहुधा आचार्यांच्या डोळ्यापुढे म. गांधींनी उभी केलेली सत्याग्रही फौज असावी. अशीच सत्याग्रही फौज धनिकशाहीविरुद्धही उभी राहील अशी त्यांना आशा वाटत असावी. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या हेतूने प्रेरित होऊन जसे सत्याग्रही निर्माण झाले—आणि विविध समाजगटांमधून निर्माण झाले—तसे ते समाजवादी क्रांतीसाठीही निर्माण होतील का? गांधीवादी सत्याग्रह्यांपैकी तर बहुतेकांना या समाजवादी क्रांतीचे आकर्षण नव्हते किंवा तिच्याविषयी आस्थाही नव्हती. क्रांती समीप आल्यावर विरुद्ध वर्गातीलही काहीजण आपली परिस्थितीच्या बंधनातून सुटका करून घेऊन क्रांतिकारकांना येऊन मिळतात हा कम्युनिस्ट मॅनिफेस्टोमधील उल्लेख आचार्यांपुढे असावा. [**आत्मवाद आणि आत्मराज्य,** (नवभारत, जानेवारी १९५५) या आपल्या लेखात जावडेकरांनी हे अवतरण दिलेले आहेच. पृ. ५–६] धनिकवर्गातून समाजवादाला कोणीच पाठिंबा देणार नाही हे मत त्यांना अग्राह्य वाटते. पण 'लोकसेवक' असा वर्ग कोणत्या प्रक्रियेतून उदयाला येईल, त्यासाठी काही निश्चित सामाजिक परिस्थिती आवश्यक असेल का हे प्रश्न यतींच्या किंवा लोकसेवक वर्गाच्या चर्चेतून समाधानकारकपणे सुटत नाहीत. तेव्हा आचार्यांची लोकसेवकांची कल्पना फलद्रूप व्हावयाची तर समाजवाद्यांना या कल्पनेचे महत्त्व पटून त्यांनी सत्तेच्या राजकारणाकडून शुद्ध लोकसेवेकडे वळले पाहिजे. त्याचबरोबर कष्टकरी वर्गांमधून सत्याग्रही लढा उभारला पाहिजे. या दुसऱ्या मुद्यावर आचार्य फारसा जोर देत नाहीत. त्यामुळे त्यांची समाजवादी क्रांती फक्त 'लोकसेवक वर्गा'च्या आत्मबलातून होणार असा ग्रह होऊ शकतो. आपल्या सत्याग्रही क्रांतीत त्यांनी कष्टकरी वर्गाच्या संघटनेला आणि सत्याग्रही प्रतिकाराला प्राधान्य द्यायला हवे होते असे वाटते. त्याऐवजी कोणताही एक वर्ग क्रांती करीत नसतो तर सर्वच वर्ग एक होऊन प्रस्थापित सत्ता उलटून

टाकतात असे प्रतिपादन त्यांनी केलेले दिसते (पहा : नवभारत, जानेवारी १९५५ मधील उपरोक्त लेख, पृ. ६). क्रांतिकारक परिस्थिती उद्‌भवल्यावर प्रस्थापित वर्गातील काही व्यक्ती क्रांतिकारकांना सामील होणे वेगळे आणि सर्व वर्गांनी मिळून क्रांती करणे वेगळे. येथे आचार्यांना झारशाहीचा पाडाव, फ्रेंच राजसत्तेचा पाडाव किंवा ब्रिटिश राजवटीचा पाडाव अभिप्रेत असावा. अशा प्रस्थापित सत्तांव्यतिरिक्त देशांतर्गत प्रस्थापित वर्गाविरुद्धच्या लढ्यात दोन वर्ग परस्परांविरोधी उभे ठाकतील की नाही हा प्रश्न आहे.

## वर्गाविरुद्ध लढा की राज्याविरुद्ध

आचार्यांच्या मांडणीवरून मागे उल्लेख केलेले वर्गसंघर्षाविषयीचे त्यांच्या विचारातील द्विधात्व स्पष्ट होते. तसेच सत्याग्रही समाजवादातील क्रांतीचा रोख विशिष्ट वर्गाच्या सत्तेविरुद्ध असण्यापेक्षा एकूण राज्ययंत्राविरुद्धच अधिक आहे हेही यावरून दिसून येते. कारण राज्यसंस्थेच्या विरुद्ध लढायचे अशी भूमिका घेतली म्हणजे मग त्या लढ्यात सर्वच वर्ग सामील होण्यात सैद्धान्तिक अडचण राहात नाही. राज्यसंस्था आणि वर्गसंस्था यांच्यापैकी कोणत्या दमन-यंत्रणेविरुद्ध प्राधान्याने लढा द्यावयाचा याचा निर्णय केल्याखेरीज सत्याग्रही समाजवादाला धारदार परिवर्तनविचाराचे स्वरूप येऊ शकत नाही. राज्य-संस्था नाहीशी करणे हा सत्याग्रही समाजवादाचा हेतू आहे खरा. पण गांधी-वादी विचाराप्रमाणेच सत्याग्रही समाजवादही हे अंतिम उद्दिष्ट प्रत्यक्ष साध्य करण्यापेक्षा त्या दिशेने प्रयत्न करताकरता राज्यसंस्थेचा दमनकारी विळखा सैल करण्यासाठी प्रयत्न करणार. या दरम्यान वर्गयंत्रणा अस्तित्वात असणारच. तिचा दमनकारी विळखा राज्ययंत्राबरोबर सैल होईल का? की त्यासाठी वेगळा लढा द्यायला हवा? जर द्यायचा झाला तर राज्ययंत्राविरुद्ध लढणारे 'लोकसेवक' हेच त्या लढ्याचे नेतृत्व करतील का? यासारख्या प्रश्नांविषयी सत्याग्रही समाजवादाला स्वतंत्रपणे आणि स्पष्टपणे मांडणी करणे आवश्यक आहे. अन्यथा सत्याग्रही समाजवाद ही फक्त राज्यसंस्थेच्या प्रभावातून सोडविण्यासाठी प्रयत्न करणारी, सुट्या-सुट्या व्यक्तींच्या स्वायत्ततेच्या विकासाला वाट करून देणारी विचारसरणी बनण्याचा धोका संभवतो.

**महाजनी – बडेकरांची टीका**

सत्याग्रही समाजवादाच्या मांडणीतील या काही प्रश्नांमुळे आचार्यांच्या मांडणीविषयी समकालीन मार्क्सवाद्यांनी त्यांच्यावर टीका केलेली दिसते. त्या काळात समाजवादी आणि मार्क्सवादी यांच्यात असलेला दुरावा हेही काही अंशी टीकेचे एक कारण दिसते. उदा. ह. रा. महाजनी यांनी 'आधुनिक भारत' या ग्रंथाच्या परीक्षणाच्या निमित्ताने मे १९३९ च्या 'मनोहर' मधून (पृ. ३६–४१) आचार्यांवर जहरी टीका केली. आचार्यांच्या समन्वयवादाला त्यांनी प्रखर विरोध केलेला दिसतो. मार्क्सवाद आणि रॉयवाद यांवरील जावडेकरांच्या मतांमुळे चिडलेल्या महाजनींनी 'आधुनिक भारता'ची 'आधुनिक भारूड' म्हणून संभावना केली आहे! (पृ. ४१). भारतीय संस्कृती-पासून जगाला बरेच शिकण्यासारखे आहे ही भूमिका त्यांना प्रतिगामी वाटली. त्याहीपेक्षा जावडेकरांची समन्वयाची खटपट त्यांना अनाठायी व निराधार वाटली. त्यांच्या मानाने प्रा. दि. के. बेडेकरांचे सत्याग्रही समाजवादाचे मूल्यमापन अधिक संयमपूर्ण व संतुलित आहे. त्यांनी जावडेकरांविषयी १९४९ (संमेलनाध्यक्षपदाच्या निमित्ताने), १९५६ (नवभारत, श्रद्धांजली विशेषांक) आणि १९५७–५८ (साधना, जावडेकर स्मारक व्याख्यानमाला) अशा तीन वेळा लिहिले. संमेलनाध्यक्षांच्या गौरव अंकातील त्यांचा लेख (**व्यक्तिवादी राष्ट्रवादाचे आचार्य**, नवभारत, मे १९४९, पृ. ६७५–६८७) तिखट टीका करणारा आहे. त्यामानाने पुढील लेखनात सौम्य टीका आहे. जावडेकरांच्या जीवनात आधुनिक भारतीयत्वाची कल्पना, अध्यात्मनिष्ठा आणि समन्वयदृष्टी ही तीन तत्त्वे आधारभूत होती असे ते म्हणतात (साधना, २१ डिसेंबर १९५७, पृ. ११). यांपैकी समन्वयदृष्टीची अधिक चर्चा त्यांनी **आचार्य जावडेकरांचे राज्यशास्त्रीय विचार** (नवभारत, जानेवारी १९५६, पृ. ५६ ते ६०) या लेखात केली आहे. १९४९ ते १९५६ या काळात बेडेकरांचे सत्याग्रही समाजवादाविषयीचे मूल्यमापन किंचित बदललेले दिसते. याचे कारण ते आचार्यांच्या श्रद्धांजलीपर अंकात किंवा स्मारक व्याख्यानमालेत लिहीत/बोलत होते एवढेच नसावे. कारण तसे असते तर गौरव अंकात त्यांनी टीका करणारा लेख लिहिला नसता. मार्क्सवादी तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांच्याविषयीच्या सखोल चिंतनातून समन्वयाची शक्यता बेडेकरांना पटली असावी हे एक कारण

संभवते. दुसरे म्हणजे महाजनींच्या तुलनेने भारतीय संस्कृतीची बेडेकरांची जाण जास्त प्रगल्भ असल्यामुळे जावडेकरांचा भारतीय संस्कृतीचा गौरव त्यांना पूर्णतया त्याज्य किंवा प्रतिगामी वाटला नाही. तिसरे म्हणजे म. गांधींच्या विषयीचे बेडेकरांचे मूल्यमापन सतत विकसित होणारे होते. गांधींना निव्वळ भांडवलदारांचे हस्तक मानण्यावर ते समाधान पावले नाहीत याची साक्ष त्यांचे Towards Understanding Gandhi (पॉप्युलर, मुंबई, १९७५) हे पुस्तक देते. गांधींविषयीच्या बदललेल्या मूल्यमापनामुळेही कदाचित त्यांना जावडेकर करीत असलेल्या गांधी – मार्क्स समन्वयाचे महत्त्व पटले असावे. म्हणूनच "क्रांती आणि शांतता यांचा समन्वय होण्यातच आता मानवी संस्कृतीचे भवितव्य सुरक्षित राहणार आहे. म्हणूनच 'शांततामय क्रांती' हा आचार्यांच्या विचारांतील प्रेरक मंत्र आपल्या राजकीय जीवनात एक श्रीदमंत्र म्हणून मार्गदर्शक ठरणार आहे." अशा शब्दात त्यांनी आचार्यांच्या राज्यशास्त्रीय विचारांचा परामर्श घेतलेला दिसतो (नवभारत, जानेवारी १९५५, पृ. ६०).

## परंपरेशी विधायक संवाद

आधुनिक विचार आणि भारतीय परंपरा आणि तत्त्वज्ञान यांतील भेद ओलांडून जाण्याचा प्रयत्न आचार्यांच्या विचारात आढळतो. त्यांची स्वतःची समन्वयदृष्टी आणि गांधी विचारांचा पगडा यांमुळे ते भारतीय परंपरांच्या समीक्षेवर भर न देता त्यांचे विधायक आणि सर्जक अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करताना दिसतात. परंपरेशी असलेला हा विधायक संवाद केवळ प्रतिके, प्रतिमा यांच्यापुरता सीमित नाही. भारतीय विचारपरंपरेत प्रेम, न्याय आणि सर्वहितबुद्धी यांना कसे स्थान आहे हे दाखवून देण्यावर आचार्यांचा भर आहे. त्यासाठी ते मुख्यतः वेदान्ताचा आधार घेताना दिसतात. उपनिषदे आणि गीता यांचा उल्लेख करीत ते भारतीय तात्त्विक परंपरा स्पष्ट करतात. क्वचित कधी बुद्धविचाराचा दाखला देऊन भारतात बुद्धविचार मागे पडला नसता तर समतास्थापनेला अधिक प्रभावी तात्त्विक आधार मिळाला असता असे ते म्हणतात. (**जपानी राष्ट्रवादाचे स्वरूप**, साधना, ९ फेब्रुवारी १९५२).

'आधुनिक भारत'च्या शेवटच्या प्रकरणातही 'बौद्ध संस्कृतीने सर्वांगीण सामाजिक क्रांती केली' याचा त्यांनी उल्लेख केला आहे (१९७९, पृ. ५९४–५९६). भारतीय परंपरेतील हा शांततामय क्रांतीचा धागा पकडून म. गांधींचे कार्य घडले असे जावडेकर म्हणतात. म्हणूनच या विचारपरंपरेशी संवाद जुळवून परिवर्तनाला आधार मिळविता येईल यावर ते भर देतात. भारतीय संस्कृतीचे वेगळेपण सांगताना ते म्हणतात की, साधुत्व किंवा बळाला अध्यात्माची किंवा साधुत्वाची जोड हे भारतीय संस्कृतीचे वेगळेपण आहे (उपरोक्त, पृ. ५४२–५४३). गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा जो समन्वय जावडेकरांना अभिप्रेत होता त्यातही आध्यात्मिकतेला महत्त्वाचे स्थान आहे. आध्यात्मिकता म्हणजे सत्प्रवृत्ती किंवा आत्मबल असे ते वारंवार सांगतात. स्वतःच्या शक्तींचा अधिकाधिक विकास साधून सेवेतून आणि त्यागातून आत्मोन्नती साधणे हीच त्यांच्या अध्यात्मातील मोक्षकल्पना आहे. या मांडणी-मुळे अध्यात्म आणि गांधीवाद दोन्ही गूढगुंजनातून बाहेर काढणे त्यांना शक्य झाले. आध्यात्मिकता म्हणजे निवृत्ती, संन्यास किंवा ऐहिकाला नकार नाही तर चिरंतन अशा आत्मप्रेरणेतून कृतिशील राहणे असा अर्थ जावडेकरांना अभिप्रेत आहे. न्यायबुद्धी, बंधुभाव आणि समता यांच्या बुडाशी ही आत्म-प्रेरणाच असते असे ते मानतात.

जावडेकरांच्या अध्यात्मनिष्ठेचे अत्यंत मर्मग्राही विवेचन दि. के. बेडेकरांनी केले आहे. ते म्हणतात, 'वास्तव आणि आदर्श यांची फारकत होऊ नये, वास्तवाचा विचार करताना मानवी मूल्यांचे व आदर्शांचे भान सतत रहावे व आदर्शाकडे जात असताना वास्तवाचाच आधार घेतला जावा अशी त्यांची भूमिका होती. या दोन्ही दृष्टींनी विचार चालू असताना **आदर्शांना निर्णायक महत्त्व आहे असे त्यांनी मानले.** मानवी आदर्शांचे मूळ मानवी मनातील एका सनातन आत्मप्रेरणेत व धर्मभावनेत आहे व या प्रेरणेतून शुद्ध सत्यान्वेषक बुद्धी, शुद्ध प्रेम आणि बंधुभाव, शुद्ध, सात्त्विक, द्वेषरहित क्रांतिकारक कृती यांची सतत निर्मिती चालू असून तिच्यामुळे मानवी संस्कृतीची घडण होत गेली, असे त्यांचे मत होते.' (साधना, २१ डिसेंबर १९५७, पृ. ११, **जाड ठसा माझा**). माणसाचे ऐहिक सुखसंवर्धन, न्यायबुद्धी आणि परिवर्तनवृत्ती यांच्या

पाठीशी आत्मप्रेरणा आहे असे मानणे म्हणजेच आदर्शांना अंतिम महत्त्व देणे होय. भौतिक घटना आणि विचार या दोहोंना आचार्य महत्त्व देतात हे खरे असले तरी त्यांचा कल मात्र चिरंतन मूल्ये आणि नैतिक प्रेरणा यांच्याकडेच होता. मानवी व्यवहारांचे मूल्यमापन त्यांच्या नैतिकतेच्या आधारे व्हावे, भौतिक बळाला साधुत्वाचे अधिष्ठान असावे हे आचार्यांचे मुख्य सूत्र आहे. पण त्यांच्या आध्यात्मिकतेच्या एकूण मांडणीत काहीवेळा नैतिक प्रेरणा किंवा विवेकावर आधारित सत्तत्त्व यापेक्षा 'विश्वात्मक सत्य' किंवा चित्तत्त्वाला जास्त महत्त्व प्राप्त होते. व्यक्ती स्वतःच्या सहज प्रेरणेने आणि विवेकाने सत् आणि असत् यांचा विचार करते हा झाला सत्-तत्त्वाचा प्रभाव. त्याऐवजी सर्व मानवी प्रेरणांना मूलकारण असे एक चित्तत्त्व आहे असे मानणे हा चिद्वादाचा प्रभाव मानता येईल. या चिद्वादाच्या प्रभावापासून आचार्यांचे अध्यात्मचिंतन पूर्णपणे मुक्त नाही.

या प्रभावामुळेच त्यांच्या लेखनात अनेक ठिकाणी ब्रह्मतेजाचा गौरव केलेला आढळतो. क्षात्रबलापेक्षा ब्रह्मबल श्रेष्ठ मानणाऱ्या परंपरेचा उल्लेख ते करतात. हे 'ब्रह्मतेज' त्यांना एखाद्या वर्णाचा गुणधर्म म्हणून अभिप्रेत नव्हते. क्षात्रबल म्हणजे भौतिक बल. त्याहून ब्रह्मबल म्हणजे ब्रह्मतत्त्वाचे बल श्रेष्ठ आहे असे ते सांगतात. चिद् तत्त्व जास्त श्रेष्ठ मानण्याच्या प्रवृत्तीतून हा ब्रह्मबल गौरव येतो. विनोबांच्या षष्टयब्दीपूर्ती निमित्तच्या लेखात त्यांनी विनोबांना ब्रह्मर्षी ही पदवी दिली आहे. 'आधुनिक भारत'च्या शेवटच्या प्रकरणातही 'ब्रह्मतेज' हे भारतीय संस्कृतीच्या वेगळेपणाचे एक लक्षण म्हणून सांगितले आहे.

ब्रह्मतेज आणि ब्रह्मर्षी यांसारख्या शब्दांना वर्णसमाजाच्या संदर्भात प्राप्त झालेले अर्थ आचार्यांना अभिप्रेत नव्हते. पण हे शब्द वापरून वर्णीय अहंकाराला समर्थन मिळू शकते याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. आपल्या परंपरेशी सर्जनशील देवाणघेवाण करून पारंपरिक प्रतिकांना वेगळे अर्थ देताना वाचकापर्यंत मात्र जुनेच अर्थ पोहोचतील असा एक धोका संभवतो. जावडेकर या धोक्याचा फारसा बंदोबस्त न करता 'ब्रह्मतेज' ही संज्ञा वापरतात.

**वर्ण आणि जातीचा प्रश्न**

भारतीय परंपरेच्या प्रभावाचा आणखी एक परिणाम म्हणजे वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था यांचे अपुरे आणि असमाधानकारक विवेचन. जातिव्यवस्थेचे गंभीर आणि सखोल विवेचन जावडेकरांनी केलेले दिसत नाही. त्यांना जातिव्यवस्था आणि तदंतर्गत विषमता मान्य नव्हती. पण या विषमतेचे स्वरूप, परिणाम आणि प्रतिकाराचे मार्ग यांवर भर द्यावा असे त्यांना वाटले नाही. (तसे त्या काळातील इतर गांधीवाद्यांनाही वाटले नाही आणि समाजवाद्यांनाही वाटले नाही.) याचे एक कारण आता जातिव्यवस्था संपुष्टात आली आहे असे त्यांना वाटत असावे. उदा. **नवा भारत, नवे जग आणि नवी दृष्टी** या नवभारत (ऑक्टोबर १९४७) मधील लेखात ते म्हणतात, 'आज ही जातिसंस्था अजिबात मोडून पडली असून कोणत्याही जातीत जन्म पावल्याबद्दल एखाद्यास अस्पृश्य मानणे व तसे वर्तन करणे हा आमच्या राज्यघटनेने गुन्हा ठरविला आहे' (पृ. ७७). जातिव्यवस्थेविषयीची ही औपचारिक दृष्टी आश्चर्यकारकच आहे. विशेषत: संपूर्ण आंबेडकरी चळवळ आणि ब्राह्मणेतर चळवळ यांतून जातिव्यवस्थेविषयीचे प्रश्न उभे राहिले असतानाही त्यांची चर्चा जावडेकर करीत नाहीत. जातिव्यवस्था ही मूळ भारतीय परंपरेशी विसंगत असून ज्या प्रमाणात ती मूळ परंपरा आपण आत्मसात करू त्या प्रमाणात या विषमतामूलक व्यवस्थेचा त्याग केला जाईल अशी त्यांची कल्पना असावी व त्यामुळेही या प्रश्नाचा त्यांनी विचार केला नसावा. शिवाय गांधीविचारातही जातिव्यवस्थेच्या चिकित्सेचा अभावच आढळतो. 'जात मानू नये' यासारखी वचने गांधीविचारात असली तरी जातीचा प्रश्न सत्याग्रहाने सोडविण्यापेक्षा सेवावृत्तीने सोडविण्यावर गांधीवादाचा भर दिसतो. साहजिकच भारतीय परंपरा आणि गांधीवाद यांच्या दुहेरी प्रभावामुळे जावडेकर जातीच्या प्रश्नाकडे वळत नाहीत.

जातीच्या मुद्याचा ठळक उल्लेख त्यांच्या लिखाणात जवळपास पाव शतकाच्या अंतराने दोन ठिकाणी येतो. वा. दा. मुंडले यांच्या चैतन्योत्पादक ग्रंथमालेत १९२४ साली जावडेकरांनी **ब्राह्मणसंघाच्या कल्पनेसंबंधी काही विचार** या शीर्षकाचे दोन लेख लिहिलेले दिसतात. ब्राह्मणांचे वर्चस्व फक्त

धार्मिक बाबतीत राहिले आहे आणि भौतिक प्रगती साधण्यात इतर जातींना ब्राह्मण जातीची आडकाठी राहणार नाही असे त्यातील प्रतिपादन आहे. पुढे १९४८ साली मात्र ब्राह्मण आणि ब्राह्मण्य या दोन्हींवर जोरदार टीका करून ब्राह्मण्य हे नेहमीच क्रांतीतील अडथळा ठरल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे (**ब्राह्मण्य नको, सत्याग्रह हवा,** नवभारत, जून १९४८, पृ. ४५ ते ५१). प्रा. शेजवलकर यांच्या 'ब्राह्मण्याचा ऱ्हास' ह्या नवभारतातील त्यांच अंकातील लेखावर प्रतिक्रिया म्हणून जावडेकरांनी हा लेख लिहिला. (शेजवलकरांच्या लेखात गांधी विचार ब्राह्मण्यावर आधारित आहे असे म्हटले होते).

ब्राह्मण्याविषयीची जावडेकरांची ही भूमिका त्यांच्या वर्णसंस्थेच्या चर्चेत आढळत नाही. एका बाजूला चार वर्ण आधीच नष्ट झाले आहेत असे ते सांगतात (पहा : या संग्रहातील **सत्याग्रही समाजवाद** हा लेख), तर दुसऱ्या बाजूला शूद्रवर्ण नाहीसा झाला पाहिजे असे ते म्हणतात (पहा : **समाजवाद आणि अध्यात्म** हा लेख). आधुनिक काळातील भौतिक प्रगतीमुळे आता शूद्रवर्णाची सेवा आणि गुलामीतून मुक्तता करणे शक्य आहे असे त्यांना वाटते. एकवर्ण समाज हेच गांधीवादाचे उद्दिष्ट असल्याचे सांगून ते जावडेकरांनी उचलून धरले आहे. 'आधुनिक राज्यमीमांसा' (भाग २) या पुस्तकात जावडेकर म्हणतात की सर्वांना ब्राह्मण बनविणे हे सत्याग्रहाचे ध्येय आहे (१९४१, पृ. ४०). येथे ब्राह्मण याचा अर्थ 'संन्यस्त, वैराग्यशील' असा आहे. सर्वांना संयमी, संन्यस्त आणि वैराग्यशील बनविण्याचे सत्याग्रहाचे ध्येय आहे. परंतु येथेही 'ब्राह्मण' या संकल्पनेमुळे वर आपण पाहिल्याप्रमाणे वर्णीय अहंकाराला समर्थन मिळण्याचा धोका राहतोच. गांधीवादी विचाराप्रमाणे खरे तर जावडेकरांनी 'सर्वांना शूद्र' म्हणजे सेवक बनविणे हे ध्येय मानायला हवे होते. पण चिद्वादी आदर्शाची प्रस्थापना करण्याच्या हेतूमुळे ते सर्वांना ब्राह्मण बनविण्याचे ध्येय बाळगतात असे दिसते.

त्यांची ही चिद्वादी भूमिका लक्षात घेऊनही जात आणि वर्णविषयक त्यांच्या भूमिकेतील अपुरेपणा ठळकपणे जाणवल्याशिवाय राहात नाही. दंडविहीन आणि न्यायाधिष्ठित समाज स्थापन करण्यात इथली जातिव्यवस्था अडथळा ठरते. त्यामुळे तिच्याकडे जावडेकरांचे विश्लेषण वळायला पाहिजे होते.

तसेच जातिव्यवस्थेचे आधुनिक समाजातील आर्थिक हितसंबंध कसे विकसित होत आहेत आणि वर्णीय अहंकाराचे अस्तित्व सर्व समाजजीवनाला कसे व्यापून राहते आहे यांचा ऊहापोह हेही सत्याग्रही समाजवादापुढील आव्हान ठरायला हवे होते. तसे होत नाही. उलट 'आधुनिक भारत' या ग्रंथात फुले, ब्राह्मणेतर चळवळ आणि आंबेडकरी चळवळ यांच्या कामगिरीचेही मूल्यमापन होत नाही. एकूणच जातिसंस्थेचे दुबळे आकलन आणि तिच्या मूलगामी विश्लेषणाचा अभाव या सत्याग्रही समाजवादाला पडलेल्या ठळक मर्यादा आहेत.

आचार्य जावडेकरांच्या सत्याग्रही समाजवादाला समन्वयविचाराचे अधिष्ठान आहे. हा समन्वय म्हणजे भिन्न विचारधारांचे संश्लेषण असे त्यांना अभिप्रेत होते. समन्वयाच्या या दृष्टीची बलस्थाने आणि त्यातून उभे राहणारे प्रश्न यांचा निर्देश येथवर केला. स्वत: जावडेकर हे एका प्रदीर्घ कालखंडातील समाजकारणामधूनच घडले. टिळकवादी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अभिमान, गांधींच्या विचाराची आणि चळवळीची जातीच्या प्रश्नाविषयीची संदिग्ध भूमिका, परंपरेचा सर्जक अन्वयार्थ लावण्याची गांधीविचाराची रीत, आंबेडकरांचे महत्त्व न ओळखणारा राष्ट्रीय प्रवाह, अशा अनेक तत्कालीन परिस्थितिविशेषांचा प्रभाव जावडेकरांवर पडणे स्वाभाविक होते. गांधीविचारातील क्रांतिकारक सूत्र नेमके पकडून त्याचा सांधा समाजवादाला जोडण्याचे वैचारिक कार्य जावडेकरांनी केले. या समन्वयातील मर्यादा मूलत: तत्कालीन परिस्थिती आणि संदर्भ यांनी लादलेल्या आहेत. आज सत्याग्रही समाजवादाची चिकित्सा करताना या परिस्थितिजन्य मर्यादांचे भान ठेवण्याची व त्या ओलांडण्याची गरज आहे. सत्याग्रही समाजवादाचा विचार पुढे नेताना गांधीवादी चळवळ, मार्क्सवादी चळवळ आणि आंबेडकरी चळवळ यांचे राजकीय पूर्वग्रह आणि संदर्भ बाजूला ठेवून या तिन्हींच्या विचारसूत्रांचे परिशीलन होणे आवश्यक आहे. विशेषत: धर्म आणि जातिव्यवस्थेच्या संदर्भात सत्याग्रही समाजवादाची मांडणी करताना आंबेडकरवादाचाच आधार घ्यावा लागेल.

सत्याग्रही समाजवादी विचार पुढे नेताना आणखी दोन प्रश्नांची दखल घ्यावी लागेल. मागे उल्लेख केल्याप्रमाणे राज्यसंस्था आणि वर्गसंस्था यांच्या

संबंधांचे पुरेसे स्पष्टीकरण सत्याग्रही समाजवाद देत नाही. त्यामुळेच परिवर्तनाची लढाई तो राज्ययंत्राविरुद्ध वळवितो. यातून व्यवस्थापरिवर्तना-ऐवजी व्यक्तिपरिवर्तन केंद्रस्थानी येण्याची शक्यता असते. ही शक्यता टाळून व्यवस्थापरिवर्तन आणि व्यक्तींचे मूल्यविश्व बदलण्याची प्रक्रिया यांचा समतोल साधला जाणे आवश्यक आहे. दुसरा मुद्दा आहे परंपरेतून परिवर्तनाला शक्ती मिळविण्याचा. जावडेकरांनी सतत हा प्रयत्न केला. पण असा प्रयत्न करताना परंपराविवेकही करावा लागेल. भारतीय समाजाच्या प्रदीर्घ इतिहासात बलिष्ठ परंपरा या नेहमी चिद्वादी, विषमताप्रधान अशाच राहिल्या आहेत. समताधिष्ठित परंपरांना गिळंकृत करण्याचे त्यांचे सामर्थ्यही फार मोठे असते. या पार्श्वभूमीवर समताधिष्ठित परंपरांची निवड करून त्यांच्या समताविचारा-साठी त्यांचे जतन करावे लागेल. अन्यथा भारतीय ते-ते सर्व श्रेष्ठ अशा परंपराविषयक पोकळ अहंगंडाने सत्याग्रही समाजवादी विचाराला मागे हटावे लागेल. बरेच वेळा विविध परंपरांमधून परिवर्तनाला क्षीण समर्थन मिळविण्याची धडपड केली जाते. जावडेकरांच्या समन्वय विचारात अशा प्रकारे सर्वच परंपरांचे सरसकट कौतुक अभिप्रेत नाही. तरीही त्यांच्या स्वतःच्या विचारात निश्चित कोणत्या परंपरा समन्वयानुकूल आहेत याची पुरेशी स्पष्टता नसल्याने सत्याग्रही समाजवादी विचार पुढे नेताना परंपरेचा प्रश्न सोडविणे आवश्यक ठरेल.

गेल्या जवळपास अर्धशतकात जावडेकरांच्या सत्याग्रही समाजवादाचे पुरेसे परीक्षण अथवा मूल्यमापनही झालेले नाही. मग त्यात भर घालून नवी मांडणी करणे तर दूरच. महाराष्ट्रात गांधीवाद आणि समाजवाद यांचा परस्परांशी असणारा संवाद आचार्यांच्या पश्चात थांबलेला दिसतो. खुद्द त्या-त्या विचार-धारांमधील अंतर्गत जिवंतपणा आणि प्रवाहीपणाही खंडित होत असल्याचे चित्र दिसते. आचार्य जावडेकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रस्तुत लेखसंग्रहामुळे अशा अर्थपूर्ण संवादाला पुन्हा गती यावी हाच या लेखसंग्रहाचा प्रमुख हेतू आहे.

■ ■

# आचार्य जावडेकरांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १८९४ | जन्म |
| १८९६ | आईचा मृत्यु |
| १९१२ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९१५ | राष्ट्रकार्यात पडण्याचा संकल्प |
| १९१७ | बी.ए. |
| १९१८ | विवाह |
| १९२१ | असहकार चळवळीत शिक्षण सोडले. |
| १८२३-२६ | इस्लामपूरजवळ पेठ येथे महात्मा बोर्डींग चालविले. यात अस्पृश्य विद्यार्थीही होते. 'राजनीतिशास्त्र परिचय'चे लेखन. |
| १९२६ | टिळक महाविद्यालय, पुणे येथे अध्यापक (आचार्य) म्हणून नेमणूक. |
| १९३० | चळवळीत सहा महिने तुरुंगवास, कन्येचा मृत्यु. |
| १९३२-३३ | पुन्हा कारावास |
| १९३४ | 'राज्यशास्त्र-मीमांसा'चे प्रकाशन, 'नवशक्ती'चे संपादक. |
| १९३५ | 'लोकशक्ती'चे पहिले संपादक |
| १९३७ | 'लोकशक्ती'च्या संपादकपदाचा राजीनामा, वडिलांचा मृत्यु. |
| १९३८ | 'आधुनिक भारत' प्रकाशित |
| १९४१ | मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. 'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र'चे लेखन. |
| १९४०-४१ | 'लोकशाही' व 'गांधीवाद'चे प्रकाशन. |
| १९४२-४४ | तुरुंगवास |
| १९४५ | 'लोकशक्ती'चे संपादक |
| १९४६ | 'लोकशक्ती'च्या संपादक पदाचा राजीनामा |
| १९४७ | 'नवभारत'च्या संपादक मंडळात |
| १९५० | 'साधना'चे संपादक |
| १९५५ | मृत्यु |

**आधार :** 'आचार्य जावडेकर', साधना प्रकाशन, पुणे.

१

# धर्ममार्गावरील माझे वाटाडे

मनुष्याने जन्मभर एकाच व्यक्तीला गुरू बनवावे अथवा एकाच ग्रंथाला प्रामाण्य मानून आपल्या उन्नतीचा मार्ग अनुसरावा अशी माझी प्रवृत्ती नाही. ज्या मोठ्या मनुष्यापाशी जे चांगले दिसेल, त्यातील जेवढा भाग आपणास झेपेल तेवढा स्वीकारावा आणि त्याच्या योगाने आपल्या बुद्धीत जो प्रकाश पडेल त्याच्या सहाय्याने आपला मार्ग चालू लागावे अशी माझी वृत्ती आहे. वाटेने जात असता आपण जेथे अडतो तेथे कोणाचा तरी सल्ला आपण स्वीकारतो व तो योग्य आहे अशी आपल्या बुद्धीची खात्री झाली म्हणजे त्या दिशेने आपण जाऊ लागतो. पुन्हा आपणास त्याच्या पुढची वाट विचारण्याचा प्रसंग आला, तर तेथे भेटणारांना ती पुसावी व पटल्यास त्यांनी दाखविलेल्या दिशेने आणखी थोडे पुढे जावे अशी माझी विचारमार्गावरील यात्रा चालू आहे. घरातून निघताना एकच वाटाड्या बरोबर घ्यावा आणि वाट शोधून काढण्याची सर्व जबाबदारी त्याच्या डोक्यावर लादून आपण त्याच्या पावलावर पाऊल टाकून सतत त्याचा पदर धरून जावे असा माझा आजपर्यंतचा प्रवास घडलेला नाही. शिवाय आजपर्यंत मला जे जे वाटाडे भेटले त्यांपैकी कोणाच्याही एकाच्या मागून जाण्याइतकी दृढ निष्ठा किंवा भक्ती माझ्या अंतःकरणात उदय पावलेली नाही. हा माझा गुण म्हणून मी सांगत नाही. कारण त्या सर्वांच्या मागून जाऊन आपल्या जीवितवित्ताचा सर्वस्वी होम करण्याचे सामर्थ्यही माझ्या अंगी नसल्याने मला त्यांच्या मार्गदर्शनाचा सर्वस्वी स्वीकार करता आला नाही, असेही या वृत्तीचे एक कारण असणे शक्य आहे. जीवनातील अंतिम सत्याच्या शोधासाठी आत्मसमर्पणपूर्वक प्रयोग करण्याचे धैर्य जितक्या प्रमाणात कमी तितक्या प्रमाणात विचारसांप्रदायावरील निष्ठाही कमी असणार व म्हणून एकाच विचारद्रष्ट्याच्या मागून अखेरपर्यंत न जाता दुसऱ्या सांप्रदायापासून काही विचार शिकावेत ही वृत्ती वाढणे शक्य आहे. ही कारणे कोणतीही असली तरी माझ्या धर्मविचारांच्या वाढीला कोणाही एकाच विभूतीचे

साहाय्य झालेले नसून सुमारे चार विभूतींच्या विचारांपासून मला जीवननिष्ठेचे ज्ञान लाभलेले आहे ही गोष्ट खरी आहे. आगरकर, टिळक, गांधी व मार्क्स हे ते माझे धर्म-मार्गावरील चार वाटाडे होत. यांपैकी प्रत्येकापासून मी काही काही विचार शिकलो आहे. त्यांपैकी कोणापासून काय शिकलो ते थोडक्यात या लेखात सांगावयाचे आहे.

## पहिले धर्मगुरू आगरकर

माझे पहिले धर्मगुरू आगरकर आहेत असे मी मानतो. सार्वजनिक लोकसेवा हा एक धर्म आहे व धर्मबुद्धीने त्याची दीक्षा घेतली पाहिजे हे मी प्रथम आगरकरांच्या लेखांतून शिकलो. "मनुष्याचे ऐहिक सुखवर्धन" हे या धर्माचे बाह्य साध्य आहे व हा धर्म भावी काळात सार्वत्रिक होणार आहे हे त्यांचे मत माझ्या मनावर खोल रुजलेले आहे व त्या मताचा मी अद्यापि त्याग केलेला नाही. धर्म हा मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या स्वर्गातील काल्पनिक पारलौकिक सुखासाठी नसून तो मरणापूर्वी उपभोगता येणाऱ्या ऐहिक सुखा-साठीच आहे ही माझी दृढनिष्ठा आहे. परलोकासंबंधीच्या कल्पना केवळ तर्काधिष्ठित आहेत व हे तर्क आजच्या मानवबुद्धीला वाच्यार्थाने पटणार नाहीत हे मत सोडावे असे मला आजपर्यंत कधीच वाटले नाही. आगरकरांच्या लेखांपासून मला दुसरे एक ज्ञान झाले व ते म्हणजे आपल्या देशात जी क्रांती आज घडत आहे ती केवळ राजकीय क्रांती उरणार नसून ती सर्वांगीण सांस्कृतिक क्रांती घडणार आहे. त्याची खूप खची करून आधुनिक युरोपात निर्माण झालेल्या अनेक नव्या विचारांचे पाणी त्याच्यावर ओतल्या-वाचून त्याच्यात पुनः नवे चैतन्य खेळू लागणार नाही. ही गोष्ट करीत असता मानव संस्कृतीचा दृष्टिकोण आपण डोळ्यापुढे ठेविला पाहिजे, केवळ आपल्या भारतीय आर्यत्वाचाच अभिमान धरून बसता कामा नये. हे मतही आगरकरांच्या लेखांनीच माझ्या मनावर बिंबवले. पण त्याच्याबरोबर त्यांनी असेही म्हटले आहे की, आपले सांस्कृतिक क्रांतीचे हे कार्य करीत असता भारतीय आर्य संस्कृतीची मूळ प्रकृती आपण सोडून देण्याचे कारण नाही. किंबहुना हे भारतीय आर्यत्व न गमावताच आपण हे क्रांतिकार्य करीत गेले पाहिजे. असे विधान त्यांनी अनेक ठिकाणी केलेले आहे, पण हे भारतीय आर्यत्व म्हणजे काय, त्याचा बोध मला त्यांचे लेख वाचून कोठेच होऊ शकला नाही. तो बोध मला टिळकांच्या 'गीतारहस्याच्या' वाचनाने होऊ लागला.

## दुसरे धर्मगुरू टिळक

भारतीय आर्यत्व म्हणजे काय याचा उलगडा मला 'गीतारहस्य' वाचल्यानंतर बौद्धिक-दृष्ट्या होऊ लागला. याच सुमारास रवींद्रनाथांची 'साधना' माझ्या वाचनात आली. तिनेही मला भारतीय आर्यत्वाचे ज्ञान करून दिले आणि म. गांधींचे नेतृत्वही याचवेळी

माझे अंतःकरण खेचून घेऊ लागले होते. 'गीतारहस्य', 'साधना' आणि म. गांधींचे 'यंग इंडिया' पत्रातील लेख, यामुळे मला मानव संस्कृतीच्या आध्यात्मिक अधिष्ठानाचे महत्त्व पटू लागले. मनुष्याला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ असले पाहिजेत, मोक्ष हा त्याचा सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ आहे आणि "तत्सुखं सात्विकं प्रोक्तं। आत्मबुद्धि प्रसादजम्।" म्हणजे आत्मनिष्ठ बुद्धीच्या प्रसन्नतेपासून प्राप्त होणारे सुख हेच मनुष्याचे सर्वश्रेष्ठ सात्विक ऐहिक सुख होय, हाच परमानंद होय व इंद्रियसुखाहून तो फारच श्रेष्ठ दर्जाचा आनंद आहे हे विचार टिळक, टागोर व गांधी यांच्या लिखाणांच्या वाचनापासून माझ्या मनावर छाप बसवू लागले. काही काळ टिळकांच्या 'गीतारहस्या'ने व रवींद्रनाथांच्या 'साधने'ने मला वेडे केले होते. तथापि त्यांपैकी कोणालाही एकालाच कायमच गुरू करावा हा विचार मला कधीच सुचला नाही. गांधींच्या विचारांपेक्षा विभूतिमत्वाचीच छाप माझ्यावर विशेष होती. भगवद्गीतेचे ते एकनिष्ठ भक्त आहेत हे मला माहीत होते, तथापि भगवद्गीतेत अहिंसा-धर्माला कोठे स्थान आहे याचा मला उलगडा झाला नव्हता. तसेच समाजघटनेला हिंसेची आवश्यकता आहे व ती हिंसा निष्काम बुद्धीने केली असता मनुष्याची आध्यात्मिक अवनतीही होऊ शकत नाही. हे मत 'गीतारहस्या'तील विवेचनातून मी उचलले असल्याने मला गांधींचे अहिंसाविषयक विचार एकान्तिक व तात्त्विक दृष्टीनेही अपुरे वाटत असत. शिवाय राज्यशास्त्र व राज्यमीमांसा हा माझ्या चिंतन-चर्चेचा अंगीकृत विषय असल्याने मला गांधींच्या राजकीय नेतृत्वाचे तात्त्विक अधिष्ठान १९३० सालापर्यंत बरोबर समजू शकले नाही. तत्पूर्वी, १९२६ साली प्रसिद्ध केलेल्या 'राजनीतिशास्त्र' या पुस्तकात टॉलस्टॉय व राजवाडे यांच्या लेखांतील उतारे देऊन हे अधिष्ठान महाराष्ट्रीय वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न मी केला होता; तथापि गांधी नेतृत्वाच्या तात्त्विक अधिष्ठानासंबंधी माझे पूर्ण समाधान 'अनासक्तियोग' हे त्यांचे छोटेसे पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत झाले नव्हते. असे असले तरी व्यावहारिक दृष्टीने त्यांच्या-इतका प्रभावी नेता आजच्या जगात कोणत्याही राष्ट्रात नाही असेही मला दिसत होते. त्यांच्या नेतृत्वाचे तात्त्विक अधिष्ठान जर चुकीचे अथवा सदोष असेल तर व्यावहारिक राजकारणाच्या क्षेत्रात ते नेतृत्व एवढा प्रभाव कसे गाजवू शकते हे एक माझ्या बुद्धीपुढे कोडे होते. या कोड्याचे एक अगदी सोपे उत्तर माझ्या वाचनात येत असे ते म्हणजे सामान्य जनता बुद्धिहीन असल्याने म. गांधींची बुवाबाजी तिला मोह पाडते व त्यामुळे सरकारलाही त्यांना थोडा फार मान द्यावा लागतो. सामान्य जनतेच्या बुद्धिहीनतेचा हा सिद्धांत मला कधीच पटला नाही, त्या सिद्धांताच्या आधारे या कोड्याचा उलगडा करणाऱ्यांच्या बुद्धिमत्तेचाही प्रकाश मला कधी प्रतीत झाला नाही. यामुळे काही काळ याबाबतीत मी अंधारात चाचपडत होतो.

## म. गांधींचा क्रांतिकारक अहिंसा धर्म

१९३० सालची म. गांधींची चळवळ आणि दांडी मोहिमेवर निघण्याच्या वेळीच प्रसिद्ध झालेले त्यांचे 'अनासक्तियोग' हे पुस्तक यांच्या अवलोकनाने व वाचनाने अहिंसेचे खरे क्रांतिकारक स्वरूप मला समजू लागले. 'गीतारहस्या'पेक्षा या 'अनासक्तियोगा'तील अहिंसेचे प्रतिपादन फारच त्रोटक व अस्फुट असले, तरी ते अधिक तर्कशुद्ध आणि सुसंगत असून अहिंसानिष्ठ सत्याग्रही वीराला भगवद्गीतेतील कोणती शिकवण आकर्षक वाटू शकते याचाही मला बरोबर उलगडा झाला. "मामनुस्मर युध्यच" हा संदेश शस्त्रसंन्यास करणाऱ्या क्रांतिवीराने कसा अमलात आणावा याचाही मला उमज पडू लागला. सशस्त्र युद्ध व सशस्त्र क्रांती ही खऱ्या पारमार्थिक युद्धाची अपक्व स्वरूपे आहेत, असे मानून सत्याग्रही जगत्क्रांतीचे यज्ञकंकण ज्यांनी हातात बांधिले, त्यांनाही भगवद्गीतेत स्फूर्तिदायक काय वाटू शकते हे मला बरोबर समजू लागले. याहीपेक्षा विशेष महत्त्वाचे म्हणजे "भौतिक युद्ध संपूर्ण कर्मफलत्यागी पुरुषाच्या हातून घडणे शक्य आहे असे तात्पर्य गीताकाराच्या भाषेतील अक्षरांतून खुशाल निघो, पण गीतेच्या शिकवणीची पूर्णपणे अंमलबजावणी करण्याचा सुमारे ४० वर्षांपर्यंत सतत प्रयत्न करीत असता मला तर नम्रपणे असे वाटते की, सत्य आणि अहिंसा यांच्या संपूर्ण पालनाशिवाय संपूर्ण कर्मफलत्याग मनुष्याच्या बाबतीत असंभवनीय होय." "फलासक्तीशिवाय मनुष्याला असत्य बोलण्याची लालुच होत नाही आणि हिंसा करण्याचीही होत नाही." ही म. गांधींची भगवद्गीतेसंबंधीची वाक्ये वाचून माझ्या मनावर फार परिणाम झाला. धर्मग्रंथातील शब्दांचा अर्थ आणि स्वतःचा अनुभव यात विरोध दिसल्यास दुसऱ्यास श्रेष्ठता देऊन वागण्याची त्यांची क्रांतिकारक वृत्ती आणि इतर शास्त्रांप्रमाणे अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतही अनुभवाच्या कसोटीने पडताळून पाहून त्यातील नित्यानित्य व सत्यासत्य अंशांचे पृथक्करण करून अनित्य व असत्य अंश सोडून सत्याचेच विवेकपूर्वक ग्रहण करण्याची त्यांची निष्ठा माझ्या प्रत्ययास आली. महान शब्दांचा व्यापक अर्थ करून स्वतःच्या भाषेचासुद्धा व्यापक अर्थ करण्याला गीताकारानेच आपणास शिकविले आहे असे तेथे गांधीजी म्हणतात. म्हणजे पशुयज्ञाच्या ऐवजी मनुष्याच्या पाशवीवृत्तीचा बळी देण्याच्या ज्ञानयज्ञाचा प्रचार जसा गीताकाराने केला आहे तसाच धर्मासाठी लढावे याचा अर्थ न्यायासाठी सत्याग्रह संग्राम चालू ठेवावा असा अर्थ करून आपण त्या उपदेशातील सत्य रहस्य पुढे चालवू शकतो असे म. गांधी सुचवित आहेत. इतकेच नाही तर सत्यसंस्थापनेचा हिंसक साधनांनी केलेला प्रयत्न खरोखर सत्य संस्थापना करू शकतच नाही, असेही म. गांधी मानितात. म. गांधींच्या 'अनासक्तियोगा'ची प्रस्तावना वाचल्यानंतर सशस्त्र क्रांती आणि धर्मासाठी सशस्त्र युद्ध या धर्मस्थापनेच्या साधनांतील सदोषता मला अधिकाधिक पटू लागली. सत्याग्रह तत्त्वज्ञानात श्रीकृष्ण व महंमद

यांचा निष्काम कर्मयोग आणि गौतम बुद्ध व येशू ख्रिस्त यांची अहिंसा यांचा एक सुंदर समन्वय म. गांधी साधित आहेत व म्हणूनच त्यांना सर्वधर्मसमन्वयाचे तत्त्व अंतःकरणपूर्वक पटलेले आहे असे मला दिसून आले. १९३० सालच्या तुरुंगवासातून सुटून आल्यानंतर "महात्मा गांधी धर्म व व्यवहार" या विषयावर 'लोकशिक्षण' या मासिकात एक लेख लिहून मी आपले यासंबंधीचे विचार मांडले. या वेळेपासून मला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा स्पष्टपणे दिसू लागला की आजच्या समाजाच्या अपूर्णावस्थेत समाजधारणेला संघटित शस्त्रबलाची आवश्यकता आहे हे खरे असले तरी त्याहूनही त्याच्या धारणेस व विकासास संघटित आत्मबलाची अधिक आवश्यकता आहे. राज्ययंत्र हे एक संघटित शस्त्रबलच होय व त्याची आज समाजधारणेला आवश्यकता आहे. तथापि सामाजिक जीवनाचा विकास करण्याच्या कामी या शस्त्रबलाचा प्रत्यक्ष उपयोग नाही. इतकेच नाही तर समाजाच्या अंतःशक्तीवर त्याचे आक्रमण झाले असता त्यास विकृती प्राप्त होऊन समाजजीवनाला धक्का बसतो. समाज हळूहळू मरू लागतो, त्याचा संस्कृतिवृक्ष वठू लागतो आणि तो जड बनतो. यासाठी समाजातील आत्मबलाची संघटना सतत चालू ठेविली पाहिजे, ही आत्मबलाची संघटना सत्य, अहिंसा, असंग्रह, ब्रह्मचर्य इत्यादी व्रते घेणाऱ्या यतिवर्गाकडून जशी होईल तशी इतर कोणत्याही वर्गाकडून होऊ शकणार नाही. हे आत्मबल जितके प्रभावी बनेल, तितके समाजधारणेला लागणारे शस्त्रबल कमी लागेल आणि अंती हे शस्त्रबळाचे संघटनायंत्र निरुपयोगी बनून गळून पडेल. मानवसमाजाची पूर्णावस्था या दिशेने कार्य करणाऱ्यांच्या प्रयत्नांवरच अवलंबून असून सशस्त्र धर्मयुद्ध आणि हिंसक क्रांती या साधनांच्या पलीकडे जाण्याचा काळ मानवसंस्कृतीच्या इतिहासात आज निकट आला आहे. राज्यशास्त्रात अहिंसक क्रांतीच्या ध्येयाची भर घालून म. गांधींनी त्याला एक नवी दिशा दाखवून दिली आहे. इतकेच नाही तर आत्मार्थी अथवा मोक्षार्थी लोकांना अहिंसा न सोडता लोकसंग्रहाच्या कार्यातील राजकीय क्षेत्रातील किती महत्त्वाचे काम करता येईल ते दाखवून देऊन भगवद्गीतेत न आढळणारे असे एक राजकारण दाखवून दिले आहे. हे राजकारण गीताधर्मातील व प्रजाधर्मातील असून राजधर्माची आवश्यकता नष्ट करणे हे या राजकारणाचे ध्येय आहे. हे अहिंसक क्रांतिकारक राजकारण श्रीकृष्ण, शिवाजी, महंमद यांसारख्या राजर्षींच्या चरित्रात अथवा ग्रंथात जसे आढळत नाही, तसेच ते बुद्ध-ख्रिस्त यांच्या चरित्रात अथवा धर्मग्रंथांतही आढळत नाही. तथापि ख्रिस्ती धर्माच्या काही अभिमान्यांनी या क्रांतिकारक अहिंसावादाची पूर्वतयारी केलेली आहे. क्वेकर पंथाचा संस्थापक जॉर्ज फॉक्स आणि रशियन संतसाहित्यिक कौंट टॉलस्टॉय यांच्या उपदेशात या क्रांतिकारक अहिंसावादाची बीजे आढळतात व येशू ख्रिस्ताचा खरा जीवन संदेश हाच आहे असे टॉलस्टॉय प्रतिपादन करतो. तथापि महात्मा गांधींनी या क्रांतिकारक अहिंसावादाला खरे मूर्त स्वरूप दिले असून आजच्या मानवसंस्कृतीत जी क्रांती आवश्यक व

अपरिहार्य झाली आहे तिचे अंतिम स्वरूप व तिच्यातून निर्माण होणाऱ्या नव्या जगाचे स्वरूप सत्याग्रही संघटनेमुळे अधिक विशुद्ध बनणार आहे. असे असले तरी राजकीय हिंसा समूळ नष्ट करण्याइतकी आत्मबलाची संघटना प्रभावी होण्यास अद्यापि बराच काळ लागणार आहे, हे ओळखूनच सत्याग्रहींनी व इतरांनी आपले व्यावहारिक राजकारण आखिले पाहिजे असे माझे मत आहे. या दृष्टीने सत्याग्रही क्रांतीचे अंतिम शुद्ध स्वरूप आज व्यवहार्य वाटत नाही. म्हणून मी समाजवाद हा आजचा युगधर्म आहे असे मानितो. या युगधर्माचे ज्ञान मला मार्क्सपासून झाले.

## मी मार्क्सपासून काय शिकलो ?

समाजवादाचे पहिले ज्ञान मला ब्रिटनमधील फेबियन सोशॅलिस्टांच्या ग्रंथांतून झाले. मार्क्सच्या विशिष्ट सिद्धान्ताचे यथार्थ ज्ञान मला १९३०—३२ सालापर्यंत झाले नव्हते. तरीही मी कॉलेज शिक्षण संपण्यापूर्वी म्हणजे १९१८-१९ पूर्वीच समाजवादी बनलो होतो. या समाजवादाचे ज्ञान जरी ब्रिटिश समाजवाद्यांच्या ग्रंथातून झाले असले तरी केवळ सनदशीर मार्गाने हे ध्येय प्राप्त होईल, हा भ्रम मला केव्हाच झाला नव्हता. याचे कारण हा भ्रम वाढण्याला ब्रिटनचे वातावरण जितके अनुकूल आहे तितकेच हिंदुस्थानचे वातावरण प्रतिकूल आहे हेच होय. या वातावरणात सनदशीर राजकारणाचे रोपटे जीवच धरू शकत नाही. मार्क्सच्या ग्रंथांचे किंवा मॅझिनीच्या ग्रंथांचे वाचन त्यासाठी आवश्यक आहेच असे नाही. यामुळे ब्रिटिश लेखकांच्या ग्रंथातील समाजवादी विचारसरणी माझ्या मनात क्रांतिवादी स्वरूप धारण करू लागली होती व रशियातील समाजवादी क्रांतीकडे प्रथमपासूनच मी सहानुभूतीने पहात असे. १९२६ सालानंतर मार्क्सच्या ग्रंथांचे अध्ययन मी करू लागलो आणि १९३४ पर्यंत मार्क्सवादाचे यथार्थ आकलन मला झाले असे मला वाटू लागले. मार्क्सचे अध्ययन करू लागण्यापूर्वी मी अध्यात्मवादी झालो होतो, फेबियन सोशॅलिस्टांच्या ग्रंथांतून मी समाजवादीही झालो होतो. तथापि अध्यात्मवाद, समाजवाद आणि क्रांतिवाद यात परस्परांना मारक अथवा परस्परांशी अत्यंत विसंगत असे काही आहे असे मला तेव्हा वाटत नव्हते व मार्क्सवादाच्या दहा—बारा वर्षांच्या अध्ययनानंतर आजही मला वाटत नाही. अध्यात्मवादी हेगेलची राज्यमीमांसा प्रतिक्रांतिकारक होती यात शंका नाही आणि क्रांतिकारक राज्यमीमांसेची शास्त्रीय मांडणी करताना मार्क्सने भौतिकवाद स्वीकारला आहे हेही खरे आहे. तथापि यावरून असे सिद्ध होऊ शकत नाही की अध्यात्म दृष्टीने क्रांतिकारक राज्यमीमांसा करता येत नाही. टॉलस्टॉयची राज्यमीमांसा आत्यंतिक क्रांतिकारक असूनही तो अध्यात्मवादी आहे. तीत जो अवास्तवतेचा व अव्यवहार्यतेचा दोष आहे तो व्यवहारापुरता टाळून क्रांतिकारक राजकीय व्यवहार करता येतो हे म. गांधी दाखवून देत आहेत व "भारुतेपेक्षा हिंसा श्रेष्ठ" या सूत्राची पुरवणी जोडून त्या मीमांसेची मांडणी करणारास स्थल-काल-परिस्थिती-अधिकार इत्यादी उपाधींनी अहिंसेचे मूर्त स्वरूप

कसे कमी अधिक पूर्णापर्ण असू शकते तेही दाखवून देत आहेत. राज्यशास्त्रातील अहिंसक क्रांतिवादाचे रहस्य ज्या काळात (१९३०–३४) माझ्या बुद्धीला पटत होते, त्याच काळात मी मार्क्सच्या विरोधविकासी तत्त्वज्ञानाचे व इतिहास मीमांसेचे मर्म समजून घेत होतो. मार्क्सवादाचे अनेकांनी अनेक अर्थ लाविलेले आहेत आणि परस्पराहून अगदी भिन्न आहेत. "मार्क्सवाद तुम्ही मानता काय" असे मला कोणी विचारले, म्हणजे "पाकिस्तान" तुम्हाला मान्य आहे किंवा नाही, अथवा अल्ला तुम्हाला मान्य आहे की नाही, असे विचारणाऱ्या लोकांची मला आठवण होते. अशांना उत्तर देण्यापूर्वी "पाकिस्तानची व्याख्या आधी करा" अथवा "अल्ला म्हणजे काय ते मला स्पष्टपणे सांगा" असे विचारणे जसे अवश्य आहे, तसेच मार्क्सवाद तुम्ही मानता की नाही, या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी "तुम्ही मार्क्सवाद म्हणजे काय समजता" असे विचारणे आवश्यक आहे असे मला वाटते. तसेच "मार्क्सवाद" "मानणे" याचा तरी अर्थ काय, हेही विचारले पाहिजे. मार्क्सवादाचा अर्थ लावण्याचे स्वातंत्र्य जर माझ्या बुद्धीला असेल व "मानणे" या शब्दाचा मी जो अर्थ करतो तो जर तुम्हाला मान्य असेल, तर "मी मार्क्सवाद मानतो", असे म्हणण्यास किंवा लिहून देण्यासही तयार आहे. पण त्या अर्थाने "मी गांधीवाद मानतो", "मी टिळकांना मानतो", आणि "मी आगरकरांना मानतो" असेही माझे म्हणणे आहे. अर्थात असे प्रश्न विचारणाऱ्यांच्या अर्थाने मी कोणालाच मानीत नाही, हेही तितकेच खरे आहे. तथापि मार्क्सच्या अध्ययनामुळे माझ्या विचारात फार मोठे अंतर पडले आहे, यात शंका नाही. त्याचे विरोधविकासी भौतिक तत्त्वज्ञान आणि इतिहासाची भौतिक मीमांसा, त्याचे राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र, यात जी तत्त्वे गोविली आहेत, ती तत्त्वे आत्मसात केल्यावाचून मानवसंस्कृतीची प्रगतीच होणार नाही अशी माझी खात्री झालेली आहे. मार्क्सएवढा मोठा द्रष्टा आधुनिक युरोपात झाला नाही असे मी मानितो त्याने समाजवादाला शास्त्रीय स्वरूप दिले. सामाजिक शास्त्रात एक विचारक्रांती घडवून आणिली आणि आजच्या मानवसंस्कृतीत क्रांती घडवून आणण्याचे एक शास्त्र निर्माण करून ही क्रांती घडून आल्यानंतर तिची घटना कशी असेल यासंबंधी सर्वसामान्य कल्पना मानवांना आणून दिली. आम्ही ब्रिटिशांच्या संस्कृतीचे बौद्धिक दास बनल्यामुळेच आमच्या राष्ट्रातील बुद्धिमंतांनी जर्मनीतील कांट, हेगेलपासून नीत्शेपर्यंतच्या सर्व तत्त्ववेत्त्यांचा अभ्यास केला, तरी मार्क्सचा अभ्यास केला नाही. टिळक, आगरकरांनी स्पेन्सरला ऋषी बनविला, पण त्याच्याच समकालीन मार्क्सचा अभ्यास केला नाही. राजवाड्यांनी कांटपासून नीत्शेपर्यंतचे सर्व जर्मन तत्त्वज्ञानी पचविले, पण मार्क्स समजून घेतला नाही. वामनराव जोशींनी समाजवाद पचविला, पण मार्क्स वगळला. हा सर्व आमच्या मागासलेपणाचा पुरावा आहे. मार्क्ससंबंधी माझी ही वृत्ती असून मार्क्सच्या अध्ययनाने मला एक नवी दृष्टी प्राप्त झाली असे वाटले. मार्क्सचा भौतिकवाद हा यांत्रिक भौतिकवादाहून भिन्न आहे याची कल्पना मला नव्हती, तोपर्यंत समाजवाद्यांसंबंधी बोलताना

त्यांचे भौतिक तत्त्वज्ञान मला पूर्णपणे अमान्य आहे असे मी लिहीत असे, पण मार्क्सच्या विरोधविकासी भौतिक तत्त्वज्ञानासंबंधी मी तसे विधान करू शकत नाही. हेगेलचे जडाद्वैत, शंकराचार्यांचे चैतन्याद्वैत आणि स्पेन्सरचे अज्ञेयाद्वैत या सर्व ब्रह्मविषयक सिद्धान्तांहून मार्क्सचे विरोधविकासी भौतिक तत्त्वज्ञान भिन्न असून वेदान्ती लोकांनाही त्याचे निःपक्षपाती बुद्धीने अध्ययन केले पाहिजे असे माझे मत आहे. याविषयी एकच मुद्दा येथे सांगतो की वेदान्ती लोकांनी जडाद्वैत सिद्धान्तावर जे जे आक्षेप घेतले आहेत त्यापैकी एकही आक्षेप या तत्त्वज्ञानातील सिद्धान्ताला लागू पडत नाही. तसेच दुसरा एक विचार माझ्या मनात अलिकडे फार जोराने येऊ लागला आहे व तो म्हणजे मानवबुद्धीचे स्वातंत्र्य आणि त्याचे आत्मस्वातंत्र्य यांना मी फार महत्त्व पूर्वीपासूनच देत असे. परमेश्वराचे दास्य झुगारून देण्यासाठी भौतिकवादाचा आश्रय करण्यासही माझ्या मनाची एकेकाळी तयारी होती. पण मार्क्सचे अध्ययन करण्यापूर्वी जो भौतिकवाद मी वाचला होता, तो मला हे बुद्धिस्वातंत्र्य व आत्मस्वातंत्र्य देईना. भौतिक नियतीने मनुष्याचे मन, बुद्धी व आत्मा यांना शृंखलाबद्ध केले आहे, असाच या भौतिकवादाचा सरळ निष्कर्ष होता. परमेश्वराच्या दास्यापेक्षा जड भौतिक नियतीचे हे दास्य मला अधिक स्पृहणीय वाटेना. माझ्या अल्प-स्वल्प अपरोक्षानुभूतीशीही ते जमेना, इतका अनुभवविरोधी सिद्धान्त ग्रहण करण्यात बुद्धिवाद आहे, असेही मला वाटेना. परमेश्वराच्या दास्यातून मुक्त होऊन प्रकृतीच्या खोड्यात आपले पाय अडकले जाऊ नयेत, अशी माझी आकांक्षा होती. ही आकांक्षा सफल होण्याचा एक मार्ग मला मार्क्सच्या विरोधविकासी भौतिक तत्त्वज्ञानात आढळला, किंवा त्याच्या अध्ययनाने मला तो सुचला असेही म्हणता येईल. धर्म व तत्त्वज्ञान यांचे ध्येय मोक्ष हे आहे. ईश्वरवाद मान्य करायला लावणे हे धर्माचे किंवा अध्यात्माचे ध्येय नाही. जैन, बौद्धांनी हे दाखवून दिले आहे. यापुढे ईश्वरवाद फार काळ टिकेल असे मला वाटत नाही. तथापि अध्यात्माचे ध्येय जो मोक्ष किंवा ब्राह्मी स्थिती, ब्रह्मानुभव, आत्मानुभव यावर तो टिकणार आहे. शास्त्रज्ञांना नवी सत्ये संशोधन करताना, कवींना नवी सौंदर्ये निर्माण करून त्यांचा आस्वाद इतरांना देताना, संतांना आत्मोद्धाराचे व जगदुद्धाराचे कार्य करीत असता आणि क्रांतिकारकांना क्रांतियज्ञात प्राणाहुती देताना या ब्राह्मीस्थितीचा अपरोक्ष अनुभव येतो. हा ब्रह्मानुभव अनिर्वचनीय आनंदमय आहे, स्फूर्तिदायक आहे, प्रेमकारक आहे आणि तो प्राप्त झाल्याने विश्वात्मभाव दृढ बनून विश्व-हितबुद्धी तेजस्वी बनते. मानवी बुद्धीत नवी विचारसृष्टी निर्माण करण्याचे व प्रत्यक्ष दिसणाऱ्या वास्तव सृष्टीवर मात करण्याचे सामर्थ्यही येऊ शकते. बुद्धी सत्यनिष्ठ, अंतःकरण प्रेममय आणि आचरण तपःशुद्ध बनविण्याचा सतत प्रयत्न करणे हा आत्मोन्नतीचा एक सनातन मार्ग आहे, हे ज्ञान मला म. गांधींच्या जीवनाचे निरीक्षण व त्यांच्या लेखनाचे परिशीलन करून अत्यंत सुलभतेने झाले. ब्रह्मानुभूतीसंबंधीचे गूढतत्त्व "सत्य हाच परमेश्वर"

या गांधी सूत्राने नष्ट केले. लो. टिळक व म. गांधी यांच्यापासून आत्मोन्नतीप्रमाणे समाजोन्नती हे धर्माचेच त्याहूनही अधिक श्रेष्ठ अंग आहे, हे मला समजले होते. पण सामाजिक घटनांची उत्पत्ती, अभिवृद्धी व विनाश कसे होतात यासंबंधीचे ज्ञान मला मार्क्सपासून जितके झाले तितके इतरांपासून झाले नाही. ऐतिहासिक घडामोडींची मार्क्सची मीमांसा अत्यंत महत्त्वाची आहे. तथापि ती परिपूर्ण आहे असे नाही. या मीमांसेची मांडणी करताना, नवे विचार निर्माण करून बाह्य वास्तव परिस्थितीला स्ववश बनविण्याची जी सनातन आत्मप्रेरणा मानवबुद्धीच्या मागे आहे, तिकडे दुर्लक्ष केल्यास ही इतिहासमीमांसा जड यांत्रिक बनते व अनेक मार्क्सवाद्यांनी ती तशी बनविलीही आहे. हा मार्क्सवाद मला मान्य नाही व त्याच्या विरोधविकासी मूळ भूमिकेशीही तो विसंगत आहे. मार्क्सवादापासून मी हेच शिकलो की आज मानवसंस्कृतीत समाजवादी क्रांती झाल्यावाचून तिला स्थैर्य लाभणार नाही व ही क्रांती घडविणाऱ्या शक्ती भांडवलशाही व साम्राज्यशाहीमुळेच निर्माण होत आहेत. परिस्थितीच्या कचाटीत सर्व मानवजात सापडली असता आणि आर्थिक घटनेच्या विघटनेमुळे सर्व संस्कृती कोसळून पडत असता परिस्थितीला स्ववश बनविण्यास अनुरूप असे विचार निर्माण करणारी मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणा चेतविली जाईल व नवे सांस्कृतिक युग स्थापन करण्याचे सामर्थ्य मानवातील काही लोक तरी निश्चित प्रकट करतील. मार्क्सवादातील हा आत्मविश्वास मला अशास्त्रीय किंवा गूढगुंजन वाटत नाही. "मानव बुद्धी"त नवविचारांची धारणा करणारी ही आत्मप्रेरणा आणि सभोवारची वास्तव स्थिती यांच्या झगड्यांतून क्रांतिकारक विचार, भावना व कृती यांचे आकार घडविले जातात. समाजजीवनाचा इतिहास विवेचिताना या दोनही घटकांचा विचार करावा लागतो. मार्क्सवादात बाह्य परिस्थितीवर भर देण्याची प्रवृत्ती आहे व गांधीवादात आत्मप्रेरणेवरच सर्व भर देण्याची प्रवृत्ती आहे. क्रांतिकार्य, क्रांतिशास्त्र व क्रांतिभावना यात दोष राहण्यास हे उभयपक्षीय एकांगीत्व कारण होत असते. सत्याग्रही व समाजवादी या दोहोंच्या सहकार्याने व तात्त्विक समन्वयानेच हे दोष नष्ट होतील असे मला वाटते. हिंदूंच्या वर्णाश्रमधर्मात जसे ब्राह्मण व क्षत्रिय होते अथवा ब्रह्मर्षी व राजर्षी होते, तसे आजच्या मानव समाजात काही सत्याग्रही व काही समाजवादी असे मी मानितो. सत्याग्रहींचे आत्मबल सर्व समाजाची धारणा करण्याइतके प्रभावी होईल तेव्हाच मानवसमाज समाजसत्ताक अवस्थेतून आत्मसत्ताक अवस्थेत जाईल व म. गांधींना अभिप्रेत असणारे रामराज्य अवतीर्ण होईल. मार्क्सवादाची अंतिम परिणती त्यातच झाली पाहिजे व होणे इष्ट आहे. मार्क्सवादाशी हे मत विसंगत नाही हे मला मान्य आहे पण ते ध्येय अमलात आणण्याचा मार्ग मार्क्सला व त्याच्या अनुयायांना कळलेला नाही. त्याचे ज्ञान म. गांधींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानानेच होऊ शकेल.

## माझ्या विचारांची गोधडी

अशी ही माझ्या विचारांची गोधडी मी बनविलेली आहे. यात सांप्रदायशुद्धता नाही असे सर्व सांप्रदायिक म्हणतात. ती लोकांपुढे मांडण्याइतकी सुंदर बनली आहे का नाही हे मी सांगू शकत नाही. तथापि ती शिवून तयार करताना मला आनंद झालेला आहे व तिच्याकडे पाहून थोडा अभिमानही वाटतो. समाजवादी मला गांधीवादी समजतात व गांधीवादी मला समाजवादी मानतात. एकाचे मत दुसऱ्यांना मुळीच पटत नाही. पण माझे विचार अशास्त्रीय व विसंगत आहेत आणि म्हणून ते गोधडीवजा बनले आहेत याबद्दल दोनही सांप्रदायिकांचे मतैक्य होऊ शकते. त्या दोघांनाही उत्तर देताना मी मोरोपंतांच्या पुढील शब्दात देऊ शकेन.

संस्कृत प्राकृत मिश्रित यास्तव कोणी
म्हणेल ही कंथा।
भवशीत भीति भ्रांत स्वान्ताला
दाविला बरा पंथा॥

हे ऐकून ते दोघेही मला हसतील. मीही त्यांना हसू शकेन. कारण मला या गोधडीने अवश्य ती ऊब मिळू शकते.

[*सत्यकथा*, एप्रिल १९४९, पृ. १९–२०]

## विभाग पहिला

# समाजवाद

२

# रशियन राज्यक्रांती आणि विश्वकुटुंबवाद

['लोकशिक्षण' मासिकात ऑक्टोबर १९२८ ते सप्टेंबर १९२९ या वर्षभराच्या काळात आचार्य जावडेकरांनी रशियन राज्यक्रांतीवर आठ लेखांची एक लेखमाला लिहिली. रशियातील क्रांतीची वैशिष्ट्ये, समाजसत्तावादाची तत्त्वे, बोल्शेविकांची धोरणे, इ. बाबींची चर्चा या लेखमालेत केली होती. याच लेखमालेत आचार्यांनी "कम्युनिझम" साठी विश्वकुटुंबवाद हा मराठी पर्याय योजला. रशियाची ऐतिहासिक आणि भौगोलिक माहिती, प्रत्यक्ष बोल्शेविक क्रांतीचा तपशील, बोल्शेविकांचे अर्थशास्त्र आणि राजकारण यांची माहिती त्याकाळी उपलब्ध असलेल्या अद्ययावत संदर्भग्रंथांच्या आधारे गोळा केल्याचे या लेखमालेवरून दिसते. पुढे १९४३ मध्ये आचार्यांनी "शास्त्रीय समाजवादा"वर दिलेली व्याख्यानेही प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केली असल्याने येथे मार्क्सवादाविषयीची चर्चा वगळली आहे मात्र आचार्यांच्या लेखनाच्या पहिल्या दशकातील त्यांच्या मांडणीचा परिचय व्हावा म्हणून "बोल्शेविकांचे समाजशास्त्र" आणि "हिंदुस्थान आणि कम्युनिझम" या लेखांमधील काही उतारे येथे अंतर्भूत केले आहेत.

"जडवाद" हे कम्युनिझमचे मूलतत्त्व या लेखमालेतून पुरेसे स्पष्ट होत नाही अशी टीका करणारा लेख (कॉ.) सरदेसाईंनी लिहिला. त्यावरील आचार्यांच्या उत्तरातील मुख्य भागही येथे दिला आहे.]

## बोल्शेविकांचे समाजशास्त्र

खरी सामाजिक उन्नती करावयाची झाल्यास या भांडवलशाहीच्या कचाटीतून सामान्य जनतेची प्रथम सुटका झाली पाहिजे, हे ओघानेच प्राप्त होते. बोल्शेविकांचे सर्व सामाजिक विचार या एका सिद्धांतावरच उभारलेले आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. त्यांना समाजातून आर्थिक दास्य नष्ट करावयाचे आहे. मध्ययुगीन युरोपात आपल्या इकडच्याप्रमाणेच चार सामाजिक वर्ग होते. क्लर्जी, नोबल्स, फ्रीमेन व सर्फस् हे ते चार वर्ग होत. हे अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्यासारखेच होते असे म्हणण्यास हरकत नाही. मध्ययुगाच्या अंताबरोबरच समाजाचे हे चतुर्विध वर्गीकरण नष्ट होऊन औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलवाले व मजूर

असे द्विविध वर्गीकरण अस्तित्वात आले. हे वर्गीकरण नष्ट करून बोल्शेविकांना एकवर्गसमाज निर्माण करावयाचा आहे. कारखानदार व जमीनदार वर्ग नष्ट होऊन समाजातील सर्व धनोत्पादन सार्वजनिक नियंत्रणाखाली आले असता समाजातील उच्चनीच भाव, स्वामी-सेवक संबंध, किंवा सधन-निर्धन भेद नष्ट होऊन सर्वच समाजाचे सेवक बनतील, सर्वांचा दर्जा एकच, कोणी कितीही मोठा झाला तरी तो समाजाचाच सेवक, किंबहुना कोणी कोणाचा मालकही नव्हे व कोणी कोणाचा नोकरही नव्हे. ज्याप्रमाणे परमेश्वराचे भक्त तितके सर्व समान दर्जाचे, त्याचप्रमाणे समाजाचे उपासक तितके सर्व समान दर्जाचेच. कोणी कोणाला महाराज, साहेब, सरकार, मालक म्हणण्याचे कारण नाही. सर्वांनी सर्वांस कॉम्रेड (भाई) म्हणावे असा त्यांचा नियम. समाजाची कोणतीही सेवा अगर समाजाला आवश्यक असे कोणतेही कर्म उच्च किंवा नीच नाही, असे ते समजतात. स्वे स्वे कर्मण्याभिरतः संसिद्धिं लभते नरः किंवा स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ही वेदान्ताची तत्त्वे त्यांना व्यवहारात आणावयाची आहेत. समाजाव्यतिरिक्त किंवा मानवतेव्यतिरिक्त ते कोणताही देव मानीत नाहीत. हे त्यांचे तत्त्वज्ञान कोणास मान्य असो किंवा नसो, मानवता ही परमेश्वराची एक श्रेष्ठ विभूती आहे, हे कोणासही मान्य करावे लागेल. या विभूतीची निष्कामबुद्धीने जे स्वकर्मपुष्पांनी अर्चा करितात ते कोणतेही कर्म करीत असले तरी त्यांचा दर्जा समानच आहे हे तत्त्व आम्हा भारतीयांना नवे नाही. आपल्या परम भक्तांसंबंधी परमेश्वर ज्याप्रमाणे तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् असे म्हणतो, त्याचप्रमाणे समाजाने आपल्या भक्तांसंबंधी म्हटले पाहिजे. ......

...... ज्याने त्याने आपापल्या अंगच्या गुणांना अनुसरुन समाजाची सेवा करावी व समाजानेही प्रत्येकाच्या गुणांचा योग्य परिपोष होईल अशी त्याची जोपासना करावी, हेच तत्त्व नैतिकदृष्ट्या सयुक्तिक ठरते. सार्वजनिक संपत्तीच्या विभागणीच्या कामी बोल्शेविकांचे हेच ध्येय आहे व नैतिकदृष्ट्या ते निर्दोष आहे यात शंका नाही. हे ध्येय केवळ नैतिक दृष्टीनेच निर्दोष आहे असे नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही निर्दोष आहे असे मि. जे. ए. हॉब्सन् या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाने दाखवून दिले आहे

.. एकत्र कुटुंबाची आर्थिक घटना [प्रत्येकाकडून त्याच्या शक्तींप्रमाणे समाजाने सेवा घ्यावी आणि प्रत्येकास त्याच्या गरजांप्रमाणे धन द्यावे] याच तत्त्वावर झालेली असते व सर्व समाजाची आर्थिक संघटना याच तत्त्वावर व्हावी असे कम्युनिस्टांचे म्हणणे आहे. याचकरिता आम्ही त्यांना विश्वकुटुंबवादी असे मराठी नाव योजिले आहे.

पण या विश्वकुटुंबाची प्रस्थापना एकदम होणे शक्य नाही हे कम्युनिस्टांनाही आज मान्य झालेले आहे. खऱ्या विश्वकुटुंबाची प्रस्थापना झाली म्हणजे सामाजिक नियंत्रणाची किंवा राज्यसंस्थेची मुळीच आवश्यकता राहणार नाही. पण समाजाला ही काल्पनिक अराजक अवस्था प्राप्त होण्यापूर्वी त्याला समाजसत्तेच्या शिस्तीतून बराच काळ गेले पाहिजे. या

अवस्थेस समाजसत्ताक (Socialistic) अवस्था असे म्हणण्याचे कारण असे की, कोणाच्या योग्य गरजा कोणत्या व त्या भागविण्यासाठी कोणास किती धन द्यावे, हे ठरविण्याचे कार्य करण्यासाठी सरकार या सत्तिप्रधान संस्थेची या काळात समाजाला आवश्यकता असते. भांडवलप्रधान संस्कृतीमुळे आज वैयक्तिक लोभ व धनाभिलाष यांची फाजील वाढ झाली आहे, मनुष्यांची स्वभावरचना व्यक्तिनिष्ठ बनलेली आहे, परस्पर सहकार्याच्या भावनेपेक्षा स्पर्धेची भावना उद्दीपित झालेली आहे, भांडवलवाल्यांच्या उदाहरणाने अकष्टार्जित उत्पन्नावर जगण्याची आकांक्षा व्यक्तिमात्राच्या अंतःकरणात प्रबळ झालेली आहे, सामाजिक विषमतेमुळे बुद्धिप्रधान धंदे करण्यास लायक अशा लोकांचा व्हावा तितका पुरवठा अद्यापि झालेला नाही. या सर्व परिस्थितीमुळे समाजसत्ताक अवस्थेतून गेल्याखेरीज विश्वकुटुंबाची प्रस्थापना करणे अशक्य झाले आहे. या अवस्थेत समाजाची निरनिराळी कामे करणाऱ्या वर्गांना निरनिराळ्या राहणीला अवश्य इतके वेतन देणे अवश्य आहे. अर्थात या काळात या प्रमाणात समाजातील आर्थिक विषमता सर्वस्वी नष्ट होणे शक्य नाही. आज रशियातही ही विषमता पूर्णपणे नष्ट झालेली नाही. ज्या मानाने बुद्धिप्रधान किंवा विशेष कौशल्याची कामे करणाऱ्या लोकांचा भरणा समाजात वाढेल, शिक्षणाचा प्रसार जोराने होईल, साध्या राहणीचे महत्त्व लोकांना पटत जाईल, वैयक्तिक स्वार्थबुद्धी कमी होऊन समाजहितबुद्धी वाढत जाईल, द्रव्यार्जनातील स्पर्धेची भावना नष्ट होऊन समाजसेवेच्या कामी अहमहमिका सुरू होईल, त्यामानाने कोणासही आपली कार्यक्षमता टिकण्यास अवश्य असणाऱ्या धनाहून अधिक धनोपभोग घेण्याची गरज भासणार नाही. आज रशियातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती या परिवर्तनास अनुकूल अशी झालेली आहे. शिक्षणाची द्वारे सर्वांस खुली असून त्याची सर्व जबाबदारी समाजाने आपल्या अंगावर घेतल्यामुळे कोणाच्याही नैसर्गिक बुद्धीचा विकास होण्यास अडचण उरलेली नाही. सर्व धनोत्पादन समाजामार्फत सहकार्याच्या तत्त्वावर होत असल्याने समाजातील क्रूर जीवनकलह नष्ट झालेला आहे, प्रत्येकाच्या योगक्षेमाची जबाबदारी समाजाने घेऊन आपत्कालच्या मदतीची, वृद्धावस्थेतील व्यवस्थेची व मुलाबाळांच्या शिक्षणाचीही बरीच सोय समाजामार्फत केल्यामुळे मनुष्याची द्रव्यदृष्टी व लोभ यांना मर्यादा उत्पन्न झाली आहे. साध्या राहणीचे महत्त्व समाजातील सत्ताधारी कम्युनिस्ट स्वोदाहरणाने पटवून देत असल्याने "यथा राजा तथा प्रजा" या प्राचीन सिद्धान्तास अनुसरून लवकरच हे ध्येय राष्ट्राच्या मनोभूमीत रुजेल अशी आशा करण्यास बराच आधार आहे. या कामी ज्या मानाने यश येत जाईल त्या मानाने एकवर्ग समाजसंघटनेच्या ध्येयाची प्रस्थापना झपाट्याने होऊ लागेल.

## सुखवस्तू वर्ग व मानवी प्रगती

समाजशास्त्राच्या दृष्टीने बोल्शेविकांच्या सामाजिक विचारसरणीवर येणाऱ्या एका आक्षेपाचा येथे विचार करणे आवश्यक आहे. समाजातील अश्रमोपजीवी सुखवस्तू वर्ग नष्ट

झाल्याने मानवी संस्कृतीच्या प्रगतीला अडथळा होण्याची भीती काही लोकांना वाटते. या लोकांचे असे म्हणणे आहे की, समाजात सुखवस्तू वर्ग असला तरच कलाकौशल्य, विद्या-व्यासंग, शास्त्रीय शोध किंवा काव्यवाङ्मयादी ललितकला यांना उत्तेजन मिळते. समाजातील सर्वच वर्गांना किंवा व्यक्तींना उपजाविकेकरिता श्रम करण्यास भाग पाडिले, तर मानवी संस्कृतीच्या या श्रेष्ठ अंगांचा विचार होणार नाही. मानवी संस्कृतीच्या इतिहासाकडे दृष्टी फेकल्यास हा आक्षेप अगदीच निराधार आहे असे म्हणता यावयाचे नाही. आजपर्यंतच्या बहुतेक सर्व संस्कृतींचा पाया सामाजिक दास्यावरच घातलेला दिसून येतो. जगप्रसिद्ध अशी प्राचीन भारतीय आर्यांची संस्कृती किंवा युरोपातील अथीनियन संस्कृती यांचा विचार केला तरी आपणास असेच दिसून येते. आमच्या इकडचे शूद्र आणि अस्पृश्य यांनी काबाडकष्ट करून समाजाला उपज विकेची साधने निर्माण करून द्यावीत, त्यांनी सर्व हीन गणलेली कामे मुकाट्याने करावीत व त्यांच्या जिवावर त्रैवर्णिकांनी उच्च संस्कृतीची इमारत उभारावी असा प्राचीन भारतीय इतिहास आहे. प्राचीन रोमन अगर ग्रीक संस्कृतीचा विचार केला तरी सामाजिक दास्यावरच तिची उभारणी झालेली आढळते. मध्ययुगातील संस्कृतीची उभारणी भूदासांच्या (सर्फच्या) काबाडकष्टावर उभारलेली होती. अर्वाचीन भांडवलप्रधान संस्कृती मजूरवर्गाच्या गुलामगिरीवर व जित राष्ट्रांतील आर्थिक लुटीवर उभारलेली आहे. ताजमहाल-सारख्या मध्ययुगीन इमारतींच्या ठिकाणी शिल्पकलेचा जो अपूर्व विकास दृष्टीस पडतो, त्याच्या बुडाशी अशाच मानवी गुलामगिरीचा आधार इतिहासज्ञांस सापडतो. यावरून विचार करिता जगातील आर्थिक दास्य नष्ट होऊन अल्पसंख्य सुखवस्तू वर्ग नाहीसा झाला तर मानवी संस्कृतीची प्रगती कुंठित होईल अशी भीती काहींना वाटते. याला असेही एक उत्तर देता येईल की, गुलामगिरीच्या असुरी संस्थेवर उभारलेली संस्कृती ही खरी संस्कृतीच नव्हे व ती नष्ट झाली तरी मनुष्यसमाजाचे कोणतेही अनहित होणार नाही. पण याहीपेक्षा अधिक समर्पक उत्तर या आक्षेपास देता येणार आहे. भौतिक शास्त्रांच्या वाढीमुळे मनुष्याची धनोत्पादनक्षमता आज जितकी वाढली आहे तितकी पूर्वी कधीच वाढली नव्हती. या भौतिक विद्येच्या साहाय्याने मनुष्याने आपला पगडा पंचमहाभूतांवर बसविला असून सृष्टीच्या दास्यातून त्याने आता आपणास बहुतेक मुक्त करून घेतले आहे. मनुष्यसमाजाच्या आवश्यक गरजा भागविण्याच्या कामी सर्वांनी श्रम करावयाचे ठरविले व धनोत्पादनाचे कार्य शिस्तवारीने व शास्त्रीय पद्धतीने होऊ लागले, म्हणजे कोणासही चार-पाच तासांहून जास्त काम करावे लागणार नाही. कोणावरही कामाचा विशेष भार न पडता प्रत्येकास अवश्य तितकी विश्रांती मिळू शकेल. विशिष्ट वर्गाने सर्वच काळ विश्रांतीत किंवा आळसात काढावा, समाजातील सामान्य जनतेने सर्व दिवसभर काबाडकष्ट करीत राहावे, तिने कोणत्याही उच्च प्रतीच्या सुखाचा अभिलाष धरू नये व आपल्या श्रेष्ठ गुणांचा विकास न होताच जागच्याजागी कुजून मरून जावे, ही आपत्ती टाळणे भौतिक विद्येच्या प्रगतीमुळे व सामाजिक समतेच्या अगर लोकसत्तेच्या ध्येयामुळे आज शक्य कोटीत आलेले आहे. उच्च

मानवी संस्कृतीची वाढ होण्यास समाजातील प्रत्येक व्यक्तीस दिवसाकाठी काही विश्रांती मिळण्याची सोय झाल्याने अधिकच अनुकूल वातावरण निर्माण होणार आहे. बहुजन-समाजाचा जीवनक्रम सुखाचा व आरामाचा होत गेल्याने त्यांच्या राहणीतही कलाकौशल्य, विद्याभिलाष, मानसिक उन्नती, सद्‌गुण संवर्धन यांस अवसर मिळेल. बहुजन समाजाला सामाजिक दास्यांत रखडत ठेवून विशिष्ट अल्पसंख्यांक वर्गानेच चैनीत व ऐषआरामात निमग्न असणे, ही खरी मानवी संस्कृती नसून बहुजनसमाजाची जीवनयात्राच अधिक रमणीय, आकर्षक व आल्हादजनक बनविणे हीच खरी मानवी संस्कृती आहे. अशा संस्कृतीच्या नव्या युगाचा अवतार होण्यास अनुकूल काळ भौतिकशास्त्रातील शोधांमुळे आज मनुष्यसमाजास प्राप्त झालेला आहे. पण सृष्टीच्या दास्यशृंखलातून आज मनुष्याची मुक्तता झाली असली, तरी भांडवलप्रधान संस्कृतीमुळे त्याचे सामाजिक व आर्थिक दास्य आज अधिकच वाढलेले आहे. याची कारणे नैसर्गिक नसून सामाजिक आहेत व सामाजिक क्रांतीने ती नष्ट करणे शक्य आहे. समाजाची रचना उचनीच भावावर करण्याचे समर्थन करण्यास भौतिक विद्येच्या प्रगतीमुळे आज एकही सबळ कारण उरलेले नाही व म्हणून समाजसत्तेच्या मार्गाने विश्वकुटुंबाचे ध्येय गाठण्याच्या मार्गात नैसर्गिक अशी कोणतीच अडचण आज उरलेली नाही. यामुळे मानवी संस्कृतीची पीछेहाट होण्याची ही भीती आता कोणी धरण्याचे कारण नाही.

## स्त्री स्वातंत्र्य

बोल्शेविकांच्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचारासंबंधीही बराच गैरसमज पसरलेला दिसून येतो. स्त्रियांच्या दास्याचे निदानही त्यांनी आपल्या सर्वसामान्य विचारसरणीस अनुसरून समाजाच्या आर्थिक संघटनेतच शोधून काढिले आहे. स्त्रियांच्या दास्याचे खरे निवारण होण्यास त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे त्यांचे मत आहे. पण ही कल्पना पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञांपैकी केवळ कम्युनिस्ट किंवा समाजसत्तावादी पक्षातच दिसून येते असे म्हणता येणार नाही. अनेक व्यक्तिस्वातंत्र्यवादी समाजशास्त्रज्ञही स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत. तथापि समाजसत्तावादी पुढारी स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य जितक्या पायाशुद्ध किंवा सुसंगत रीतीने प्रतिपादितात, तितके व्यक्तिस्वातंत्र्यवादी पुढारी प्रतिपादीत नाहीत. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य द्यावयाचे म्हणजे आज त्या जी कौटुंबिक कर्तव्ये करीत आहेत, त्यांची समाजाने काहीतरी वेगळी सोय केली पाहिजे. ती कशी करावयाची हाच मुख्य प्रश्न असून त्याचे जितके समाधानकारक उत्तर समाजसत्तावादी देऊ शकतात तितके व्यक्तिस्वातंत्र्यवादी देऊ शकत नाहीत. पहिली गोष्ट अशी की व्यक्तिमात्रास आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व स्वतंत्र बनण्यास दिवसाकाठी चार-पाच तासांहून अधिक काळ काम करावयास लागू नये, असा समाजसत्तावाद्यांचा पहिला सिद्धांत आहे. समाजातील धनोत्पादनाचे सर्व कार्य शास्त्रीय व सार्वजनिक हितदृष्टीने होऊ लागले असता हे ध्येय

शक्य कोटीत येऊ शकेल असे बहुतेक लोकांस मान्य होण्यासारखे आहे. असे झाले म्हणजे आजच्याप्रमाणे स्त्रियांना द्रव्यार्जनासाठी आठ-आठ, दहा-दहा तास घरदार सोडून जाण्याची गरज लागणार नाही. तसेच यांत्रिक शक्तीचा उपयोग समाजात वाढत जाईल त्यामानाने कुटुंबातील गृहिणीस करावी लागणारी आजची कामे कमी कमी होत जाणार हे ही आपणास दिसत आहे. दळणे, कांडणे, कपडे धुणे, दिवाबत्ती करणे, स्वयंपाक करणे वगैरे सर्व कामे हळूहळू मोठ्या प्रमाणावर यांत्रिक शक्तीने होत जाऊन गृहिणींस ती करावी लागणार नाहीत, किंवा लागली, तरी त्यातील फारच थोडा भाग करावा लागेल असे समाजसत्तावाद्यांचे मत आहे. गृहकृत्यांच्या कामी व्यक्तिस्वातंत्र्याच्या ऐवजी सहकार्याचे तत्त्व अमलात येण्याने हे ध्येय साध्य होत जाईल. घरोघरी दळणे, कांडणे, कपडे धुणे, भाकरी भाजणे, गुरे ठेवून दुधाचा पुरवठा करणे, असे न करता गावातील किंवा आळीतील सर्व लोकांचे दळणे, कांडणे, कपडे धुणे, पाव भाजणे किंवा डेअरी करून दूध पुरविणे ही कामे यांत्रिक साहाय्याने सार्वजनिक नियंत्रणाखाली सहकार्याने होऊ लागल्यास समाजातील स्त्रियांचे कितीतरी श्रम वाचणार आहेत. ...

कुटुंबातील हरएक कामांचा बोजा स्त्रियांवर टाकून व बालसंगोपनाची सर्वच जबाबदारी स्त्रियांकडे सोपवून हल्लीचा समाज व पुरुषवर्ग मातृवात्सल्याच्या नैसर्गिक भावनेला फाजील ताण देत आहे, असे सूक्ष्म विचाराअंती सर्वांस मान्य करावे लागेल. यांत्रिक शक्तीचा उपयोग पुरुषवर्गाच्या सुखसोयी वाढविण्याच्या कामी जितका झालेला आहे तितका कौटुंबिक काबाडकष्ट कमी करण्याच्या कामी अद्यापि झालेला नाही. तसेच प्रत्येकाचे वेतन भांडवलशाहीत त्याच्या धनोत्पादन सामर्थ्यावरूनच ठरत आहे, तोपर्यंत स्त्रियांच्या अडचणी व गरजा ध्यानात घेऊन त्यांना कामाच्या वेळात पगारी सुट्ट्या व पगारी रजा देण्याची सोय होणे शक्य नाही. सर्व धनोत्पादन सार्वजनिकरीत्या होऊन प्रत्येकाच्या योग्य गरजांचा विचार करून सामाजिक संपत्तीची विभागणी व्हावी, हे समाजसत्ताक तत्त्व ज्या मानाने अमलात येईल त्या मानानेच स्त्रियांचे आर्थिक दास्य नष्ट होऊन स्त्रीस्वातंत्र्यामुळे कौटुंबिक सौख्यात भर पडत जाणार आहे. ..

## कम्युनिस्ट व नास्तिकवाद

अखेरीस कम्युनिस्ट पक्षाच्या धर्ममतांसंबंधी दोन शब्द लिहून हा लेख संपवावयाचा आहे. कम्युनिस्ट हे आपणास पक्के धर्मद्वेष्टे समजतात. परमेश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा विश्वास नाही व भौतिक सृष्टीच्या पाठीमागे अध्यात्मशक्ती आहे या सिद्धांतावरही त्यांची श्रद्धा नाही. आम्हास त्यांची ही मते मान्य नाहीत व समाजात जडवाद माजल्याने समाजाचे हित होईल असे आम्हास वाटत नाही. पण समाजसत्तावाद किंवा विश्वकुटुंबवाद (Socialism or Communism) याचा नास्तिकवादाशी किंवा जडवादाशी असा

अन्योन्य नित्यसंबंध आहे, असे आम्हास वाटत नाही. अनेक समाजसत्तावादी अध्यात्मवादी आहेत व अनेक जडवादी व्यक्तिस्वातंत्र्यवादी आहेत. आमच्या मतांप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञानातील अध्यात्मवादी वेदान्त, विभूतिवाद, लोकसंग्रहपोषक निष्कामकर्मयोग व भगवद्गीतेतील प्रवृत्ती निवृत्तीचा समन्वय यांच्या पायावर विश्वकुटुंबवादाचे सुंदर मंदिर उभारता येणे शक्य आहे. पण इतके तर्कशुद्ध तत्त्वज्ञान खिस्ती धर्माच्या आधारभूत ग्रंथात सापडत नसल्याने पाश्चात्य देशातील पुष्कळ समाजसुधारक व समाजशास्त्रवेत्ते, नास्तिकवादी, जडवादी किंवा अज्ञेयवादी बनतात. कॉम्ट, स्पेन्सर, मिल्ल यांचीच परंपरा आज रशियन कम्युनिस्टांनी चालविली आहे, पण मिल्ल, स्पेन्सर यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यवादाऐवजी समाज-सत्तेच्या तत्त्वांचा अवलंब केल्याने त्यांनी न कळत फार मोठे धर्मकार्य केलेले आहे असे आमचे मत आहे. मनुष्याच्या वैयक्तिक स्वार्थ भावनेवर समाजाची रचना करू पाहणारे लोक धर्मनिष्ठेच्या कितीही गप्पा मारीत असले किंवा कितीही कर्मठ असले, तरी समाज-सुधारणात्मक धर्माचा ते उच्छेद करीत आहेत असेच म्हणावे लागते. या दृष्टीने तोंडाने धर्मनिष्ठेचा जप करणारे भांडवलप्रधान संस्कृतीचे भोक्ते विश्वकुटुंबवादी नास्तिक सुधारकांपेक्षा धर्माचे अधिक द्वेष्टे ठरतात. बोल्शेविकांची सामाजिक व आर्थिक मते खऱ्या मानवधर्मास अनुकूल अशीच आहेत. धर्माचे ऐहिक ध्येय विश्वकुटुंबवाद हेच आहे. खऱ्या विश्वव्यापक सार्वत्रिक धर्मावर उभारलेल्या लोकसंग्रह शास्त्राचा पाया व्यक्तीच्या स्वहित-बुद्धीवर घातला न जाता व्यक्तीच्या स्वधर्मबुद्धीवरच घातला पाहिजे. धनोत्पादन वैयक्तिक स्वार्थभावनेवर न चालता समाजसेवेच्या पवित्र भावनेवर चालू राहिले पाहिजे. सामाजिक संपत्तीची विभागणी व्यक्तीच्या अर्थोत्पादनक्षमतेवरच अवलंबून न राहता त्याच्या समाज प्रेमाच्या उत्कटतेवर अवलंबून राहिली पाहिजे. समाजात नित्य क्रूर जीवनकलह चालू न राहता परस्परसहकार्याची मंजूळ भावना प्रचलित झाली पाहिजे. सर्वांच्या योगक्षेमाची जबाबदारी मानवतारूपी विराट पुरुषाने उचलावी आणि मनुष्याची द्वैतवर्धक द्रव्यदृष्टी व स्वार्थभावना यांचा हळू-हळू लोप व्हावा. व्यक्तिमात्राचे सर्व व्यवहार परस्पर स्नेहाच्या व सहकार्याच्या तत्त्वावर होऊ लागून शरीरभेदाच्या पलीकडे असणाऱ्या आध्यात्मिक अद्वैताचा क्षणोक्षणी अनुभव येऊ लागावा, असेच कम्युनिस्टांचे मत आहे. समाजसत्तेच्या उग्र तपश्चर्येतून पार पडल्यानंतर व सर्वांचाच आत्मविकास, पराकोटीस गेल्यानंतर जगातील पोलीस, तुरुंग, शस्त्रसामुग्री इत्यादी अमंगल वस्तूंचा लोप होऊन सर्व विश्व मंगलमय बनून जाईल असे त्यांना वाटते. भारतीय पुराणात वर्णन केलेले सत्ययुग ते हेच होय. खिस्ताने भाकीत केलेले परमेश्वरी साम्राज्य ते हेच होय. याच ध्येयाकडे मनुष्यमात्रास नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न आज कम्युनिस्ट लोक करीत आहेत व या दृष्टीने ते आपणास धर्मद्वेष्टे म्हणवीत असले तरी, आम्ही त्यांना धर्मनिष्ठच समजतो.

[*लोकशिक्षण*, मे १९२९, पृ. ३११ ते ३१३]

## हिंदुस्थान आणि कम्युनिझम

[ भारतात कम्युनिझम फैलावणे कितपत शक्य व आवश्यक आहे याची चर्चा या लेखात केली आहे. मुख्यतः भारतीय संस्कृती आणि कम्युनिझम यांत विरोध आहे काय या मुद्याविषयीचे आचार्यांचे विवेचन तेवढेच येथे घेतले आहे. ]

आतापर्यंत प्रस्तुत लेखमालेत बोल्शेविक पक्षाने रशियात केलेल्या क्रांतीचा इतिहास सांगून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा वाचकांना परिचय करून दिला. या लेखात हे तत्त्वज्ञान हिंदुस्थानात पसरणे कितपत शक्य व इष्ट आहे या प्रश्नाची चर्चा करावयाची आहे. बोल्शेविकांचे तत्त्वज्ञान म्हणजे कम्युनिझम ऊर्फ "विश्वकुटुंबवाद" हिंदुस्थानात प्रसार पावणे शक्य व इष्ट नाही, असे मानणाऱ्या लोकांचे मुख्यतः तीन आक्षेप ऐकू येतात. पहिला आक्षेप असा की, कम्युनिझमचा फैलाव जेथे भांडवलशाहीची अतोनात वाढ झालेली आहे अशाच देशात होणे शक्य असते, पण हिंदुस्थानात अद्यापि भांडवलशाहीची वाढच फार झाली नसल्यामुळे या तत्त्वज्ञानाचे बीजारोपण सध्याच्या परिस्थितीत येथे होणे शक्य नाही व आवश्यकही नाही. आमच्यापुढे आज मुख्य प्रश्न राष्ट्रीय संपत्तीची वाढ कशी होईल हा आहे. राष्ट्रीय संपत्तीची विभागणी कशी व्हावी, हा त्यानंतरचा प्रश्न आहे. आमचे उद्योग-धंदे अद्यापि बाल्यावस्थेत आहेत. याच वेळी राष्ट्रीय संपत्तीच्या समान किंवा न्याय्य विभागणीचा प्रश्न पुढे करून कामगार भांडवलवाले यांच्यात वर्गयुद्ध सुरू झाल्यास आमची औद्योगिक उन्नती अगदीच खुंटून जाईल, किंबहुना आमचे राष्ट्रीय उद्योगधंदे बाल्यावस्थेतच मरून जातील. सध्या आपल्या देशात कम्युनिझमचा पाय शिरकू नये असे म्हणणाऱ्यांचा दुसरा आक्षेप व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीने आहे. यांच्या मताप्रमाणे हिंदुस्थानापुढे सध्या मुख्य महत्त्वाचा प्रश्न राजकीय स्वातंत्र्याचा आहे. यांच्या मताप्रमाणे एकदा हिंदी राष्ट्र राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाले म्हणजे मग त्याची सामाजिक किंवा आर्थिक संघटना कशी असावी हे प्रश्न सहज सुटणार आहेत. तोपर्यंत कम्युनिझमसारख्या वादग्रस्त प्रश्नांची चर्चा सुरू केल्याने राष्ट्रीय पक्षात फाटाफूट होऊन स्वातंत्र्याचा लढा लांबणीवर पडत जातो, किंबहुना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यास लागणारे ऐक्य नष्ट झाल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीही अशक्य होऊन बसणार आहे. येणेप्रमाणे पहिला आक्षेप अर्थशास्त्रज्ञांचा तर दुसरा राज-नीतीतज्ञांचा आहे. या दोहोंहून निराळा असा तिसराही आक्षेप तात्त्विक स्वरूपाचा आहे. ह्या आक्षेपकांचे म्हणणे असे आहे की, कम्युनिझमचे सर्व तत्त्वज्ञान भारतीय संस्कृतीला विरोधक असल्याने त्याचा पाय आपल्या देशात शिरणे अशक्य व अनिष्ट आहे. अर्थात आर्थिक, राजकीय व तात्त्विक अशा त्रिविध आक्षेपांचे थोडक्यात समाधान करण्यासाठी हा लेख मुद्दाम लिहावयास घेतला आहे.

ज्या देशात औद्योगिक उन्नती अत्यंत होऊन भांडवलशाहीची अतोनात वाढ झाली आहे, त्याच देशात समाजसत्तावाद किंवा विश्वकुटुंबवाद असली तत्त्वे प्रसार पावून यशस्वी

होतील आशी कार्ल मार्क्स प्रभृती आद्य समाजसत्तावाद्यांची अपेक्षा होती, परंतु ही अपेक्षा इतिहासाच्या ओघाकडे पाहिली असता खोटी ठरलेली दिसते. पहिली समाजसत्ताक क्रांती इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स किंवा जर्मनी अशा औद्योगिक प्रगतीत पुढारलेल्या राष्ट्रांत झालेली नसून ती रशियासारख्या औद्योगिक उन्नतीत मागासलेल्या देशात झाली असे प्रत्यक्ष दिसत असता वरील प्रकारचा आक्षेप आज कोणी घेऊ शकत नाही. यापुढेही अशा प्रकारची समाजसत्ताक क्रांती औद्योगिक प्रगतीत फार पुढे गेलेल्या अमेरिका किंवा इंग्लंड या देशांत होण्याचा संभव नसून परराष्ट्रीय कर्जाच्या व देण्याच्या भाराखाली चेपून गेलेल्या जर्मनीत किंवा परकीय साम्राज्यशाहीखाली चुरडून जात असलेल्या हिंदुस्थानातच होईल अशी बोल्शेविकांची ऊर्फ रशियन कम्युनिस्टांची अपेक्षा आहे.......

... सध्याच्या राजकीय दास्याच्या काळात होणारी औद्योगिक प्रगती ही खरोखर राष्ट्रीय आहे किंवा नाही अथवा ती तशीच राहील किंवा नाही हा प्रश्नच आहे. या दृष्टीने सध्या मोठ्या भांडवलावर चालणारे कारखाने न निघता छोट्या भांडवलावर चालणारे पण मोठ्या लोकसंख्येस रोजगार देणारे खेड्यापाड्यातील धंदेच राष्ट्रीय दृष्ट्या अधिक हितप्रद आहेत. राष्ट्रहिताच्या दृष्टीने संशयास्पद महत्त्वाच्या प्रचंड कारखानदारीच्या मोहाने देशातील बेकार व दरिद्री लोकांच्या चळवळी बंद पडतील अशी आशा करणे व्यर्थ आहे. आपल्या राष्ट्राची खरी व हितावह औद्योगिक उन्नती आम्ही राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्याखेरीज होऊ शकत नाही हे आता सर्वांस कळून चुकले आहे व म्हणून पारतंत्र्यातील औद्योगिक प्रगतीच्या मृगजळाच्या मोहाने बहुजनसमाजाच्या चळवळी लांबणीवर टाकण्यास कोणीही तयार होणे शक्य नाही. अर्थशास्त्रज्ञांच्या आक्षेपांचे असे निरसन केल्यानंतर व्यवहारदक्ष मुत्सद्यांकडून राष्ट्रीय दृष्टीने येणाऱ्या आक्षेपाकडे वळले पाहिजे.......

[येथून पुढील चर्चा मुख्यत: त्यावेळच्या राष्ट्रीय चळवळीची स्थिती आणि राष्ट्रसभेतील विविध प्रवाह यांवर केंद्रित झालेली आहे. "हप्त्याहप्त्याने स्वराज्य" ही कल्पना अमान्य करून संपूर्ण स्वराज्याचा आचार्य पुरस्कार करतात व ही मागणी क्रांतिकारक असल्याचा दावा करतात. "..देशातील जमीनदार व कारखानदार वर्ग अराष्ट्रीय बनून सरकारच्या आश्रयाखाली जाणार.....इंग्लंडातील भांडवलवाले व येथील भांडवलवाले आजच एक होऊ लागले आहेत...." अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ शेतकरी कामकऱ्यांच्या चळवळींशी जोडण्यात गैर काही नाही असा आचार्य जावडेकरांचा अभिप्राय आहे.]

आज राष्ट्रीय सभेत संपूर्ण स्वातंत्र्यवादी जो पक्ष निर्माण झाला आहे, तो केवळ भावनेच्या आधारावरच उभारलेला आहे असे म्हणता येणार नाही. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मिळालेल्या सुधारणांचा प्रत्यक्ष अनुभव आणि भांडवलप्रधान संस्कृतीच्या पुरस्कर्त्या ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्यांत हिंदी जनतेचे खरे हित साध्य होणे शक्य नाही अशी खात्री यांच्या आधारावर आज हिंदी राष्ट्र ब्रिटिश साम्राज्याचे पक्के द्वेष्टे बनले आहे. साम्राज्यांतर्गत

स्वराज्यात हिंदी धनिकवर्गाचे, हिंदी भांडवलवाल्यांचे हित होणे शक्य आहे पण शेकडा ९८ लोकांचे म्हणजे हिंदी शेतकऱ्यांचे व कामकऱ्यांचे खरे हित भांडवलप्रधान संस्कृती व तिचे प्रतिनिधिभूत जे ब्रिटिश साम्राज्य यांच्या छत्राखाली होऊ शकत नाही, याची जाणीव राष्ट्रीय सभेतील नव्या पक्षाला झाली आहे. तसेच हा भांडवलप्रधान संस्कृती आणि साम्राज्यवाद हे केवळ हिंदजनतेचेच नव्हेत, तर अखिल जगतातील सामान्य जनतेचे शत्रू झालेले आहेत. यामुळे हिंदी स्वातंत्र्य हा केवळ हिंद राष्ट्रापुरताच प्रश्न उरलेला नसून तो जागतिक राजकारणातील एक महत्त्वाचा प्रश्न बनलेला आहे. याच दृष्टीने हिंदी राष्ट्रीय सभेचा संबंध आज साम्राज्यविनाशक संघाशी (Anti-Imperial League) नव्या पक्षाने जोडून दिला आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या भरभराटीसाठी व वैभवासाठी हिंदी जनता यापुढे आपले रक्त सांडण्यास तयार होणार नाही, असा स्पष्ट ठराव राष्ट्रीय सभेने केला असून शेतकरी, कामकरी व सैनिक यांची संघटना करून तिच्या मार्फत स्वातंत्र्य प्रस्थापित करणे व या कामी इतर देशातील शेतकरी व कामकरी लोकांची सहानुभूती संपादन करणे असे आजचे राष्ट्रीय सभेचे राजकारण आहे आणि हिंदी राष्ट्रातील कारखानदार व जमीनदार वर्गाला हाताशी धरून, औद्योगिक उन्नतीचे आमिष दाखवून, बड्या अधिकारांच्या जागांचा मोह उत्पन्न करून आणि धनिक सत्ता स्थापन करून हिंदी राष्ट्र कायमचे आपल्या ताब्यात ठेवणे हे ब्रिटिश साम्राज्यवादी मुत्सद्यांचे ध्येय आहे. अर्थात हिंदी स्वातंत्र्य हिंदी शेतकरी व कामकरी वर्गच संपादन करणार व त्या कामी हिंदी धनिकवर्ग त्यास आडवा येणार. पण शेतकरी व कामकरी वर्गाने भांडवलवाल्या धनिकवर्गाचा विरोध सोसून जे स्वराज्य किंवा स्वातंत्र्य प्रस्थापित होणार ते कामकरी व शेतकरी यांचेच राज्य होणार हे स्पष्ट आहे.

## भारतीय संस्कृती आणि विश्वकुटुंबवाद

आता आधुनिक विश्वकुटुंबवादाचे तत्त्वज्ञान भारतीय संस्कृतीशी विरोधी आहे व म्हणून त्याचा प्रसार आपल्या देशात होऊ नये असे म्हणणाऱ्यांच्या आक्षेपांचे थोडे विवेचन करू. हे विवेचन करताना भारतीय संस्कृती म्हणजे काय व तिचे वैशिष्ट्य कोणते हे पाहिले पाहिजे व त्याप्रमाणे विश्वकुटुंबवादाची मूलभूत तत्त्वे कोणती याचाही विचार केला पाहिजे. भारतीय संस्कृती म्हणजे बालविवाह, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, एकतंत्री राज्यव्यवस्था आणि आर्थिक विषमता अशीच ज्यांची कल्पना असेल त्यांच्याशी ह्या विषयाची चर्चा करणे जवळजवळ अशक्यच आहे. विशिष्ट काळी विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट देशात उत्पन्न होणारे सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक विचार-आचार, रूढी व कायदे ही कोणत्याही राष्ट्राची संस्कृती होऊ शकत नाही. तर त्या संस्कृतीने परिधान केलेली ती केवळ वस्त्रे अथवा मानव वंशाच्या अत्युत्कृष्ट स्वरूपासंबंधी आपली ध्येये अमलात आणण्यासाठी उपयोगात आणलेली ती साधने होत. या दृष्टीने विचार करणाऱ्यांचे असे

मत आहे की, भारतीय संस्कृतीचे ध्येय अध्यात्मवाद हे असून युरोपीय संस्कृतीचे ध्येय जडवाद हे आहे. परंतु हे मतही बऱ्याच मर्यादित स्वरूपात आज मान्य होण्यासारखे आहे. कारण भारतीय संस्कृतीचे ध्येय अध्यात्मवाद हे आहे याचा अर्थ अधिक स्पष्ट केला पाहिजे. अध्यात्मवाद म्हणजे निवृत्तीवाद किंवा संन्यास मार्ग नव्हे. सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहारापासून व्यक्तीला पराङ्मुख करून केवळ वैयक्तिक मोक्ष हेच ध्येय मानणे हे भारतीय संस्कृतीचे ध्येय निदान यापुढे तरी होऊ शकत नाही. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हा चतुर्विध पुरुषार्थ साध्य करून देणारा, निःश्रेयसाबरोबरच अभ्युदयाचाही लाभ घडविणारा, संसारास भिऊन पळू न जाता त्यास आत्मवश बनविणारा, सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहारांचा त्याग करणारा नव्हे, तर या सर्व व्यवहारांची आध्यात्मिक पायावर उभारणी करून त्यांचा उपयोग सार्वत्रिक उन्नतीस करून आधिभौतिक उन्नतीस शत्रू न लेखता तिला आध्यात्मिक उन्नतीचे साधन बनविणारा, कलाकौशल्य व सौंदर्य यांचा तिटकारा न करता त्यांच्या साहाय्याने, आत्मानंदाचा आस्वाद घेणारा असा अध्यात्मवाद हे भारतीय संस्कृतीचे ध्येय आहे व ते सर्व जगताचेही ध्येय बनले पाहिजे. त्यापुढे प्रत्येक धर्माची, प्रत्येक जातीची, प्रत्येक मानववंशाची किंवा प्रत्येक राष्ट्राची संस्कृती भिन्न राहणार नसून सर्व मानवजातीची संस्कृती एकच होणार आहे. अर्थात ह्या अखिल मानवी संस्कृतीला उपरिनिर्दिष्ट अध्यात्मवादाचीच कास धरावी लागणार असून खऱ्या विश्वकुटुंबवादाचे ध्येय हेच असले पाहिजे.

या दृष्टीने समाजसत्तावाद आणि व्यक्तिस्वातंत्र्यवाद यांचा आपण विचार करू. हे वाद मुख्यतः समाजाच्या आर्थिक संघटनेसंबंधी उत्पन्न झालेले आहेत. मानवी जीविताला आवश्यक असणारी संपत्त्युत्पादनाची साधने खाजगी व्यक्तीच्या मालकीची असावीत असे व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे म्हणणे, तर त्यावर समाजाची मालकी असावी असे समाजसत्तावादाचे मत आहे. व्यक्तिस्वातंत्र्यवादामुळे समाजात स्पर्धा वाढते, तर समाजसत्तावादाने सहकार्य वाढते. व्यक्तिस्वातंत्र्यवादाची मदार वैयक्तिक स्वार्थबुद्धीवर, तर समाजसत्तावादाची मदार समाजसेवाबुद्धीवर. सामाजिक वर्गावर्गातील व राष्ट्राराष्ट्रातील द्वैत नष्ट करून अखिल मानवजातीत अद्वैत प्रस्थापित करणे हे समाजसत्तावादाचे ध्येय. व्यक्तिस्वातंत्र्यवादाने यांत्रिक शक्ती बहुजन समाजाला दास्यात लोटून धनिक वर्गाची दासी बनते, तर समाजसत्तावादामुळे यांत्रिक शक्ती सर्व जनतेची सेवा करू लागते. व्यक्तिस्वातंत्र्यवादामुळे औद्योगिक साधनांचा उपयोग श्रीमंतांच्या चवचाल चैनी तृप्त करण्याकडे होतो, तर समाजसत्तावादामुळे त्यांचा उपयोग बहुजनसमाजाच्या आवश्यक गरजा भागविण्याकडे होतो. व्यक्तिस्वातंत्र्यामुळे अनर्थमूलक वैयक्तिक संपत्तीची वाढ होते, तर समाजसत्तावादामुळे सर्वांना उपभोग घेता येण्याजोगी सर्वोपकारक अशी सार्वजनिक संपत्ती वाढत जाते. हे मुद्दे ध्यानात घेतल्यास उपरिनिर्दिष्ट अध्यात्मवादाशी खरा विरोध समाजसत्तावादाचा नसून

व्यक्तिस्वातंत्र्यवादाचाच आहे असे प्रत्येकास दिसून येणार आहे. समाजसत्तावादावर पारमार्थिक दृष्टीने कोणास काहीही आक्षेप घेता येईल असे निदान आम्हास तरी वाटत नाही.

## वर्णाश्रमधर्म आणि विश्वकुटुंबवाद

आज वर्णाश्रमधर्मरूपी भारतीय संस्कृती जिवंत आहे असे तिचे परंपरानिष्ठ भक्तही म्हणणार नाही. पण, वर्णाश्रमधर्माच्या आधारभूत कल्पना खरोखर इतक्या उज्ज्वल आहेत की, त्यांचा स्वीकार भावी मानवी संस्कृतीला करावा लागेल असे आमचे मत आहे. या ठिकाणी आम्ही ज्या प्रकारचा वर्णधर्म मानतो तो आनुवंशिक नव्हे हे स्पष्टपणे सांगणे भाग आहे. तसेच या वर्णाश्रमधर्मात शूद्रवर्गाचीही आवश्यकता आम्हाला भासत नाही. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे तीन वर्ण नैसर्गिक आहेत व त्याचप्रमाणे ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रमही नैसर्गिक असून मानवी संस्कृतीला उन्नतीस नेणारे आहेत. अध्ययन, अध्यापन करून समाजाच्या बौद्धिक व आध्यात्मिक संपत्तीत भर घालणारा ब्राह्मणवर्ग आणि समाजाच्या आधिभौतिक संपत्तीची निरपेक्ष भावनेने वाढ करणारा वैश्यवर्ग, हे प्रत्येक समाजाला अवश्य आहेत. तसेच या दोघांचे धर्मबुद्धीने संरक्षण करणारा क्षत्रियवर्गही समाजाला पाहिजेच आहे. मात्र शूद्रवर्गाची आज समाजाला गरजच उरलेली नाही. आजपर्यंत सर्व राष्ट्रांनी आपल्या संस्कृतीचा पाया शूद्रवर्गावर घातलेला होता. परंतु यंत्रशक्तीने या गोष्टींची आता आवश्यकता उरलेली नाही. यापुढील जगात केवळ त्रैवर्णिकच राहतील. शूद्रवर्ग निर्माण करून आजपर्यंत मनुष्य-समाजातील एका मोठ्या वर्गावर सर्व राष्ट्रांनी मोठा अन्याय केलेला आहे. किंबहुना आजपर्यंतच्या सर्व संतमहात्म्यांनी स्त्रिया व शूद्र यांना त्रैवर्णिकांचे हक्क संपादन करून देण्यासाठीच प्रयत्न केलेले आहेत. श्रीकृष्णांनी भगवद्गीता लिहून स्त्री-शूद्रांना सद्गतीचा मार्ग मोकळा केला, गौतमबुद्धाने स्त्री-शूद्रांचा कैवार घेऊन आध्यात्मिक समता प्रस्थापित केली, ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहून हेच कार्य पुढे चालविले आणि वेदान्तज्ञान कुलुपात ठेवणाऱ्यांना लाजविले. हीच परंपरा आजच्या समाजसुधारकांनी चालविली आहे. शूद्रत्व हे वर्णाश्रमधर्माचे आवश्यक अंग नव्हे. सत्त्व, रज, तम अशा त्रिगुणात्मक प्रकृतीतून तीनच वर्ण निर्माण होतात. चौथा वर्ण हा नैसर्गिक नव्हे. आजपर्यंत सर्व शरीरकष्टाची कामे एकाच वर्गावर लादण्यात आम्ही मोठे पाप केले आहे. या अन्यायाने आम्ही मनुष्यांना निर्जीव व निर्बुद्ध अशा यंत्राची पदवी दिलेली होती. आज भांडवलवाला वर्ग हेच करीत आहे. यंत्रे आणि मजूर यात त्याला अंतर दिसत नाही. परंतु हा प्रकार यापुढे चालणार नाही. मनुष्यप्राणी हा कोणाचाही गुलाम होऊन राहणार नाही. प्रत्येक मनुष्य स्वतंत्र व समान दर्जाचा आहे, अशीच वेदान्ताची शिकवण आहे. वेदान्ताचे ध्येय विश्वकुटुंबाची प्रस्थापना हेच आहे. या विश्वकुटुंबात सर्वांच्या योग्य गरजा भागविण्याची जबाबदारी समाजावर राहून आपल्या शक्तीप्रमाणे विश्वकुटुंबाची सेवा करणे हे व्यक्तीचे कर्तव्य राहील.

"स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः" ही परमेश्वरी वृत्ती समाजाने स्वीकारावी व "स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः" अशी वृत्ती व्यक्तीत बाणावी, हे वर्णाश्रम-धर्माचे खरे ध्येय आहे. हे ध्येय साध्य होण्यास भांडवलप्रधान संस्कृती नष्ट होऊन श्रम-प्रधान व गुणप्रधान संस्कृतीचा उदय झाला पाहिजे. बोल्शेविकांनी या भावी गुणप्रधान संस्कृतीची ध्वजा आपल्या देशात उभारली आहे व भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या आसुरी सत्तेखाली चुरडून गेलेल्या सर्व जगतातील बहुजनसमाजाला आपल्या झेंड्याखाली एक होण्यास ते आवाहन करीत आहेत. आज ते आपणास जडवादी व धर्मद्वेष्टे म्हणवीत असले, तरी ते मोठे धर्मकार्य करीत असून मानवी संस्कृतीला पारमार्थिक स्वरूप देण्याचेच कार्य त्यांच्या हातून होत आहे असे आम्हाला वाटते. स्वार्थ वृत्ता, स्पर्धा, वर्गद्वेष, सत्ताभिलाष या दुष्ट भावनांवर समाजसंघटना न करता समाजसेवा, सहकार्य, समता आणि स्वार्थत्याग या भावनांवर समाजसंघटना झाली पाहिजे हेच त्यांचे मत आहे. श्रम हेच सर्व संपत्तीचे आदिकारण असल्यामुळे श्रमाला मान द्या, पैशाला मान देऊ नका असे त्यांचे सांगणे आहे.

म. गांधी हे स्वतः समाजसत्तावादी नाहीत. तथापि खाजगी मालमत्तेसंबंधीचे त्यांचे विचार 'सोशॅलिझम्' किंवा 'कम्युनिझम' सारखेच आहेत. आपल्या आवश्यक गरजा भागवण्यास लागणाऱ्या संपत्तीहून अधिक संपत्तीचा संचय आपणापाशी करणे हे चौर्य आहे, असे त्यांचे मत आहे. सत्याग्रहाश्रमातील (उद्योगमंदिरांतील) लोकांना अस्तेयाची शपथ घ्यावी लागते...

म. गांधींचे सदरहू विचार सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास खाजगी मालमत्तेसंबंधीचे त्यांचे विचार विश्वकुटुंबवादाच्या तत्त्वज्ञानास धरूनच आहेत. आपल्या नित्याच्या गरजा भागविण्यास लागणाऱ्या संपत्तीहून अधिक संपत्ती स्वतःजवळ ठेवणे ही चोरी आहे असे म्हटले काय आणि समाजातील सर्व संपत्ती समाईक समजून ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या गरजांइतकीच संपत्ती समाजाने घेऊ द्यावी असे म्हटले काय, एकच आहे. हे एकदा मान्य झाले म्हणजे अशी चोरी करणाराकडून ही संपत्ती जबरदस्तीने काढून घ्यावी किंवा नाही हा फक्त हिंसा व अहिंसा ह्या तत्त्वांतील भेद शिल्लक उरतो...

स्वामी रामतीर्थ तर वेदान्ताच्या नावाने व आधाराने विश्वकुटुंबवादाचा उघडउघड उपदेश करीत असत.......

स्वामीजींचे ओजस्वी शब्द वाचल्यावर वेदान्त आणि विश्वकुटुंबवाद यांची ध्येये भिन्न नाहीत, हे आम्ही पुन्हा सांगण्याची गरजच नाही. आज रशियात त्यांचे स्वरूप बाह्यतः केवळ जडवादी किंवा अधार्मिक दिसत असले, तरी हिंदुस्थान त्याचा स्वीकार करताना त्यास आध्यात्मिक व धार्मिक स्वरूप देईल अशी आम्हास आशा आहे. किंबहुना

विश्वकुटुंबास आधारभूत असलेल्या विश्वधर्माचा संदेश हिंदुस्थानातून जगास दिला जाईल असा आम्हास भरवसा वाटतो.

[*लोकशिक्षण*, सप्टेंबर १९२९, पृ. ६२३ ते ६३८]

## कम्युनिझम व अध्यात्मवाद

"रशियन राज्यक्रांती व कम्युनिझम" या विषयावर मी 'लोकशिक्षणात' जी लेखमाला लिहिली, तिच्यातील एका मुद्यावर श्री. सरदेसाई यांनी प्रस्तुत मासिकाच्या नोव्हेंबरच्या अंकात एक टीकात्मक लेख लिहून मला उपकृत केले आहे. आपल्या लेखाच्या प्रारंभी त्यांनी माझ्या एकंदर लेखमालेसंबंधी जे प्रशंसोद्गार काढले आहेत, त्याबद्दल त्यांचे आभार मानून मी त्यांच्या टीकेतील मुद्यास यथाशक्ती उत्तर देण्याचा प्रयत्न या लेखात करणार आहे. माझ्या लेखमालेवर त्यांचा मुख्य आक्षेप असा आहे की, मी आधुनिक कम्युनिझमचे मुख्य मर्म प्रकट केले नाही. त्यांच्या मते जडवादाचा स्वीकार केल्याखेरीज कम्युनिझमचे मर्म प्रकट करता येणार नाही. साधुसंतांनी मनुष्य समाजापुढे मांडलेले विश्वकुटुंबाचे ध्येय व आधुनिक कम्युनिझम यांच्यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. "पहिला अध्यात्मवादी तर दुसरा जडवादी, पहिला श्रद्धामूलक तर दुसरा शास्त्रीय, पहिला काल्पनिक तर दुसरा विकासवादी, आणि पहिला अव्यावहारिक तर दुसरा व्यावहारिक" असा या दोहोंत भेद असता तो मी प्रकट न करता कम्युनिझमला हिंदुस्थान आध्यात्मिक स्वरूप देईल अशी आशा प्रकट केली ही माझी मोठी चूक होय असे श्री. सरदेसाई यांचे मत आहे. अर्थात त्यांनी आपल्या लेखात अध्यात्मवाद खोडून काढण्याचा प्रयत्न करून जडवादाची सविस्तर मांडणी केलेली आहे.

माझ्या मते श्री. सरदेसाई हे आपल्या लेखात अध्यात्मवाद व मायावाद हे दोन्ही शब्द समानार्थक घेऊन चाललेले आहेत. कारण "आपणास जगतात दृग्गोचर होणारी भिन्नता ही आभासमय किंवा मिथ्या आहे" हे एक त्यांनी अध्यात्मवादाचे (त्यांच्या शब्दात "भाववादा" चे) लक्षण सांगितले आहे. पण सर्वच अध्यात्मवादी, मायावादी किंवा "जगन्मिथ्यावादी" आहेत असे नाही. किंबहुना मायावादाला "असच्छास्त्र" किंवा "प्रच्छन्न बौद्धमत" असे मानणारे अनेक अध्यात्मवादी तत्त्वज्ञ आहेत. जगतातील सर्वच द्वैत केवळ आभासमय किंवा माया मानणारे लोक कम्युनिझमच काय पण कोणतीही समाजसंघटना करू शकणार नाहीत, असे मला वाटते. मायावाद्यांनाही जगतातील द्वैताला व्यावहारिक सत्ता देऊन मगच समाजसंघटनेचा विचार करावा लागतो. माझ्या लेखमालेत मी जो अध्यात्मवाद मांडला आहे, तो संन्यासमार्गाहून किंवा निवृत्तीमार्गाहून भिन्न आहे असे मी स्पष्टपणे लिहिलेले आहे. जगतात जडत्व आणि चैतन्य ही दोनही प्रतीत होतात. जडवादी म्हणतो की, चैतन्य हे जडद्रव्याचे रूप आहे, तर अध्यात्मवादी म्हणतो की,

जडद्रव्य हे चैतन्याचे एक स्वरूप आहे. मायावादी जडद्रव्याचे अस्तित्वच मान्य करीत नाही. जडवादी चैतन्य हा जडद्रव्याच्या विशिष्ट स्थितीत उत्पन्न होणारा क्षणिक देखावा आहे असे मानतो. "आपले विचार व त्याचप्रमाणे आपल्या भावना ह्या आपल्या शरीरातील सूक्ष्म रासायनिक क्रिया आहेत असे हल्ली बरट्रँड रसेलसारख्या शास्त्रज्ञास वाटू लागले आहे" असे श्री. सरदेसाई लिहितात. आपले विचार व भावना या सूक्ष्म रासायनिक क्रिया आहेत, या म्हणण्याचा काही अर्थच होत नाही. रासायनिक क्रिया आणि विचार व भावना यांचे स्वरूप अगदी भिन्न आहे. आपले विचार व भावना या रासायनिक क्रियांवर अवलंबून असतात किंवा त्यांनी नियंत्रित असतात, असे फार तर म्हणता येईल. हा नियम सर्वत्र मान्य केल्यास चैतन्याचे किंवा आत्म्याचे स्वातंत्र्यच नष्ट होते. श्री. सरदेसाई यांनाही ही गोष्ट मान्य आहे. अध्यात्मवादी व जडवादी कम्युनिस्ट यांच्या-संबंधी लिहिताना ते म्हणतात : "कम्युनिझमचा प्रचार करण्यात आपण आपखुषीने (free-will) जगद्धेतूच्या सिद्धीस मदत करीत आहो असे एक समजतो, तर दुसरा स्वतःस निसर्गनियंत्रित (determined) असे विकासाचे केवळ एक साधन समजतो" हा सिद्धांत मान्य करणे म्हणजे प्रारब्धवाद किंवा दैववाद स्वीकारण्यासारखेच आहे. अर्थात मनुष्यास आपण आपल्या प्रयत्नांनी विशिष्ट समाजस्थिती स्थापन करू असे जे वाटत असते तो भ्रमच झाला. मानवी अंतःकरणात उत्पन्न होणारी ध्येयसृष्टी ही एक मोठी माया आहे असे जडवाद्यांस म्हणावे लागते. अध्यात्मवाद्यांचा मायावाद मनुष्याला संन्यस्त बनवीत असला तर हा जडवाद्यांचा "शास्त्रीय (!) मायावाद" मनुष्याला दैववादी बनवितो असे म्हणावे लागेल. लोकमान्यांनी दाखवून दिल्याप्रमाणे—विश्व सर्व हा तुरुंग मोठा प्राणिमात्र हे बंदी। पदार्थधर्मांचिया शृंखला त्यांते कोणी न भेदी॥ हाच जडवादाचा अखेरचा सिद्धांत आहे. ज्याचे त्याचे विचार व भावना ह्या जर ज्याच्या त्याच्या शरीरातील रासायनिक क्रिया आहेत, तर मग खरे विचार व खोटे विचार किंवा सद्भावना व असद्भावना यातील फरक कोठे राहतो! सृष्टीचे आदिकारण जडद्रव्य आहे हा श्री. सरदेसाई यांच्या डोक्यातील विचार जर त्यांच्या शरीरातील रासायनिक क्रियेचा परिणाम असेल आणि "जगत्कारण चैतन्यरूप आहे" हा माझ्या डोक्यातील विचार जर माझ्या शरीरातील सूक्ष्म रासायनिक क्रियेचा परिणाम असेल, तर त्यांचा खरेखोटेपणा कसा ठरविणार? निळ्या चंद्रज्योतीचा प्रकाश निळा पडतो व तांबड्या चंद्रज्योतीचा प्रकाश तांबडा पडतो, यातीलच हा प्रकार नाही काय! अंतःसृष्टी व बहिःसृष्टी यांचे निरीक्षण करणारा आत्मा मनुष्याचे विचार बुद्धीच्या साहाय्याने सुसंगत व संयुक्तिक बनवितो, हा सिद्धांत मान्य केल्याखेरीज अमुक तत्त्वज्ञान खरे व अमुक तत्त्वज्ञान खोटे असे म्हणताच येणार नाही. तात्पर्य, जड सृष्टीचे पूर्ण नियंत्रण मानसिक सृष्टीवर चालते असे म्हणणाऱ्या जडवाद्याला कोणत्याही मनुष्यावर त्याच्या विचारांची अगर कर्मांची जबाबदारी टाकता येणार नाही, आणि म्हणून खरे व खोटे, सत् व असत् यांतील भेद त्यास मानता येणार

नाही. सयुक्तिक विचार व अयुक्तिक विचार असा भेद केल्याखेरीज तर्कशास्त्र-न्यायशास्त्र, आणि सद्वर्तन व असद्वर्तन असा भेद केल्याखेरीज नीतिशास्त्र यांची उत्पत्तीच होऊ शकत नाही. मनुष्याला विचारस्वातंत्र्य व कर्मस्वातंत्र्य न देणारे जडवादी तत्त्वज्ञान तर्कशास्त्रांच्या कसोटीवर टिकूच शकत नाही, किंबहुना ही कसोटीच त्याच्या दृष्टीने आभासात्मक ठरते.........

[मनुष्याचे विचारस्वातंत्र्य रसेल यांनाही मान्य होते असे प्रतिपादन करून येथून पुढील लेखात आचार्यांनी मार्क्स, एंगल्स व लेनिन यांचे उतारे देऊन "त्यांनी मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य मान्य केलेले आहे किंवा त्यांना मान्य करावे लागले आहे" असा युक्तिवाद केला आहे. "सामुदायिक प्रयत्नाने धनोत्पादनाच्या क्षेत्रात माणसाचे सृष्टीचे दास्य अंशतः कमी होते. त्यापुढेच मनुष्याला पूर्ण स्वातंत्र्याच्या क्षेत्रात (realm of freedom) प्रवेश करता येतो" या मार्क्संच्या प्रतिपादनात "पूर्ण स्वातंत्र्य" हे आध्यात्मिक व मानसिक शक्तींच्या विकासाला अनुकूल असते असे जावडेकर गृहीत धरतात. त्याला "The realm of freedom ... lies, therefore, in the nature of things beyond the sphere of material production." या विधानाचा आधार आहे. मार्क्सची त्याविषयीची चर्चा 'Capital' च्या तिसऱ्या खंडात आहे (प्रोग्रेस, मॉस्को, १९५९, १९८४ चे पुनर्मुद्रण, पृ. ८२०). त्याचप्रमाणे लेनिनच्या Materialism and Empirio criticism या ग्रंथातील एंगल्सकृत स्वातंत्र्याची चर्चा (Freedom, Therefore, consists in a mastery over ourselves ... ..) उद्धृत करून मार्क्सवादी विचाराला आत्मस्वातंत्र्याचे वावडे नाही असे मत आचार्यांनी मांडले आहे. एंगल्सने केलेल्या चर्चेसाठी पहा : 'Collected Works,' खंड २५, पृ. १०५-०६, प्रोग्रेस, मॉस्को, १९८७.]

## अध्यात्मवाद आणि मायावाद

येथपर्यंत मानवी अंतःकरणात उद्‌भूत होणाऱ्या विचारसृष्टीस व ध्येयसृष्टीस जडद्रव्यातील विशिष्ट रासायनिक क्रियेचे प्रतिबिंब मानणाऱ्या जड मायावाद्यांचे खंडण केले. आता बाह्येंद्रियांना प्रतीत होणाऱ्या दृश्य विश्वास केवळ माया कल्पिणाऱ्या अध्यात्मवादी मायावादाविषयी दोन शब्द लिहावयास पाहिजेत. जगातील द्वैताचा अत्यंत अभाव कल्पिणे अशक्य आहे. मायेचे स्वरूप वर्णन करताना ती भावरूपही नाही, व अभावरूपही नाही, यास्तव तिचे स्वरूप अनिर्वचनीय आहे असे म्हणून मायावादाच्या अध्वर्यूंसही तिच्यापुढे हात टेकावे लागले आहेत. कित्येकांनी ईशकृत द्वैत आणि जीवकृत द्वैत असा भेद कल्पून ईशसृष्टी व जीवसृष्टी अशा दोन सृष्टी मानून जीवसृष्टीचाच तेवढलय जीवनमुक्तावस्थेत होऊ शकतो व ईशसृष्टी तशीच राहते, अशी मान्यता देऊन ईशासृष्टीचे सत्यत्व पर्यायाने कबूल केले आहे. ज्ञानी मनुष्यासही आपल्या कचाटीत धरणारी प्रकृती किंवा दृश्य विश्व केवळ, अभावरूप किंवा अगदीच मिथ्या कसे ठरणार? खरे पाहू गेल्यास दृश्य विश्व म्हणजे ह्या अव्यक्त परमात्म्याचेच सगुण स्वरूप नव्हे काय? त्याचे अस्तित्व नाकबूल करणे, त्याचे नियम उल्लंघन करण्याची इच्छा धरणे, किंवा त्याची अवहेलना करणे हा एक मोठा भ्रमच आहे. जीवात्मा हा परमात्म्याचाच अंश असल्यामुळे परमात्म्याचा सृष्टीवरील स्वामित्वाचा हक्क जीवात्म्यासही मिळू शकतो. परंतु सर्व सृष्टीचे

नियम उल्लंघन करण्याची अराजक स्वतंत्रता त्यास कधीही उपभोगता येणार नाही. येथेच सृष्टी नियमांच्या ज्ञानाची आवश्यकता उत्पन्न होते, धनोत्पादनाच्या कार्यात अंतर्भूत होणारे निसर्गनियंत्रण मान्य करावे लागते आणि हे निसर्गनियंत्रण शक्य तितके अल्पतम बनविण्यासाठीच धनोत्पादन आणि धनविभाजन ही कार्ये एकेकट्या व्यक्तीकडे न सोपविता त्यावर समाजातील सर्व व्यक्तींनी सहकार्य करून नियंत्रण लादावे लागते. समाजातील धनोत्पादन, धनविभाजन आणि धनसंचय ही कार्ये सामाजिक आत्म्याच्या नियंत्रणाखाली समाजहिताच्या दृष्टीने चालू ठेवणे हाच विश्वकुटुंबवाद किंवा कम्युनिझम् होय. यामुळे मनुष्यसमाजाची जशी आर्थिक उन्नती होणार आहे, त्याचप्रमाणे पारमार्थिक उन्नतीही होणार आहे. भौतिक विश्व व अर्थशास्त्र असल्या शास्त्रास अपराविद्येत गणून त्यांना अविद्येत काढणारा अध्यात्मवाद यापुढे जगात टिकणार नाही. तत्त्वज्ञान, आत्मसाक्षात्कार किंवा ब्राह्मी स्थिती असल्या प्रत्यक्षावगम्य शास्त्रांना अशास्त्रीय ठरविणारा जडवाद जितका समाजक्रांतीच्या दृष्टीने विघातक आहे, तितकाच भौतिक शास्त्रे व सामाजिक अभ्युदयास आवश्यक असणारी अर्थ किंवा नीतिशास्त्रे यांना गौणत्व देऊन त्यांची अवहेलना करणारा अध्यात्मवाद समाजहिताला विघातक आहे. म्हणूनच "हिंदुस्थान आणि कम्युनिझम" या माझ्या लेखात "सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहारांपासून व्यक्तीला पराङ्मुख करून केवळ वैयक्तिक मोक्ष हेच ध्येय मानणे हे भारतीय संस्कृतीचे ध्येय निदान यापुढे तरी होऊ शकत नाही. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हा चतुर्विध पुरुषार्थ साध्य करून देणारा, निःश्रेयसाबरोबरच अभ्युदयाचाही लाभ घडविणारा, संसाराला भिऊन ( किंवा त्याला खोटे मानून) पळून न जाता त्यास आत्मवश बनविणारा, सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहारांचा त्याग करणारा नव्हे, तर या सर्व व्यवहारांची आध्यात्मिक पायावर उभारणी करून त्यांचा उपयोग सार्वत्रिक उन्नतीस करून देणारा, धर्माधर्मांतील द्वैत न वाढविता सर्व धर्मांकडे अद्वैत भावनेने पाहणारा, अधिभौतिक उन्नतीस शत्रू न लेखता तिला आध्यात्मिक उन्नतीचे साधन बनविणारा, कलाकौशल्य व सौंदर्य यांचा तिरस्कार न करता त्यांच्या साहाय्याने आत्मानंदाचा आस्वाद घेणारा असा अध्यात्मवाद हे भारतीय संस्कृतीचे ध्येय आहे व ते सर्व जगताचेही ध्येय बनले पाहिजे." असे मी म्हटले होते, आणि इकडे श्री. सरदेसाई यांनी लक्ष पुरविले असते तर अध्यात्मवाद व मायावाद हे शब्द ते समानार्थक समजून चालले नसते.......

अखेरीस श्री. सरदेसाई यांच्या एकाच विधानास उत्तर देऊन हा बराच लांबलेला लेख आटोपता घेतो. ते लिहितात: "श्री. जावडेकर म्हणतात, 'आजपर्यंत सर्व शरीरकष्टाची कामे एकाच वर्गावर लादण्यात आम्ही मोठे पाप केले आहे.' श्री. जावडेकर यांची अपेक्षा अशी दिसते, की ज्या आम्ही हे पाप केले आहे ते आम्ही आता त्याचे क्षालन करून पृथ्वीवर रामराज्य स्थापन करू!" अशी अपेक्षा माझ्या लेखात मी कोठेच व्यक्त

केलेली नाही. शूद्रवर्ग आपली स्वतंत्रता आपणच मिळवील हे श्री. सरदेसाई यांचे मत मला मान्य आहे. कारण शूद्रवर्गाचे विशेषतः अतिशूद्र म्हणजे अस्पृश्यवर्गाचे पारतंत्र्य आपण होऊन नष्ट करण्याइतकी नैतिक भावना वरच्या वर्गात जागृत झाली आहे असे मला वाटत नाही. त्यातून कामगार व शेतकरी वर्गाची मुक्तता क्रांतीच्या मार्गानेच होऊ शकेल असे मी माझ्या लेखात स्पष्ट म्हटले आहे. असे असता माझ्यावर एक नसती अपेक्षा श्री. सरदेसाई यांनी का लादावी हे मला समजत नाही. कार्ल मार्क्सचे वर्गयुद्धाचे तत्त्व जगाच्या सध्याच्या नैतिक उन्नतीच्या दृष्टाने मला मान्य आहे. पण हे तत्त्व अध्यात्मवादाशी विसंगत आहे, असे मात्र मला वाटत नाही. जालियनवाला बागेत जनरल डायरने अमानुष कत्तल केली, हे त्याने व परंपरेने ब्रिटिश सरकारने मोठे पाप केले असे मी समजतो. पण एवढ्यावरून ब्रिटिश सरकार आपण होऊन या पापाचे क्षालन करील अशी अपेक्षा मी कधी केली नाही. माझे एवढेच म्हणणे की, कार्ल मार्क्सचे वर्गयुद्धाचे तत्त्व मान्य करूनही अध्यात्मवाद स्वीकारता येतो.....

[*लोकशिक्षण, डिसेंबर १९२९, पृ. ७८१-७९३*]

३

# समाजसत्ताक लोकशाही पक्षाची आवश्यकता

[ गांधींच्या चळवळीचा आंतरराष्ट्रीय संदर्भात विचार करून जगभरच समाजसत्ताक क्रांती टाळण्याचे प्रयत्न कसे चालू आहेत ते आचार्यांनी लेखाच्या पहिल्या भागात दाखविले आहे. त्यापुढील भागात समाजसत्ताक क्रांतीचे ध्येय कसे प्रत्यक्षात आणावे याचा विचार केला आहे. हा दुसरा भाग येथे घेतला आहे. समाजसत्ताक क्रांतीचे ध्येय आणि गांधींचा अहिंसक असहकाराचा मार्ग यांचा संयोग व्हावा असे सूचित केले आहे. अन्यत्र आचार्यांनी म्हटल्याप्रमाणे गांधीवाद आणि समाजवाद यांचा समन्वय व्हावा असे त्यांना १९३० पासूनच वाटत होते. त्यादृष्टीने १९३१ मधील ह्या लेखातील विचार महत्त्वाचे आहेत. ]

...समाजाचे सर्वांगीण स्वातंत्र्य आणि राजकीय व आर्थिक लोकसत्ता यांचा समाजसत्ताक लोकशाहीत अंतर्भाव होतो. राष्ट्रातील संस्थानिक, जमीनदार, कारखानदार व सावकार हे वर्ग अजिबात नष्ट करून संस्थाने, जमिनी, कारखाने व पेढ्या या सर्वांवर लोकांची सत्ता स्थापन करावयाची आणि हे सर्व व्यवहार समाजातील बहुजनसंख्येचे सुख व स्वातंत्र्य यांची वृद्धी होईल अशा प्रकारे चालू ठेवावयाचे हाच समाजसत्ताक लोकशाहीचा व्यावहारिक अर्थ आहे.

एवढी मोठी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती घडवून आणावयाची म्हणजे सामान्य जनतेतील अंधश्रद्धा व पुराणप्रियता नष्ट होणे अवश्य आहे. कुटुंब, जात, वर्ग, राष्ट्र, धंदा, धन, धर्म यासंबंधीचे आमचे सर्व व्यवहार केवळ परंपरागत रूढीप्रमाणे अंधश्रद्धेने चालू आहेत. आमच्या बुद्धीला लागलेले हे अंधश्रद्धेचे ग्रहण सुटून आमचा विवेकसूर्य पूर्ण प्रकाशाने तळपू लागल्याखेरीज सामान्य जनतेच्या हातून एवढी मोठी क्रांती होणार नाही. आमचे बहुतेक सामाजिक व आर्थिक व्यवहारच नव्हेत, तर राजकीय व्यवहारही एक प्रकारच्या धर्मभावनेवर उभारलेले आहेत. हा धर्म सनातन असून त्याने लावून दिलेली परंपरागत कर्तव्ये ईश्वरप्रणीत आहेत व त्यात फिरवाफिरव किंवा सुधारणा करण्याचा आम्हा मानवांना अधिकार नाही अशी कल्पना सामान्य जनतेच्या अंतःकरणात खोल रुजलेली आहे. ही कल्पना निर्मूल करून राजा व प्रजा, सावकार व कुळे, जमीनदार

व शेतकरी, कारखानदार व कामकरी, ब्राह्मण व शूद्र, पती व पत्नी, आईबाप व मुले यांच्यातील संबंध व तज्जन्य सर्व संस्था, रूढी किंवा कायदे या सर्वांना विवेकाच्या निकषा-वर घासून किंवा विवेकाच्या अग्नीत झाळून पाहण्याचा हक्क प्रत्येक पिढीतील लोकांना आहे याची जाणीव जनतेला करून दिली पाहिजे. तसेच मनुष्याने आपल्या बुद्धिप्रकर्षाने आज निसर्गाच्या दास्यशृंखला तोडून टाकून आपल्या उन्नतीस होणारा निसर्गाचा विरोध नष्ट केला असून मानवी दास्याला व कष्टांना आज नैसर्गिक कारणे उरलेली नाहीत हा सिद्धांतही जनतेला पटवून दिला पाहिजे. मनुष्यसमाजातील प्रत्येक व्यक्तीचा योगक्षेम व जीवितयात्रा अनायासे होऊन प्रत्येक व्यक्तीस आपली बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नती करून घेऊन सत्यसंशोधन, सौंदर्यसंवर्धन व समाजसेवा करण्यास अवश्य ती विश्रांती मिळेल इतकी सामाजिक सुधारणा करणे आज शक्य आहे. आज अशी स्पृहणीय अवस्था मानवसमाजास प्राप्त होत नसली आणि प्रत्येक राष्ट्रातील सामान्य जनतेस दारिद्र्य, अज्ञान, अनारोग्य व अनीती यांच्या कर्दमात लोळावे लागत असले तर त्याचे कारण निसर्गाचा विरोध, देवाचा प्रकोप किंवा दैवाची गती यांपैकी एकही नसून अन्याय आणि विषमता यांच्या पायावर उभारलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संस्था याच आहेत आणि सामान्य जनता मनात आणील तर या सर्व अन्यायांतून व विपत्तींतून तिला आपली मुक्तता करून घेता येईल, हा आत्मविश्वास किंवा आपल्या विवेकशक्तीवरील विश्वास जनतेत वाढला पाहिजे. श्रीमंत व गरीब, स्पृश्य व अस्पृश्य, स्त्री व पुरुष यांच्या सुखात, स्वातंत्र्यात व ज्ञानात जे अंतर आढळते ते सर्व नष्ट करून समतेची प्रस्थापना करणे शक्य आहे. यात पूर्वजन्म, पुनर्जन्म, दैव किंवा देव यांचा काही एक संबंध नाही. एका राष्ट्रातील बालमृत्युची संख्या दुसऱ्या राष्ट्रातील त्याच संख्येहून अधिक का? एका राष्ट्रातील आयुर्मान दुसऱ्या राष्ट्राहून कमी किंवा अधिक का आहे? काही लोकांना मोडक्या खोपटात जन्म येऊन खोपटातच मरावे का लागते व दुसऱ्या काहींना वाड्यात जन्म येऊन वाड्यातच मृत्यु का येतो? काहींना आजन्म उन्हातान्हात काबाडकष्ट करूनही पोटभर अन्न, अंगभर वस्त्र किंवा निवाऱ्याची जागा का मिळत नाही व काहींना अल्पश्रमाने किंवा बिनश्रमाने या सर्व बाबतींत चैनीने कालक्रमणा कशी करता येते? काहींना बुद्धी नसून शिक्षणाप्रीत्यर्थ शेकडो रुपये उडविता कसे येतात व काहींना बुद्धी असूनही शिक्षणाची संधी का मिळत नाही? काहींना आपणास व आपल्या मुलाबाळांस साध्या पडशाखोकल्या-वरही लगेच उपचार करता येतो व काहींना प्राणांतक आजाराच्या वेळीही वैद्यकीय मदत का मिळत नाही? काहींना आपल्या कुटुंबियांची सर्व जन्माची चोख व्यवस्था लावून मरता येते, तर काहींना त्यांना वाऱ्यावर सोडून मृत्युवश का व्हावे लागते? या सर्व प्रश्नांचा विचार शुद्ध विवेकाच्या साहाय्याने केल्यास प्रस्तुत सर्व आपत्ती सामाजिक व राजकीय अन्यायातून व विषमतेतून निर्माण होतात असे दिसून येणार आहे. सामान्य जनतेचे लक्ष अद्यापि ऐहिक उन्नतीकडे लागलेलेच नाही. आपल्या सर्व आपत्तींच्या

कारणांची मुळे त्यांना पूर्वजन्माच्या अज्ञात क्षेत्रात रुजलेली दिसत असून त्यांची उपभोगलालसा मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या स्वर्गीय सुखाशी निगडित झालेली आहे. सामाजिक अन्यायाच्या व विषमतेच्या नरकातून निघून न्यायाच्या व समतेच्या राज्याची प्रस्थापना करणे हाच स्वर्ग होय, हे जनतेला समजावून दिले पाहिजे. तसेच वैयक्तिक स्वार्थ सोडून समाजसेवेत आनंद मानणे हाच खरा मोक्ष आहे असे लोकांना वाटू लागले पाहिजे.

आता हे सर्व ध्येय साध्य कसे करावे यासंबंधी थोडे विवेचन केले पाहिजे. सामान्य जनतेचे स्वातंत्र्य हे स्वतः सामान्य जनतेनेच मिळविले पाहिजे व टिकविले पाहिजे, हे ध्यानात ठेवणे जरूर आहे. केवळ बौद्धिक जागृती झाल्याने जनता आपल्या दास्यातून व दैन्यातून मुक्त होईल ही आशा व्यर्थ आहे. तसेच राजकीय लोकसत्तेची प्रस्थापना होऊन प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मताधिकार मिळाल्यानेही जनतेचे सामाजिक व आर्थिक दास्य नष्ट होऊ शकत नाही, असा अनुभव इंग्लंडादी युरोपीय देशांच्या इतिहासावरून आलेला आहे. जोपर्यंत समाजात काही लोकांना केवळ स्वामित्वावर उपजीविका करता येत आहे आणि या परोपजीवी वर्गाच्या हाती श्रमोपजीवी अशा बहुजनसमाजाची जी वित्तसाधने आहेत तोपर्यंत जनतेचे दैन्य व दास्य यांचा विनाश होत नाही. हे खरे असल्यास ह्या परोपजीवी वर्गाच्या हातून बहुजनसमाजाची जीवितसाधने म्हणजे राष्ट्रातील साधन संपत्ती–जमिनी व कारखाने काढून घेऊन ती सार्वजनिक मालकीची करण्यास हल्लीच्या प्रातिनिधिक राजकीय संस्था असमर्थ आहेत असा गेल्या बारा वर्षांचा युरोपीय इतिहास स्पष्ट साक्ष देत आहे. समाजसत्तेचे ध्येय मान्य करणाऱ्या मजूर पुढाऱ्यांचे बहुमत आज इंग्लंड, जर्मनी सारख्या युरोपीय देशांतील लोकसभांत होऊन हे पक्ष आपल्या देशात मंत्रिपदारूढही झाले आहेत, पण एकट्या रशियाखेरीज अद्यापि कोणत्याही देशाची समाजसत्तेच्या ध्येयाकडे निश्चित प्रगती होत असल्याचे दिसत नाही. यावरून केवळ आपले प्रतिनिधी लोकसभांत पाठवून समाजसत्ताक क्रांती करणे अगदी अशक्य नसले तरी अल्पकाळात तरी असंभवनीय आहे, असा अनुभव इंग्लंडादी युरोपीय देशातील जनतेला आलेला आहे किंवा येऊ लागला आहे. ...

### समाजसत्ताक निःशस्त्र क्रांती कशी होईल ?

म. गांधींनी निःशस्त्र क्रांतीचे जे एक नवे साधन शोधून काढिले आहे त्याचा उपयोग समाजसत्ताक क्रांती करण्याच्या कामी सर्व जगाला होणार आहे व याच दृष्टीने पाश्चात्त्य देशातील विचारी लोकांचे लक्ष आज त्यांच्या शांततायुद्धाकडे लागले आहे यात शंका नाही. औद्योगिक संस्कृतीमुळे आज प्रत्येक युरोपीय राष्ट्रात व अमेरिकेत परोपजीवी भांडवलवाले व श्रमोपजीवी कामगार यांच्यात एक प्रकारचे वर्गयुद्ध सारखे चालू असते आणि या युद्धाचा अंत समाजसत्ताक पद्धती रूढ झाल्याखेरीज होणे अशक्य आहे असेही पुष्कळांना पटलेले आहे. पण एवढी मोठी क्रांती घडवून कशी आणावी हा मोठा कूट प्रश्न

तेथील विचारी लोकांपुढे येऊन पडलेला आहे. रशियातील कम्युनिस्ट लोकांचे या कूट प्रश्नाला उत्तर अगदी सरळ व सोपे आहे. ते असे की, पाश्चात्त्य भांडवलप्रधान राष्ट्रे साम्राज्यवृद्धीसाठी भांडता भांडता एक मोठे जागतिक महायुद्ध निर्माण होईल आणि या जागतिक महायुद्धाच्या प्रसंगी प्रत्येक देशात सशस्त्र क्रांती होऊन समाजसत्तेची प्रस्थापना होईल. याकरिता सर्व देशांतील समाजसत्तवाद्यांनी आपापल्या देशातील कामकरी व शेतकरी वर्गाची या दृष्टीने संघटना करीत राहून या भावी जागतिक राज्यक्रांतीला त्यांना सज्ज करून ठेवावे. रशियात झाली त्या प्रकारची समाजसत्ताक राज्यक्रांती जागतिक महायुद्धाच्या संधीशिवाय कोणत्याही देशात होऊ शकत नाही हेही गेल्या दहा-बारा वर्षांच्या अनुभवाने त्यांना पटू लागले आहे. पण प्रत्येक देशात ज्या मानाने हे समाजसत्ताक राज्यक्रांतीचे भय वाढत आहे, त्या मानाने साम्राज्यवादी भांडवलप्रधान राष्ट्रांतील सूत्रधार हे जागतिक युद्ध टाळण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा शक्य तो उपाय योजित आहेत. यामुळे सशस्त्र क्रांतिवादी समाजसत्ताक पक्षाला अनुकूल असणारी जागतिक महायुद्धाची संधी सध्यातरी प्राप्त होऊ शकत नाही.

शिवाय या जागतिक महायुद्धात आणि जागतिक क्रांतीत होणाऱ्या मनुष्यहानीचे भीषण स्वरूप मनःचक्षुपुढे उभे राहिले म्हणजे कोणाही विचारी मनुष्याच्या अंतःकरणात उद्विग्नतेचे आणि निराशेचे साम्राज्य पसरल्याखेरीज राहत नाही व एवढ्या भयंकर मनुष्यसंहारानंतर व धनहानीनंतर मानवसंस्कृती म्हणून काही शिल्लक उरू शकेल किंवा नाही याबद्दल शंका वाटू लागते. अर्थात मानवसंस्कृतीवरील व मानव साम्राज्याच्या अस्तित्वावरील हे भयंकर संकट टाळून जगात न्यायाची, शांततेची व समतेची प्रस्थापना करण्याचा काही उपाय निघाल्यास तो शोधून काढण्याकडे सर्व दूरदर्शी व मानवहितदक्ष थोर विभूतींचे आज लक्ष लागलेले आहे. भांडवलशाही, लष्करशाही व साम्राज्यशाही यांतून निश्चितपणे उद्भवणाऱ्या या भावी जागतिक महायुद्धातून व जागतिक सशस्त्र क्रांतीतून मनुष्यजातीला सोडविण्याचे सामर्थ्य सामान्य जनतेच्या संघटित व शांततामय प्रत्यक्ष प्रतिकारात आहे असे आम्हास वाटते. भांडवलशाही, लष्करशाही व साम्राज्यशाही या सर्वांच्या सुलतानी व सैतानी जुलमाचे अस्तित्व जगातील कामकरी व शेतकरी लोकांच्या सहकारितेवर व सहनशीलतेवर अवलंबून आहे हे कोणासही विचाराअंती दिसून येण्यासारखे आहे. कोणत्याही राष्ट्रातील कामकरी व शेतकरी वर्ग हा आपल्यावर जुलूम करून आपल्या श्रमावर जगणारी जी परोपजीवी भांडवलशाही, लष्करशाही व साम्राज्यशाही तिला आपण साहाय्य करणार नाही असा निर्धार करील आणि सार्वत्रिक कायदेभंग व करबंदी ह्या शस्त्रांनी शांततेची क्रांती करून समाजसत्ता व विश्वकुटुंब (Socialism and Communism) यांची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न करील, तर फार थोड्या काळात त्याला यश मिळून मानव संस्कृतीच्या इतिहासात एका नव्या युगाचा प्रारंभ होईल यात शंका नाही.

वर वर्णन केलेली निःशस्त्र क्रांती घडवून आणून सशस्त्र क्रांती व सशस्त्र युद्ध या रानटी उपायांऐवजी मनुष्यत्वाला साजेल व मानव संस्कृतीला पुढे नेईल असा मार्ग जनतेला दाखवण्याचा झाल्यास अहिंसावाद व समाजसत्तावाद या दोहोंवर विश्वास असणाऱ्या लोकांनी एक पक्ष स्थापन करून त्यामार्फत आपल्या देशातील कामकरी व शेतकरी लोकांचे संघटन करण्याचे कार्य अंगावर घेतले पाहिजे. आज हे कार्य करीत असणाऱ्या लोकात सुधारणावादी व सशस्त्र क्रांतिवादी असे दोनच पक्ष आहेत. एकाचा ओढा प्रातिनिधिक संस्था, इंग्लंडातील मजूरपक्ष, राष्ट्रसंघ व "सेकंड इंटरनॅशनल" याकडे आहे, तर दुसऱ्याचा ओढा मॉस्को येथील "थर्ड इंटरनॅशनल"कडे आहे. म. गांधींचा निःशस्त्र क्रांतिकारक पक्ष अद्यापि समाजसत्ताक ध्येय स्वीकारून कामकरी व शेतकरी वर्गाची संघटना करण्यास पुढे येत नाही. या पक्षापैकी पुष्कळांना औद्योगिक संस्कृतीची आवश्यकताच वाटत नाही. किंबहुना सर्व यांत्रिक औद्योगिक संस्कृती ही एक मानव संस्कृतीवर आपत्ती आलेली आहे अशी त्यांची कल्पना दिसते. पण आधुनिक औद्योगिक संस्कृती ही अनिष्ट नसून तिच्यावर जो धनिक वर्गाचा पगडा बसला आहे तो अनिष्ट आहे व तिची सर्व सूत्रे समाजाच्या हाती दिल्यास तिचे अनिष्ट स्वरूप नष्ट होऊन तिला मंगल स्वरूप प्राप्त होईल अशी समाजसत्ताक पक्षाची श्रद्धा आहे. अर्थात समाजसत्तेचे ध्येय आणि निःशस्त्र प्रत्यक्ष प्रतिकाराचे (non-violent direct action) साधन या दोहोंवर ज्यांची निष्ठा आहे अशा लोकांचा एक पक्ष आता हिंदुस्थानात अस्तित्वात येणे आवश्यक व अपरिहार्यही दिसते. कामकरी व शेतकरी वर्गामार्फत सावकार, जमीनदार, कारखानदार व सरकार यांचा जो प्रत्यक्ष प्रतिकार करावयाचा तो सध्या धोरण या दृष्टीने निःशस्त्र किंवा अनत्याचारी असावा असे म्हणणारे आज पुष्कळ लोक आहेत, पण आपण अखेरपर्यंत शांततेच्या मार्गासच चिकटून राहू असे म्हणणारे लोक कामकरी व शेतकरी वर्गाच्या संघटनेत फारसे आढळणार नाहीत. परंतु यापुढे जगात भांडवलशाही, लष्करशाही व साम्राज्यशाही आम्ही चालू देणार नाही असे मानणारा, पण कोणत्याही परिस्थितीत सशस्त्र क्रांतीचा अवलंब न करणारा, असा पक्ष निर्माण झाल्याखेरीज हा निःशस्त्र क्रांतीचा प्रयोग यशस्वी होणार नाही. म. गांधींनी हिंदी स्वराज्याच्या चळवळीत प्रवेश केला त्यावेळी त्या चळवळीची जी स्थिती होती तीच स्थिती आज समाजसत्ताक चळवळीला हिंदुस्थानात व इतर देशात प्राप्त झालेली आहे. केवळ सदनशीर व कायदेशी चळवळीने इष्टफलप्राप्ती होत नाही आणि सशस्त्र क्रांतीही शक्य दिसत नाही. या परिस्थितीतून म. गांधींनी आपल्या सत्याग्रहाच्या तत्त्वाचा अवलंब करून जसा स्वराज्याच्या चळवळीत पुढे मार्ग काढिला तसाच मार्ग सर्व जगातील समाजसत्तावाद्यांनी आज काढला पाहिजे.

म. गांधींचे सत्याग्रहाचे तत्त्व ज्यांना पटले आहे, परंतु औद्योगिक संस्कृती ही केवळ आसुरी मानून तिचा सर्वस्वी त्याग करणे ज्यांना शक्य व इष्ट वाटत नाही, त्यांनी या कामी पुढाकार घेतला पाहिजे. तसेच कामकरी व शेतकरी लोकांची ही संघटना प्रथमपासूनच


H—335—3

द्वेषभावनेपासून अलिप्त ठेवली पाहिजे. आपला लढा संस्थानिक, जमीनदार व कारखानदार या वर्गातील व्यक्तींविरुद्ध नसून त्या त्या सामाजिक संस्थांविरुद्ध आहे आणि हे सर्व वर्ग नष्ट करावयाचे याचा अर्थ त्यातील व्यक्तींना मारून टाकावयाचे हा नसून त्यांचे फक्त परोपजीवन नष्ट करून त्यांना श्रमोपजीवी बनवायचे एवढाच आहे, हे प्रथमपासून जनतेला स्पष्ट करून सांगितले पाहिजे. अर्थात कामकरी व शेतकरी वर्गाची संघटना करून त्यांना असहकारिता, कायदेभंग व करबंदी किंवा खंडबंदी याचे शिक्षण देत असतानाच आपली परोपजीवी वृत्ती हे पाप आहे व ती सोडून देऊन स्वतः श्रमोपजीवी बनणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेची जाणीव कारखानदार, जमीनदार व सावकार या लोकांत निर्माण करण्याबद्दलही प्रयत्न केले पाहिजेत. याशिवाय समाजातील मध्यम वर्गाचीही सहानुभूती मिळवून देऊन समाजसत्ताक अवस्था मानव संस्कृतीच्या व प्रगतीच्या दृष्टीने कशी अपरिहार्य व आवश्यक आहे याबद्दल अनेक दिशांनी प्रयत्न करून लोकमत अनुकूल करून घेतले पाहिजे. इतकेच नाही तर सध्याच्या भांडवलप्रधान संस्कृतीतून समाजसत्ताक संस्कृतीत जाताना काही संक्रमणावस्थेस आवश्यक अशा तडजोडीसुद्धा कराव्या लागतील हे या शांततावादी पक्षाने नेहमी ध्यानात बाळगिले पाहिजे. सशस्त्र क्रांतिकारकांनाही अशा तडजोडी कराव्या लागतात, हे रशियाच्या इतिहासावरून दाखवून देता येण्यासारखे आहे. तात्पर्य, हल्लीच्या भांडवलप्रधान समाजाला श्रमप्रधान स्वरूप देण्याचे कार्य क्रांती-खेरीज होणार नाही हे खरे असले तरी ही क्रांती सशस्त्रच झाली पाहिजे व तीत अगणित मनुष्यसंहार व अनंत धनहानी झालीच पाहिजे, म्हणजे हे अपरिहार्य आहे, असे आम्हास वाटत नाही. बहुजन समाजाने अहिंसेच्या मार्गाने हे घडवून आणण्याचा निर्धार करून त्याकरिता वाटेल तो स्वार्थत्याग करावयाचे ठरविल्यास ते अगदी शक्य आहे. ... ...

... शिवाय हे कार्य सामान्य जनतेच्या निःशस्त्र प्रतिकाराने घडवून आणल्यास दुसरा एक फायदा होणार आहे. सशस्त्र क्रांतीनंतर काही काळ तरी एका अल्पसंख्यांक वर्गाचा सत्तेचा अंमल सर्व जनतेला सहन करावा लागतो आणि तो काळ संपेपर्यंत लोकसत्ता व भाषणस्वातंत्र्य किंवा मुद्रणस्वातंत्र्य यांचा लोप होतो. शेतकरी व कामकरी वर्गाच्या निःशस्त्र अशा प्रत्यक्ष प्रतिकारातून समाजसत्ता प्रस्थापित झाल्यास ही आपत्ती टळून पूर्ण लोकसत्ताक वातावरणात जनतेला वावरता येईल व सर्व समाजसत्तावाद्यांना अभिप्रेत अशी जी अराजक विश्वकुटुंबाची सामाजिक अवस्था त्या दिशेने मानवसमाजाची प्रगती अत्यंत वेगाने होऊ लागेल. अर्थात, भांडवलशाहीबरोबरच लष्करशाहीचाही लोप होऊन सर्वत्र शांतियुगाच्या छायेत मानव संस्कृतीची अमर्याद वाढ होऊ शकेल.

[*लोकशिक्षण*, *जुलै १९३१*, *पृ. ४७९ ते ४९४*]

४

# व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला

सध्याच्या समाजाची आर्थिक घटना व्यक्तिवादावर झालेली आहे. प्रत्येक व्यक्तीला कायदेशीर दृष्टीने औद्योगिक स्वातंत्र्य असावे, एकच धंदा करणाऱ्या निरनिराळ्या उत्पादक व्यक्तींत अगर संस्थांत अनियंत्रित स्पर्धा चालू असावी, कोणत्याही व्यक्तीने आपणास लागणारा माल वाटेल त्या ठिकाणी व वाटेल त्या व्यक्तीपासून खरेदी करावा आणि त्याचा वाटेल तसा उपभोग घ्यावा असे सामान्यतः सध्याच्या आर्थिक घटनेचे स्वरूप आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, औद्योगिक स्पर्धा, वैयक्तिक स्वार्थसाधन आणि बाजारभावानुसार मालाची निपज ही तत्त्वे या घटनेला आधारभूत आहेत. या तत्त्वांवर अधिष्ठित झालेल्या आर्थिक घटनेपासून अगर आर्थिक व्यवहारांपासून समाजाचे हित आपोआप साधते, त्याकरिता समाजाने अगर राज्यसंस्थेने बुद्धिपुरस्सर प्रयत्न करावयास नकोत, फक्त प्रत्येक व्यक्तीला औद्योगिक स्वातंत्र्य देऊन त्याने इतर व्यक्तींशी केलेले करार योग्य रीतीने पाळले जातात की नाही एवढे समाजाने अगर सरकारने पाहिले म्हणजे झाले, असे या घटनेच्या समर्थकांचे म्हणणे असे. पण प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थसाधनावर आणि अनियंत्रित औद्योगिक स्पर्धेवर अधिष्ठित झालेल्या या आर्थिक घटनेपासून आपोआप समाजहित साधेल ही आशा आज पार मावळून गेली असून प्रत्येक आर्थिक व्यवहारावर समाजसत्तेचे अधिकाधिक नियंत्रण घालण्याची आवश्यकता जगातील सर्व राष्ट्रांना भासू लागली आहे. सर्वत्र समाजाने अगर सरकारने बुद्धिपुरस्सर निर्माण केलेल्या नियोजित घटनेची (Planned Economy) भाषा ऐकू येऊ लागली आहे.

व्यक्तिवादी अर्थशास्त्र हे अयोजित घटनेचे (Unplanned Economy) पुरस्कारी होते आणि नियोजित घटनेचा पुरस्कार समाजवादी अर्थशास्त्रज्ञांनीच आजपर्यंत केलेला आहे. पण आज ज्यांना समाजवादी (Socialism) तत्त्वे सर्वस्वी मान्य नाहीत, अशा लोकांनाही सर्व आर्थिक व्यवहारात नियोजित घटनेचा पुरस्कार करावा लागत आहे.

यावरूनही व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया आज ढासळला आहे असेच अनुमान निघते. अशा स्थितीत व्यक्तिवादी अर्थशास्त्राच्या मूलभूत सिद्धान्तात कोणते दोष होते किंवा आहेत याचा विचार करणे अवश्य आहे. याच विषयाचे शक्य तितक्या सोप्या भाषेत विवेचन करण्याचे आम्ही योजिले आहे. आता हे "मूलभूत सिद्धांत" एकामागून एक घेऊन त्यातील दोषांचे स्वल्प दिग्दर्शन करू.

## अयोजित घटनेचा सिद्धांत

प्रत्येक व्यक्तीने आपापले हित दूरदृष्टी ठेवून साधीत गेले म्हणजे समाजाचे हित आपोआप साधते, उलट समाजहिताच्या कल्पनेने राज्यकर्त्यांनी व्यक्तीच्या हितसाधनास जखडून टाकण्याचा प्रयत्न केला तर त्याचा विपरित परिणाम घडून येतो. याकरिता प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थसाधनाच्या प्रयत्नातून जी घटना आपोआप निर्माण होईल तीच स्वाभाविक आणि समाजहिताला पोषक अशी असते.

अर्थशास्त्राची दृष्टी जसजशी सूक्ष्म होत गेली तसतसा या युक्तिवादातील हेत्वाभास अधिकाधिक स्पष्ट होऊ लागला. समाजहित आणि व्यक्तिहित यात अंतिम दृष्टीने अद्वैत असले तरी संकुचित दृष्टीने पाहू गेल्यास त्यात पदोपदी द्वैतच दिसून येते. सामान्य व्यक्तीला दूर व व्यापक दृष्टी असत नाही आणि ज्यांना ती असते त्यांनाही लोभा-मुळे अगर भयामुळे संकुचित स्वार्थदृष्टी सोडवत नाही. शिवाय सध्याच्या व्यक्ति-स्वातंत्र्याच्या आर्थिक घटनेत कोणत्याही व्यक्तीला समाज साहाय्य करणारा नसल्यामुळे प्रत्येक व्यक्ती अधिकाधिक स्वार्थी, लोभी व भ्याड बनत जाते व यामुळे सर्व आर्थिक व्यवहार, दूरदृष्टीच्या व्यापक स्वार्थाने होत नसून बहुतेक व्यवहार अदूरदृष्टीने आणि संकुचित वृत्तीनेच होत असतात. यामुळे प्रत्येक व्यक्ती अहर्निश स्वार्थासाठी धडपडत असली तरी त्यापैकी प्रत्येकाच्या कृतीने समाजहिताचे वर्धन होत नसून त्याचा विनाश होत आहे. प्रत्येक घरवाल्याने आपल्या घराच्या आजूबाजूची जागा साफ ठेवल्याने सार्वजनिक आरोग्य साधत नाही कारण अशा परिस्थितीत प्रत्येक घरवाला आपली घाण दुसऱ्याच्या घराशेजारी टाकू लागतो. त्यातलाच हा प्रकार आहे. एखाद्या नाटकगृहात हजारो प्रेक्षक जमले असता त्याला आग लागावी आणि सर्वांनी एकदम दरवाजाकडे धाव घ्यावी म्हणजे जशी खेचाखेच होते व सर्वच दरवाजे तुंबून जातात व सर्वांवरच जळून मरण्याची पाळी येते तशीच काहीशी स्थिती सध्याच्या अयोजित आर्थिक घटनेमुळे झालेली आहे. अशा प्रसंगी एखाद्या सार्वजनिक अधिकाऱ्याने पुढे होऊन सर्व व्यक्तींच्या स्वार्थाला आळा घालून शक्य तितके लोक वाचवावे लागतात. याच न्यायाने समाजाचे आर्थिक हित केवळ वैयक्तिक स्वार्थसाधनावर न सोपविता ते समाजसत्तेचा उपयोग करून साधावे लागते. व्यक्तीची दृष्टी अज्ञान, भय आणि लोभ यांनी अंध झालेली असते व म्हणूनच समाजाने त्याला सर्वत्र सहाय्य करावे लागते. समाजातील सर्व व्यक्तींचे सर्व

आर्थिक व्यवहार अदूरदर्शी स्वार्थाने होत नाहीत व त्यांना आपले हितही बरोबर कळत नाही ही गोष्ट व्यवहारज्ञ व्यापारी ओळखून असतात. याचाच फायदा घेऊन ते जाहिराती देणे वगैरे अनेक उपाय योजून एकसारखी लोकवंचना करीत असतात. त्याचप्रमाणे इतर भावनांना वश होऊन गिऱ्हाईक आपल्या आर्थिक स्वार्थाकडे दुर्लक्ष केव्हा करते हेही चाणाक्ष व्यापारी जाणतात. याच ज्ञानातून त्यांनी विक्रयशास्त्र बनविलेले असून त्याला विक्रयशास्त्र म्हणण्यापेक्षा लोकवंचनाशास्त्र म्हणणेच अधिक संयुक्तिक होईल. प्रत्येक व्यक्ती आपले खरे आर्थिक हित साधण्यास पात्र व समर्थ असती तर त्याला लोकवंचनेचे स्वरूप प्राप्त झाले नसते. असो. आता व्यक्तिवादी अर्थशास्त्राच्या दुसऱ्या सिद्धांताकडे वळू. ...

## स्पर्धा व लायकीचा सिद्धांत

प्रत्येक धंद्यातील लोकात अप्रतिबंध स्पर्धा चालू असली आणि सर्वांस कायदेशीर औद्योगिक स्वातंत्र्य मिळालेले असले म्हणजे प्रत्येक धंदा जास्तीत जास्त लायक व्यक्तींच्या हाती जातो व त्यामुळे समाजाच्या संपत्तीत जास्तीत जास्त भर पडते, असे हा सिद्धांत सांगतो. हा सिद्धांतही भ्रामक ठरलेला आहे. आधी लायकी म्हणजे काय याचा विचार झाला पाहिजे. औद्योगिक स्पर्धेत यशस्वी होण्यास मनुष्याजवळ कोणती लायकी लागते? याचे उत्तर पैसा मिळविण्याची लायकी, यापेक्षा अधिक काही देता येत नाही. आजच्या समाजात जुलूम आणि लोकवंचना या मार्गांनीही द्रव्यार्जन करता येत असल्यामुळे औद्योगिक स्पर्धेत यशस्वी होण्यास जुलूम करण्याची आणि लोकवंचना करण्याची लायकीही अंगी असावी लागते. तसेच औद्योगिक स्पर्धेत लायक व्यक्तीच यशस्वी होतात असे सिद्ध होण्यास समाजातील सर्व लायक व्यक्तींस त्या स्पर्धेत भाग घेण्यास सारखीच संधी व साधने प्राप्त होतात असे गृहीत धरले पाहिजे. पण सध्याच्या आर्थिक विषमतेच्या युगात स्पर्धाक्षेत्रात सर्वांना सारखी साधने आणि संधी मिळतात असे म्हणता येत नाही. शिवाय आज अंगी असणारी लायकी आणि विशिष्ट साहाय्य मिळाल्यास पुढे निर्माण होणारी लायकी यांचाही विचार या ठिकाणी झाला पाहिजे. एखादी व्यक्ती, एखादा वर्ग किंवा एकादे राष्ट्र आज नालायक असेल पण तेच विशिष्ट साहाय्य मिळाल्यास आज लायक गणलेल्या व्यक्तीपेक्षा, वर्गापेक्षा किंवा राष्ट्रापेक्षा अधिक लायक होणे शक्य असेल. पण आजच्या कठोर स्पर्धायुगात अशा संभाव्य लायकीचा, साहाय्याच्या अभावी, एकसारखा नाश होत आहे.

या सिद्धांतावर आता आणखी एक आक्षेप घेण्यात येत असतो : तो असा की, आजच्या समाजात स्पर्धातत्त्व फारसे उरलेलेच नाही. निरनिराळे धंदेवाले आपापसात स्पर्धा न करता सहकार्य ऊर्फ कट करू लागले आहेत. धंदेवाल्यांच्या या कटामुळे गिऱ्हाईकांच्या पदरात जास्तीत जास्त व स्वस्तात स्वस्त माल पडेल ही आशाही आज

उरलेली नाही. आजचे औद्योगिक व्यवहार स्पर्धातत्त्वाप्रमाणे होत नसून संघतत्त्वाप्रमाणे होत आहेत. अशा प्रकारे स्पर्धासिद्धांताचा सर्वत्र बोजवारा उडत आहे......

## समाजसेवा आणि द्रव्यार्जन

आजच्या समाजात, समाजाच्या आर्थिक हितात जो जितकी भर घालील त्या प्रमाणातच त्याला द्रव्यार्जन करता येते, असे वस्तूचे किंवा कामाचे जे मोल बाजारात मिळते ते त्या वस्तूच्या मागणी–पुरवठ्यावर अवलंबून असते. पुरवठा करणारांनी एकजूट केली किंवा एखादे ठिकाणी मक्तेदारी निर्माण झाली की पुरवठा कमी करून बाजारातील मोल वाढविता येते. तसेच जमिनीसारख्या निसर्गदत्त वस्तूचे मोल कोणतेही कष्ट न करता, मागणीच्या वाढीबरोबर आपोआप वाढू लागते. एकदा विशिष्ट प्रमाणात द्रव्यार्जन केले म्हणजे व्याजाच्या, खंडाच्या किंवा नफ्याच्या रूपाने त्याची वाढ कोणतेही कष्ट न करता होऊ शकते. एखाद्या व्यक्तीजवळ काही उपजत गुण असला व तो दुर्मिळ असला तर समाजातील इतर व्यक्तींच्या आपापसांतील चढाओढीमुळे त्या व्यक्तीस कष्टाच्या मानाने वाजवीपेक्षा फाजील द्रव्य मिळू शकते. अशा अनेक व्यवहारांत द्रव्यार्जन आणि समाजाच्या संपत्तीत भर पडणारी भर यांचे समप्रमाण बसत नाही. इतकेच नाही तर पुष्कळ वेळा व्यस्त प्रमाण असते. एकेकाळी अर्थशास्त्रज्ञांची अशी समजूत होती की असे "अकष्टार्जित द्रव्यार्जन" फक्त फक्त जमिनीच्या मालकासच करता येते पण आज असे दिसू लागले आहे की अकष्टार्जित द्रव्याचा भाग आज प्रत्येक सधन व्यक्तीच्या उत्पन्नात थोडाफार असतो. यामुळे द्रव्यार्जन व समाजसेवा यांचे कोणतेही समप्रमाण आजच्या समाजात बसू शकत नाही. याचाच अर्थ आजची समाजाची आर्थिक घटना अन्यायावर व जुलमावर उभारलेली आहे. अर्थात् ती टिकाऊ नाही. ज्यांना कष्ट करावे लागतात त्यांना द्रव्य मिळत नाही व ज्यांना द्रव्य मिळते त्यांना कष्ट करावे लागत नाहीत अशी विपरित घटना टिकाऊ कशी होणार ?......

## बाजारभावाचा सिद्धांत

बाजारात ज्या मालाचा भाव वाढेल त्याचा पुरवठा वाढत जावा आणि ज्याचा भाव कमी होईल त्याचा पुरवठा कमी होत जावा यातच समाजहित आहे. कारण त्याच्यायोगाने समाजाच्या गरजा आपोआप भागविल्या जातात. हा सिद्धांतही मागील तीन सिद्धांतांप्रमाणेच भ्रामक ठरलेला आहे. बाजारभाव हे सामाजिक गरजांचे निदर्शक असतात, हे म्हणणेच मुळी बरोबर नाही. या ठिकाणी गरजा, वासना आणि क्रयशक्ती यातील भेद ध्यानात घेतला पाहिजे. माणसाच्या अशा अनेक गरजा असतात की त्यांना वासनांचे स्वरूप प्राप्तच झालेले नसते. अर्थात अशा गरजांचा काहीही परिणाम बाजारभावावर होत नाही. उलट अशा अनेक वासना मनुष्याला आहेत की त्यांची, त्याच्या हिताच्या दृष्टीने

काहीच गरज नाही. दारूसारख्या व्यसनाकडे पाहिल्यास, या गोष्टीचा उलगडा होतो. तात्पर्य, मनुष्याच्या वासना आणि सामाजिक उपयुक्तता यांचा परिणाम होतो तो सामाजिक गरजांचा होत नसून, समाजातील व्यक्तींच्या वासनांचा होत असतो. यामुळे, बाजारभावाकडे लक्ष देऊन मालाची निपज करणारांकडून सामाजिक उपयुक्ततेकडे लक्ष दिले जाते असे म्हणता येत नाही. शिवाय, समाजातील सर्व व्यक्तींच्या वासनांचा सारखाच परिणाम बाजारभावावर होतो असेही नाही. कारण "उत्पतद्यते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ।" हा सिद्धांत अर्थशास्त्रज्ञांना केव्हाही विसरता येत नाही. दरिद्री लोकांच्या वासनांना बाजारभावातील मागणीचे स्वरूप प्राप्त होत नाही. बाजारातील मागणी ही क्रयशक्तीवर अवलंबून असते व क्रयशक्ती क्रयेच्छा आणि द्रव्यबल हा दोहोंवर अवलंबून असते. दरिद्री लोकांना मोटार घेण्याची इच्छा कितीही तीव्र झाली, तरी त्यामुळे मोटारींचा बाजारभाव वाढत नाही किंवा त्यांना हवेशीर बंगल्यात राहण्याची वासना असली म्हणून अशा बंगल्यांचा पुरवठा वाढू शकत नाही. आजच्या समाजातील बाजारभाव श्रीमंतांच्या विलासीवृत्तीचे निदर्शक असतात. सामान्य जनतेच्या गरजांचे निदर्शक नसतात. अशा प्रकारे व्यक्तिवादी अर्थशास्त्राला आधारभूत असे जे चार प्रमुख सिद्धांत त्यांचा आज कसा बोजवारा उडालेला आहे हे थोडक्यात दिग्दर्शित केले आहे. त्यावरून व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला असे जे शीर्षक लेखाला दिले आहे, त्यातील रहस्य वाचकांच्या ध्यानात येईल अशी आशा आहे. अशा रीतीने व्यक्तिवादाने आपोआप समाजहित साधेल अशी जी आशा होती ती नष्ट झाल्यामुळे अयोजित घटनेचे तत्त्वही मागे पडले असून नियोजित घटनेचे तत्त्व सर्वत्र पुढे येत आहे. "कोणी कोणता माल निर्माण करावा, कोणत्या मालास किती भाव मिळावा, कोणत्या कामाला किती मोबदला मिळावा, कोणी किती तास काम करावे" अशा प्रकारच्या अनेक आर्थिक व्यवहारांवर समाजसत्तेचे नियंत्रण घालून सर्व व्यवहार पूर्व योजनेप्रमाणे चालू ठेवावेत ही विचारसरणी आज सर्वत्र फैलावू लागली आहे. ती जरी प्रथम समाजसत्ताक रशियामध्ये निर्माण झाली असली तरी इटली, जर्मनी, इंग्लंड व अमेरिका या भांडवलशाही राष्ट्रांनाही ती आज स्वीकारावी लागत आहे. आज भांडवलशाही व समाजसत्ता यांच्यातील मतभेद अयोजित घटना व नियोजित घटना यांच्यावर अधिष्ठित झालेला नाही. नियोजित घटनेचे तत्त्व मुसोलिनी व हिटलर यांनाही "समाजवादी रशिया" इतकेच, मान्य झालेले आहे. यामुळे भांडवलशाहीचे स्वरूप पालटत आहे. परंतु भांडवलशाही समाजरचना आणि नियोजित घटना यांच्यात मूलतःच विरोध असल्यामुळे नियोजित घटना यशस्वी व्हावयाची असल्यास अखेरीस सर्वांसच समाजवादाची कास धरावी लागेल. नाहीतर ही नियोजित घटना म्हणजे संघटित भांडवलशाहीचा सार्वत्रिक जुलूम असा अर्थ होऊन ती जुलमाने गांजलेल्या संघटित कामगार वर्गाकडून उलथून पाडली जाईल असे समाजवादी अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे.

[*पारिजात, मे १९३४, पृ. १३ ते १६*]

पारिजातच्या मे महिन्याच्या अंकात "व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया ढासळला" या मथळ्याचा मी एक लेख लिहिला होता. त्याला श्री. न. वा. शिदोरे यांनी उत्तर देऊन माझे म्हणणे खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. पण तो अयशस्वी झाला असून माझ्या लेखावरील आक्षेप समर्पक नाहीत असे मी या लेखात दाखवून देणार आहे. .....

## शिदोरे यांचा पहिला आक्षेप

"आमचा या भूमिकेवरील पहिला आक्षेप असा की, त्या विवरणात उत्क्रांतीची दृष्टी सोडून देऊन रा. जावडेकर हे एका धिसाडघाईने रचलेल्या क्रांतीच्या तत्त्वाच्या आहारी पडले आहेत. आजची समाजघटना ही एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरूपात शिरत आहे. या मंथनात तिचे स्वरूप मूलतः पालटेल असा कयास करणे इतिहासाकडे दुर्लक्ष करण्याइतकेच अशास्त्रीय होईल."

या आक्षेपाचा काय अर्थ आहे ते मला समजत नाही. क्रांतितत्त्वाचा आश्रय करणे किंवा आजच्या समाजाचे स्वरूप मूलतः अशास्त्रीय असे म्हणणे इतिहासाकडे दुर्लक्ष करण्या-इतके अशास्त्रीय कसे आहे ते श्री. शिदोरे यांनी स्पष्ट केलेले नाही. मानवी समाजाच्या आर्थिक घटनेत केव्हाच मूलतः परिवर्तन झालेले नाही किंवा मानवी इतिहासात केव्हाच क्रांत्या झाल्या नाहीत किंवा होणार नाहीत, असा इतिहासाचा सिद्धांत आहे काय? श्री. शिदोरे यांनीच आपल्या लेखात ज्या औद्योगिक क्रांतीचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे तिच्यामुळे समाजाच्या आर्थिक घटनेचे स्वरूप मूलतः बदलले नाही असे त्यांचे म्हणणे आहे काय? आणि औद्योगिक क्रांतीमुळे समाजाचे स्वरूप जर मूलतः बदलले असेल तर ते स्वरूप पुनः मूलतः बदलणार नाहीच असा आग्रह धरणे हे इतिहासशास्त्राला धरून कसे होते?

याच आक्षेपाचे विवरण करताना मी मार्क्सच्या बुद्धीचे अनुकरण केले आहे व उत्क्रांतीची दृष्टी सोडून दिली आहे, अशीही विधाने त्यांनी माझ्यासंबंधी केली आहेत. पण तीही चुकीची असून त्या विधानांमुळे माझ्यासंबंधी नसता गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे. मी समाजवादी असलो तरी मार्क्सचा अनुयायी नाही आणि समाजसत्ताक घटनेची स्थापना केवळ सशस्त्र क्रांतीनेच होईल, असा मार्क्सच्या अनुयायांचा आग्रह माझ्यापाशी नाही. पण तशी क्रांती होणारच नाही असाही पण आग्रह धरणे मला शास्त्रीय दृष्टीचे वाटत नाही.

## शिदोरे यांचा दुसरा आक्षेप

माझ्या विवेचनावर श्री. शिदोरे यांचा दुसरा आक्षेप पुढीलप्रमाणे आहे. "परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की रा. जावडेकर यांनी शास्त्रीय व नैतिक अशा दोन्ही रंगाचा

चष्मा आपल्या डोळ्याला लावल्यामुळे सांप्रतच्या आर्थिक घटनेचे हुबेहूब स्वरूप त्यांच्या दृष्टीतून निसटले आहे." माझे स्वतःचे या बाबतीतील मत असे आहे की कोणत्याही सामाजिक शास्त्राची पूर्तता व अर्थात अर्थशास्त्राचीही पूर्तता, नैतिक दृष्टी स्वीकारल्याखेरीज होऊ शकणार नाही आणि म्हणून शास्त्रीय दृष्टी व नैतिक दृष्टी यांच्यात मी विरोध समजत नाही. तथापि श्री. शिदोरे यांचे काय म्हणणे आहे, ते मला समजते. समाजातील आर्थिक संस्थांचे व व्यवहारांचे यथातथ्य वर्णन करणे यालाच ते शास्त्रीय दृष्टी समजतात व त्या व्यवहारासंबंधी अगर संस्थांसंबंधी सदसद्विवेक करणे याला ते नैतिक दृष्टी समजतात. मला प्रचलित आर्थिक संस्था व व्यवहार यांचे केवळ यथातथ्य वर्णन करावयाचे नसून त्यांच्या सदसदत्वासंबंधी निर्णय द्यावयाचा होता व म्हणूनच श्री. शिदोरे यांच्या शब्दात मला शास्त्रीय व नैतिक या दोन्ही दृष्टींचा अवलंब करावा लागला आहे. तथापि शास्त्रीय विवेचनात नैतिक दृष्टीने केलेल्या विवेचनाची आवश्यकताच असते असे माझे मत असल्यामुळे माझे विवेचन माझ्या दृष्टीने शास्त्रीयच झालेले आहे व मी जर नैतिक दृष्टीची पूर्तता त्या विवेचनास दिली नसती तर त्याची शास्त्रीयताही अपुरीच राहिली असती असे मी समजतो. या वादात विशेष न शिरता मी येवढेच सांगू इच्छितो की, प्रचलित आर्थिक व्यवहार आणि संस्था यांच्या सदसदत्वाचा निर्णय करण्याची माझी भूमिका असली तरी त्यामुळे माझी शास्त्रीय दृष्टी कोठे चुकली आहे असे मला वाटत नाही. व्यक्तिवादी अर्थशास्त्राच्या आधारभूत अशा चार सिद्धांतांवरील माझ्या टीकेवर श्री. शिदोरे यांनी जे आक्षेप घेतले आहेत त्यांचा फोलपणा थोडक्यात दाखवून दिला असता माझे विवेचन अशास्त्रीय नाही अशी वाचकांची खात्री होईल.

## व्यक्तिहित व समाजहित यासंबंधीचा सिद्धांत

या सिद्धांतासंबंधी श्री. शिदोरे लिहितात, "व्यक्तिहिताचा अर्थ शास्त्रीय दृष्ट्या स्वार्थ-साधुपणा किंवा संकुचित दृष्टी असा नसून शक्य तितके जास्तीत जास्त अर्थोत्पादन करणे हा होय". माझा या विचारसरणीवरच मुख्य आक्षेप आहे. सध्याच्या समाजातील आर्थिक व्यवहार दूरदृष्टीच्या व्यापक स्वार्थाने होत नसून त्यापैकी बहुतेक व्यवहार अदूरदृष्टीने व संकुचित वृत्तीने होत असतात असे माझे म्हणणे आहे. व्यक्तिहित साधणे म्हणजे समाजाच्या संपत्तीत अधिकात अधिक भर घालणे असा श्री. शिदोरे यांना प्रिय असणाऱ्या अर्थशास्त्राचा शास्त्रीय अर्थ असेल, पण प्रत्यक्ष सृष्टीतील व्यवहाराशी त्याचा काही संबंध नाही. आजच्या जगात समाजाच्या संपत्तीत भर न घालता समाजाच्या संपत्तीचा नाश करूनही अर्थसंपादन करता येते. व्यक्तीची दृष्टी अर्थोत्पादनाकडे नसून अर्थसंपादनाकडेच प्रामुख्याने असते व ज्यावेळी अर्थोत्पादनाऐवजी अर्थविनाशानेच अर्थसंपादन करणे शक्य असेल त्यावेळी व्यक्ती अर्थविनाशासच प्रवृत्त होतील हे उघड आहे. ...

... औद्योगिक क्रांतीच्या काळात प्रत्येक व्यक्तीला आपले हित साधण्याची संपूर्ण मुभा दिल्याने समाजहित आपोआप साधेल ही भ्रामक समजूत जर अस्तित्वात नसती तर जगातील अनंत आपत्ती वाचल्या असत्या असे मला वाटते. या औद्योगिक क्रांतीच्या काळात म्हणजे ज्यावेळी इंग्लंडात औद्योगिक क्रांती झाली त्या काळात इंग्लंडचे म्हणजे इंग्लंडातील भांडवलवाल्यांचे, सर्व जगावर औद्योगिक व व्यापारी प्रभुत्व प्रस्थापित झाले हे खरे असले, तरी त्याच काळात हिंदुस्थानातील सर्व उद्योगधंदेवाले ठार मेले आणि इंग्लंडात औद्योगिक गुलामगिरी सामान्य जनतेच्या नशिबी आली हे विसरता येत नाही....

इंग्लंडातील औद्योगिक क्रांतीमुळे दोन आपत्ती जगावर आल्या. एक कामगारवर्गाला औद्योगिक गुलामगिरी प्राप्त झाली. आणि दुसरी, इतर सर्व राष्ट्रांवर इंग्लंडचे औद्योगिक व व्यापारी वर्चस्व प्रस्थापित झाले. पहिल्या आपत्तीचे निवारण करण्यासाठीच समाजवादी अर्थशास्त्राचा उदय झाला व दुसऱ्या आपत्तीचे निवारण करण्यासाठी राष्ट्रवादी अर्थशास्त्राचा (national economics) जन्म झाला. समाजवादी अर्थशास्त्राचे जनकत्व जसे कार्ल मार्क्स याला देण्यात येते त्याचप्रमाणे राष्ट्रवादी अर्थशास्त्राचे जनकत्व फ्रेड्रिक लिस्ट यास देण्यात येते. या दोन्ही अर्थशास्त्रज्ञांनी व्यक्तिहित व समाजहित यांची निरपेक्ष सांगड घालण्याच्या व्यक्तिवादी अर्थशास्त्राच्या सिद्धान्तावर हल्ले चढविले आहेत. व आज या माऱ्यामुळे त्या सिद्धान्ताचा सर्वत्र बोजवारा उडालेला आहे. समाजवादी अर्थशास्त्राप्रमाणे राष्ट्रवादी अर्थशास्त्रही अंशतः तरी पूर्वीपासूनच नियोजित घटनेचे पुरस्कारी बनलेले आहे व त्याचे हे स्वरुप अधिकाधिक वृद्धिंगत होऊन आज त्याला राष्ट्रीय समाजवादी अर्थशास्त्राचे स्वरुप (national socialist economics) येऊ लागले आहे.

## आर्थिक व्यवहाराचे सामाजिक नियंत्रण

यानंतर आर्थिक व्यवहारांवर समाजहिताच्या दृष्टीने धनोत्पादन, बाजारभाव, मजुरीचे दर, कामाचे तास वगैरेवर नियंत्रणे घालावी लागत आहेत असे म्हटले आहे. या नियंत्रणांसंबंधी शिदोरे लिहितात "रा. जावडेकरांच्या मतांप्रमाणे जरी मागणीच्या वाढीच्या काळात नियंत्रण अवश्य असले तरी चालू असलेल्या औद्योगिक मंदीच्या काळासारख्या प्रसंगी असली नियंत्रणे जरूर तितकी ढिली केली पाहिजेत."

श्री. शिदोरे यांचे हे विधान वस्तुस्थितिसंबंधी दुर्लक्षच दर्शविते. कारण सध्याची औद्योगिक मंदी सुरू झाल्यापासूनच अमेरिकेसारख्या देशात अधिकाधिक नियंत्रणाची आवश्यकता भासू लागली असून आपण घातलेल्या सामाजिक नियंत्रणामुळेच आमची औद्योगिक मंदीतून लवकर मुक्तता होईल असे जर्मनी, इटली वगैरे देशातील नियोजित घटनेचे पुरस्कर्ते म्हणत आहेत. इंग्लंडसारख्या व्यक्तिवादी अर्थशास्त्राच्या माहेरघरात

अधिकाधिक नियंत्रणे घालून औद्योगिक मंदीतून पार पडण्याचे तत्त्व पुरस्कारिले जात आहे व केवळ राष्ट्रीय नियंत्रणे व आंतरराष्ट्रीय परिषदा व तह होत आहेत. यावरून मंदीचा नाश करण्यासाठीच आर्थिक व्यवहारांवर अधिक नियंत्रणे हवीत असा सर्वत्र अनुभव येत आहे असे दिसून येईल.

आजच्या औद्योगिक मंदीची कारणे शोधून पाहिली म्हणजे आजच नियंत्रणाची आवश्यकता का आहे ते समजून येते. आज मागणी नाही म्हणून बाजारभावांना मंदी आली आहे हे खरे आहे. पण मागणी मंद का झाली? धनाची विषम विभागणी हे मंद मागणीचे कारण आहे. गरीबांकडे द्रव्याचा ओघ अधिक जाईल तर मागणी वाढेल. भांडवलशाही पद्धतीत द्रव्याचा भाग फाजील प्रमाणात धनिकांकडे जातो व त्यामुळे उत्पादनाचे कारखाने वाढतात पण त्याचबरोबर सामान्य जनतेला द्रव्याचा भाग कमी मिळाल्यामुळे मागणी मंदावते. एकीकडे उत्पादन अधिक व दुसरीकडे मंद मागणी यामुळे आर्थिक आपत्ती येते. ही आपत्ती टाळण्यास द्रव्याची अधिक समान विभागणी झाली पाहिजे. तसेच आपल्या देशातील जनतेला भिकार बनविल्यामुळे स्वदेशी मागणी वाढत नाही म्हणून युरोपीयन देशातील भांडवलवाले मागासलेल्या देशातील बाजारपेठा आपणास मिळाव्यात म्हणून खटपट करतात व सर्वच देशांनी हीच महत्त्वाकांक्षा धरल्या-मुळे मालाची निपज अधिक होते. पण मागासलेले देश पुढे येऊ लागल्यामुळे आता तेही त्यांचा माल घेत नाहीसे झाले आहेत. म्हणून उत्पादनाच्या कार्यात काही शिस्त व आंतरराष्ट्रीय नियंत्रणाची व करारमदारांची आवश्यकता वाटू लागली आहे.

## बाजारभावानुसार उत्पादनाचा सिद्धांत

बाजारभावाकडे पाहून धनोत्पादन केल्यामुळे सामाजिक गरजा आपोआप भागतात हा मूळ सिद्धांत. त्यावर माझी टीका अशी की सध्याचे बाजारभाव खऱ्या सामाजिक गरजांचे निदर्शक नसून श्रीमंतांच्या विलासी वासनांचे निदर्शक असतात. हे सिद्ध करताना गरजा व वासना यांतील भेद दाखविला. यावर श्री. शिदोरे लिहितात, "बाजारात ज्या मालाचा भाव वाढेल त्याचा पुरवठा वाढत जावा आणि ज्याचा भाव कमी होईल त्याचा पुरवठा कमी होत जावा यातच समाजहित आहे." या सिद्धांताचा रा. जावडेकरांना सात्त्विक संताप आल्यासारखा वाटतो. कारण त्याच्या बुडाशी क्रयशक्ती व वासना यांची जी सांगड अर्थशास्त्राने घातली आहे ती रा. जावडेकरांच्या नैतिक दृष्टीला पटत नाही. परंतु आम्हाला इतकेच म्हणावयाचे आहे की संपूर्ण समाजवादी घटनेतही हीच सांगड अर्थशास्त्रज्ञांना व आर्थिक धोरणाबद्दल जबाबदार असणाऱ्या मुत्सद्यांना शिरोधार्य करणे अपरिहार्य आहे. आज ज्या गोष्टींचा विचार करून धनोत्पादन होते त्याच गोष्टींकडे पाहून समाजसत्ताक अमदानीतही ते होईल असे श्री. शिदोरे यांचे

म्हणणे दिसते. पण हे म्हणणे बरोबर नाही. समाजसत्ताक अमदानीत श्रीमंतांचा वर्गच नष्ट होईल. गरीबांची क्रयशक्ती वाढेल, खऱ्या गरजांच्या प्रमाणात धनविभागणी करण्याचे धोरण राहील आणि उत्पादन केवळ बाजारातील मागणीवरून ठरविले जाणार नाही तर सामाजिक गरजांचा आगाऊ कयास बांधून त्याप्रमाणे धनोत्पादन करण्यात येईल. यामुळे धनोत्पादन अगदी भिन्न तत्त्वावर होईल.

या लेखात इतके शास्त्रीय विषय आलेले आहेत की, त्यांची सांगोपांग चर्चा करण्यास स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. तथापि माझ्या विचाराची सामान्य दिशा वाचकास कळावी, श्री. शिदोरे यांचे आक्षेप भरभक्कम पायावर आधारलेले नाहीत हे समजून यावे आणि व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा पाया खरोखरच ढासळू लागला आहे हे माझे मत आक्षेप-निरसनाच्या स्वरूपात पुन्हा एकदा वाचकांच्या पुढे यावे, येवढ्याच करिता हा लेख लिहीलेला आहे. त्यामुळे या विषयाची सांगोपांग माहिती मिळवून घेण्याची इच्छा एकदोन वाचकांस झाली तरीही मी या लेखाचे सार्थक झाले असे समजेन.

[*पारिजात, ऑक्टोबर १९३४, पृ. ३ ते १०*]

५

# राष्ट्रीय सभा आणि समाजवाद

[राष्ट्रीय चळवळीत समाजवादाच्या ध्येयाचा कसा समावेश झाला याची चर्चा या लेखात केली आहे. जेव्हा समाजवाद हे ध्येय प्रत्यक्षात नव्हते तेव्हाही दारिद्र्य, आर्थिक पिळवणूक इ. मुद्दे राष्ट्रीय चळवळीत ठळकपणे पुढे आले होते असे आचार्यांनी नवरोजी, टिळक आणि गोखले यांचे दाखले देत लेखाच्या पूर्वार्धात दाखविले आहे. या पार्श्वभूमीवर रशियन राज्यक्रांतीनंतरच्या काळात समाजवादी उद्दिष्ट भारतीय नेत्यांपैकी अनेकांनी स्वीकारले. त्या उद्दिष्टांचे स्वरूप आणि राष्ट्रीय चळवळ आणि समाजवाद यांच्या संबंधांची चर्चा "समाजसत्ताक ध्येयाचा उदय" या उपशीर्षकाखाली त्यांनी केली आहे. ती येथे दिली आहे.

या लेखाच्या शेवटी आचार्यांनी समाजवाद विविध मार्गांनी येऊ शकतो हे नमूद करून भारतात गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा समन्वय करणारे नवे तत्त्वज्ञान निघेल असे सूचित केले आहे.]

रशियन राज्यक्रांतीनंतर थोड्याच काळात हिंदुस्थानात समाजसत्तेचे तपशीलवार विचार होऊ लागला. त्यामानाने सामान्य नागरिकांच्या हक्कांचा समावेश स्वराज्याच्या व्याख्येत होऊ लागला. नागरिक हक्कांचा समावेश राज्यघटनेत असावा असा ठराव प्रथम १९१८ साली मुंबईस भरलेल्या जादा राष्ट्रीय सभेत झाला. त्यानंतर १९१९ साली अमृतसरच्या राष्ट्रीय सभेत मजूर संघटनांचे काम राष्ट्रीय सभेने हाती घ्यावे असा स्पष्ट ठराव झाला. लाला लजपतराय यानंतर थोड्याच काळात हिंदुस्थानात आले. ते समाजवादाची आणि मजूर-संघटनेची भाषा बोलतच बाहेरून आले आणि त्यांच्या अध्यक्षतेखालीच १९२० साली पहिली अखिल भारतीय कामगार संघ परिषद भरली. १९२० साली राष्ट्रीय सभेचे नागपुरास अधिवेशन झाले. त्याचवेळी पुनः मजूर संघटनेचा ठराव राष्ट्रीय सभेत झाला. महात्मा गांधींच्या असहकार, सत्याग्रह, कायदेभंग, करबंदी वगैरे चळवळींची समाजवाद्यांच्या सार्वत्रिक संपाच्या कल्पनेशी काही लोक तुलना करू लागले आणि गांधी व लेनिन अथवा मार्क्सवाद व गांधीवाद यांचीही तुलना काही बुद्धिमंतांना करावीशी वाटू लागली. श्री. डांगे यांनी 'सोशॅलिस्ट' या नावाचे वृत्तपत्र याच वेळी सुरू केले होते आणि महायुद्धोत्तर काळातील क्षणिक औद्योगिक भरभराटीमुळे मुंबईसारख्या औद्योगिक शहरात यशस्वी संपांना

अनुकूल वातावरण निर्माण झाले. गांधीजींच्या करबंदीच्या चळवळीलाच संयुक्त प्रांतादी जमीनदारी विभागात वर्गयुद्धाचे स्वरूप देता येईल अशी आशा उत्तर हिंदुस्थानात काम करणाऱ्या काही समाजवाद्यांना किंवा कम्युनिस्टांना वाटली. या वेळी राष्ट्रवाद आणि समाजवाद, राष्ट्रीय लढा आणि वर्गयुद्ध यातील अंतर फारच थोड्यांना समजत होते. तथापि बाजारभावातील विलक्षण चढ, कागदी नाण्यांचा सुळसुळाट, महायुद्धानंतर निर्माण झालेले एकंदर अस्थिर वातावरण, आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या ऐकू येणाऱ्या अस्पष्ट बातम्या आणि असहकारितेसारखी सर्व देशात आंदोलन करणारी प्रचंड राजकीय चळवळ यामुळे राजकीय क्षेत्रात धाडसाने उड्या घेणाऱ्या तरुणांची मने क्रांतिवादाचा स्वीकार करण्यास अनुकूल झाली होती. अशाच काही मनांनी कम्युनिझमचा स्वीकार केला आणि गांधीतत्त्वाने हिंदुस्थानचा तरणोपाय लागणार नाही असा आपल्या मनाशी कयास बांधला. गांधीवाद आणि मार्क्सवाद यांच्यात त्यांना पदोपदी विरोध दिसू लागला आणि गांधीवादाचे उच्चाटन झाल्याखेरीज अगर केल्याखेरीज आपणास अभिप्रेत असणारा मार्क्सवाद राष्ट्रात फैलावणार नाही असा त्यांच्या बुद्धीचा ठाम ग्रह झाला. गांधीवाद हा आध्यात्मिक भूमिकेवर उभारला आहे तर मार्क्सवाद हा भौतिक भूमिकेवर उभारला आहे. गांधीवाद राष्ट्राच्या नावावर सर्वांना एक म्हणतो तर मार्क्सवाद वर्गयुद्धाची जाणीव करून देऊन राष्ट्रीय ऐक्याच्या नावाने होणारी गरीबांची व शेतकरी कामकऱ्यांची नागवणूक लोकांपुढे मांडतो. गांधीवाद अहिंसा तत्त्वावर उभारला आहे. तर मार्क्सवादाला अहिंसावाद म्हणजे अव्यवहार्य शरणागती अथवा हताशवाद वाटतो. गांधीवाद यांत्रिक उत्पादनाला विरोध करतो तर मार्क्सवाद यांत्रिक उत्पादनानेच मनुष्याचा उद्धार होईल असे मानतो. गांधीवाद प्रतिपक्षाच्या अंतःकरणाचे परिवर्तन घडवून आणू म्हणतो व म्हणून प्रतिपक्षाच्या आहारी जातो, तर मार्क्सवाद प्रतिपक्षाला नामशेष करू इच्छितो. गांधीवादाने सामाजिक वर्गभेदाना मान्यता दिली असून श्रीमंतांनी आपल्या संपत्तीला राष्ट्रीय न्यास समजून वागावे असे म्हणतो तर मार्क्सवाद हा न्यास राष्ट्राने आपल्या हाती घ्यावा असे क्रांतिकारक तत्त्व प्रतिपादितो. वर्गभेद नष्ट करून एक वर्ग बनविणे हे मार्क्सचे ध्येय तर अनेक वर्ग कायम ठेवून त्यांना परस्परांशी प्रेमाने वागण्याचा उपदेश करणे हे गांधींचे ध्येय. अशा प्रकारे कम्युनिस्ट पक्षाने गांधीतत्त्वावर चोहोबाजूने हल्ला चालविला आणि प्रथमतः राष्ट्रीय सभेत व नंतर कामगार संघपरिषदेत आपले बहुमत करण्याचा प्रयत्न चालू ठेवला. १९२७-२८ पर्यंत या पक्षाला कामगार संघटनेत बरेच यश आले आणि हिंदुस्थानातील सर्व कामगार चळवळ या पक्षाच्या हातीच जाते की काय असे वाटू लागले.

१९२२ सालानंतर १९२७ सालापर्यंत राष्ट्रीय चळवळीला ओहोटी आली होती. या काळात गांधीतत्त्वाला लोकांत बरीच अप्रियता प्राप्त झाली होती आणि स्वराज्यपक्ष हाही नेमस्तांच्या सनदशीर मार्गावर चालला होता. या काळात हिंदुस्थानात कम्युनिझमच्या

तत्त्वांचा बराच फैलाव झाला आणि खुद्द राष्ट्रीय सभेतच एक समाजवादी विचारसरणी दिसू लागली. गांधीजींचा असहकार आणि स्वराज्यपक्षाची कौंसिलातील अडवणूक या दोन्ही चळवळी फोल असून आगामी महायुद्धात हिंदुस्थानने समाजसत्ताक क्रांतीची तयारी केली पाहिजे अशी भाषा ऐकू येऊ लागली. लॉर्ड बर्कनहेड यांनी सायमन कमिशन नेमून या असंतोषाच्या आगीत तेलच ओतले आणि साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे ध्येय बदलून पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय पुकारण्याचा विचार पं. जवाहरलाल नेहरू यांनी कायम केला होता. १९२७च्या राष्ट्रीय सभेस पं. जवाहरलाल नेहरू आले ते युरोपात बरेच हिंडून आले होते. या काळात ते समाजवादी बनले होते आणि साम्राज्यविरोधी संघ (Anti-Imperialist League) नावाची जी संस्था नुकतीच अस्तित्वात आली होती, तिच्याशी राष्ट्रीय सभेचा संबंध जोडावा, या मताचे ते बनले होते. १९२७ च्या मद्रासच्या राष्ट्रीय सभेतील ठरावांवर या विचारसरणीची बरीच छाप पडली होती. (१) पूर्ण स्वातंत्र्य हेच हिंदी राष्ट्राचे ध्येय आहे, असा ठराव करण्यात आला. (२) राष्ट्रीय सभेने साम्राज्यविरोधी संघाला आपली संस्था जोडून घ्यावी असे ठरविण्यात आले. (३) भावी साम्राज्यशाही युद्धात राष्ट्रीय सभेने सरकारशी सहकार्य करू नये असे ठरविण्यात आले. या सर्व धोरणात समाजवादी विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. यानंतर १९२८ साली सायमन कमिशनच्या बहिष्काराची चळवळ झाली आणि ठिकठिकाणी स्वातंत्र्यसंघ व युवकसंघ स्थापन होऊन समाजवादी ध्येयांचा उघड पुरस्कार सुरू झाला, पण याच वेळी बार्डोलीच्या सारावाढीविरुद्ध सरदार वल्लभभाई यांनी सुरू केलेली सारावंदीची चळवळ यशस्वी झाली व लोकांचे चित्त पुनः सत्याग्रहाकडे वेधून घेतले गेले. याच वर्षी मीरत खटला होऊन कम्युनिस्टांवर धाड आली आणि आपापसांतील तंट्यामुळे कामगारसंघ परिषद दुभंगली गेली. ट्रेड डिस्प्यूट ॲक्ट आणि पब्लिक सेफ्टी ॲक्ट यांसारखे कायदे होऊन कामगारचळवळींचा बंदोबस्त करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. या धोरणामुळे पुढे काही काळ कम्युनिस्ट चळवळ मंदावली व याच सुमारास राष्ट्रीय चळवळ अधिकाधिक जोरात येऊ लागली. १९२९ साली डिसेंबर अखेर स्वातंत्र्याचे सत्याग्रह युद्ध सुरू होणार असे जाहीर झाले. या वर्षी राष्ट्रीय सभेतील पुढारी पं. जवाहरलाल नेहरू आणि बाबू सुभाषचंद्र हे कामगार संघटनेत शिरले आणि तिचा राष्ट्रीय सभेशी अधिक निकट संबंध आणण्याचा प्रयत्न करताना दिसू लागले. हे दोघेही कम्युनिस्ट नव्हते आणि कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय संस्थेशी हिंदी कामगार संघटनेचा संबंध जोडू नये या मताचेच ते आहेत. १९२९ साली नागपूर येथे भरलेल्या कामगार संघ परिषदेत मला कम्युनिस्टांचे ध्येय मान्य असले तरी त्यांचे मार्ग मला पसंत नाहीत असे पं. जवाहरलाल नेहरू यांनी अध्यक्ष या नात्याने जाहीरपणे सांगितले. इतकेच नव्हे तर चीन वगैरे देशात कम्युनिस्टांना अपयश येण्याचे कारण त्यांचे चुकीचे धोरणच होय असेही त्यांनी सांगितले. त्या वर्षी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष तेच होते व त्यांच्याच अध्यक्षत्वाखाली १९३० सालचा सत्याग्रहसंग्राम सुरू व्हावयाचा होता.

या संग्रामाचे सेनानीत्व म. गांधी यांच्याकडेच जाणार होते. तथापि त्यात जे नवे तरुण सामील होणार होते ते युवक संघ, स्वातंत्र्य संघ वगैरे समाजवादी विचारसरणीने भारलेले अथवा प्रेरित झालेले तरुणच सामील होणार होते. त्यांना गांधीवादाहून मार्क्सवादच प्रिय होता, परंतु गांधीवादापैकी सत्याग्रहाचे लढाऊ धोरण त्यांना आकर्षक वाटत होते. सशस्त्र क्रांतीचे धोरण अव्यवहार्य आहे हेही त्यांना दिसत होते आणि पारतंत्र्यातील राजकारणात प्रथम तरी वर्गयुद्धाच्या भावनेपेक्षा स्वातंत्र्ययुद्धाची भावनाच अधिक प्रभावी असणार असे त्यांना अस्पष्ट रूपाने भासत होते. गांधींनी जेव्हा स्वातंत्र्यसंग्राम सुरू केला तेव्हा अर्थात त्याचे ठिकठिकाणचे नेतृत्व गांधींजींच्या राजकारणात आणि विधायक कार्यक्रमात दहावारा वर्षे मुरलेल्या लोकांकडेच गेले. गांधीजींच्या पाठीमागे एक प्रचंड संघटना आणि प्रांतिक व स्थानिक कार्यकर्त्यांचे—आजन्म सेवकांचे—जाळे होते. तसे अर्थातच या विद्यार्थीदशा तरुण समाजवाद्यांच्या मागे नव्हते. शिवाय ज्या तरुण विद्यार्थीवर्गात युवकसंघाची चळवळ झाली होती त्यातीलही फारच थोडे या स्वातंत्र्ययुद्धात सामील झाले. पण जे सामील झाले ते सर्व समाजवादी होते आणि दोन-तीन वर्षांच्या तुरुंगांच्या वातावरणातही या तरुण समाजवाद्यांनी बऱ्याच तरुणांची मने आपल्या विचारसरणीस अनुकूल करून घेतली. संयुक्त प्रांतांतील काँग्रेस कार्यकर्त्यांत पं. जवाहरलाल होते व आहेत आणि १९३२ साली तेथे जी किसानांची चळवळ झाली, तीत प्रत्यक्ष कम्युनिस्ट असेही काही लोक होते. आजही राष्ट्रीय सभेतील कार्यकर्त्यांत या प्रांतातच समाजवाद्यांची संख्या अधिक आहे. कराची काँग्रेसमध्ये नागरिक हक्कांचा जो एक एकवीस कलमी ठराव झाला आहे, त्यात (१) राष्ट्रीय जीवनास आधारभूत असे धंदे राष्ट्रीय मालकीचे करणे. (२) कामगारांना जीवनक्षम वेतन, मर्यादित कामाचे तास, बेकारभत्ता, पगारी रजा वगैरे हक्क मिळवून देणे. (३) सरकार देण्याप्रमाणेच जमिनीच्या मालकाच्या देण्याचा भारही शेतकऱ्यावर कमी करून घेणे. (४) सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका करून घेणे, वगैरे समाजवादी तत्त्वे मान्य करण्यात आली आणि वर्गकलहाच्या तत्त्वाला अंशतः मान्यता मिळाली असे समाजवादी पक्षास वाटते.

## काँग्रेस सोशलिस्ट पक्ष

यानंतर १९३२ साली झालेली दोन वर्षांची शिक्षा भोगून पं. जवाहरलाल १९३४ साली बाहेर आले तेव्हा त्यांनी गेल्या लढ्यात जमीनदार वर्ग उघडपणे सरकार पक्षास मिळाला तेव्हा आता राष्ट्रीय लढ्याला वर्गयुद्धाचे स्वरूप देण्याचे काम करण्यासाठी एक समाजवादी गट संघटित झाल्यास तो मला हवाच आहे असे एक पत्र मुंबईचे मि. मसानी यांना दिले. या पत्राच्या आधारेच काँग्रेस सोशॅलिस्ट पक्ष स्थापन झाला. या पक्षात सत्याग्रह युद्धात सामील झालेलेच बरेचसे लोक आहेत. प्रत्यक्ष कम्युनिस्ट पक्षात आज दोन तट पडले आहेत. एक रशियातील स्टॅलिनचे अनुयायी किंवा थर्ड इन्टरनॅशनल ही संस्था

जे धोरण ठरवील त्याप्रमाणे वागणारे आणि दुसरे रॉयचे अनुयायी. थर्ड इन्टरनॅशनलचे अनुयायी हे राष्ट्रीय सभेपासून दूर राहूनच आपले तत्त्वज्ञान फैलावू इच्छितात व वर्ग-युद्धाच्या ज्वाला पेटतील तितक्या पेटवीत राहाव्या म्हणजे केव्हा तरी आपणास यश येईल, या मतांचे आहेत. यांचा राष्ट्रीय सभेला अत्यंत तीव्र विरोध आहे व अर्थात गांधीतत्त्वाला तर त्याहूनही अधिक विरोध आहे.

रॉयगटातील लोक राष्ट्रीय सभा हस्तगत करू इच्छितात व ते आज कॉंग्रेस सोशॅलिस्ट पक्षात शिरले आहेत. जमिनी व कारखाने सरकारी मालकीचे करणे आणि त्यासाठी वर्गयुद्धावरच भर देणे हे मत त्यांना मान्य असले तरी आज ते थोडे मागे ठेवून निर्भेळ स्वातंत्र्यवाद, साम्राज्यविरोधी धोरण व महायुद्धाला सक्रिय विरोध अशा जहाल स्वातंत्र्य-वाद्यांना आकर्षक वाटणाऱ्या मुद्यावरच भर आज द्यावा आणि राष्ट्रीय सभा हस्तगत करावी म्हणजे इतर वर्ग तीतून आपोआप निघून जातील व तीच सभा वर्गसंस्था आणि क्रांतिकारक बनेल असे त्यांचे धोरण आहे. यासाठी आपणास सोशॅलिस्ट म्हणवून न घेणारे पण साम्राज्याशी कोणतीही तडजोड न करणारे असे जे जे जहाल लोक असतील त्या सर्वांना आपल्या पक्षात सामील करून घ्यावे व गांधीपक्षाचा पाडाव प्रथम करावा असे म्हणणारा हा गट आहे. ही विचारसरणी अद्यापि सर्व कॉंग्रेस सोशॅलिस्टांना पसंत पडत नाही. पं. जवाहरलाल यांनाही ते धोरण पसंत पडेल असे वाटत नाही. पंडितजींवर महात्मा गांधी यांची फार छाप असून त्यांचे नेतृत्व नष्ट करण्यास ते आपणास उपयोगी पडणार नाहीत असे काहींचे मत आहे. आज सर्वच समाजवादी पक्षाने आपले वैशिष्ट्य-निदर्शक असे दोन ठराव ठरविले आहेत. (१) आगामी युद्धात सरकारला विरोध. (२) आगामी घटनेखाली मंत्रिपदावर बहिष्कार. यांपैकी पहिल्यासंबंधी राष्ट्रीय सभेत फार मतभेद होईल असे वाटत नाही आणि १९२७ च्या लखनौच्या राष्ट्रीय सभेत युद्धविरोधी ठरावाचा पुनरुच्चार तरी होईल याबद्दल मला शंका नाही. पण मंत्रिपदासंबंधी मात्र तीव्र मतभेद होतील. घटना फेटाळण्याच्या दृष्टीनेही मंत्रिपदाचा स्वीकार करणे हेच इष्ट आहे, असे म्हणणारे पुष्कळ लोक निघतील असे वाटते. तथापि या प्रश्नाचा कसाही निकाल लागला, तरी तेवढ्याने राष्ट्रीय सभा समाजवादी बनली असे कोणास म्हणता येणार नाही.

राष्ट्रीय सभा आज एकदम समाजवादी बनू शकत नाही हे पं. जवाहरलाल यांनीच नव्हे तर कम्युनिस्टातील रॉय गटानेही ओळखिले आहे. आजच्या आपल्या लढ्यात अधिकृत सत्तेशी झगडणे हेच तत्त्व अग्रभागी राहणार यात शंका नाही. प्रथमपासून वर्ग-युद्धाचे तत्त्व अग्रभागी ठेवून राज्यक्रांती झाल्याचे उदाहरण अद्यापि इतिहासात घडलेले नाही. रशियातसुद्धा वर्गयुद्धाने क्रांती झाली नाही. तेथे प्रथम लोकशाहीसाठी झालेल्या क्रांतीला तेथील कम्युनिस्ट पक्षाने समाजसत्ताक क्रांतीचे स्वरूप दिले. पण यानंतर या विजयामुळे विशेष उत्साह वाटून कम्युनिस्ट पक्षाने अनेक देशात प्रथमपासूनच

वर्गयुद्धाच्या धोरणावर क्रांती घडवून आणण्याचे आणि आपल्या राजकारणात राष्ट्रीय भावना, वर्णभावना यांचा किती अडथळा येणार आहे इकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण आखले. याचा परिणाम सर्वत्र कम्युनिस्टांविरुद्ध मध्यम वर्ग व वरिष्ठ वर्ग यांची एकी झाली व त्यांनी शेतकरीवर्गाला राष्ट्रीय भावनेवर झुलवून आपल्या पक्षास फोडून घेतले. यामुळे केवळ औद्योगिक क्षेत्रातील गिरणीकामगाराखेरीज समाजातील सर्व वर्ग कम्युनिस्टविरोधी बनून तो फॅसिस्ट किंवा नाझी झाला आणि नाझी तत्त्वज्ञान व फॅसिस्ट तत्त्वज्ञान विजयी होऊ लागले व लोकसत्ता व नागरिक हक्क यांचीही इतिश्री करण्यात आली. यापासून समाजवादी पक्षाने धडा घेतला पाहिजे आणि राष्ट्रीय भावना, धर्मभावना व वर्णभावना यांची शक्ती ओळखिली पाहिजे. तसेच प्रत्येक ठिकाणी वर्गयुद्धाचे धोरण पुढे करण्याचे सोडून दिले पाहिजे. समाजातील मध्यम वर्ग आणि शेतकरी वर्ग यांना आपली मते पटवून देण्याचे धोरण थोडे बदलले पाहिजे. केवळ शेतकरी–कामकरी वर्ग मोठा आहे, त्याच्या हाती सर्व धनोत्पादनाची साधने आहेत व तो ती खाजगी व्यक्तींपासून हिसकावून घेईल व त्यास विरोध करणारास नामशेष करील अशा धमक्या देऊन समाजवादाचा फैलाव होणार नाही, हे तत्त्वज्ञान खरोखरच समाजाला तारक आणि न्यायाधिष्ठित आहे असे लोकांना पटले पाहिजे. हे पटविण्यास ते अपरिहार्य आहे एवढे सांगून चालणार नाही. तर ते न्याय्य आहे असे सिद्ध केले पाहिजे. मात्र ही न्याय्यता सिद्ध करण्यासही केवळ बुद्धिवादाचे बल उपयोगी पडणार नाही, अगर केवळ दहशतही उपयोगी पडणार नाही. तर या तत्त्वज्ञानासाठी त्याची दीक्षा घेतलेले लोक लोकसेवेसाठी मरून जाण्यास तयार आहेत हे दृश्य लोकांना दिसले पाहिजे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे याचा फैलाव करणारांनी सत्याग्रही वृत्ती धारण केली पाहिजे असे माझे मत आहे. प्रत्येक देशात रशियन क्रांतीची पुनरावृत्ती न होता, समाजवाद हा निरनिराळ्या मार्गांनी निरनिराळ्या देशांत येईल हे तत्त्व गृहीत धरून हिंदुस्थानात तो सत्याग्रही वृत्तीतूनच जन्मास येईल असे मी म्हणतो. या विजयाची अधिक चर्चा मी करीत नाही, तरी हिंदुस्थानात आज गांधीवाद अगर मार्क्सवाद यांच्यात जो विचारांचा झगडा चालू आहे त्यात एकाचाच दुसऱ्यावर पूर्ण विजय होणार नाही तर या दोन्ही तत्त्वज्ञानांचा समन्वय करणारे एक नवे तत्त्वज्ञान निघेल व त्याच्या जोरावरच हिंदुस्थानात समाजवाद फैलावेल असे मला वाटते. गांधीवाद आणि मार्क्सवाद हे दोन्ही अगदी निर्भेळ स्वरूपात हिंदुस्थानचे अंतःकरण जिंकू शकत नाहीत हे मला वाटते आताच सिद्ध झाले आहे आणि या गोष्टीची जाणीव ज्या मानाने दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांना अधिकाधिक होत जाईल त्या मानाने हिंदी समाजवाद फोफावत जाईल आणि हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याला समाजवादी स्वरूप आणि समाजवादाला आध्यात्मिक स्वरूप येत जाईल......

[*चित्रमय जगत्*, *डिसेंबर* १९३९, पृ. ९६३–९६९]

६

# [ भारतातील ] राष्ट्रवाद आणि समाजवाद

[ "राष्ट्रवाद आणि समाजवाद – उगमाचा शोध" या शीर्षकाच्या लेखातील काही भाग खाली दिला आहे. लेखाच्या प्रारंभी युरोपच्या ऐतिहासिक संदर्भात राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या तत्त्वांचा उदय कसा झाला त्याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे एकोणिसाव्या शतकात भारतातील राजकारण्यांची पहिली पिढी सुधारणा विचारांवर जास्त भर देणारी होती याचा उल्लेख आहे. हा भाग येथे वगळला आहे. भारतातील राष्ट्रीय चळवळीत समाजवादाचे स्थान काय असावे याची आचार्यांनी केलेली चर्चा खाली उद्धृत केली आहे. ]

हिंदी राष्ट्रवाद लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली अदमासे १८९५ च्या सुमारास महाराष्ट्रात शिवजयंतीच्या रूपाने जन्माला आला असे म्हणण्यास हरकत नाही. या वेळेपासून १९२० साली लोकमान्यांचे निधन होईपर्यंत पंचवीस वर्षांचा काळ गेला. या काळात हा राष्ट्रवाद अधिकाधिक समतावादी व लोकसत्तावादी झालेला दिसून येतो आणि त्यानंतर आतापर्यंत आणखी जी पंधरा–सतरा वर्षे झाली त्या काळात तर सामाजिक समता व लोकसत्ता या तत्त्वांवरील हिंदी राष्ट्रवादाची श्रद्धा अधिकाधिक वाढलेलीच दिसून येईल. आज तर लोकसत्तेचा सिद्धांत हिंदी राष्ट्रवादाचा आधारभूत सिद्धांतच गणला जात आहे. मात्र हिंदी राजकारणात लोकसत्तेच्या सिद्धांताला जी ही सर्वमान्यता मिळालेली आहे, ती युरोपखंडाप्रमाणे राजसत्ता चांगली की लोकसत्ता चांगली या मुद्यावर वाद होऊन मिळालेली नाही तर हिंदुस्थानला स्वराज्य उपभोगावयाचे असेल तर ते आजच्या परिस्थितीत लोकसत्ताकच असू शकेल या खात्रीमुळेच मिळालेली आहे. राष्ट्रवादी हा स्वातंत्र्यासाठी भुकेलेला असतो, ते स्वातंत्र्य अमुकच प्रकारचे असावे असा त्याचा आग्रह नसतो. याचा अर्थ ते कसे असावे याबद्दल त्यांचे स्वतःचे काही मत नसते असा नाही, तर त्या मताबद्दल तो आग्रह धरीत नाही. कोणत्या प्रकारचे स्वातंत्र्य असावे, त्यात सामाजिक व आर्थिक समतेला अथवा व्यक्तिस्वातंत्र्याला व समाजसत्तेला किती व कोठे स्थान असावे, हे सर्व प्रश्न त्याला स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे म्हणजे प्रचलित राजकारणाच्या दृष्टीने गौण

वाटतात. याचा अर्थ राष्ट्रवादी हा सामाजिक व आर्थिक समतेचा किंवा लोकसत्ता व समाजसत्ता याचा विरोधी असतो, असा काही लोक करतात आणि ज्या देशात राष्ट्रवादाच्या परिपोषास सामाजिक व आर्थिक समता, लोकसत्ता व समाजसत्ता या ध्येयाची आवश्यकता नसते किंबहुना त्याचा तात्कालिक अडथळाही वाटतो, त्या देशात राष्ट्रवाद या सर्व ध्येयांना काही काळ तरी विरोधी बनतो यात शंका नाही. इटली, जर्मनी व जपान या देशांच्या गेल्या तीस–चाळीस वर्षांच्या इतिहासावरून हेच सिद्ध होते. पण हिंदी राष्ट्रवादाचा याच काळातील इतिहास पाहिल्यास तो गेल्या तीस-चाळीस वर्षांत सामाजिक समतेचा व लोकसत्तेचा अधिकाधिक पुरस्कर्ता बनला असून आज त्याचा विकास समाजसत्तेच्या दिशेने होत आहे असे दिसेल.

समाजवादी पुढारी जर लोकसत्तेला विरोधी वृत्ती सोडून देतील आणि आपणास अभिप्रेत असणारा समाजवाद हा आपण लोकसत्ताक मार्गानेच आणणार आणि रशियाप्रमाणे अनियंत्रित कामगारशाही स्थापण्याचा प्रयत्न करणार नाही, असे पं. जवाहरलाल नेहरूंप्रमाणे एकमुखाने जाहीर करतील, तर आमच्या मते हिंदी राष्ट्रवाद फारच थोड्या काळात समाजवादी बनेल आणि आज ज्याप्रमाणे आपले स्वराज्य हे लोकसत्ताकच असले पाहिजे व असणार असे आज सर्व राष्ट्रवादी अभिमानाने सांगत आहेत, त्याचप्रमाणे ते आमचे भावी स्वराज्य समाजसत्ताक लोकशाही ( Socialistic Republic) स्वरूपाचे असावे असे उद्या म्हणू लागतील. गेल्या तीस–चाळीस वर्षांतील हिंदी राष्ट्रवादाच्या इतिहासावरून हिंदी राष्ट्राची आजची परिस्थिती लोकसत्ताविरोधी राष्ट्रवादाच्या परिपोषास अनुकूल नसून लोकसत्तावादी राष्ट्रवादास अनुकूल आहे असे सिद्ध झाले आहे. याच इतिहासाच्या पायावर भावी हिंदी राजकारणाची इमारत उठवावयाची असेल तर येथील लोकसत्ताक राष्ट्रवादाला लवकरच समाजसत्ताक स्वरूप प्राप्त होईल आणि हिंदुस्थानात राष्ट्रवाद, लोकसत्ता व समाजसत्ता यांचा सुंदर समन्वय झाल्याचे दिसून येईल.

हिंदुस्थानच्या ज्या राजकीय परिस्थितीमुळे येथील राष्ट्रवाद अधिकाधिक लोकसत्तावादी बनला व तो पुढे समाजवादी बनेल असे आम्हास वाटते त्या परिस्थितीचा आता थोडा विचार करू. लोकसत्तेचे ध्येय सरंजामदार वर्गाशी मध्यम व्यापारी वर्गाचा जो कलह झाला त्यातून निर्माण झाले असून त्याची तत्त्वे सरंजामदार व वतनदार वर्गाच्या स्वार्थाला मारक आहेत. या वर्गाने हिंदी स्वराज्याच्या लढ्याचे नेतृत्व स्वीकारले असते व दिवसेंदिवस तो वर्ग लढ्यात अधिकाधिक गोवला गेला असता, तर या लढ्याला लोकसत्ताक स्वरूप प्राप्त झाले नसते. १८५७ साली जर हिंदुस्थान स्वतंत्र झाला असता तर त्या वेळचे स्वराज्य लोकसत्ताक न बनता अनियंत्रित राजसत्ताक बनले असते. पण या वेळी या वर्गाने वर्गदृष्ट्या या लढ्यात भाग घेतला नाही. पुढे सनदशीर राजकारणाशी या वर्गाने काही काळ आपला संबंध ठेवला पण ते राजकारणही तापू लागले तसतसा हा वर्ग त्यातून

बाहेर पडला व आपण स्वराज्य स्थापनेच्या कार्यास अपात्र आहो असे त्याने सिद्ध केले. त्यानंतर मध्यमवर्गाचे राजकारण सुरू झाले. या मध्यम वर्गापैकी जो वर्ग कारखानदार बनला त्याने काही काळ हिंदी राजकारणाशी आपला संबंध ठेवला. तरी तोही वर्ग आज या लढ्यातून आपले अंग काढून घेत असून हिंदी राष्ट्रसभेची चळवळ निर्धन शेतकरीवर्ग आणि कनिष्ठ मध्यमवर्ग यांच्या आधारावरच पोसत व फैलावत आहे.

अद्यापि कामकरीवर्ग तिच्यात मनोभावे सामील झालेला नसून त्याचे नेतृत्व करू इच्छिणाऱ्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या डोक्यात रशियातील कामगारशाहीचे ध्येय वावरत आहे. कामगारशाहीचा सिद्धांत हा समाजवादाचा एकमेव आधारभूत सिद्धांत नसून समाजसत्ता व लोकसत्ता यांच्यातील विरोधही खरा व नित्याचा नाही याची जाणीव ठेवून, कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी हिंदुस्थानातील लोकसत्ताक राष्ट्रवादाशी सहकार्य केले पाहिजे आणि हिंदी राष्ट्रवाद्यांनी समाजसत्ता हा लोकसत्तेचा अपरिहार्य परिणाम आहे याची जाणीव ठेवून, युरोपचे अंधानुकरण करून समाजसत्तेच्या भीतीने लोकसत्तेलाही लाथाडण्याची वृत्ती न धारण करता लोकसत्तेच्या अनुषंगाने येणाऱ्या समाजवादास संतोषाने स्वीकारू अशी वृत्ती धारण केली पाहिजे. हिंदुस्थान एका राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात सापडला असल्याने त्याच्यात उदयास येणारा समाजवाद, वर्गयुद्ध आणि कामगारशाही या स्वरूपाने येणार नसून तो राष्ट्रवाद व लोकसत्ता यांच्या पावलावर पाऊल टाकून येणार आहे हे समाजवादी पुढाऱ्यांनी ओळखावे हाच भाई रॉय यांचा समाजवादी पुढाऱ्यांना उपदेश आहे असे आम्हास वाटते व तितक्यापुरता तो बरोबरच आहे. पण त्यावरून समाजसत्ताक लोकशाहीच्या आपल्या ध्येयाचा आज कोणी उघड पुरस्कारच करू नये असा जो काही लोक निष्कर्ष काढतात किंवा समाजवादी पक्ष उघडपणे कार्यच करू शकणार नाही, हा जो दुसरा सिद्धांत ऐकू येतो तो आमच्या मते बरोबर नाही. राष्ट्रवादाच्या परिपोषास वर्गयुद्ध मारक आहे आणि जित राष्ट्रात राष्ट्रवाद हीच क्रांतिकारक राजकीय शक्ती असणार हे मान्य करूनही समाजवादाच्या उघड पुरस्कारानेच सशस्त्र वर्गयुद्ध टळेल आणि वर्गकलहाला शांततावादी क्रांतीचे स्वरूप प्राप्त होऊ शकेल, असे आम्हास वाटते.

तात्पर्य, हिंदी राष्ट्रवाद हा समाजवादी बनणार, पण तो सशस्त्र वर्गयुद्धाच्या रूपाने बनणार नसून वर्गकलहाला निःशस्त्र प्रतिकाराचे स्वरूप देऊन हिंदी राष्ट्रवादाला समाजवादी स्वरूप प्राप्त होऊ शकेल असे आमचे मत आहे. आज समाजवादी पुढाऱ्यांनी औद्योगिक शहरात जो वर्गकलह सुरू केला आहे त्याला ते शांततावादी अथवा सत्याग्रही स्वरूप देतील तर तो दुर्धर्ष ठरेल आणि राष्ट्रसभेच्या राजकारणाला धनिकशाही वळण लागण्याची भीती नष्ट होऊन त्याचा स्वाभाविक विकास समाजवादी दिशेनेच होऊ लागेल. शांततावादी व सत्याग्रही समाजवादालाही राष्ट्रसभेतील काही लोकांचा तात्त्विक विरोध असला तरी त्याचे उल्लंघन करणे त्यांच्या शक्तीच्या बाहेरचे आहे हे सूक्ष्म विचाराअंती सर्वांना दिसू शकेल.

तात्पर्य समाजवादी पुढाऱ्यांनी आज समाजवादाचा अथवा वर्गकलहाच्या तत्त्वाचा सर्वस्वी त्याग न करता त्यांना शांततावादी निःशस्त्र क्रांतिवादी अथवा सत्याग्रही स्वरूप देऊन आपला पुढील मार्ग काढला पाहिजे. सत्याग्रह आणि वर्गकलह किंवा समाजवाद यांचा मूलभूतच विरोध आहे असा ओरडा अँग्लो-इंडियन पत्रकारांनी केला. गांधीशिष्य म्हणविणारांनी तसे प्रतिपादन केले, किंवा खुद्द म. गांधींनीही तसा निर्णय दिला, तरी तिकडे दुर्लक्ष करून आपले कार्य दृढ श्रद्धेने आणि नेटाने समाजवादी पुढाऱ्यांनी पुढे चालू ठेविले पाहिजे.

## वर्गयुद्धाची परिहार्यता

वर्गयुद्धात्मक समाजवादी क्रांतीचे ध्येय शेतकरी वर्ग आणि मध्यम वर्ग यांच्यात फैलावू शकत नाही असा अनुभव युरोपात आल्यामुळे आज तेथील समाजवादी पुढारी समाजसत्ता व लोकसत्ता यातील विरोध कमी करून मध्यमवर्ग, शेतकरी व कामकरी यांची एकजूट निर्माण करीत आहेत. स्पेनमध्ये या ध्येयाला बरेच यश आले होते. पण त्याविरुद्ध धनिक वर्गाने उघड बंड केले. पण हे मध्यमवर्ग, शेतकरी वर्ग व कामकरी वर्ग यांच्या एकजुटीचे धोरण हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशात अधिक यशस्वी होईल व त्याचे नेतृत्व लवकरच लोकसत्ताक समाजवादी पक्षाकडे येऊ शकेल, कारण येथील मध्यमवर्ग व शेतकरी वर्ग हे शंभर-सव्वाशे वर्षांच्या साम्राज्यशाही जुलमाने व पिळवणुकीने इतके निर्धन बनले आहेत की, त्यांना समाजवादी ध्येय पटण्यास फारसे प्रयास पडणार नाहीत. या दोनही वर्गांच्या पोटापाण्याचा प्रश्न समाजवादी उपायांचा त्वरित अवलंब केल्याखेरीज सुटणेच अशक्य झाले आहे. हिंदुस्थानातील या वर्गाची सुस्थिती तर नाहीच आणि दुसऱ्या देशांची पिळवणूक करणेही त्याला शक्य नाही, ही परिस्थिती ध्यानात घेतल्यास हिंदुस्थानात अनियंत्रित भांडवलशाहीची वाढ होणे अशक्य आहे, असे दिसून येईल. हिंदुस्थानची आजची आर्थिक परिस्थितीच अशी आहे की, येथील शेतकरी वर्ग आणि मध्यमवर्ग हे अगदी निर्धन झाले आहेत व त्यांची सुस्थिती करण्यास समाजवादच अवलंबावा लागणार आहे. युरोपातील शेतकरी संपन्न आणि स्वतंत्र असल्याने तेथील मध्यमवर्गाला साम्राज्यशाहीचा लाभ मिळत असल्याने काही काळ तरी समाजवादापासून दूर राहून आपले पोटापाण्याचे प्रश्न सुटू शकतील, असा भास त्यास होऊ शकतो. ही स्थिती हिंदी शेतकऱ्यांची व मध्यमवर्गाची नाही. त्यांचा जमिनीची मालकी किंवा कारखान्यातील भाग यांचा मोह फार प्रबळ नसून तो हळूहळू विलय पावत आहे. या सर्वांसच अपुऱ्या मजुरांची स्थिती प्राप्त होत असून जमिनी व कारखाने सार्वजनिक मालकीचे करण्यातच आपले खरे हित व खरा उद्धार आहे हे तत्त्व या वर्गाला पटण्यास फार काळ लागणार नाही. मात्र राष्ट्रवाद व लोकसत्तावाद यांची बीजे या वर्गाच्या अंतःकरणात खोल रुजली असल्याने कामगारवर्गाने वर्गयुद्धाचा व कामगारशाहीचा पुकारा केल्यास त्याच्या मागून जाण्यास हे वर्ग तयार होणार नाहीत. तसेच या वर्गाच्या विरोधाला न जुमानता केवळ कामकरी वर्ग

आपली अनियंत्रित सत्ता हिंदुस्थानात स्थापन करील ही गोष्ट अगदी असंभवनीय आहे. शिवाय हिंदुस्थान राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात गुंतला असता वर्गयुद्धाचे धोरण स्वीकारणे शक्य व इष्टही नाही.

हिंदुस्थानात वर्गयुद्धाचे तत्त्व रुजणार नाही असे आम्ही म्हणतो, याचा अपरिहार्य संबंध हिंदुस्थानच्या अध्यात्मवादाशी नाही हे येथे स्पष्ट करणे अवश्य आहे. अध्यात्मवादी व्यक्तीही समाजधारणेसाठी अपरिहार्य घनघोर संग्राम करू शकतात, किंबहुना कौरवपांडवांमधील कुलक्षयकारक कुलयुद्धही करू शकतात, मग वर्गयुद्धाचाच अध्यात्मवादाशी अपरिहार्य विरोध का असावा हे आम्हास समजत नाही. पण हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितीत वर्गयुद्ध अपरिहार्य आहे असे आम्हास वाटत नाही. या देशात दिवसानुदिवस अधिकाधिक प्रबळ होत जाणारा राष्ट्रवाद अधिकाधिक लोकसत्तावादी व समाजवादी बनत आहे. यामुळे वर्गयुद्ध परिहार्य आहे असेच आम्हास वाटते. हिंदुस्थानच्या अध्यात्म वृत्तीमुळे वर्गयुद्धाची परिहार्यता त्यास लवकर समजून त्याच्या परिहाराचे साधनही तो शोधून काढू शकेल इतकेच. तसेच या राष्ट्रवादाची पाळेमुळे निर्धन शेतकरी-कामकरी वर्गात खोल खोल जाऊ लागली असून या वर्गाचे नेतृत्व करणाऱ्या मध्यमवर्गालाही समाजवादाखेरीज आपला उद्धार होण्याची आशा आज उरलेली नाही. त्यातून सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या गेल्या पंधरा–वीस वर्षांतील फैलावामुळे येथील लोकसत्तावाद केवळ कायदेशीर व सनदशीर राजकारणाच्या पुढे गेला असून निःशस्त्र क्रांतीच्या तत्त्वाचा येथे फार मोठ्या प्रमाणावर फैलाव झाला आहे. लोकसत्तेला धनिकशाही स्वरूप येऊ न देण्याचे सामर्थ्य सत्याग्रही प्रत्यक्ष प्रतिकारात असून येथील लोकसत्तावादाचा आधार व्यक्तिवाद हा नसून राष्ट्रवाद हाच आहे. राष्ट्रवाद व समाजवाद या दोहोंच्या कचाटीत लोकसत्ता धरली असता तिची वाढ धनिकशाहीच्या दिशेने होणे अर्थात शक्य होणार नाही. ......

[*सह्याद्रि*, जानेवारी १९३८, पृ. ११ ते २४]

## ७

# शास्त्रीय समाजवाद

गेल्या एप्रिल महिन्यात (१९४२) इस्लामपुरातील शारदा मंडळापुढे शास्त्रीय समाजवादाच्या विषयावर तीन व्याख्याने मी दिली. ती आता लहानशा पुस्तकरूपाने प्रसिद्ध करीत आहे. ही व्याख्याने जशी दिली तशीच शब्दशः लिहिलेली नाहीत कारण ती मीच स्वतः लिहिलेली असली तरी मागाहून बऱ्याच दिवसांनी लिहून काढिली आहेत. समाजवादासंबंधी अनेक गैरसमज लोकांत प्रचलित आहेत ते दूर करावेत आणि त्याचे सर्वांगीण व्यापक शास्त्रीय स्वरूप लोकांपुढे अगदी थोडक्यात मांडावे हा या व्याख्यानांचा उद्देश होता. ही व्याख्याने देत असता बोलण्याच्या ओघात समाजवादासंबंधीचे अनेक गैरसमज जाता जाता खोडून काढिले पण तो भाग या लिखित व्याख्यानात त्या त्या ठिकाणी तसाच न देता तो सर्व एकत्र द्यावा, हा या प्रस्तावनेचा हेतू आहे.

समाजवादाचे अंतिम ध्येय मानवकुल हे एकत्र कुटुंब बनावे हे आहे. एकत्र कुटुंबात समाईक मालमत्तेचे तत्त्व हे मुख्य सूत्र असते. समाईक मालमत्तेचे तत्त्व उच्चारताच स्त्रियाही समाईक बनविणार काय असा प्रश्न विचारतात. पण हा प्रश्न विचारणारांच्या बुद्धीचे कोतेपणच त्यामुळे व्यक्त होत असते. कारण स्त्रिया ही मालमत्ता नव्हे, हे साधे तत्त्वही त्यांना समजत नाही. एकत्र कुटुंबात मालमत्ता समाईक असते, पण स्त्रिया समाईक नसतात हे निदान हिंदू लोकांना तरी समजून सांगण्याची गरज नसावी.

तसेच समाईक मालमत्ता म्हणजे काय? या प्रश्नाचाही उलगडा एकत्र कुटुंबाचा अनुभव असणाऱ्यांना सहज व्हावयास हवा. एकत्र कुटुंबात जमिनीसारखी उत्पादक संपत्ती समाईक मालकीची असते. तसेच एखादे मोठे घर, बागा, खेळण्याची मैदाने, अशा प्रकारची समाईकपणे उपभोगता येणारी काही उपभोग्य संपत्तीही समाईक असते. तथापि अगदी वैयक्तिक उपभोगाच्या वस्तू खाजगी समजल्या जातात. उदा. एकत्र

कुटुंब असले तरी अंगावरचे कपडे-लत्ते, बूट-जोडे या सर्व वस्तू वैयक्तिक मालकीच्याच समजल्या जातात. नित्याच्या वैयक्तिक उपभोगाच्या वस्तू लहानशा कुटुंबातही विभागून दिलेल्या असतात व एका मुलाचे खेळणेही आपण दुसऱ्या मुलास घेऊ देत नाही. अशा प्रकारची उपभोग्य संपत्ती समाईक समजावी असा समाजवादाचा उद्देश नाही. समाजसत्ताक अवस्थेतही वैयक्तिक उपभोगाची संपत्ती खाजगी राहील व ती त्याच्या संमतीविना दुसऱ्याने उपभोगणे हा गुन्हा होईल. तसेच जी समाजाची समाईक संपत्ती होईल, तिचाही उपभोग कसा, कोणी व केव्हा घ्यावा हे समाजामार्फत ठरविले जाईल व त्या नियमांनुसार तो उपभोग सर्वांना घेता येईल. समाजाची समाईक मालकी म्हणजे बेबंदशाही नव्हे. पण समाईक मालमत्ता म्हणजे मुख्यतः उत्पादक संपत्ती समाईक असा अर्थ धरिला जातो. जसे एकत्र कुटुंबात सर्व उत्पन्न समाईक समजतात व नंतर कुटुंबातील निरनिराळ्या व्यक्तींत त्यांच्या त्यांच्या गरजांनुसार विभागण्यात येते, त्याचप्रमाणे समाजातील सर्व उत्पन्नाची विभागणी निरनिराळ्या व्यक्तींच्या गरजांनुसार करावी असे समाजवादाचे ध्येय आहे. पण या तत्त्वानुसार सर्वांच्या योग्य गरजा भागविल्या जाण्यास समाजाचे उत्पन्न वाढविण्यास सर्वांनी कष्ट करावयास हवेत. म्हणून कोणीही प्रौढ सुदृढ व्यक्तीस बिनकष्टाने धनोपभोग घेता येऊ नये या तत्त्वावर समाजाची रचना झाली पाहिजे. बाल, वृद्ध व रुग्ण यांचे संवर्धन, संरक्षण व शुश्रुषा समाईक उत्पन्नापासून व्हावी. त्याचा भार केवळ एकाच कुटुंबावर पडू नये. स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनता येण्यासाठी धनार्जन करणाऱ्या स्त्रियांच्या संरक्षणाचे विशेष कायदे करावेत. काम करण्याच्या वेळी त्यांच्या मुलांचा सांभाळ करणे, त्यांना खेळविणे, त्यांना शिकविणे हे सर्व समाजामार्फत व्हावे. गृहकृत्यांचा भार कमी व्हावा, धनार्जनाच्या कामाचा भार त्यांना झेपेल असाच असावा, मुलांना घेण्यासाठी मधून मधून सुट्ट्या असाव्यात, बाळंतपणापूर्वी व नंतर भरपगारी रजा असावी असे अनेक कायदे करून स्त्रियांचे विशेष संरक्षण केल्याविना त्या आर्थिक स्वावलंबनाचा उपभोग घेऊ शकणार नाहीत. तसेच बाल, वृद्ध व रुग्ण या सर्वांची जबाबदारी समाईक संपत्तीतून पार पाडल्याखेरीज समाजात सुख व स्वास्थ्य नांदणार नाही. याचा अर्थ कुटुंबसंस्था नष्ट करावी असा नाही. समाजस्वास्थ्याला कुटुंबसंस्था अवश्य आहे पण प्रत्येक कुटुंबाने आपापला आर्थिक भार उचलावा ही आजची पद्धती योग्य नाही. शिक्षण, बालसंगोपन, रुग्णशुश्रुषा, वृद्धसेवा, अपघातनिवारण या सर्व बाबतीत समाईक खर्चाचे, सहकार्याचे व सामाजिक समतेचे तत्त्व अवलंबिण्यात आले पाहिजे. सर्वांच्या मुलांचे, वृद्धांचे व रुग्णांचे योग्य संगोपन, संवर्धन, शिक्षण व शुश्रुषा होतील अशी जबाबदारी सर्व समाजाने घेतली पाहिजे.

तसेच समाजातील संपत्तीचा उपभोग बिनकष्टाने कोणासही घेता येऊ नये म्हणून अकष्टार्जित धनाचे मार्ग कायद्याने बंद केले पाहिजेत. याचेच नाव एकवर्ग समाज. ऐतखाऊ मालकवर्ग आणि निर्धन मजूर वर्ग असा वर्गभेद नष्ट करून प्रत्येकाने आपल्या

शक्तीप्रमाणे समाजाची सेवा करावी आणि प्रत्येकास त्याच्या अथवा तिच्या गरजांप्रमाणे धनोपभोग मिळावा, हीच समाईक मालमत्तेच्या बुडाशी कल्पना आहे. एकत्र कुटुंबात ऐतखाऊ दादागिरी सुरू झाली म्हणजे कुटुंब मोडते व भांडणे होतात. त्याचप्रमाणे भांडवलशाही समाजात मालकी हक्कांवर बिनकष्टाने जगणारांची दादागिरी चालू आहे म्हणून या संस्कृतीत वर्गयुद्ध माजते. या वर्गयुद्धात कामगारवर्गाचा विजय झाल्याने ही मालकवर्गाची दादागिरी बंद पडेल तेव्हाच समाजात स्वास्थ्य नांदेल. म्हणून जमिनी, कारखाने वगैरे उत्पादक संपत्ती खासगी मालकीची न ठेवता समाईक सामाजिक मालकीची बनवावी, असा शास्त्रीय समाजवादाचा मुख्य सिद्धांत आहे. ही एक क्रांती आहे व ती होणे आज अपरिहार्य झाले आहे असे शास्त्रीय समाजवाद सांगतो. ही समाजसत्ताक क्रांती सशस्त्र रूपानेच होईल असे आज प्रायः गृहीत धरले जाते व "शास्त्रीय समाजवाद" या शब्दांनाही आज अर्थ प्राप्त झालेला आहे. माझा याबाबतीत मतभेद आहे तो थोडक्यात तिसऱ्या व्याख्यानाच्या अखेरीस मांडला आहे. याखेरीज सर्व विवेचन कार्ल मार्क्सच्या विचारांचा मला जो अर्थ समजला त्याप्रमाणे पण अगदी त्रोटकपणे केलेले आहे. मार्क्सच्या समाजवादाच्या सर्व इमारतीस स्वयंविकासी भौतिकवादाचा आधार आहे. हा आधार व इतिहासाची भौतिक मीमांसा पहिल्या व्याख्यानात विशद केले आहेत. हा विषय फारच सूक्ष्म आणि तात्त्विक असल्याने तो बराच दुर्बोध झाला आहे. तो भारतीय तत्त्वज्ञानाच्या शब्दात विशद करण्याचा यत्न केल्याने काहींना अधिक दुर्बोध पण पुष्कळांना अधिक सुबोध होईल अशी अपेक्षा आहे. या विषयासंबंधीचे माझे स्वतःचे तात्त्विक निर्णय मी माझ्या 'आधुनिक भारत' या ग्रंथात अधिक सविस्तर मांडले आहेत. या सर्व विचारांची आध्यात्मिक दृष्टीने अथवा वेदान्ताच्या दृष्टीने मांडणी अधिक योग्य प्रकारे होऊ शकेल अशी माझी कल्पना आहे. माझे यासंबंधीचे विचार बरेचसे निश्चित झाले आहेत आणि अध्यात्म, समाजधारणा व धर्म या दृष्टींनी विचार करून भारतात आध्यात्मिक समाजवाद निर्माण होईल अशी माझी अपेक्षा आहे. युरोपातील अध्यात्मवादाची आज एका भांडवलप्रधान राष्ट्रीय लष्करशाहीशी सांगड घालण्यात आली आहे. ही कशी विकृत आहे व युरोपातील "राष्ट्रीय समाजवाद" हा खरा राष्ट्रवाद अथवा खरा समाजवादही कसा नव्हे याचे दिग्दर्शन दुसऱ्या व तिसऱ्या व्याख्यानात अनुषंगाने केले आहे. या प्रतिपादनात माझी वैयक्तिक मते व ज्यास आज शास्त्रीय समाजवाद म्हणतात त्याचे सिद्धांत यातील भेद शक्य तो स्पष्ट केला आहे. तरीही धर्म ही एक अफूची गोळी आहे हे भौतिकवादी समाजवादाचे मत माझ्यावर लादण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला आहे. त्याचे स्पष्ट निराकरण करून ही प्रस्तावना संपवावयाची आहे. ज्यांनी माझ्यावर हा आरोप गैरसमजाने केला आहे त्यांचे समाधान मी करू शकेन. ज्यांनी बुद्धिपुरस्सर माझ्यावर खोटा आरोप केला असेल त्यांचे समाधान करण्याची आवश्यकताच नाही. मी स्वतः अध्यात्मवादी असून माझी सामान्य तात्त्विक भूमिका अद्वैतवादी आहे. मात्र

मायावाद हा अद्वैतवादाचा अंतिम सिद्धांत आहे व वेदान्त हा निवृत्तीपरच आहे हे मत मला पसंत नाही. वेदान्ताला प्रवृत्तीपर स्वरूप आहे व प्रवृत्तीपर वेदान्त व समाजवाद यांचा समन्वय होतो असे माझे मत आहे. वेदान्ताला प्रवृत्तीपर स्वरूप देण्याचा प्रयत्न स्वामी विवेकानंद, लो. टिळक, योगी अरविंद घोष प्रभृती भारतीय राष्ट्रवाद्यांनी केला आहे. यांच्याच विचारांच्या आधारावर भारतात आध्यात्मिक राष्ट्रवाद निर्माण झाला असून म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांच्या प्रयत्नांनी या आध्यात्मिक राष्ट्रवादाचे सत्याग्रही समाजवादात रूपांतर होत आहे. हा सत्याग्रही समाजवाद हाच पुढे आध्यात्मिक भूमिकेचा शास्त्रीय समाजवाद म्हणून गणला जाईल असे माझे मत या व्याख्यानमालेतील अखेरच्या पुष्पात स्पष्टपणे मांडिले आहे. अर्थात या शास्त्रीय समाजवादात "धर्म ही अफूची गोळी आहे" या सिद्धांताचा समावेश होऊ शकत नाही हे वेगळे सांगण्याची मुळीच आवश्यकता नाही.

## तत्त्वज्ञान आणि इतिहास - मीमांसा

शास्त्रीय समाजवाद या विषयावर तीन व्याख्याने देण्याचे मी मान्य केले आहे, त्यापैकी आजच्या व्याख्यानाचा विषय "तत्त्वज्ञान आणि इतिहास–मीमांसा" असा आहे. तत्त्वज्ञान या शब्दाने विश्वघटनेसंबंधीचे ज्ञान किंवा सिद्धांत असा अर्थ विवक्षित असतो. यालाच ब्रह्मज्ञान किंवा ब्रह्मविद्या असेही म्हणावयास हरकत नाही. विश्वाच्या आदिकारणास ब्रह्म असा शब्द आहे आणि विश्वाच्या आदिकारणाच्या स्वरूपावरून विश्वघटनेसंबंधी जे सर्वसामान्य सिद्धांत बसविण्यात येतात त्यांचाही अंतर्भाव या ब्रह्मविद्येत होत असतो. ब्रह्माचे म्हणजे विश्वाच्या आदिकारणाचे स्वरूप ज़ड आहे किंवा ते भौतिक आहे असे जे मानतात त्यांना अन्नब्रह्मवादी असे म्हणण्यास हरकत नाही. समाजवाद हा जडवादी, भौतिकवादी किंवा अन्नब्रह्मवादी आहे असे म्हणता येईल. पण जडवाद, भौतिकवाद किंवा अन्नब्रह्मवाद हे शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या मनात या तत्त्वज्ञानाचे जे स्वरूप एकदम उभे राहते त्याहून समाजवाद्यांचा जडवाद, भौतिकवाद किंवा अन्नब्रह्मवाद हा फार भिन्न आहे. ते आपल्या भौतिकवादास "स्वयंविकासी भौतिकवाद" (Dialectical Materialism) असे नाव देतात व तो यांत्रिक भौतिकवादाहून भिन्न मानतात.

## स्वयंविकासी व यांत्रिक भौतिकवाद

एकंदर सृष्टीचे जडसृष्टी, जीवसृष्टी आणि मानवसृष्टी असे तीन भाग कल्पिले तर जडसृष्टीतूनच जीवसृष्टीची उत्पत्ती झाली आणि मानवेतर जीवसृष्टीतूनच मानवसृष्टीची उत्पत्ती झाली असा भौतिकवादाचा सिद्धांत आहे व तो यांत्रिक भौतिकवादाप्रमाणे स्वयंविकासी भौतिकवादासही मान्य आहे. आपल्या शरीरास अन्नमय कोश म्हणतात. या कोशातूनच मनुष्याच्या सर्व गुणांचा व शक्तींचा विकास झाला आहे व या गुणास व

शक्तींस तो अन्नमय कोशच आधारभूत आहे असे दोन्हीही भौतिकवाद मानतात व म्हणून त्या दोहोंसही अन्नब्रह्मवादी असे सामान्य नाव देता येते. पण या दोन प्रकारच्या भौतिकवादात अथवा अन्नब्रह्मवादात फार मोठा मतभेद आहे. यांत्रिक भौतिकवादी त्रिविधसृष्टीची उत्पत्ती जडातूनच झाली आहे, म्हणून सजीव सृष्टीला व मानवसृष्टीलाही जडसृष्टीचे नियम लागू आहेत व दोन्ही सृष्टीतील सर्व व्यवहारांचे ज्ञान केवळ जडसृष्टीच्या नियमांच्या ज्ञानावरूनच होऊ शकेल असे प्रतिपादन करतात आणि कार्यात कारणाच्या गुणाहून अधिक गुण येणे शक्य नाही असा यांत्रिक भौतिकवादाचा सिद्धांत आहे. या दृष्टाने यांत्रिक भौतिकवादी हे वेदान्त्यांप्रमाणे विवर्तवादी आहेत असे म्हणता येईल. कारण वेदान्तातील विवर्तवादाप्रमाणे कारणांहून कार्य भिन्न नसते व त्याच्या ठिकाणी जी भिन्नता दिसते ती केवळ आभासात्मक आहे असे ते म्हणतात. पण हा विवर्तवाद भौतिकसृष्टीतील परिवर्तनास ते लावीत नाहीत तर फक्त निर्गुण ब्रह्मावर सगुण विश्वाचा देखावा कसा दिसतो त्याचा उलगडा करण्यासाठीच या विवर्तवादाचा ते आश्रय करीत असतात. पण सगुण सृष्टीतील एका पदार्थातून दुसरा पदार्थ निर्माण झाला असता तेथे विवर्तवादाचाच आश्रय करावा आणि कारणरूप पदार्थाहून निर्माण झालेल्या कार्यरूप पदार्थात अधिक गुण नसतील किंवा तो कारणापासून गुणदृष्ट्या भिन्न नसतो असे त्यांचे म्हणणे नाही. या भौतिक सृष्टीतील कार्यकारण संबंधांचा विचार करीत असता वेदान्तीही परिणामवादाचा आश्रय करतात आणि कारणपदार्थाहून कार्यरूप पदार्थ व्यवहारदृष्ट्या भिन्न आहे असे मानतात. स्वयंविकासी भौतिकवाद हा परिणामवादी आहे आणि म्हणून जडसृष्टी हे जीवसृष्टीचे कारण आहे असे तो मानितो, तरी जीवसृष्टीत, जडसृष्टीत न दिसणारे, अनेक अधिक गुण निर्माण झालेले असल्याने, तिचे व्यवहार जडसृष्टीहून भिन्न प्रकारचे आहेत हे स्वयंविकासी भौतिकवादास मान्य आहे. यामुळे यांत्रिक भौतिकवादाप्रमाणे जडसृष्टीच्या नियमांचीच जीवसृष्टी सर्वस्वी बद्ध आहे असा जड नियतिवाद स्वयंविकासी भौतिकवादास मान्य होत नाही. यांत्रिक भौतिकवाद नियतिवादी आहे व तो आपला नियतिवाद मानवेतर सृष्टीप्रमाणे मानवसृष्टीसही लागू करतो. यामुळे जीवाच्या कर्तृत्वास अथवा आत्मस्वातंत्र्यास यांत्रिक भौतिकवादात स्थान नाही. आत्मस्वातंत्र्य नाही म्हणजे बुद्धि-स्वातंत्र्यास व पौरुषासही स्थान उरत नाही व म्हणून मनुष्य व त्याची बुद्धी यांना भौतिक परिस्थितीच्या दासांचा दर्जा प्राप्त होतो. यामुळे यांत्रिक भौतिकवादात नीतिशास्त्रालाही स्थान उरत नाही......

जीवसृष्टीला जीवकर्तृत्व, बुद्धिस्वातंत्र्य आणि आत्मस्वातंत्र्य ही तत्त्वे विशिष्ट प्रमाणात लागू पडतात, हे स्वयंविकासी भौतिकवादाने मान्य केलेले आहे. मात्र मानवी मनाचे व बुद्धीचे स्वातंत्र्य भौतिक नियमांचे उल्लंघन करू शकत नाही असे त्याचे म्हणणे आहे. भौतिक नियतीचे ज्ञान करून घेणे आणि भौतिक सृष्टीचा उपयोग आपल्या हितासाठी

करून घेणे हेच स्वातंत्र्य मानवाला त्याच्या बुद्धीच्या विकासाने प्राप्त करून घेता येते, असे समाजवादाचे मत असून ते स्वयंविकासी भौतिकवादातील परिणामवादी सिद्धांतास अनुरूप असेच आहे. तात्पर्य समाजवाद हा भौतिकवादी असला तरी तो जड नियतिवादी नाही आणि त्यात जीवकर्तृत्व, बुद्धिस्वातंत्र्य आणि पौरुष यांना भरपूर अवकाश आहे हे ध्यानात घेतले पाहिजे.

## नैतिक अन्नब्रह्मवाद

आता या तत्त्वज्ञानाच्या नैतिक अंगाचा थोडा विचार करू. समाजवाद हा नैतिकदृष्ट्या अन्नब्रह्मवादी आहे असे म्हटले की, इंद्रियसुखापलीकडे बौद्धिक व आत्मिक सुखाची तो पर्वा करीत नाही अथवा इंद्रियसुखापलीकडे कोणतेही सुख नाही असे त्याचे मत आहे असे लोक समजतात. पण हा समाजवादाचा विपर्यास आहे. "तत्सुखं सात्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिप्रसादजम्" हे सात्विक सुखाचे स्वरूप समाजवादास मान्य आहे आणि सामान्य इंद्रियसुखापेक्षा या बौद्धिक व आत्मिक सुखाची योग्यता अधिक असल्याने त्याच्या प्राप्तीसाठी स्वतःच्या इंद्रियसुखावर तिलांजली देऊन लोकहितासाठी झटणारे सात्विक पुरुष श्रेष्ठ आहेत, हे सर्व समाजवादास मान्य आहे. पण समाजधारणेचा विचार करीत असता त्याच्या भौतिक गरजांचा प्रश्न समाधानकारकपणे प्रथम सोडविला पाहिजे एवढेच त्याचे म्हणणे आहे. भौतिक सुखांना विशिष्ट मर्यादेबाहेर महत्त्व नाही आणि ही भौतिक सुखेही आत्मिक व बौद्धिक सुखांची साधने आहेत हे मान्य करूनही समाजवाद असे सांगतो की, समाजाची शरीरयात्रा ज्यावर चालते तो समाजमंदिराचा पाया आहे आणि हा पाया मजबूत असेल तरच समाजाची धारणा होऊ शकेल. जसे व्यक्तीच्या जीवनात "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनं" हे तत्त्व खरे आहे, त्याप्रमाणे सामाजिक जीवनाचा पाया त्याच्या आर्थिक घटनेवर अवलंबून असतो हे खरे आहे. हा पाया डळमळू लागला की सर्व समाजमंदिर डळमळू लागते आणि तो कोसळून पडला की सर्व समाज कोसळून पडतो. यासाठी त्याच्या या पायात कोणकोणती परिवर्तने घडत आहेत याचा नित्य अभ्यास करून तो पाया ज्या तत्त्वांच्या अवलंबनाने सुस्थिर आणि खंबीर होईल अशी तत्त्वे शोधून काढून त्यांच्यावर समाजाची उभारणी केली पाहिजे. उपाशी मनुष्याला ब्रह्म हे अन्नमयच भासणार आणि त्याला या स्वरूपातच त्याची प्राप्ती झाली पाहिजे. आनंद-ब्रह्म हे ब्रह्माचे अंतिम स्वरूप असले, तरी अन्नब्रह्माची मुळीच प्राप्ती ज्यास होऊ शकत नाही त्यास आनंदब्रह्माची प्राप्ती होणे दुरापास्त आहे. यासाठी समाजाच्या अन्नाचा म्हणजे समाज-शरीराच्या भौतिक गरजांचा प्रश्न प्रथम सोडविला पाहिजे आणि ज्यांना लोकसंग्रहार्थ आपले तन, मन, धन अर्पण करावयाचे असेल, ज्यांचा स्वार्थ सुटला असेल, परार्थ हाच आपला स्वार्थ असा सर्वभूतात्मभाव ज्यांच्या अंतःकरणात उदित झाला असेल, स्वार्थबुद्धीच्या व अहंकाराच्या अज्ञानातून जे मुक्त झाले असतील त्यांनी समाजधारणा-शास्त्राला आधारभूत असा जो

अन्नाचा प्रश्न तो कसा सुटेल ते पाहून त्याची विस्कटलेली घडी प्रथम नीट बसविली पाहिजे. समाजातील नैतिक ध्येये त्याच्या आर्थिक घटनेस अनुरूप अशी असली पाहिजेत. आर्थिक घटनेतील परिवर्तनाबरोबर तीही बदलत जातात व गेली पाहिजेत. जगात अपरिवर्तनीय, शाश्वत, सनातन असे काही नाही. सर्वच संसरणरूप आहे. सर्वच क्षर आहे. अक्षर, अव्यय, अनश्वर असे काही नाही. हीच विचारसरणी त्यांनी ब्रह्मज्ञान, नीतिशास्त्र व इतिहास या सर्व शास्त्रांत अवलंबिली आहे. सामाजिक नीतिशास्त्रातील सर्व तत्त्वे परिस्थितिसापेक्ष असतात, ती त्रिकालाबाधित नाहीत असा सापेक्ष सत्यवाद ते नीतिशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास या विषयात स्वीकारतात. समाजरचनेचा पाया त्याच्या आर्थिक घटनेत असतो. ही आर्थिक घटना नित्य बदलत असते व या आर्थिक घटनेतील बदलांमुळेच राजकीय, नैतिक व सामाजिक परिवर्तने घडून येत असतात, अशी त्यांची ऐतिहासिक घडामोडींची भौतिक मीमांसा आहे. ती कशी आहे त्याचा आता विचार करू.

## इतिहासाची भौतिक मीमांसा

इतिहासाची भौतिक मीमांसा म्हटली की, पुनः या मीमांसेत ध्येयवादाला किंवा ध्येयांना महत्त्व नसून केवळ भौतिक घडामोडींनाच महत्त्व देण्यात येते असा आक्षेप कित्येक घेतात. पण हा आक्षेप शास्त्रीय समाजवादात लागू पडत नाही. कारण ऐतिहासिक घडामोडीत ध्येयांचे किंवा ध्येयवादाचे महत्त्व नाही असे शास्त्रीय समाजवाद सांगत नाही. तर सामाजिक ध्येये आणि ध्येयवाद ही समाजाच्या भौतिक व आर्थिक परिस्थितीने मर्यादित झालेली असतात आणि जुनी आर्थिक घटना बदलून नवी आर्थिक घटना निर्माण झाल्यामुळेच जुनी ध्येये मागे पडून नवी ध्येये निर्माण होत असतात, एवढेच शास्त्रीय समाजावादाचे म्हणणे आहे. सामाजिक ध्येये ज्या सामाजिक दृष्टीतून निर्माण होतात ती सामाजिक दृष्टी त्याच्या भौतिक व आर्थिक सृष्टीतून निर्माण होत असते. या भौतिक व आर्थिक सृष्टीत नित्य पालट होत असतात, हे पालट विशिष्ट प्रमाणाबाहेर होऊ लागले अथवा झाले म्हणजे नवी आर्थिक सृष्टीच निर्माण होते. या नव्या आर्थिक सृष्टीमुळे पूर्वीचे आर्थिक संबंध स्वरूपतः तसेच राहिले असले, तरी त्यांचे अंतःस्वरूप पालटलेले असते. यामुळे समाजावर होणारे त्यांचे परिणामही भिन्न बनतात व त्यांच्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टीही बदलत असते. जे व्यवहार पूर्वी समाजधारणेला तारक होते, ते मारक ठरतात, ज्यामुळे पूर्वी लोकसंग्रह होत असे त्यामुळेच आता लोकविग्रह होऊ लागतो. हे पाहून विचारी मनुष्यांना नवी सामाजिक दृष्टी प्राप्त होते आणि या नव्या दृष्टीचा अवलंब करून ते नवी ध्येयसृष्टी निर्माण करीत असतात. या नव्या ध्येयसृष्टीचा उद्भव नव्या आर्थिक सृष्टीतूनच होत असतो आणि ही नवी ध्येयसृष्टी समाजात स्थापन झाली म्हणजे नवी सामाजिक सृष्टी निर्माण होत असते. या नव्या सामाजिक सृष्टीतील ध्येये आणि व्यवहार सर्वच नव्या तत्त्वावर अधिष्ठित झालेले असतात. औद्योगिक क्रांतीमुळे

समाजाची आर्थिक घटना मूलतःच बदलली आहे आणि म्हणून एक नवी आर्थिक सृष्टी निर्माण झाली आहे. धनोत्पादनाचे प्रमाण पूर्वी फार छोटे होते. त्यावेळी धनोत्पादनाची साधने ज्याच्या मालकीची तोच उत्पादनाचे श्रम करीत असे. अशा समाजात जमिनीचा मालक व शेतकरी एकच होता. कारखानदार व मजूर असा भेद नव्हता. निरुद्योगी मालक वर्ग आणि केवळ कष्टजीवी मजूर असा वर्गभेद नव्हता. यानंतर यांत्रिक धनोत्पादन सुरू झाले व धनोत्पादनाचे प्रमाण वाढले, धनोत्पादनात भांडवलाला अधिक श्रेष्ठत्व प्राप्त झाले आणि धनोत्पादनाची साधने–कारखाने व जमिनी–भांडवलवाल्याच्या मालकीची बनली. श्रम करणाराच्या मालकीखाली होणारे छोटे धनोत्पादन बंद पडून भांडवलवाल्यांच्या मालकीखाली होणारे मोठे धनोत्पादन सुरू झाले. अशा प्रकारे प्रमाणभेदातून प्रकारभेद निर्माण झाला.......

## विरोधातून विकास

समाजात एका तत्त्वावर चाललेले व्यवहार प्रमाणभेदाने भिन्न प्रकारचे बनले म्हणजे त्यांचे नियंत्रण करण्यासाठी जुने तत्त्व सोडून नवे तत्त्व स्वीकारण्याची आवश्यकता वाटू लागते. एकदा, जो कसतो त्याचीच मालकी जमिनीवर असावी, हे तत्त्व समाजाला हितावह वाटले व तेव्हा जमिनीवर समाजाची समाईक मालकी होती ती नष्ट होऊन खाजगी मालकी निर्माण झाली. पुढे कसतो त्याची जमीन, या तत्त्वापेक्षा ज्याच्याजवळ भांडवल असेल त्याची मालकी जमिनीवर असली तर शेतीची सुधारणा होईल असे वाटू लागले व त्यास लागणारे भांडवल कसणाऱ्या शेतकऱ्यांपाशी नसते म्हणून भांडवलवाल्याची जमीन हे तत्त्व बरे वाटले. यामुळे भांडवलशाही शेती सुरू झाली. पण या पद्धतीमुळे धनोत्पादन वाढले तरी धनाची विषम विभागणी होते असे दिसू लागले, तेव्हा शेती सामुदायिक बनवावी हे तत्त्व पुनः बरे वाटू लागले. अशा प्रकारे समाजरचनेचे एक तत्त्व एका परिस्थितीत बरे ठरते व तेच तत्त्व दुसऱ्या परिस्थितीत वाईट ठरते. नंतर त्याच्या विरुद्ध तत्त्व समाज स्वीकारतो. यावेळी समाजाची गाडी एका तत्त्वाच्या दिशेने जात होती ती त्या विरुद्ध तत्त्वाच्या दिशेने जाऊ लागते. यावेळी विरोधी तत्त्वे व मते यांचा लढा समाजात उत्पन्न होतो व या विरोधातूनच समाजाच्या गाडीची प्रगती होत असते. अशा प्रकारे समाजाचा विकास त्यातील विरोधातून होत असतो. हा विकास होत असता पुनः पुनः त्याच तत्त्वावर समाज येत असल्याचा भास होतो, पण हा भास खरा नसतो.

## विरोधविकासाचा वाटोळा जिना

तेल्याच्या घाण्याचा बैल जसा एका खांबाभोवती फिरून पुनः पुनः त्याच ठिकाणी येतो त्याप्रमाणे समाज पुनः पुनः त्याच तत्त्वावर येतो हे खरे नाही. तसेच समाजाची प्रगती नारळीच्या झाडावर चढणाऱ्या मनुष्याप्रमाणे एकसारखी लंब रेषेत होते हे सुद्धा खरे नाही.

समाजाची प्रगती वाटोळ्या जिन्यावरून वर चढणाऱ्या मनुष्यासारखी होत असते. तो पुनः पुनः त्याच त्याच तत्त्वावर आल्यासारखा दिसला, तरी तो वरच्या पातळीवर त्या तत्त्वाचा आश्रय करीत असल्याने त्याची प्रगती अथवा उन्नती होत असते. तो एकदा एक तत्त्व स्वीकारतो, पुनः त्याच्या विरुद्ध तत्त्वाचा तो अवलंब करतो व पुनः ते विरोधी तत्त्वही सोडून पहिल्या तत्त्वाकडे गेल्यासारखा भासतो. पण तसे करीत असता विरोधी तत्त्वाच्या आश्रयाने झालेली प्रगती तो सोडून देत नाही. त्यापासून जे घेण्यासारखे असते ते आत्मसात करून त्याचा त्याग करतो व म्हणूनच तो पूर्वीच्या तत्त्वाकडे जातो म्हणण्यापेक्षा दोन विरोधी तत्त्वातील ग्राह्यांशांचे ग्रहण करून व त्याज्यांशांचा त्याग करून तो एक नवे समन्वय तत्त्व शोधून काढतो असे म्हणण्यास हरकत नाही. जो कसतो त्याची जमीन हे व ज्याचे भांडवल त्याची जमीन हे त्याच्या विरुद्ध तत्त्व, या दोन परस्पर विरुद्ध तत्त्वांचा समन्वय साधून समाजवादी आर्थिक घटना निर्माण होणार आहे. त्यात श्रम करणारे व भांडवलवाले किंवा मजूर व मालक असे दोन वर्ग राहणार नाहीत. समाजातील सर्वच लोक श्रम करणारे, समाजाचे सेवक होणार व सर्वच लोक सामाजिक भांडवलाचे अथवा धनोत्पादनाच्या साधनांचे समाईक मालक बनणार आहेत. अशा प्रकारे यांत्रिक धनोत्पादनाचे फायदे पदरात पडून शिवाय विषम विभागणी व वर्गविग्रह नाहीसे होतील.

## वर्गविग्रह

समाजधारणेची तत्त्वे अशी वारंवार बदलतात आणि परस्परविरोधी तत्त्वांचा आश्रय करण्याची बुद्धी समाजाला होत असते, याचे कारण काय? या कारणांची मीमांसा हेगेलने आध्यात्मिक दृष्टीने केली आहे. ती अशी : मनुष्याचे मन नेहमी सत्याचा, न्यायाचा व स्वातंत्र्याचा शोध करीत असते. या प्रेरणा त्याला परमात्म्यापासून मिळत असतात पण सत्याचे, स्वातंत्र्याचे अथवा न्यायाचे आकलन मनुष्यबुद्धीला एकदम होत नाही. मानवी मनाची सत्याकडे होणारी प्रगती परस्परविरोधी तत्वांच्या अवलंबनातून होत असते व म्हणून त्याच्या बुद्धीला नेहमी आंदोलने बसत असतात. सिद्धांत, प्रतिसिद्धांत आणि समन्वय सिद्धांत (thesis, antithesis and synthesis) अशा क्रमाने मनुष्याच्या बुद्धीला सत्याचे ज्ञान होत असते. कार्ल मार्क्सने सिद्धांत, प्रतिसिद्धांत आणि समन्वय सिद्धांत अशी आंदोलने मानवी बुद्धीला का प्राप्त होतात, याची भौतिक उपपत्ती लाविली :

(१) समाजात नित्य बदल होत असतो.

(२) या बदलांमुळे त्याच्या आर्थिक घटनेत प्रमाणभेदांतून प्रकारभेदाच्या न्यायाने नवी आर्थिक घटना अस्तित्वात येते.

(३) या आर्थिक अथवा भौतिक घटनांतरामुळे समाजधारणेला नव्या तत्त्वांचा आधार घेतला पाहिजे ही बुद्धी सुचते. अशा प्रकारे सामाजिक बुद्धीला बसणारी आंदोलने ही समाजाच्या आर्थिक घटनेतील आंदोलनाची प्रतिबिंबे असतात.

(४) या आंदोलनांतून नव्या जुन्या तत्त्वांचा विरोध निर्माण होतो व या विरोधातून समाजाची प्रगती होते.

(५) नव्या जुन्या सामाजिक तत्त्वांच्या विरोधाआड समाजातील निरनिराळ्या वर्गांच्या हितातील विरोध लपलेला असतो व म्हणून या तात्त्विक मतांतील विरोधांना वर्गविरोधाचे स्वरूप प्राप्त होते. अशी कार्ल मार्क्सची ऐतिहासिक घडामोडींची भौतिक मीमांसा आहे. हेगेलच्या विरोधविकासाच्या आध्यात्मिक सिद्धांताला मार्क्सने असे भौतिक रूप दिले. या सिद्धांतानुसार त्याने मानवी इतिहासाचे पर्यालोचन केले, तेव्हा त्यास सर्व इतिहासात वर्गविग्रहाचे तत्त्व दिसू लागले. जेव्हा एका तत्त्वावर समाजाची रचना होते तेव्हा जो वर्ग वरिष्ठ असतो, त्याचे या तत्त्वापासून सर्वांत अधिक हित होत असते. या वर्गाचे हित तेच समाजहित असे त्यावेळी समजले जाते. पण हा सिद्धांत सर्वस्वी खरा नसतो. या वरिष्ठ वर्गाचे हित व समाजातील सामान्य जनतेचे हित यात विरोधही असतो. प्रथम हा विरोध अल्प असतो, पण या समाजरचनेची वाढ होत जाते तसतशी या विरोधाचीही वाढ होत जाते. कालांतराने हा विरोध इतका वाढतो की, वरिष्ठ वर्गाचे हित ते सामान्य जनतेचे अनहित आणि सामान्य जनतेचे हित ते वरिष्ठ वर्गाचे अनहित अशी परिस्थिती प्राप्त होते. यावेळी एका वर्गाचे श्रेष्ठत्व नष्ट करून दुसऱ्या वर्गाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित होण्याचा काल प्राप्त होतो. पहिला वरिष्ठ वर्ग नष्ट करून दुसरा वर्ग वरिष्ठ बनविण्याचे प्रयत्न करू लागतो. तेव्हा या दोन वर्गांत विरोध उत्पन्न होतो व त्याला वर्गयुद्धाचे स्वरूप प्राप्त होते. दुसरा वर्ग पहिल्या वर्गाच्या पोटातच, त्याचा आश्रय करूनच, वाढलेला असतो. पण तो आता ते पोट फोडून बाहेर येण्याचा प्रयत्न करू लागतो. याच वेळी सामाजिक क्रांत्या होतात.

## वर्गविग्रह व लोकसत्ताक क्रांती

मध्ययुगात आपल्या चातुर्वर्ण्याप्रमाणेच युरोपीय समाजात चातुर्वर्ण्य होते. ही वर्गयुक्त समाजरचना मोडून सामाजिक समता व राजकीय लोकसत्ता या ध्येयांचा पुकार करीत तिकडील वैश्य वर्गाने धर्माधिकारी व सरंजामदार वर्गाविरुद्ध युद्ध केले व या नव्या तत्त्वांची प्रस्थापना केली. हा वैश्य वर्ग प्रथम सरंजामशाहीच्या आश्रयानेच वाढला होता, पण पुढे त्याच्या विकासास सरंजामशाहीचा विरोध येऊ लागला. तेव्हा या वर्गाने सरंजामशाही समाज मोडून सामाजिक समतेचे व लोकसत्तेचे तत्त्व प्रस्थापित केले. या तत्त्वामुळे या वर्गाच्या नेतृत्वाखाली समाजाची प्रगती झाली पण पुनः लवकरच भांडवलशाहीचा उदय झाला व समाजात कामगार विरुद्ध भांडवलदार असा वर्गविग्रह सुरू झाला. कामगारवर्गाचा जन्म भांडवलदार वर्गाच्या जन्माबरोबरच झाला असून त्यांच्यातील हितविरोध भांडवलशाही संस्कृतीच्या वाढीबरोबर वाढत आहे. या हितविरोधातून व्यक्तिवादी व समाजवादी आर्थिक तत्त्वे निर्माण झाली आहेत. धनोत्पादनाची साधने खाजगी

मालकीची असावीत हे व्यक्तिवादी तत्त्व असून ती सार्वजनिक मालकीची असावीत हे समाजवादी तत्त्व आहे. या तात्त्विक विरोधाच्या बुडाशी वर्गावर्गांतील हितविरोध आहे. यातून निर्माण होणाऱ्या वर्गयुद्धातून समाजसत्ताक क्रांती होणार आहे, असे कार्ल मार्क्सने भविष्य वर्तविले. त्याला सुमारे नव्वद वर्षे झाली. आणखी दहा वर्षांत कदाचित त्याचे हे भविष्य खरे ठरून समाजसत्ताक संस्कृती विजयी होईल. मार्क्सने आपले तत्त्वज्ञान बनविताना जर्मन तत्त्ववेत्त्यांचा विरोधविकासाचा सिद्धांत, इंग्लिश अर्थशास्त्रातील श्रममूल्य सिद्धांत आणि फ्रेंच क्रांतिकारकांचा समाजवाद, या तिहींचा समन्वय केला आणि शास्त्रीय समाजवादाची निर्मिती केली. मार्क्सच्या पूर्वी जे समाजवादी होते त्यांना तो भावनामय म्हणतो. त्यांना शास्त्रीय दृष्टीने विचार करण्याची सापेक्ष दृष्टी प्राप्त झालेली नव्हती, वर्गविग्रहातून सामाजिक क्रांत्या होतात याचे ज्ञान नव्हते आणि सामाजिक ध्येयांची व क्रांत्यांची भौतिकमीमांसा अवगत नव्हती. ते क्रांतिकारक असले तरी त्यांची विचार-पद्धती सनातन होती. समाईक संपत्तीचे व धनोत्पादनाचे तत्त्व सनातन आहे व समाज-सत्ताक आर्थिक घटना सर्वच काळी योग्य होती असे ते प्रतिपादीत. प्रत्येक संस्था व समाजरचनेचे तत्त्व परिस्थितिसापेक्ष असते. त्याचे परिणाम परिस्थितिसापेक्ष असतात व म्हणून एका परिस्थितीत समाजाला हितप्रद असलेली तत्त्व दुसऱ्या परिस्थितीत अहितावह ठरतात. ही सापेक्ष विचारपद्धतीच शास्त्रीय आहे हे कार्ल मार्क्सने दाखवून दिले. यामुळे आजपर्यंत समाईक मालकीचे समाजवादी तत्त्व का फैलावले नाही व आज तेच तत्त्व का फैलावत आहे, याचा उलगडा झाला. तसेच समाजसत्ताक क्रांतीला अनुकूल अशी भौतिक परिस्थिती केव्हा व कशी निर्माण होईल आणि ती क्रांती कोणत्या वर्गाच्या शक्तीने घडून येईल हेही मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाने दाखवून दिले....

## समाजवादी अर्थशास्त्र

आजचा विषय समाजवादी अर्थशास्त्र हा आहे. समाजवादाचे ज्ञान होण्यास त्याची आर्थिक विचारसरणी समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थशास्त्र हा समाजवादाचा गाभा आहे असे म्हणण्यास हरकत नाही. ज्यांना समाजवादाचे आर्थिक विचार मान्य असतील त्यांना त्याचे इतर विचार मान्य नसले तरी समाजवादी म्हणवून घेता येते, पण ज्यांना ते विचार मान्य नाहीत त्यांनी समाजवादाची इतर मते मान्य केली तरी ते समाज-वादी होऊ शकत नाहीत. समाजवादी अर्थशास्त्राने भांडवलशाहीचे पृथःकरण करून तिचे अंतर्गत विरोध जगापुढे प्रथम मांडिले. भांडवल आणि भांडवलशाही समाज यांची समाज-वादी व्याख्या आपण प्रथम समजून घेतली पाहिजे. व्यक्तिवादी अर्थशास्त्रात "उत्पादक संपत्ती" आणि "उपभोग्य संपत्ती" असे संपत्तीचे दोन वर्ग करतात आणि त्यातील "उत्पादक संपत्ती"स भांडवल असे म्हणतात. या व्याख्येप्रमाणे हातमाग, चरखे यांच्या-पासून तो कापडाच्या व सुताच्या गिरण्यापर्यंत सर्व धनोत्पादनाची साधने भांडवल या

सदरात येतात आणि गिरणीवाल्यांप्रमाणे साळी–कोष्टी, सूत कातणाऱ्या बायका हे सर्व भांडवलवाले होतात. याहष्टीने भांडवल, श्रम, निसर्ग आणि योजक असे धनोत्पादनाचे चार घटक आहेत व ते सनातन आहेत.......

पण ही साधने किंवा संपत्तीची कारणे सनातन आहेत म्हणून ती जेथे आहेत ते सर्व समाज सारखेच आहेत असे म्हणता येणार नाही. भांडवलशाही समाज सनातन नाही आणि भांडवलदार वर्गही सनातन नाही. सामान्य व्यवहारात हातमागवाला कोष्टी किंवा चरखावाली बाई यांना आपण भांडवलवाले म्हणत नाही. फक्त गिरणीवाल्यासच भांडवलदार म्हणतो. या दृष्टीने भांडवल आणि भांडवलशाही यांच्या व्याख्या केल्या पाहिजेत. कार्ल मार्क्सने भांडवलाची व्याख्या या दृष्टीने केली आहे. केवळ उत्पादक संपत्ती म्हणजे भांडवल, अशी व्याख्या न करता जी उत्पादक संपत्ती मालक स्वतः काम करून उपयोगात न आणिता दुसऱ्याच्या श्रमाने उपयोगात आणितो व स्वतः केवळ मालकी हक्काने मिळणारे धन उपभोगितो, तिलाच भांडवल म्हणावे, अशी मार्क्सने व्याख्या केली. या व्याख्येप्रमाणे गिरणी हे भांडवल होते व गिरणीवाला भांडवलदार होतो, पण साळी व सूत कातणारी बाई यांना भांडवलदार म्हणता येत नाही. त्यांची उपकरणे ही भांडवले नव्हेत. तसेच ज्यांच्याजवळ स्वतःची उत्पादक साधने नाहीत व जे दुसऱ्याच्या मालकीच्या साधनांच्या साहाय्याने कष्ट करून संपत्ती निर्माण करितात त्यांनाच कामगार म्हणावे, अशी कामगार शब्दाची व्याख्या मार्क्सने केली.

अशा प्रकारे कामगार व भांडवलदार असे दोन वर्ग ज्या समाजात असतील तो भांडवलशाही समाज व त्याची संस्कृती ही भांडवलशाही संस्कृती. अशा व्याख्या केल्या म्हणजे भांडवल, भांडवलदार व कामगार वर्ग, भांडवलशाही समाज आणि भांडवलशाही संस्कृती, या सनातन वस्तू नसून त्या दोन-अडीचशे वर्षांत निर्माण झालेल्या व वाढलेल्या आहेत असे दिसू लागते. भांडवलशाहीला उत्पत्ती व अभिवृद्धी आहे असे दिसू लागले म्हणजे तिला ऱ्हास व विनाश हेही असले पाहिजेत, अशी कल्पना येते. मार्क्सने हीच गोष्ट दाखवून दिली. भांडवलशाही संस्कृती ही सनातन, अनद्यावत, निसर्गसिद्ध आणि अविनाशी आहे असे जेव्हा समजत होते, तेव्हा ही एक काल जन्मास आलेली, आज वाढीस लागलेली व उद्या नाश पावणारी नश्वर वस्तू आहे असे कार्ल मार्क्सने दाखवून दिले.

मार्क्सने भांडवलशाहीची उत्पत्ती, अभिवृद्धी व विनाश यांची कारणे दाखवून दिली आणि असे सिद्ध केले की, या भांडवलशाही संस्कृतीच्या उत्पत्तीबरोबरच तिच्या विनाशाची बीजे जन्मास आली आहेत, तिच्या वाढीबरोबरच ती विनाशबीजे वाढत आहेत आणि त्यांच्या वाढीमुळे तिचा लवकरच अंत होणार आहे. मालकी हक्कांवर जगून कोणतेही श्रम न करणारा भांडवलदार वर्ग अलिकडेच निर्माण झाला आहे. या भांडवलदार वर्गाचे

जमीनदार, कारखानदार व सावकार असे तीन पोट-विभाग आहेत. ते जमिनीचा खंड, ठेवीवरील अथवा कर्जावरील व्याज, कारखान्यातील नफा या तीन प्रकारच्या उत्पन्नावर जगत असतात. खंड, नफा आणि व्याज हे तीन अकष्टार्जित उत्पन्नाचे मार्ग आहेत. समाजातील सर्व जमिनी, कारखाने व पेढ्या फार थोड्या लोकांच्या हाती जाऊन बहुसंख्य सामान्य जनतेला या अल्पसंख्य भांडवलदार वर्गाचे नोकर बनून ते देतील तेवढे वेतन घेऊन कष्ट करण्यास भाग पडते अशी भांडवलशाही संस्कृतीची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. औद्योगिक क्रांतीमुळे प्रचंड कारखाने व प्रचंड शेते निर्माण करण्याची कला अवगत झाली आहे. ही यंत्रकला व भौतिक विद्या आज केवळ मूठभर भांडवलदार वर्गाच्या स्वार्थासाठी उपयोगात येत आहे. यामुळे जमीनदार व शेतकरी, कारखानदार व कामकरी आणि सावकार व ऋणकरी असे वर्ग निर्माण झाले व बहुसंख्य जनता शेतकरी, कामकरी व ऋण-करी बनून तिची जीवित साधने एका अल्पसंख्य वर्गाच्या हाती केंद्रित होऊ लागली आहेत. घरगुती धंदे, छोटी शेते आणि सावकार हे सर्व नष्ट होऊन यांत्रिक कारखाने, यांत्रिक शेते आणि बँका यांचे जाळे सर्वत्र पसरत आहे. या जाळ्यात सर्व समाज अडकत आहे. कोणासही स्वतंत्र धंदा उरणार नाही. सर्वांना पगारी नोकर होऊन भांडवलदारांचे सेवक व्हावे लागणार आहे. हा पगार किंवा वेतन हे एकच उपजीविकेचे साधन शेकडा नव्वद लोकांना उरणार आणि शेकडा दहा-पाच लोकच देशातील सर्व संपत्तीचे व भांडवलाचे मालक बनणार, अशी ही भांडवलशाही संस्कृती आहे.

शेकडा नव्वद कष्टजीवी वर्गाचे कायदेशीर धनहरण कसे होत आहे हे मार्क्सने सिद्ध केले. या कायदेशीर धनहरणातच भांडवलशाही संस्कृतीच्या विनाशाची बीजे आहेत. भांडवलदार वर्गाला केवळ मालकी हक्कांवर खंड, नफा किंवा व्याज कसे मिळते याची उपपत्ती मार्क्सने प्रथम लाविली. या उपपत्तीसच "धनोत्पादनातील वाढाव्याचा सिद्धांत किंवा "जादामूल्य सिद्धांत" (surplus value theory) असे म्हणतात. हा सिद्धांत थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल : कामगार वर्गाकडे किंवा कष्टजीवी जनतेकडे भांडवलदार वर्ग केवळ नांगर ओढणारे बैल यादृष्टीने पाहत असतो. कोणताही बैल ठेवताना त्याला चारा किती घालावा लागेल आणि त्याच्या कष्टातून धन किती उत्पन्न होईल याचा विचार शेतकरी करतो. त्याप्रमाणे कोणताही नोकर ठेवताना त्याला वेतन किती द्यावे लागेल आणि त्याच्या कष्टातून याहून अधिक धन किती पैदा होईल याचा विचार मालक करीत असतो. बैलाला पोसून त्याच्या कष्टांतून निर्माण होणाऱ्या धनाचा जो भाग उरतो, त्याला जादा धन किंवा जादा मूल्य अथवा वाढावा, असे म्हणता येईल. या जादा धनातून मालकाला अकष्टार्जित धन मिळत असते. कामकरी वर्गाच्या कष्टातून निर्माण झालेल्या धनातून त्या वर्गास वेतनरूपाने द्यावे लागणारे धन वजा केले, म्हणजे जे धन उरते त्याला जादा धन किंवा जादा उत्पन्न म्हणतात. या जादा धनातून मालकवर्गाला

व्याज, खंड व नफा या तीन प्रकारचे उत्पन्न विनकष्टाने–केवळ मालकी हक्काने–मिळत असते. ज्याप्रमाणे बैलाला पोसावयास लागणाऱ्या खर्चाहून अधिक धन त्याच्या कष्टातून निर्माण झाले नाही तर बैल ठेवून शेती कोणी करणार नाही. त्याचप्रमाणे कामकरी वर्गाला द्याव्या लागणाऱ्या वेतनाहून अधिक धन त्यांच्या श्रमातून निपजले नाही तर भांडवलशाही धनोत्पादन चालणार नाही. म्हणून जादा धन हा भांडवलशाहीचा आधार आहे. हे धन मालकवर्गात विभागले जाते. सावकार व्याज रूपाने, जमीनदार खंड रूपाने आणि कारखानदार नफा रूपाने, या धनातील भाग घेत असतात. हे अकष्टार्जित धनार्जनाचे तीन मार्ग आजच्या समाजात आहेत. यामुळे कष्ट आणि धनार्जन यांचे सम प्रमाण दिसत नाही, तर उलट ते व्यस्त प्रमाणच दिसते. ज्यांना कष्ट करावे लागतात त्यांना मालमत्ता करता येत नाही आणि ज्यांना मालमत्ता करता येते त्यांना कष्ट करावे लागत नाहीत अशी आजची भांडवलशाही समाजरचना आहे. आजच्या समाजात बहुसंख्य समाज मजूर बनला आहे, त्याच्यापाशी स्वतःची जमीन किंवा कारखाने नाहीत, त्यांना आपल्या श्रमशक्तीचा विक्रय जडवस्तूप्रमाणे बाजारातील स्पर्धेत करावा लागतो. या स्पर्धेत एका व्यक्तीच्या पोटास लागणारे किमान धन घेऊन आपली श्रमशक्ती कामकरी वर्गास विकावी लागते. स्पर्धाप्रधान भांडवलशाहीत कामकरी वर्गास उपजीविकेची किमान साधने मिळतील इतकेच वेतन मिळू शकते हाच भांडवलशाहीचा वेतन सिद्धांत होय. आजच्या स्पर्धाप्रधान व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळात जे भांडवलदार नाहीत त्या सर्वांना आपल्या जीवनास अवश्य असे किमान वेतन घेऊन भांडवलदार वर्गाच्या सुखासाठी नित्य खपण्याखेरीज गत्यंतर नाही. आज जे व्यक्तिस्वातंत्र्य व करारस्वातंत्र्य आहे ते केवळ भ्रामक आहे. समाजात सर्वत्र तीव्र जीवनकष्ट आणि औद्योगिक स्पर्धा चालू आहेत. या अनिर्बंध स्पर्धेत मनुष्याला आपली श्रमशक्ती विकून केवळ जीवितधारण करता येईल पण त्याला आपली संस्कृती किंवा धर्म किंवा कुटुंब यांचीही धारणा करता येणे अशक्य होत आहे. कुटुंब करून राहणारा मनुष्य आणि खानावळीत जेवून राहणारा सडासोट मनुष्य यांच्या स्पर्धेत पहिला तगून रहात नाही. या औद्योगिक स्पर्धेत आता स्त्रियाही ओढल्या जात आहेत आणि त्यामुळे वेतनाचे दर पुनः कमी होत आहेत. औद्योगिक शहरांतून भटारखाने व वेश्यागृहे यांची संस्कृती निर्माण होत आहे व समाजातील प्रत्येक व्यक्ती दुसऱ्याकडे तीव्र कलहबुद्धीने, ईर्षेने, असूयेने व मत्सराने पहात आहे. प्रत्येक मनुष्याचे व त्याच्या अंगच्या गुणांचे मोल पैशाच्या मानदंडाने मापिले जात आहे. अशी ही बाजारी संस्कृती आहे व प्रत्येक गोष्टीचे मोल बाजारभावाने ठरविले जाते. या भांडवलशाही संस्कृतीत संस्कृती, धर्म, उच्च विचार, कला, प्रेम, भूतदया, परोपकार इत्यादी कोणतीही श्रेष्ठ वस्तू टिकणार नाही. या श्रेष्ठ गोष्टींकडे दुर्लक्ष करणारे स्वार्थी, निष्ठुर, लोभी, लबाड लोक तगून राहतात आणि अशांच्याच हाती समाजजीवनाची सूत्रे जात असतात. या समाजात आर्थिक व सामाजिक विषमता पराकोटीला जात आहे आणि

सधन-निर्धन यांच्यातील सापेक्ष अंतर फार वाढत आहे. पूर्वीचे श्रीमंत इतके श्रीमंत नव्हते आणि सधन-निर्धनमधील अंतर इतके मोठे नव्हते. यामुळे आपल्या दारिद्र्याची तीव्र जाणीव आणि श्रीमंतासंबंधीचा तीव्र द्वेष निर्धन वर्गात वाढत आहे. या द्वेषातूनच वर्गविग्रह निर्माण होत आहे. पण एका अर्थाने हा वर्गविग्रह फार पुराणा आहे. समाजात खाजगी मालमत्ता निर्माण होऊन सधन-निर्धन वर्ग निर्माण झाल्यापासूनच हा वर्गविग्रह चालू आहे. पण आज तो फार तीव्र आणि अंतिम स्वरूपाचा बनला आहे. कामकरी वर्गाला एकजूट केल्याखेरीज आणि वरिष्ठ वर्गाशी झगडल्याखेरीज पोटच भरणे अशक्य झाले आहे. यामुळे एकीकडे दारिद्र्य व दास्य आणि दुसरीकडे संपत्ती आणि सत्ता असा वर्गविग्रह चालू झाला आहे. या वर्गविग्रहातच भांडवलशाहीचा अंत होणार आहे हा अंत केवळ ही संस्कृती अनीतिमान आहे म्हणून होणार नसून तिच्यामुळे समाजधारणाच होऊ शकत नाही आणि तिचा अंत केल्याखेरीज समाजाचा गाडा पुढे चालूच शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे भांडवलशाही संस्कृतीचा अंत होणार आहे. कामगार वर्गातील स्पर्धेमुळे, यांत्रिक शोधांमुळे आणि कामगारांच्या हलाखीच्या स्थितीमुळे वेतनाचे दर कमी होतात आणि धनोत्पादनाची शक्ती वाढल्यामुळे जादा संपत्ती निर्माण होत रहाते. ही जादा संपत्ती व्याज, खंड आणि नफा या रूपांनी मालक वर्गाच्या हातो साठली म्हणजे तिचा विनियोग अधिक धनोत्पादन आणि चैनीच्या पदार्थांची निपज इकडे होतो. अशा प्रकारे एकीकडे दारिद्र्य व बेकारी यांची वाढ आणि दुसरीकडे जादा संपत्तीची निपज असा आंतरविरोध उत्पन्न होतो. दारिद्र्य व बेकारी यांच्या वाढीमुळे लोकांची क्रयशक्ती संकुचित होते व मालाचा उठाव होत नाही. यामुळे औद्योगिक अरिष्टे ओढवतात, कारखाने बंद पडतात, पुनः बेकारी वाढते व पुनः मालाचा उठाव बंद पडतो. हे अरिष्ट बराच वेळ टिकून बरीच संपत्ती नाश पावली म्हणजे पुनः औद्योगिक यंत्र चालू होते. अशी अरिष्टाची परंपरा येऊन एकीकडे बेकार सेना किंवा जादा लोकसंख्या आणि दुसरीकडे टाळेबंद कारखाने आणि जादा संपत्ती असे भयाण दृश्य दिसू लागते. विपुलतेत विपत्ती अनुभवावी लागते आणि धनोत्पादनाची शक्ती वाढल्यामुळेच जणू काय धनार्जन अशक्यप्राय होऊ लागते.

ही बेकार सेना व जादा माल यांचा संयोग होऊ शकत नाही. समाजाच्या योग्य गरजा भागविल्या जात नसताना निरर्थक आणि अपकारक वस्तूंची निपज होत असते. ही अरिष्ट परंपरा नष्ट करण्यासाठी नियोजित आर्थिक घटनेचे तत्त्व (planned economy) पुढे आले आहे. प्रत्येक व्यक्तीला आर्थिक व्यवहारात पूर्ण स्वातंत्र्य द्यावे, वेतन, व्याज, खंड, नफा या सर्वांचे दर केवळ व्यक्तीव्यक्तींतील चढाओढीने व ओढाताणीने ठरू द्यावेत. त्यात समाजाने ढवळाढवळ करू नये, वाटेल त्याने वाटेल तो माल पिकवावा आणि तो वाटेल त्या दराने खपवावा, बाजारभावांवर नियंत्रण घालू नये, अशा प्रकारची व्यक्तिवादी

अर्थशास्त्राची विचारसरणी होती. ती अनर्थावह ठरली आहे. यामुळे आर्थिक व्यवहारांवर नियंत्रणे घालावीत, व्याज, वेतन, नफा, खंड, बाजारभाव या सर्वांवर निर्बंध घालावेत आणि नियोजित आर्थिक घटना स्थापन करावी ही कल्पना निघाली. ......

भांडवलशाहीचे आंतरविरोध नष्ट करण्याचा एकच खरा उपाय आहे व तो म्हणजे धनोत्पादन, धनसंचय आणि धनविभाजन ही कामे खासगी व्यक्तींच्या हातून काढून ती सार्वजनिकरीत्या चालू करणे. हा उपाय अमलात येण्याच्या आड आज फक्त मालक वर्गाचे मालकी हक्क येत आहेत. या मालकी हक्काच्या नावाने हाकाटी करून समाजवादाला विरोध करण्यात येत असतो पण भांडवलशाही मालकी हक्कांची उत्पत्ती व अभिवृद्धी कशी होत असते याचा विचार कोणी करीत नाही. एक गिरणी स्थापन झाल्याने किती घरगुती स्वतंत्र धंदे-वाले मरतात ! एक मोटार सुरू झाली म्हणजे किती बैलगाडीवाले व टांगेवाले देशोधडीला लागतात ? शेतात वर्षभर खपून धान्य किंवा कापूस पिकविणारा शेतकरी बाजारात दुकान-दार व्यापाऱ्यांकडून कसा नागविला जातो ? माल विकत घेताना व विकताना नागविला जाणारा शेतकरी ऋणको बनतो आणि जमीन गहाण टाकतो. हे ऋण पुरविण्यास त्याला नागविणारे व्यापारीच पुढे येतात व सावकार बनतात आणि हेच सावकार अखेरीस जमिनीचे मालक बनतात. अशा प्रकारे भांडवलशाही पद्धतीची शेती निर्माण होते. हे सर्व कायदेशीर मार्गानेच होत असते आणि ते व्यक्तिस्वातंत्र्य व करारस्वातंत्र्य या नावाने गौरविले जाते. पण याप्रकारे हळूहळू सर्वांचे मालकी हक्क नष्ट होऊन फक्त मोठे कारखानदार, मोठे सावकार अथवा पेढीवाले आणि मोठे जमीनदार यांचेच मालकी हक्क तेवढे शिल्लक उरतात. अशा प्रकारे समाजातील सर्व मालकी हक्क फक्त शेकडा दहा-पाच टक्के भांडवल-दारांच्या हाती गोळा होतात व इतरांचे मालकी हक्क नष्ट होऊन ते या भांडवलदारांचे मजूर ऊर्फ गुलाम बनतात. भांडवलदारांनी ज्यांचे धंदे ठार केले, ज्यांची घरे उजाड पाडली आणि ज्यांचे मालकी हक्क आपणाकडे आणिले त्यांना कोणी नुकसानभरपाई दिली आहे काय ? भांडवलशाही संस्कृती ही वणिक् संस्कृती आहे. ......

कार्ल मार्क्सने हे उत्कृष्ट प्रकारे सिद्ध केले आहे. भांडवलदारांचे हक्क नष्ट करणे म्हणजे दुसऱ्याचे हक्क हिरावून घेणारांचे हक्क हिरावून घेणेच होय, (The expropriators will be expropriated) असे मार्क्सचे म्हणणे आहे. पण हे महत्कार्य, ही सर्वांगीण क्रांती, कामगार वर्गच करू शकेल असे मार्क्सचा समाजवाद सांगतो. ...

## समाजवादी राजकारण

भांडवलशाही संस्कृती नष्ट करून समाजवादी संस्कृतीची स्थापना करण्याचे महत्कार्य कामगार वर्गाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकेल आणि ही क्रांती यशस्वी करण्यासाठी काही

काल अनियंत्रित कामगारशाही म्हणजेच "डिक्टेटरशिप ऑफ दि प्रोलेटेरियट" स्थापन करावी लागेल असा शास्त्रीय समाजवादाचा राजकीय सिद्धांत आहे. हा सिद्धांत समाजवादाच्या इतिहासमीमांसेवर आधारलेला आहे. समाजाची अगदी प्राथमिक अवस्था मृगयावृत्तीवर व पशुपालन वृत्तीवर आधारलेली होती. यावेळी जमिनीवर खाजगी मालकी नव्हती. पुढे कृषिप्रधान समाज बनला तरी पुष्कळ जमीन समाईक व काही खासगी मालकीची होती. हळूहळू समाजाची संपत्ती वाढू लागली व तिच्या रक्षणासाठी क्षत्रिय ऊर्फ सरंजामदार वर्ग निर्माण झाला. हळूहळू या सरंजामदार वर्गाचे मालकी हक्क वाढत गेले व लष्करशाही माजली. काही देशांत सर्व जमीन सरंजामदार वर्गाच्या मालकीची बनली व बहुतेक कष्ट करणारे शेतकरी त्यांचे दास बनले. प्रथम गुलामवर्ग व नंतर भूदास (सर्फ) असे वर्ग निर्माण झाले. सरंजामी युगात धर्माधिकारी, सरदार, व्यापारी, कारागीर आणि भूदास असे चार वर्ग युरोपात होते. आपल्या देशात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण होते. यापैकी धर्माधिकारी किंवा ब्राह्मण, सरदार किंवा क्षत्रिय आणि व्यापारी, कारागीर किंवा वैश्य हे श्रेष्ठ वर्ग होते आणि भूदास किंवा शूद्र हा कनिष्ठ वर्ग होता. पहिले वर्ग परोपजीवी आणि दुसरा श्रमोपजीवी होता. पुढे युरोपातील वैश्य वर्गाची भरभराट होऊन त्याने सरंजामदार व धर्माधिकारी वर्गाविरुद्ध बंड केले आणि या वर्गकलहातून सामाजिक समता व लोकसत्ता यांची निर्मिती झाली. पण त्याचबरोबर औद्योगिक क्रांतीतून भांडवलशाही जन्मास आली आणि भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. कामगार वर्ग निर्धन, कष्टजीवी वर्ग असून भांडवलदार वर्ग हा सधन व परजीवी वर्ग आहे. अशा प्रकारे आजपर्यंत प्रत्येक समाजात श्रमजीवी आणि परजीवी असा वर्गभेद चालत आला आहे व तो सनातन आहे असे लोक समजतात. हा वर्गभेद नष्ट करून एकवर्ग समाज स्थापन करणे हे समाजवादाचे ध्येय आहे. हा एकवर्ग समाज निर्माण होण्यास आता फक्त भांडवलदार वर्गाचाच विरोध आहे व तो मालकी हक्कांच्या नावाने होत असतो. भांडवलदार वर्गाने शेकडा नव्वद–पंचाण्णव लोकांचे मालकी हक्क हिरावून घेतले आहेत, तरी ही मालकी हक्कांची मोहनिद्रा समाजास पछाडीत आहे. शेतकरी वर्ग मालकी हक्काच्या मोहाने अंध बनून सावकारी पाशात अडकतो पण त्याला हा मोह सोडवत नाही. मध्यम वर्ग असाच मोहांध बनून भांडवलदार वर्गाचा गुलाम बनतो व कष्टजीवी सामान्य जनतेला पिळून काढण्यास भांडवलदारांस सहाय्य करतो. समाजवादी मताप्रमाणे ही भांडवलशाहीची मोहिनी नष्ट करण्यास कामगार क्रांती आणि तीही सशस्त्र क्रांती करावी लागणार आहे आणि या क्रांतीनंतर भांडवलदार वर्गाचा पुरा पाडाव होईपर्यंत अनियंत्रित कामगारशाही स्थापन करण्याखेरीज गत्यंतर नाही. कारण वर्गयुद्धाखेरीज क्रांती यशस्वी होत नाही असा अनुभव लोकसत्ताक क्रांतीच्या वेळी आलाच आहे. ही लोकसत्ता आज धनिकसत्ता बनली आहे याचे कारण भांडवलदार व कामगार हा वर्गभेदच होय. हा वर्गभेद नष्ट करण्यास समाजाची सर्व उत्पादनाची साधने, म्हणजे जमिनी, खाणी, कारखाने

यांच्यावर समाजाची समाईक मालकी स्थापन केली पाहिजे. शेतकऱ्याच्या जमिनी सावकार-जमीनदार वर्गाकडे जात आहेत व छोटे व्यापारी धंदेवाले नष्ट होऊन मोठे कारखानदार व पेढीवाले यांच्या मालकीत सर्व समाजाची उत्पादक संपत्ती गोळा होत आहे. हा भांडवलशाही संस्कृतीचा अनिवार्य क्रम आहे. तो थांबण्यास सर्व जमिनी व कारखाने समाईक मालकीचे बनून सर्व लोक सामाजिक संपत्तीचे मालक व दुसऱ्या दृष्टीने सर्वच लोक समाजाचे सेवक बनले पाहिजेत. अशा समाजात मालक-मजूर हा वर्गभेद नष्ट होऊन सर्वांना सांपत्तिक व सांस्कृतिक समतेचा व स्वातंत्र्याचा उपभोग मिळेल. प्रत्येकास समाज ठरवील तितकेच वेतन मिळेल व कोणाही प्रौढ व सुदृढ व्यक्तीस काम केल्याविना पोट भरता येणार नाही. सर्वांचे वेतन सारखेच असेल असा याचा अर्थ नाही. या वेतनात कमी अधिक प्रमाण असेल पण ते सर्व समाज आपल्या गरजांकडे लक्ष देऊन ठरवील. आज ज्याला जितके द्रव्यार्जन करता येईल तितके त्याने करावे असे आहे. हे द्रव्यार्जन करण्याचे व्याज, खंड व नफा हे तीन बिनकष्टाचे मार्ग असून ते सधन व्यक्तींसच उपलब्ध असतात. निर्धन व्यक्तीस आपली श्रमशक्ती विकून उदरभरण करावे लागते. अशा पद्धतीत समाजात दोन वर्ग होऊन ते एकमेकांशी सारखे लढत राहतात. हे वर्गयुद्ध हे भांडवलशाही संस्कृतीचे नित्य लक्षण आहे. या आर्थिक घटनेतून आजच्या जगात त्रिविध द्वैत निर्माण झाले आहे. प्रत्येक भांडवलप्रधान राष्ट्रात भांडवलदार व कामगार यांचा एक लढा चालू आहे. तसेच भांडवलदार राष्ट्रांना (१) आपला माल विकण्यासाठी आणि कच्चा माल विकत घेण्यासाठी मागासलेले देश लागतात, (२) या देशात भांडवलदार देशातील भांडवलदार आपले भांडवल गुंतवितात आणि (३) जे मागासलेले देश रिकामे असतील तेथे आपल्या देशातील जादा लोक पाठवून वसाहती करतात. अशा तीन कारणांसाठी भांडवलप्रधान राष्ट्रे साम्राज्ये निर्माण करतात. या साम्राज्याविना त्यांची भांडवलशाही समाजघटना टिकूच शकत नाही, पण या औद्योगिक किंवा आर्थिक साम्राज्यशाहीमुळे साम्राज्यातील प्रभुराष्ट्रे आणि अंकित राष्ट्रे यांच्यात लढे उत्पन्न होतात. भांडवलशाही संस्कृतीमुळे निर्माण होणारे हे दुसरे द्वैत आहे. याशिवाय याच संस्कृतीतून आणखी एक द्वैत निर्माण होते. हे द्वैत म्हणजे निरनिराळ्या भांडवलदार साम्राज्यशाही राष्ट्रांतील द्वैत होय. इंग्लंड व जर्मनी यांच्यातील द्वैत या प्रकारचे आहे. आज इंग्लंड व फ्रान्स एका पक्षास आणि जर्मनी व इटली दुसऱ्या पक्षास असे तट पडले असून पहिल्यास आपली साम्राज्ये टिकवावयाची आहेत व दुसऱ्यास ती जिंकून घ्यावयाची आहेत. या साम्राज्यशाही राष्ट्रांतील वैरांतून महायुद्धे निर्माण होत आहेत. अशा प्रकारे भांडवलशाही संस्कृतीतून त्रिविध द्वैत किंवा तीन प्रकारचे लढे निर्माण होत आहेत. भांडवलदार कामगारांचा लढा, प्रभुराष्ट्रे व अंकित राष्ट्रे यांच्यातील राष्ट्रीय स्वरूपाचा लढा आणि निरनिराळ्या साम्राज्यशाही राष्ट्रांत साम्राज्यप्राप्तीसाठी होणारे लढे, असे हे लढे आहेत. ते एकात एक गुंतलेले आहेत व त्यातूनच आंतरराष्ट्रीय वर्गयुद्ध आणि महायुद्ध परंपरा यांचा उद्भव होत आहे. गेले महायुद्ध हा

युरोपीय भांडवलशाहीचा अपरिहार्य परिणाम होता आणि त्यावेळी युरोपातील सर्व राष्ट्रांतील कामगार वर्गाने आपापल्या राष्ट्रातील सरकारांना साम्राज्यशाही युद्धात सहाय्य न करिता भांडवलशाही नष्ट करण्यासाठी वर्गयुद्धांची उठावणी केली असती, तर युरोपीय भांडवलशाहीचा अंत झाला असता असे लेनिनप्रभृती क्रांतिकारक समाजवाद्यांचे मत होते. युरोपीय समाजवाद्यांनी महायुद्धाच्या वेळी आपापल्या देशात समाजसत्ताक क्रांत्या कराव्या आणि आशियातील अंकित राष्ट्रांना साम्राज्यातून फुटून निघून स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यास सहाय्य करावे, असे लेनिनचे धोरण होते व काले मार्क्सचे कट्टे अनुयायी यावेळी युरोपीय जनतेचे व हिंदुस्थानादी अंकित राष्ट्रांचे पुढारी असते तर भांडवलशाहीचा अंत १९२० पूर्वीच झाला असता असे अनेक समाजवाद्यांचे मत आहे. पण यावेळी युरोपात तत्त्वभ्रष्ट समाजवाद आणि आशियात अशास्त्रीय क्रांतिवाद यांचा फैलाव झालेला होता. युरोपीय जनता साम्राज्यातील अव्याहत लुटीमुळे क्रांतिपराङ्मुख बनण्याइतकी तत्त्वभ्रष्ट बनली होती आणि आशियातील अंकित राष्ट्रांच्या पुढाऱ्यांना क्रांतिवादाचे शास्त्र अवगत नव्हते. त्यांच्यापैकी काही दहशतवादी व इतर सनदशीर राजकारणी होते. या परिस्थितीस फक्त रशिया हा अपवाद होता. रशियातील झारशाहीच्या जुलमी व जुनाट राज्ययंत्राखाली मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद एकसारखा फोफावत होता आणि ते राज्ययंत्र महायुद्धात कोसळून पडताच तेथे लेनिनच्या नेतृत्वाखाली समाजवादी जगत्क्रांतीचा झेंडा उभारण्यात आला बोल्शेविकांनी रशियात कम्युनिस्ट क्रांती यशस्वी केली आणि युरोपात व आशियात एकदम जगत्क्रांतीचा सुरुंग लावून आशियातील साम्राज्यांकित राष्ट्रांना स्वतंत्र करण्याचा आणि युरोपीय जनतेचे आंतरराष्ट्रीय संघटन करून भांडवलशाहीचे मूळच उपटून टाकण्याचा जगड्व्याळ प्रयत्न केला. या प्रयत्नास भौतिक परिस्थिती अनुकूल होती. पण युरोपीय जनतेच्या व आशियातील राष्ट्रांच्या पुढाऱ्यांची बौद्धिक व आत्मिक तयारी नव्हती, असा अनुभव १९२४ साली लेनिन वारला तोपर्यंतच्या काळात आला. १९१८ साली रशियात क्रांती झाली आणि १९२४ साली लेनिन वारला. या पाच-सहा वर्षांत मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादास अनुसरून अथवा त्यावरील लेनिनच्या भाष्यास अनुसरून समाजवादी जगत्क्रांतीचा पहिला अपूर्व प्रयोग करण्यात आला. एकट्या रशियाखेरीज इतर सर्व राष्ट्रांत हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि भांडवलशाही संस्कृतीला जीवदान मिळाले. युरोपात कम्युनिस्ट क्रांतीचे जे अयशस्वी प्रयत्न झाले, त्यातूनच फॅसिस्टांचे क्रांतिप्रतिबंधक शास्त्र निर्माण झाले आणि त्यामुळे आज युरोपीय लोकशाहीचा अंत होत आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या नावाने लोकशाहीला धनिकशाहीचे उघडे स्वरूप द्यावयाचे, मध्यम वर्गाला व शेतकरी वर्गाला कामगार वर्गापासून फोडून घ्यावयाचे आणि साम्राज्याचा मोह दाखवून महायुद्धाची तयारी करण्यात बेकारांना धनोत्पादनाच्या शक्तीला गुंतवावयाचे, असे हे क्रांतिप्रतिबंधक शास्त्र आहे. याला भांडवलप्रधान राष्ट्रीय लष्करशाही असे म्हणता येईल. युरोपीय राष्ट्रांत भांडवलशाही संस्कृती आणि वर्गसंस्था यांना परंपरेचे पावित्र्य प्राप्त झालेले आहे. धर्माच्या व

परंपरेच्या नावाने भांडवलशाही संस्कृतीचा प्रचार तेथील सामान्य जनतेत, विशेषतः मध्यम वर्गात व शेतकरी वर्गात करता येतो, मध्यम वर्गाचा प्रश्न साम्राज्ये स्थापून सोडविणे शक्य आहे असा मोह निर्माण करता येतो आणि राष्ट्रीय वैभवाच्या नावाने साम्राज्यवादाचा पुरस्कार करता येतो. तरीही आज युरोपीय जनतेत समाजवादी विचार इतके फैलावले आहेत की, फॅसिस्टांना किंवा नाझींनाही आपले धोरण राष्ट्रीय समाजवाद हे आहे असे बोलावे लागत आहे. भांडवलदार वर्ग राष्ट्राचा निधिधारक आणि सेवक आहे असे तत्त्व पुकारावे लागत आहे. शेतकरी-कामकरी लोकांच्या दारिद्र्याचे व बेकारीचे निवारण करण्याची जबाबदारी सरकारवर आहे असे मान्य करावे लागत आहे आणि व्यक्तिवादी अर्थशास्त्र सोडून देऊन भांडवलदारांचे व्यक्तिस्वातंत्र्य राष्ट्रीय योजनेच्या नावाने मर्यादित करावे लागत आहे. राष्ट्रीय भावनेच्या प्रसारार्थ राष्ट्रीय बंधुत्व आणि राष्ट्रासाठी त्याग करण्याची वृत्ती जागृत करावी लागत आहे. भांडवलशाही संस्कृती सनातन नाही. भांडवलदारांचे हित तेच राष्ट्राचे हित नाही आणि ऐदी भांडवलदार वर्गाची राष्ट्रहिताला आवश्यकता नसून त्याचा त्या कामी अडथळाच होत आहे, हे आज ना उद्या युरोपीय जनतेला कळल्याखेरीज राहणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक प्रबल युरोपीय राष्ट्राने औद्योगिक साम्राज्याच्या आकांक्षेने लष्करशाहीचा पुरस्कार करणे म्हणजे मृगजळाच्या मागे धावल्यासारखे अनर्थावह आहे, याचीही उमज प्रत्यक्ष महायुद्धाच्या आंचीने पडल्याखेरीज राहणार नाही. यासाठी लेनिनने गेल्या महायुद्धाच्या वेळी ज्या जगत्क्रांतीचा प्रयत्न केला तोच प्रयत्न पुनः नव्या महायुद्धाच्या वेळी युरोपीय समाजवाद्यांनी आणि आशियातील राष्ट्रवाद्यांनी एक होऊन करावा असे शास्त्रीय समाजवादाचे म्हणणे आहे. हे होण्यास युरोपीय समाजवादी क्रांतिकारक बनले पाहिजेत आणि आशियातील क्रांतिकारक निदान अंतःकरणाने समाजवादी बनले पाहिजेत. युरोपीय समाजवाद्यांनी साम्राज्याचा मोह सोडला पाहिजे व आशियातील राष्ट्रवाद्यांनी सनदशीर राजकारणाचा मोह सोडला पाहिजे. अशा प्रकारे पुनः एखादे युरोपीय महायुद्ध होईल, तेव्हा युरोपीय समाजवादी आणि आशियातील राष्ट्रवादी एक होऊन जगत्क्रांती यशस्वी करतील आणि समाजसत्तेची स्थापना करून एकवर्ग मानव संस्कृतीची निर्मिती करतील अशी शास्त्रीय समाजवाद्यांस म्हणजे कम्युनिस्टांस दृढ आशा आहे. पण माझा याबाबतीत थोडा मतभेद आहे. तो सांगून ही व्याख्यानमाला संपवावयाची आहे.

आज हिंदुस्थानात एक सत्याग्रही क्रांतिशास्त्र निर्माण होत आहे. या क्रांतिशास्त्राचा उगम भारतीयांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानात आहे. सत्याग्रह हे जसे एक क्रांतिशास्त्र आहे तसेच ते एक समाजधारणाशास्त्रही आहे. समाजधारणेला सत्याग्रही वृत्तीची आणि समाजक्रांताला सत्याग्रही नेत्याची आवश्यकता आहे. सामाजिक क्रांती करण्यास सनदशीर राजकारणाचे केवळ बुद्धिबळ अपुरे पडते हे युरोपातील सनदशीर समाजवादाच्या

इतिहासाने सिद्ध झाले आहे. रॅम्से मॅक्डोनल्ड सारखे इंग्लंडातील समाजवादी पन्नास वर्षे सनदशीर समाजवादाचा पुरस्कार करून अखेरीस कॉन्झर्वेटिव किंवा टोरी पक्षात सामील झाले. याचे कारण केवळ बुद्धिबलाने किंवा युक्तिवादाने समाजवादी क्रांती होऊ शकत नाही असे त्यांना दिसून आले आणि सशस्त्र क्रांतीचा मार्ग त्यांना इष्ट नव्हता किंवा पटत नव्हता, हेच होय. याच्या उलट आज युरोपीय देशात समाजवादी क्रांतिकारकांनी जे सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न केले तेही फलद्रूप झालेले नाहीत आणि फॅसिझमचे क्रांतिप्रतिबंध-शास्त्रच यशस्वी झाल्यासारखे दिसत आहे. रशियात विशिष्ट परिस्थितीत सशस्त्र क्रांती यशस्वी झाली हे जसे खरे आहे, तसेच युरोपात निदान आज तरी समाजवादी क्रांती अपेशी झाली आहे हेही खरे आहे. अशा परिस्थितीत युरोपातील काही समाजवाद्यांचे लक्ष सत्याग्रही क्रांतिशास्त्राकडे वेधू लागले आहे. निदान हिंदुस्थानात तरी सत्याग्रही समाजवाद निर्माण होऊन येथील सर्वांगीण क्रांती यशस्वी करील अशी माझी खात्री आहे. आज सत्याग्रहाचे स्वरूप केवळ राष्ट्रवादी आहे कारण आपण एका अंकित राष्ट्रात रहात आहोत व साम्राज्यशाही प्रभु राष्ट्राच्या वर्चस्वातून मुक्त होणे हेच आपले आजचे पहिले कर्तव्य आहे. समाजवादी लोक सर्वांगीण क्रांतिवादी असले तरी आधी राजकीय सत्ता जनतेच्या हाती आली पाहिजे हे मत त्यांना मान्य असल्याने व ही राजकीय सत्ता हाती येण्यास मुख्य अडचण ब्रिटिश साम्राज्य सत्तेचीच असल्याने साम्राज्य विरोधी लढ्यात ते नेहमीच आघाडीवर असतात. ते प्रथम राजकीय क्रांतिकारक व नंतर सर्वांगीण क्रांतिकारक आहेत. पूर्वीच्या सामाजिक सुधारकांप्रमाणे प्रथम इतर सुधारणा व मग राजकीय सुधारणा, असे त्यांचे मत नाही. पण राजकीय क्रांतीची पूर्तता आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीखेरीज होणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास आहे. ही सर्वांगीण समाजसत्ताक क्रांती टाळण्याचे मार्ग फक्त दोनच आहेत. एक म. गांधी म्हणतात त्याप्रमाणे सर्व राष्ट्राने केवळ हस्तव्यवसायाने निर्माण होईल तेवढी संपत्ती उपभोगूनच समाधान मानावयाचे आणि बौद्धिक व आत्मिक उन्नतीकडेच आपले सर्व सामर्थ्य वेचावयाचे. हिंदुस्थानात असा एक वर्ग निर्माण होईल आणि या वर्गाकडे समाजाचे नेतृत्व राहील असे मला वाटते. ज्यांना भौतिक सुखात रस वाटत नाही, बौद्धिक व आत्मिक सुखाची ज्यांना गोडी लागलेली आहे, परोपकार हाच ज्यांचा स्वभाव बनला आहे, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हेच आदर्श जीवन असे ज्यांना वाटते, सामाजिक, भौतिक व आत्मिक शास्त्रातील सत्यसंशोधन हेच ज्यांचे जीवितसाध्य अथवा ध्येय बनले आहे, इंद्रियसुखात आनंद मानणाऱ्या सामान्य जनतेला जे प्रौढ बालके समजतात असे काही श्रेष्ठ लोक असतात. त्यांच्या साध्या राहणीस केवळ हस्तव्यवसायाने निर्माण झालेली संपत्ती पुरेशी होईल. पण सामान्य जनतेला भौतिक सुखांची जी हाव आहे ती केवळ हस्तव्यवसायांनी भागणार नाही. अशा सामान्य समाजाला यांत्रिक धनोत्पादन आज हवे आहे आणि यांत्रिक धनोत्पादन हे खाजगी व्यक्तींच्या आधीन ठेविले

की तेथे भांडवलशाही निर्माण झालीच. ही भांडवलशाही कायम ठेवून समाजसत्ताक क्रांती टाळण्याचा प्रयत्न युरोपीय राष्ट्रवादी समाजवादाच्या ऊर्फ फॅसिझमच्या नावाने करीत आहेत. पण हा "राष्ट्रीय समाजवाद" खरा राष्ट्रवादही नाही व खरा समाजवादही नाही. ती एक राष्ट्रवादाची व समाजवादाची विकृती आहे. अशी विकृती साम्राज्यशाहीमुळे निर्माण होऊ शकते. पण हिंदुस्थान, चीन किंवा रशिया यासारख्या चाळीस किंवा तीस कोटी लोकसंख्येचा प्रश्न साम्राज्यशाहीने सुटणे अशक्यच आहे. कारण तीस–चाळीस कोटी लोकांना तीन–चारशे कोटी लोकांचा देश पादाक्रांत केल्याखेरीज साम्राज्य फायद्यात पडणार नाही. एवढा प्रदेश सर्व जगातच नाही. तेव्हा फॅसिझमचा अथवा खोट्या राष्ट्रीय समाजवादाचा उपाय हिंदुस्थानला अवलंबिता येणे अशक्यच आहे आणि सर्व लोक यतिवर्गाप्रमाणे केवळ हस्तव्यवसायातून निर्माण होणाऱ्या भौतिक संपत्तीत समाधान मानण्यासही तयार नाहीत. अशा परिस्थितीत समाजवाद हाच तरणोपाय आहे. त्याच्या प्रस्थापनेस विरोध करणारा जमीनदार, कारखानदार वर्गही या देशात आपली अनियंत्रित सत्ता स्थापन करण्याइतका प्रबल, संघटित आणि समर्थ नाही अथवा होणेही शक्य नाही. साम्राज्य स्थापून मध्यम वर्गाच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासही तो असमर्थ आहे. मग शेतकरी वर्गाचे व कामकरी वर्गाचे दारिद्र्य व बेकारी तर खूप दूरच राहिली. अशा दुर्बल, असंघटित, असमर्थ आणि अज्ञानी वर्गाला या देशात फॅसिझम स्थापन करून सामान्य जनतेवर अनियंत्रित सत्ता गाजविता येईल अथवा येथील लोकसत्तेला धनिकसत्ता बनविता येईल हे अशक्य आहे. तेव्हा या देशास समाजवादाचा आश्रय करण्याशिवाय गत्यंतर नाही. येथील राष्ट्रीय लोकशाहीला समाजसत्ताक लोकशाही बनविणे लवकरच अवश्य होईल. हे कार्य सत्याग्रहाने होणे अगदी शक्य आहे व ते वर वर्णन केलेल्या यतिवर्गाच्या नेतृत्वाने होऊ शकेल. अहिंसेचे व अपरिग्रहाचे व्रत घेऊन समाजधारणेचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारा वर्ग हाच शांततेच्या मार्गाने समाजसत्ताक क्रांती घडवून आणू शकेल. हिंदुस्थानात सत्याग्रही समाजवाद निर्माण होईल अशी आशा वाटण्यास पं. जवाहरलाल यांच्यासारखे नेते निःशस्त्र प्रतिकाराने समाजवाद स्थापन होऊ शकेल असे मानतात हे एक प्रबल कारण आहे. गांधीवाद व मार्क्सवाद यांच्यात आज विरोध दिसत असला तरी हिंदुस्थानात सत्याग्रह व समाजवाद यांचा समन्वय होणार आहे, असे माझे स्वतःचे मत आहे. हे खरे ठरले तर सत्याग्रही समाजवाद हाच खरा शास्त्रीय समाजवाद आणि सशस्त्र क्रांतिकारक समाजवाद हा अशास्त्रीय समाजवाद असे भावी पिढ्यांचे लोक म्हणू लागतील! जोपर्यंत अहिंसेने सामाजिक क्रांती करण्याचे शास्त्र अवगत झाले नाही तोपर्यंत आपणास क्रांतिशास्त्र अवगत झाले आहे असा अहंकार कोणीही बाळगू नये. तेव्हा खरा शास्त्रीय समाजवाद सत्याग्रहातून निर्माण होईल व त्याचे स्वरूप आध्यात्मिक राहील असे माझे मत आहे.

[*शास्त्रीय समाजवाद, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९४७*]

८

# चोरी आणि काम

समाजाला जगण्यासाठी संपत्ती लागते आणि ही संपत्ती काम केल्यावाचून निर्माण होत नाही. संपत्ती म्हणजे केवळ चलनी नाणे किंवा पैसा नव्हे. त्या पैशाने आपण ज्या उपभोगाच्या वस्तू विकत घेतो तीच खरी संपत्ती होय. उदाहरणार्थ, धान्य, कापड, घरे, जनावरे इत्यादी सर्व उपभोगाच्या वस्तू हीच समाजाची संपत्ती होय. या उपभोगाच्या वस्तू निर्माण करण्यासाठी जी साधने लागतात तीही संपत्तीच होय. उदा., शेतीला लागणारे नांगर, खते, जमीन ही सर्व साधने संपत्तीच होय. कारण या वस्तू जरी प्रत्यक्ष उपभोगाच्या नसल्या तरी त्या साधनांच्या योगाने आपणास धान्यादी उपभोगाचे पदार्थ निर्माण करता येतात. म्हणून त्यांना समाजाची साधनसंपत्ती असे म्हणता येईल. मोठमोठे कारखाने व खाणी ही अशीच संपत्ती उत्पादन करण्याची साधने होत. अन्नधान्य, कपडा, राहण्याचे घर, त्या घरातील नित्योपयोगी वस्तू ही आपली उपभोग्य संपत्ती आणि शेतजमिनी, नांगर-खते, खाणी, कारखाने इत्यादी पदार्थ ही समाजाची उत्पादन-संपत्ती किंवा साधन संपत्ती होय. या दोनही प्रकारच्या संपत्तीत एकसारखी भर घालावी लागते. उपभोगाने संपत्ती संपते. तशीच ती उपभोग न घेता केवळ साठवून ठेवल्यानेही नाश पावत असते. म्हणून समाजाच्या संपत्तीत एकसारखी भर पडत रहावी लागते आणि ही भर समाजातील लोकांनी काम केल्यावाचून पडत नाही. समाजाची श्रमशक्ती हीच सर्व संपत्तीचे आदिकारण आहे असे म्हटले तरी चूक होणार नाही. समाजाच्या जीवनाला हे धनोत्पादनाचे कार्य एकसारखे चालू राहणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी समाजातील प्रत्येक प्रौढ आणि सुदृढ व्यक्तीने उत्पादनाच्या कामात काही तरी भाग घेतला पाहिजे. संपत्तीचा उपभोग घेतल्यावाचून कोणताही मनुष्य जगूही शकत नाही. अर्थात प्रत्येक मनुष्य समाजात उत्पन्न होणाऱ्या संपत्तीचा उपभोग घेतच असतो. म्हणजेच तो एकप्रकारे समाजाच्या संपत्तीचा विनाश करीत असतो. अर्थात आपण जितकी संपत्ती उपभोगून नष्ट केली तितकी तिच्यात भर

घालण्याची जबाबदारी नैतिक दृष्टीने त्यांच्यावर पडली पाहिजे. दुसऱ्याने श्रम करावेत आणि त्यांच्या श्रमांतून निर्माण झालेली संपत्ती आपणास उपभोगता यावी ही वृत्ती म्हणजेच चोरांची वृत्ती होय. स्वतः श्रम न करता संपत्तीचा उपभोग घेण्याचा हक्क हा केवळ लहान मुले, म्हातारी मनुष्ये, रोगी, अंध, पंगू एवढ्यांनाच असला पाहिजे. जो धडधाकट आहे आणि ज्याला काम करणे शक्य आहे अशा मनुष्याने केवळ आपल्या आईबापांनी, वाडवडिलांनी किंवा पूर्वजांनी संपत्ती मिळवून ठेविली म्हणून काम न करिता समाजाच्या संपत्तीचा उपभोग घेणे ही नैतिक दृष्ट्या चोरीच समजली पाहिजे.

## कायदेशीर आणि बेकायदेशीर चोरी

नैतिक दृष्ट्या ज्या व्यवहारात अशा प्रकारची चोरी आहे त्यापैकी अनेक व्यवहार आजच्या कायद्याने चोरी या सदरात पडू शकत नाही. उदा., कोणत्याही वस्तूचा बाजारभाव कायद्याने नियंत्रित केला म्हणजे त्यापेक्षा अधिक भावाने ती वस्तू विकणे हा कायदेशीर गुन्हा होतो. अशा व्यवहारांनाच आज आपण काळाबाजार असे म्हणतो. ही एक प्रकारची चोरीच आहे, परंतु ज्यावेळी सरकार असे भावनियंत्रणाचे कायदे करीत नाही, त्यावेळी आपला माल कोणत्याही भावाने विकला तरी त्याला कायदेशीर दृष्टीने कोणी गुन्हेगार समजत नाही व हे सर्व व्यवहार 'काळा बाजार' या नावास पात्र नसतात. व्यवहारात तो पांढरा बाजारच ठरत असतो. परंतु एवढ्याने वाटेल त्याने वाटेल तितकी किंमत घेणे हे न्यायाचे ठरू शकत नाही. आणि जे आर्थिक व्यवहार न्यायाचे नव्हेत ते कायदेशीर असले, तरी नैतिक दृष्टीने ती चोरीच समजली पाहिजे. समाजातील आर्थिक व्यवहारात जेव्हा जेव्हा अन्यायाची वाढ होऊ लागते आणि सामाजिक श्रमशक्तीतून निर्माण होणारी संपत्ती श्रम न करणाऱ्या वर्गाकडे अधिकाधिक जाऊ लागते, तेव्हा तेव्हा समाजातील कायदेशीर चोरीचे प्रमाण वाढले आहे असेच म्हणावे लागते. समाजात ज्या मानाने आर्थिक व्यवहारांची अधिकाधिक गुंतागुंत होऊ लागते आणि व्यापारी, सावकारी, जमीनदारी व कारखानदारी यांची वाढ होऊ लागते, त्या मानाने कायदेशीर चोरीचे प्रमाणही वाढत जाते. ज्यांच्या श्रमामुळे संपत्तीची उत्पत्ती होते त्यांना तिचा संग्रह मुळीच करता येत नाही आणि ज्यांच्यापाशी संग्रह वाढत जातो त्यांना त्यांच्या वाढीसाठी कोणत्याही प्रकारचे श्रम करावे लागत नाहीत. श्रम आणि संग्रह यांचे प्रमाण व्यस्त बनलेले असते. धनिकांना श्रम करावे लागत नाहीत आणि श्रमिकांना धन मिळत नाही, या सर्व गोष्टी कायदेशीर व्यवहाराने होत असतात. अशा परिस्थितीत कायदा हा सावांचे रक्षण करीत नसून चोरांचे रक्षण करीत असतो असे म्हणावे लागते. हे कायदे मोडण्याकडे लोकांची प्रवृत्ती होते. पण केवळ एकेकट्या व्यक्तीने आपापल्या स्वार्थासाठी समाजातील कायदे मोडू लागल्याने समाजात सुव्यवस्था नांदू शकणार नाही. अशा वेळी ही कायदेशीर चोरी नष्ट करावयाची, तर संपत्तीच्या मिळकतीसंबंधी आणि संग्रहासंबंधी ज्या पद्धती रूढ झालेल्या असतील, त्या सर्व आमूलाग्र बदलून नव्या

पद्धतीवर समाजाची आर्थिक घटना करावी लागते. जुन्या पद्धतीमुळे ज्या धनिक वर्गाचा फायदा होत असतो, त्या वर्गाचा समाजाची आर्थिक घटना बदलण्यास विरोध होतो आणि जुनी पद्धत चालू राहिल्यामुळे ज्या श्रमिक वर्गाचे नुकसान किंवा अनहित होत असते, त्या वर्गाला क्रांतीची आवश्यकता पटू लागते. अशा वेळी धनिक वर्ग आणि श्रमिक वर्ग ह्यांच्यामध्ये एक प्रकारचा वर्गकलह किंवा वर्गयुद्ध निर्माण होते. आज सर्व जगात एका बाजूला भांडवलदार-जमीनदार, सावकार व कारखानदार आणि दुसऱ्या बाजूस शेतकरी-कामकरी यांच्यामध्ये वर्गयुद्ध सुरू झालेले आहे. हे वर्गयुद्ध कोणी काही तत्त्वज्ञान शिकविल्यामुळे निर्माण झालेले नसून भांडवलशाही आर्थिक व्यवहारांमुळे जे कायदेशीर चोरीचे प्रमाण वाढलेले आहे, त्यामुळेच हे वर्गयुद्ध प्रत्येक देशात पेटत आहे.

## कौरव-पांडवांचा लढा

हे वर्गयुद्ध म्हणजे दोन भिन्न राष्ट्रांतील किंवा दोन भिन्न धर्मांतील अथवा दोन भिन्न जातींतील लढा नव्हे, तर एकाच राष्ट्रात, एकाच धर्मात किंवा एकाच जातीत नांदणाऱ्या दोन वर्गांतील लढा आहे, ह्याचा स्पष्ट बोध आपण करून घेतला पाहिजे.

आम्हाला हिंदूविरुद्ध मुसलमान, ब्राह्मण विरुद्ध मराठा, स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य हे लढे समजू शकतात. परंतु जमीनदार विरुद्ध शेतकरी, कारखानदार विरुद्ध कामकरी आणि सावकार विरुद्ध त्यांची कुळे यांच्यामधील लढा अद्यापि बरोबर समजत नाही. जातिनिष्ठा आणि धर्मनिष्ठा आमच्या अंगात मुरलेली आहे. परंतु ज्यांचे आर्थिक हितसंबंध एक आहेत, ते कोणत्याही जातीचे किंवा धर्माचे किंवा वंशाचे असले तरी ते सर्व एकाच वर्गात पडतात आणि त्यांचे आर्थिक व्यवहार एकाच प्रकारचे न्यायाचे किंवा अन्यायाचे होत असतात याची जाणीव आम्हाला अद्यापि स्पष्ट होत नाही. पण या वर्गयुद्धात श्रमिक वर्गाचा विजय व्हावा असे ज्यांना वाटते, त्यांना ही जाणीव आता बुद्धिपुरस्सर निर्माण केली पाहिजे. ज्याप्रमाणे अर्जुनाला आपल्या कुलात जन्मलेल्या कौरवांशी धर्मयुद्ध करण्यात पाप आहे असा मोह झाला होता, तसाच मोह आपल्या राष्ट्रातील सामान्य जनतेला होऊन आपल्याच धर्मातील व आपल्याच जातीतील धनिक वर्गाविरुद्ध आर्थिक लढा करण्यात पाप आहे असे तिला वाटत असते. एकाच धर्मातील दोन व्यक्ती जर दोन वर्गांत पडत असतील, म्हणजे जर एक सावकार असेल व दुसरा त्याचे कूळ असेल, तर त्या दोन व्यक्ती केवळ एकाच धर्माच्या असल्यामुळे त्यांचे हितसंबंध एक होऊ शकत नाहीत. आपल्या धर्माचा व जातीचा चोर आपणास लुबाडू शकतो किंवा प्रसंगी आपला प्राणही घेऊ शकतो, त्याचप्रमाणे आपली आर्थिक पिळवणूक करू शकतो. ह्या व्यवहारात तो जात, गोत, धर्म, किंबहुना, राष्ट्र यांचीही जाणीव ठेवीत नाही. म्हणून ज्यांचे ज्यांचे आर्थिक हितसंबंध एक आहेत व म्हणून जे एकाच वर्गात पडतात, त्या सर्वांची जात व धर्म विसरून आपण एकजूट केली पाहिजे. हा

घडा श्रम करणाऱ्या शेतकरी व कामकरी वर्गाला दिल्यावाचून आपले यापुढील राजकारण योग्य प्रकारे चालणार नाही. इतकेच नव्हे, तर आपल्या समाजाची सर्वच व्यवस्था गोंधळ माजून मोडून पडेल. आजचे भांडवलदार हे कौरवच आहेत आणि कामगार हेच पांडव आहेत. पहिल्याने दुसऱ्याची सत्ता आणि संपत्ती लुबाडून घेतली आहे आणि ती कायदेशीर मार्गांनी घेतली आहे. आपल्या सर्व व्यवहारास ते कायद्याचा व धर्माचा आधार देत आहेत, पण त्यांच्या बाजूस न्याय व नीती नाही. ज्या कायद्याच्या व धर्माच्या मागे न्यायाचा व नीतीचा पाठिंबा नाही, तो कायदा व धर्म समाजाची धारणाच करू शकत नाही. अशा कायद्याने व धर्माने समाजाचे हित होणार नाही किंबहुना अशा कायद्याला व धर्माला खरा कायदा व खरा धर्म असेही म्हणता येणार नाही. न्यायाच्या संस्थापनेसाठी त्याच्याविरुद्ध क्रांती करणे हाच खरा धर्म होऊ शकतो.

## नवा क्रांतिधर्म

धर्म, रूढी आणि कायदे यांची बंधने समाजाच्या धारणेसाठी असतात आणि ही बंधने समाजाच्या व्यवहारात जसे जसे फरक पडतील, तशी तशी बदलून घ्यावी लागतात. समाजाच्या जीविताला आवश्यक असे आर्थिक व्यवहार योग्य प्रकारे चालावेत म्हणून मालमत्तेसंबंधीचा कायदा केलेला असतो. या कायद्याने प्रत्येकाचे मालकी हक्क ठरवून दिलेले असतात आणि ते हक्क इतरांनी लुबाडून घेऊ नयेत अशी तरतूद केलेली असते. ह्या सर्वांचा हेतू समाजातील संपत्तीची उत्पत्ती अधिक व्हावी, जे श्रम करतील त्यांनाच तिचा उपभोग घेता यावा, जे अधिक श्रम करतील त्यांना अधिक संपत्ती मिळावी, श्रम करणाऱ्या व्यक्तींच्या सर्व शक्तींचा योग्य विकास व्हावा आणि अती उपभोगाने किंवा कोणतेही काम न करण्याने त्या शक्तींचा ऱ्हास किंवा विनाश होऊ नये, हा असला पाहिजे. अशा हेतूने केलेल्या मालमत्तेच्या व मालकी हक्काच्या कायद्यांमुळे उत्पादनाचे कार्य वाढत जाते. नवे नवे शोध लागतात. थोड्या श्रमात अधिक उत्पादन करता येते आणि जगाच्या एका टोकाचा माल दुसऱ्या टोकाकडे नेऊन विकता येतो. हजारो लोकांचे धन एकत्र करून कोट्यावधी व अब्जावधी रुपयांचे भांडवल उभारता येते. शेकडो लोकांच्या श्रमाने निर्माण होणारा माल दोन-चार मजूर लावून निर्माण करता येतो आणि हजारो लोकांच्या श्रमातून उत्पन्न होणाऱ्या संपत्तीचा थोडा थोडा अंश जमवून कोणतेही श्रम न करिता नवकोट नारायण बनता येते. अशा वेळी पूर्वीचा मालकी हक्काचा व मालमत्तेचा कायदा बदलून घेऊन नवा कायदा केला नाही, तर समाजात गोंधळ माजल्याशिवाय रहात नाही. त्यासाठीच समाजाच्या मालकीखाली सर्व जमिनी व कारखाने आणावेत, असे म्हणणारा समाजवाद आज पुढे आला आहे. भौतिक विद्येचे आणि यंत्रकलेचे नवे शोध झालेले आहेत. त्यांचा उपयोग करून समाजाची भौतिक संपत्ती वाढवावी. पण त्याचबरोबर समाजातील शेतकरी-कामकरी ह्या वर्गाच्या हाती सर्व सत्ता व संपत्ती जावी असे त्यांचे

म्हणणे आहे. आजपर्यंत हिंदू, मुसलमान, खिस्ती, बौद्ध इत्यादी अनेक धर्मांनी ज्या ज्या समाजपद्धती निर्माण केल्या, त्या सर्व समाजपद्धतीखाली शेतकरी कामकरी वर्ग हा संपत्ती, सत्ता व संस्कृती यांच्यापासून बहुशः दुरावलेला असाच वर्ग होता. त्या काळात कदाचित संपत्ती उत्पादनाची साधने आजच्या इतकी वाढली नसल्याने तसे करणे अपरिहार्य असेल, पण आज तसे करण्याला तेही कारण उरलेले नाही. सर्वांच्या म्हणजे कष्टजीवी जनतेच्या सुखाची, स्वातंत्र्याची आणि संस्कृतीची इयत्ता वाढण्याची शक्यता आजच्या भौतिक संशोधनामुळे निर्माण झालेली आहे. कष्टजीवी जनतेच्या सुखाच्या, स्वातंत्र्याच्या आणि सं कृतीच्या आड आज जर काही येत असेल, तर धनिकवर्गाचे मालकी हक्क हेच होत.

## श्रम, अस्तेय आणि असंग्रह

भांडवलशाही व्यवहारामुळे आजच्या समाजात वर्गयुद्ध माजले आहे. हे वर्गयुद्ध समाजवादी माजवीत नाहीत. तर हे वर्गयुद्ध माजणार नाही अशा तऱ्हेची नवी समाजसंचना घडवून आणण्यासाठी त्यांना प्रयत्न करावयाचे आहेत. हे प्रयत्न करण्यासाठी त्यांना शेतकरी-कामकरी वर्गाला संघटित केले पाहिजे आणि ते करीत असता जाती व धर्म ह्यांचे भेद विसरून वर्गभावना जागृत केली पाहिजे. ज्या धनिक वर्गाच्या मालकी हक्कांना ह्या समाजवादामुळे धोका येणार आहे, त्यांना सामान्य जनतेत फैलावणारी ही वर्गभावना भयंकर व भीषण वाटत आहे आणि म्हणून त्या जनतेला जातिनिष्ठेत व धर्मनिष्ठेत कुचमून ठेवण्यास जमातवादी राजकारणे व राजकीय पक्ष ते लोक निर्माण करीत आहेत. कष्टजीवी जनतेचे खरे हितशत्रू हे जमातवादी पुढारी आहेत. ह्या जमातवादी राजकारणापासून जनतेचे हित होणार नसून केवळ धनिक वर्गाचे हित काही काळ होणार आहे. पण तेही हित फार काळ टिकणार नाही. समाजधारणेला आज अत्यंत आवश्यक असणारी समाजवादी रचना अडवून धरण्यात धनिक वर्गाला अखेरीस यश येणार नाही. ही आवश्यक क्रांती अनत्याचाराने व अहिंसेने व्हावी असा महात्मा गांधींचा आग्रह आहे व राष्ट्रसभेलाही तेच इष्ट आहे. पण जनतेला अवश्य असणारी ही क्रांती राष्ट्रसभेने राजदंड हाती घेतल्यानंतर केवळ हितोपदेशाने घडून येईल अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनी आपल्या राजदंडाचा उपयोग धनिक वर्गाचे मालकी हक्क कमी कमी करण्याकडे आणि शेतकरी कामकऱ्यांचे राज्य स्थापन करण्याकडे झपाट्याने केला पाहिजे. ते तसे करतील तर त्यांना आपल्या राजदंडाचा क्रांतिधर्मास उपयोग करून दिल्याचे श्रेय लाभेल आणि हिंदुस्थानातील समाजवादी क्रांती अनत्याचारी मार्गाने घडू शकेल. समाजवाद हाच आजचा युगधर्म आहे आणि त्याच्या संस्थापनेनेच सत्य, अहिंसा इत्यादी म. गांधी उपदेशीत असलेली धर्माची सनातन तत्त्वे समाजघटनेत अधिकात अधिक प्रमाणात प्रकट होऊ शकतील. श्रम, अस्तेय आणि असंग्रह या तीन तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्यापूर्वी धनिकांचे स्तेय किंवा चोरी थांबविली पाहिजे आणि

त्यांचा संग्रह नष्ट केला पाहिजे. धनिक वर्ग श्रमिकांच्या धनाची जी कायदेशीर चोरी करतो, त्याला पिळवणूक असे नाव मार्क्सने दिले. या चोरीचा शास्त्रीय शोध त्याने लाविला म्हणून तो या नव्या युगधर्माचा द्रष्टा समजला जातो. हा नवा गुणधर्म जी क्रांती करू पाहत आहे त्याचे खरे ध्येय श्रम, अस्तेय व असंग्रह या तत्त्वांची स्थापना करावी हेच आहे, असेही म्हणता येईल. आजच्या परिस्थितीत ही सनातन तत्त्वे समाजात प्रस्थापित करण्याचा समाजवाद हाच मार्ग आहे, म्हणून त्याला युगधर्म असे म्हणता येते.

[*वाल्मिकी आश्रमातील प्रवचने,*
*सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,*
*पुणे, १९४७, पृ. १६ ते २२*]

९

# कम्युनिस्ट जाहिरनाम्याच्या चष्म्यातून

इ. स. १८४८ साली कार्ल मार्क्स आणि फ्रेड्रिक एन्जल्स यांचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या नावाने प्रसिद्ध असलेला जाहिरनामा युरोपात त्यावेळी असलेल्या कम्युनिस्ट लीग नावाच्या गुप्त क्रांतिकारकांच्या संस्थेच्या वतीने प्रसिद्ध केला. कम्युनिस्ट लीगचे एक अधिवेशन १८४७ च्या नोव्हेंबरमध्ये लंडन येथे भरले होते. त्या वेळी कार्ल मार्क्स आणि फ्रेड्रिक एन्जल्स या दोन पुढाऱ्यांच्याकडे आपल्या संस्थेचे ध्येय, धोरण आणि कार्यक्रम ज्यात नमूद केला आहे असा एक जाहिरनामा तयार करण्याचे काम सोपविण्यात आले होते. हे कार्य १८४८ मध्ये पुरे होऊन हा जाहिरनामा जर्मन भाषेत लिहिण्यात आला. त्याचे फ्रेंच भाषांतर १८४८ च्या जून महिन्यात पॅरिसमध्ये क्रांती झाली, त्याच्या आधी थोडे दिवस प्रसिद्ध करण्यात आले होते. या क्रांतीत कम्युनिस्ट पक्षाने कामगारवर्गाच्या संघटित शक्तीच्या सहाय्याने समाजवादी क्रांती करण्याचा पहिला प्रयत्न केला. तो विफल झाल्यानंतर त्या पक्षावर जी दडपशाही झाली ती लक्षात घेऊन कम्युनिस्ट लीगचे विसर्जन करण्यात आले. यानंतर हा जाहिरनामा बरीच वर्षे युरोपातील बहुतेक देशांत बेकायदाच होता. मधून मधून त्याची भाषांतरे निरनिराळ्या भाषांत होत व त्याला काही वर्षे प्रकाशात वावरता येई. पण कम्युनिस्ट पक्षाच्या व क्रांतिकारक कामगार संघटकांच्या बाहेर त्याला फारशी प्रसिद्धी मिळाली नव्हती. रशियातील १९१७ च्या क्रांतीनंतर त्या जाहिरनाम्याचे अध्ययन व प्रचार बहुतेक सर्व राष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आणि त्यातील तत्त्वांना व सिद्धांतांना सरकारमान्य प्रतिष्ठित विद्यापीठातील विद्वानांकडूनही हळूहळू मान्यता मिळू लागली. जे कम्युनिस्ट या विशिष्ट पक्षाचे सभासद नाहीत, तेही समाजवादाची शास्त्रीय उपपत्ती समजून घेण्यासाठी त्याला प्रामाण्य देतात आणि ज्यांना कम्युनिस्ट तत्त्वावर टीका करावयाची आहे तेही त्या तत्त्वज्ञानाचा एक आधारग्रंथ म्हणून त्याला मान्यता देतात. ज्याने हा ग्रंथ वाचलेला नाही, त्याला कम्युनिस्ट विचारांवर टीका करण्याचाही अधिकार प्राप्त होणार नाही असे म्हणण्यास हरकत नाही. तसेच हिंदू संस्कृतीचे अध्ययन करू

इच्छिणाऱ्यास भगवद्गीतेचे अध्ययन जितके अवश्य आहे तितकेच 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'चे अध्ययन प्रत्येक समाजवाद्यास अथवा त्याच्या टीकाकारास अवश्य आहे, असे म्हटले तर त्यात फारशी अतिशयोक्ती होणार नाही. तसेच भगवद्गीता हे जसे एक छोटे पण तात्त्विक व व्यावहारिक दोन्ही दृष्टींचा समन्वय करणारे धर्मपुस्तक आहे तसाच हा अगदी छोटा पण तात्त्विक व व्यावहारिक अशा समाजवादाच्या दोनही अंगांचा परिचय करून घेण्यास योग्य असा प्रमाणभूत ग्रंथ आहे. या ग्रंथाचे प्रभुत्व ज्यांच्यावर आहे असे क्रांतिकारक पक्ष आज जगातील प्रत्येक देशात पसरलेले असून जगातील पहिले समाजवादी राष्ट्र म्हणून ज्याची ख्याती आहे त्या राष्ट्राचा तो एक तात्त्विक दृष्ट्या आधारग्रंथ मानिला जातो. त्या ग्रंथाचे अध्ययन तेथील प्रत्येक तरुणास करावे लागते आणि त्या पक्षाच्या प्रत्येक सभासदास तो ग्रंथ प्रमाणभूतही मानावा लागतो. मानव-संस्कृतीत अपरिहार्य बनलेली समाजवादी क्रांती आज का घडत आहे, तिच्या पाठीमागे कोणती ध्येये व तत्त्वे आहेत, त्यांच्या मागे कोणाची शक्ती आहे, ही शक्ती वाढण्याची कारणे कोणती, तिला शिक्षक व तत्त्वज्ञान यांचा सतत पुरवठा कसा होतो आणि ही शक्ती कोणत्या परिस्थितीत, कोणत्या साधनांनी आणि कोणत्या प्रकारे प्रभावी होईल, या सर्वांचा उलगडा होण्यास या जाहिरनाम्याचा फार उपयोग होण्याजोगा आहे. तसेच आजच्या संस्कृतीत कोणती क्रांती समाजवादी करू पाहते व ती क्रांती झाल्यावर त्या संस्कृतीचे स्वरूप कसे असेल, यासंबंधीचे मार्क्सचे विचारही या छोट्या पुस्तकात थोडक्यात वाचावयास मिळतात. इतके या जाहिरनाम्याचे ऐतिहासिक महत्त्व असून जगातील सर्व प्रबल राष्ट्रांतील सरकारांनी व झार, मुसोलिनी व हिटलर यांसारख्या निष्ठुर व सर्वशक्तिमान गणिलेल्या सत्ताधिशांनी जे विचार नेस्तनाबूद करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, धर्माच्या, नीतीच्या व संस्कृतीच्या नावावर ज्यांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न शंभर वर्षे चालू आहे, परंतु जे विचार असल्या आसुरी शक्तीच्या माऱ्यालाही तोंड देऊन जगभर उघडपणे फैलावत आहेत, असे विचार या ग्रंथात प्रकट झालेले आहेत.

मार्क्सने या जाहिरनाम्याची प्रस्तावना करतानाच असे म्हटले आहे की, कम्युनिझमचे भूत आज सर्वत्र थैमान घालीत आहे अशी ओरड युरोपातील सर्व सत्ताधीश करीत आहेत आणि त्याला गाडून टाकण्यासाठी सर्व शत्रू आपापसांतील मतभेद विसरून एकत्र येत आहेत. पण भांडवलशाहीच्या जिवावर उठलेले हे भूत तिचा अंत केल्याखेरीज शांत होणार नाही. त्याने पुढे असेही दाखवून दिले आहे की हा समंध भांडवलशाहीनेच जागृत केलेला आहे आणि तोच आता तिच्या उरावर बसून तिचा प्राण घेणार आहे. भांडवलदारवर्गाची ही अवस्था, एखाद्या मंत्राक्षऱ्याने आपल्या मंत्रसामर्थ्याने अनेक भुते जागी करावी आणि त्यांना शांत करण्याचे सामर्थ्य मात्र त्याच्यापाशी नसावे, त्याच्या स्थितीप्रमाणे केविलवाणी झालेली आहे असे मार्क्सने जाहिरनाम्याच्या पहिल्या भागात वर्णन केले आहे.

हा सामाजिक क्रांतीचा समंध कसा जागृत होतो, याचा शास्त्रीय विचार करून त्याने असे दाखवून दिले आहे की, सामाजिक क्रांतीची प्रेरक शक्ती वर्गविग्रहातून निर्माण होत असते. हा वर्गविग्रह मानवी समाजाच्या ऐतिहासिक कालात सर्व समाजात नित्य चालू आहे. आतापर्यंतचा मानवी इतिहास हा वर्गविग्रहाने सर्वत्र व्याप्त असाच आहे. प्रत्येक समाजात दुसऱ्याच्या श्रमावर जगणारा आणि आपल्या श्रमातून निर्माण होणारे फल फक्त पोटापुरते स्वतः खाऊन सर्व वादावा मालकाच्या पदरात टाकणारा असे दोन वर्ग असतात. पहिला शोषक आणि दुसरा पीडित, अथवा पहिला पिळणारा व दुसरा पिळला जाणारा असे दोन वर्ग असणे असे आजपर्यंतच्या मानवसंस्कृतीचे एक शाश्वत लक्षणच आहे. आजच्या भांडवलशाही समाजातही हा वर्गविग्रह चालू असून शोषण, पीडन अथवा पिळवणूक करणारा वर्ग व त्याचे स्तुतिपाठक हेच तेवढे हा वर्गविग्रह नाकारीत असतात. या वर्गविग्रहाची बीजे आजच्या उत्पादन पद्धतीत आणि धनार्जन पद्धतीतच आहेत. आज उत्पादनपद्धती सामुदायिक बनली असून उत्पादनाची साधने–जमिनी, कारखाने, पेढ्या व दळणवळणाची साधने–यांच्यावर खाजगी मालकी आहे. उत्पादनपद्धती सामुदायिक आणि धनार्जनाचे मार्ग मात्र जुन्याच मालमत्तेच्या कायद्यानुसार खाजगी व्यक्तींच्या हाती आहेत. यामुळे मालक व मजूर अथवा भांडवलदार व कामगार असा हितविरोध व वर्गविग्रह निर्माण होत आहे. धनोत्पादनाची सर्व साधने भांडवलदार वर्गाच्या हाती गोळा होत असून संपत्तीचे संकलन आणि आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होत आहे. यामुळे राजसत्तेचेही केंद्रीकरण होत असून ही राजसत्ता लोकशाही स्वरूपाची दिसत असली तरी आजचे सरकार हे भांडवलदारांच्या कंपनीचे व्यवस्थापक अथवा कारभारीमंडळ बनले आहे, ज्यांच्या हाती धनोत्पादनाची साधने असतील व आर्थिक सत्तेची सूत्रे खेळत असतील, त्यांच्याच हाती राजसत्तेची सूत्रे असतात असा सार्वत्रिक नियम आहे असे मार्क्स सांगतो.

आज ज्या भांडवलदार, व्यापारी, कारखानदार, पेढीवाले या वर्गाच्या हाती आर्थिक व राजकीय सत्ता एकवटली आहे तो वर्ग एके काळी सरंजामदार वर्गाचा दास होता आणि त्याच्या हाती असणारी धनोत्पादनाची साधने फार छोटी व विखुरलेली होती. पुढे आफ्रिका व अमेरिका या खंडांचा शोध लागून व्यापार व बाजारपेठा यांना जागतिक स्वरूप प्राप्त झाल्यावर या वर्गाची भरभराट झाली आणि त्याच्या हातची उत्पादनसाधने वाढू लागली. सरंजामशाही युगातील सर्व बंधने त्यांच्या विकासास अडथळा करू लागली तेव्हा ती बंधने तोडून टाकून या वर्गाने नव्या उत्पादनपद्धतीस व विनिमयपद्धतीस पोषक असे व्यक्तिस्वातंत्र्याचे व अनियंत्रित स्पर्धेचे तत्त्व पुरस्कारून आपल्या स्वतःचा विकास करून घेतला. प्रथम सरंजामदारवर्ग, नंतर धर्माधिकारी व त्यानंतर राजे या सर्वांविरुद्ध यशस्वी बंडखोरी करून या वर्गाने नवा समाज व ही नवी राज्यपद्धती शोधून काढिली. हा नवा समाज व ही नवी राज्यपद्धती म्हणजेच आजची भांडवलदार लोकशाही होय. या

समाजात कामगारवर्गाचे शोषण चालू असून ते अप्रतिहत चालविता यावे म्हणून राजसत्तेने आर्थिक व्यवहारत हात घालू नये हे अनियंत्रणाचे तत्त्व तो पुकारीत असतो. पण या समाजात ज्या प्रचंड उत्पादनसाधनांच्या योगाने संपत्ती निर्माण होते, ती साधनेच आज इतकी वाढली आहेत व त्यातून निर्माण होणारे आर्थिक व्यवहार इतके संकीर्ण व विश्वव्यापक बनले आहेत की खाजगी मालमत्तेचा कायदा बदलून धनोत्पादनाची साधने सार्वजनिक मालकीची बनविल्यावाचून या समाजात चालू असणारा वर्गविग्रह थांबणे शक्य नाही.

हा वर्गविग्रह करण्यास लागणारी संघटना ही उत्पादनपद्धतीच करीत असते. देशभर पसरलेले व खेड्यापाड्यात विखुरलेले कामगार ही पद्धती एकत्र आणते. पोटासाठी व जगण्यासाठी ही पद्धतीच त्यांना संघटना करण्यास प्रवृत्त करते. रोज अनेक धंद्यांतील स्वतंत्र व प्रतिष्ठित धंदेवाले स्वातंत्र्य गमावून कामगारवर्गात लोटले जातात. हे नवे नवे बुद्धिमान, बेकार पण सुशिक्षित लोक कामगारवर्गाचे नेते बनतात आणि त्यांना आपला लढा शास्त्रीय पद्धतीने कसा चालवावा हे शिकवितात. छोटे व्यापारी, दुकानदार, वकील, डॉक्टर, इंजिनिअर, शेतकरी हे सर्व या बड्या भांडवलदाराचे दास बनून त्यांच्यापुढे लोटांगणे घालू लागतात व त्यांनाही कामगारक्रांती व समाजवाद ही तत्त्वे पटू लागतात. तसेच या समाजावर एकामागून एक अशी आर्थिक अरिष्टे गुदरु लागून मधून मधून त्यातील कारखाने, पेढ्या बंद पडून उत्पादनकार्यच स्थगित होते. भांडवलदार समाजाचे हे आचके वाढत जाऊन अखेरीस संघटित क्रांतिकारक कामगारवर्ग समाजवादी बनून त्याचा अंत करणार आहे. अशा प्रकारे भांडवलदारच आपल्या हातांनी आपले मारेकरी निर्माण करीत आहेत आणि आपली थडगी खणणारे व चिता रचणारे तयार करीत आहेत. या मारेकऱ्यांची वाढ व्हावी, त्यांची संघटना व्हावी आणि त्यांना सुशिक्षित व सुविद्य नेते मिळावे अशीच या समाजाची उत्पादनपद्धती व आर्थिक संघटना आहे.

### क्रांतितंत्र कोण शिकविते ?

यापुढे मार्क्सने असे दाखवून दिले आहे की, या भांडवलदार वर्गाला जमीनदार वर्गाविरुद्ध, धर्माधिकारी वर्गाविरुद्ध, राजांविरुद्ध, परकीय भांडवलदारांविरुद्ध आणि आपल्यातीलच पोटवर्गाविरुद्ध अनेक लढे करावे लागतात. या लढ्यात त्याला कामगारवर्गास राजकीय क्रांतितंत्र शिकवून त्यांचे सहाय्य घ्यावे लागते. लोकशाहीची व सामाजिक समतेची शिकवण द्यावी लागते. राजसत्तेविरुद्ध क्रांती करण्याचे शिक्षण मिळालेला हा कामगारवर्ग त्याच तंत्राचा उपयोग करून लोकशाहीचा लढा पुरा करणार आहे आणि भांडवलदार लोकशाहीला समाजवादी लोकशाहीचे स्वरूप आणून देणार आहे. सत्तारूढ वरिष्ठ वर्ग जबरदस्तीने दूर लोटल्यावाचून आपल्या हातची सत्ता सोडत नाही, हे शिक्षण

कामगारांना प्रथम भांडवलदारांनी जमीनदाराविरुद्ध व राजांविरुद्ध लढताना दिलेलेच आहे. आता तीच विद्या त्यांचे शिष्य आपल्या गुरुंवर उलटविणार आहेत. एके काळी भांडवलदार वर्ग हाच क्रांतिकारक वर्ग होता. वर्गविग्रहही तो करीत असे. धर्म, समाज-संघटना, राज्यघटना या सर्वांत त्याने क्रांती केली. उत्पादनपद्धतीत क्रांती केली. खेड्या-तील धंदे उद्‌ध्वस्त केले. मागासलेले देश गुलाम केले. व्यापार व बाजारपेठा यांना जागतिक स्वरूप दिले. शेतकऱ्यांचे जोडधंदे आणि जित देशातील सर्व धंदे नष्ट केले. पण आता खाजगी मालमत्ता नष्ट करून सार्वजनिक कारखानदारी, जमीनदारी व सावकारी करण्यास तो विरोध करीत आहे. आता तो प्रतिक्रांतिकारक बनला आहे आणि प्रातिनिधिक राज्ययंत्र आपल्या कबजात घेऊन कामगारवर्गावर गोळ्या घालीत आहे. देशातील नव्वद टक्के लोकांचे मालकी हक्क व मालमत्ता यांचा अपहार त्यांने केलाच आहे. आता त्याच्या मालकीत देशातील सर्व धन गोळा झाले आहे. हे चोरलेले धन त्याच्यापासून हिरावून घेऊन ते समाजाच्या मालकीचे करणे हेच समाजवादी क्रांतीचे ध्येय आहे. यात चोरी नसून चोराने लुबाडलेली संपत्ती त्यांच्यापासून हिरावून घेण्याची ही क्रिया आहे. काम-गारांच्या कष्टाचे फळ ज्यांनी लुबाडून घेतले, त्याची वाढही जे त्याचे रक्तशोषण करूनच करीत असतात, त्यांचे मालकी हक्क नष्ट करणे याचा अर्थ चोराने चोरून मिळविलेले मालकी हक्क नष्ट करणे एवढाच आहे, पण ही क्रांती केवळ कामगारवर्गच करू शकेल.

कामगारवर्गाव्यतिरिक्त इतर अनेक वर्गही भांडवलदारवर्गाविरुद्ध भांडत असतात. छोटे शेतकरी, छोटे व्यापारी, गरीब मध्यमवर्ग, छोटे दुकानदार व धंदेवाले, हस्तव्यवसायाने पोट भरणारे ग्रामोद्योगवाले, हे सर्व भांडवलदाराविरुद्ध ओरड करीत असतात आणि "त्यांचे नियंत्रण करून आमचे रक्षण करा" असे म्हणत असतात. हे सर्व आपणास समाजवादी समजूही लागतात व या प्रत्येक वर्गातून भांडवलदारांचे नियंत्रण करण्याच्या अनेक योजना पुढे येत असतात. या योजनांना काही लोक भोळेपणाने व काही लोक भामटेपणाने समाज-वादी योजना अशी नावे देत असतात. पण जुनाट अर्थोत्पादनपद्धती टिकवून धरण्याचे हे सर्व प्रयत्न वस्तुतः क्रांतिकारक किंवा समाजवादी नसून ते प्रतिक्रांतिकारकच असतात. कामगारवर्गाला आपला लढा चालवित असताना भांडवलशाही समाजाचे जे स्वरूप अनुभवास येते तेच त्या समाजाचे खरे स्वरूप आहे आणि या लढ्यातून कम्युनिस्ट क्रांतीचे तत्त्वज्ञान आणि त्याचे सिद्धांत जन्मास येत असतात. हे अनुभवगोचर वास्तववादी शास्त्र असून ते कोणा महान विभूतीच्या डोक्यातून स्फुरण पावणारे नाही. त्याचा विकास करण्याची स्फूर्ती व दृष्टी तो लढा चालवितानाच मिळत असते. कम्युनिस्ट पक्ष हा काही कामगारवर्गाहून अलग असा त्याचे नेतृत्व करू पाहणारा अनेक कामगारपक्षांपैकी एक परोपकारी पक्ष नव्हे. कम्युनिस्ट पक्ष हा कामगारवर्गाच्या अनुभवांशी, आशाआकांक्षांशी, आचार-विचारांशी समरस बनलेला, त्यांना तोंड फोडणारा, त्यांना मूर्त करून व्यक्त रूप

देणारा, वर्गलढ्याच्या आघाडीवर उभा राहून अखेरपर्यंत लढणारा असा पक्ष आहे. असे जो करील तोच खरा कम्युनिस्ट पक्ष होय. कामगारवर्गाचे क्रांतिकारक नेतृत्व करणारा जो पक्ष त्यालाच कम्युनिस्ट पक्ष म्हटले पाहिजे. या क्रांतिकारक वर्गाहून भिन्न अथवा त्याचा हार्दिक पाठिंबा नसणारा असा पक्ष कम्युनिस्ट पक्ष होऊ शकत नाही. तात्पर्य, कामगार-वर्गाशी समरस झालेला व त्याच्या आशाआकांक्षा व्यक्त करून त्याच्या क्रांतिकार्यात नित्य आघाडीवर राहणारा वर्ग हाच खरा कम्युनिस्ट पक्ष होय असे मार्क्सने या जाहिरनाम्यात म्हटले आहे. अर्थात आम्ही कामगार व कारखानदार या दोघांचेही हित करतो असे म्हणणारा पक्ष म्हणजे मी चोर आणि साव या दोघांचे हक्क शाबूत ठेवतो असे म्हणणारा पक्ष असून त्याच्या म्हणण्यातच विसंगती आहे असे मार्क्सचे मत आहे.

आजपर्यंत ज्या क्रांत्या झाल्या त्यात एका वर्गाचे मालकी हक्क नष्ट होऊन दुसऱ्या वर्गाच्या हक्कांची वाढ झाली आणि एका वर्गाची पिळवणूक थांबून दुसऱ्या वर्गाची पिळवणूक निर्माण झाली. पण आता सर्वांत तळचा कामगारवर्गच क्रांती करीत असल्याने खरा वर्गहीन समाज यापुढे स्थापन होणार आहे. असा वर्गहीन समाज निर्माण होऊन सर्व संपत्ती समाईक झाली म्हणजे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावर प्रभुत्व स्थापन करण्यासाठी निर्माण झालेले राज्ययंत्र गळून पडेल व मग फक्त समाईक संपत्तीची व्यवस्था ठेवणारी एक नियामक संस्थाच राहील. माणसांवर राज्य करणे हे तिचे स्वरूप न उरता समाईक उत्पन्न चालू ठेवणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा उपभोग घेण्यास सर्वांस सहाय्य करणे, सर्वांच्या उद्धारातच प्रत्येकाचा उद्धार आहे व प्रत्येकाचा उद्धार हाच सर्वांचा उद्धार असा अनुभव या वर्गहीन समाजातच सर्वांना येऊ शकेल.

## आक्षेपांचे निरसन

कार्ल मार्क्सने या जाहिरनाम्यात समाजवादी तत्त्वज्ञानावर जे आक्षेप घेण्यात येत असतात, त्यांचे निरसन थोडक्यात पण जोरदार आणि मुद्देसूद भाषेत केले आहे. पहिला आक्षेप असा की, तुम्ही कष्टार्जित संपत्ती व मालकी हक्क नष्ट करणार आहात. त्यावर त्याने असे उत्तर दिले आहे की, भांडवलदारांनी कष्टजीवी वर्गाच्या श्रमफलांचा अपहार करून शेकडा नव्वद लोकांचे मालकी हक्क व कष्टार्जित संपत्ती यांचा अपहार आधीच केलेला आहे व आपले मालकी हक्क विनकष्टाने वाढविलेले आहेत. त्यांच्या संपत्तीचा व मालकी हक्कांचा अपहार करून त्यावर समाजाची मालकी स्थापन करण्यात काहीच अयोग्य नाही. दुसरा आक्षेप असा घेण्यात येतो की, मालकी हक्क व खाजगी धनसंग्रह यांची वाढ करण्याचे हक्क नष्ट केल्यास उत्पादनाचे कामच बंद पडेल. यावर मार्क्सचे उत्तर असे आहे की, मालकी हक्कांची व धनसंग्रहांची वाढ करण्याचे हक्क ज्यांना आहेत, ते आज कोणतेही काम करीत नसतात आणि ज्यांना उत्पादनाचे काम करावे लागते त्यांना मालकी हक्क किंवा संग्रह यांची

वाढ करता येत नाही. आजच्या समाजात संग्रह आणि श्रम यांचे प्रमाण व्यस्त आहे. आमच्या समाजातच ते प्रमाण सम होणार आहे. सर्वांना आपल्या श्रमफलांचा पूर्ण उपभोग मिळावा आणि एकाच्या श्रमाची फळे दुसऱ्याने उपटू नयेत अशी व्यवस्था करण्यासाठीच उत्पादनसाधनांवरची मालकी सार्वजनिक करावयाची आहे. असे केल्याने श्रम करणारांना मिळणारा धनार्जनाचा व उपभोगाचा भाग वाढणार आहे. तो कमी होणार नाही. फक्त ऐदी निरुद्योग्यांचा स्वामित्वाने धनसंग्रह करण्याचा अपहारहक्क नष्ट होणार आहे. सर्वांची मालमत्ता नष्ट होणार नसून फक्त भांडवलदारी मालमत्ता समाजाची बनणार आहे. यामुळे श्रम करणारांचा उपभोग वाढणार आहे.

समाजवादी अमदानीत व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होणार या आक्षेपाला मार्क्सने असे उत्तर दिले आहे की असे म्हणणारे लोक 'व्यक्ती' म्हणजे भांडवलदार आणि 'स्वातंत्र्य' म्हणजे भांडवलदारी स्वातंत्र्य असा अर्थ करीत असतात. हे भांडवलदार व्यक्तींचे भांडवलदारी व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य आम्ही नष्ट करणार आहो, पण असे केल्याने इतरांच्या व्यक्ति-मत्त्वाचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व संवर्धनच होणार आहे. चौथा आक्षेप असा घेण्यात येतो की, समाजवादी लोक कुटुंबसंस्था नष्ट करून सर्व स्त्रिया समाईक मालकीच्या बनविणार आहेत. पण स्त्रिया ही कोणाच्या मालकीची मालमत्ता आहे किंवा त्या केवळ उत्पादनसाधने आहेत अशी भावना असणाऱ्या भांडवलदारी वृत्तींतूनच हा आक्षेप उत्पन्न झालेला आहे. स्त्री ही उत्पादन-साधन किंवा मालमत्ता नव्हे. हेच समाजवाद्यांना शिकवावयाचे आहे. आज भांडवलदार धनिकांनी गरिबांची कुटुंबसंस्था नष्ट करून त्यांच्या बायकामुलींचा बाजार थाटलेला आहे आणि त्याला वेश्याव्यवसाय असे नाव देण्यात येत असते. धनार्जनाच्या इतर धंद्याप्रमाणे हा धंदाही धनिक वर्ग करीत असून निर्धन जनतेच्या स्त्रियांचा क्रयविक्रय करीत असतो. गरिबांच्या कुटुंबांचा विध्वंस करून आणि त्यांना कौटुंबिक जीवन अशक्य करून बाजारात मांडण्यात येणाऱ्या या स्त्रियांवरही संतोष न पावल्यामुळे हा धनिक वर्ग आपल्या वर्गातील व्यक्तींची कुटुंबे फोडून त्यांच्या स्त्रियाही भ्रष्ट करीत असतो. अशी जी धनिक वर्गाचा पैशावर उभारलेली कुटुंबसंस्था आहे, ती मात्र समाजवादी चालू देणार नाहीत हे उघड आहे.

यानंतर शिक्षण, संस्कृती व धर्म यांचा विध्वंस समाजवादी करणार आहेत. या आक्षेपाचेही असेच निरसन करण्यात आले आहे. आजपर्यंत अनेक क्रांत्या झाल्या तरी वर्गसंस्था टिकून होती, यामुळे शिक्षण, संस्कृती व धर्म या सर्व संस्थांनी वर्गसंस्थेला पाठिंबाच दिला आहे. हे शिक्षण, ही संस्कृती व ही धर्मसंस्था यांची आता गरज उरणार नाही. कामगारसंस्कृती ही वर्गहीन संस्कृती होणार असल्याने तिचे स्वरूप आजपर्यंतच्या कोणत्याही संस्कृतीहून अत्यंत भिन्न असेच असेल. एवढे थोडक्यात सुचवून मार्क्सने हा आक्षेप निरसनाचा भाग पुरा केलेला आहे.

येथपर्यंत कार्ल मार्क्स याच्या जाहिरनाम्याच्या पहिल्या दोन विभागांचा संक्षिप्त गोषवारा दिला. त्यावरून या जाहिरनाम्यातील बहुतेक महत्त्वाच्या मुद्यांची ओळख वाचकांस होईल, अशी आशा आहे. जाहिरनाम्यातील तत्त्वांच्या दृष्टीने चालू लागलो तर त्यासंबंधी आपणास काय दिसते ते पाहू. हा जाहिरनामा, शंभर वर्षांपूर्वी युरोपखंडात जेव्हा इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड या तीन देशात लोकशाहीची क्रांती यशस्वी करून भांडवलदारवर्ग अधिकारारूढ झाला होता त्यावेळी या लोकशाहीचे भांडवलदारी स्वरूप नष्ट करून तिला समाजवादी स्वरूप देऊ पाहणाऱ्या, क्रांतिकारक कामगार संघटनेच्या वतीने कार्ल मार्क्सने काढिला होता. अद्यापि या तीन देशांत समाजवादी क्रांती घडलेली नाही. यावरून आमच्या देशातील काही लोकांना असा भ्रम होण्याचा संभव आहे की ज्याअर्थी गेल्या शंभर वर्षांत या भांडवलदार लोकशाही देशात समाजवादी क्रांती यशस्वी होऊ शकली नाही, त्याअर्थी आपल्या हिंदुस्थान देशातही समाजवादी क्रांती आणखी पाच-पन्नास वर्षे तरी होण्याचा बिलकुल संभव नाही. पण हा शुद्ध भ्रम आहे. ज्यावेळी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाला त्यावेळी युरोपीय देशांनी आपली प्रचंड साम्राज्ये आशिया खंडात विस्तारलेली असल्यामुळे आणि जगातील मागासलेल्या देशांची लूट करण्यास त्यांना भरपूर क्षेत्र आणि मुबलक अवकाश मिळाल्यामुळे, सर्व जगातून लूटमार करून नेलेल्या धनाचा काही अंश आपल्या देशातील निर्धन कामगारांना थोड्या-थोड्या प्रमाणात एकसारखा देत राहून, त्यांनी समाजवादी क्रांतीपासून भांडवलशाहीचा बचाव केला आणि आपल्या देशातील लोकशाहीचे भांडवलदारी स्वरूप कायम ठेविले. परंतु असे करण्यासाठी त्यांनी हिंदुस्थानप्रभृती आशियातील राष्ट्रांची संपत्ती इतकी धुवून नेली की, ही सर्व राष्ट्रे केवळ शेतकरी कामकरी वर्गाची गुलाम राष्ट्रे बनली. येथे युरोप खंडातील भांडवलशाहीशी स्पर्धा करणारा भांडवलदार वर्गही आपल्या शक्तीने आपले डोके वर काढू शकला नाही. पुढे इटली व जर्मनी हे युरोपियन देश पुढे येऊन जर्मनी, ऑस्ट्रिया आणि तुर्कस्थान यांनी ब्रिटिश, फ्रेंच व डच यांच्या साम्राज्यांविरुद्ध महायुद्ध पुकारले. यात जर्मनीचा पाडाव झाला. तरीही इंग्लंड, फ्रान्स व हॉलंड यांचा साम्राज्य हादरलीं आणि भांडवलशाही संस्कृती मोडकळीस येऊन गडगडू लागली.

या भांडवलशाही संस्कृतीला उखडून पाडून तिला कायमची गाडून टाकणारा कम्युनिझम याच युद्धामध्ये १९१७ साली रशियात विजयी झाला आणि आपल्या धर्तीवर सर्व युरोपात आणि आशियात क्रांत्या करण्याचे प्रयत्न त्याने गेली तीस वर्षे सतत चालविले आहेत व या काळात १९३९ साली सुरू झालेले दुसरे महायुद्ध होऊन गेले आणि या युद्धानंतर रशिया हे कम्युनिस्ट राष्ट्र सर्व पूर्व युरोप आपल्या कक्षेत आणून बर्लिनपर्यंतचा प्रदेश आपल्या पायांखाली घालून बसले आहे. आशिया खंडातील निम्मा चीन कम्युनिस्ट राज्य स्थापन करून, उरलेल्या निम्म्या चीनवर आक्रमण करू लागला आहे.

सर्व मुसलमानी राष्ट्रे आणि हिंदुस्थान यांच्या सरहद्दीपर्यंत रशियाचे कम्युनिस्ट राज्य पसरलेले असून या प्रचंड राष्ट्रांशी टक्कर देण्याचे सामर्थ्य एकट्या अमेरिकेखेरीज इतर कोणत्याही राष्ट्रास नाही, याबद्दल आज कोणासही शंका नाही. अमेरिकेलाही रशियावर चढाई करून विजय संपादन करण्याची शक्ती कितपत आहे ही शंकाच आहे. तथापि रशियाचे बळ आणि प्रभाव एकसारखा वाढत असल्याने त्याचा बंदोबस्त लवकरच केला पाहिजे. या वृत्तीने अमेरिका आज आक्रमक धोरण स्वीकारीत आहे. पश्चिम युरोपातील इंग्लंड, फ्रान्स आदी लोकशाही राष्ट्रे आज हतबल होऊन, अमेरिकेच्या कक्षेत जाऊ लागली आहेत व त्या विभागात लोकशाही पद्धतींचा समाजवाद स्थापन करण्याची भाषा, तेथील लोक बोलत आहेत. इंग्लंडातही लोकशाही पद्धतीने समाजवादी मंत्रिमंडळ अधिकारावर आलेले आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता, लोकशाहीचे भांडवलदारी स्वरूप आता जगात कोठेही टिकू शकत नाही, हे सर्वमान्य झाले आहे.

आपला देश नुकताच स्वतंत्र होऊन, त्यात भांडवलदार लोकशाही स्थापन झाली आहे. या लोकशाहीवर ज्या काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व आज स्थापन झाले आहे ती काँग्रेस अद्यापि समाजवादाची जहाल भाषा बोलू लागली नसली तरी समाजवादी लोकशाही हेच आमचे ध्येय आहे असे ती म्हणत आहे. पं. नेहरू हे तिचे आज सर्वश्रेष्ठ नेते असून, ते जग-प्रसिद्ध समाजवादी आहेत व राष्ट्रीय सभेला त्यांची मते सर्वस्वी मान्य नसली तरी त्यांच्या नेतृत्वावाचून तिला या देशावर राज्य करणे अशक्य आहे. तेव्हा समाजवादी लोकशाही ही आता या देशात स्थापन होणे अपरिहार्य झाले आहे, हे कोणासही नाकारता येणे शक्य नाही. तथापि राष्ट्रीय सभेतून भांडवलदार वर्गाचे उच्चाटन झालेले नाही आणि तिची सूत्रे कामगारवर्गाशी समरस व एकरूप झालेल्या समाजवादी पक्षाच्या हाती आलेली नाहीत. म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर समाजवादी पक्ष आज तिच्यातून बाहेर पडत आहे. यामुळे राष्ट्रीय सभा ही एक नेमस्त समाजवादी अशी संस्था बनत आहे.

समाजवादी पक्ष हा "प्रत्यक्ष प्रतिकार आणि सत्याग्रह या मार्गांनी समाजवादी लोक-शाहीची स्थापना आम्ही करू आणि राष्ट्रीय सभेला अवश्य असल्यास सनदशीर विरोध करू" असे म्हणत आहे. निःशस्त्र क्रांती हे त्याने आपले धोरण जाहीर केले आहे. जोपर्यंत देशातील राज्ययंत्र लोकशाही स्वरूपाचे आहे आणि लोकशाहीला आधारभूत असे मत-स्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य आणि संघटनास्वातंत्र्य हे हक्क शाबूत आहेत, तोपर्यंत आपणास शांततेच्या व न्यायाच्या मार्गाने समाजवादी क्रांती करता येईल, असा विश्वास या पक्षाचे अधिकृत नेते बोलून दाखवितात आणि काँग्रेसच्या नावाने राज्य करणाऱ्या पक्षाने जर लोकशाही राज्य नष्ट केले नाही, तर प्रत्यक्ष प्रतिकाराच्या पण शांततेच्या मार्गापासून हा पक्ष ढळेल, असे वाटत नाही. परंतु १९४२ साली ब्रिटिश सत्तेने जशी हिटलरशाही या

देशात गाजविली तशी हिटलरशाही युद्धाच्या किंवा इतर कोणत्या तरी सबबीने जर या देशात निर्माण झाली तर हा पक्ष आपले कार्य या धोरणाने चालवू शकणार नाही. ज्या परिस्थितीत म. गांधींना सुद्धा ब्रिटिश सरकारला असे बजावून सांगावे लागले की १९४२ च्या ८ ऑगस्टनंतर जे शोचनीय प्रकार घडून आले, त्यांची सर्व जबाबदारी एकट्या सरकारच्याच माथ्यावर आहे आणि सरकारनेच लोकांना अत्याचारास प्रवृत्त केले, ज्या परिस्थितीत म. गांधीसारख्या तपस्वी सत्याग्रही यतीलाही जर असे म्हणून स्वस्थ बसावे लागले, तर तशीच परिस्थिती निर्माण झाल्यास समाजवादी पक्ष लोकांना शांत ठेवू शकेल, अशी अपेक्षा कोणाही सुज्ञ मनुष्यास करता येणार नाही. समाजवादी पक्ष हा विवेकी पक्ष आहे. सन्मार्ग सोडू नये, लोकशाही मोडू नये आणि अविवेकी हिंसा करू नये अशी त्यांची वृत्ती आहे आणि ही वृत्ती नष्ट न होता, वाढत जाण्यास अनुरूप व अनुकूल अशी परिस्थिती कायम ठेवण्याची जबाबदारी काँग्रेसच्या नावाने राज्य करणाऱ्या मंत्रिमंडळावर आहे. त्यांचा जर लोकशाहीवर आणि नागरिक हक्कांवर विश्वास असेल आणि कठोर तत्त्वनिष्ठेने त्यांनी त्यांचे रक्षण केले, तर या देशात समाजवादाची स्थापना करण्यासाठी रक्तपाती क्रांती टाळण्याची जबाबदारी समाजवादी पक्ष आपल्या हिंमतीवर पार पाडू शकेल असे आम्हास वाटते.

ही परिस्थिती कायम टिकेल, तर राष्ट्रीय सभेचा नेमस्त सनदशीर मार्ग आणि समाजवाद्यांचा प्रत्यक्ष प्रतिकारी निःशस्त्र क्रांतिमार्ग या दोहोंच्या सहाय्याने हिंदुस्थान लोकशाही समाजवादाची स्थापना करील, कम्युनिस्टांचा सशस्त्र क्रांतिमार्ग या देशाला अनुसरावा लागणार नाही, असे आम्हास वाटते. अर्थात तो मार्ग चोखाळावा लागल्यास देशातील लोकशाही मोडेल हे उघड आहे. तसेच सशस्त्र क्रांतीनंतर जो एकपक्षीय अनियंत्रित सत्ता स्थापन होते, तिच्या अमदानीत नागरिकस्वातंत्र्य नष्ट होते व विरोधी पक्षसंघटना उखडून टाकण्यात येतात. रशियातील ही अनियंत्रित हुकूमशाही पाहिली असता या मार्गाने जाणे कोणासही इष्ट वाटणार नाही म्हणून समाजवाद्यांच्या निःशस्त्र क्रांतीचा मार्गच अखेरीस इष्ट व शक्य असा या देशात ठरेल असे वाटते. या मार्गाचे श्रेष्ठत्व म. गांधींनी या देशास शिकविले असून त्यांच्या निधनानंतर त्या मार्गाने जाऊन आपण समाजवादी लोकशाही निर्माण करू हा विश्वास साथी जयप्रकाश प्रभृतींना आज वाटत आहे. येथील लोकशाही नष्ट करण्याइतका कम्युनिस्ट पक्ष प्रबल व प्रभावी होण्याचे वस्तुतः आज काहीच कारण नाही. पण राष्ट्रीय सभापक्षानेच समाजवादी पक्षाला उखडून टाकण्याचे धोरण स्वीकारले तरच कम्युनिस्ट पक्ष जोरास लागेल. पण मग लोकशाहीचा अंत राष्ट्रीय सभापक्षानेच केला असे म्हणावे लागेल. समाजवादी पक्ष हा जी साधने वापरू इच्छित आहे, ती राष्ट्रसभेनेच त्याला शिकविलेली आहेत हे लक्षात घेऊन त्याला शांततेने आपला

मार्ग चोखाळू दिल्यास लवकरच येथे जी लोकशाही स्थापन होत आहे तिचे समाजवादात रूपांतर होईल.

## गांधींचे कार्य आणि समाजवाद

गांधींचे खरे वारस कोण हा वाद निरर्थक आहे. म. गांधींच्या कल्पनेप्रमाणे सर्व राष्ट्रसभा सर्वोदय समाज बनली नाही आणि पं. नेहरूंच्या मताप्रमाणे ती समाजवादीही पूर्णपणे बनली नाही. टिळक-गोखले यांच्याप्रमाणे जयप्रकाश-जवाहरलाल हे जहाल-मवाळ राजकारण करीत आहेत. दोघांना एकत्र ठेवून दोघांच्या सहकार्याने कार्यभाग साधून देणारी शक्ती म. गांधींनी आपल्या आत्मबलाच्या प्रेरणेने राष्ट्रसभेत निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने ती नष्ट झाली आहे. सर फेरोजशहा यांच्या हट्टामुळे पूर्वी सुरतेस राष्ट्रसभा दुभंगली आणि गोखले व टिळक एकमेकांपासून दुरावले. त्यामुळे स्वराज्य लांबणीवर पडले, राष्ट्रसभा राष्ट्रीयत्व गमावून बसली आणि देशात अत्याचार व दडपशाही यांचा प्रादुर्भाव झाला. या आपत्ती टाळण्यास मंत्रिमंडळे पं. नेहरूंच्या धोरणाने चालवून त्यांचे बाहेरून नियंत्रण करण्याची सत्ता साथी जयप्रकाश किंवा आचार्य नरेंद्र देव यांच्या हाती देणे आवश्यक होते. हे जर कोणी केले असते तर त्यांना गांधींच्या राजकीय वारशावर हक्क सांगता आला असता. आता दोन पक्ष अलग झाले त्याचे दुष्परिणाम भोगावे लागणारच. पण आता हे दुष्परिणाम किमान प्रमाणातच रहावे एवढी तरी काळजी उभयपक्षी घेतली जावी. आज गांधी नाहीत, तरीही त्यांनी निःशस्त्र क्रांतीचा जो मार्ग दाखवून दिला, त्यामुळे समाजवाद्यांना एक नवी दृष्टी लाभली आहे. मार्क्सच्या वेळी निःशस्त्र क्रांतीचा पर्याय जगाला माहीत नव्हता. तो पर्याय म. गांधींनी आम्हास शिकविला. त्या मार्गाने जाण्याचे धोरण आखणारा एक समाजवादी पक्ष पुढे आला हाही गांधींचाच प्रभाव आहे. पण ब्रिटिश मुत्सद्यांनी शहाणा स्वार्थ लक्षात घेऊन शांतता-रक्षण करताना कठोर वृत्ती स्वीकारली तरी, निःशस्त्र क्रांतिकारकांना सशस्त्र क्रांतिकारकांप्रमाणे उखडून काढण्याचे अविवेकी धोरण स्वीकारले नाही, तोपर्यंतच गांधींना राष्ट्रसभा निःशस्त्र क्रांतीच्या मार्गावर ठेवता आली. चर्चिल मंत्रिमंडळाने हा विवेक गुंडाळून ठेविला तेव्हा गांधींनाही त्यात अपयश येऊ लागले. पण थोड्याच काळात चर्चिल गेले आणि गांधी यशस्वी झाले. हे शहाणपण पं. नेहरू यांच्या व्यतिरिक्त किती मंत्री दाखवितील आणि पं. नेहरूंची समाजवादी लोकशाही संस्कृती त्यांच्या अंगी किती प्रकट होईल, यावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे. पं. नेहरूंच्या वृत्तीशी व विचारांशी ते जितके समरस होतील आणि म. गांधींच्या असामान्य निरपेक्ष अहिंसावादाची भाषा सोडून सापेक्ष नीतीच्या वृत्तीने लोकशाही राज्य चालवितील तितक्या प्रमाणात हिंदी समाजवादी पक्ष निःशस्त्र क्रांतीच्या मार्गावर खंबीर राहून समाजवादाची संस्थापना करील आणि गांधींचे कार्य चिरंतन करण्याचा व्यवहार्य व शास्त्रीय मार्ग जगाला दाखवून देईल.

मार्क्सवादात जर कोणती भर घालणे हिंदुस्थानला शक्य असेल तर ती एवढीच होय. म. गांधी जिवंत असते, तर त्यांनी हे करण्यात मार्गदर्शन केले असते. पण आता त्यांनी जेवढे कार्य केले तेवढे चिरंतन करण्याचा हाच मार्ग आहे. पं. नेहरू व साथी जयप्रकाश हे आजचे गोखले-टिळक आहेत. गांधी प्रत्येक पिढीस कसे लाभणार? तथापि ज्यांनी आपले संस्कार या दोनही पुढाऱ्यांवर भरपूर केले आहेत तेच त्यांचे कार्य शक्य तितके पुढे चालवितील. कम्युनिस्ट जाहिरनाम्याच्या चष्म्यातून आजच्या हिंदी राजकारणाचे स्वरूपदर्शन आम्हास असे होत आहे.

[*नवभारत, मे १९४८, पृ. १९ ते २३*]

१०

# डॉ. लोहिया आणि हिंदी समाजवाद

[या लेखात आचार्य जावडेकरांनी मुख्यत्वे लोहियांच्याच विचारांचा पाठपुरावा केला आहे. तथापि लोहियांची मांडणी त्यांना "अंधारातील प्रकाशा"सारखी वाटली आणि हे विचार "समाजवादी पक्षच राष्ट्राला तारू शकेल ही आशा वाढविण्यास अनुरूप" वाटले. म्हणून या लेखातील काही उतारे येथे घेतले आहेत. १९५२ मध्ये पंचमढी येथे भरलेल्या समाजवादी पक्षाच्या अधिवेशनापुढील लोहियांच्या भाषणावर हा लेख आधारित आहे. समाजवादी पक्षाविषयीचा आचार्यांचा आशावाद या लेखात स्पष्ट दिसून येतो. पुढे जेव्हा प्रजा समाजवादी पक्ष स्थापन झाला तेव्हाही आचार्यांनी "प्रजा समाजवादी पक्ष आणि मार्क्स-गांधी" या मथळ्याची लेखमाला नोव्हेंबर १९५२ मध्ये 'साधने'त लिहिली आणि गांधीवादी व मार्क्सवादी कार्यकर्ते "लोकशाही समाजवादी" पक्षात एक झाले याबद्दल समाधान व्यक्त केले. याच लेखमालेत त्यांनी मार्क्स आणि गांधींच्या विचारांचा जो ऊहापोह केला तो या संग्रहात तिसऱ्या भागात समाविष्ट केला आहेच.

मात्र प्र. स. पक्षातील अंतर्गत वादंगामुळे तो लवकरच फुटीच्या उंबरठ्यावर पोहोचला आणि "प्रजा समाजवादी पक्षावरील गंडांतर" असा लेख लिहिण्याची वेळ आचार्यांवर आली ('साधना', १६ व २३ जुलै १९५५). कॉंग्रेसशी असणारे संबंध आणि सर्वोदयासंबंधीची भूमिका या मुद्यांवरून लोहियांनी अशोक मेहता, जयप्रकाश यांच्यावर प्रखर टीका केली होती. त्यावर या लेखांमध्ये प्रतिक्रिया व्यक्त करताना आचार्यांनी लोहियांच्या कार्यपद्धतीवर स्पष्ट टीका केली. लढाऊपणाच्या खोट्या कल्पना सोडाव्यात असा सल्लाही त्यांनी दिला. खाली दिलेल्या उताऱ्यांवरून लोहियांशी आचार्य वैचारिकदृष्ट्या बव्हंशी सहमत असल्याचे दिसते. मात्र नेहरू, जयप्रकाश, विनोबा यांच्याविषयीचे आचार्यांचे मूल्यमापन लोहियांहून भिन्न होते. तसेच लोहियांची आक्रमक भाषा आणि स्वपक्षीय नेत्यांवर तुटून पडण्याची पद्धत या बाबी आचार्यांना मानवणाऱ्या नव्हत्या. म्हणूनच पुढे १९५५ मधील लेखनात त्यांनी लोहियांना आपला स्पष्ट विरोध नोंदवला.]

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्योत्तर राजकारणात समाजवादी पक्ष स्वतंत्र राजकीय पक्ष म्हणून कार्य करू लागल्यापासून आपल्या राजकीय कार्याबरोबरच या पक्षाने तत्त्वचिंतनाचे कार्यही तितक्याच हिरीरीने पुढे चालू ठेवले आहे. समाजवादाचे सर्वांगीण सामाजिक तत्त्वज्ञान भारताच्या समाजवादी पुनर्घटनेला परिणामकारक मार्गदर्शन कसे करू शकेल याचा मूलगामी

विचार पक्ष परिषदांतून होत आला आहे. पंचमढी पक्ष परिषदेपुढे डॉ. लोहिया यांनी केलेले अध्यक्षीय भाषण या प्रयत्नाचेच एक विशेष दर्शन होय.......

यंदा डॉ. राममनोहर लोहिया यांनी समाजवादी तत्त्वज्ञान आणि आपणास अभिप्रेत असणाऱ्या सामाजिक व आर्थिक क्रांतीची संघटना, यासंबंधी जे मौलिक व उद्बोधक विचार मांडले, त्यामुळे जागतिक समाजवादाच्या इतिहासात हिंदी समाजवाद्यांना कोणते महत्त्वाचे व विशिष्ट काम करावयाचे आहे त्याची यथार्थ कल्पना येऊ शकते. क्रांती आणि हिंसा यांचे नित्य साहचर्य कल्पिण्याची प्रथा मोडून टाकून क्रांती व अहिंसा यांचे साहचर्य सिद्ध करण्याचे महान कार्य महात्मा गांधींनी केले आहे. याच अभिनव विचाराचा वारसा आपणाकडे घेऊन हिंदी समाजवादी आज आपल्या राष्ट्रात सामाजिक क्रांती घडवून आणू पाहात आहेत. क्रांतीची पूर्तता काही झाले तरी अखेरीस हिंसेवाचून होणारच नाही असा पूर्वग्रह अनेक समाजवाद्यांच्या मनात बद्धमूल झालेला आहे. अशा लोकांना उद्देशून डॉ. लोहिया हे म्हणतात की, क्रांती संपूर्ण होण्याच्या अगदी अंतिम क्षणी हिंसा घडेल किंवा नाही हा प्रश्न अगदी गौण असून आपण सामाजिक क्रांतीची संघटना व पूर्व तयारी करावयाची ती हिंसा मार्गाने करावयाची की अहिंसा मार्गाने करावयाची हाच खरा व महत्त्वाचा प्रश्न आहे. या बाबतीत आपले विचार निःसंदिग्ध व निश्चित असले पाहिजेत असा लोहिया यांचा आग्रह आहे. आपण क्रांतीची जी संघटना करावयाची ती पूर्णपणे अहिंसेनेच केली पाहिजे आणि अखेरपर्यंत शक्य तो हिंसा टाळावयाची असेच आपले धोरण व तत्त्व असले पाहिजे. असे असले तरी ही क्रांती जन्मास येण्याच्या अंतिम क्षणी जर देशातील राज्यसंस्था केवळ संगिनींच्या जोरावरच आपले अस्तित्व टिकवू लागेल, सर्व जनता जर क्रांतिकार्यास प्राणपणाने साहाय्य करण्यास उद्युक्त झाली असेल, तिच्या क्रांतिकारक असहकारामुळे जर राज्यसंस्थेचे शस्त्रबळ विघटित व डळमळीत झाले असेल, तर जनताच अशा अवस्थेत जबरदस्तीने ते राज्य उलथून पाडण्यास स्वयंप्रेरणेने पुढे येईल. अशा अत्याचारी सरकारला अथवा सरकार नामधारी गटाला सक्तीने पदभ्रष्ट करण्याचा नैतिक हक्क जनतेला आहे. या अवस्थेत घडणारी हिंसादेखील शक्यतो टाळणे व कमी करणे हेच आपले ध्येय असले पाहिजे असे डॉ. लोहिया यांचे प्रतिपादन आहे. हे प्रतिपादन योग्य व समर्पक आहे यात शंकाच नाही.

मात्र अशा अवस्थेतही होणारी अपरिहार्य हिंसा कशी किमान प्रमाणात ठेवावी आणि त्या अपरिहार्य वाटणाऱ्या हिंसेतून पुनः हुकूमशाही अवतरू नये अथवा चिरंतन होऊ नये, यासाठी काय करावे याचाही विचार येथे करावयास हवा. त्या संबंधी आम्हास एवढेच म्हणता येईल की, अशी अवस्था प्राप्त झाली असताही जे राजकीय हिंसा न करतील व केवळ अनत्याचारी लोकसेवा करीत राहतील आणि जे जनतेला क्रांतिकारक सरकारच्या

अन्यायांविरुद्ध झगडण्याचा अनत्याचारी मार्ग दाखवून देतील, असे शुद्ध सत्याग्रहीच अशा अवस्थेत लोकशाहीचा प्राण टिकवून ठेवू शकतील व कोणी हुकूमशाही चिरंतन करण्याचा प्रयत्न केला तरी तो यशस्वी होऊ देणार नाहीत. यासाठी सामाजिक क्रांतिकारकात असा एक वर्ग असला पाहिजे की जो केव्हाही अधिकार सूत्रे आपल्या हाती घेणार नाही. तो केवळ सेवेचे व अनत्याचारी प्रतिकाराचे राजकारण तेवढेच करीत राहील. लोकसेवेसाठी सुद्धा सत्तेचा व राजदंडाचा उपयोग करण्याची सवय लागली असता जनतेच्या अंतःकरणावर केवळ निरपेक्ष सेवेने आपला प्रभाव पाडण्यास लागणारे आत्मबल नष्ट होईल अशी भीती आम्हास वाटते. म्हणून ज्यांना अहिंसक क्रांतीची संघटना करावयाची असेल त्यांच्यामध्ये अथवा त्यांच्या पाठीशी असा एक निष्ठावंत अहिंसावादी क्रांतिकारक वर्ग असावा की जो कोणत्याही परिस्थितीत सत्ताधारी बनू इच्छिणार नाही व केवळ सेवेच्या व प्रेमाच्या आधारानेच जनतेला आपले अनुयायित्व करण्यास उद्युक्त करील. असो.

## अहिंसक क्रांतीची तीन प्रतिके

अहिंसक क्रांतीची संघटना करण्याचे तीन मार्ग म्हणून डॉ. लोहिया यांनी सांगितले आहेत. विधायक लोकसेवा, निवडणुकी आणि सत्याग्रही प्रत्यक्ष प्रतिकाराचे झगडे या तीन मार्गांची तीन प्रतीके म्हणून त्यांनी फावडे, मतदानाची पेटी आणि तुरुंग यांचा उल्लेख केला आहे तो योग्यच आहे. समाजवादी क्रांतीची संघटना या तीनही मार्गांनी करीत राहिले तरच आपणास समाजवादाची संस्थापना करता येईल आणि तीही वर वर्णन केलेली क्रांतिनिष्ठ जनतेच्या स्वयंप्रेरित हिंसेची अवस्था टाळून करता येईल. जर अहिंसक क्रांती करू इच्छिणारा समाजवादी पक्ष निवडणुकीपासून अलिप्त राहिला आणि काँग्रेस अथवा भांडवलशाहीला धक्का न लावणारा पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष एवढेच दोन पक्ष प्रातिनिधिक संस्थांत राजकारण करू लागले तर लोकशाही राज्यसंस्था नष्ट होऊन एकपक्षीय हुकूमशाही अस्तित्वात येईल आणि जनतेला हिंसक क्रांतीवाचून दुसरा पर्याय उरणार नाही. यासाठी विधायक लोकसेवा आणि सत्याग्रही झगडे यांच्याबरोबर निवडणुकीचे व प्रातिनिधिक संस्थांतील सनदशीर विरोधाचे राजकारणही समाजवादी पक्षाने करीत राहिले पाहिजे. त्याचबरोबर ब्रिटनप्रभृती युरोपीय राष्ट्रांतील समाजवादी पक्षाचे केवळ सदनशीर राजकारण करून आपणास अभिप्रेत असणारी सामाजिक क्रांती घडवून आणता येणार नाही याचेही स्पष्ट विवेचन डॉ. लोहिया यांनी केलेले आहे व ते समर्पक आहे. आपला समाजवाद हा कम्युनिस्टांच्या अत्याचारी व हुकूमशाही समाजवादाहून अथवा त्याच्या विकृतीहून जसा भिन्न आहे तसाच तो ब्रिटिश राष्ट्रातील सदनशीर समाजवादाहूनही भिन्न असला पाहिजे व आहे हे व्यक्त करण्यासाठीच आपल्या अभिप्रेत क्रांतीची वरील तीन प्रतीके डॉ. लोहिया यांनी दिग्दर्शित केलेली आहेत.

सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान हे वर्गविग्रहाच्या तत्त्वज्ञानाशी मूलतःच विसंगत व विरोधी आहे हे काही गांधीवाद्यांचे मत डॉ. लोहिया यांनी आपणास अमान्य असल्याचे नमूद केले आहे. कोणत्याही अन्यायाचा प्रतिकार करण्याचे साधन म्हणून म. गांधींनी सत्याग्रहाचा पुरस्कार केला असल्याने भांडवलशाहीतून निर्माण होणाऱ्या वर्गविग्रहातील हिंसा टाळून त्याला अनत्याचारी स्वरूप देण्याचा प्रयत्न करणे हे सत्याग्रहाच्या मूळ भूमिकेशी विसंगत आहे हे मत प्रस्तुत लेखकास केव्हाही पटलेले नाही. यासंबंधी 'आधुनिक भारत' या पुस्तकात मी सविस्तर विवेचन केलेले आहे. सत्याग्रहाची भूमिका आणि वर्गविग्रह यात विसंगती मानण्याची गरज नाही. तसेच भारतीय संस्कृतीच्या इतिहासाला वर्गविग्रहाचा सिद्धांत लागूच पडत नाही हे म्हणणेही ऐतिहासिक सत्यास धरून नाही.

भारतीय संस्कृती द्विज आणि शूद्र अशा दोन वर्गांत दुभंगलेली होती आणि तशी ती दुभंगलेली ठेवण्याचाच ज्यांनी आग्रह धरला त्यांना यश आल्यामुळे भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांना परकीय संस्कृतीची गुलामगिरी पत्करावी लागली आणि परकीयांच्या आक्रमणाचे स्वागत येथील संस्कृतीने दडपून ठेविलेल्या वर्गांनी केले हा भारताचा इतिहास आहे. इतकेच नाही तर आज आपल्या देशात भांडवलशाहीमुळे निर्माण झालेला वर्गविग्रह अहिंसेने चालवून वर्गसंस्थेचे उच्चाटन करण्याचा मार्ग येथील दलित वर्गाला आपण दाखवून दिला नाही तर हा दलित वर्ग रशियातून येणाऱ्या मुक्तिसैन्याचे दास्य स्वागतपूर्वक स्वीकारण्यास तयार होईल अशीही भीती आज वाटू लागली आहे. परकीयांच्या साहाय्याने आपणावर होणाऱ्या सामाजिक जुलुमांचा अंत करण्याचा प्रयत्न येथील लोकांनी केलेला आहे व आजही कम्युनिस्ट पक्ष याच परंपरेचे कळत अगर न कळत अनुकरण करीत आहे असे म्हटल्यास ते फारसे चूक होणार नाही. यावर एकच उपाय आहे व तो म्हणजे सत्याग्रहाच्या साधनाने आपणावरील आर्थिक व सामाजिक जुलूम नष्ट करण्याचे शिक्षण येथील शेतकरी कामकरी वर्गाला द्यावयाचे. केवळ विधायक लोकसेवा किंवा केवळ सनदशीर राजकारण एवढ्याने सामाजिक क्रांतीचे कार्य तडीस जाणार नाही. ते तडीस जावयाचे तर या दोन प्रकारच्या कार्यांबरोबरच दलित जनतेला आपल्यावरील अन्यायाची चीड किंवा सात्त्विक संताप व्यक्त करता येईल असे प्रयत्न आपण केले पाहिजेत. या सात्त्विक संतापाला अनत्याचारी स्वरूप देणे म्हणजेच सत्याग्रहाने वर्गविग्रह चालविण्याचे कार्य करणे होय. अशा प्रकारे डॉ. लोहिया यांनी अहिंसक क्रांतीची संघटना आणि तिचा कार्यक्रम यांची मांडणी केली आहे. ती उद्बोधक आणि योग्य मार्गदर्शक आहे.

## मार्क्सवादातील उणिवा

डॉ. लोहिया यांच्या भाषणाचा दुसरा एक विशेष म्हणजे मार्क्सवादातील उणिवा आणि त्यातील तात्त्विक दोष यांचे विवेचन त्यांनी शास्त्रीय पद्धतीने केले आहे हा होय. मार्क्सवादी विचारसरणीत जो नैतिक दृष्टीने पहिला दोष दृष्टोत्पत्तीस येतो तो मार्क्सवादात

मानवी जीवनातील स्थिर किंवा शाश्वत मूल्यांना मुळीच मुळीच स्थान दिलेले नसल्यामुळे त्यांचे नीतिशास्त्र केवळ सापेक्षतावादी आणि क्षरस्वरूपी बनलेले आहे. तथापि मानवी समाजाची जीवनयात्रा अवलोकन केली असता मानवी अंतःकरणात काही परिस्थिति-निरपेक्ष अशी अक्षर नीतितत्त्वे त्याला नित्य प्रेरणा देत आहेत असे दिसून येते. मानवाच्या प्रगतीचा व उन्नतीचा विचार करीत असता या अक्षर नीतितत्त्वांचा आणि परिस्थिति-निरपेक्ष अशा शाश्वत आत्मप्रेरणेचा विचार अवश्य करावा लागतो. तसे केल्यावाचून मानवाच्या उन्नतीची दिशा ठरविता येत नाही. मार्क्सवादात अशा शाश्वत नीतितत्त्वांचा अथवा जीवनमूल्यांचा विचार केलेला नसला तरी त्याचे अंतिम सामाजिक ध्येय हे दण्ड-हीन व एकवर्ग समाजाची संस्थापना करणे असे असल्यामुळे त्यात साध्य दृष्टीने मानवी जीवनातील स्वातंत्र्य, समत्व आणि बंधुभावना अथवा सत्य, अहिंसा, प्रेम आणि सेवावृत्ती इत्यादी अंतिम मूल्यांचा अंतर्भाव झालेला आहे. मार्क्सवादाच्या अंतिम साध्यात अंतर्भूत झालेली ही मानवाची अंतिम जीवनमूल्ये हेच मार्क्सवादातील खरे आकर्षण आहे हे विसरता कामा नये. या सत्याची प्रेरणा मार्क्सवादाच्या पाठीमागे नसती तर त्याच्या संस्थापनेसाठी लक्षावधी युवकांनी आपल्या जीविताचा होम केला नसता. हे खरे असले तरी मार्क्सवादाच्या अंतिम साध्यात अंतर्भूत झालेल्या या सत्याची संस्थापना करण्याची साधने मार्क्सवादाला उपलब्ध झालेली नाहीत व आपल्या साध्याच्या आकर्षणाने मोहित झालेले मार्क्सवादी हीन साधनांचा उपयोग करून त्या साध्यापासून दूरदूर वाहवत चालले आहेत आणि शुद्ध हेतूंच्या फरसबंदी मार्गावरून चालत जाऊन अखेरीस नरकाचे द्वार गाठावे त्याप्रमाणे दण्डहीन समाजाची संस्थापना करू पाहणारे मार्क्सवादी एकपक्षीय अनियंत्रित सत्तेच्या अथवा हुकूमशाहीच्या चक्रव्यूहात अडकले गेल्याचे करुण दृश्य आज आपणास दिसत आहे. या करुण दृश्यापासून योग्य तो बोध घेऊन डॉ. लोहिया यांच्या-सारखे हिंदी समाजवादी तत्त्वज्ञ कम्युनिस्टांना व जगातील दलित जनतेला असा इशारा देत आहेत की हुकूमशाहीच्या साधनाने लोकशाहीचे किंवा दण्डहीन समाजाचे साध्य गाठता येणार नाही. पक्षसंघटनेच्या आणि क्रांतिकार्याच्या उपक्रमात लोकशाहीचा बळी देऊन स्वातंत्र्याची संस्थापना करता येणार नाही. हिंसेची पेरणी करून अहिंसेचे पीक काढता येणार नाही किंवा द्वेषाचा वणवा पेटवून प्रेमाचा बगिचा निर्माण करता येणार नाही. साध्य आणि साधन यांच्यातील निकट संबंध आग्रहपूर्वक प्रतिपादून म. गांधींनी मानवाला सर्वांगीण जुलमातून मुक्त करण्याची क्रांती अहिंसेच्या संघटनेनेच करता येईल हे दाखवून दिले आणि मानवाला अक्षर नीतीचे आणि खऱ्या जीवनमूल्यांचे स्वरूप पटवून दिले. गांधीजींनी दाखवून दिलेला हा साध्यसाधन संबंध आणि साधनशुद्धीचा सिद्धांत यांचे ज्ञान झाल्यामुळेच हिंदी समाजवादी मार्क्सवादातील ही उणीव भरून काढून नवे सामाजिक तत्त्वज्ञान व नवे क्रांतिशास्त्र निर्मून आपल्या राष्ट्रात समाजवादी क्रांती घडवून आणू पाहात आहेत.

मार्क्सवादी सामाजिक तत्त्वज्ञानातील दुसरी उणीव डॉ. लोहिया यांनी अशी दाखवून दिली आहे की भांडवलशाहीतील केंद्रित उत्पादनपद्धती जशीच्या तशी कायम ठेवून तिच्यावरील मालकी तेवढी एका वर्गाकडून काढून घ्यावयाची आणि ती कामगार वर्गाच्या हाती द्यावयाची ही क्रांतिकार्यासंबंधीची मार्क्सवाद्यांची कल्पना पुरेशी नाही. समाजाची लोकशाहीच्या व समाजवादाच्या तत्त्वांवर पुनर्घटना करावयाची आणि अखेरीस दंडहीन समाजाच्या ध्येयाकडे प्रगती करावयाची तर भांडवलशाहीतील केंद्रित उत्पादन पद्धती मोडून टाकून तिच्या ठिकाणी विकेंद्रित उत्पादन पद्धतीची स्थापना केली पाहिजे. अशा रीतीने विकेंद्रित उत्पादन पद्धती स्थापन केली तरच राज्यसत्तेचे विकेंद्रीकरण करता येऊन खरी लोकशाही व खरा समाजवाद स्थापता येईल. विकेंद्रित उत्पादन पद्धतीचे अधिष्ठान घेतल्यावाचून लोकशाही समाजवादाची उभारणी करता येणार नाही हा सिद्धांत रशियातील क्रोपोटकिन प्रभृती अराज्यवाद्यांनी अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय दृष्टीने सविस्तर मांडला असून शेती आणि इतर उद्योगधंदे या दोहोंचा संयोग करून राष्ट्रातील प्रत्येक भूविभाग व घटक यांची सर्वांगीण उन्नती साधता येईल याचेही विवेचन त्यांनी केलेले आहे.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानातील आणखी एक महत्त्वाची उणीव डॉ. लोहिया यांनी दाखवून दिली आहे ती म्हणजे विशिष्ट प्रकारची आर्थिक घटना स्थापन केली की त्या अधिष्ठानावर शक्य असणारी सर्व प्रकारची सामाजिक ध्येये आपोआप किंवा फारसे प्रयास न करता भरभराटीस येतील असा भ्रम मार्क्सवादाचे प्रतिपादन वाचल्याने होतो. पण हा केवळ भ्रम असून आपणास अभिप्रेत असणारी सामाजिक ध्येये आर्थिक घटनेप्रमाणे समाजाच्या इतर अंगांच्या सर्व व्यवहारात प्रविष्ट होतील आणि समाजाच्या सर्व व्यवहारात ती प्रकट होतील याबद्दल बुद्धिपुरस्सर निरनिराळ्या क्षेत्रात समाजनेत्यांनी सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे. आपणास जी सामाजिक ध्येये प्रस्थापित करण्यासाठी क्रांती घडवून आणावयाची आहे त्या सामाजिक ध्येयांचा चुराडा क्रांतिकार्य चालू असता आपणाकडून केला जात नाही याबद्दलची शक्य ती दक्षता क्रांतिकारकांनी घेतली पाहिजे. नाहीतर ज्या मानवसंस्कृतीच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी आपणास समाजाच्या आर्थिक घटनेत क्रांती घडवून आणावयाची आहे ती संस्कृतीच या क्रांतिकार्यामुळे नष्ट होईल. म्हणून सामाजिक क्रांतीचे कार्य हे केवळ त्याच्या बाह्यांगातील राजकीय व आर्थिक घटनेत बदल घडवून आणण्याचे कार्य नसून ते मानवाच्या अंतरंगाचा विकास करणारे आणि त्याच्या संस्कृतीचे संवर्धन करणारे कार्य आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. मार्क्सवादाने भारलेल्या लोकांचे या सांस्कृतिक अंगाकडे नेहमी दुर्लक्ष होत असते आणि त्यांनी स्वीकारलेल्या अविवेकी व अत्याचारी साधनांमुळे मानवसंस्कृती नष्ट होण्याचा धोका निर्माण होत असतो.

मार्क्सवादी विचारातील ही उणीव दाखवून देत असता मार्क्सवादाच्या अविवेकी विरोधकांनाही डॉ. लोहिया यांनी एक इशारा दिलेला आहे. तो असा की आजच्या

भांडवलशाही समाजाची आर्थिक घटना न बदलता केवळ सामाजिक उच्च ध्येयांचा व सांस्कृतिक मूल्यांचा घोष करीत राहून उपदेश करण्याने ती सामाजिक ध्येये व ती सांस्कृतिक मूल्ये समाजात मूर्त स्वरूपात येणार नाहीत. समाजाची आर्थिक घटना कशीही असली तरी ती न सुधारता वाटेल ती सामाजिक ध्येये किंवा सांस्कृतिक मूल्ये समाजात पोसली जातील अशी आशा करणे हा मार्क्सवादाहूनही अधिक घोर भ्रम आहे. आज लोकशाही समाजवादाच्या अधिष्ठानावरच उच्च सामाजिक ध्येये आणि सांस्कृतिक मूल्ये यांचा परि-पोष होऊ शकतो व म्हणूनच लोकशाही समाजवादाची संस्थापना हाच आजच्या मानवांचा युगधर्म बनला आहे हे केव्हाही विसरून चालणार नाही. या युगधर्माकडे दुर्लक्ष करून मानव संस्कृतीच केवळ नव्हे तर मानव समाजही आज जगू शकत नाही हे सत्य लोहिया यांनी आपल्या भाषणात परोपरीने विवेचिले असून त्याच सत्याच्या आधारावर समाज-वादी क्रांती घडून येणारच. कारण मानवाला मरावयाचे नसून जगावयाचे आहे असा आत्मविश्वास त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस प्रगट केला आहे.

## आशियाचे स्वातंत्र्य आणि समाजवादी अर्थशास्त्र

मार्क्सवादाचा जन्म एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर पश्चिम युरोपात झाला. त्यावेळी इंग्लंड, फ्रान्स प्रभृती युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रात प्रचंड यांत्रिक उत्पादनाच्या आधारा-वर राक्षसी कारखानदारी अस्तित्वात येत होती. तिच्यातून निर्माण होणाऱ्या वर्गकलहात भांडवलशाहीचा अंत होऊन काही काळ अनियंत्रित कामगारशाही स्थापन होईल व लवकरच एकवर्ग समाज निर्माण होऊन ते राज्ययंत्र गळून पडेल अशी मार्क्सवादाची दृष्टी होती. ती त्याने पाहिलेल्या पश्चिम युरोपातील साम्राज्यवादी राष्ट्रातील परिस्थिती आणि आज या युरोपीय साम्राज्यशाहीच्या कक्षेतून मुक्त होणाऱ्या दरिद्री, मागासलेल्या आणि विपुल लोकसंख्येच्या कृषिजीवी आशियातील राष्ट्रातील परिस्थिती यांची तुलना होऊ शकत नाही. या आशियातील विपुल लोकसंख्येच्या आणि निर्धन कृषिमय जीवनाच्या राष्ट्रात जी औद्योगिक उन्नती घडवून आणावयाची ती प्रचंड कारखाने व प्रचंड शेती यांची निर्मिती करून घडवून आणता येणार नाही. पश्चिम युरोपात युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रांत जसे भांडवलाचे वैपुल्य होते किंवा आहे तसे रशियामध्ये शेतजमिनीचे वैपुल्य होते. तेथे शेतजमिनीचे सरासरी माणशी प्रमाण निदान १५ एकर तरी पडण्यासारखे होते, म्हणून प्रचंड शेते निर्माण करून तेथील शेतीसुधारणेचा व बेकारी निवारणाचा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सोडविता आला, पण हिंदुस्थान किंवा मलायासारखे देश अथवा चीन या देशात शेतजमिनीचे सरासरी प्रमाण माणशी दोन एकरही पडू शकत नाही आणि प्रचंड कारखानदारी निर्माण करण्यास लागणारे भांडवल येथे साठविण्यास शेकडो वर्षे लागतील. ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास प्रचंड शेती व प्रचंड कारखाने हा मार्ग आशियातील स्वतंत्र राष्ट्रांना अवलंबिता येणे अशक्य आहे असे मत डॉ. लोहिया यांनी

पुरस्कारिले आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच आशियातील राष्ट्रांचा म्हणजे एकंदर जगातील $\frac{२}{३}$ क्षेत्रफळाचा व $\frac{१}{२}$ लोकसंख्येचा प्रश्न सोडविला पाहिजे. तो सोडवावयाचा तर विकेंद्रित उत्पादन पद्धती, कृषिजीवन आणि इतर उद्योगधंदे यांचा संयोग या मार्गांचाच अवलंब केला पाहिजे, पण हे विकेंद्रित उत्पादनही विद्युत्शक्तीच्या व छोट्या यंत्रांच्या साहाय्याने केल्यावाचून आजच्या मानवसमाजाच्या भौतिक व सामाजिक आकांक्षा तृप्त होणार नाहीत असाही त्यांनी आग्रह धरलेला आहे. यांत्रिक उत्पादन आणि निसर्ग शक्तींचे सहाय्य यांचा उपयोग केल्यावाचून सामान्य जनतेच्या राहणीचे मान सुधारण्याची आकांक्षा सफल होणार नाही आणि सामाजिक समतेची व एकवर्ग समाजाची स्थापनाही करता येणार नाही. व्यक्तिजीवनाचा विकास, व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व आणि आर्थिक व सामाजिक समतेची आकांक्षा ही आधुनिक मानवसंस्कृतीची वैशिष्ट्ये असून या आकांक्षा तृप्त होण्यास भौतिक शास्त्रांनी उपलब्ध करून दिलेले यांत्रिक उत्पादन आणि निसर्गशक्तीचे सहाय्य यांचा आपण मुबलक उपयोग करून घेतलाच पाहिजे. मात्र तसे करीत असताना विकेंद्रित उत्पादनपद्धती आणि अल्पप्रमाण यंत्रे यांचेच साहाय्य घ्यावयाचे हे आपले ध्येय असले पाहिजे. हे अर्थशास्त्रीय सिद्धांत स्वीकारल्यानेच नव्याने मुक्त होणाऱ्या आशियातील राष्ट्रांचा प्रश्न सुटू शकेल इतकेच नाही तर ज्या युरोपीय राष्ट्रांनी आजपर्यंत प्रचंड कारखानदारी निर्मून आशियातील राष्ट्रांची पिळवणूक केली आणि आपल्या देशातील शेती सोडून दिली त्या युरोपीय राष्ट्रांना सुद्धा आशियातील साम्राज्य आता नष्ट झाल्यामुळे आपल्या आर्थिक जीवनाची पुनर्घटना करताना वरील सिद्धांतांचाच आधार घ्यावा लागणार आहे. ...

[*रचना*, जुलै १९५२, पृ. ३७७ ते ३८८]

## ११

# समाजवाद आणि अराज्यवाद

आधुनिक युरोपात लोकशाही आणि समाजवाद या ध्येयांचा उदय सामान्यतः एकाच वेळी झालेला आहे. या दोन ध्येयांच्या उदयाबरोबरच खिस्ताने उपदेशिलेल्या परमेश्वरी साम्राज्याचे ध्येयही आधुनिक युरोपात उदय पावलेले आहे. या परमेश्वरी साम्राज्यात कोणत्याही प्रकारचा वर्गभेद उरणार नाही किंवा राज्यसंस्थेसारखी कोणतीही दंडधारी संस्था अस्तित्वात राहणार नाही. या विचारांना मूर्तस्वरूप देण्याच्या प्रयत्नांतूनच आधुनिक युरोपातील लोकशाही, समाजवाद आणि अराज्यवाद या सामाजिक ध्येयांचा उदय झालेला आहे असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. या ध्येयांच्या प्रस्थापनेसाठी आधुनिक युरोपातील ज्या क्रांतिकारकांनी आपल्या जीवित वित्ताची आहुती दिली त्यांच्या अंतःकरणातील या त्यागवृत्तीच्या प्रेरणेचे मूळ खिस्ताच्या आध्यात्मिक संदेशात आहे हे विसरून चालणार नाही.

### लोकशाही कल्पनेचा उगम

सोळाव्या शतकात सर टॉमस मूर (Sir Thomas More) या नावाचा जो सुप्रसिद्ध धर्मसुधारक इंग्लंडात झाला त्याच्या 'युटोपिया' या ग्रंथात लोकशाही, समाजवाद आणि अराज्यवाद यांचे ध्येय स्पष्टपणे पुरस्कारलेले दिसून येते. त्याच्याही पूर्वी चौदाव्या शतकात होऊन गेलेल्या जॉन विक्लिफ या धर्मसुधारकाच्या उपदेशात व त्याच्या उपदेशावर आधारलेल्या लेव्हलर्स पंथाच्या प्रचारात लोकशाही, आर्थिक समता, किंबहुना अराज्यवाद यांची ध्येयेही प्रकट झालेली आहेत. तात्पर्य, मध्ययुगीन खिस्ती धर्मसंस्थेविरुद्ध सुधारणेची ध्वजा उभारून ज्यांनी ज्यांनी खिस्ताचा मूळ उपदेश पुनरुज्जीवित करून त्या तत्त्वांवर सामाजिक व राजकीय संस्था उभारण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांच्या विचारात आपणास लोकशाही, समाजवाद व अराज्यवाद ही ध्येये आढळून येतील. या सर्वांचा उगम भूतलावर परमेश्वरी साम्राज्य स्थापन करण्याच्या खिस्ताच्या आध्यात्मिक उपदेशातून झालेला आहे. हे लक्षात घेतल्यास म. गांधींनी ही ध्येये आपल्या सत्याग्रही तत्त्वज्ञानात कशी व का गोवून घेतली

त्याचा उलगडा होतो. या ध्येयांच्या युरोपीय उपासकांत पुढे अध्यात्मवादाचा व धर्माचा उच्छेद करू पाहणारा एक पंथ उदयास आला. त्यामुळे ही ध्येये केवळ भौतिकवादावरच उभारलेली आहेत असा गैरसमज करून घेऊन आध्यात्मिक संस्कृतीच्या नावाने त्या ध्येयांना विरोध करणे हे किती जड बुद्धीचे लक्षण आहे त्याचाही उलगडा या ध्येयांचा उगम लक्षात घेतल्यास होऊ शकेल.

आधुनिक युरोपात ही ध्येये प्रथम मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणेतूनच निर्माण झालेली असून तेथील आधुनिक संस्कृतीतील ही आत्मप्रेरणा मंद, भ्रष्ट व नष्ट झाल्यानंतर त्यांना केवळ भौतिक सुखवादाचे आणि हिंसक क्रांतीचे स्वरूप प्राप्त झाले असे इतिहासावरून दाखवून देता येईल. त्याचप्रमाणे ही क्रांतिकारक आत्मप्रेरणा तेथून नष्ट होऊ लागल्यानंतर आधुनिक भारतीय इतिहासात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ती आपला प्रभाव पाडू लागली आणि या आत्मप्रेरणेच्या प्रभावानेच येथे सत्याग्रही तत्त्वज्ञान निर्माण झाले. या सत्याग्रही तत्त्वज्ञानाने भारताचे राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांची संस्थापना केली असून ते आता समाजवादी व अराज्यवादी ध्येयांची उपासना करत सामाजिक क्रांती घडविण्याच्या कार्यास लागले आहे. हे कार्य करीत असता त्याला मार्क्सवादाहून श्रेष्ठ असे क्रांतिशास्त्र आणि विरोधविकासी भौतिकवादाहून श्रेष्ठ असे जीवनतत्त्वज्ञान निर्माण करावे लागेल. त्या क्रांतिशास्त्रात व जीवनतत्त्वज्ञानात मार्क्सवादात न घडून आलेला समाजवाद व अराज्यवाद यांचा समन्वयही त्याला करावा लागणार आहे. रशियामध्ये जेव्हा क्रांती झाली तेव्हा समाजवादी व अराज्यवादी अशा दोन्ही निष्ठांचे क्रांतिकारक संप्रदाय अस्तित्वात होते. पण त्यांपैकी बोल्शेव्हिक नावाच्या मार्क्सवादी क्रांतिकारकांनी अराज्यवाद्यांना नामशेष केले आणि आपल्याच एका पक्षाची हुकूमशाही प्रस्थापित केली. समाजवादी क्रांतीनंतर अराज्यवादाचा उदय होईल ही आशा नष्ट करून तेथे एकपक्षीय सर्वंकष अनियंत्रित सत्ता प्रस्थापित केली. ही घडामोड कशी व का घडली आणि तिच्यापासून आपण कोणता बोध घेतला पाहिजे?

## क्रांतीनंतरच्या रशियातील घडामोडी

१९१७ च्या ऑक्टोबरमध्ये बोल्शेव्हिक क्रांती झाल्यानंतर रशियात "सामाजिक क्रांतिकारक" (Social Revolutionaries) आणि अराज्यवादी (The Anarchists) असे दोन क्रांतिकारक पक्ष बोल्शेव्हिकांना प्रतिस्पर्धी म्हणून होते. बोल्शेव्हिक पक्ष, सामाजिक क्रांतिकारक पक्ष व अराज्यवादी पक्ष हे यावेळच्या रशियातील तीनही पक्ष सशस्त्र क्रांतिवादीच होते. बोल्शेव्हिक पक्ष हा मार्क्सवादी असून त्याचा पुढारी लेनिन होता. या पक्षाचे खरे सामर्थ्य लेनिनचे असामान्य नेतृत्व आणि त्याने अनेक वर्षे प्रयत्न करून निर्माण केलेली लष्करी शिस्तीची केंद्रित संघटना हेच होते. त्याची मुख्य मदार औद्योगिक क्षेत्रातील

संघटित कामगार वर्गावर होती. सामाजिक क्रांतिकारक पक्षाला शेतकरी व सैनिक या दोन वर्गातील बहुसंख्यांकांचा पाठिंबा होता. शेतकरी वर्गाला हा पक्ष अधिक आपलासा वाटे आणि शेतकरी वर्गासंबंधीचे कायदे करण्याच्या बाबतीत ऑक्टोबर क्रांतीनंतर स्थापन झालेल्या हंगामी सरकारला या पक्षाच्या सूचना मान्य कराव्या लागल्या होत्या. १९१८ च्या जानेवारीत रशियात भरलेल्या घटना परिषदेत या पक्षाचे सभासद बहुसंख्येने निवडून आलेले होते. तरीही लेनिनने आपल्या पक्षात निर्माण केलेली लष्करी शिस्त आणि एकी यांचा या पक्षात अभाव असल्यामुळे क्रांतिकालीन अवस्थेत लेनिनने प्रथम या पक्षात फूट पाडली आणि नंतर त्याची दाणादाण उडवली. जेव्हा निरनिराळे पक्ष आपापल्या मतानुसार नवी राजवट उभारण्याचा प्रयत्न करीत असतात त्यावेळी जो पक्ष अधिकात अधिक संघटित, अधिकात अधिक एकनिष्ठेचा व निर्धाराचा असेल आणि ज्या पक्षाला असामान्य नेतृत्व करण्याचे गुण अंगी असलेला विभूतिमान नेता लाभला असेल तो पक्ष यशस्वी होतो. या न्यायास अनुसरून बोल्शेव्हिक पक्षापुढे सामाजिक क्रांतिकारक पक्षाची दाणादाण उडाली यात फारसे आश्चर्य नाही. तसेच सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करून अराज्यवादाची उपासना करणारा पक्षही अशा क्रांतिकालात नामशेष होणे अगदी साहजिक आहे आणि रशियात तसेच घडले.

## अराज्यवाद व अहिंसा

अराज्यवाद हे तत्त्वच सत्तेच्या केंद्रीकरणास आणि पक्षसंघटनेच्या शिस्तीस मारक व विघातक आहे. अशा तत्त्वावर उभारलेल्या पक्षाला बोल्शेव्हिक पक्षासारख्या कठोर लष्करी शिस्तीच्या पक्षापुढे हार खावी लागली व तो नामशेष झाला तर त्यात मुळीच आश्चर्य नाही. अशा प्रकारे बोल्शेव्हिक पक्षाने सामाजिक क्रांतिकारक आणि अराज्यवादी या दोन्ही पक्षांना नामशेष करून आपल्या एकाच पक्षाची सर्वंकष सत्ता १९१८ च्या अखेरीस रशियात स्थापन केली. ह्या अराज्यवादी पक्षाची उभारणी बाकुनिन व क्रोपोटकिन यांच्या विचारांवर झालेली असून ते सशस्त्र प्रतिकाराचे पुरस्कर्ते होते. या सशस्त्र प्रतिकारवादी अराज्यवाद्यांहून वेगळा अहिंसक अराज्यवादी विचारसंप्रदाय रशियात तेव्हा निर्माण झाला होता व त्याचा प्रणेता काउंट टॉलस्टॉय शुद्ध अहिंसावादी होता. समाजामध्ये अहिंसावृत्ती पूर्णपणे बाणल्याखेरीज त्याला अराज्यावस्था प्राप्त होऊ शकणार नाही हे ओळखून क्रांतिकारकांनी हिंसक प्रतिकार सोडून दिला पाहिजे आणि शुद्ध अहिंसावृत्तीने राज्यसंस्थेशी असहकार केला पाहिजे, असा उपदेश टॉलस्टॉय करीत असे. टॉलस्टॉयच्या या उपदेशांतूनच म. गांधींनी सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा परिपोष केला. अहिंसा वृत्तीवर उभारलेल्या या अराज्यवादास आम्ही "आत्मराज्यवाद" असे नाव देत असतो.

## आत्मराज्य किंवा अहिंसक अराज्यवाद

मानव समाजाला सर्व प्रकारच्या विषमतेतून व दास्यातून मुक्त व्हावयाचे असेल तर त्याने आपल्या अंतःकरणातील हिंसा व लोभ इत्यादी हीन वासनांवर विजय संपादन केला पाहिजे आणि सर्व मानवांशी बंधुभावनेने वागण्याचा निर्धार केला पाहिजे. या विचारावर हा अहिंसक अराज्यवाद उभारलेला आहे. महात्मा गांधी व टॉलस्टॉय यांना अराज्य म्हणजे केवळ राज्यसत्तेचा अभाव एवढाच अर्थ अभिप्रेत नव्हता. राजकीय बंधनांतून मुक्त होऊ इच्छिणाऱ्यांनी आत्मसंयमाची नैतिक व आध्यात्मिक बंधने पाळण्यास तयार असले पाहिजे आणि "आत्मवत् सर्वभूतानि" ही सर्वात्मभावनेची वृत्ती धारण केली पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. त्याच दृष्टीने आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या "अहिंसक अराज्यवादाला" आत्मराज्यवाद असे नाव दिलेले आहे.

"लोकसत्ता" या शब्दाने लोकमतानुसार चालणाऱ्या राज्यसंस्थेचा बोध होतो, "समाजसत्ता" या शब्दाने समाजातील संपत्ती समाईक मालकीची समजावी हे ध्येय सूचित होते. त्याचप्रमाणे "आत्मसत्ता" या शब्दाने इंद्रियसंयम आणि मनोविजय यांचा बोध होऊन आत्मराज्य या शब्दाने अशा इंद्रियसंयमी व मनोविजयी मानवसमाजाची दंडहीन सामाजिक अवस्था सूचित व्हावी असे आम्हास वाटते. लोकराज्य अथवा लोकशाही आणि समाजवाद या दोहोंनाही अंतिम दृष्टीने मानव समाजातील या आध्यात्मिक संपत्तीचा आधार असला पाहिजे. हे ओळखूनच म. गांधी लोकशाही व समाजवाद या ध्येयांना मान्यता देतात. परंतु ते त्यांचे अंतिम ध्येय नसून "आत्मराज्य" अथवा "अहिंसक अराज्यवाद" हेच त्यांचे अंतिम ध्येय होय. म. गांधींनी भारतात या ध्येयास अनुसरून जी एक अहिंसक प्रतिकारशक्ती निर्माण केली व तिचा प्रभाव प्रचलित राजकारणावर पाडून दाखविला तशी अहिंसक प्रतिकारशक्ती टॉलस्टॉय किंवा त्याचे अनुयायी यांना रशियामध्ये निर्माण करता आली नाही. यामुळे तेथील क्रांतिकारकांचा प्रतिकारवाद हा नेहमी हिंसक व शस्त्रधारी असाच राहिला. पण अराज्यवाद व हिंसक प्रतिकार संघटना या दोहोंत मूलतःच विरोध असल्यामुळे हिंसक प्रतिकाराच्या तंत्रात निष्णात अशा बोल्शेव्हिकांनी रशियातील अराज्यवादाचा संपूर्ण पाडाव केला यात आश्चर्य नाही.

## हिंसक प्रतिकार व दंडविहीन समाज

हिंसक प्रतिकारवादातून समाजाला दंडहीन अवस्था प्राप्त होऊ शकत नाही, इतकेच नाही तर हिंसक प्रतिकाराचा आश्रय करून प्रत्येक राज्यसंस्थेला विरोध करीत राहिले तर समाजात एक सर्वंकष हुकूमशाही प्रस्थापित होण्यासच अप्रत्यक्ष सहाय्य होते हे रशियातील अराज्यवाद्यांच्या इतिहासावरून कोणाच्याही लक्षात येण्यासारखे आहे. मानवाच्या आजच्या अवस्थेत केवळ एक अमूर्त ध्येय या रूपानेच चालू राजकीय व्यवहारांवर अराज्यवाद प्रभाव पाडू शकेल, पण तसा दंडहीन समाज आज मूर्त अवस्थेत आणता येणार नाही

हे कोणाच्याही विवेचक बुद्धीस पटण्यासारखे आहे. तथापि अराज्यवादाचे अमूर्त ध्येय आपल्या जीवनात शक्य तितके मूर्त स्वरूपात आणण्याचा प्रयत्न करणारे सत्याग्रही लोक-सेवक समाजात आत्मबलाची जागृती व संघटना करून त्याचा प्रभाव प्रचलित राजकारणावर पाडू लागतील तर अनियंत्रित राज्यसत्तेचे लोकसत्तेत रूपांतर होऊ शकेल, भांडवलदार लोकशाहीचे समाजसत्ताक लोकशाहीत रूपांतर होईल आणि समाजसत्ताक लोकशाहीतील राजकीय व आर्थिक घटनेचे विकेंद्रीकरण घडून येईल अशी आशा वाटण्याइतका पुरावा म. गांधींनी भारतीय राजकारणात सत्याग्रहाचे जे प्रयोग केले त्यावरून उपलब्ध होऊ शकतो. अराज्यवादाचे संपूर्ण ध्येय जरी मूर्त स्वरूपास आले नाही तरी त्या ध्येयाच्या उपासकास जनतेतील आत्मबल जागृत करून विकेंद्रित लोकशाही समाजवाद स्थापन करता येईल अशी आशा धरण्यास कोणताही प्रत्यवाय नाही.

## अराज्यवाद आणि विकेंद्रीकरण

रशियातील अराज्यवादी पक्ष राजकीय व आर्थिक घटनेतील विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाचा आग्रही पुरस्कर्ता होता. लोकशाही समाजवादाची संस्थापना करू पाहणाऱ्यांनी या राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाचे महत्त्व रशियातील क्रोपोटकिन प्रभृति अराज्यवाद्यां-पासून योग्य प्रकारे पटवून घेतले पाहिजे. .....

या क्रांतीतून सहकारी संस्था, स्वयंपूर्ण ग्रामसंस्था आणि स्वयंशासित आर्थिक संघटना यांच्या आधारावर एक विकेंद्रित समाजवादी राज्य निर्माण करावे असे त्यांचे विचार होते. पण रशियातील अराज्यवादी पक्षाने बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध जे सशस्त्र प्रतिकाराचे प्रयत्न केले त्यात त्यांचा पूर्ण पाडाव झाला आणि अखेरीस बोल्शेव्हिक पक्षाच्या अनियंत्रित हुकूमशाहीखाली रशियातील सर्व जनता जाऊन पडली.

## मार्क्सवादातील विसंगती

मार्क्सवादात कामगारशाहीची अनियंत्रित हुकूमत ही एक संक्रमणकालीन अवस्था म्हणून वर्णन करण्यात येत असते. हा संक्रमणकाल संपून समाजातील मालकशाहीचा पूर्ण पाडाव झाला आणि एकवर्ग समाज निर्माण झाला म्हणजे समाजातील राज्यसंस्थाच नष्ट होईल किंवा तिचे दंडधारी स्वरूप नष्ट होईल असे प्रतिपादण्यात येत असते. या प्रतिपादनाचा खरा अर्थ काय आहे आणि ही संक्रमणकालीन कामगारशाहीची हुकूमत म्हणजे काय याचा अनुभव रशियातील गेल्या तीस वर्षांतील इतिहासावरून आणि जगभर पसरलेल्या कम्युनिस्ट पक्षांच्या प्रयत्नांवरून आजच्या जगास आलेला आहे. अनियंत्रित कामगारशाही याचा अर्थ एका विशिष्ट पक्षाची हुकूमशाही असा आहे व या पक्षात पक्षांतर्गत किंवा पक्षाच्या बाहेर कायदेशीर विरोध करणारा असा कोणताही दुसरा

पक्ष उरू द्यावयाचा नाही, असा व्यावहारिक अर्थ आहे. तसेच ही कामगारशाही देशातील सर्व कामगारवर्ग व शेतकरी वर्ग यांच्या नावाने स्थापन करण्यात येत असली तरी तिची सर्व सूत्रे केवळ एकाच पक्षाच्या हाती केंद्रित होतात आणि त्या पक्षाची सत्ताही अखेरीस एका विशिष्ट गटाच्या हाती जात असते असा रशियातील अनुभव आहे. या हुकूमशाहीची सत्ता मानवी समाजाच्या अंतर्बाह्य सर्व व्यापारांवर चालत असते आणि म्हणूनच तिला सर्वंकष (Totalitarian) असे म्हणतात. ही सर्वंकष सत्ताधारी हुकूमशाही संक्रमणकालासाठी म्हणजे केवळ वर्ष सहा महिने किंवा ४-५ वर्षेच टिकवावयाची असा अर्थ आता उरलेला नाही.

आपल्या राष्ट्रात कम्युनिस्ट क्रांती झाल्यापासून जगातील इतर भांडवलदार राष्ट्रांचे आपणावर होणारे आक्रमण सर्वस्वी नष्ट झाले अथवा याचा धोका सुद्धा उरला नाही अशी अवस्था प्राप्त होईपर्यंत ही हुकूमशाही टिकवावयाची असा या सिद्धांताचा व्यावहारिक अर्थ आता करण्यात येत असतो. कम्युनिस्ट राजवटीला अंतर्गत अथवा बहिर्गत असा कोणताही धोका उरला नाही म्हणजे मग ही हुकूमशाही हळूहळू निरुपयोगी ठरून नष्ट व्हावयाची असा या सिद्धांताचा आज अर्थ झाला आहे. म्हणजे सर्व जगात पसरलेली भांडवलशाही संस्कृती ही निर्मूल होऊन सर्वत्र वर्गहीन समाज स्थापन होईल, तोपर्यंतचा दीर्घकाल ज्या पक्षाच्या हाती अनियंत्रित सत्ता राहिली तो पक्ष तत्त्वभ्रष्ट बनतो, आपल्या पक्षाच्या सभासदास सत्ता व संपत्ती यासंबंधीच्या जादा सवलती तो देऊ लागतो आणि या एकपक्षीय हुकूमशाहीखाली एक अनियंत्रित सत्ताधारी व इतरांहून अधिक धनोपभोग घेणारी नोकरशाही निर्माण होते. हा अनुभव आजच्या रशियातही येऊ लागला आहे. यामुळे असल्या अनियंत्रित एकपक्षीय हुकूमशाहीतून दंडहीन सामाजिक अवस्था तर दूरच राहिली पण विशिष्ट प्रमाणात व क्षेत्रात व्यक्तीला बुद्धिस्वातंत्र्य व आत्मस्वातंत्र्य उपभोगण्यास अवसर देणारी समाजसत्ताक लोकशाही सुद्धा प्रस्थापित होणे शक्य दिसत नाही. अशा प्रकारे राजकीय लोकशाहीच्या स्थापनेबरोबर सर्वच प्रकारची आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या उद्देशाने एकपक्षीय हुकूमशाही संक्रमणावस्थेपुरती स्थापन करण्याचा मार्क्सवादी सिद्धांत तात्त्विक दृष्टीने तर्कदुष्ट आणि व्यावहारिक दृष्टीने अनर्थावह ठरलेला आहे.

समाजाच्या सर्व अंगांवर व व्यवहारांवर सर्वंकष सत्ता गाजविणारी अनियंत्रित एकपक्षीय हुकूमशाही दीर्घकाळ स्थापन करावी असा मार्क्सवादाचा मूळ सिद्धांत नव्हता. आपल्या सर्वांगीण स्वातंत्र्याची जाणीव झालेला, भांडवलशाही व लोकशाही संस्कृतीत जेवढा विकास होणे शक्य आहे तेवढा विकास करून घेतलेला, बंधुभावनेच्या व सामाजिक समतेच्या ध्येयाने प्रेरित झालेला आणि नवसमाज निर्माण करून सर्व बंधनांच्या अतीत

असणारी वर्गहीन व दंडहीन सामाजिक अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी झटणारा कामगारवर्ग आपल्या संघशक्तीने नवसमाज निर्माण करीत असता त्याच्या त्या कार्यास विरोध करू पाहणारा भांडवलदार वर्ग काही काळ प्रतिक्रांतीची धडपड करू लागल्यास ती धडपड मोडून टाकून नवसंस्कृतीच्या जन्मास जो अडथळा निर्माण झालेला असेल तो अडथळा दूर करण्यापुरतीच काही काळ अनियंत्रित कामगारशाहीची स्थापना होईल एवढाच मार्क्सच्या क्रांतिशास्त्रातील मूळ विचार होता. या बिजांतून सर्वंकष अनियंत्रित हुकूमशाहीचा केवढा प्रचंड विषवृक्ष निर्माण होऊ शकतो त्याचा अनुभव गेल्या ३०–४० वर्षांच्या इतिहासावरून मानव समाजाला आलेला आहे. हा अनुभव जमेस धरून आता लोकशाही, समाजवाद आणि अराज्यवाद या ध्येयात अंतर्भूत होणाऱ्या तत्त्वांचा मार्क्सवादाहून निराळ्या प्रकारे समन्वय साधण्याची आवश्यकता आज निर्माण झाली आहे. आमच्या मते हा समन्वय कसा साधावा या प्रश्नाचे उत्तर आधुनिक भारत जगाला दाखवून देणार असून त्याचा प्रारंभ म. गांधींनी सत्याग्रहाचा जो प्रभाव गेल्या ३०–३५ वर्षांत भरतखंडात दाखविला त्यातूनच झालेला आहे.

[*साधना, ७ मार्च १९५३, पृ. ५ व ६*]

## गांधींचे आत्मराज्य

... म. गांधींच्या विचारांमध्ये मानवी समाजाच्या दंडहीन अवस्थेस म्हणजेच अराज्यवादास अथवा आत्मराज्यवादास अग्रस्थान प्राप्त झालेले होते. त्यांच्या अंतःकरणातील आत्मप्रेरणेस, अध्यात्मवृत्तीस अथवा सर्वश्रेष्ठ धर्मभावनेस अनुरूप असाच हा तर्कशुद्ध निष्कर्ष होता. आध्यात्मिक आदर्श निष्ठा, अव्यभिचारी सत्यनिष्ठा आणि अविचल निरपवाद अहिंसावृत्ती यांतून निर्माण झालेली ही मानव समाजाची आदर्श अवस्था मनुष्यसमाजाला सुसंस्कृत स्थिती प्राप्त झाल्यापासून आजपर्यंत एकसारखी आकर्षित आहे. ही अवस्था प्राप्त व्हावी हाच सर्व धर्मसंस्थापकांचा अंतिम हेतू होता. अशी अवस्था फार प्राचीन काळी मानव समाजाला प्राप्त झालेली होती व ते सत्ययुग अथवा कृतयुग पुन्हा प्राप्त व्हावे हाच सर्व धर्मांचा आद्य हेतू असला पाहिजे. कृतयुग, सत्ययुग अथवा परमेश्वरी साम्राज्य इत्यादी अनेक नावांनी या आदर्श अवस्थेचे वर्णन प्राचीन धर्मसंस्थापकांनी केलेले आहे. याच आदर्शाला पुढे ठेवून आधुनिक युरोपातील सामाजिक व राजकीय क्रांतिकारकांनी अहिंसा वृत्तीचा त्याग करून सशस्त्र क्रांतीचे साधन या कामी उपयोगात आणिले म्हणून त्यांना या सत्याची संस्थापना करता आली नाही अशी महात्मा गांधींची आधुनिक युरोपीय इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी होती. ते या संस्कृतीला सैतानी संस्कृती असे केव्हा केव्हा म्हणत, पण ते त्यांचे वर्णन आधुनिक युरोपात निर्माण झालेल्या लोकशाहीच्या व समाजवादाच्या ध्येयांना उद्देशून केलेले नसून जी हिंसक साधने वापरली

आणि तसे करताना हिंसावृत्तीला जो गौरव प्राप्त करून दिला त्या साधनांना व त्या हिंसावृत्तीच्या गौरवालाच म. गांधींनी सैतानी हे विशेषण दिलेले आहे. पण क्रॉमवेल किंवा मॅझिनी अथवा लेनिन या त्यागी थोर पुरुषांनी ज्या लोकशाहीचे व समाजवादाचे ध्येय पुरस्कारिले त्या ध्येयांचा वा त्या ध्येयांच्या संस्थापनेसाठी त्यांनी केलेल्या स्वार्थत्यागाचा म. गांधींनी जन्मभर सक्रिय गौरवच केलेला आहे. कारण म. गांधींच्या जीवनात जसे श्रीकृष्ण किंवा गौतम बुद्ध अथवा येशू ख्रिस्त हे आपला सत्ययुगाच्या संस्थापनेचा प्राचीन संदेश देण्यासाठी पुन्हा अवतरले असल्याचा भास होतो त्याचप्रमाणे त्यांच्या जीवनात क्रॉमवेल, मॅझिनी अथवा लेनिन यांच्यासारखे आधुनिक काळात होऊन गेलेले लोकशाहीनिष्ठ व समाजवादी क्रांतिकारक हेही भारतात अवतीर्ण झालेले आहेत असाही भास होत असे. पहिल्या धर्मसंस्थापकांचा वारसा जसा गांधीजींनी आत्मसात केला होता तसाच दुसऱ्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांतिकारकांचा वारसाही त्यांनी आत्मसात केला होता आणि म्हणूनच त्यांचा सत्याग्रही संदेश हा जसा समाजाच्या बाह्यांगातील सर्वांगीण क्रांतीचे साधन बनू शकतो तसाच तो त्याच्या अंतरंग क्रांतीचे व आत्मप्राप्तीचे साधनही बनू शकतो. यामुळेच गांधीजी जसे स्वतःस लोकशाहीनिष्ठ व समाजवादी म्हणवून घेत तसेच ते आपणास अराज्यवादीही म्हणवून घेत. पण लोकशाही व समाजवाद ही ध्येये समाजाच्या बाह्यांगाच्या घटनेसंबंधीची असून आत्मराज्य हे समाजाचे आत्मिक उन्नती व अंतरंग क्रांती कोणत्या दिशेने झाली पाहिजे ते दाखवून देणारे अमूर्त असे अंतिम ध्येय आहे. हा विवेक करण्यास ते कधीही चुकत नसत. पहिली दृष्टी ही अध्यात्मशास्त्रीय दृष्टी आहे व दुसरी दृष्टी ही समाजशास्त्रीय दृष्टी आहे. या दोनही दृष्टींचा योग्य समन्वय व त्यातील भेदांचा विवेक झाल्यावाचून मानवी संस्कृतीपुढे आज ज्या समस्या उभ्या आहेत त्या सोडविता येणार नाहीत. ..

[येथून पुढे ''समाजशास्त्र व अध्यात्मशास्त्र यांचे दृष्टिकोन'' या उपशीर्षकाखाली काही परिच्छेद आहेत, ते येथे गाळले आहेत. या दोहोंची चर्चा आचार्य जावडेकरांनी "गांधी आणि मार्क्स" या लेखमालेतही केली आहे. ''समाजशास्त्र सर्वसामान्य मनुष्याला ज्या भौतिक व सामाजिक परिस्थितीत आपली आत्मोन्नती" साधता येईल त्याचा विचार करते तर ''अध्यात्मशास्त्र हे कोणत्याही भौतिक अथवा सामाजिक परिस्थितीत मनुष्याने आपली आदर्शनिष्ठा कायम ठेवून आत्मोन्नती व समाजोन्नती साधण्यासाठी कसे प्रयत्न करावेत ते सांगणारे शास्त्र आहे." असा त्यामधील भेद सांगून आचार्य जावडेकर आदर्शनिष्ठा आणि वास्तववाद यांच्या संबंधांची चर्चा करतात. ''मानवसमाजाला.. प्राप्त झालेले हे विकृत स्वरूप नष्ट करून मानव संस्कृतीस अत्यंत अवश्य अशा आध्यात्मिक अधिष्ठानावर तिची उभारणी करणे हाच आजचा मुख्य प्रश्न आहे. त्याचे उत्तर देताना केवळ भौतिक वास्तववाद किंवा केवळ आध्यात्मिक आदर्शवाद यांचेपैकी कोणत्याही एकाचाच अवलंब करून चालणार नाही.. विकेंद्रित समाजवादी लोकशाही हे आपले समाजसंघटनेचे मूर्त ध्येय असून.. आत्मराज्य हाच आमच्या संस्कृतीचा अमूर्त परंतु जिवंत असा आदर्श आहे.." असे सांगून आचार्य म. गांधींच्या नेतृत्वाची पुढे चर्चा करतात.]

## म. गांधींचा आदर्शनिष्ठ वास्तववाद

म. गांधी हे वास्तववादी होते की आदर्शवादी होते या प्रश्नाचे उत्तर ते आदर्शनिष्ठ वास्तववादी होते असेच द्यावे लागेल. रशियातील थोर पुरुषांशी तुलना करून बोलावयाचे तर असे म्हणता येईल की ते टॉलस्टॉयपेक्षा अधिक वास्तववादी होते आणि लेनिनपेक्षा अधिक आदर्शनिष्ठ होते. टॉलस्टॉयची आध्यात्मिक आदर्शनिष्ठा त्यांनी भारतापुढे ठेविली व तिचा भारतात सक्रिय प्रचार केला पण त्याचबरोबर लेनिनसारख्या क्रांतिकारकाचा वास्तववाद आध्यात्मिक आदर्शनिष्ठेचे अनुसंधान सुटल्यामुळे कसा मलिन होतो व त्यामुळे समाजहिताला कोणता धोका उत्पन्न होतो ते ओळखून आध्यात्मिक आदर्शनिष्ठा न सोडता राजकीय व्यवहार करण्याचा वास्तववाद सतत आचरून दाखविला आणि आपणास अधिक वास्तववादी समजणाऱ्या त्यांच्या समकालीन इतर कोणत्याही हिंदी पुढाऱ्यांपेक्षा अधिक राजकीय यश संपादन केले. १०–१२ वर्षांपूर्वी प्रत्येक व्यवहारी म्हणविणाऱ्या हिंदी मुत्सद्याला अव्यवहार्य वाटणारे भारतीय संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय प्रत्यक्ष हस्तगत करून दिले. इतकेच नाही तर भारताला राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही ही ध्येये प्राप्त करून घेण्यास जे सत्याग्रही आत्मबल उपयोगी पडले त्याच सामर्थ्याच्या जोरावर भारतात समाजवादी क्रांती यशस्वी करून आपणास इतर राष्ट्रात न घडलेला लोकशाही व समाजवाद यांचा समन्वय आपल्या राष्ट्रात घडवून आणता येईल अशी श्रद्धा अथवा आत्मविश्वास भारतीय समाजवाद्यांच्या अंतःकरणात त्यांनी निर्माण केला. यामुळेच भारतीय समाजवाद्यांच्या या निष्ठेकडे व भावी कर्तबगारीकडे आशिया खंडातील इतर राष्ट्रांतील समाजवादी तसेच ब्रिटन व अमेरिका येथील समाजवादी आज औत्सुक्याने व कौतुकाने पाहू लागले आहेत. म. गांधींनी ही जी सत्याग्रही प्रेरणा भारतात जागृत केलेली आहे ती चिरंतन होऊन भारताकडे मानव संस्कृतीचे नेतृत्व यावयाचे तर महात्मा गांधींच्या जीवनातील आध्यात्मिक आदर्शनिष्ठेचे अंतःसूत्र कायम टिकले पाहिजे. हे समाजवादाचे ध्येय मान्य झाल्याने अथवा ते ध्येय मान्य करणाऱ्या एखाद्या राजकीय पक्षाच्या हाती भारतातील लोकशाही राज्य आल्याने घडणार नाही. म. गांधींच्या हृदयातील त्यांच्या आध्यात्मिक आदर्शनिष्ठ जीवनापासून भारतीय जनतेला स्वयंप्रेरित त्यागाची व सेवामय जीवनाची जशी प्रेरणा मिळत असे तशी प्रेरणा केवळ आपल्या आदर्शनिष्ठ जीवनाने व लोकसेवेने भारतीय जनतेत निर्माण करणारे सत्याग्रही लोकसेवक भारतात निर्माण झाले पाहिजेत. सत्ता आणि संपत्ती यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ असे सामर्थ्य सत्याग्रही जीवनाने संपादन करिता येते याचा अनुभव म. गांधींच्या निधनानंतर आचार्य विनोबा भावे यांनी भारताला आणून दिला आहे. सत्याग्रही जीवनाचे हे सामर्थ्य सामाजिक क्रांतीच्या कामी उपयोगी पडू लागताच श्री. जयप्रकाश नारायण यांच्यासारखेच समाजवादी क्रांतिकारक व त्यांचा पक्ष आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदानयज्ञाकडे एकदम ओढिला गेला. केवळ मामुली स्वरूपाच्या विधायक कार्यात गुंतलेले गांधीवादी सामाजिक क्रांतीची ध्वजा घेऊन खेड्यापाड्यांतून संचार करू लागले.

इतकेच नाही तर काँग्रेस पक्ष व त्या पक्षाची सरकारे यांनाही भारतात जागृत होणारी ही सामाजिक क्रांतीची प्रेरणा स्वागतार्ह वाटू लागली. हा सर्व आध्यात्मिक आदर्शनिष्ठ जीवनातून होणाऱ्या सामाजिक क्रांतिशक्तीचा प्रभाव आहे. यातील रहस्य ज्यास समजून घ्यावयाचे असेल त्यांनी लोकशाही समाजवादाच्या समाज संघटनात्मक ध्येयाच्या पलिकडे दृष्टी पोहोचवून आध्यात्मिक आदर्शनिष्ठेच्या नेत्रांना दिसणाऱ्या आत्मराज्याच्या अमूर्त ध्येयाचे महत्त्व ओळखले पाहिजे. दंडहीन सामाजिक अवस्थेचे अथवा सत्ययुगाचे हे अंतिम ध्येय केवळ समाजशास्त्रीय विचार दृष्टीला फार दूरचे किंबहुना सर्वथा अप्राप्य असे भासत असले तरी सत्याग्रही जीवनाची दीक्षा ज्यांनी घेतलेली असेल त्यांना ते अत्यंत नजीकचे व त्यांच्या जीवनात प्रभावी क्रांती घडवून आणणारे असेच अनुभवास येत असले पाहिजे. समाजाला दंडहीन अवस्था प्रत्यक्ष प्राप्त झाली नाही तरी त्या दिशेने त्याची प्रगती होत रहावी याबद्दल प्रयत्न करणारे सत्याग्रही लोकसेवक राज्यसंस्थेच्या आधारावाचून आपले सर्व व्यवहार कसे करावेत आणि समाजाच्या अंतःकरणातील सद्बुद्धी जागृत करून समाजात दुष्ट लोकांची निपजच होऊ नये याबद्दल कसे यत्न करावेत ते दाखवून देत राहिले पाहिजेत. हे सर्व समाजाला उन्नतीकारक असले तरी या सत्याग्रहींनी वस्तुनिष्ठ समाजशास्त्रीय दृष्टी केव्हाही सोडता कामा नये. ही त्यांनी सोडली नाही तरच म. गांधींच्या प्रमाणे त्यांना राजकीय, सामाजिक व आर्थिक क्रांतीचे महत्त्व पटेल आणि अशा क्रांतीत ते योग्य प्रकारचे मार्गदर्शन करू शकतील.

## आध्यात्मिक आदर्शनिष्ठेतील धोका

युरोपीय संस्कृतीच्या आजच्या अवस्थेचा विचार करीत असता आध्यात्मिक आदर्शनिष्ठेची महती आपणास पटू लागते. या दृष्टीने म. गांधींनी आध्यात्मिक आदर्शनिष्ठा पुन्हा जागृत करून तिच्या प्रभावाने राजकीय, आर्थिक व सामाजिक क्रांती करण्याचा मार्ग दाखवून दिला हेच त्यांचे वैशिष्ट्य होय असे आपणास म्हणता येते. युरोपीय संस्कृतीच्या प्रभावाने आजच्या मानवसमाजाला जे स्वरूप प्राप्त झाले आहे त्या दृष्टीने हे वैशिष्ट्य महत्त्वाचे आहे. तथापि भारतीय संस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने म. गांधींच्या कार्याचा विचार करू लागले असता त्याचे वैशिष्ट्य थोडे निराळे असल्याचे दिसून येईल. भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांना आध्यात्मिक आदर्शनिष्ठेचे महत्त्व वैचारिक दृष्टीने नेहमीच पटलेले होते. परंतु ही आध्यात्मिक आदर्शनिष्ठा सर्वसामान्य समाजाच्या जीवनात टिकून राहील, निदान तिचा थोडा तरी प्रभाव सतत पडत राहील अशी सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती कशी निर्माण करावी व त्यासाठी कोणत्या प्रकारची सामाजिक संघटना स्थापन करावी यासंबंधीचे समाजशास्त्रीय विचार भारतीय संस्कृतीत वाढलेले नाहीत. यामुळे सुमारे दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी आपण जी एक वर्णाश्रम धर्माच्या रूपाने समाजसंघटना निर्माण केली तिच्यात बदल करण्याची कोणतीही आवश्यकता भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांना अद्यापि वाटत

नाही. यामुळे सामाजिक क्रांतीचे महत्त्व किंबहुना तिची आवश्यकताही आम्हास अद्यापि पटलेली नाही. यामुळे आधुनिक युरोपात घडून आलेल्या लोकशाहीच्या व समाजवादाच्या क्रांत्यांचेही महत्त्व आम्हास यथार्थ आकलन करता आले नाही व येत नाही. यामुळे म. गांधींनी आपल्या विभूतिमत्त्वाच्या बळाने आम्हास लोकशाही व समाजवाद या ध्येयांचे महत्त्व समजून दिले नसते व त्यांच्या संस्थापनेचा आमच्या आध्यात्मिक आदर्शनिष्ठेशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे हे पटवून देण्याचे प्रयत्न केले नसते तर आम्ही लोकशाही व समाजवाद ही ध्येये परकीय, पाश्चात्त्य आणि म्हणून त्याज्य अथवा उपेक्षणीय असेच मानून परकीयांचे साम्राज्य गेल्यानंतर स्वस्थ बसलो असतो. तसे स्वस्थ न बसता आज आम्ही सत्याग्रह शक्तीचा उपयोग सामाजिक क्रांतीच्या कामी करू लागलो असलो, निदान तसा विचार आम्हास सुचला तर त्याचे श्रेय केवळ म. गांधींनाच द्यावे लागेल. आध्यात्मिक आदर्शनिष्ठा आणि सामाजिक क्रांतीनिष्ठा या दोहोंचा समन्वय गांधीजींनी केला यातच त्यांचे खरे वैशिष्ट्य असून ही सामाजिक क्रांतीनिष्ठा आपणास आत्मसात करावयाची तर समाजशास्त्रीय वास्तवदृष्टी स्वीकारून आजच्या भारतात समाजवादी राजवट स्थापन करणे हेच आपले खरे कर्तव्य आहे हे आपण निःसंदिग्धपणे ओळखले पाहिजे. केवळ आध्यात्मिक आदर्शनिष्ठेची भाषा वापरून अंतिम आत्मराज्याचे ध्येय लोकांपुढे ठेवून आजच्या समाजात चालू असलेले राजकीय, आर्थिक व सामाजिक संघर्ष आपणास मिटविता येणार नाहीत. हे संघर्ष केवळ समाजाला आत्मोन्नतीचा किंवा नैतिक उन्नतीचा उपदेश करूनही टिकविता येणार नाहीत. ते मिटवावयाचे तर ज्या सामाजिक व आर्थिक संघटनेमुळे ते निर्माण होत आहेत ती सामाजिक व आर्थिक संघटना बदलून घेण्याच्या कामी समाजातील आत्मबल व नैतिकबल कसे प्रभावी होईल ते सत्याग्रहींना दाखवून दिले पाहिजे. इतकेच नाही तर आजच्या समाजात धनिक व श्रमिक वर्गामध्ये जो विग्रह चालू आहे तो विग्रह नष्ट करण्यास समाजवादाची संस्थापना हा एकच खरा मार्ग आहे हे ओळखून सत्याग्रहींनी समाजाचे आत्मिक बल ( आत्मबल ) त्या कामी उपयोगी आणण्याचा उपदेश समाजाला व राज्यकर्त्यांना केला पाहिजे. यासाठी सत्याग्रही पद्धतीने लढे करावे लागले तरी तेही करण्याची तयारी त्यांनी ठेविली पाहिजे. ही वास्तववादी दृष्टी भारतातील प्राचीन अध्यात्मनिष्ठेला देऊन तिला सामाजिक, राजकीय क्रांतीस प्रवृत्त केले हेच गांधीजींचे भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने कार्य वैशिष्ट्य होय. युरोपखंड क्रांतिनिष्ठ बनले होते पण ते अध्यात्मनिष्ठेपासून भ्रष्ट झाले होते. भरतखंड अध्यात्मनिष्ठ होते पण त्याला क्रांतीनिष्ठेचे महत्त्व न पटल्याने त्याची संस्कृती गुलाम संस्कृती बनली होती. गांधीजींनी भारतीय आध्यात्मिक संस्कृतीची ही विकृती नष्ट केली व तसे करताना अध्यात्मनिष्ठेतून निर्माण झालेली अहिंसावृत्ती क्रांतिकारक रूपाने प्रकट केली. यामुळे केवळ अध्यात्मनिष्ठेतून निर्माण होणारा क्रांतिपराङ्मुखतेचा धोका त्यांनी टाळला. तसेच क्रांतिपराङ्मुखतेमुळे अध्यात्मनिष्ठेला प्राप्त झालेली विकृती नष्ट करून तिच्याच आधारावर भारतीय जनतेत

क्रांतिवृत्तीची ज्योत प्रज्वलित केली. जर म. गांधींनी भारतीय जनतेच्या अंतःकरणात पेटविलेली ही क्रांतिवृत्तीची ज्योत आपण केवळ अध्यात्मनिष्ठेचे आदर्श उपदेशित राहून विझू दिली तर त्यापासून आपल्या राष्ट्राच्या भवितव्याला धोका निर्माण होईल. म्हणून म. गांधींच्या प्रमाणे आपण आध्यात्मिक आदर्शनिष्ठा आणि सामाजिक व राजकीय वास्तववाद यांचा समन्वय साधिला पाहिजे आणि आत्मराज्याच्या अंतिम ध्येयाच्या उपासनेबरोबरच लोकशाही समाजवादाच्या निकटवर्ती ध्येयाच्या संस्थापनेचे प्राप्त कर्तव्य वास्तववादी दृष्टीने करीत राहिले पाहिजे. असे आपण करू तर लोकशाही, समाजवाद आणि अराज्यवाद या ध्येयांचा योग्य समन्वय कसा होतो ते आपणास कळू लागेल व जी गोष्ट युरोपखंडास किंवा मार्क्सवादी क्रांतिशास्त्रज्ञांस करता आली नाही ती आपण करून दाखवू शकू. ...

[*साधना, १४ मार्च १९१३, पृ. ९ ते ७*]

[या लेखमालेतील तिसरा आणि शेवटचा लेख २१ मार्च १९५३ च्या 'साधने'त (पृ. ५ ते ६) प्रसिद्ध झाला. झारशाहीतील रशियातील क्रांतिकारक लढे आणि चंपारण्यापासूनचा भारतीय स्वातंत्र्य लढा यांतील भेद थोडक्यात स्पष्ट करून त्यामुळे रशियात निष्ठुर एकपक्षशाही तर भारतात आत्मराज्य ही ध्येये उदयाला आली असा युक्तिवाद केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात कम्युनिस्टांखेरीज राष्ट्रवादी (कॉंग्रेस), समाजवादी (प्रजासमाजवादी पक्ष) आणि सत्याग्रही (सर्वोदयी) अशा तीन शक्ती असल्याचे आचार्य या लेखात सांगतात. या तिन्ही शक्तींवर गांधींचा प्रभाव असल्याने "आत्मराज्य" स्थापन करण्यात त्यांचा हातभार लागू शकतो असे त्यांना वाटत होते. मात्र "म. गांधींच्या आग्रहामुळे का होईना हिंदी राष्ट्रवादाची प्रगती समाजवादी दिशेनेच झाली पाहिजे ही गोष्ट आज भारतात जवळजवळ सर्वमान्य झालेली आहे. पण ही सर्वमान्य झालेली गोष्ट प्रत्यक्ष घडवून आणण्याचे सामर्थ्य या सर्वसत्ताधारी बनलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या अंगी (कॉंग्रेस) येण्याचे चिन्ह दिसत नाही." अशी त्यांची तक्रार होती. साहजिकच, "म. गांधींच्या वास्तववादी राजकारणाचा वारसा या (प्र. स.) पक्षाकडे आलेला आहे व त्यामागील क्रांतिकारक वृत्ती आजच्या भारतात टिकवून धरण्याचे कार्य राजकीय पक्षांपैकी हाच एक पक्ष करीत आहे....." असे आचार्यांना वाटले. मात्र आचार्यांना सर्वाधिक आशा होती ती सर्वांगीण क्रांती करू पाहणाऱ्या सत्याग्रही लोकसेवकांविषयी. भूदान यज्ञाच्या रूपाने राजकीयच नव्हे तर आध्यात्मिक अधिष्ठान निर्माण करणारी सामाजिक क्रांती ही तिसरी शक्ती करेल असे त्यांना वाटत होते. "या देशातील लोकशाही बिनधोक बनून तिची समाजवादी दिशेने त्वरित प्रगती होत राहील अशी परिस्थिती निर्माण करणे हे सत्याग्रही लोकसेवकांचे आजचे कर्तव्य आहे." असे ते म्हणतात.

या लेखाचा आणि लेखमालेचा समारोप करताना आचार्य म्हणतात : "... अशा रीतीने आधुनिक भारतात लोकशाही, समाजवाद आणि अराज्यवाद यांचा सुंदर समन्वय घडून येत असून रशियातील बोल्शेव्हिकांना जे व्यवहारतः साधले नाही, मार्क्सवादी तत्त्वज्ञान्यांना जे तत्त्वतः आकलन झाले नाही ते कार्य आधुनिक भारतात घडून येत आहे अशी आमची श्रद्धा आहे. ज्या मानाने या कार्याची प्रगती होत जाईल त्या मानाने भारतातील कम्युनिस्ट पक्ष व त्यांचे तत्त्वज्ञान यांचा अंत होत जाऊन मानवी संस्कृतीचे नेतृत्व करण्याचे कार्य रशिया किंवा अमेरिका यांच्या हातून घडणार नसून ते भारतीय राष्ट्रच करून दाखवील अशी जगाची खात्री होत जाईल."]

## विभाग दुसरा

---

# गांधीवाद

## १२

# सत्याग्रह युद्धनीती

[ "महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षांची उत्क्रांती" या शीर्षकाची लेखमाला आचार्यांनी १९२२ मध्ये 'लोकमित्रा'तून प्रसिद्ध केली. तिच्या समारोपात गांधींच्या नेतृत्वाच्या उदयाचा उल्लेख त्यांनी केला होता. ते म्हणतात ".... चंपारण्य प्रकरण, खेडा जिल्ह्यातील सरकारला जमीन महसूल वसूल न करू देण्याचे प्रकरण आणि रौलट बिलानंतर सर्व हिंदुस्थानला व्यापणारी आणि सरकार आणि लोक यांना काही काल मोहात, भ्रमात किंवा आनंदात पाडणारी सत्याग्रहाची चळवळ या सर्व गोष्टी महात्मा गांधी यांनी कोणत्याही पक्षाच्या साहाय्यावाचून केल्या होत्या. ... " ('लोकमित्र', जुलै, १९२२, पृ. ७५). या लेखमालेनंतर पुढच्याच वर्षी त्यांनी गांधींच्या सत्याग्रहाचे स्वरूप विशद करणारा लेख 'लोकमित्रा'त लिहिला. या लेखावरून १९२३ सालीच सत्याग्रहाच्या मूलभूत वैशिष्ट्यांचे आणि तात्त्विक अधिष्ठानाचे भान आचार्यांना कसे आले होते हे स्पष्ट होते.

सत्याग्रह हे धर्मयुद्ध असते, खरे सत्याग्रह युद्ध शुद्ध सत्याकरताच असते, आप्तबांधवांच्या जुलुमांचाही प्रतिकार करण्यास सत्याग्रहयुद्ध व्यक्तीला प्रवृत्त करते, आत्मबलाची वृद्धी हा सत्याग्रहाचा गाभा आहे इ. बाबींचा आचार्यांनी लेखाच्या आरंभी उल्लेख केला आहे.]

... म. गांधींनी सत्याग्रह्यांपुढे ठेवलेले ध्येय भगवद्‌गीतेतील कर्मयोग्याचे आहे. काही लोकांना असे वाटते की, म. गांधींनी शत्रूवरसुद्धा प्रेम करावे, इंग्लिशांना आपले बंधू समजावे वगैरे जी ध्येये लोकांपुढे ठेवलेली आहेत, ती ख्रिस्ती किंवा जैनधर्मातून घेतलेली असून भगवद्‌गीतेत श्रीकृष्णांनी अर्जुनाला केलेला उपदेश अधिक व्यवहार्य व मनुष्य-स्वभावाला अधिक उचित असा आहे, परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. भगवद्‌गीतेतील उपदेशाप्रमाणे वागावयाचे झाले तरी ज्याला म्हणून धर्माची किंवा नीतीची थोडीतरी चाड आहे, त्याने सर्वभूतात्मभाव स्वीकारून "निर्वैरः सर्वः भूतेषु" अशीच वृत्ती स्वीकारली पाहिजे. भगवद्‌गीतेत वर्णिलेली कर्मयोग्याची मनःस्थिती आणि सत्याग्रह्यांची मनःस्थिती यात काडीमात्र अंतर नाही. फक्त भगवद्‌गीतेतील कर्मयोगी आपल्या आत्मबलाच्या तोडीला शस्त्रबलांची जोड देतो व सत्याग्रही केवळ आपल्या आत्मबलानेच यशःप्राप्तीची इच्छा

धरतो. एरव्ही निष्कामबुद्धी, निरपेक्ष प्रेम, समता व मनाची शांती ही ध्येये दोघांनाही सारखीच मान्य आहेत. तसेच लोकसंग्रहबुद्धी म्हणजे जगत्कल्याणाची इच्छा दोघांतही जागृत असते आणि हे दोघेही जगापासून पळून जाणारे संन्यासी नसून ते जगातील अज्ञान, द्वेष-भावना आणि अन्याय यांच्याशी नित्य झगडणारे पराक्रमी कर्मयोगी आहेत. जगातील सर्व अनर्थांचे मूळ मनुष्यामनुष्यांतील भेदभावनेत, वर्णावर्णांतील वैषम्यांत किंवा राष्ट्राराष्ट्रांतील द्वैतभावनेत आहे. ही गोष्ट दोघांनाही सारखीच मान्य असून ही द्वैतभावना नष्ट करणे हेच दोघांचेही ध्येय आहे. अहंकाराने मोहास बळी पडून स्वार्थ साधण्यासाठी युद्धास उद्युक्त होणारे लोक नरकांत जातात, असे भगवद्गीतेतही सांगितलेले आहे. ...

... सत्याग्रहयुद्ध श्रेष्ठ किंवा सशस्त्रयुद्ध श्रेष्ठ, याचा निर्णय गीतेत दिलेला नाही. फक्त संन्यासमार्ग पत्करून, मला मोक्ष मिळाला, मला आता जगताशी काही कर्तव्य नाही, असे म्हणून स्वस्थ न बसता सिद्धावस्था प्राप्त होण्यापूर्वी व नंतरही जगातील अन्यायाशी निष्काम-बुद्धीने सतत झगडत राहिले पाहिजे, एवढाच गीतेचा अभिप्राय आहे व तो म. गांधींसारख्या सत्याग्रह्याला पूर्णपणे मान्य आहे. म. गांधींना भगवद्गीता इतकी पूज्य का वाटते याचा उलगडा आता वाचकांस होईल. म. गांधी संन्यासमार्गी आहेत अशी जी कित्येकांची समजूत आहे, त्यातील प्रमादही वरील विवेचनावरून ध्यानात येईल. ...

आता आणखी एका प्रश्नाची फोड करून मग सत्याग्रह्याच्या ध्येयाचा प्रश्न सोडून सत्याग्रह युद्धाच्या नीतीची चर्चा करू. ध्येय या दृष्टीने सशस्त्रयुद्धापेक्षा शांततेचे युद्ध अधिक सरस आहे याबद्दल आता कोणाचा मतभेद होईल, असे वाटत नाही. जगातील अन्यायाचा प्रतिकार सशस्त्र युद्धाने करणे म्हणजे अन्यायी लोकांना ठार करणे होय, परंतु सत्याग्रहाची योजना करणे म्हणजे अन्यायी लोकांना न्यायी बनविण्याचा प्रयत्न करणे होय. अर्थात धर्मदृष्टीने या दुसऱ्या मार्गाचे महत्त्व जास्त आहे, हे कोणासही सांगावयास नको. जगातील अन्यायाच्या प्रतिकारार्थ निरहंकार व निष्कामबुद्धीने केलेले सशस्त्र युद्ध हे कर्त्याला बंधन-कारक होत नाही. या दृष्टीने सशस्त्र कर्मयोगी व निःशस्त्र कर्मयोगी या दोघांचीही योग्यता सारखीच आहे. परंतु पहिल्याच्या कर्माच्या परिणामांहून दुसऱ्याच्या कर्माचा परिणाम जगताला अधिक हितावह, असे म्हणणे भाग आहे. पहिल्याच्या उपायाने एकाच पक्षाची आध्यात्मिक उन्नती होईल, तर दुसऱ्याच्या प्रयत्नांनी दोन्ही पक्षांची आध्यात्मिक उन्नती होईल. कोणत्याही कर्माची इष्टानिष्टता कर्त्याच्या बुद्धीवरून आणि त्याच्या परिणामांवरून ठरत असते. कर्त्याच्या मनाला मिळणाऱ्या शांतीच्या किंवा मोक्षाच्या दृष्टीने निष्काम व साम्य-बुद्धी आणि लोकसंग्रहपणा एवढ्याच गोष्टी पुरे होतात, परंतु परिणामाच्या दृष्टीने अहिंसेचा मार्ग, हिंसेच्या मार्गाहून श्रेष्ठ आहे असे कोणीही कबूल करील.

आता व्यवहार्यतेच्या दृष्टीने पाहिल्यासही दोन्हीही कर्मयोग तितकेच कठीण व तितक्याच प्रमाणात व्यवहार्य आहेत. जे युद्ध वैयक्तिक असेल ते खऱ्या कर्मयोगाला धरून असू शकेल

परंतु ज्या युद्धात अनेक व्यक्तींचा समावेश होतो, ते तसे असू शकणार नाही. त्यात भाग घेणाऱ्या पुष्कळ व्यक्ती स्वार्थप्रेरित असू शकतील, हा नियम दोन्ही प्रकारच्या–म्हणजे सशस्त्र व निःशस्त्र युद्धांना सारखाच लागू आहे. सार्वत्रिक सत्याग्रहासंबंधी म. गांधी म्हणतात, "वैयक्तिक कायदेभंग निःस्वार्थी असू शकतो व पुष्कळ वेळा तो तसाच असतो. सार्वत्रिक कायदेभंग हा स्वार्थी असू शकतो व तो बहुधा तसाच असतो. उदाहरणार्थ; दक्षिण आफ्रिकेत केलनबॅक व पोलक यांनी केलेला कायदेभंग निष्काम बुद्धीचा होता. त्यात त्यांना स्वतः काहीच मिळवावयाचे नव्हते. हजारो लोकांनी त्यात जो भाग घेतला तो मुदतबंदीच्या करारांतुन सुटलेल्या मजुरांवर व त्यांच्या बायकामुलांवर बसविलेला वार्षिक कर नाहीसा होईल, या स्वार्थबुद्धीने घेतला होता." सार्वत्रिक सत्याग्रहाच्या प्रसंगी कायदेभंग करणाऱ्यांना त्या तत्त्वाचे व्यवहारापुरते ज्ञान असले म्हणजे बस्स आहे.

.. यात सामील होणारेही सर्व सैनिक निष्काम कर्मयोगी लागत नाहीत. फक्त त्यांचे ध्येय ते असून त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी त्यांचे अहर्निश यत्न चाललेले असले पाहिजेत. या प्रयत्नात ज्यांना पूर्ण यश प्राप्त झालेले आहे व ज्यांना मुळीच यश प्राप्त झालेले नाही परंतु त्यातील बाह्य कवाईत मात्र ज्यांना करता येते, सेनापतीने घालून दिलेली शांततेची बाह्य शिस्त जे सहसा मोडीत नाहीत, अशा अनेक दर्जाच्या अनेक लोकांचा समावेश सत्याग्रह-युद्धात होऊ शकेल. त्यांच्यापुढे ठेवलेले ध्येय मात्र येशू खिस्त, गौतम बुद्ध किंवा एकनाथ, तुकाराम यांचे ठेवलेले असेल. म. गांधींनी राष्ट्रीय स्वयंसेवकांपुढे ठेवलेल्या शपथपत्रिकेतील ध्येयाचीही अशीच स्थिती आहे. ते अव्यवहार्य आहे म्हणून त्याची चेष्टा करणाऱ्यांनी एवढे खुप लक्षात ठेवावे की, उद्या आमच्या राष्ट्राने सशस्त्र युद्ध करून स्वातंत्र्य मिळविण्याचे ठरविले तरी तितकेच उच्च ध्येय स्वयंसेवकांपुढे ठेवावे लागेल. ...

वरील विवेचनावरून सत्याग्रहयुद्धात शक्याशक्य, युक्तायुक्त किंवा योग्यायोग्य असा विचारच करावा लागत नाही असा मात्र कोणी ग्रह करून घेऊ नये. ज्याप्रमाणे सशस्त्र युद्धात सेनापतीच्या अंगी कौशल्य लागते त्याचप्रमाणे सत्याग्रहयुद्धातही सेनापतीच्या अंगी समयसूचकता, व्यवहारनैपुण्य आणि स्वपरबलाबलाची जाणीव लागत असते. युद्ध केव्हा सुरू करावे, शत्रूवर कोठे हल्ला चढवावा, तात्पुरते तह केव्हा करावेत आणि अखेरच्या तहाच्या प्रसंगी कोणत्या अटींबद्दल आग्रह धरावा व कोणत्या अटीत तडजोड करावी, या सर्व गोष्टी ठरविण्यास इतर सेनापतींप्रमाणेच सत्याग्रही सेनापतीसही व्यवहारनैपुण्य लागत असते. यालाच सत्याग्रह युद्धनीती असे म्हणण्यास हरकत नाही. तिचे आता थोडे सविस्तर विवेचन करितो.

सत्याग्रहाची असहकारिता आणि कायदेभंग अशी दोन अंगे आहेत. यापैकी असहकारितेस युद्धाची पूर्वतयारी व कायदेभंगास प्रत्यक्ष संग्राम, असे म्हणण्यास हरकत नाही.

शत्रुपक्षाशी असहकारिता केल्याने जरी स्वपक्षीयांना त्रास सोसावा लागला तरी कायदेभंगामुळे स्वपक्षाची जी हानी होते, त्यामानाने ती हानी काहीच नाही. कायदेभंग सुरू असला म्हणजे रोजच्या रोज आपले सैनिक पडत असतात किंवा ते शत्रूच्या ताब्यात जात असतात. याकरिता कायदेभंग सुरू करताना फारच सावधगिरी ठेवावी लागते. कायदेभंगाची मोहीम एकसारखी फार दिवस चालू शकत नाही. शिवाय ती सुरू असताना आपण शत्रुपक्षाला मुद्दाम आव्हान केले असल्यामुळे त्याचे माथे फिरून जाऊन तो आपल्यावर वाटेल त्या शस्त्रांचा प्रयोग करीत असतो. यामुळे स्वपक्षीयात द्वेषभावना जागृत होऊन शांततेची शिस्त मोडण्याचा फार संभव असतो. याकरिता सत्याग्रहयुद्ध सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत सत्याग्रही सेनापती लोकांना असहकारितेचा एकसारखा उपदेश करीत असला तरी कायदेभंगाचा प्रत्यक्ष संग्राम नेहमीच चालू असतो असे नाही. ...

आता सत्याग्रहयुद्ध केव्हा सुरू करावे यासंबंधी विचार करू. याबाबतीत इतर युद्धाला जो न्याय लागू आहे तोच सत्याग्रह युद्धालाही लागू असला पाहिजे. ...

... साम, दाम व भेद या उपायांनी शक्य तितका तंटा मिटविण्याचा प्रयत्न करावा, कारण युद्धात जयापजयाविषयी नेहमीच साशंकता असल्यामुळे शक्य तितका युद्धाचा प्रसंग टाळावा, परंतु वरील तिन्ही उपाय टाळल्यावर जय मिळेल अशी तयारी करून युद्ध करावे. म. गांधींनी ज्या ज्या वेळी सत्याग्रह-युद्धे केली त्या त्या वेळी हा नियम पूर्णपणे पाळलेला दिसून येतो. द. आफ्रिकेत एशिॲटिक लॉ अमेंडमेंट ॲक्ट काढून टाकण्याबद्दल त्यांनी जे सत्याग्रह-युद्ध चालविले होते, त्यावेळी त्यांनी प्रतिपक्षाला शक्य तितक्या सवलती दिल्या होत्या आणि ज्या ज्या वेळी प्रतिपक्षाने तहाचे बोलणे लावले, त्या त्या वेळी त्यांनी तात्पुरत्या युद्ध-तहकुबीला मान्यता देऊन, तो तंटा सामाने तोडण्यास आपली तयारी आहे, असे व्यक्त केले होते. एकदा तर त्यांना या कामात पूर्णपणे फशी पडावे लागले होते. येथे सुरू झालेल्या खेडा जिल्ह्यातील सत्याग्रहाच्या प्रसंगी, रौलट ॲक्ट संबंधीच्या चळवळीच्या वेळी किंवा पुढे सुरू झालेल्या व हल्ली सुरू असलेल्या असहकारितेच्या चळवळीतही त्यांनी कायदेभंगाचे संग्राम सुरू करताना फार सावधगिरी ठेवलेली दिसून येते. ज्या ज्या वेळी सरकारने तडजोडीची अनुकूलता दर्शविली त्या त्या वेळी त्यांनी आपली तडजोडीस अनुकूलता व्यक्त केली होती. अगदी निरुपाय म्हणून आपण कायदेभंगाचे शस्त्र उभारतो, असे त्यांचे नेहमीचे म्हणणे असे. त्यांनी ज्यावेळी कायदेभंग स्वीकारला त्यावेळी आपण तसे न केल्यास सशस्त्र प्रतिकाराची बुद्धी फैलावेल, असे त्यांनी सरकारास दाखवून दिले. यावरून सुद्धा ज्या परिस्थितीत सशस्त्र युद्ध युक्त ठरेल, त्याच परिस्थितीत निःशस्त्र युद्ध युक्त ठरते असे म्हणावे लागते. सशस्त्र युद्ध पुकारण्यापूर्वी आमची इच्छा नसता आमच्यावर हा प्रसंग प्रतिपक्षाच्या हट्टीपणामुळे आलेला आहे, असे दोन्ही युद्धमान पक्षातील मुत्सद्दी जाहीर करीत असतात. तो यापैकीच काहीसा भाग आहे. परंतु त्यात थोडीशी लबाडी असते, ती मात्र सत्याग्रही

मुत्सद्याच्या जवळ नसते. सशस्त्र युद्धातही लुच्चेगिरी का करतात व सत्याग्रह्यांनी तसे का करू नये, याचे कारण पुढीलप्रमाणे आहे.

प्रतिपक्षाच्या अडचणीचा फायदा घ्यावयाचा हा एक सशस्त्र युद्धातील डाव आहे. अर्थात सत्याग्रह्याला हा डाव खेळण्याचे प्रयोजन नाही, कारण प्रतिपक्षीयांचे नुकसान करून किंवा त्यास भीती दाखवून त्याला विजय संपादन करावयाचा नसतो. यामुळे युद्धाला योग्य कारण असले तर तो युद्ध केव्हाही सुरू करतो. सशस्त्र युद्धाची तशी स्थिती नाही. एकदा आपला तंटा साम, दाम, भेद या तीन उपायांनी तुटणे शक्य नाही व युद्ध करणे अवश्य आहे, अशी दोन राष्ट्रांची खात्री झाली म्हणजे आपणास अनुकूल आणि प्रतिपक्षीयास प्रतिकूल असा काळ शोधून काढून त्याचवेळी प्रतिपक्षाचा कोणताही दोष नसला, तरी युद्ध सुरू करावे लागते. अशा वेळी युद्ध सुरू करण्याची जबाबदारी प्रतिपक्षीयावर टाकण्यात लबाडी असते, ही गोष्ट काही खोटी नाही. तथापि युद्धाशिवाय गत्यंतर नाही, अशी खात्री झाल्यावरच केवळ युद्धाचा समय ठरविण्यातही लुच्चेगिरी केली जाते. साम, दाम, भेद या उपायांनी कायमपणे न मिटणाऱ्या प्रश्नाबद्दलच साधारणतः युद्धे होत असतात, हे खोटे नाही. तथापि सत्याग्रह्याला प्रतिपक्षाच्या संकटाचा फायदा घेणे योग्य वाटत नसल्यामुळे त्याला उपरोक्त लबाडी करण्याचे कारण नसते. ज्यावेळी खरोखरच प्रतिपक्षी कोणत्याही तडजोडीस अनुकूल नसतो त्याचवेळी सत्याग्रह युद्ध सुरू करणे युक्त आहे, हे आता वाचकांच्या लक्षात येईल.

येथे साम, दाम, दंड, भेद या चार उपायांचा सत्याग्रही कोणता अर्थ करतात हे पाहिले पाहिजे. दंड याचा अर्थ सत्याग्रही आत्मक्लेश असाच करतात. सामाचा अर्थ उघड असून कोणत्याही प्रश्नासंबंधी प्रतिपक्षीयाशी चर्चा करून दोन्ही पक्षातील लोकांचे गैरसमज दूर करणे आणि आपल्या पक्षाची बाजू युक्तिवादाने दुसऱ्यांना पटविण्याचा प्रयत्न करणे, या अर्थाने सत्याग्रह्याला सामाची फारच गरज आहे. हे काम करण्यास सत्याग्रह्याने नेहमी तयार असले पाहिजे. महात्मा गांधींनी असहकारिता पुकारली असताना ते व्हॉईसरायांची गाठ का घेतात, ड्यूक ऑफ कॅनॉट किंवा प्रिन्स ऑफ वेल्स यांना पत्रे का पाठवितात, याचे रहस्य या सामाच्या उपायात आहे. कोणताही प्रश्न सामाने सुटणारा असल्यास तो प्रयत्न प्रथम झाला पाहिजे. दुसरा उपाय म्हणजे दाम. दाम याचा अर्थ प्रतिपक्षातील लोकांना फितुरीकरिता दिलेले द्रव्य असा नव्हे, कारण त्याचा अंतर्भाव दाम यात न होता भेद यात होतो. दाम यात आपल्या न्याय्य हक्कांतील काही भाग सोडून देऊन तडजोडीस तयार होणे असा होतो. सत्याग्रह्याला हाही उपाय योजावा लागतो. स्वातंत्र्याचे ध्येय प्राप्त झाले नाही तरी काही काळ वसाहतीच्या स्वराज्यावर तृप्त राहणे, हा दामाचाच एक प्रकार आहे. भेद हा उपाय उघडपणे योजणे याचाच अर्थ असहकारिता होय. हा उपाय योजताना अर्थात कोणत्याही नीतिबाह्य कृत्याचा अवलंब करावयाचा नाही, हे सत्याग्रह्याचे

ब्रीदच आहे. तात्पर्य नेहमीच्या व्यवहारातील साम, दाम, दंड, भेद या चारी उपायांची योजना त्यातील 'शठं प्रति शाठ्यं' हा भाग वगळून सत्याग्रही करीत असतो.

युद्धनीतीत "किमान प्रतिकाराचे धोरण" (Policy of Least Resistance) असे एक धोरण असते. त्याचाही अवलंब सत्याग्रह्याला करावा लागतो. अलीकडे हिंदी राजकारणात किमान प्रतिकाराचे धोरण आपण स्वीकारतो, असे नेमस्त लोक म्हणत असतात, परंतु हे त्यांचे म्हणणे बरोबर नाही. कारण हे धोरण कोणत्याही प्रकारचे युद्ध न करणाऱ्या नेमस्तांना आचरता येणेच शक्य नाही. प्रत्यक्ष युद्धाला उभा राहणाऱ्या सेनापतीला त्याचा स्वीकार करावा लागतो. ज्या ठिकाणी शत्रूच्या प्रतिकाराचा संभव कमी आणि ज्या ठिकाणी आपले बल एकवटणे जास्त सुकर ते ठिकाण आधी काबीज करून शत्रूची फळी फोडणे, असा या धोरणाचा मूळचा शब्दशः अर्थ आहे. नेमस्त लोक या धोरणातील एकाच अंगाचा लक्षणेने स्वीकार करतात, परंतु त्यातील दुसऱ्या अंगाकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष आहे, प्रतिपक्षीयांचा सर्वांत मोठा जो अन्याय असेल व ज्याचे समर्थन करणे त्यांना शक्य नाही त्यावरच आपले लक्ष वेधणे व तो अन्याय दूर करण्याचा प्रथम प्रयत्न करणे हे धोरण वरील धोरणाचे एक अंग आहे. त्याचे दुसरे अंग म्हणजे तो अन्याय दूर करण्यासाठी आपले शक्तिसर्वस्व एकवटणे हे होय. दुसरे अंग नेमस्तपक्षाच्या मुळीच लक्षात येत नाही. स्वतःच्या सामर्थ्याने काहीच मिळणे शक्य नाही, असे नेमस्तांना वाटत असल्यामुळे त्यांचे या अंगाकडे दुर्लक्ष होणे साहजिक आहे. म. गांधींच्या नेहमीच्या धोरणाचे स्वरूप खरोखरच किमान प्रतिकाराचे असे. ज्या हक्काकरिता किंवा अन्याय निवारणाकरिता कायदेभंगाचे युद्ध सुरू करावयाचे असे ते ठरवितात, त्या हक्काची पायमल्ली करणे किंवा तो अन्याय न निवारणे विपक्षीयांना असमर्थनीय असते. कायदेभंगाचे युद्ध पुकारण्यापूर्वी ते ज्या किमान मागण्या करतात, त्या खरोखरच नेमस्त असतात, अशा दृष्टीने शत्रूला ज्या ठिकाणचा हल्ला परतविणे अत्यंत दुष्कर असे ठिकाण शोधून तेथेच हल्ला चढवावयाचा हे म. गांधींचे नित्याचे धोरण आहे. परंतु तो हल्ला यशस्वी करण्याकरिता आपले सर्व सामर्थ्य खर्ची घालावयाचे किंबहुना आपले प्राणही खर्ची घालावयाचे असा त्यांचा बाणा आहे, यामुळेच त्यांना आजपर्यंत यश संपादन करता आले आहे. नेमस्त किंवा राष्ट्रीय यांच्या आजपर्यंतच्या धोरणाहून हे अगदी स्वतंत्र धोरण आहे. या दोघांनाही सरकारशी सशस्त्र किंवा निःशस्त्र युद्ध करावयाचे नव्हते. मागण्या करून जेवढे मिळेल तेवढेच मिळवावयाचे असे दोघांचेही धोरण असून फक्त मागण्या कशा कराव्या याविषयीच त्यांच्यात तीव्र मतभेद दिसून येत असे. ज्यावेळी मागण्या नाकारल्यावर आपणास काहीच करावयाचे नसते तेव्हा जास्त मागण्या करणे हे मुत्सद्दीपणाचे असते, परंतु ज्या वेळी आपल्या मागण्या कोणत्याही प्रकारचे युद्ध मांडून प्राप्त करून घ्यावयाच्या असतात, त्यावेळी केवळ युद्ध न्यायाच्या दृष्टीने तिकडे न पाहता शक्याशक्य व स्वपर-बलाबल पाहावे लागते. कोणत्याही प्रकारचे युद्ध केले तरी आपले

सर्व न्याय्य हक्क एकदम प्राप्त होतील अशी अपेक्षा करणे हे अव्यवहार्य असते. परंतु मागण्या कितीही नेमस्त केल्या तरी त्या आपण स्वार्थत्याग केल्याशिवाय प्राप्त होतील हे समजणेही तितकेच किंबहुना त्याहून जास्त अव्यवहार्य समजले पाहिजे. या दृष्टीने किमान मागण्या आणि त्या प्राप्त करण्यासाठी कमालीचे प्रयत्न यांची योग्य जोड देणे हेच खरे किमान प्रतिकाराचे धोरण होय. किमान मागण्या याचा अर्थ जो अन्याय अगदी असमर्थनीय असेल तेवढाच दूर करण्याचा प्रथम प्रयत्न करावयाचा. तो दूर करण्यासाठी सर्व बल एकवटायचे व शत्रूवर जोराचा हल्ला करावयाचा.

बार्डोलीचा सत्याग्रह सुरू करावयाच्या वेळी म. गांधींनी अशा पेचात सरकारला धरण्याचा घाट घातला होता. बार्डोलीचा सत्याग्रह सुरू करण्याच्या आधी सरकारला त्यांनी ज्या मागण्या केल्या होत्या त्या अत्यंत कमी होत्या. स्वराज्य, खिलाफत किंवा पंजाब या प्रकरणाचा विचार करण्यास सर्वपक्षीय परिषद बोलवा, अशीसुद्धा मागणी त्यांनी केली नव्हती. फक्त आमचे राजकीय कैदी सोडून द्या, भाषण स्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य यांवर हल्ला करीत नाही अशी हमी द्या, म्हणजे आम्ही बार्डोलीचा सार्वत्रिक सत्याग्रह बंद करतो, असे त्यांनी व्हाईसरॉयांना जाहीर आश्वासन दिले होते. याचा अर्थ असहकारिता बंद करावयाची असा नाही. परंतु प्रत्यक्ष कायदेभंग सुरू करावयाचा नाही. मागे असे सांगितलेले आहे की, असहकारिता म्हणजे प्रत्यक्ष युद्ध नव्हे, ही भेदनीती आहे किंवा युद्धाची पूर्वतयारी आहे. कायदेभंग हे खरे युद्ध आहे. त्यावेळच्या परिस्थितीत स्वराज्य द्याल तरच बार्डोलीचा कायदेभंग बंद करतो असेही म. गांधींना म्हणता आले असते, परंतु स्वराज्याकरिता कायदेभंगाचे युद्ध मांडणे त्यांना त्यावेळी व्यवहार्य वाटत नव्हते, हे उघड आहे.

अखेरीस एकाच प्रश्नाचे उत्तर देऊन हा लेख पुरा करतो. सत्याग्रह युद्धात मुत्सद्देगिरी लागते असे वाचून कित्येक वाचक बुचकळ्यात पडतील, कारण मुत्सद्देगिरी म्हणजे लबाडी असा काही लोक अर्थ करतात, पण हा अर्थ बरोबर नाही. शौर्य आणि क्रौर्य यात जो भेद आहे, तोच भेद मुत्सद्दीपणा व लबाडी यात आहे. आपण बुद्धिबळाचा खेळ मांडला म्हणजे प्रतिपक्षाची नजर चुकवून मात करतो यात खरे क्रीडाकौशल्य नाही. दुसऱ्याचे पुढचे चार डाव ध्यानात घेऊन आपला खेळ सरळपणाने खेळणे व अखेरीस प्रतिपक्षावर डाव करणे यात खरे कौशल्य आहे. सत्याग्रह्याची मुत्सद्देगिरी दुसऱ्या प्रतीची असते व तीत असत्याची व लपंडावाची भेसळ नसते. ज्यामानाने लपंडाव कमी त्या मानाने बुद्धिकौशल्य जास्त लागते, तसेच ज्या मानाने शस्त्रबळ कमी त्या मानाने वीरवृत्ती जास्त लागते, हा सर्वत्र अनुभव आहे. या दृष्टीने मुळीच लपंडाव किंवा शस्त्रबळ यांचे सहाय्य न घेणाऱ्या सत्याग्रह्याची मुत्सद्देगिरी व वीरवृत्ती ही असामान्यच असली पाहिजे हे उघड आहे.

वरील एकंदर विवेचनावरून सत्याग्रहाचे युद्ध कोणत्या तत्त्वावर चालविले जाते, त्याचे खरे रहस्य कशात आहे व निःशस्त्र, दुर्बल आणि परपीडित राष्ट्राला सशस्त्र युद्धापेक्षा ह्या सत्याग्रह युद्धाचा अवलंब करणे कार्यसिद्धीच्या दृष्टीने कसे अधिक हितावह व सुकर आहे, तसेच त्यामुळे लोकांच्या वीरवृत्तीचा उच्छेद होऊन ते मेषपात्र बनतात, त्यातील सत्यवृत्ती ऊर्फ साधुत्व हे सर्वांच्या अंगी बाणणे शक्य नसल्यामुळे ते मनुष्यस्वभावाचा विचार करता अव्यवहार्य आहे, त्यात राजकारणपटुत्व अथवा मुत्सद्देगिरी यास अवसर नसतो, वगैरे जे आक्षेप त्यावर घेतले जातात ते कसे फोल व भ्रामक आहेत, हे वाचकांच्या चांगले लक्षात येईल.

[*लोकमित्र, डिसेंबर १९२३, पृ. २९३ ते २९१*]

१३

# सत्याग्रह आणि प्रजाधर्म

... राष्ट्रसभा आणि म. गांधी यांच्या दरम्यान अहिंसेच्या व्यावहारिक मर्यादांसंबंधी जो मतभेद झालेला आहे, त्याचे अधिक विवेचन या लेखात करावयाचे आहे. ते करण्यापूर्वी राज्यशास्त्रदृष्ट्या एका मूलभूत तत्त्वाचे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. आजपर्यंत गौतम बुद्ध आणि येशू खिस्त यांनीच सत्य व अहिंसा या तत्त्वांचा प्रसार अत्यंत मोठ्या प्रमाणावर केलेला आहे व त्यांच्या अनुयायांतूनच विशेषतः खिस्ताच्या अनुयायांतूनच अहिंसक सर्वांगीण क्रांतीची कल्पना निघालेली आहे. गौतम बुद्ध व येशू खिस्त यांच्या अनुयायांनीही काही कालाने राजधर्मातील अपरिहार्य हिंसेला समाजधारणेच्या नावाने– म्हणजेच धर्माच्या नावाने– मान्यता दिली आहे. यामुळे बुद्धधर्मात महायानपंथ निघाला व खिस्ती धर्मात "पवित्र रोमन साम्राज्याची कल्पना" निघाली. श्रीकृष्ण व महंमद पैगंबर यांनी तर "धर्म्य युद्धाला मोक्षप्राप्तीचे एक साधनच बनविले आहे." धर्म्यात् हि युद्धात् श्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते । तरीही गौतम बुद्ध, येशू खिस्त यांच्या अनुयायांतील अनेकांनी ही तडजोड मान्य न करता आपला शुद्ध अहिंसावाद यतिधर्माच्या रूपाने जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला असून हिंदु व मुसलमान धर्मांनीही समाजधारणेच्या कामी राजधर्मातील दंडशक्ती पुरी पडत नाही हे ओळखून यतिवर्ग आणि फकीरवर्ग निर्माण करण्याची आवश्यकता मान्य केलेली आहे. पण हा यतिवर्ग किंवा फकीरवर्ग आपल्या क्रांतिकार्याची जाणीव ठेवू शकला नाही, उलट तोच राजदंडाचा स्तुतिपाठक बनला व राजकीय जुलुमाला धार्मिक संस्थेचा आशीर्वाद देऊन प्रतिक्रांतिकारक कार्य करू लागला. सत्य-अहिंसा धर्माचा याहून अधिक अधःपात संभवत नाही. पण हिंदुधर्मातील ब्राह्मणांनी, बुद्धधर्मातील भिक्षूंनी, खिस्ती धर्मातील धर्माधिकाऱ्यांनी व मठातील संन्याशांनी समाजधारणेच्या नावाने राजांच्या जुलुमापुढे मान वाकविण्याचे आणि आर्थिक व सामाजिक विषमता सहन करण्याचे शिक्षण जनतेला दिलेले आहे यात शंका नाही. हे ऐतिहासिक सत्य पाहूनच

"धर्म ही अफूची गोळी आहे" हा सिद्धांत कार्ल मार्क्सने जगापुढे मांडिला. या सिद्धांताला गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, जॉर्ज फॉक्स, काँट टॉलस्टॉय, म. गांधी इत्यादी काही उज्ज्वल अपवाद आहेत आणि त्यांच्या तेजस्वी जीवनाकडे पाहूनच मनुष्यांना खऱ्या धर्माचे आणि आपल्या आत्म्याच्या सत्यस्वरूपाचे ज्ञान होऊ शकते. समाजात आत्मबलाची ज्योत एकसारखी तेवत ठेऊन सर्व प्रकारच्या अन्यायाला, जुलुमाला आणि विषमतेला विरोध करीत राहावयाचे, पण असे करताना सत्य व प्रेम या दैवी गुणांचा लोप होऊ द्यावयाचा नाही हे या विभूतींचे अवतारकार्य असते. म. गांधींनी हे कार्य एवढ्या प्रमाणावर केलेले आहे आणि ते करण्यात लागणारे राजकीय व्यवहारनैपुण्य व संघटनाकौशल्य इतक्या मोठ्या प्रमाणावर व्यक्त केलेले आहे की, त्यांना धर्मसंस्थापकांच्या वर्गात मोजावे की क्रांतिकारकांच्या यादीत त्यांची गणना करावी याबद्दल अनेकांना मोह पडतो.

## राजधर्म, यतिधर्म व प्रजाधर्म

म. गांधींचे वैशिष्ट्य हे आहे की, ते जनतेला क्रांतिकारक प्रजाधर्माचे शिक्षण देणारे यती आहेत. गौतम बुद्ध किंवा येशू ख्रिस्त यांनी प्रजाधर्मातील क्रांतिकारक कर्तव्याचे शिक्षण जनतेला दिले नाही. सत्ता व संपत्ती यांच्या मोहापासून अलिप्त राहून प्रजेचे आत्मबल जागृत करणारा यतिवर्ग त्यांच्या धर्मात निर्माण झाला, परंतु सत्तेच्या व संपत्तीच्या मदाने धुंद झालेल्यांशी सहकार करून राजकीय, सामाजिक व आर्थिक विषमतेला मान्यता देणे हे पाप आहे याची जाणीव त्यांनी जनतेला करून दिली नाही. त्या धर्मातील राजांना व प्रजांना आपापले धर्म सांगितले आणि राजधर्मातील किमान अपरिहार्य हिंसेला मान्यता देण्यास शिकविले, पण समाजधारणेला अवश्य असणारी अपरिहार्य हिंसा किमानच राहील याबद्दल जी दक्षता घ्यावयास हवी, ती त्यांनी घेतली नाही. ही दक्षता घ्यावयाची तर प्रजाधर्मातील क्रांती प्रकरण शिकविले पाहिजे. म. गांधी प्रजेला सत्याग्रही बनवून हे क्रांती प्रकरण शिकवीत आहेत. म्हणूनच सत्याग्रह हा आता केवळ यतिधर्म उरला नसून तो जनतेचा प्रजाधर्म बनला आहे. यतिधर्मातील अहिंसेचे शुद्ध स्वरूप प्रजाधर्मात तितके शुद्ध राहणे शक्य नाही याचीही जाणीव आपण नित्य ठेवली पाहिजे. पण राजधर्मातील अपरिहार्य हिंसा नित्य किमानच राहावी, याकरिता प्रजाधर्मातील अहिंसेची मर्यादा कमालीची ठेवावी लागते, याची जाणीव म. गांधींनी आधुनिक भारताला करून दिली आहे. "प्रजाधर्मातील अहिंसेचे क्रांतिकारक स्वरूप हेच तिचे खरे स्वरूप आहे" याचीही विस्मृती ते जनतेला होऊ देत नाहीत, हे त्यांचे महत्कार्य आहे.

## आत्मबल व शस्त्रबल यांचे व्यस्त प्रमाण

समाजाची न्यायबुद्धी हा समाजधारणेचा खरा आधार आहे. समाजजीवनात ज्या प्रमाणात ही न्यायबुद्धी प्रकट झाली असेल, त्याप्रमाणे त्यांच्या धारणेस शस्त्रबलाची

आवश्यकता लागणार नाही. उलट समाजघटनेत जितका न्याय कमी तितके त्याच्या धारणेस लागणारे शस्त्रबळही अधिक, असे हे प्रमाण आहे. म्हणूनच समाजधारणेच्या कार्यांतील आत्मबल व शस्त्रबळ यांचे व्यस्त प्रमाण असे वर म्हटले आहे. राज्यसंस्था ही समाज संघटनेचे रक्षण करणारी अथवा तिला विशिष्ट आकार देणारी संस्था आहे. कित्येक वेळा समाजसंघटनेतील न्यायतत्त्वाचे संरक्षण ती करते, तर पुष्कळ वेळा ती अन्याय्य तत्त्वांचेही संरक्षण करीत असते. तथापि तिचे जाहीर धोरण न्यायसंरक्षण हेच नेहमी असते. पण न्यायाच्या नावाने अन्यायाचे रक्षण करण्याचा डाग जिला लागलेला नाही अशी राज्यसंस्था अद्यापि अस्तित्वात आलेली नाही. साम्राज्यशाही राज्यसंस्थेची तर उत्पत्ती, स्थिती व अंत हे अन्यायापासूनच होत असतात. पण प्रजेत अन्यायाशी असहकार करण्याचे व न्याय संस्थापनेसाठी आत्मक्लेश भोगण्याचे सामर्थ्य जितके वाढेल, तितक्या प्रमाणात अन्याय्य राज्यसंस्था कोलमडून पडेल व तिच्या आधारावर चालणारी समाजघटनाही मोडून जाईल हे उघड आहे. ही क्रांती जर सामान्य जनतेच्या संघटित शुद्ध आत्मबलानेच होईल, तर अन्याय्य राज्यसंस्था नष्ट केल्यानंतर नवी दंडधारी राज्यसंस्था निर्माणही करावी लागणार नाही असे सत्याग्रही क्रांतिशास्त्र आहे. समाज संघटनेतील अन्याय असहकाराने नष्ट झाल्यानंतर जी संघटना निर्माण होईल, तिला हिंसक राजधर्माची आवश्यकताच उरणार नाही. हेच म. गांधींचे "रामराज्य" होय. त्याला आधुनिक भाषेत "आत्मराज्य" असेही म्हणता येईल. पुराणात सत्ययुगाच्या नावाने याच ध्येयाचा उल्लेख असून स्वराज्याचे अंतिम स्वरूप तेच आहे. समाजवाद्यांनाही अंतिम दृष्टीने तेच शिखर गाठावयाचे असून ख्रिस्ताचे परमेश्वरी साम्राज्य अथवा बुद्धाचे धर्मराज्य ते हेच होय.

## राष्ट्रसभा व क्रांतिवाद

सत्याग्रही क्रांतीची शुद्ध कल्पना वरीलप्रमाणे आहे आणि देशातील प्रस्थापित राज्ययंत्र मोडून पडले तरी त्याच्या ठिकाणी दुसरे राज्ययंत्र निर्माण करणे हे सत्याग्रही क्रांतीत अवश्य मानिलेले नाही. सत्ययुग हेच जिचे ध्येय असून त्यासाठी सतत यत्न करीत राहण्याची जीवनदीक्षा ज्यांनी घेतली असेल, त्यांच्या हातून राज्यस्थापनेचे कार्य होणार नाही व ते करू लागले तर त्यांचा ध्येयभंग त्यात झाल्यावाचून राहणार नाही. तथापि राष्ट्रसभेला ही सत्याग्रही क्रांतीची शुद्ध भूमिका स्वीकारता येणे अव्यवहार्य किंबहुना आजच्या जगाच्या विकासाच्या दृष्टीने अशक्यच आहे. येथील सामान्य जनता व तिचे पुढारीपण करणारे नेते, यांपैकी कोणालाही हा आध्यात्मिक अराजकवाद आज व्यवहार्य वाटत नाही व म्हणूनच म. गांधींशी शांततारक्षण व राष्ट्ररक्षण या कामी स्वीकारण्याच्या धोरणासंबंधी राष्ट्रसभेचा मतभेद झालेला आहे. क्रांतिकालीन अराजक परिस्थितीतही तो तसा होणे अपरिहार्य आहे. राज्ययंत्र मोडून त्याच्या ठिकाणी दुसरे उभे करणे व राजधर्मातील रूढ नीतीस अनुसरून किमान अपरिहार्य हिंसेने त्याचे रक्षण करणे, एवढीच क्रांतीची कल्पना आजच्या

परिस्थितीत व्यवहार्य होऊ शकते. जुन्या राज्यसंस्थाशी सर्व जनता व राजसेवक यांनी असहकार करून ते बंद पाडिले व जुन्या राजसेवकांनी नव्या समाज घटनेला आपली निष्ठा संक्रांत केली की, शुद्ध सत्याग्रही क्रांती यशस्वी झाली एवढेच या क्रांतीचे आजचे व्यवहार्य मूर्त स्वरूप आहे. एवढे झाले की, नव्या समाज संघटनेचे स्वराज्य क्रांतीने प्राप्त झाले असे मानून त्याचे रक्षण करण्याचा प्रश्न राष्ट्रसभेला हाती घ्यावा लागणार आहे. तो प्रश्न शुद्ध सत्याग्रहाने सोडविण्याइतके संघटित आत्मबळ आज आपणास प्राप्त होणे शक्य नाही या धोरणानेच राष्ट्रसभेला तो सोडवावा लागेल.

## समाजवादी व सत्याग्रही

हे कार्य राष्ट्रसभेतील समाजवाद्यांनाच करावे लागेल आणि सत्याग्रही कार्यकर्त्यांना त्यात प्रत्यक्ष सामील न होता नवी राज्यसंस्था सर्वंकष ( Totalstarian ) बनून जनतेच्या मूलभूत हक्कांची व हिताची पायमल्ली करणार नाही एवढी दक्षता घेण्याचे कार्य करावे लागेल. या दोन पक्षांचे असे सहकार्य टिकून राहील, तर रशियाप्रमाणे अनियंत्रित एकपक्ष-शासक समाजवाद येथे निर्माण न होता लोकशाही स्वरूपाचा समाजवाद निर्माण होईल. यालाच मी "सत्याग्रही समाजवाद" म्हणतो. ...

[*अखंड भारत, १६ नोव्हेंबर, १९४५ पृ. ३ व ६*]

# १४

# सत्याग्रह आणि राज्यमीमांसा

[ 'कल्पना' मासिकाने मार्च १९४८ चा अंक म. गांधींना श्रद्धांजली वाहणारा विशेषांक म्हणून काढला. त्यात आचार्य जावडेकरांचा "म. गांधींचे राजकीय नेतृत्व आणि जीवित कार्य" ह्या शीर्षकाचा लेख समाविष्ट आहे. या लेखात आचार्यांनी गांधींच्या नेतृत्वगुणांची चर्चा केली आहे. प्युरिटन पंथ, क्वेकर पंथ यांनी अन्यायप्रतिकाराची प्रेरणा दिली पण पुढे त्यांचे कार्य लेखाकृतीपुरतेच मर्यादित झाले. गांधींप्रमाणेच टॉलस्टॉयनेही अहिंसेचा पुरस्कार केला पण अहिंसेचा चळवळीचा आणि नेतृत्वगुण यांचा जसा संगम गांधींमध्ये आढळतो तसा अन्य कोणात आढळत नाही हे गांधींचे वेगळेपण आचार्यांनी नोंदवले आहे. या लेखाच्या उत्तरार्धात "सत्याग्रह आणि राज्यमीमांसा" या उपशीर्षकाखाली आचार्यांनी गांधींच्या सत्याग्रहविचाराची जी चर्चा केली आहे ती येथे घेतली आहे. ]

राज्यसंस्थेची मीमांसा करणारे मुख्यतः तीन संप्रदाय आधुनिक काळात निर्माण झालेले आहेत. त्यांना अनुक्रमे व्यक्तिवादी, राष्ट्रवादी आणि समाजवादी असे म्हणता येते. व्यक्तिवाद्यांचा सर्व भर व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर असून, राष्ट्रवादी हे राष्ट्रभक्ती व राष्ट्रनिष्ठा यांनाच अग्रस्थान देत असतात. समाजवादी हे या दोहोहून भिन्न असून समाजाची सर्व संपत्ती सामाजिक मालकीची समजावी आणि आर्थिक वर्गभेद नष्ट करून एकवर्गी समाज स्थापावा यावर भर देतात. आजची सर्व राष्ट्रे भांडवलदार व कामगार या दोन वर्गांत विभागलेली असून त्यांच्यामध्ये एक प्रकारचा वर्गकलह सारखा चालू असतो. सामाजिक धनोत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची नसून केवळ स्वामित्वावर धन संपादन करणारे जमीनदार, कारखानदार व सावकार हा वर्ग नाहीसा झाल्याखेरीज आज सर्व राष्ट्रांत चालू असलेला वर्गविग्रह कायमचा शांत होणार नाही असे समाजवाद्यांचे म्हणणे आहे. या व्यक्तिवादी, राष्ट्रवादी व समाजवादी विचारसरणींहून सत्याग्रही विचारसरणी भिन्न असली, तरी तिच्यात या तीनही विचारसरणींतील सत्-तत्त्वांचा समावेश झालेला आहे. उदाहरणार्थ, सत्याग्रही मनुष्य हा प्रत्येकाचे बुद्धिस्वातंत्र्य अबाधित ठेऊन, आत्मप्रामाण्य हेच सर्वश्रेष्ठ प्रामाण्य समजतो आणि या आत्मप्रामाण्याच्या आधारे तो

सामाजिक, राजकीय व धार्मिक अन्याय्य बंधनांचा भंग करण्यास प्रवृत्त करतो. पण हे करताना तो अहिंसेचे आणि सत्यनिष्ठेचे बंधन आपणास लावून घेतो. सत्यनिष्ठा हेच त्याचे आत्मदर्शनाचे साधन असते आणि सामाजिक अन्यायाचा अहिंसेने प्रतिकार करीत असता, तो आपल्या अंतःकरणातील सत्यनिष्ठेस जागून सामाजिक अन्यायाशी अनत्याचारी असहकार करीत असतो. या त्याच्या अनत्याचारी क्रांतिकारक कृत्यासाठी समाजाने दिलेली देहदंडाची शिक्षा भोगून सत्यासाठी सोसलेल्या आत्मक्लेशाने समाजाचे अंतःकरण बदलण्याचा तो प्रयत्न करीत असतो. लोकशाही राज्यातही अशा प्रकारच्या सत्याग्रही व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क प्रजेने उपभोगला पाहिजे, हे तत्त्व सत्याग्रहात अंतर्भूत झालेले आहे. बहुमताच्या हाती राजदंड असावा ही लोकशाहीची नीती सत्याग्रही संप्रदायास व्यवहार-दृष्ट्या मान्य करावी लागली, तरी बहुमताने निवडून दिलेल्या पक्षाच्या हाती राज्यकारभार असतानाही अन्याय असह्य झाल्यास प्रजेला सत्याग्रही वृत्तीने निषेधार्थ म्हणून सविनय कायदेभंग करण्याचा अंतिम हक्क असला पाहिजे. नाहीतर लोकशाहीखाली बहुसंख्याकांनी कितीही अन्याय केला तरी तो सहन करणे हेच अल्पसंख्याकांचे कर्तव्य ठरेल, हे मत नैतिक दृष्ट्या समर्थनीय होऊ शकत नाही. या दृष्टीने विचार केल्यास सत्याग्रही हा आत्मप्रामाण्यवादी असल्याने तो अत्यंत व्यक्तिस्वातंत्र्यवादी आहे असे म्हणता येते व ते खरे आहे. पण आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा व बुद्धिस्वातंत्र्याचा उपयोग, धनसंग्रह करण्याच्या कामी आणि इतरांनी आपल्या श्रमाने निर्माण केलेली संपत्ती आपणास मिळविण्याच्या कामी करणे ही एक चोरीच आहे व कायद्याने अकष्टार्जित संपत्ती संपादन करण्याचे व धनसंग्रह करण्याचे काही स्वातंत्र्य आज व्यक्तींना दिलेले असले तरी ते योग्य नाही व त्याचा फायदा घेऊन स्वार्थी धनसंचय करणे हे सत्याग्रहाच्या वृत्तीशी आणि अस्तेय व असंग्रह या वृत्तींशी विसंगत आहे. व्यक्तींना जे बुद्धिस्वातंत्र्य दिलेले आहे ते सत्याग्रह अथवा सदसत् यांचा विवेक करून, नित्य सत्यनिष्ठ राहण्यासाठी आहे. स्वतःच्या श्रमानेच त्याने आपली उपजीविका केली पाहिजे. दुसऱ्याच्या श्रमाचा उपयोग करून, स्वतः कष्ट न करिता उत्पन्न झालेल्या धनाचा उपभोग घेणे व संग्रह करणे हा अन्याय असून या कामी अथवा आपल्या किंवा लोकांच्या अन्यायाचे समर्थन करण्याच्या कामी बुद्धीचा विनियोग करणे हा तिचा व्यभिचारच होय. या दृष्टीने समाजरचना ही श्रम, अस्तेय व असंग्रह या तीन तत्त्वांवर उभारली जावी असे सत्याग्रहाचे मत आहे. सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य ही तीन तत्त्वे सर्व आत्मोन्नतीस आधारभूत आहेत. त्याचप्रमाणे श्रम, अस्तेय व असंग्रह ही तीन तत्त्वे समाजाच्या आर्थिक घटनेसही आधारभूत घडली जावी. या आर्थिक घटनेच्या दृष्टीने लोभमूलक व संग्रहप्रधान भांडवलदारी समाजरचना सत्याग्रहास बिलकूल मान्य नसून, आर्थिक घटनेच्या दृष्टीने समाजवाद सत्याग्रहास अधिक निकट आहे. आर्थिक व्यवहारात भांडवलशाही व्यक्तिस्वातंत्र्याला सत्याग्रही समाजात स्थान मिळणे शक्य नाही. भांडवलदार व कामगार अशा दोन वर्गांत विभागलेली द्विवर्ग

राष्ट्रप्रेमा सत्याग्रही तत्त्वाशी विसंगत आहे. राष्ट्र हे एकवर्गीय असले पाहिजे, हे समाजवादी तत्त्व सत्याग्रहास मान्य आहे. तथापि हिंसेच्या व अत्याचाराच्या मार्गाने खरा एकवर्गी समाज निर्माण करता येणार नाही आणि तसा प्रयत्न केल्यास अनियंत्रित कामगारशाही स्थापन होऊन तीत लोकशाहीचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा पूर्ण लोप होईल असे सत्याग्रही दृष्टीचे लोक म्हणतात आणि रशियातील अनुभवावरूनही असे दिसत आहे. तात्पर्य, लोकशाही राज्य आणि सत्याग्रही व्यक्तिस्वातंत्र्य हे शाबूत ठेवून जो समाजवाद येऊ शकेल तो सत्याग्रहात अंतर्भूत होऊ शकतो. आजच्या भांडवलदार लोकशाहीतील भांडवलदारांचे व्यक्तिस्वातंत्र्य आणि द्विवर्ग समाजरचना सत्याग्रहाला केव्हाही मान्य होणे शक्य नाही.

राष्ट्रवादातील या सत्तत्त्वाचा समावेश सत्याग्रहात झालेला आहे. राष्ट्रभक्ती हा एक श्रेष्ठ सद्गुण आहे यात शंका नाही. पण राष्ट्रनिष्ठा ही सत्याग्रही व्यक्तीची अंतिम निष्ठा होऊ शकत नाही. आपल्या राष्ट्राच्या सुखासाठी किंवा सत्तेसाठी दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अन्याय करणे अशा कृत्यास सत्याग्रही पाठिंबा देऊ शकत नाही. इतकेच नाही, तर आपल्या राष्ट्राने केलेल्या अशा अन्यायाचा निषेध करणे हे त्याचे कर्तव्य ठरते. त्याचप्रमाणे ज्यांनी सत्याची व अहिंसेची दीक्षा घेतली असेल, त्यांनी आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी सत्याग्रही अहिंसक प्रतिकार करून प्राणार्पणही करणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य असले तरी ते त्या कामी शस्त्र धारण करणार नाहीत हे उघड आहे. पण राष्ट्रावर परराष्ट्राचे आक्रमण झाले असता त्याचे रक्षण न करता तटस्थ राहणे व भेकडपणाने आपल्या जीवितवित्ताचा लोभ धरून स्वस्थ बसणे असला भेकड शांततावाद स्वीकारण्यापेक्षा हातात शस्त्र घेऊन राष्ट्ररक्षणासाठी लढणारा वीर अथवा राष्ट्र परतंत्र झाले असता त्याला स्वतंत्र करण्यासाठी सशस्त्र क्रांती करणारा स्वातंत्र्यवीर हा सत्याग्रहाशी अधिक निकट आहे यात शंका नाही.

अशा रीतीने विचार केल्यास सत्याग्रही विचारसरणी व राज्यमीमांसा ही व्यक्तिवादी, राष्ट्रवादी व समाजवादी राज्यमीमांसेहून भिन्न असली, तरी या तीनही राज्यशास्त्रीय विचारातील सत्तत्त्वांना अंतर्भाव होऊन समन्वय साधला गेला आहे असे विचाराअंती दिसून येईल. आपल्या देशात म. गांधी नेते होण्यापूर्वी व्यक्तिवादी विचारसरणीचा सुधारक पक्ष व त्याचे प्रागतिक राजकारण होते. त्याच्याविरुद्ध राष्ट्रवादी वृत्तीचा राष्ट्रीय पक्ष व त्याचे क्रांतिप्रवण राजकारण होते. म. गांधींनी राजकीय नेतृत्व स्वीकारल्यानंतर या सुधारक व्यक्तिवादाचा व क्रांतिप्रवण राष्ट्रवादाचा समन्वय कसा करून दाखविला हे आपल्या पिढीने प्रत्यक्ष पाहिलेच आहे. गांधीयुगात समाजवादी पंथ व पक्ष नवाच निर्माण झाला. तो प्रथमतः रशियातील कम्युनिस्ट संप्रदायाच्या रूपाने येथे वावरू लागला. पण १९३१–३२ च्या सत्याग्रही आंदोलनानंतर राष्ट्रसभेतच एक राष्ट्राभिमानी समाजवादी पक्ष जन्मास येऊन त्याच्यावर म. गांधींची छाप पडू लागली व राष्ट्रसभेच्या राष्ट्रीय लढ्यावर

समाजवादी विचारांचा प्रभाव पडू लागला. अलीकडे राष्ट्रवाद व समाजवाद यांचा समन्वय करून दोहोंनाही लोकशाही समाजवादाच्या कार्यात गुंतवावे असा प्रयत्न म. गांधी करीत होते. आपली नुकतीच स्थापन झालेली लोकशाही व राष्ट्रमैत्री संघटना भांडवलशाहीच्या आहारी जाऊ नये व शांततेच्या मार्गाने समाजवादी लोकशाही स्थापन व्हावी या दृष्टीने प्रयत्न महात्मा गांधी करीत होते. पण या गोष्टी घडण्याच्या आतच त्यांचे देहावसान झाले. आता पुढील राजकीय घटनांचे भवितव्य काय होईल हे निश्चयाने सांगता येत नाही. तरीही पुढील काळात राजकीय पक्षभेद कसेही झाले, तरी हिंदी राष्ट्राचे राजकारण समाजवादी दिशेने जाणार व व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांना बाध न येता येथे समाजवादाची स्थापना व्हावी हेच ध्येय आज प्रायः सर्वमान्य झाले आहे. याचे बहुतेक श्रेय महात्मा गांधी व त्यांनी आम्हास दिलेल्या सत्याग्रही दृष्टिकोनाकडे दिले जाईल, यात शंका नाही. म. गांधींच्यासारख्या असामान्य प्रकृतीच्या प्रत्यक्ष नेतृत्वाच्या अभावीही आपले राष्ट्र आता आपला मार्ग काढू शकेल हा जो आत्मविश्वास आपणास व आपल्या नेत्यास वाटत आहे त्याचे तरी श्रेय इतर कोणास आहे!

## लोकसत्ता व आत्मसत्ता

लोकसत्ता ही जर शुद्ध राहावयाची असेल तर तिच्यातून धनिकशाहीचे उच्चाटन झाले पाहिजे हे जितके खरे आहे तितकेच किंबहुना त्याहूनही अधिक हे खरे आहे की, या लोकशाहीचा खरा आधार प्रत्येकाचे आत्मबल आहे. लोकशाहीचा सर्व राज्यकारभार व राजकारण यांचा आधार बहुमत असा मानला जातो. हे बहुमत आपल्या मतास अनुकूल करून घेण्याचे मतस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य यांचा लाभ सर्वांस समतेने व्हावा आणि त्यांचा दुरुपयोग न होता सदुपयोग व्हावा, यासाठी आपल्या बुद्धीचा योग्य उपयोग करण्याची सवय जनतेला लागली पाहिजे. कोणत्याही शुद्धाशुद्ध साधनांनी, द्रव्याच्या लोभाने, दंडाच्या भीतीने, जातीच्या, धर्माच्या, स्वार्थाच्या दृष्टीने आपल्या मताचा प्रचार करणे हे लोकशाहीला भ्रष्ट करणारे पाप समजले गेले पाहिजे. तसेच बहुमताची खुशामत करणे अथवा बहुमताला पटलेले मत चुकीचे आहे असे स्वतःच्या बुद्धीस पटले असताही बहुमत आपणाविरुद्ध जाईल या भीतीने ती चूक न दाखविता लोभाने अथवा भीतीने त्याचे समर्थन करणे या गोष्टी लोकशाहीला मारक आहेत. आपल्या निःपक्षपाती, निर्विकार, निर्मळ व निरहंकार बुद्धीस जे मत पटले, त्याचा धैर्याने, चिकाटीने, पण शांतीने व सहिष्णुतेने प्रचार करण्यात आपल्या जीविताचे सार्थक मानणारे, आपल्या मतातील चूक अथवा दोष दिसून येताच त्यात सुधारणा करणारे आणि सत्य वाटणाऱ्या मतांना कितीही संकटे आली, तरी न सोडणारे सत्यनिष्ठ धीरोदात्त नेते लोकशाहीला अत्यंत आवश्यक असतात. त्याशिवाय तडजोड करण्यास सदैव उत्सुक असणारे पण कोणत्याही अमिषाने किंवा भयाने आपले तत्त्व सोडून भ्रष्ट न होणारे सत्याग्रही लोकशाही राज्यात असाव

असतात. ही सत्याग्रही वृत्ती व निष्ठा वाढत जाईल, त्या मानाने जनतेचे आत्मबळ जागृत होत जाईल व लोकसत्तेतून आत्मसत्तेकडे जाण्याचा काळ जवळ येत जाईल. राजदंड धारण करून समाजात शांततारक्षण करणे हे राजधर्मात जोपर्यंत अपरिहार्य, तोपर्यंत कोणताही सत्याग्रही नेता राजसत्ता स्वीकारणार नाही. किंबहुना सत्याग्रहात राजदंडाला स्थानच नाही. लोकसत्ताक राजदंड हाही उपयोगात आणण्याचा प्रसंग पडू नये, तो निरुपयोगाने गंजून जावा किंवा गळून पडावा आणि सर्व प्रजाजनांनी एकमेकांचे रक्षण आपल्या अंतःकरणातील धर्मबुद्धीने, न्यायबुद्धीने करावे असे सत्ययुग प्राप्त करून घेणे हे सत्याग्रहाचे अंतिम साध्य आहे. लोकसत्ता, समाजसत्ता हे या अंतिम साध्याच्या मार्गातील केवळ टप्पे आहेत. राष्ट्रवादी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या टप्प्यावर, लोकसत्तावादी त्याच्या पुढील लोकशाहीच्या टप्प्यावर, समाजसत्तावादी त्याच्या पुढील समाजवादी टप्प्यावर विश्रांती घेतील. पण आत्मसत्तावादी सत्याग्रही हा कोठेच विश्रांती घेऊ इच्छित नाही. त्याला अभिप्रेत असणारी मानवसमाजातील आंतर्बाह्य क्रांती केव्हाच संपणार नाही. त्याचा प्रवास नित्य चालूच राहणार. कारण तो अखंड क्रांतिकारक आहे. या अखंड क्रांतियज्ञातच त्याची शांती, विश्रांती व आनंद आहे. अशा एका सत्याग्रही विभूतीचे दर्शन आम्हास झाले याबद्दल आम्ही धन्यता मानली पाहिजे. ज्या राष्ट्राला त्यांचे राजकीय नेतृत्व लाभले ते तर आपणास धन्य मानीत आहेतच, पण त्यांच्या साम्राज्यसत्तेला सैतानी हे विशेषण लावून या असामान्य लोकनायकाने आव्हान ज्यांना दिले व अखेरीस या देशातून त्यांच्या सत्तेचा मोड केला ते ब्रिटिश लोकही त्यांच्या दर्शनाने आपणास धन्य मानून त्यांची महती गात आहेत व आपल्या धर्मसंस्थापकाच्या जसे काय ते अवतारच आहेत असे म्हणत आहेत. हे राजकीय यश अद्यापि कोणाही कर्मयोगी राजकीय नेत्याला संपादन करता आलेले नाही. महाभारतातील कौरव-पांडवांच्या भारतीय युद्धाहून आधुनिक भारताने जे सत्याग्रही स्वातंत्र्ययुद्ध केले त्याची महती एकदम थोर आहे. पहिले आधुनिक भारतात झालेले सत्याग्रह युद्ध कलियुगातून सत्ययुगाकडे जाण्याचा मार्ग दाखवून देणारे युद्ध असे भावी इतिहासात गणले जाईल, अशी श्रद्धा ठेवून आपण त्यांनी दाखवून दिलेला सत्याग्रही-राजकारणाचा मार्ग पुढे चालविण्याचा प्रयत्न आपापल्या शक्तीस अनुसरून करीत राहिले पाहिजे.

[*सत्यकथा, मार्च १९४८, पृ. ११ ते १६*]

## १५

# [ सत्याग्रह, परिवर्तन आणि राजदंड ]

[म. गांधींच्या मृत्यूनंतर ग. धो. जोशींच्या विनंतीवरून आचार्यांनी गांधींचे चरित्र लिहिले. जून १९४८ ते एप्रिल १९४९ च्या दरम्यान त्यातील काही भाग 'प्रभात' साप्ताहिकात प्रसिद्ध झाले. पुढे 'जीवनरहस्य' या नावाने हे चरित्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. त्याच्या शेवटच्या दोन प्रकरणांतील सत्याग्रहविषयीचे काही उतारे खाली दिले आहेत.]

समाजात दुष्ट प्रवृत्ती वाढण्यास वित्ताचा लोभ आणि संग्रहबुद्धी ही दोन प्रमुख कारणे आहेत. आजची भांडवलशाही आर्थिक घटना व्यक्तींचा लोभ आणि संग्रहबुद्धी यांच्यावर आधारलेली असून आर्थिक व्यवहारात सत्यासत्याचा विवेक करण्याचे कारण नाही आणि आर्थिक व्यवहाराशी न्यायनीतीचा काही संबंध नाही अशी समजूत रूढ झालेली आहे. आर्थिक, राजकीय व सामाजिक अशा सर्व व्यवहारांवर धर्माचे नियंत्रण असले पाहिजे, असे मध्ययुगीन समाजघटनेचे आद्य तत्त्व होते. हे तत्त्व हिंदु, मुसलमान व ख्रिस्ती या सर्व धर्मांच्या समाजात मध्ययुगात सर्वमान्य झालेले होते. या ठिकाणी धर्म या शब्दाचा अर्थ विशिष्ट संप्रदाय असा न करता सर्व धर्मांना सामान्य अशी जी न्यायाची व नीतीची तत्त्वे ती, असा केल्यास धर्माधिष्ठित मध्ययुगीन समाज हा आजच्या भांडवलशाही समाजापेक्षा अधिक सुसंस्कृत होता. निदान त्याचे गृहीत तत्त्व अधिक शुद्ध होते असे म्हणावे लागते. परंतु असे म्हणताना धर्म म्हणजे विशिष्ट धर्मसंप्रदाय असा अर्थ मात्र करता कामा नये. तसेच ही जी सामाजिक नीती अथवा नीतिबंधने समाजाच्या सर्व व्यवहारांवर सत्ता गाजविणारी अशी असावी असे आपणास वाटते ती नीतिबंधने समाजाच्या आर्थिक व इतर भौतिक परिस्थितीत घडणारे बदल ध्यानात घेऊन बदलीत गेले पाहिजे याचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे. सामाजिक नीतिबंधनांना धर्म ही संज्ञा देण्याने समाजाच्या सर्व व्यवहारांवर नीतीचे नियंत्रण असावे, असा बोध व्हावयाचा, तर त्याच्याबरोबर ही सामाजिक नीतिबंधने परिस्थितीनुसार बदलणारी आणि सर्व धर्मसंप्रदायांना आधारभूत अशी

सामान्य नीतितत्त्वे असली पाहिजेत याचीही जाणीव ठेवली पाहिजे. अर्थात् समाजाच्या आर्थिक घटनेला नैतिक अधिष्ठान असले पाहिजे आणि आर्थिक व्यवहार करीत असता व्यक्तींनी न्यायबुद्धीला जागून ते केले पाहिजेत. ही सत्याग्रही दृष्टी महात्मा गांधींनी स्वीकारल्यामुळे आर्थिक व्यवहारांवर नीतीचे बंधन नसावे आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थाला व लोभाला केवळ इतर व्यक्तींच्या स्पर्धेचे बंधन पडेल तेवढे पुरे आहे, या मतावर आधारलेले व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि भांडवलदारी आर्थिक घटना ही सैतानी आहेत अथवा अनर्थावह आहेत असे महात्मा गांधींना वाटत असे. व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि भांडवलदार आर्थिक घटना यांच्याकडे पाहण्याची ही दृष्टी महात्मा गांधींना रस्किनच्या 'Unto this last' (सर्वोदय) या ग्रंथावरून लाभली अथवा तो ग्रंथ वाचल्यानंतर त्यांची ही दृष्टी अधिक साफ होऊन त्यांना आधुनिक भांडवलदार संस्कृतीचे अनर्थावह स्वरूप अधिक विशद झाले. या वेळेपासून त्यांना आर्थिक समता हाच समाजाचा पाया असला पाहिजे असे वाटू लागले. शरीरश्रम करून प्रत्येकाने समाजाच्या भौतिक संपत्तीत भर घातली पाहिजे. दुसऱ्याच्या श्रमाचे फळ आपण उपभोगता कामा नये आणि आपल्या श्रमाचे फळही योग्य गरजेच्या पलीकडे स्वतः उपभोगू नये व ते समाजाला अर्पण करावे, या तीन तत्त्वांवर समाजाची आर्थिक घटना उभारली जावी असा या आर्थिक समतेचा अर्थ आहे. हेच थोडे दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर श्रम, अस्तेय आणि असंग्रह ही समाजाच्या आर्थिक घटनेची आधारभूत तत्त्वे मानली जावीत असे सांगता येईल. आजची भांडवलदार संस्कृती स्तेययुक्त आणि संग्रहप्रधान आहे. कामगार-वर्गांच्या श्रमाचे फल त्यांना केवळ पोटास पुरेल इतके वेतन देऊन कारखानदार-वर्ग केवळ स्वामित्वाच्या हक्कावर उपटीत असतो. आजच्या समाजात कर्जाचे व्याज, जमिनीचा खंड आणि कारखानदारीचा नफा असे केवळ स्वामित्वाच्या हक्कांनी द्रव्यार्जन करण्याचे तीन मार्ग कायदेशीर गणले जातात. आर्थिक समतेच्या दृष्टीने विचार केल्यास हे मार्ग कायदेशीर असले तरी ते दुसऱ्याच्या श्रमाचे फळ लुबाडणारे असल्यामुळे ती कायदेशीर चोरी आहे असे म्हणावे लागते. धनोत्पादनाची साधने मोठी बनल्यामुळे ही कायदेशीर चोरी फार मोठ्या प्रमाणात चालू झाली आहे आणि या चोरीमुळे जो धनसंग्रह होत आहे त्या धनसंग्रहाने समाजातील बहुतेक कष्टजीवी व्यक्तींना दारिद्र्य आणि दास्य ही भोगावी लागत आहेत. आजच्या समाजात चालू असलेले हे स्तेय बंद करण्यास कारखाने, जमिनी व पैसा यांच्यावर समाजाचे स्वामित्व प्रस्थापित करणे यावाचून दुसरा मार्ग दिसत नाही. म्हणूनच समाजवादाची निर्मिती आज झाली आहे आणि हा समाजवाद सत्याग्रही मार्गाने स्थापन झाल्यास तो आपणास मान्य आहे असे महात्मा गांधी म्हणत होते. तथापि हा समाजवाद लोकशाही स्वरूपाचा आणि विकेंद्रित आर्थिक घटनेचा असला पाहिजे असाही त्यांचा आग्रह होता. हे घडण्यास एक आर्थिक व सामाजिक क्रांती करावी लागणार आहे आणि या आर्थिक व सामाजिक क्रांतीचे साधन सत्याग्रह हेच

असले पाहिजे असेही त्यांचे मत होते. श्रम, अस्तेय आणि असंग्रह या तीन तत्त्वांचा सामाजिक व आर्थिक घटनेच्या दृष्टीने आज अर्थ केल्यास तिला समाजवादी लोकशाहीचे स्वरूप येईल असे स्थूलमानाने म्हणता येईल. अशा आर्थिक समतेच्या अभावी जी लोकशाही स्थापन होते ती लोकशाही समाजात भांडवलदार पद्धती अस्तित्वात असेपर्यंत भांडवलदारांच्या प्रभुत्वाखाली जात असते. अशा भांडवलदार लोकशाहीचे राज्य हे खरे लोकशाही राज्य होऊ शकत नाही. कारण भांडवलदार उत्पादनपद्धतीत अंतर्भूत झालेली कायदेशीर चोरी त्यात चालू असते. या दृष्टीने विचार केल्यास समाजातील मोठ्या उत्पादन साधनांवर आज असलेली खाजगी मालकी नाहीशी करून त्यांच्यावर समाजाचे स्वामित्व प्रस्थापित करणे हा एक अस्तेय तत्त्व प्रस्थापित करण्याचा मार्ग आहे असे दिसून येईल. या दृष्टीने समाजवादाची प्रस्थापना ही अस्तेयाची प्रस्थापना असे म्हणावे लागते.

असंग्रह आणि अस्तेय या दोहोंत एक फरक आहे. अस्तेय म्हणजे दुसऱ्याच्या श्रमाने निर्माण झालेले फळ लुबाडून न घेणे. आपला संग्रह वाढविण्याचा लोभ हा एक मार्ग आहे. परंतु अशी चोरी न करता आपली संपत्ती स्वतःच्या श्रमाने वाढली तरीही तिचा संग्रह आवश्यक गरजांच्या पलीकडे करू नये. ही वृत्ती असंग्रह व्रताच्या बुडाशी आहे. हा भेद लक्षात घेतल्यास समाजवादाची प्रस्थापना करणे म्हणजे असंग्रहाचे तत्त्व समाजावर लादणे हे म्हणणे बरोबर नाही. समाजवाद असंग्रहाचे तत्त्व कायद्याने लादू इच्छित नाही, तर तो केवळ अस्तेयाचे तत्त्वच कायद्याने लादू पहात आहे असे म्हणावे लागेल. चोरीने होणारा संग्रह कायद्याने थांबवावा याकरिता त्यांचा मुख्य कटाक्ष आहे. दुसऱ्याच्या श्रमाच्या फलाचा अपहार हा कायद्याने थांबविणे जितके शक्य आहे, तितके स्वतःच्या श्रमाच्या फळांचा संग्रह कायद्याने थांबविणे शक्य नाही, हे समाजवाद्यांनाही समजते. तसा प्रयत्न केल्यास श्रम करणाऱ्या फलाकांक्षी लोकांना श्रम करण्यास उत्तेजन मिळणार नाही हे लक्षात घेऊन प्रत्येकास त्याच्या त्याच्या श्रमाच्या प्रमाणाप्रमाणे व प्रकाराप्रमाणे कमीअधिक संग्रह करू देणे आज आवश्यक आहे हे व्यवहारदृष्ट्या समाजवाद्यांनी मान्य केले आहे. म्हणून समाजवाद म्हणजे असंग्रहाची संस्थापना असे न म्हणता समाजवाद म्हणजे अस्तेयाची संस्थापना असेच म्हणावे लागेल. अर्थात सत्याग्रहाची दृष्टी याच्याही पुढे गेली असून त्या दृष्टीने सर्वच संग्रह हे स्तेय आहे असे काही लोक म्हणतात. तसे म्हटल्यास स्तेय आणि संग्रह यातील भेद नष्टच होईल किंवा कष्टार्जित संग्रह ही चोरी आहे व ती कायद्याने बंद करणे शक्य आहे. कष्टार्जित संग्रह यालासुद्धा सूक्ष्म अर्थाने चोरी म्हणता येईल. कारण समाजाच्या सहकार्यावाचून कोणताही संग्रह आपणास करता येत नाही व तो टिकविता येत नाही. परंतु व्यवहारदृष्ट्या व कायद्याच्या दृष्टीने संग्रहाचे कष्टार्जित व अकष्टार्जित असे भाग करणे आज आवश्यक असून अकष्टार्जित संग्रहाचे म्हणजे चोरीचे हे कायदेशीर

मार्ग आज उपलब्ध आहेत ते कायद्याने बंद करावेत आणि कष्टार्जित संग्रहाच्याबाबत हृदयपरिवर्तनाचा मार्ग स्वीकारावा असे धोरण समाजवादास अभिप्रेत आहे. चोरीच्या-बाबत चोराच्या हृदयपरिवर्तनावर कोणतीही राज्यसंस्था विसंबून राहत नाही. त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या श्रमाचे फळ लुबाडून जो धनसंग्रह भांडवलदारपद्धतीत घडत आहे तो कायद्याने बंद पाडण्याचे कामी धनिकवर्गाचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी विलंब लावणे म्हणजे सामाजिक लोभाचे संरक्षण करणे होय अशी समाजवादी दृष्टी आहे. महात्मा गांधी धनिकांचे हृदयपरिवर्तन करावे असे म्हणत असले तरी या धनिकवर्गाने आपला धनसंग्रह समाजाला अर्पण केला पाहिजे व तो त्याने न केल्यास त्या उत्पादन-पद्धतीविरुद्ध अनत्याचारी असहकाराने व सत्याग्रही निष्ठेने शेतकरी-कामकरी वर्गाला मालक वर्गाशी झगडावे लागेल असेही त्यांनी म्हटले आहे. या मार्गाने समाजवादी आर्थिक घटना जेव्हा श्रम, अस्तेय आणि असंग्रह या तत्त्वांवर उभारली जाईल तेव्हाच खरा अहिंसक समाज आणि खरी अहिंसक लोकशाही निर्माण होईल असे गांधींचे मत होते. अहिंसाधिष्ठित लोकशाही (Democracy based on non-violence) या महात्मा गांधींच्या शब्दाचा अर्थ इतका व्यापक आहे. ही अहिंसक आर्थिक घटना निर्माण होईपर्यंत लोकशाही राज्यात खरी न्यायसंस्थापना होणार नाही. आर्थिक घटने-तील ही अहिंसक क्रांती हे न्यायसंस्थापनेचे खरे साधन असून ती क्रांती सत्याग्रही मार्गाने घडवून आणणे म्हणजेच अहिंसेच्या साधनाने सत्याची उपासना करणे होय. महात्मा गांधींच्या व्यापक धर्मनिष्ठ अथवा सत्याग्रही जीवननिष्ठ अशी राष्ट्रीय लोकशाहीची राजकीय क्रांती अंतर्भूत झालेली आहे. ही क्रांती करण्यासाठीच महात्मा गांधींनी राष्ट्रसभा यापुढे सत्याग्रही लोकसेवक संस्था बनावी असे म्हटले होते. अर्थात तसे तिला बनावयाचे तर तिने आपल्या हाती राजदंड घेण्यासाठी निर्माण झालेल्या पक्षोपपक्षांच्या स्पर्धेपासून अलिप्त राहिले पाहिजे, कारण राजदंड हाती घेऊन त्या संस्थेस आपली सत्याग्रही निष्ठा टिकविता येणार नाही.

## भांडवलशाही, लोकशाही व अहिंसा

राजदंड हाती घेऊन समाजधारणा व समाजरक्षण करणाऱ्यांना शस्त्रबलाचे अथवा हिंसेचे साधन वापरणे अपरिहार्य असते, हे ध्यानात घेतल्यास साधनशुद्धतेचा सिद्धांत राजसत्तेला लागू पडत नाही असे जर म्हटले तरी हा राजदंड कायदेशीरपणेच वापरला जावा, हे कायदे लोकमतानुसार बनविले जावेत. सर्व पक्षांस व व्यक्तींस आपापल्या मतास लोकांचे मत अनुकूल करून घेण्याची मुभा असावी आणि ज्या पक्षास बहुमताचा पाठिंबा मिळेल त्या पक्षाच्या हाती राजसत्ता जावी अशी पद्धती लोकशाही राज्यात असते. यामुळे लोकशाही राज्यात राजदंडामार्फत होणारी हिंसा किमान प्रमाणात होण्याचा संभव असतो हे खरे असले, तरी जोपर्यंत भांडवलदारीमुळे होणारे लोभ आणि लोभमूलक संग्रह राजदंडाने

बंद पाडलेला नाही, तोपर्यंत समाजातील हिंसा कमी करण्याचे कर्तव्य त्या राजसत्तेने केले नाही असे म्हणावे लागते. जी राजसत्ता हे भांडवलदारीचे शोषण थांबवू शकत नाही, ती स्वतः हिंसा कमी करीत असली, तरी भांडवलदारांनी चालविलेली हिंसा चालू देते हे लक्षात घेतल्यास तिला किमान हिंसक म्हणता येणार नाही. शिवाय भांडवलदारांचे शोषण आणि संग्रह चालू देणारी भांडवलदार लोकशाही ही शेतकरी-कामकरी वर्गांची स्वयंप्रेरित राजनिष्ठा संपादू शकत नाही. तिला राजनिष्ठा संपादन करण्यासाठी असत्याचा प्रचार करावा लागतो आणि सत्याचा प्रचार करणारांना व स्वतःवर होणाऱ्या भांडवलदारी अन्यायाविरुद्ध भांडणाऱ्या कामगारांना दडपून टाकावे लागते. भांडवलदार लोकशाही राज्याने असे धोरण स्वीकारले की तिचे लोकशाही स्वरूप नष्ट होऊन तिला एकपक्षीय अनियंत्रित स्वरूप प्राप्त होते. फॅसिझम ही भांडवलदार उत्पादनपद्धती टिकवून धरू पाहणारी अनियंत्रित एकपक्षसत्ता आहे तर याच्याविरुद्ध कम्युनिझम ही भांडवलदार पद्धती मोडण्यासाठी स्थापन झालेली एकपक्ष अनियंत्रित सत्ता आहे. जोपर्यंत भांडवलदार उत्पादनपद्धती कायम आहे तोपर्यंत लोकशाही राज्य स्थापन झाले तरी कामगार आणि भांडवलदार यांच्यात चालू असलेल्या वर्गकलहामुळे ते लोकशाही राज्य सुस्थिर राहू शकत नाही आणि त्याचे रूपांतर कोणत्या तरी स्वरूपाच्या अनियंत्रित एकपक्षसत्तेत होऊ लागते असा याचा अर्थ आहे. भांडवलदार उत्पादनपद्धती व आर्थिक घटना ही नष्ट करू पाहणारा कम्युनिस्ट पक्ष आणि ती उत्पादनपद्धती टिकवून धरू पाहणारा फॅसिस्ट पक्ष यांचा लढा निर्माण होऊन ज्या पक्षाच्या हाती राजसत्ता जाईल तो पक्ष लोकशाही राज्य मोडून टाकून आपली हुकूमशाही स्थापन करतो. याचा अर्थ द्विवर्गसमाजरचना आणि लोकशाही राज्यपद्धती या दोन गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत असा होतो. एकतर या लोकशाही राज्याने भांडवलदार उत्पादन पद्धती व द्विवर्गसमाजरचना मोडून एकवर्गसमाजाची व समाजवादाची स्थापना केली पाहिजे किंवा द्विवर्गसमाजरचना कायम टिकवू पाहणाऱ्यांनी लोकशाही राज्य मोडून टाकले पाहिजे असा हा पेच आहे. हा पेच उलगडण्यापूर्वी एकवर्गसमाज हे आपले ध्येय आहे की, द्विवर्गसमाज हे आपले ध्येय आहे याचा निर्णय केला पाहिजे. तसेच द्विवर्गसमाज यापुढे चालू शकेल की नाही याचाही विचार केला पाहिजे. आज आर्थिकदृष्ट्या विचार केल्यास द्विवर्गसमाज चालणे अशक्य झालेले आहे आणि म्हणून एकवर्गसमाज स्थापन करण्यावाचून गत्यंतरच नाही. लोकशाही मोडून केवळ अनियंत्रित पक्षसत्तेच्या जोरावर द्विवर्गसमाज स्थापन करण्याचा प्रयोग हिटलर आणि मुसोलिनी यांनी केला. पण तो प्रयोग आता अपयशी ठरलेला आहे. तेव्हा व्यवहारदृष्टीने एकवर्गसमाजस्थापना केल्यावाचून समाजाची धारणा होणे अशक्य बनले आहे असे म्हणता येईल. हा एकवर्गसमाज स्थापन करताना लोकशाही राज्य टिकवून ते साध्य गाठावयाचे, की ते लोकशाही राज्य मोडून ते ध्येय गाठावयाचे एवढाच प्रश्न उरलेला आहे.

महात्मा गांधी यांनी लोकशाही राज्यात पक्षातीत राजकारण करणारी एक सत्याग्रही लोकसेवक संस्था स्थापन करावी असा विचार जगापुढे मांडला आहे. त्याचबरोबर द्विवर्ग-समाजरचना ही अहिंसेशी विसंगत असून एकवर्गसमाज हेच अहिंसक समाजाचे स्वरूप आहे असेही सांगितले आहे. वर वर्णिल्याप्रमाणे लोकशाही राज्यात द्विवर्ग भांडवलशाही आर्थिक घटना कायम असेपर्यंत कम्युनिझम व फॅसिझम अशा प्रवृत्तीचे पक्ष निर्माण होणे अपरिहार्य दिसते. या दोनही पक्षांची प्रवृत्ती लोकशाहीला मारक आहे. या अथवा अशा प्रवृत्तीच्या दोन किंवा अधिक पक्षांच्या व्यतिरिक्त एक लोकसेवक संस्था स्थापन होऊन तिने जनतेमध्ये पक्षातीत राजकारण करण्याची व लोकशाही राज्य जागृत ठेवण्याची वृत्ती निर्माण केली तर लोकशाही टिकून एकवर्गसमाज स्थापन करण्याचा मार्ग सापडू शकेल. या पक्षातीत राजकारण करणाऱ्या लोकसेवक संस्थेने जनतेची शक्ती संघटित करून लोकशाही राज्य आणि एकवर्गसमाज हीच आपली ध्येये असे जाहीर केले तर लोकशाही पद्धतीने समाजवादाची स्थापना करणारा पक्ष अधिकारावर येऊन तो स्तेयमूल व संग्रह-प्रधान भांडवलदारपद्धती मोडून एकवर्गसमाज स्थापन करू शकेल. त्याने असे केले तरी तो आपली अनियंत्रित सत्ता जनतेवर लादू शकणार नाही. कारण जनतेचे आत्मबल संघटित करणारी सत्याग्रही संस्था त्याला तसे करू देणार नाही. अशा प्रकारे लोकशाही राज्यात जर एक लोकसेवक सत्याग्रही संस्था स्थापन झाली आणि तिने प्रजेचे प्रभुत्व कायम टिकविले तर समाजवादी क्रांती करून लोकशाही राज्यपद्धती टिकविणे शक्य आहे असे तात्त्विक दृष्टीने मान्य करावे लागेल. सत्याग्रही अधिष्ठान निर्माण करून लोकशाहीला समाजवादी स्वरूप देणे आणि लोकशाही राज्ययंत्रातील राजदंडाचा उपयोग, भांडवलशाही आर्थिक घटना नष्ट करून एकवर्गसमाज स्थापन करण्याच्या कामी करणे, या दोनही गोष्टी मिळून आत्यंतिक समाजवादी लोकशाहीचे ध्येय मूर्त स्वरूपात येईल. महात्मा गांधींनी सर्वोदय समाजाचे जे ध्येय आपल्यापुढे ठेवले आहे त्याची ही पूर्वावस्था होय. युरोप खंडात लोकशाही समाजवादाचे ध्येय निर्माण झालेले आहे पण ते ध्येय मूर्त स्वरूपात आणण्यास सत्याग्रही लोकसेवक संघाची व पक्षातीत राहून सत्ताविरहित राजकारणाची आवश्यकता आहे हे महात्मा गांधींनी आपणास दाखवून दिलेले आहे. आजच्या समाजघटनाशास्त्रात त्यांनी ही एक मौलिक भर घातलेली आहे असे राज्यशास्त्रज्ञांस व समाजशास्त्रज्ञांस मान्य करावे लागते.

धर्म या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्या अनेक अर्थांपैकी आत्मप्राप्तीचे साधन आणि समाजधारणा करणारी सामाजिक घटना व नीती हे दोन फार महत्त्वाचे अर्थ आहेत. या दोहोंपैकी आत्मप्राप्तीचे साधन या दृष्टीने महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य किंवा ज्ञान, प्रेम व सेवा ही तीन तत्त्वे जगापुढे सर्व धर्मांचे शाश्वत अथवा सनातन रहस्य म्हणून मांडली. समाजघटना व सामाजिक नीती या अर्थाचा धर्म हा परिस्थित्यनुसार बदलणारा

असला तरी त्याच्या बुडाशीही ज्ञान, प्रेम आणि सेवा अथवा सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य या तत्त्वांचे अधिष्ठान असले पाहिजे. या दृष्टीने समाजाच्या आर्थिक घटनेच्या बुडाशी श्रम, अस्तेय आणि असंग्रह ही तीन तत्त्वे असावीत आणि आर्थिक समता हे समाजघटनेचे ध्येय असावे असे महात्मा गांधींनी दाखवून दिले. आज जी उत्पादनपद्धती निर्माण झाली आहे, ती उत्पादनपद्धती आणि उत्पादनाची भौतिक साधने यांचा विचार केल्यास आजचे समाजधारणाशास्त्र लोकशाही समाजवाद हे आपले सामाजिक ध्येय असावे असे म्हणते. अशा रीतीने समाजधारणेच्या दृष्टीने लोकशाही समाजवाद हा आजचा युगधर्म आहे असे म्हणता येईल आणि सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य इत्यादी साधनांनी आत्मप्राप्ती करून देणे हे सनातन मानवधर्माचे रहस्य आहे असे म्हणता येईल. सत्याग्रही निष्ठा हा मानवाचा सनातन धर्म आणि लोकशाही समाजवाद हा त्याचा आजचा युगधर्म हे ज्ञान महात्मा गांधींच्या सत्याग्रही जीवनापासून जगाला झालेले आहे अथवा होऊ शकेल असे आमचे मत आहे.

[*जीवनरहस्य, देशमुख आणि कं., पुणे १९४१, पृ. ४६३ ते ४७०*]

## [सत्याग्रह आणि राजदंड]

सत्याग्रही राजकारणाचे स्वरूप जर आपण समजून घेतले तर राजकारण करूनही सत्याची व अहिंसेची शुद्ध साधने मलिन न होऊ देण्याचे त्यांचे ध्येय राजकारणात कसे व किती प्रमाणात यशस्वी होणे शक्य आहे याची आपणास कल्पना येऊ शकते. राज्यसंस्था चालविणारांना समाजरक्षणासाठी हिंसेचा व काही वेळा असत्याचरणाचाही उपयोग करावा लागतो. मनुष्याला कसेही करून स्वतःचे प्राण आणि वित्त यांचे रक्षण व्हावे अशी इच्छा असते. ही इच्छा सफल व्हावी म्हणूनच तो राज्यसंस्थेशी राजनिष्ठ राहत असतो. स्वतःच्या प्राणावर प्रसंग येऊन बेतला असता मनुष्य साधनशुद्धीचा सिद्धांत निष्ठापूर्वक पाळू शकत नाही. ही त्याची दुर्बलता नष्ट करून त्याला जीवितरक्षणाची व वित्तरक्षणाची हमी यावी यासाठी राज्यसंस्था असावी असे त्याला वाटत असते. यामुळे राज्यसंस्थेला शस्त्रबलाचा आधार घेण्याचा व त्या आधाराने समाजरक्षण करण्याचा हक्क आहे किंवा तशी त्यांना सवलत आहे असे सामान्य मनुष्य समजत असतो. या समाजसंरक्षक राज्यसंस्थेला साधनशुद्धीचा सिद्धांत सर्वस्वी आचरिता येत नाही, असा अनुभव आल्यामुळेच राजकारणात सत्याची व अहिंसेची शुद्ध साधने वापरून काम भागत नाही असे मत प्रसार पावलेले आहे. पण गांधीजींनी जे सत्याग्रही राजकारण केले ते प्रजेने आपले नैतिक बळ संघटित करून उन्मार्गगामी राज्यसंस्थेला ताळ्यावर आणून सन्मार्गगामी करण्याचेच प्रायः असल्याने त्यात अनत्याचारी असहकाराने यश मिळविण्यास पुष्कळच अवसर व संधी त्यांना मिळत गेली. म्हणूनच मागे अनेक ठिकाणी आम्ही असे म्हटले आहे की, सत्याग्रही राजकारण हे प्रजाधर्मातील राजकारण असून ते राजधर्मातील सत्ताधर्माचे राजकारण नव्हे. राजदंड

सत्तेच्या हाती घेऊन जनतेला धाक व लोभ दाखवून तिचे रक्षण करणे हे त्याचे स्वरूप नसून राजसत्तेने अन्याय केल्यास कोणत्याही भयास किंवा लोभास वश न होता राजसत्तेशी अन्यायाशी असहकार करून त्या राजसत्तेस ताळ्यावर आणणे हे त्याचे साध्य आहे. हे प्रजाधर्माचे राजकारण अशीच वाढत गेले व जनतेच्या अंगी शूराची अहिंसा निर्माण झाली, तर असा एक काळ येऊ शकेल की, त्या वेळी जनतेला आपले संरक्षण करण्या-साठीही राजदंडाची आवश्यकता वाटणार नाही. ही एक मानव समाजाची आदर्श अवस्था असून हिलाच ते आत्मराज्य, रामराज्य किंवा परमेश्वरी राज्य असे नाव देतात. सत्याग्रही राजकारणाचे अंतिम ध्येय हे आत्मराज्यच आहे. त्यात राजदंडाचा आश्रय करून समाजाचे धाकाच्या व लोभाच्या साहाय्याने रक्षण करणे हे बसू शकत नाही. म्हणून ज्या ज्या वेळी राष्ट्रसभेने राजदंड धारण केला, त्या त्या वेळी तिला साधनशुद्धीचा सिद्धांत सोडून द्यावा लागला, अर्थात सत्याग्रही निष्ठेचा मूळ आधारच अशा प्रकारे नष्ट झाल्यामुळे तिला या सत्याग्रही दृष्टीने आपल्या धोरणाचे तात्त्विक समर्थनही करता आले नाही. १९३७ साली महात्मा गांधींनी गांधी-सेवासंघाच्या सभासदांनी प्रांतिक स्वराज्याचे नियंत्रण करण्याचे काम करणाऱ्या पार्लमेंटरी बोर्डात, कायदेमंडळात व मंत्रिमंडळात जावे असा निर्णय दिला होता. पण पुढे दोन वर्षे अनुभव घेतल्यानंतर त्यांनी आपला हा प्रयोग अयशस्वी झाला असा नवा निर्णय दिला. पुन्हा १९४५ नंतर राष्ट्रसभेने जेव्हा अधिकार स्वीकार केला तेव्हा राष्ट्रसभेने आता "सत्य व अहिंसा" किंवा "शांततेची व न्याय्य साधने" हे शब्दही आपल्या ध्येयातून काढून टाकावेत असा उपदेश ते उघडपणे करू लागले. तात्पर्य, राजदंड हाती घेऊन राजकारण करणारांना साधनशुद्धीचा सिद्धान्त आचरता येत नाही असे म्हणणे चुकीचे होणार नाही. राष्ट्रसभेला स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही राजदंड हाती घेऊ इच्छिणाऱ्या राजकीय पक्षाचे स्वरूप प्राप्त होऊ नये व तिने सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहून केवळ सेवेचे व आत्मबलाचे राजकारणच करावे असा त्यांचा आग्रह का होता त्याचाही आता उलगडा होऊ शकेल असे वाटते. प्रजेचे राजनैतिक प्रभुत्व कायम ठेवणे, सर्वसामान्य नागरिक हक्क अबाधित राखणे आणि खरी लोकशाही प्रभावी करणे, या सर्व दृष्टींनी राष्ट्रसभेला आज ना उद्या अशा सत्याग्रही लोक-सेवक संघाचे स्वरूप येईल तरच तिचे पूर्ववैभव तिला प्राप्त होईल व महात्मा गांधींच्या राजकारणाचे चिरंतन स्मारक होऊ शकेल.

गांधीजी हे सत्याच्या व अहिंसेच्या निरपेक्ष व निरपवाद आदर्श पुढे ठेवून वर्तन करू इच्छिणारे मुमुक्षु साधक आणि साक्षात्कारी संत होते. त्यांची सत्यनिष्ठा अविचल होती आणि अहिंसावृत्तीही जन्मभर वाढलेल्या निष्ठेने व व्रतांनी सुदृढ बनविलेली होती. या सत्याग्रही निष्ठेसाठी चालविलेला अखंड यज्ञ असेच त्यांनी आपले जीवन बनविले होते आणि जो मोक्ष आपण साध्य केला तो सर्व जनतेसही साध्य करणे अगदी शक्य आहे असे ते मानीत. जनतेला आपल्या अंगच्या या अहिंसावृत्तीचा अथवा आत्मबलाचा साक्षात्कार घडून

देणे हेच त्यांचे जीवितसाध्य होते. या जीवितसाध्यास अनुरूप असेच सत्याग्रही राजकारण त्यांनी शोधून काढले व ते विशिष्ट प्रमाणात यशस्वीही करून दाखविले. पण सामान्य जनतेत प्रकट झालेले हे आत्मबळ विशिष्ट काळीच चमकून गेले व क्षणभर आपला प्रभाव दाखून पुन्हा अंतर्धान पावले असा अनुभव त्यांनी चाळीस-पन्नास वर्षे जे राजकारण केले त्यावरून आपणास दिसून येईल. आत्मबळ ही शक्ती सत्यनिष्ठेच्या, निर्विकार प्रेमभावनेच्या आणि अनासक्त सेवावृत्तीच्या रूपाने प्रत्येक मानवी अंतःकरणात वसत असते व तीच परमेश्वर, परमात्मा अथवा परब्रह्म होय, हा सत्याग्रही राजकारणाचा मूळ आधार आहे. हे आत्मबळ सामाजिक व्यवहारांवर प्रभावी होईल तर समाजधारणेला दंडप्रधान राजसत्तेची आवश्यकताच उरणार नाही. पण आज जनतेचे हे आत्मबळ सुप्त आहे यामुळे मनुष्य समाजाला राजसत्तेचा आधार घेऊन समाजात शांतता व शाश्वती स्थापन करावी लागते. समाजाचे आंतर व बाह्य शत्रूंपासून रक्षण करणे हे राज्यसंस्थेचे नियोजित ध्येय आहे. या नियोजित ध्येयानुसार पूर्णपणे चालणारी अशी राज्यपद्धती व राज्यसंस्था अद्यापि निर्माण झालेली नाही. आजच्या बहुतेक राज्यसंस्था आपल्या या नियोजित व घोषित ध्येयापासून भ्रष्ट झालेल्या दिसतात. "आर्तांचे रक्षण करण्यासाठी तुमचे शस्त्रबळ आहे, निरपराधी प्राण्यांवर प्रहार करण्यासाठी ते नाही" असा इशारा ऋषी लोक राजांना देत असत. समाजाची धारणा राजांच्या शस्त्रबळाने होते की ऋषींच्या आत्मबळाने होते असा प्रश्न केल्यास त्यास एकच एक उत्तर देता येणार नाही. ऋषींचे आत्मबळ जर समाजातील अन्यायप्रवृत्तींना पूर्णपणे जिंकू शकेल, तर त्या समाजाच्या धारणेला राजांच्या शस्त्रबळाची आवश्यकता पडणारच नाही असा सत्याग्रही राजकारणाचा अंतिम सिद्धांत आहे. पण भूमितीतील व्याख्येत आढळणारे बिंदु, सरळ रेषा, वर्तुळे या वस्तू जशा बुद्धिगोचर पण अव्यक्तच असतात, तसेच केवळ आत्मबलावर चालणाऱ्या व राजदंडाचा मुळीच उपयोग न करणाऱ्या सत्याग्रही समाजाचे हे ध्येय अव्यक्तच राहणार आहे. तथापि ते अव्यक्त ध्येय प्रत्येक मानवाच्या अंतःकरणात आजही वसत आहे व त्याच्या प्रकाशात आपले नित्य वर्तन घडत राहावे हीच मानवाच्या धर्मबुद्धीची आकांक्षा आहे. पण या आकांक्षेनुसार चालणारा समाज जसा आज आढळत नाही तसा असा आदर्शपूर्ण मानवही दुर्मिळच असतो. गांधीजी हे एक असा आदर्श आपल्यापुढे ठेवून नित्य वर्तन करणारे पुरुष होते. त्यांनी ही तपश्चर्या करण्यात आपल्या जीवनाची ५० वर्षे वेचली आणि हे आत्मराज्याचे ध्येय रामराज्याच्या नावाने आजच्या जगापुढे ठेवले. हे त्यांचे रामराज्य म्हणजे दशरथपुत्राचे ऐतिहासिक राज्य नव्हे, तर त्या ऐतिहासिक रामराज्याच्याही मागे जी मानवी अंतःकरणातील अमूर्त, अव्यक्त धर्मभावना तत्कालीन आदर्श मानवांना अंतःप्रेरणा देत होती, त्या सनातन, शाश्वत, नित्यनूतन आणि स्वयंविकासी धर्मभावनेने प्रेरित असे धर्मराज्य गांधींना अभिप्रेत होते.

...सत्ययुगीन धर्मराज्याचा आदर्श गांधीजींच्या रामराज्य या शब्दाने सूचित केला जातो. पण या आदर्शापासून खाली येऊन वास्तववादी दृष्टीने आपण विचार करू लागलो,

म्हणजे आपणास आत्मबलाचा व शस्त्रबलाचा उपयोग करणाऱ्या वास्तव समाजाच्या व्यवहारासंबंधी बोलताना सापेक्ष दृष्टीने या सिद्धांताची मांडणी करावी लागते. समाजधारणेच्या कामी आत्मबल जितके अधिक प्रभावी होईल, तितके त्या समाजाच्या धारणेला राजसत्तेचे शस्त्रबळ कमी लागेल. सत्याग्रही नेत्यांचा प्रयत्न समाजात अधिकात अधिक आत्मबल निर्माण करणे, हा असावा आणि राजदंड धारण करणाऱ्यांचा प्रयत्न आपल्या शस्त्रबलाचा उपयोग किमान प्रमाणात करणे, असा असावा. म्हणून सत्याग्रही लोकनेत्यांचे व्यावहारिक ध्येय अधिकात अधिक शक्य तितके आत्मबल निर्माण करणे असे सांगता येते. तसेच समाजधारणेला अपरिहार्य असणारे शस्त्रबल किमान किंवा अल्पतम प्रमाणात योजून समाजधारणा करणे या शब्दात राजदंडाचे ध्येय सांगता येते.

राजदंड उन्मार्गगामी होऊ नये, याकरिताच लोकशाही राज्यपंथ स्थापण्यात आले. लोकशाही राज्यात निरनिराळे पक्ष जनतेची मते मिळवून अधिकारावर येण्याचा प्रयत्न करीत असतात. जनतेचे मतपरिवर्तन घडवून जिला मान्य होणाऱ्या पक्षाच्या हाती सत्ता जावी आणि विरोधी पक्षांनाही आपल्या हाती त्याच मार्गाने सत्ता मिळविण्याचा मार्ग मोकळा रहावा अशी योजना लोकशाही राज्यात केलेली असते. तरीही अशा राज्यातील पक्ष सत्तेची लालूच व भीती दाखवून मते मिळविण्याचा दुरुपयोग करून प्रजास्वातंत्र्य व प्रजेचे प्रभुत्व नष्ट करण्यास प्रवृत्त होतात असा अनुभव अलीकडे युरोपात आलेला आहे. या अनुभवाचे कारण भांडवलदार उत्पादनपद्धती हे एक आहे. युरोपातील लोकशाही, भांडवलशाहीने विकृत बनविली. भांडवलदार लोकशाही ही खरी लोकशाही नसून समाजवादी लोकशाही हीच खरी लोकशाही होऊ शकेल हे मत आज राजकीय तत्त्वज्ञांस पटू लागले आहे. पण लोकशाही पद्धतीने समाजवादाचा प्रयोग करण्यात अद्यापि कोणासही यश आलेले नाही. समाजवादाची स्थापना करण्यात लोकशाही राज्यपंथ यशस्वी व्हावयाचे असेल, तर जनतेची एक मोठी संघटना समाजवादी ध्येयाची पण अनत्याचारी वृत्तीची निर्माण झाली पाहिजे. या संघटनेने भांडवलदार वर्गाविरुद्ध अनत्याचारी असहकार संघटित केला पाहिजे. ही संघटना अर्थात वर्गविशिष्ट होणार. अशा वर्गविशिष्ट कामगारसंघटनेने अनत्याचारी असहकाराने भांडवलदार उत्पादन पद्धती स्थगित केली, तर समाजवादी लोकशाही स्थापन करणारी शक्ती निर्माण होऊ शकेल, पण हे कार्य करताना अत्याचारी वातावरण निर्माण झाले तर येणारा समाजवाद हा लोकशाही राज्याला मारक ठरेल. म्हणून ही कामगार संघटना अत्याचारी बनू नये अशी दक्षता समाजवाद्यांनी घेतली पाहिजे. तसेच जे समाजवादी आपली संघटना अनत्याचारी वृत्तीने व धोरणाने करीत असतील, त्यांना प्रचार व संघटना करण्याचे स्वातंत्र्य लोकशाही राज्यातील सत्ताधाऱ्यांनी दिले पाहिजे. अनत्याचारी प्रचार व संघटना यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यास समाजवादी क्रांती अनत्याचारी टिकणे कठीण होते आणि भांडवलदार उत्पादन पद्धती आपल्या आंतरविरोधांनी

कोलमडून पडल्यास सशस्त्र क्रांती करण्यावाचून समाजाला दुसरा मार्गच उरत नाही. हा मार्गही निश्चित यशस्वी होणे अगदी अपवादात्मक परिस्थितीवाचून शक्य होत नाही. यामुळे भांडवलदारपद्धती चालू शकत नाही आणि नवी उत्पादन पद्धती स्थापन होण्यास वाव मिळत नाही, असा पेच निर्माण होऊन समाजाचे जीवन गुदमरू लागते. बाह्य आघातांनी राज्ययंत्र मोडून पडले, तर बाहेरची गुलामगिरी येते व बाहेरचा आघात आला नाही तर आतील पुरोगामी शक्ती प्रतिगामी राज्ययंत्र मोडून दुसरे उभारू शकत नसल्यास समाज-जीवन गुदमरून मरणाऱ्या माणसाप्रमाणे निष्प्राण बनू लागते. अशा समाजाला किंवा राष्ट्राला केव्हा तरी परकीयांची गुलामगिरी करण्यावाचून गत्यंतरच उरत नाही.

या सर्व आपत्ती टाळण्यास समाजवादी क्रांती करू पाहणारांनी कामगारसंघटनेला अनत्याचारी ठेवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यांना तसे करण्याचे स्वातंत्र्य सरकारने दिले पाहिजे. हे स्वातंत्र्य नसेल तर केवळ जनतेला मताधिकार दिल्याने राज्य लोकशाही पद्धतीस धरून चालू आहे असे म्हणता येणार नाही. यासाठी कामकरी-शेतकरी वर्गांचे शांततेची संघटना करण्याचे स्वातंत्र्य शाबूत ठेवणे हे लोकशाही पद्धतीने समाजवाद आणू पाहणारांचे आद्य कर्तव्य ठरते. हे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी जनतेला सत्याग्रह अथवा सविनय कायदेभंग करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. महात्मा गांधींच्या राजकारणापासून समाजवाद्यांनी हा धडा घेतला असून हिंदी समाजवादी पुढारी आज संप व सत्याग्रह या साधनांनी आपल्या देशातील लोकशाही राज्याला समाजवादी रूप देण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण आज महात्मा गांधींच्यासारखा असामान्य निष्ठावंत सत्याग्रही नेता नाही आणि स्वतः महात्मा गांधींनासुद्धा सरकारने अत्यंत जालीम अशी दहशतवादी दडपशाही केली, तेव्हा जनतेला सत्याग्रही निष्ठेला चिकटून ठेवण्यात पूर्ण यश आले नाही. जनतेची क्रांतिनिष्ठा अहिंसक वृत्ती सोडणार नाही, असे प्रयत्न समाजवाद्यांनी केले तरी त्यांचे ते प्रयत्न यशस्वी होण्यास प्रतिपक्षी सत्ताधाऱ्यांनीही विशिष्ट नीती सतत पाळली पाहिजे. ही नीती सत्ताधारी पाळणार नाहीत तर वाटेल त्या परिस्थितीत जनतेची क्रांतिशक्ती अनत्याचारीच राहील अशी हमी कोणी देऊ शकणार नाही व तशी कोणी दिली तरी ती सफल होणार नाही. यासाठी हिंदुस्थानात नवीन स्थापन होणाऱ्या लोकशाही राज्यातील सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या क्रांति-शक्तीला अनत्याचारी स्वरूप देऊ पाहणाऱ्या समाजवाद्यांना योग्य अवसर दिला पाहिजे आणि समाजवाद्यांनीही जनतेची क्रांतिशक्ती अनत्याचारी ठेवण्याचे निष्ठापूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. या दोनही गोष्टी घडतील आणि पंडित जवाहरलाल नेहरू व श्री जयप्रकाश नारायण हे समाजवादी लोकशाही बनवतील अशी आशा वाटते. महात्मा गांधींचे राजकारण हिंदुस्थानात चिरंजीव होणार किंवा नाही, या प्रश्नाचे उत्तर या आशेच्या सफलतेवर अवलंबून आहे.

## सक्ती, परिवर्तन आणि क्रांती

सामाजिक व आर्थिक क्रांती समाजावर सक्तीने लादण्यात येऊ नये, तर समाजाचे हृदयपरिवर्तन होऊन त्याचा बाह्य आविष्कार म्हणून सामाजिक क्रांती घडून यावी, हेच लोकशाहीचे रहस्य आहे. समाजाने हे हृदयपरिवर्तन घडवून आणण्याच्या कामी दहशतवादाचा उपयोग करणे हा शुद्ध अविवेक आहे आणि अशा अविवेकाने सामाजिक क्रांती केव्हाही यशस्वी होऊ शकणार नाही. या दृष्टीने दहशतवाद हा क्रांतिकार्याला मारक आहे हे कोणासही पटण्यासारखे आहे. समाजाचे हृदयपरिवर्तन झाल्यावाचून त्याचे क्रांतिकारक मतपरिवर्तन होऊ शकत नाही, ही सत्याग्रहाची भूमिका असून हे क्रांतिकारक मतपरिवर्तन घडण्यास निष्काम सेवा, निःपक्षपाती प्रेम आणि अहिंसक शौर्य, या गुणांचा उत्कर्ष क्रांतिकारकाच्या अंगी जितका झाला असेल तितके इष्ट असते. या गुणांनाच आत्मबल ही संज्ञा देता येईल. या कामी सेवा, त्याग आणि आत्मक्लेशाच्या तपश्चर्येचे तेज यांचा उपयोग होत असतो. केवळ बुद्धिबळाचा समाजाचे क्रांतिकारक हृदयपरिवर्तन घडविण्यास फारसा उपयोग होऊ शकत नाही. क्रांतिकारक ध्येय अथवा मते सामान्य जनतेला पुस्तकी विद्येने किंवा वर्तमानपत्री प्रचाराने अथवा वक्तृत्वपूर्ण भाषणांनी आधी आकलन होत नाहीत व ती बुद्धीने आकलन झाली तरी त्याच्या प्रस्थापनेसाठी भोगाव्या लागणाऱ्या यातना सहन करण्यास लागणारे धैर्य व चिकाटी जनतेच्या अंगी येऊ शकत नाही. अनेक वर्षांची सेवा, उत्कट जनताप्रेम आणि निर्भय, शौर्यशाली सत्यनिष्ठा हे गुण अंगी असणारे क्रांतिकारक आपल्या आत्मबलाने जनतेचे खरे हृदयपरिवर्तन अथवा निष्ठांतर करू शकतात. येथेच सत्याग्रही तत्त्वज्ञानाने प्रागतिक राजकीय तत्त्वज्ञानात महत्त्वाची भर टाकलेली आहे. सत्याग्रही क्रांतिकारक हा केवळ बुद्धिबळाच्या जोरावर जनतेचे निष्ठांतर होईल व ती क्रांती घडवून आणील अशी अपेक्षा करीत नाही. तो बुद्धिबळाला आत्मबलाची प्रेरणा देऊन मनुष्यास त्यागाला, शौर्याला आणि औदार्याला प्रवृत्त करू पाहतो. प्रागतिक लोकशाही ही केवळ बुद्धिबळाने समाजाची प्रगती करू पाहते व जोपर्यंत समाजाचे क्रांतिकारक निष्ठांतर करण्याची आवश्यकता निर्माण झाली नाही, तोपर्यंत हे बुद्धिबळ प्रगतीचे कार्य करू शकते.

समाजात सुप्रतिष्ठित झालेल्या परंपरागत निष्ठा बदलून जेव्हा नव्या निर्माण करण्याचा काळ प्राप्त होतो, तेव्हा केवळ बुद्धिबळाने हे कार्य घडू शकत नाही. अशा वेळी जनतेत नव्या निष्ठा निर्माण करण्यास आत्मबलाचा उपयोग होतो, हेच महात्मा गांधींनी सत्याग्रहाचा प्रयोग करून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धीने ते ध्येय आकलन करता येते आणि त्याची स्थापना झाली असता सर्वांचे हित होईल असे बुद्धीला पटते, त्या ध्येयसिद्धीस लागणारा त्याग, शौर्य आणि चिकाटी या आत्मगुणांच्या अभावी क्रांती अडून असते. अशा वेळी समाजातील वरिष्ठ अथवा पीडक किंवा शोषक वर्ग आणि

कनिष्ठ अथवा पीडित किंवा शोषित वर्ग यांच्यामध्ये विरोध व कलह निर्माण होतो. या वर्गविग्रहात कनिष्ठ, पीडित व शोषित वर्गांना आपल्या हक्कांची जाणीव निर्माण करून देऊन नवी समाजरचना करण्याचे नवनिर्मितीचे कार्य करण्यास त्यांना प्रवृत्त करणे हे कम्युनिस्ट क्रांतीचे तंत्र आहे. सत्याग्रही तंत्राने या वर्गविग्रहाचा प्रश्न सोडवावयाचा तर वरिष्ठ वर्गाला आपल्या रक्तलांछित नफ्याचा त्याग करण्यास प्रवृत्त करणे आणि कनिष्ठ वर्गास आपले शोषण करणाऱ्या उत्पादनपद्धतीशी अनत्याचारी असहकार करण्यास प्रवृत्त करणे असे द्विविध कार्य केले गेले पाहिजे. हे द्विविध कार्य करीत असता दोनही वर्गांना आपापल्या कर्तव्यांची जाणीव करून देणारे सत्याग्रही नेते हवेत. सत्याग्रहींनी स्वतः असंग्रही राहिले पाहिजे आणि वरिष्ठ वर्गाच्या स्वार्थाशी झगडत असता त्या वर्गातील व्यक्तींविरुद्ध अद्वेषाची भावना टिकविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. शोषणमूलक संग्रहाला पायबंद घालून तो बंद पाडणारे कायदे करण्यास सरकारला प्रवृत्त केले पाहिजे आणि असे कायदे हे न्याय-संस्थापना करणारे असल्याने वरिष्ठ वर्गालाही त्यांना मान्यता देण्यास प्रवृत्त केले पाहिजे. अशा प्रकारे मालक व मजूर हा वर्गभेद नष्ट करून मालक हे समाजाचे सेवक आहेत आणि मजूर हे समाजाच्छदः संपत्तीचे मालक आहेत, ही भावना वाढवित नेऊन हा वर्गविग्रह संपवून रक्तपात न करता एकवर्गसमाजाची स्थापना केली पाहिजे. असे सत्याग्रही नेते स्वतः न्यायनिष्ठ राहिले पाहिजेत, वर्गशोषणाच्या अन्यायाची सम्यक जाणीव त्यांना झालेली असली पाहिजे आणि सर्व समाजाची न्यायबुद्धी जागृत करून तिला या समाजवादी क्रांतीची न्याय्यता त्यांनी पटवून दिली पाहिजे. अनत्याचारी असहकाराच्या म्हणजे संपाच्या व सत्याग्रहाच्या साधनांनी समाजाच्या न्यायबुद्धीच्या जागृतीचे हे कार्य केले गेले, तर या क्रांतीत निदान लोकशाही राज्यात तरी हिंसक स्वरूप येण्याचे कारण नाही. पण संप, सत्याग्रह किंवा प्रत्यक्ष प्रतिकार या साधनांवाचून केवळ सनदशीर युक्तिवादाच्या साधनाने हे सामाजिक हृदयपरिवर्तन घडून येणार नाही. ...

[*जीवनरहस्य, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९५१, पृ. ५२१ ते ५३०*]

## १६

# महात्मा गांधींची धर्मनिष्ठा

...महात्मा गांधी हे एक धर्मपुरुष होते आणि ते क्रांतिकारक धर्मपुरुष होते. एकाच वृक्षाला ज्या अनेक शाखा असतात, त्याचप्रमाणे एकाच मानवधर्मांचे निरनिराळे सांप्रदाय बनलेले असून त्यांनाच हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, शीख, पारशी, बौद्ध, जैन इत्यादी नावे प्राप्त झालेली आहेत असे त्यांचे मत होते. सत्य आणि अहिंसा हेच त्या सर्व धर्मांचे रहस्य असून विश्वाला एक नैतिक नियती आहे या निष्ठेवर या एका विश्वव्यापक मानवधर्माचा सर्व आधार आहे असे ते मानीत. विश्वाची भौतिक नियती शोधून काढणे हे संत, महात्मे व धर्मपुरुष यांचे कार्य असते. न्यूटनने जसा गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढिला तसाच प्राचीन ऋषींनी व संत-महात्म्यांनी सत्याचा, प्रेमाचा व सेवेचा नियम शोधून काढिला आहे. ही नैतिक विश्वनियती शोधून काढणे, त्या नियतीच्या आधारे निरनिराळे जीवनप्रयोग करणे आणि त्या प्रयोगांनी सिद्ध झालेले सिद्धांत समाजघटनेच्या व समाजक्रांतीच्या कामी उपयोगात आणणे हाच समाजोद्धाराचा व आत्मोद्धाराचा खरा मार्ग आहे. समाजाच्या सर्व व्यवहारांवर या नैतिक नियतीचे नियंत्रण चालू राहिले पाहिजे असा जो आग्रह त्यालाच ते सत्याचा आग्रह किंवा धर्मनिष्ठा असे नाव देतात. ही त्यांची धर्मनिष्ठा अत्यंत व्यापक, अनाग्रही, संप्रदायशून्य अशी नैतिक जीवननिष्ठा आहे. या अर्थाने राजकारण आणि धर्म यांची फारकत होऊ नये असा त्यांचा आग्रह होता. पण त्याचबरोबर त्यांचा असाही आग्रह होता की, राजकारण हे कोणत्याही विशिष्ट सांप्रदायिक धर्मांच्या आधारावर चालता कामा नये. धर्म ही सर्वसंग्राहक जीवननिष्ठा अथवा सत्यनिष्ठा आहे असा जेव्हा अर्थ असतो तेव्हाच ती सर्व सामाजिक व्यवहारांना आधारभूत निष्ठा बनावी, हे मत अनेक धर्मांच्या व अनेक मतांच्या लोकांचे एक राष्ट्र बनविण्यास उपयोगी पडू शकेल व तशी ती उपयोगी पडू शकते, हे स्वतः महात्मा गांधींच्या जीवनावरूनच आपल्या पूर्ण ध्यानात येऊ शकते "धर्म" हा शब्द "सांप्रदायिक धर्म" या अर्थाशी इतका

निगडित झालेला आहे की, महात्मा गांधी ज्या व्यापक जीवननिष्ठेच्या अर्थाने तो शब्द योजितात, तो अर्थ लोकांच्या अंतःकरणात जागृत होत नाही आणि त्यामुळे गांधीजींनी या व्यापक व सर्वसंग्राहक जीवननिष्ठेला धर्माव्यतिरिक्त एखादा दुसरा शब्द योजिला असता तर फार बरे झाले असते असे काही लोकांचे मत आहे.

उदाहरणार्थ, धर्म म्हटल्याबरोबर हिंदूंच्या अंतःकरणात हिंदू धर्म आणि मुसलमानांच्या अंतःकरणात मुसलमान धर्म व ख्रिस्तांच्या अंतःकरणात ख्रिस्ती धर्म असाच अर्थ उदित होतो, पण हे सर्व धर्म एकाच धर्मवृक्षाच्या शाखा आहेत, असा बोध त्यांना सहसा होत नाही आणि म्हणून या सर्वव्यापक धर्माला दुसरे एखादे नाव द्यावे असे या आक्षेपकांचे म्हणणे आहे. महात्मा गांधींना या आक्षेपकांच्या म्हणण्यातील तथ्य माहीत नसते, तर त्यांनी प्रत्येक वेळी धर्म हा शब्द योजताना त्याच्या सर्वसंग्राहक व व्यापक अर्थाचे स्पष्टीकरण केलेच नसते. पण आक्षेपकांचे म्हणणे मान्य करूनही त्यांना असे वाटत होते की, सामान्य जनतेच्या अंतःकरणात धर्मासंबंधी जी पूज्य व पवित्र भावना नांदत आहे, ती वस्तुतः या व्यापक व सर्वसंग्राहक, संप्रदायरहित जीवननिष्ठेसंबंधीचीच भावना आहे. तिला जागृत करून आपण सर्व धर्मांच्या लोकांत सहिष्णुवृत्ती आणि बंधुभावना जागृत करू शकू. जनतेच्या अंतःकरणातील ही खोल जीवननिष्ठा जागृत करण्यानेच जनता त्यागास आणि सेवेस तयार होईल आणि खरे जनतेचे राज्य निर्माण होऊन त्या जनताराज्यास आत्मराज्याचे अथवा रामराज्याचे स्वरूप प्राप्त होऊ शकेल. सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ती या रूपाने प्रत्येक अंतःकरणात वसत असणाऱ्या परमेश्वरास आवाहन करण्याचे एक साधन त्यांना प्रिय असणाऱ्या धर्माचा व अध्यात्माचा खरा अर्थ त्यांना समजून देणे आणि तो अर्थ आपल्या जीवनात आचरून दाखविणे हेच आहे असा महात्मा गांधींचा या बाबतीतील दृष्टिकोन होता. बुद्धिमंतांच्या आक्षेपनिरसनापेक्षा जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन तिची जीवननिष्ठा जागृत करण्यावरच त्यांची सर्व मदार होती. बुद्धिमंत शास्त्रीपंडित अथवा आधुनिक विद्वान या सर्वांहून त्यांचे लक्ष जनतेच्या अंतःकरणाकडे विशेष होते. त्यांना असे वाटत होते की, हे नवेजुने शास्त्रीपंडित ज्याला धर्म समजतात, त्याच्याहून जनतेच्या अंतःकरणात पूज्यत्व पावलेला आणि साधुसंतांनी आचरून दाखविलेला धर्म भिन्न व श्रेष्ठ आहे आणि तो धर्म सर्व निरनिराळ्या धर्मांच्या बुडाशी आहे याचीही सुप्त जाणीव जनतेला आहे. निदान हिंदुस्थानात तरी हा सर्वधर्मसमभाव जनतेच्या अंतःकरणात खोल रुजलेला आहे व त्याला आपल्या जीवनाचे पाणी घालून आपण पुनः जिवंत करू शकू. हा सर्वधर्मसमभाव, ही सहिष्णुवृत्ती व इतर धर्मियांसंबंधीची बंधुभावना केवळ हिंदूंसच नव्हे तर जे आपणास परधर्मीय समजतात त्या इस्लाम धर्मियांसही आपण ही वृत्ती प्रेमाने, त्यागाने आणि सेवेने पटवू शकू. मौलाना आझाद, खान अब्दुल गफारखान इत्यादी धर्मपंडितांस

व धर्मनिष्ठ संतांस जर आपले हे मत पटलेले आहे आणि अनेक सत्याग्रह-संग्रामांत जर हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून मुसलमान लोक सहस्रावधी संख्येने सामील झालेले आपण पाहिले आहेत, तर मुसलमान जनतेतील ही व्यापक जीवननिष्ठा धर्माच्या नावाने आपणास जागृत का करता येणार नाही? संतांचे व धर्मपुरुषांचे निःपक्षपाती प्रेमळ अंतःकरण आणि जनतेचे निःस्वार्थ अंतःकरण या दोहोंनी धर्माचा जो व्यापक व सर्वसंग्राहक अनाग्रही संप्रदायरहित अर्थ केला आहे, तोच त्याचा खरा अर्थ असून ही पवित्र धर्मनिष्ठा मी प्रभावी बनवू शकेन असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. हा आपला विश्वास श्रीकृष्ण, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर यांच्या जीवनाच्या अनुभवसिद्ध आधारावर उभारलेला आहे असे त्यांना वाटत होते. तथापि धर्म शब्दाचा दुसरा एक संकुचित, आग्रही व संप्रदायनिष्ठ अर्थ आहे व त्या अर्थाचा धर्म राजकारणात घोटाळे व अनर्थ उत्पन्न करतो हेही त्यांना माहीत होते व दिसत होते. विशेषतः हिंदुराष्ट्रवादी व पाकिस्तानवादी हे या भ्रष्ट अर्थाने धर्माचा उपयोग करीत आहेत, हे त्यांना दिसत होते. पण त्यासाठी आपण धर्म हा शब्द सोडून देऊन आपल्या जीवननिष्ठेला दुसरा शब्द योजावा असे त्यांना अखेरपर्यंत वाटले नाही.

दुसऱ्या एका दृष्टीने विचार केल्यास आपल्या सर्वसंग्राहक व व्यापक, अनाग्रही व संप्रदायरहित जीवननिष्ठेस त्यांनी धर्मनिष्ठा हेच नाव कायम ठेवण्याचा आग्रह का धरला असावा त्याचा उलगडा होऊ शकतो. साधुसंत आणि धर्मसंस्थापक यांनी आपलाच अर्थ स्वीकारून जनतेला धर्मभावनेचे पावित्र्य व पूज्यत्व पटवून दिले होते व जनतेनेही त्याच वृत्तीने त्याला पूज्य व पवित्र मानिले आहे असे त्यांना अंतःकरणपूर्वक वाटत असल्याने धर्माचा खरा अर्थ हाच आहे अशी त्यांची श्रद्धा होती. असे असता आपण तो शब्द सोडून देणे योग्य नाही असे त्यांना वाटणे साहजिक आहे. शिवाय आपण तो शब्द सोडून दिला, तर स्वार्थीपंडितांनी, बुद्धिमंत विद्वानांनी आणि सत्तालोलुप राजकारण्यांनी जो भ्रष्ट अर्थ धर्म शब्दावर लादला आहे तोच त्याचा खरा अर्थ आहे अशी जनतेची भावना होईल आणि ती जनता त्या भ्रष्ट धर्मास सोडून न देता त्यालाच कवटाळून बसेल व तिचा त्यामुळे अधिकच अधःपात होईल अशीही भीती त्यांना वाटत असावी. जनतेच्या अंतःकरणात जो शब्द पूज्य आणि पवित्र स्थान पटकावून बसला आहे आणि ज्याचा खरा अर्थ सर्वोत्तम तितका उच्च व श्रेष्ठ आहे अशी आपली खात्री आहे, त्याचा अर्थ जनतेला पटवून देणे हेच आपले कर्तव्य आहे. या दृष्टीनेच ते आपल्या जीवननिष्ठेस व्यक्त करण्यास दुसरा शब्द न योजता धर्म हाच शब्द योजीत होते असे आम्हास वाटते. या त्यांच्या सर्वसंग्राहक, व्यापक, अनाग्रही व संप्रदायशून्य जीवननिष्ठेस हळूहळू सत्याग्रही जीवननिष्ठा असे नाव रूढ होईल अशी आमची कल्पना आहे.

## सत्याचे त्रिविध क्षेत्र

आता आपण या सत्याग्रही जीवननिष्ठेचा थोडा अधिक विचार करू. सत्याग्रही जीवननिष्ठेत सत्याला प्रथम स्थान दिलेले असून अहिंसा हे त्या सत्याच्या प्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन असे मानले जाते. यासंबंधी थोडे अधिक विवेचन करणे आवश्यक आहे. सत्य म्हणजे काय ? जीवनातील सत्याची प्राप्ती म्हणजे काय ? या प्रश्नांची उत्तरे अनेकांनी अनेक प्रकारे दिलेली आहेत. आमच्या मते या प्रश्नांचे रहस्य समजावयाचे तर सत्याचे तीन विभाग किंवा सत्याची तीन क्षेत्रे कल्पावी लागतील. भौतिक ज्ञान हे सत्यसंशोधनाचे पहिले क्षेत्र, सामाजिक ज्ञान हे त्याचे दुसरे क्षेत्र आणि आत्मिक ज्ञान हे त्याचे तिसरे क्षेत्र होय. आपणास जे बाह्य विश्व इंद्रियांमार्फत दिसते अथवा अनुभविता येते त्याचे स्वरूप व त्याची घटना कशी आहे ? भौतिक शास्त्रज्ञ या भौतिक क्षेत्रातील सत्यासत्याचा शोध करीत असतात. येथे आपणास असे दिसते की, या क्षेत्रात प्रथम आपणास जे सत्य वाटते त्याहून अनेक वेळा खरे सत्य अगदी भिन्न किंवा तद्विरोधी असते. उदाहरणार्थ, आपणास सूर्य पृथ्वीभोवती फिरत असावा असे वाटते, पण त्यानंतर अधिक खोल विचार करून शास्त्रज्ञ असे म्हणू लागले की, सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असे आपणास वाटते तो आभास असून पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे सत्य आहे. याच न्यायाने मृगजळ किंवा इंद्रधनुष्य यांना आपण आभास म्हणतो. मृगजळ किंवा इंद्रधनुष्य यांचे स्वरूप प्रथमतः किंवा वरकरणी जसे दिसते तसे ते नाही हे आपणास अधिक अनुभवाने व अधिक विचाराने कळून येते. सृष्टीचे व्यापार कसे चालले आहेत हे समजून घेऊन त्यांचे कार्यकारणभाव समजून घेणे, तिच्या घडामोडींचे नियम शोधून काढणे अथवा ते नियम आपल्या बुद्धीने तयार करणे हे भौतिक शास्त्राचे कार्य आहे. या भौतिक शास्त्राच्या वाढीमुळे मनुष्याला आपले सामर्थ्य वाढविता येते आणि त्या सामर्थ्याचा उपयोग करून आपणास इष्ट असणारे भोग प्राप्त करून घेता येतात. तसेच आपले आणि आपल्या भोगसंपत्तीचे रक्षण करण्याची साधनेही त्याला भौतिक ज्ञानामुळेच प्राप्त होऊ शकतात. गेल्या तीनशे वर्षांत मानवाच्या भौतिक ज्ञानात फारच मोठी भर पडलेली असून ज्ञान हे केवढे मोठे बळ आहे त्याची प्रतीती त्याला आलेली आहे.

परंतु भौतिक ज्ञानाच्या वाढीमुळे जे बळ मनुष्याला प्राप्त झालेले आहे ते बळ कोणत्या कामी उपयोगात आणावे याचे ज्ञान मनुष्याला कसे होते या प्रश्नाचा विचार करताना सामाजिक व नैतिक शास्त्रात प्रवेश करावा लागतो. मनुष्याला खरे सुख कसे प्राप्त होईल ? खरे सुख कोणते आणि खोटे सुख कोणते ? मनुष्याचे कर्तव्य काय आणि त्याच्या जीविताचे ध्येय कोणते ? या प्रश्नाचा विचार नैतिक व सामाजिक शास्त्रात करावा लागतो. समाजाची घटना कशी असावी, तिच्यात बदल कसे व कोणत्या साधनांनी घडत असतात, तिच्यात घडणाऱ्या बदलांपैकी चांगले कोणते व वाईट कोणते या सर्व बदलांना मानवहिताच्या

दृष्टीने अनुकूल कलाटणी देणे कितपत व कसे शक्य आहे इत्यादी प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न सामाजिक व नैतिक शास्त्रे करीत असतात. या शास्त्रांचा विचार करीत असता मनुष्याला सत्यासत्यविवेकाप्रमाणे सदसद्विवेकही करावा लागतो. सत्याग्रहनिष्ठेतही असा सत्यासत्य व सदसद्विवेक करावा लागतो. सत्य या शब्दाचेही सत्य म्हणजे जे चांगले ते आणि जे शाश्वत ते असे अर्थ होतात. आपली सदसद्विवेकबुद्धी सांगेल त्याप्रमाणे वर्तन करण्याचा प्रयत्न करणे आणि असत्याचा काया-वाचा-मनाने सर्वथैव त्याग करणे असाच सत्याग्रहनिष्ठेचा मुख्य अर्थ आहे. आपल्या अंतःकरणात सतासताचा झगडा नित्य चाललेला असतो. सद्वासना सद्भावना व सद्विचार यांच्याविरुद्ध असद्वासना, असद्भावना आणि असद्विचार यांच्यातील युद्ध अथवा द्वंद्व अंतःकरणाच्या कुरुक्षेत्रावर नित्य चालू असते. या कुरुक्षेत्रातील युद्धात सत्यपक्षाचा असत्यपक्षावर विजय झाल्यानंतरच तेथे धर्मराज्य किंवा आत्मराज्य स्थापन होऊ शकते. आपल्या अंतःकरणातील या सदसद्वृत्तीतील द्वंद्वाप्रमाणे समाजातही सत्पक्ष विरुद्ध असत्पक्ष, न्याय विरुद्ध अन्याय, नीती विरुद्ध अनीती असा लढा चालू असतो. या दोन युद्धमान पक्षांपैकी प्रत्येक पक्ष आपणास सत्पक्षच म्हणवीत असतो आणि आपला विजय होण्यानेच सर्वांचे हित होईल असे म्हणत असतो. पुष्कळ वेळा तो तसे मानीतही असतो. अशा प्रकारे प्रत्येक पक्षाला आपली बाजू सत्याची व दुसऱ्याची बाजू असत्याची वाटत असते. यामुळे एकाच समाजातील हे अंतर्गत संघर्ष अथवा दोन अथवा अधिक समाजांतील संघर्ष दोन अथवा अधिक अशा मानीव सत्यासाठी चालू असल्याचे आपणास आढळते. अशा वेळी सत्याग्रही निष्ठेच्या मनुष्याला या दोन अथवा अधिक मानीव सत्यांपैकी वास्तविक सत्य कोणते त्याचा निर्णय स्वतःच्या बुद्धीने अथवा अंतःकरणवृत्तीने करावा लागतो. हा निर्णय केल्यानंतर त्या लढणाऱ्या दोन किंवा अधिक पक्षांपैकी सत्पक्ष कोणता व असत्पक्ष कोणता हे सांगता येते. पण एवढे सांगून तो तटस्थ राहून स्वस्थ बसू शकत नाही. असत्पक्षाविरुद्ध आणि सत्पक्षाच्या बाजूने लढणे हे त्याचे कर्तव्य असते. पण हा लढा पूर्ण अनत्याचारी वृत्तीने व अनत्याचारी साधनांनी तो चालवू इच्छितो. यासाठी महात्मा गांधींनी अनत्याचारी असहकार आणि सविनय कायदेभंग ही दोन नैतिक शस्त्रे शोधून काढिली आणि भौतिक युद्धाचा एक नैतिक अथवा आध्यात्मिक पर्याय जगाला दाखवून दिला. अंतःकरणातील व समाजातील सदसद्वृत्ती-तील लढ्यात सद्वृत्तीचा विजय करण्यासाठी जन्माच्या अखेरपर्यंत लढत राहावे आणि अखेरीस त्या लढ्यातच आपल्या जीविताचा होम करून जगातील असत्प्रवृत्तीचा अंधार दूर करण्यासाठी संपूर्ण आत्मसमर्पण करावे हीच सत्याग्रही निष्ठा होय. ही निष्ठा जागृत करण्यासाठीच महात्मा गांधींनी आपले जीवित वेचिले. आजच्या मानवसंस्कृतीवर जी अरिष्टे एकसारखी घुटमळत आहेत, त्या अरिष्टांतून तिची मुक्तता करण्यास आपल्या या सत्याग्रही निष्ठेचा अवलंब मानवांनी केला तरच मानवाला आपल्या उद्धाराचा खरा मार्ग आढळेल असा त्यांचा आजच्या मानवाला संदेश आहे.

या सत्याग्रहनिष्ठेचे अधिष्ठान नैतिक व आत्मिक आहे. येथपर्यंत भौतिक, सामाजिक व नैतिक सत्याचा विचार आपण केला. आता सत्याग्रहनिष्ठेचे आत्मिक अधिष्ठान म्हणजे काय त्याचा थोडा विचार करू. महात्मा गांधींचे अध्यात्मशास्त्र फार सोपे होते. भगवद्‌गीता, धम्मपद, बायबल, कुराण या सर्व धर्मग्रंथांत सांगितलेले अध्यात्मशास्त्र एकच आहे असे ते मानीत. मानवी अंतःकरणातील सत्यप्रेरणा हीच त्यांची आत्मप्रेरणा होय. या सत्यप्रेरणेशी जे तादात्म्य पावतात ते आपल्या खऱ्या आत्म्याशी तादात्म्य पावतात आणि ते सर्व प्रकारच्या आपपर भावातून, ममत्वातून आणि अहंकारातून मुक्त होऊन विश्वात्म्याशी अथवा विश्वचैतन्याशी एकरूप होऊन वर्तन करीत असतात, असे त्यांचे अध्यात्मशास्त्र होते. सामान्यतः भगवद्‌गीतेतील स्थितप्रज्ञ हा त्यांचा आत्मप्राप्ती झालेल्या मुक्त मानवाचा आदर्श होता असे म्हणण्यास हरकत नाही. सर्व विश्वातील सर्व पदार्थांशी करणारी एकच चिच्छक्ती आहे. ही चिच्छक्तीच परमात्मा, परब्रह्म, परमेश्वर, अल्ला, राम, रहीम, कृष्ण, करीम या नावांनी ओळखली जाते. ही शक्ती आपल्या अंतःकरणात सत्यनिष्ठेच्या रूपाने वसत असते व कार्य करीत असते. मात्र आपण इंद्रियवृत्तींच्या व मनोविकारांच्या अधीन होऊन या विश्वचैतन्यापासून दूर जात असतो. आपण विश्वचैतन्याच्या सागरातील एक बिंदू आहो, त्याचे सर्व सामर्थ्य आपल्यामागे उभे आहे पण आम्ही अहंकाराने व ममत्वाने त्याच्यापासून अलग बनतो. सागरातील जलबिंदू त्या सागरापासून अलग झाला की, त्याची सर्व शक्ती खलास होते. या विश्वान्तर्यामी तेजापासून आपली बुद्धी आपण अहंकाराने अलग बनवितो तेव्हा तिचे तेज अल्प व मंद बनून अखेरीस नष्ट होते. आपण इंद्रियनिग्रह आणि मनोविजय या साधनांनी त्या विश्वचैतन्याच्या शक्तीशी तादात्म्य पावू शकतो आणि त्याच्यापासून प्राप्त होणाऱ्या प्रकाशाच्या आधारे जगात सर्वत्र भरलेल्या स्वार्थाच्या, अहंकाराच्या व अज्ञानाच्या अंधारातून आपला मार्ग काढू शकतो असे महात्मा गांधींचे अध्यात्मशास्त्र होते. विश्वचैतन्याशी म्हणजेच सत्याशी किंवा सत्त्वाशी तादात्म्य पावण्याचे त्यांचे साधन म्हणजेच अहिंसा किंवा प्रेम होय. जगातील प्रत्येक वस्तुजातावर, प्रत्येक प्राणिमात्रावर, प्रत्येक मानवावर प्रेम करणे हीच त्यांची अहिंसा होय. सर्वांतर्यामी विश्व-चैतन्य हेच आध्यात्मिक सत्य होय आणि या सत्याशी तादात्म्य पावण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग म्हणजे प्राणिमात्रावर प्रेम करणे हाच होय. असे प्रेम ज्याच्या अंतःकरणात सदैव वसत असेल, ते केव्हाही इंद्रियवृत्तींनी व मनोविकारांनी आच्छादिले जात नसेल, त्याला कर्तव्याचा मार्ग अंतःप्रकाशाने दिसू लागेल अशी त्यांची निष्ठा होती व ही निष्ठा त्यांनी अनुभवाने व प्रयोगांनी पडताळून पाहिली होती. सत्याच्या प्राप्तीचे व अहिंसेच्या साधनांचे जे जे प्रयोग आपण केले, त्या प्रयोगांनी व त्या अनुभवांनी आपली ही निष्ठा कसोटीस उतरली असून ही अधिकाधिक बळकटच बनली आहे असे ते सांगत. अर्थात ही त्यांची निष्ठा म्हणजे अंधश्रद्धा नव्हे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

## बुद्धिस्वातंत्र्य व आत्मप्रामाण्य

सत्याग्रही हा बुद्धिप्रामाण्यवादी असतो की नाही असा एक वाद कित्येक लोक उपस्थित करीत असतात. त्यासंबंधी आमचे असे मत आहे की, सत्याग्रहीस बुद्धिप्रामाण्यवादी म्हणण्यापेक्षा त्याला आत्मप्रामाण्यवादी असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. मनुष्याला होणारे ज्ञान त्याच्या बुद्धीनेच होत असते हे खरे असले, तरी ही बुद्धी शुद्ध करण्यासाठी त्याने इंद्रिये व मन यांच्यावर विजय प्राप्त करून घ्यावा लागतो असे सत्याग्रही निष्ठेचे तत्त्व आहे. इंद्रियाधीन व विकारवश बुद्धी ही सदसद्विवेक करू शकत नाही म्हणून बुद्धीला शुद्ध, सम आणि शांत स्वरूप प्राप्त करून देण्याचे प्रयत्न सर्वांनी करीत राहिले पाहिजे. अशा शुद्ध, सम आणि शांत बुद्धीचे निर्णय हेच प्रमाण मानले पाहिजेत. पण अशी शुद्ध, सम व शांत बुद्धी प्राप्त होईपर्यंत व्यक्तींनी आपल्या बुद्धीस प्रमाण न मानता दुसऱ्याच्या बुद्धीने चालावे असा याचा अर्थ होत असेल, तर सत्याग्रहनिष्ठा ही एक शब्दप्रामाण्यवादी किंवा ग्रंथप्रामाण्यवादीच निष्ठा बनेल व अशा निष्ठेतील दास्यवृत्ती सत्याग्रहनिष्ठेतही निर्माण झाल्यावाचून राहणार नाही. महात्मा गांधी अशा बौद्धिक दास्यवृत्तीचा सतत निषेध करीत असत. तथापि त्यांच्या काही अनुयायांत ही दास्यवृत्ती वाढलेली दिसून येई. पण हा म. गांधींचा किंवा सत्याग्रहनिष्ठेचा दोष म्हणता येणार नाही. सत्याग्रहनिष्ठेत कोणतेही शब्दप्रामाण्य किंवा ग्रंथप्रामाण्य अंतर्भूत होऊ शकत नाही किंबहुना तसे ते होईल, तर त्या निष्ठेचे सर्व आधुनिकत्व व क्रांतिकारकत्व नष्ट होऊन ती एक मध्ययुगीन अंधश्रद्धा बनेल व तिला प्रतिगामी व प्रतिक्रांतिकारक स्वरूप आल्यावाचून राहणार नाही.

महात्मा गांधी हे प्रत्येकास पूर्ण बुद्धिस्वातंत्र्य द्यावे असे मानीत असत, तसा त्यांचा आग्रह होता. तरीही ते बुद्धीबरोबर अंतःकरणाचाही (head and heart) उल्लेख केल्यावाचून राहत नसत. पुष्कळ वेळा ते बुद्धीपेक्षा अंतःकरणाला अधिक मान द्यावा असेही म्हणत असत. यावरून ते बुद्धिप्रामाण्यवादी नसून अंतःकरणप्रामाण्यवादी किंवा भावप्रामाण्यवादी होते, असेही काहींना वाटले. पण तेही तितकेसे योग्य आहे असे आम्हास वाटत नाही. युरोपीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात व्हॉल्टेअर हा बुद्धिप्रामाण्यवादी व रूसो हा अंतःकरणप्रामाण्यवादी गणिला जातो. रूसोला भाववादी असेही म्हणता येईल. रूसोचा भाववाद आणि महात्मा गांधींचा अंतःकरणवाद यात आम्हाला फरक वाटतो. बुद्धीला विकारवश किंवा भावनावश बनण्यास संधी मिळाल्यास ती बुद्धी भ्रष्ट होते. म्हणून सर्व मनोविकार व इंद्रियप्रेरणा यांच्या दास्यातून मुक्त बनलेले शुद्ध अंतःकरण व त्या शुद्ध निर्विकार, निर्मम व निरहंकार अंतःकरणावर अधिष्ठित झालेली बुद्धी हीच आपली खरी मार्गदर्शक होऊ शकते हे महात्मा गांधींना जनाला शिकवावयाचे होते. यासाठी बुद्धीचा निर्णय शुद्ध राहावा म्हणून ते अंतःकरणाच्या शुद्धतेचे महत्त्व वर्णीत असत. अशा शुद्ध अंतःकरणात आत्मप्रेरणा जागृत होते व तिच्यामुळे बुद्धी प्रज्वलित अथवा तेजस्वी बनते.

या दृष्टीने त्यांच्या अंतःकरणवादाचा रूसोच्या भाववादाशी घोटाळा करणे योग्य नाही. रूसोच्या भाववादात बुद्धीला विवश अथवा विकारवश बनविण्याचा धोका होता, तसा महात्मा गांधींच्या अंतःकरणवादात नव्हता. कारण तो अंतःकरणवाद हा वस्तुतः आत्मवाद अथवा आत्मप्रामाण्यवाद आहे असे आम्हास वाटते.

महात्मा गांधी हे जसे अंतःकरणशुद्धतेला महत्त्व देणारे होते, तसेच ते क्रियाप्रवृत्तीला अथवा कर्मप्रवृत्तीलाही महत्त्व देणारे कर्मयोगी होते. अंतःकरणाची शुद्धी झाल्याने त्यांची भावना व्यापक, निर्मम आणि निरहंकार बनते, पण या निरहंकारतेने व निर्ममतेने कर्मशून्यता येऊ नये. ज्ञान हे अंतःकरणात मुरले पाहिजे आणि ते इंद्रियव्यापारांच्या द्वाराही प्रकट होऊन विश्वाची सेवा करण्यात त्या ज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे. नाही तर हे ज्ञान निष्फळ ठरेल. इतकेच नाही, तर ते प्रयोगाने सिद्ध झाले किंवा नाही याचाही अनुभव येणार नाही. ज्ञानाची वाढ आणि अज्ञानाचा निरास, या गोष्टी ज्ञानाचे अथवा सत्याचे प्रयोग करीत राहिल्यानेच होत असतात. जे ज्ञान अंतःकरणात मुरलेले नाही ते जमिनीत मुळे न धरलेल्या व झाडावरून तोडून आणून पुरलेल्या फांदीप्रमाणे निर्जीव असते. ते ज्ञान अंतःकरणात मुरेल, तरच अंतःप्रवृत्ती जागृत होईल आणि त्यांच्यातून कर्मप्रेरणाही वळावेल. म्हणून काही लोक ज्ञानाच्या वास्तवीत शुद्धीपेक्षा किंवा भावनेपेक्षा अधिक महत्त्व कर्मप्रेरणेला देतात. ज्या ज्ञानामुळे अंतःकरणे पराक्रम गाजवून उद्दीप्त होतात आणि मनुष्य कर्मप्रवृत्त होतो तेच ज्ञान खरे असेही ते म्हणतात. रूसो हा जसा भाववादी म्हणून युरोपात प्रसिद्ध आहे तसा नीत्शे हा कर्मवादी म्हणून तिकडे प्रसिद्ध आहे. तो ज्ञानापेक्षा कर्मालाच प्राधान्य देतो हे पाहून आमच्या इकडचे काही लोक त्याला भगवद्गीतेतील कर्मयोगी किंवा त्रिगुणातीत स्थितप्रज्ञ असेही मानतात. महात्मा गांधी हे कर्मयोगी होते, तरी ते नीत्शेसारखे आसुरी कर्मयोगी नव्हते. एखाद्या पराक्रमी विभूतीच्या विकासासाठी सर्वसामान्य मानवांचा आत्मविकास चुरडून टाकावा किंवा सर्वसामान्य जनतेला खरा आत्मविकास करण्याचे सामर्थ्यच नसल्याने सामान्य जनतेला बुद्धिस्वातंत्र्य देऊ नये, सामाजिक समता स्थापू नये आणि सामान्य जनतेच्या हितासाठी तिच्यावर या पराक्रमी विभूतीने सत्ता गाजवावी असली मते त्यांना कधीही पटली नाहीत. याच्या उलट त्यांचा सामान्य जनतेच्या आत्मबलावर आत्यंतिक विश्वास होता. तिच्यापैकी प्रत्येकाने स्वतःच्या बुद्धीने स्वतःचे नेतृत्व करू लागावे आणि आपल्या अंतःकरणास व शुद्ध बुद्धीस पटतील तेच मते स्वीकारून त्यांच्यामागून जाऊन आपला उद्धार करून घ्यावा असा त्यांचा उपदेश असे. त्यांची पराक्रमी विभूतीची कल्पना जनतेवर शस्त्रबळाने सत्ता गाजविणाऱ्या आणि तिला धाकाने व लोभाने वश करून गुलाम बनविणाऱ्या असुराची नसून आपल्या सतत सेवेने, त्यागाने आणि क्लेशाने तिचे अंतःकरण काबीज करणाऱ्या, तिला क्रियाप्रवण आणि पराक्रमी

जनविणाऱ्या लोकसेवकाची होती. दुसऱ्याचे रक्त सांडण्यात खरा पराक्रम नसून स्वतःच्या रक्ताचा अभिषेक करून जनतेचा अंतरात्मा जागृत करण्यात व तिला मुक्त वा स्वतंत्र करण्यास साहाय्य करण्यात खरा पराक्रम आहे अशी त्यांची निष्ठा होती. आपल्या शुद्ध बुद्धीने व शुद्ध अंतःकरणवृत्तीने अशी पराक्रमी कर्मप्रेरणा जागृत झाली तरच ती शुद्ध बुद्धी व तेच खरे शुद्ध अंतःकरण असे त्यांचे मत होते. तात्पर्य, गांधीजींच्या आत्मप्रामाण्यात बुद्धिस्वातंत्र्य, अंतःकरणशुद्धी आणि आत्मप्रेरणा या सर्व तत्त्वांना स्थान दिलेले असून ही आत्मप्रेरणा म्हणजेच सत्यनिष्ठा, अहिंसावृत्ती आणि सेवाबुद्धी होय असे मानण्यात येते. सत्यनिष्ठेला अग्रस्थान दिल्यामुळे अंधश्रद्धा आणि विकारी, पक्षपाती प्रेम यांना त्यात स्थान उरत नाही. शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य यांचा स्वतःच्या बुद्धीशी अथवा अंतःकरणवृत्तीशी विरोध येईल, तेथे स्वतःच्या बुद्धीला व अंतःकरणवृत्तीला साक्षी ठेवून वर्तन करावे असाच ते नेहमी उपदेश करीत असत.…

[*जीवनरहस्य, देशमुख आणि कं., पुणे १९५१, पृ. ४३२ ते ४४४*]

## १७

# गांधीवादाचे भवितव्य

गांधीवादाचे भवितव्य काय होणार ? या प्रश्नाचे उत्तर देणे फारच बिकट काम आहे. काही वर्षांपूर्वी स्वतः म. गांधी यांनी असे उद्‌गार काढले होते की, गांधीवाद म्हणून आज कोणतीही चीज नाही. आणि गांधीवादी अशी कोणीही व्यक्ती नाही. १९४५-४६ सालचे हे उद्‌गार आहेत. असे उद्‌गार त्यांनी अनेक वेळा काढलेले आहेत. यावरून स्वतःच्या नावाने एखादा नवा वाद अगर संप्रदाय निर्माण करण्याची त्यांची इच्छा नव्हती हे उघड आहे. तथापि, जगामध्ये काही व्यक्तींच्या नावाने जे वाद झालेले आहेत, ते त्या व्यक्तींच्या इच्छेने अथवा पुरस्कारानेच झालेले असतात असे नाही. स्वतः गौतम बुद्धास किंवा येशू खिस्तास सुद्धा आपल्या नावाने एक नवीन धर्म स्थापन व्हावा, अशी इच्छा नव्हती. परंतु त्यांनी आपल्या तत्त्वाचा जो पुरस्कार आपआपल्या समाजात केला, तो पुरस्कार पटणारे आणि त्याला विरोध करणारे अशा दोन पक्षांतील संघर्षातून पुढे बौद्ध धर्म व खिस्ती धर्म हे नवे धर्म म्हणून अस्तित्वात आले. अशीच स्थिती अनेक वादांचे बाबत घडलेली आहे. त्याचप्रमाणे आपल्या देशात म. गांधींच्या नावाने एखादा गांधी-वादी पंथ निर्माण होणे अशक्य नाही. तसा झाला आणि त्या पंथाने जर म. गांधींनी केलेले कार्य विशिष्ट पद्धतीने पुढे चालविले, तर त्यापासून केवळ आपल्याच देशाचे नव्हे तर सर्व जगाचेही हित होऊ शकेल असे माझे स्वतःचे मत आहे. पण अशा धोरणाने काम करणारांनी स्वतःचा एखादा विशिष्ट राजकीय संघटित पक्ष बनवावा हे मात्र इष्ट नाही. गांधीवादाची दीक्षा घेतलेल्या व्यक्तींनी एकमेकांशी सहकार्य करावे, त्यासाठी निरनिराळे प्रसंग घडवून आणून परस्परांशी विचारविनिमय करावा. परंतु बहुमताची शिस्त अल्प-मतावर लादण्याची पद्धती स्वीकारून त्यांचा एक संघटित राजकीय पक्ष बनविण्याचा प्रयत्न करणे हे माझ्या स्वतःच्या मताने गांधीवादाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. गांधीजींनी राष्ट्रसभेला स्वतःचे लोकसेवक संघात परिवर्तन अथवा रूपांतर करून घेण्याचा

जो आदेश दिला होता, तो विचारात घेतला, तर राज्ययंत्र आपल्या ताब्यात घेऊन त्याच्यामार्फत जनतेचे हित करण्याचा प्रयत्न करणे, हे गांधीवादी लोकसेवकांचे किंवा राष्ट्रसभेचे कार्य होऊ नये, असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय दिसून येतो. परंतु अशा सत्याग्रही वृत्तीने लोकसेवा करणाऱ्या संस्थेने अथवा व्यक्तीने केव्हाही कोणत्याच प्रकारे राजकारण करू नये, असाही त्यांचा वरील सूचना करण्यात आशय नव्हता.

## गांधीजी हे राजकीय अहिंसावादी

गांधीवादाची जी कल्पना माझ्या स्वतःच्या मनात आहे, त्या कल्पनेतून राजकारण हे पूर्णपणे केव्हाच वाळू शकत नाही. व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात जितकी अंगे व व्यवहार आहेत, त्या सर्व अंगात व व्यवहारात गांधीवादाचा संबंध येतो. अर्थात राजकारणाशीही गांधीवादाचा संबंध नेहमीच राहणार व राहिला पाहिजे. जोपर्यंत राज्य-संस्था आहे, तो पर्यंत राजकारण आहे. आणि जोपर्यंत सामाजिक व्यवहारात राजकारण आहे, तोपर्यंत गांधीवादी व्यक्ती अथवा संघ किंवा संस्था राजकारणनिवृत्त होऊ शकत नाहीत. मी तर असे मानतो की, केवळ अहिंसाधर्मांचे प्रणेते असे म्हटल्याने गांधीजींचे वैशिष्ट्य लक्षातच येऊ शकत नाही. ते अहिंसावादी होते, हे त्यांचे वैशिष्ट्य नसून, ते राजकीय अहिंसावादी होते, हे त्यांचे खरे वैशिष्ट्य होते. राजकीय व्यवहारात अहिंसा वृत्तीचा प्रभाव अधिकाधिक प्रमाणात कसा पडत जाईल, आणि राजकीय अहिंसेचा विकास एकसारखा कसा होत राहील याची जे काळजी वाहतात, त्या अहिंसेचा प्रभाव पाडण्यासाठी जे नित्य प्रयत्न करतात आणि जनतेची अंतःकरणे अनासक्त सेवेने व प्रेमाने वश करून जे जनतेला आपली मान्यता दूर करून घेण्याचे अहिंसेचे मार्ग दाखवून देतात व आचरून दाखवितात, त्यांनाच गांधीवादी म्हणता येईल. असे करताना राजकारणाशी संबंध येणे अपरिहार्य आहे.

स्वातंत्र्य प्राप्त होण्याच्या सुमारास अशी एक बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती की, गांधीजी हे १५ ऑगस्ट १९४७ नंतर राजकारणातून निवृत्त होणार, आणि पुढील आयुष्य केवळ सामाजिक, धार्मिक स्वरूपाचे कार्य करण्यात घालविणार. पण थोड्याच दिवसात स्वतः महात्मा गांधींनी "मी जिवंत असेपर्यंत माझे राजकारण केव्हाच संपणार नाही. फक्त देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्यानंतर माझ्या राजकारणाचे स्वरूप बदलेल" असे जाहीर करून या बातमीचा इन्कार केला. स्वतः गांधीजींच्या मताने गांधीवादी मनुष्य राजकारणातून केव्हाच सर्वस्वी निवृत्त होऊ शकत नाही. याचा अर्थ देशात जितके गांधीवादी असतील, त्यांपैकी प्रत्येकाने राजकारण हेच आपले नित्याचे कार्यक्षेत्र बनवावे, असा होऊ शकत नाही. याचा अर्थ इतकाच की जे गांधीवादी म्हणून घेतात त्यांना समष्टी रूपाने काही एक राजकारण असले पाहिजे. समष्टीरूप राजकारणात हा गांधीवादी संघ जितका प्रभाव पाडू शकेल, तितक्या प्रमाणात गांधीवाद जिवंत राहील व यशस्वी

होईल, असे मला वाटते. जर गांधीवादी संघाला अथवा त्यातील कोणाही व्यक्तीला देशातील राजकारणावर आपला प्रभाव पाडता आला नाही, तर गांधीवादाला काही भवितव्य आजच्या व्यवहारजगात राहील, असे मला वाटत नाही. थोडक्यात त्याच्या राजकीय प्रभावावर आणि राजकीय कर्तृत्वावर ते अवलंबून राहील, असे माझे मत आहे. जे स्वतःला गांधीवादी म्हणवितात त्यांनी आजच्या परिस्थितीत आपले राजकीय कार्यक्षेत्र कोणते अथवा एकंदर राजकीय कार्यकर्त्यांपैकी आपला विभाग कोणता, यासंबंधी निश्चित मत ठरविण्याची व तदनुरूप सामुदायिक निर्णय घेण्याची ही वेळ आहे.

## गांधीवाद व राज्ययंत्र

देशातील राजकारणासंबंधी आपला निर्णय घेताना देशातील राजकारणात जे निरनिराळे पक्ष आहेत, त्यांच्याशी आपला संबंध कसा राहणार, हे त्यांनी प्रथम ठरविले पाहिजे. लोकशाही राज्यात राज्यसत्ता न्याय्य मार्गांनी आपल्या हातात घेऊ पाहणारे अनेक पक्ष असणे अपरिहार्य व आवश्यक आहे हे ओळखून आपणास या अनेक पक्षांपैकी, कोणत्या पक्षाशी कितपत व कशा प्रकारचे संबंध ठेवता येतात, याचाही निर्णय घेतला पाहिजे. पण त्याचबरोबर राज्ययंत्र आपल्या हाती घेऊन त्याच्यामार्फत समाजाला विशिष्ट आकार देणे हे आपल्या अहिंसात्मतेशी विसंगत आहे, हे ओळखून गांधीवादी व्यक्तींनी अशापैकी कोणत्याही पक्षाचे सभासद होता कामा नये व आपली निष्ठा कोणत्याही पक्षास कायमची बहाल करता कामा नये. आजच्या मानवसमाजाच्या अवस्थेत राज्ययंत्राची आवश्यकता आहे. हे राज्ययंत्र कायमचे एका व्यक्तीच्या अथवा एका पक्षाच्या हातात देण्यापेक्षा निरनिराळे पक्ष व निरनिराळ्या व्यक्तींनी विशिष्ट मुदतीने मतदारांपुढे उभे राहून स्वतःस निवडून घ्यावे व या निवडणुकीत ज्या व्यक्ती वा जो पक्ष बहुसंख्येने निवडून येईल त्यांच्या हाती राज्ययंत्र जावे ही लोकशाही पद्धती म्हावाच्या व अहिंसेच्या कार्यास अधिकात अधिक उपकारक व पोषक आहे. हे खरे असले तरी अशा पद्धतीने राज्य चालले तरी ते अहिंसेने चालत नाही. त्यातील राज्यकर्त्यांना शांततेसाठी व न्याया-साठी अपरिहार्य असणारी हिंसा करणे भाग असते. म्हणून शांततेसाठी करावी लागणारी हिंसा किमान प्रमाणात कशी राहील एवढ्याच धोरणाने कोणत्याही अधिकारारूढ पक्षाला आपले कार्य चालवावे लागते.

## जगातील वाढती विषमता

देशातील प्रस्थापित आर्थिक व सामाजिक घटना जितक्या प्रमाणात विषमतामूलक असेल, तितक्या प्रमाणात तिचे संरक्षण करणाऱ्या व करू पाहणाऱ्या राज्यसंस्थेला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अधिक हिंसा करावी लागते. म्हणून ज्यावेळी एखादी सामाजिक व आर्थिक घटना तिच्यातील विषमतेमुळे मोडून पडू लागलेली असेल आणि तिच्याहून कमी हिंसक व कमी विषम सामाजिक घटना निर्माण करणे शक्य असेल, त्यावेळी जुन्या समाज घटनेला

सावकार धरणारी राज्यसंस्था अधिकात अधिक हिंसक बनत असते. आज जगातील सर्व राज्यातील सरकारांना यामुळेच अधिकात अधिक हिंसक स्वरूप प्राप्त होत आहे. दोन-तीनशे वर्षांपूर्वी युरोपात निर्माण झालेली भांडवलशाही आज जगातील सर्व राज्यात फुललेली आहे. या आर्थिक घटनेमुळे सामाजिक विषमता प्रत्येक ठिकाणी वाढत असून या घटनेखाली समाजाचा कोणत्याही प्रकारचा विकास यापुढे होण्याचा संभव उरलेला नाही. म्हणून तिच्यातून निर्माण होणाऱ्या रचना आज सर्वत्र कोसळून पडत आहे. पण बहुतेक देशातील सरकारे या भांडवलशाही आर्थिक घटनेस शक्य तो कोसळू न देता सुरक्षित व स्थिर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामुळेच जागतिक क्रांतीचे आणि महायुद्धाचे वातावरण शांत होऊ शकत नाही. गांधीवादाने अशा परिस्थितीत जर होऊ घातलेली सामाजिक क्रांती शांततेने कशी घडविता येईल, निदान त्यावेळी होणारी हिंसा किमान प्रमाणात कशी राहील, हे जगाला दाखवून दिले, आणि त्यासाठी लागणारी जनतेची शक्ती आपल्या देशात संघटित व प्रभावी बनविली, तरच गांधीवादाला या देशात व जगात उज्ज्वल भवितव्य आहे, असे म्हणता येईल.

## गांधीवाद्यांची मोठी चूक

आपल्या देशाचा विचार करून बोलावयाचे तर असे म्हणता येईल की, या देशात स्थापन होणारी पार्लमेंटरी लोकशाही शक्य तितक्या लवकर समाजवादी बनविण्यात गांधीवादी जर यशस्वी झाले तरच त्यांना जगापुढे आम्ही शांततामय क्रांतितत्त्व निर्माण केले आहे असे म्हणता येईल, आणि त्याचा परिणामही जगाच्या राजकारणावर होऊन तिसरे महायुद्ध टळेल आणि सर्व आशिया व युरोप येथे रक्तपाती क्रांती न होता लोकशाही समाजवादाची स्थापना होणे शक्य होईल. या दृष्टीने राष्ट्रसभेतून समाजवादी पक्षाला बाहेर पडावे लागू नये, आणि राष्ट्रसभा समाजवादी बनावी, असेच प्रयत्न तिच्यातील निष्ठावंत गांधीवाद्यांनी करावयास हवे होते. राष्ट्रसभा ही संस्था पूर्वी केव्हाही गांधीवादी नव्हती. ती आजही तशी नाही आणि यापुढेही होणे शक्य नाही. ही गोष्ट म. गांधींना समजलेली होती. सर्व राष्ट्रसभेला गांधीवादी नियंत्रणाखाली आणून तिच्या मार्फत मध्य-सरकारे व प्रांतिक सरकारे गांधीवादी तत्त्वानुसार चालविता येतील, असे जर कोणास वाटत असेल, किंवा वाटले असेल, तर तो एक त्या व्यक्तीचा गांधीवादासंबंधीचा अहंकार होय! प्रत्येक वादाला विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट मर्यादा असतात. त्या मर्यादा ओळखून त्या वादाच्या अभिमान्यांनी आपले कार्य करीत राहावे लागते. ज्यावेळी समाजाचे जे प्रश्न आपल्या तत्त्वानुसार सुटणे शक्य नाही त्यावेळी त्या क्षेत्रातून बाजूला सरून आपल्या तत्त्वाशी अधिक निकट असणाऱ्या पक्षाला ते कार्य करता येईल अशी परिस्थिती आपल्या वादाच्या मर्यादा ओळखणाऱ्यांनी निर्माण करून द्यावी लागते. म. गांधींनी पं. नेहरूंना हिंदुस्थानचे पंतप्रधान बनविले त्यातही त्यांची हीच दृष्टी असावी असे मला वाटते. अशाच धोरणाने

राष्ट्रसभेचे घटनायंत्र समाजवादी पक्षाच्या अथवा लोकांच्या हाती देण्यास राष्ट्रसभेतील गांधीवाद्यांनी शक्य ते यत्न करावयास हवे होते. पण त्यांच्या हातून असे घडले नाही, उलट राष्ट्रसभा ही एकपक्षीय सत्ताधारी संस्था बनावी आणि तिच्यातून समाजवादी पक्षास बाहेर पडणे भाग पडावे असेच धोरण राष्ट्रसभेतील स्वतंत्र गांधीवादी म्हणविणाऱ्या अथवा जनता ज्यांना गांधीवादी समजते अशा व्यक्तींनी स्वीकारले. माझ्या मते त्यांची ही फार मोठी चूक झाली.

राष्ट्रसभेच्या प्रमुख पुढाऱ्यांचे राष्ट्रवादी समाजवादी आणि गांधीवादी असे तीन गट होते. जोपर्यंत स्वातंत्र्याची प्राप्ती झालेली नव्हती, तोपर्यंत राष्ट्रसभेचे धोरण मुख्यतः राष्ट्रवादी रहाणे हेच योग्य होते व तसे ते राहिले. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर एकदम एक भिन्न परिस्थिती निर्माण झाली. या भिन्न परिस्थितीत राष्ट्रसभेला समाजवादी धोरण स्वीकारावे हा एक मार्ग होता. किंवा म. गांधींनी अखेरीस सुचविले त्याप्रमाणे देशातील राज्यतंत्र आपल्या हाती घेण्याचा विचार अजिबात सोडून देऊन, आपले रूपांतर एकदम सत्याग्रही लोकसेवासंघात करणे हा त्याहून अधिक श्रेष्ठ पण व्यवहारदृष्ट्या अधिक कठीण असा दुसरा मार्ग होता.

पहिला मार्ग स्वीकारण्याची गांधीवाद्यांची इच्छा नव्हती आणि दुसऱ्या मार्गाने जाण्याचा निर्धार करण्याइतकी राष्ट्रसभेची आत्मोन्नती झालेली नव्हती. कोणाही गांधीवाद्याला ते घडवून आणणे व्यवहार्य वाटले नाही व आज वाटत नाही. यामुळे यांपैकी कोणताही मार्ग न स्वीकारता अधांतरी लोंबणाऱ्या त्रिशंकूप्रमाणे आज राष्ट्रसभेची अवस्था झालेली आहे.

## राष्ट्रसभा – कालची व आजची

सर्वोदय समाज, रामराज्य अथवा आत्मराज्य हे गांधीवादाचे अंतिम ध्येय असले, तरी या ध्येयाहून भिन्न असे निकटवर्ती दुसरे ध्येय मान्य केल्यावाचून गांधीवादाचा राजकीय व्यवहार चालू शकत नाही. म. गांधी राष्ट्रसभेचे नेतृत्व करू लागले, तेव्हा त्यांनी आपले निकटवर्ती राजकीय ध्येय रामराज्य किंवा सत्ययुग हे नसून, पार्लमेंटरी पद्धतीचे लोकशाही स्वराज्य हेच आपल्या चळवळीचे निकट ध्येय आहे, असा स्पष्ट खुलासा केला. आज हे पार्लमेंटरी स्वराज्य हस्तगत झाले आहे. आता आपले निकट ध्येय काय ? याचा स्पष्ट निर्णय गांधीवाद्यांनी पुन्हा घेतला पाहिजे. केवळ सर्वोदयसमाज किंवा सत्ययुग हे आमचे अंतिम ध्येय आहे असे सांगून त्यांना कोणताही राजकीय व्यवहार करता येणार नाही. माझ्या मते लोकशाही समाजवाद हेच आपले ध्येय आहे असे राष्ट्रसभेकडून गांधीवाद्यांनी अधिकृतपणे मान्य करून घ्यावयास हवे होते आणि ज्यांना समाजवाद मान्य नाही त्यांना राष्ट्रसभेतून बाहेर जाण्यास सांगावयास हवे होते. पण सर्व गांधीवाद्यांना लोकशाही समाजवाद हेच आपले निकट ध्येय आहे, असे मान्य होत नाही आणि राष्ट्रसभापक्षाला संघटित

एकपक्षीय स्वरूप देण्यात आले असले तरी त्या पक्षातून समाजवादी नसणाऱ्या व्यक्तींना बाहेर जाणे भाग पडावे हेही त्यांना पटत नाही. वर्गहीन समाज हेच गांधीवाद्यांचेही ध्येय आहे, असा ठराव झाला तरी राष्ट्रसभापक्षाला समाजवादी संघटित पक्षाचे स्वरूप त्यामुळे प्राप्त होऊ शकत नाही. आजचा राष्ट्रसभापक्ष ही पूर्वीची काँग्रेस नव्हे, याचेही स्पष्टीकरण यापुढे गांधीवाद्यांनी जितके करावयास हवे तितके केलेले नाही. दादाभाई, टिळक, गांधी यांच्या काळातील काँग्रेस ही आजची काँग्रेस नव्हे, ही गोष्ट जनतेला व जगाला स्पष्ट झाली पाहिजे. आमच्या देशात लोकशाही समाजवाद स्थापन झाला पाहिजे. तो त्वरित स्थापन झाला पाहिजे. त्याच्या प्रस्थापनेसाठी सार्वत्रिक संप व सत्याग्रह अशा शांततेच्या मार्गांनी जाण्याचा हक्क देशातील शेतकरी व कामकरी वर्गाला आहे. "या हक्कांची बजावणी करण्याचे कार्य कसे करावे हे आम्ही तुम्हास दाखवून देतो आणि तुम्ही जर आमच्यामागून आलात तर इतर कोणत्याही देशापेक्षा अधिक लवकर आम्ही तुम्हास समाजवाद स्थापन करून दाखवू" असा आपल्यासंबंधीचा विश्वास ज्यावेळी गांधीवादी लोक देशातील शेतकरी-कामकरी वर्गांत निर्माण करतील, त्या दिवशी आपल्या देशात गांधीवादाचे भवितव्य सुरक्षित झाले असे म्हणता येईल.

## गांधीवादी व समाजवादी

थोडक्यात सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, गांधीवाद्यांनी काँग्रेसपक्षासंबंधीचे आपले पूर्वीचे ममत्व थोडे कमी केले पाहिजे आणि आजच्या परिस्थितीत कोणत्याही पक्षाला गांधीतत्त्वानुसार राज्य चालविता येईल हा अहंकारही सोडला पाहिजे. आज देशाचा राज्यकारभार समाजवादी धोरणाने व निष्ठेने चालविणारा पक्षच देशात अधिकात अधिक अहिंसेचे वातावरण ठेवू शकेल, हे ओळखून गांधीवाद्यांनी देशातील राज्ययंत्र समाजवादी निष्ठेच्या व धोरणाच्या लोकांच्या हाती जाईल याबद्दल प्रयत्न केले पाहिजेत. ते तसे केल्यानंतर त्या पक्षाने आपली एकपक्षीय हुकूमशाही निर्माण करू नये एवढी दक्षता त्यांनी घेतली पाहिजे. जर त्यांनी समाजवादी निष्ठावंतांना राज्ययंत्रावर आरूढ होण्यास मनापासून सहाय्य केले, तर पुढील कार्य करण्यात त्यांना निश्चित यश येईल. पण याच्या उलट त्यांनी कोणत्याही ममत्वास अथवा अहंकारास बळी पडून देशातील समाजवादी पक्षास उखडून टाकण्यास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहाय्य केले, तर गांधीवादाचे निकटवर्ती भवितव्य बरेच संशयित ठरणार आहे, अशी मला भीती वाटते. मी जे राजकीय कार्य गांधीवाद्यांकडून अपेक्षितो ते कदाचित समाजवादी पक्षच आपल्या बळावर करील. असे होईल तर गांधीवादाचे भवितव्य त्यानेच सुरक्षित केले, असे इतिहासात नमूद होईल. मला ही घटना पहिल्या घटनेपेक्षा कमी संभवनीय वाटत नाही. कदाचित तीच अधिक संभवनीय ठरणे शक्य आहे.

[नवभारत, मार्च १९५१, पृ. ४८० ते ४८४]

## १८

# समाजवाद आणि अध्यात्म

अध्यात्म व समाजवाद या विषयाचे औत्सुक्य माझे मनात फार दिवसांपासून आहे. आपल्याकडे काही लोकांत असा एक गैरसमज आहे की समाजवाद व अध्यात्म यामध्ये कोणत्याही प्रकारची सुसंगती नाही, त्यांचे सूत कधीही जमणार नाही. परंतु मला तसे वाटत नाही. उलट माझा असा विश्वास आहे की ज्या लोकांना सबंध मानवजातीत आध्यात्मिक संस्कृती वाढवायची आहे, त्यांनी आजच्या परिस्थितीत समाजवादाचा सक्रिय पुरस्कार नि अंगीकार केला पाहिजे.

आज आपला देश स्वतंत्र आहे. जगातील इतर राष्ट्रांमध्ये सन्मानाने व बरोबरीने आपले राष्ट्र बसू लागले आहे. जगातील व्यवहार करण्याची आकांक्षा आम्ही धरू लागलो आहोत. सुसंस्कृत राष्ट्रांच्या बरोबरीने त्यांना सहाय्य करण्याचे दृष्टीने पुढे पाऊल टाकण्याचे सामर्थ्य आमच्यापाशी आहे, तशा प्रकारची सामुग्रीही आमच्यापाशी आहे. अर्थात ही सामुग्री भौतिक नाही हे निश्चित. आमचा देश भौतिक दृष्टीने संपन्न होण्याची, सुवर्णभूमी पुनरपि बनण्याची ताकद आमच्यापाशी आहे. पण आमची आजची भौतिक साधने कमकुवत आहेत. आज भौतिक साधनसामुग्रीच्या दृष्टीने आम्ही दरिद्री आहोत. परंतु, त्याचबरोबर सांस्कृतिक व नैतिक दृष्टीने आमच्यामध्ये आकांक्षा निर्माण झाल्या आहेत. आमच्यापाशी श्रेष्ठ संस्कृती व नीती आहे. या पायावर आम्ही राष्ट्राची इमारत उभारू, विश्वात संस्कृतीचे, मानवतेचे मनोहर मंदिर निर्मू. प्राप्त स्वातंत्र्याची सोभाद्र अशी आशा आम्ही बाळगीत आहोत व जगही आमच्यापासून तशी अपेक्षा करीत आहे. आध्यात्मिक ठेवा हे आमचे अधिष्ठान आहे. त्यामुळे कोणताही नवा विचार करताना आम्हाला वैभव, सत्ता प्राप्त होईल की नाही, यापेक्षा माझ्या आत्म्याचा विकास होईल की नाही हा प्रश्न आमच्यापुढे उभा राहतो. आत्मविकासाची ही भूक भारतीयांच्या अंतःकरणात दीर्घ परंपरेने सदैव जागत असते. आणि माझा असा विश्वास आहे की

प्रत्येक मानवी मनामध्ये अशा प्रकारचा प्रश्न निर्माण होत असतो, जागृत होत असतो. कर्तव्याकर्तव्याचा निर्णय करताना माझे आत्मिक कल्याण होईल की नाही हा विचार काही आधुनिक विचारवंताना कुनाड वाटतो त्यांना अध्यात्म, आत्मिक कल्याण, मोक्ष-कल्पना या गोष्टी घातक वाटतात. टाकाऊ वाटतात. भौतिक सुखापलीकडे जाऊन अध्यात्माचा विचार करणे त्यांना आवश्यक वाटत नाही. पण माझ्या मते ही गोष्ट चूक आहे. हा जो वैचारिक गोंधळ आहे, तो भौतिकवाद्यांनी माजवलेल्या काहुरात नसून अध्यात्मवाद्यांच्या विकृत कल्पनांत आहे. प्रत्येकाच्या मनात जीवनसाफल्याची प्रेरणा असतेच. मग या आत्मिक प्रेरणेबाबत गैरसमज का ? याला अध्यात्मवादी कारणीभूत आहेत. सुखाचा विचार करता करता आत्मिक सुखावर ते जोर देत आले. परंतु आत्मिक सुखाचा विचार करणाऱ्यांनी सामाजिक सुखाचा विचार सोडून दिला. आणि म्हणून अध्यात्म हे दूर नेणारे, गुहेत कोंडणारे शास्त्र आहे अशी निंदा होऊ लागली. परंतु सुदैवाने अशा प्रकारचा विचार चुकीचा आहे, असे आता आम्हास वाटू लागले आहे. आणि त्याच दृष्टीने आम्ही अध्यात्माचा विचार करू लागलो आहे. आम्हाला राजकीय व भौतिक लढ्यामध्ये पडण्याची प्रेरणा अध्यात्माला प्राधान्य देणाऱ्या लोकांनीच दिली व त्या आध्यात्मिक प्रेरणेच्या बळावर आम्ही देश स्वतंत्र केला. ती प्रेरणा पूर्णपणे जागृत झाली आहे असे नाही. पण ज्यांनी मार्गदर्शन केले होते त्यांना त्या प्रेरणेचे संपूर्ण दर्शन झाले होते. या अध्यात्मातून नवी संस्कृती निर्माण करता येईल ही आशा ज्यांनी निर्माण केली त्यांच्यापैकी महात्मा गांधी हे आज सर्व जगात वंद्य ठरले आहेत.

राजकीय लढ्यात या प्रेरणेने महान कार्य झाले. परंतु तेवढ्याने भागणार नाही. आज जगात इतरत्र जी क्रांती होत आहे ती ही येथे झाल्याखेरीज आपले स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण होणार नाही तर ते टिकणारही नाही. म्हणून ज्या आध्यात्मिक प्रेरणेने आपण स्वातंत्र्य मिळविले तिच्याच आधारावर अधिष्ठित अशी समाजवादी क्रांतीही घडवून आणणे आवश्यक आहे. समाजवाद आजचा युगधर्म आहे. त्याच्याकडे आपण अध्यात्म दृष्टीने पाहणे चूक नाही. ज्यावेळी आम्ही विपन्न होतो, दुबळे गुलाम होतो, त्यावेळीही जर स्वतंत्र होण्यासाठी आध्यात्मिक प्रेरणेचा उपयोग होऊ शकला तर त्याच प्रेरणेचा उपयोग आता या स्वतंत्र देशातील आर्थिक वगैरे झगडे सोडविताना होईल की नाही ते पाहणे आवश्यक आहे. राष्ट्रात अडचणी आल्या, संघर्ष झाले तर आध्यात्मिक प्रेरणेचा विचार करावा अशी आपली परंपरा आहे. भगवद्गीतेत युद्ध चालू असताना आत्मिक विकासाचा प्रश्न उभा केला आहे. युद्धाचा विचार करताना अध्यात्माचा विचार हेच तर गीतेचे वैशिष्ट्य. स्वातंत्र्याचा संग्राम चालू असताना ज्या प्रेरणांचा, साधनांचा उपयोग झाला, त्यांचा उपयोग स्वातंत्र्योत्तर इतर समस्या सोडविण्यासाठीही होईल असे थोर विचारवंतांना वाटत आहे.

समाजवादाच्या आध्यात्मिक दृष्टीने विचार करून सुसंगत असा समाजवाद निर्माण करता येईल की नाही? समाजवादाची मूलतत्त्वे नि अध्यात्माची मूलतत्त्वे यांच्यात विरोध आहे की काय याचा विचार करायला हवा. हिंदुस्थानच्या राजकारणात म. गांधी येण्यापूर्वी आमच्या ज्या आध्यात्मिक कल्पना होत्या व आता ज्या आहेत, यात फार मोठा बदल घडून आला आहे. आमच्याच नव्हे तर जगाच्याही आध्यात्मिक विचारात गांधीजींच्या राजकारणप्रवेशामुळे फरक झाला आहे. अध्यात्म हे राजकीय व सामाजिक क्रांतीला उपयोगी पडते, त्याच बळाने समाजाच्या बाह्यांगाबरोबर अंतरंगातही क्रांती घडवून आणणे शक्य आहे. ही कल्पना म. गांधींच्या पूर्वी आम्हास नव्हती. अध्यात्म म्हणजे काहीतरी गहन गूढ आहे, हे गूढत्व म्हणजेच अध्यात्मवादाचे वैशिष्ट्य अशी चुकीची कल्पना आमची होती. गांधीजींनी हा विचार साफ बदलविला. आत्मिक प्रेरणेचा उपयोग सामाजिक परिवर्तनासाठी कसा करता येतो, हे गांधींनी स्पष्ट करून दाखविले.

## विश्वकुटुंबवृत्ती

समाजवादी क्रांतीचा मूलभूत विचार व आध्यात्मिक क्रांतीचा मूलभूत विचार यांत विरोध नसून एक प्रकारचे आंतरिक साधर्म्य आहे. आपण कुटुंबात जी नीती वापरतो, त्याच नीतीचा अवलंब करून मानवजातीचे प्रश्न सोडवावेत अशी म. गांधी यांची शिकवण आहे. ही नैतिक शक्ती सत्याची व अहिंसेची असते असे ते मानीत. ही शक्ती वापरताना मी प्रेम करीत असतो. झगडतानाही ज्याच्याविरुद्ध झगडायचे त्याच्यावर प्रेम करणे ही एक नीती आहे. सत्यासाठी आईबापांजवळही असहकार केला पाहिजे. पण तसे करताना त्यांचे व माझे हित एकच आहे अशी दृढतर श्रद्धा माझी असायला हवी. कुटुंबात सुधारणा व्हावी म्हणून ज्या नीतीचा मी अवलंब करतो त्याच नीतीच्या साहाय्याने मी समाजही सुधारू लागलो तर समाजातही क्रांती घडविता येईल. कौटुंबिक नीती समाजाला लावणे हे सत्याग्रहाचे मूलतत्त्व आहे. अखिल मानवजात म्हणजे एक कुटुंब आहे. या कुटुंबातील सर्व व्यवहार सुधारायचे असतील तर सत्याग्रहाचाच अंगीकार केला पाहिजे.

समाजवादाच्या दृष्टीनेही हाच विचार पुढे येतो. समाजवाद म्हणजे समाजाची रचना कशी असावी याचे शास्त्र. हे राज्यघटनेचे व अर्थघटनेचे शास्त्र आहे. समाजवादासंबंधी विचार करताना अर्थघटना कशी असावी, राज्यघटना कशी असावी याचा विचार करावा लागतो.

समाजवादी समाजरचनेत कौटुंबिक नीतीच अभिप्रेत आहे. हिंदु कुटुंबातील संपत्ती ही समाईक आहे. केवळ एका व्यक्तीची नाही. एकत्र कुटुंबातील सामुदायिक संपत्तीची भावना समाजजीवनात आणणे म्हणजेच समाजवादाचा प्रयत्न होय. सामुदायिक संपत्तीत

भर घालणे, तिचा सामाईकपणे उपभोग घेणे अशा तऱ्हेची रचना कशी घडविता येईल, अर्थकारणात अशा तऱ्हेचे बदल कसे करता येतील, यासंबधीचे शास्त्र म्हणजेच समाजवाद.

## शासनसंस्थेचा जन्म

परंतु एकत्र कुटुंबपद्धती मोडकळीस का आली ? तिच्यात सामाईक मालकीचे तत्त्व होते. परंतु कुटुंबाच्या सामाईक संपत्तीत भर घालण्यासाठी सुदृढ व बुद्धिमान अशी कुटुंबातील माणसे श्रम करेनाशी झाली. हा दोष वाढतच गेला. तेव्हा श्रम करणाऱ्यात व श्रम न करणाऱ्यात थोडा भेदाभेद केल्यावाचून भर घडण्याचे कार्य चालणार नाही म्हणून वैयक्तिक मालमत्तेचा विचार पुढे आला. सामाईक संपत्तीची वाटणी करताना व्यक्ती श्रम करते की नाही हे पाहणे आवश्यक झाले. हा विचार केला तरच समाज चालेल. समाजघटनेचा विचार करताना जे लोक उद्योग करीत नाहीत पण उपभोग मात्र घेतात त्यांच्याबद्दल विचार करावा लागतो. जे पंगू, अशक्त असतील त्यांना विनाश्रम उपभोग घेऊ द्यावा पण जे सुदृढ आहेत त्यांनी श्रम करायला हवे. एकाने श्रमाने संपत्ती निर्मिली ती जर दुसरा हिरावून घेईल तर त्याचे परिपत्य करणे अवश्य आहे. आळस व चोरी यांच्यावर उपाय हवाच. त्याशिवाय समाजरचना अशक्य आहे. चोरीचे परिपत्य करणे, आळश्यांना कार्यप्रवृत्त करणे यासाठी थोडी सक्ती व विषमता आली तरी हरकत नाही असा विचार पुढे आला. यातून स्मृतिशास्त्र निर्माण झाले. या धर्मशास्त्राला वाटू लागले की समाजाला निग्रह पाहिजे. कार्यप्रवण करण्यासाठी लोभ व चोराला सुधारण्यासाठी भीती असा वास्तववादी विचार धर्मालासुद्धा करावा लागला. हा मार्ग शुद्ध आध्यात्मिक आत्मकल्याचा नाही हे त्यांना कबूल होते. परंतु वास्तववादी दृष्टीने जीविताचा नि वित्ताचा अपहार होऊ नये म्हणून दंडधारी शासनसंस्था असावी असा विचार स्मृतिशास्त्रज्ञांनी केला. निग्रह, अनुग्रह, उभयविध कार्य करणारी राज्यसंस्था अस्तित्वात आली.

स्मृतिकारांनी व्यवहारी दृष्टीने समतेच्या ज्या मर्यादा सांगितल्या त्या त्रिकालाबाधित आहेत असे मानणे चूक आहे. त्या मर्यादा एकेकाळी समर्थनीय असतील. परिस्थितीच्या दडपणामुळे अहिंसेला व समतेला त्या मर्यादा घातल्या गेल्या. त्या मर्यादांमुळेच चातुर्वर्ण्य पद्धतीची विषम घडण झाली. परंतु त्या मर्यादा त्रिकालाबाधित नाहीत. त्या उल्लंघण्याचा काळ आता आला आहे.

पूर्वी परशुरामाने सारा समाज निःक्षत्रिय केला. आजचा काल सारा समाज निःशूद्र करण्याचा आहे. शूद्र कोणी नाही असा समाज निर्माण करणे आज अवश्य आहे. केवळ त्रैवर्णिक समाज असावा, शूद्र म्हणून कोणी नसावेत ही जुनी भाषा हा मुद्दा एक समाजवादच आहे. शेतकरी कामकरी राज्यातच शूद्र वर्ग नाहीसा होणार आहे. शूद्रांच्या हाती राजसत्ता ज्या दिवशी जाईल त्या दिवशी विषमता व शूद्र वर्ग नाहीसा होईल. त्रैवर्णिक

समाजाहून एकवर्ण समाज ही पुढची पायरी आहे. आजचे युग शूद्र राज्याचे असले पाहिजे. शूद्र म्हणजे सत्ता, संपत्ती, संस्कृती यांपासून वंचित ठेवलेला, दुरावलेला वर्ग. हा वर्ग ग्रीकांत होता, मुसलमानांत होता. हा वर्ग आता नको. प्लेटोचे चातुर्वर्ण्य, गीतेचे चातुर्वर्ण्य, मध्ययुगीन चातुर्वर्ण्य नष्ट झाले पाहिजे. अथेन्समधील शास्त्रकार व आमचे स्मृतिकार समजत होते की, शूद्राशिवाय समाज चालणार नाही. पण आता काळ असा येत आहे की आजची भौतिक साधने वाढल्यामुळे समाजधारणेसाठी शूद्रवर्गाची गरज नाही. आजचे हिंदुकोडबिल सुद्धा आध्यात्मिक संस्कृतीला मूर्त स्वरूप देऊन ही क्रांती करण्याचाच एक प्रयत्न आहे. पण केवळ राजकीय लोकशाहीने सामाजिक क्रांती पुरी होऊ शकत नाही. संपत्ती समाजाची बनली पाहिजे. कार्ल मार्क्सने सांगितले की संपत्ती सर्वांसाठी, संस्कृती सर्वांसाठी हवी. एक-वर्ग समाज निर्माण करण्यासाठी शासनसंस्था हवी. परंतु ह्या शासनसंस्थेमार्फत होणारी हिंसाही कशी काढून टाकता येईल हा आपली पुढचा एक प्रश्न आहे. ज्याप्रमाणे शूद्र नसावेत त्याप्रमाणे क्षत्रियही नसावेत. शासनसंस्थेशिवाय समाज सुरळीत चालावा. केवळ आत्मबळाने चालणारी समाजव्यवस्था उभी रहावी असे टॉलस्टॉय, म. गांधी यांना वाटत होते. गीतेत श्रमविभागणीचे तत्त्व सांगितलेले आहे. आपापले कर्म करून सर्वांना मोक्ष मिळावयास हवा. सिद्धी मिळायला हवी. समाजवादाचा आर्थिक प्रश्न केवळ पोटापाण्याचा नाही. तो नीतीचा, मोक्षाचा अध्यात्माचाही आहे. आर्थिक व्यवहारात हे अध्यात्म दिसू शकते की नाही असा मार्क्सने प्रश्न मांडला आहे. तो म्हणतो, आर्थिक व्यवहारात विश्व-बंधुत्वाचे नाते कितपत पाळले जात आहे, या कसोटीवरूनच तुम्ही सुसंस्कृत की असंस्कृत हे ठरवायला हवे. हा आर्थिक व्यवहार सर्व जीवनास आधारभूत आहे. अर्थकल्पना म्हणजे केवळ पैसे मिळविण्याची प्रेरणा नव्हे. जी आर्थिक नीती विषमतेवर, मालकी हक्कावर, आळसावर आधारलेली आहे ती सुधारल्यावाचून गत्यंतर नाही. फार पूर्वीची छोटी चोरी आज फार मोठी झाली आहे.

आजच्या अर्थशास्त्राचे अधिष्ठान चोरी आहे. या चोरीचे पारिपत्य करण्यासाठी शासनसंस्थेने या कायदेशीर चोरांना बंदी केली पाहिजे. आजचा म्हणजे खासगी मालमत्तेचा कायदा बदलला पाहिजे. जी शासनसंस्था आपल्या दंडशक्तीचा उपयोग या चोरींचे पारिपत्य करण्यासाठी करीत नाही तिला नैतिक अधिष्ठान मिळू शकत नाही. परंतु ते निर्माण केल्यावाचून सुटका नाही. म. गांधींनी सांगितले की, राज्यसंस्थेला नैतिक अधिष्ठान नसेल तर तिच्याशी संघटित असहकार केला पाहिजे आणि हा असहकार जर अहिंसक राहिला तर शासनसंस्थेला सुद्धा दंडशक्तीचा उपयोग करावा लागू नये, अशी समाजरचना निर्माण होऊ शकेल. परंतु समाजात जोवर कायदेशीर चोरी चालू आहे, वर्ग-संघर्ष चालू आहे, तोवर तो वर्गसंघर्ष नाही असे समजून चालणार नाही. तो आहेच. तो कसा मिटवावा यासाठी आध्यात्मिक दृष्टीचा उपयोग होईल.

हा वर्गविग्रह नष्ट करावयासच हवा. विकोपाला पोचलेल्या वर्गविग्रहाचे निरसन करण्यासाठी समाजवाद्यांनी क्रांतिशास्त्र निर्माण केले. या समाजवादात दोन प्रकार आहेत. इंग्लंड, अमेरिकेचा समाजवाद पार्लमेंटरी मार्गाने येतो, रशियातील एकपक्षीय हुकूमशाहीने येतो. हिंदुस्थानातही समाजवाद आणायचा हवा आहे. पण या दोहोंकडून भिन्न अशा मार्गाने तो आणायचा आहे. तो मार्ग म्हणजे म. गांधींचा सत्याग्रही मार्ग. हा मार्ग अवलंबू तरच समाजवादाला आध्यात्मिक अधिष्ठान मिळू शकेल. समाजवादाचा इतिहास अजून पुरा झालेला नाही. त्याची व्याख्या अजून अपूर्ण आहे. त्याचा पुढील इतिहास हिंदुस्थानात घडणार आहे. मग समाजवादाची व्याख्याही बदलेल. या आध्यात्मिक समाजवादाचे स्वरूप आज अव्यक्त आहे. ते व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे. इंग्लंड, अमेरिकेचा केवळ सनदशीर मार्ग, रशियाचा एकपक्षीय हुकूमशाही मार्ग, दोन्ही अपुरे पडले आहेत. तेव्हा आमचा स्वतंत्र मार्ग स्वतःच्या बुद्धीने शोधून, त्याला आध्यात्मिक अधिष्ठान देऊन तो मार्ग यशस्वी करून दाखवू अशी आमची ईर्षा आहे आणि ही ईर्षा, हा आत्मविश्वास याचे श्रेय म. गांधींनी दिलेल्या प्रेरणेला आहे.

[*साधना, १४ जानेवारी १९५०, पृ. ८-९*]

[ प्रस्तुत लेख कोल्हापूरच्या नॅशनल युनियन ऑफ स्टुडंटस् या विद्यार्थी संघटनेने आयोजित केलेल्या शिबिर व्याख्यानमालेतील आचार्यांच्या भाषणावर आधारित असून आचार्यांनीच तो लेखरूपाने लिहिला आहे.]

## १९

# क्रांतिकारक धर्मपुरुष महात्मा गांधी

सत्याग्रह निष्ठा हा आधुनिक मानवाचा धर्म आहे. त्याच्या आश्रयाने बुद्धिस्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचे शुद्धीकरण होईल. बुद्धिस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा उपभोग स्वार्थसंपादन आणि धनसंग्रह यांच्या कामी होऊ लागल्याने ती तत्त्वेही भ्रष्ट झालेली आहेत. स्वार्थ आणि संग्रह यांच्यातून मुक्त होऊन बुद्धी अव्यभिचारी सत्यनिष्ठेचा आश्रय करील आणि सामाजिक संस्थापनेसाठी स्वार्थमूलक व संग्रह-प्रधान समाजरचनेविरुद्ध क्रांती करण्यास प्रवृत्त होईल, तेव्हाच ही तत्त्वे शुद्ध बनून माणसाच्या सर्वांगीण अभ्युदयास प्रेरक बनू शकतील. बुद्धिस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही व समाजवाद या आधुनिक युगात निर्माण झालेल्या तत्त्वांचे शुद्धीकरण करून मानवी उद्धाराचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य गांधीजींच्या सत्याग्रहाच्या संदेशात आहे.

गांधीजी धर्मपुरुष होते आणि क्रांतिकारकही होते. धर्मभावना आणि क्रांतिकारक वृत्ती या दोहोंचे साहचर्य भारतात गौतम बुद्ध व महावीर यांच्या काळानंतर प्रकट झालेले दिसत नाही. भारतीय संस्कृतीत सामाजिक क्रांतीच्या आवश्यकतेची जाणीव गेल्या दोन अडीच हजार वर्षांत तरी समाजव्यापी प्रभाव पाडीत असल्याचे आढळत नाही. म. गांधींच्या जीवनात सामाजिक क्रांतीची प्रेरणा धर्मनिष्ठेच्या रूपाने प्रकट झालेली आढळते. भारतीय संस्कृतीतून नष्ट झालेली क्रांतिकारक धर्मप्रेरणा गांधीजींनी पुन्हा प्रज्वलित केली हे त्यांचे भारतीय संस्कृतीच्या इतिहासातील महान कार्य होय. या त्यांच्या महान कार्यामुळे आधुनिक भारतात सर्वांगीण क्रांतीची प्रेरणा जागृत झाली. इतकेच नाही तर ती क्रांतिकारक प्रेरणा युरोपात आधुनिक काळात निर्माण झालेल्या क्रांतिकारक प्रेरणेहून अधिक प्रभावी बनू लागली आहे.

या क्रांतिकारक धर्मप्रेरणेला गांधीजींनी सत्याग्रह असे नाव दिले असून सर्वोदय हे त्याचे फळ आहे. गांधीजींच्या हयातीत ही प्रेरणा प्रायः राजकीय क्रांतीच्या स्वरूपात

प्रकट होऊन तिने भारताला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. आज ती प्रेरणा सामाजिक व आर्थिक क्रांतीच्या रूपाने प्रकट होऊ लागली आहे. म. गांधीजींच्या सत्याग्रहाचा हा प्रभाव पाहून भारतीय समाजवाद्यांनी ती प्रेरणा आत्मसात करण्याचा प्रयत्न चालविला असून येथील समाजवाद सत्याग्रही स्वरूप धारण करू लागला आहे. मात्र मार्क्सवाद हेच सामाजिक क्रांतीचे पूर्ण शास्त्र आहे व त्यात कोणतीही सुधारणा करणे शक्य नाही असा ज्यांच्या बुद्धीचा ठाम निर्णय झालेला आहे त्यांना अद्यापिही गांधीवाद ही एक प्रतिक्रांतिकारक वस्तु असून धर्म ही नेहमी अफूच्या गोळीसारखीच मानवाला कर्तव्यापासून पराङ्मुख करणारी व गुंगी आणणारी चीज आहे असे वाटत आले आहे. म. गांधींचे समग्र जीवनकार्य अवलोकन केल्यानंतरही ज्यांची ही मार्क्सवादी श्रद्धा कायम टिकली असेल त्यांची ती श्रद्धा विचलित करण्याचे सामर्थ्य कोणत्याही मानवी बुद्धीत येणे शक्य नाही. तेव्हा या श्रद्धावंतांना वगळूनच भारतीयांनी म. गांधींच्या जीवन संदेशाचा विचार व आचार करीत राहिले पाहिजे. या दृष्टीने गांधीजींच्या जीवनात धर्मनिष्ठेने व आत्मप्रेरणेने जे क्रांतिकारक स्वरूप धारण केले होते त्याचा थोडा अधिक विचार करू.

## सत्यनिष्ठा आणि आत्मप्रामाण्य

गांधीजींच्या जीवनात धर्मनिष्ठेला जे क्रांतिकारक स्वरूप लाभले होते त्याचा उगम शोधू लागल्यास तो त्यांच्या जीवनातील उपजत सत्यनिष्ठेत व आत्मप्रामाण्यवृत्तीत दिसून येईल. गांधींच्या जीवनदर्शनात सत्यनिष्ठेला आद्य स्थान दिलेले आहे. अनेक साधु-पुरुषांनी अहिंसा, सत्य इत्यादी गांधीजींनी उपदेशिलेल्या तत्त्वांना आपल्या जीवनात साकार करून धर्मसंशोधन केलेले असले तरी त्यांनी प्रायः अहिंसेला प्रथम स्थान दिल्याचेच आढळून येईल. त्यांना प्रेम हेच सर्वश्रेष्ठ ईश्वररूप प्रतीत होत होते. गांधीजींना सत्य हेच परमेश्वराचे सर्वश्रेष्ठ स्वरूप दिसत असे. परमेश्वर सत्यस्वरूप आहे ही भाषाही सोडून देऊन सत्य म्हणजेच परमेश्वर अशी भाषा त्यांनी रूढ केली. त्यांनी आपल्या जीवननिष्ठेला नावही सत्याग्रह असेच दिले. सत्यसंशोधन, सत्य-आचरण आणि सत्य-संस्थापन हीच मानवाची जीवननिष्ठा होय असे ते उपदेशितात. जे सत्याला सर्व समर्पण करण्यास तयार आहेत तेच खरे मानव अथवा मुक्तमानव अशी त्यांची निष्ठा सांगता येईल.

ज्याने सत्यनिष्ठा स्वीकारली तो स्वतःस अनीश्वरवादी असे म्हणवीत असला आणि त्याच्या दृष्टीने ते प्रामाणिकपणे असले तर मी त्यालाही ईश्वराचा भक्तच म्हणेन. कारण सत्य हाच माझा ईश्वर आहे असे गांधीजी म्हणत असत. अनीश्वरवादी मनुष्यही सत्यनिष्ठेसाठीच अनीश्वरवादाचा आग्रह धरीत आहे असे येथे गृहीत धरले आहे. म. गांधींनी सत्यनिष्ठेला असे अंतिम स्थान दिल्यामुळे त्यांची धर्मनिष्ठा कोणत्याही विशिष्ट सिद्धांतांनी जखडली गेली नव्हती. व म्हणूनच तिला क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झाले. त्यांच्या जीवननिष्ठेत केवळ विशुद्ध सत्यनिष्ठेहून अन्य कोणत्याही सिद्धांतावर श्रद्धा ठेवण्याचा आग्रह

धरलेला नाही. अशी ही सत्यनिष्ठा आधुनिक मानवाच्या शास्त्रीय वृत्तीस अनुकूल असल्यामुळे तिला मानवधर्माचे स्वरूप प्राप्त होण्यास कोणतीही अडचण नाही. आपल्या जीवनात सत्यनिष्ठेला आद्य स्थान देणे हाच प्रत्येक मानवाचा सर्वश्रेष्ठ धर्म आहे याबद्दल मतभेद होण्याचे मुळीच कारण नाही.

पण या सत्यनिष्ठेइतकीच आत्मप्रामाण्यवृत्ती सत्याग्रही तत्त्वज्ञानात पूज्य मानिली गेली पाहिजे. सत्यनिष्ठेला जीवनात अग्रस्थान देऊनही ते सत्य विशिष्ट ग्रंथात किंवा विशिष्ट सिद्धांतात कायम व पूर्ण रूपाने प्रकट झालेले आहे अशी श्रद्धा धारण केल्यास सत्याग्रहाचे क्रांतिकारक स्वरूप नष्ट होते. शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य ही सत्यनिर्णयाची अंतिम कसोटी नसून आत्मप्रामाण्य हीच सत्याची अंतिम कसोटी आहे. ही निष्ठाच सत्याग्रहाला क्रांतिकारक स्वरूप देऊ शकते. गांधींच्या जीवनात सत्यनिष्ठेइतकीच आत्मप्रामाण्यवृत्ती मुरलेली होती, म्हणूनच ते आधुनिक जगातील क्रांतिकारकांचे मुकुटमणी होऊ शकले. प्राचीन काळातील अवतारी गणलेले धर्मपुरुषही त्यामुळेच क्रांतिकारक कार्य आपापल्या काळात करून गेले. मध्ययुगीन संस्कृतीत ही आत्मप्रामाण्यवृत्ती लोप पावली होती आणि तीच आत्मप्रामाण्य-वृत्ती पुन्हा जागृत झाल्यामुळे आधुनिक युगातील संस्कृती तिच्यापुढे जाऊ शकली.

पण विश्वातील व जीवनातील अंतिम सत्याचा शोध ज्यांना करावयाचा असेल, त्यांना केवळ बुद्धिप्रामाण्य पुरे पडत नाही, असे म. गांधी मानीत असत. अनुभवाच्या आधारा-वाचून बुद्धी केवळ तर्कवश होऊन आपले कार्य करू लागेल तर ती तर्कांची जाळी विणता विणता भ्रमाच्या भोवऱ्यात गुंतून पडते आणि तिला असत्यही सत्य भासू लागते. म्हणून बुद्धीने काढलेले निष्कर्ष अनुभवांनी पडताळून पाहिले पाहिजेत. ही गोष्ट आधुनिक जगात भौतिक विद्येच्या उपासकांनी प्रथम मान्य केली आणि तेव्हापासूनच भौतिक शास्त्रांची प्रगती झपाट्याने होऊन त्या विचारांचा प्रभाव सामाजिक जीवनावर व मानव संस्कृतीवर अधिकाधिक पडू लागला. भौतिकशास्त्रीय संस्कृतीने बुद्धिप्रामाण्याला आद्यस्थान देण्याची वृत्ती मानव समाजात निर्माण केली आणि बुद्धिप्रामाण्य ही एक आधुनिक मानवाची विशिष्ट निष्ठा म्हणून पुढे आली.

भौतिकशास्त्रांची प्रगती केवळ बुद्धिप्रामाण्यावर अवलंबून आहे हे मत थोडासा घोटाळा निर्माण करणारे आहे. भौतिक शास्त्रात जी बुद्धी प्रमाणभूत मानली जाते ती केवळ तर्कशुद्ध बुद्धी नसून ती अनुभवाधिष्ठित तर्कशुद्ध बुद्धी आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. भौतिक शास्त्रात तर्क आणि अनुभव या दोनही साधनांचा उपयोग करूनच सत्याचे संशोधन करावे लागते. अर्थात शास्त्रीय बुद्धिप्रामाण्य तर्क आणि अनुभव या दोहोंचाही समावेश करणारेच असले पाहिजे हे मत भौतिक शास्त्रज्ञानांही मान्य होण्यासारखे आहे. मात्र अनुभव या शब्दात भौतिक शास्त्रज्ञ केवळ इंद्रियगम्य अनुभवांचाच समावेश करीत असतात. पण मानवाला येणारे अनुभव हे केवळ इंद्रियगम्य अनुभवच आहेत हे म्हणणे संपूर्णतः खरे नाही.

मानवाच्या अंतःकरणात प्रतीत होतात पण जे इंद्रियगोचर होऊ शकत नाहीत असे अनेक अनुभव आहेत. मानवाची जीवननिष्ठा ठरविताना मानवी इंद्रियांना गोचर न होणारे पण त्यांच्या अंतःकरणाला प्रतीत होणारे असे जे अनुभव आहेत त्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान द्यावे लागते. अशा अनुभवात ज्याला आत्मानुभव किंवा धर्मानुभव (Spiritual or Religious Experience) असे म्हणतात तो मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ अनुभव होय. मानवाच्या अंतःकरणाला व आत्म्याला येणाऱ्या अनुभवांचा आधार घेऊन व त्यांना पडताळून पाहून जे निष्कर्ष बुद्धीने काढले तेही व्यापक अर्थाने बुद्धिप्रामाण्याच्या कक्षेत येऊ शकतील. मात्र अशा व्यापक अर्थाच्या बुद्धिप्रामाण्यात बुद्धीच्या व अंतःकरणाच्या शुद्धीचा व समत्वाचा सिद्धांत अंतर्भूत करावा लागतो. असा अंतर्भाव करून बुद्धिप्रामाण्याचा सिद्धांत मांडला तर त्याला भगवद्गीतेतील बुद्धियोग असा शब्द लावता येईल.

## शुद्ध बुद्धीचे प्रामाण्य

जेव्हा नैतिक व आत्मिक क्षेत्रात बुद्धीला संचार करावा लागतो तेव्हा तिला केवळ इंद्रियगोचर अनुभवांचाच आधार घेऊन सत्यसंशोधन करता येत नाही. या क्षेत्रात कार्य करीत असता बुद्धीला केवळ अंतःकरणास येणाऱ्या अनुभवांचा व आत्मानुभूतींचा आधार घ्यावा लागतो. अशा बुद्धीलाच साम्यबुद्धी, निर्विकारबुद्धी, आत्मनिष्ठबुद्धी किंवा योगमुक्त-बुद्धी अशी नावे वेदान्त्यांनी दिलेली आहेत. नैतिक आणि आत्मिक क्षेत्रात या योगबुद्धीला किंवा साम्यबुद्धीला शरण जावे लागते आणि अंतःकरणाची व बुद्धीची ही शुद्धता करण्यासाठी त्यांची विकार आणि वासना यांपासून मुक्तता करावी लागते. मानवाची बुद्धी आणि अंतःकरण यांची विकारवासना यांपासून मुक्तता करण्याचे तत्त्व मान्य केल्याशिवाय मानवाची जीवननिष्ठा ठरविता येत नाही. म्हणून सत्याग्रहनिष्ठेत केवळ इंद्रियानुभवावर अधिष्ठित झालेले बुद्धिप्रामाण्य हे हत्यार सत्यसंशोधनाला पुरेसे मानण्यात येत नाही. नैतिक व आत्मिक क्षेत्रातील सत्यसंशोधनास आवश्यक असणारी शुद्ध बुद्धी हीच येथे प्रमाणभूत धरली जाते. मानवी बुद्धीला ही शुद्धी प्राप्त करून घेण्यासाठी अंतःकरणातील वासना व विकार यांच्यापासून स्वतःची मुक्ती करावी लागते आणि अंतःकरणही पवित्र बनवावे लागते. अशा प्रकारचे "शुद्ध बुद्धीचे" प्रामाण्य सत्याग्रहात अभिप्रेत आहे. पण हे शुद्ध बुद्धीचे प्रामाण्यही स्वतःच्याच बुद्धीचे असले पाहिजे. दुसऱ्याची बुद्धी माझ्या बुद्धीपेक्षा अधिक शुद्ध आहे म्हणून मी माझ्या बुद्धीस दूर सारून दुसऱ्याच्या बुद्धीने व्यवहार करू लागलो तर मी सत्याग्रही होऊ शकत नाही. अखेरीस माझीच बुद्धी मला तारक होऊ शकेल. या निष्ठेलाच आम्ही आत्म-प्रामाण्य वृत्ती हे नाव दिले आहे आणि सत्याग्रहात सत्यनिष्ठेइतकेच आत्मप्रामाण्यवृत्तीचे महत्त्व आहे असे म्हटले आहे. मात्र सत्याग्रहातील ही आत्मप्रामाण्यवृत्ती आज सामान्यतः जिला बुद्धिप्रामाण्यवृत्ती म्हणतात तिच्याहून भिन्न, अधिक खोल व अधिक श्रेष्ठ आहे.

जीवनातील अंतिम सत्याचा शोध व साक्षात्कार करून घेणाऱ्यांनी केवळ तर्कयुक्त बुद्धीला प्रमाण न मानता मन, बुद्धी आणि इंद्रिये या सर्वांची शुद्धी करून आणि अहंकार व ममत्व यांतून मुक्त होऊन सर्वात्म वृत्तीने व सर्वहितबुद्धीने विचार व वर्तन करण्यास शिकले पाहिजे. असे करीत असता इतरांपासून आपणास स्फूर्ती घेता येईल पण इतरांच्या बुद्धीने चालून त्यास त्या सत्याचे आकलन करता येणार नाही. तसेच विश्वातील व जीवनातील सत्य पूर्णपणे कोणास समजलेले आहे व म्हणून त्याचे अधिक संशोधन आता करण्याचे कारण नाही अशी वृत्तीही सत्याग्रहाला पोषक होऊ शकत नाही.

## गांधींची लोकशाहीची कल्पना

कोणतेही शास्त्र एकसारखे वाढत असले पाहिजे हा न्याय गांधीजी सत्याग्रहशास्त्रासही लागू करतात. सत्याग्रह हे एक पूर्णत्व पावलेले शास्त्र आहे अशी त्यांची धारणा नव्हती. ते एक सदैव वाढणारे असे जिवंत शास्त्र असून आपल्या स्वतःच्या विकासाबरोबर त्या शास्त्राचे आपले ज्ञानही विकास पावत आहे हीच त्यांची वृत्ती होती. या शास्त्राची वाढ एकसारखी होत राहिली पाहिजे. आणि सत्याग्रहींच्या जीवन विकासाबरोबर ती होत राहील अशी त्यांची निष्ठा होती. सत्याग्रहाचे आपले ज्ञानही एक सारखे वाढत असून त्याबरोबर आपलाही विकास होत आहे असे ते म्हणत. अशा शास्त्राच्या उपासकांनी ग्रंथप्रामाण्य किंवा गुरुप्रामाण्य यांना आपली निष्ठा न वाहता स्वयंप्रज्ञेनेच आपला मार्ग चोखाळला पाहिजे. जेव्हा त्यांना असे दिसून आले की राष्ट्रसभेतील आपले अनुयायी स्वबुद्धीने मते न देता आपल्या म्हणजे गांधीजींच्या मताकडे पाहून आपले हात वर करतात तेव्हा त्यांनी राष्ट्रसभेचा त्याग केला आणि जेव्हा गांधी सेवा संघात हीच अंधश्रद्धेची वृत्ती वाढत असलेली त्यांना दिसली तेव्हा त्या संघाचा विस्तारही त्यांनी गुंडाळून ठेविला. आपण चरखा संघ, हरिजन सेवक संघ, ग्रामोद्योग संघ अशा ज्या निरनिराळ्या लोकसेवेच्या संस्था काढल्या त्यांच्याही विचारात एकसारखी वाढ होत राहिली पाहिजे आणि त्यातील सेवकांनी आपल्या विचारात नवी नवी भर टाकीत गेले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. या सर्व संस्था जिवंत आणि विकासशील बनवावयाच्या तर त्यातील सेवकांनी स्वयंप्रज्ञेनेच नेहमी वागले पाहिजे. गांधी सेवा संघाच्या नावातील "गांधी" हा शब्द देखील काढून टाकावा आणि सत्याच्या व अहिंसेच्या उपासकांचा संघ असे नाव प्रचलित करावे अशीही त्यांनी सूचना केली होती.

प्रत्येक मानवाच्या स्वयंप्रज्ञेला पूर्ण अवसर मिळाला पाहिजे आणि प्रत्येकाने सत्यसंशोधनाच्या कार्यात सहभागी होऊन समाजाची सत्याच्या व प्रेमाच्या दिशेने अधिकाधिक प्रगती घडवून आणिली पाहिजे असे गांधीजींचे विचार असल्यामुळेच त्यांची या सत्य-संशोधनास अवश्य असणाऱ्या अहिंसेवर तितकीच दृढ निष्ठा होती. एकदा शांत समोरच्या

सत्याची अंमलबजावणी करणे एवढेच मानवाचे कर्तव्य नसून नित्य नवे नवे संशोधन करून सत्याचे अधिकाधिक ज्ञान प्राप्त करून घेणे व त्या कामी सर्वांचे सहकार्य मिळविणे हेच मानवाचे खरे कर्तव्य आहे. याच दृष्टीने ते लोकशाहीचे भक्त बनले होते. बहुमताच्या दडपणाखाली चुरडून जाऊन स्वतःचे मत सोडून देणे अशी त्यांची लोकशाहीची कल्पना नव्हती. बहुमताची खुशामत करून किंवा त्यांची फसवणूक करून अथवा दहशतीने इतरांची मते दडपून टाकून मिळविलेले बहुमत सत्ताधारी बनल्याने समाजात लोकशाहीची स्थापना होऊ शकेल असे कोणासही म्हणता येत नाही. प्रत्येक नागरिकाने सत्याग्रही बनून स्वयंप्रज्ञेने आपले मत प्रकट करण्याचे नीतीधैर्य दाखविले तरच लोकशाही अस्तित्वात येऊन समाजाची उन्नती होत राहील. या दृष्टीने विचार केल्यास लोकशाहीचे अधिष्ठान नागरिकांतील सत्याग्रह वृत्तीत आहे हे कोणासही दिसून येईल.

पण नागरिकांतील ही सत्याग्रहनिष्ठा वाढत जावी अशी सामाजिक व आर्थिक परिस्थिती निर्माण झाल्याबाचून केवळ सार्वत्रिक मतदानाचा हक्क दिल्याने अशी खरी जिवंत लोकशाही अस्तित्वात येणार नाही. ही सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील लोकशाही निर्माण करण्याचे कार्यही सत्याग्रही निष्ठेच्या नागरिकांनी केले पाहिजे. याच दिशेने लोकशाहीचे शुद्धीकरण घडून येईल आणि याच मार्गाने आजच्या भांडवलदार लोकशाहीत माजणारा वर्गकलह शांत होऊन आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील लोकशाही अस्तित्वात येईल.

## सत्याग्रह व समाजवाद

लोकशाहीच्या शुद्धीकरणास ज्याप्रमाणे सत्यनिष्ठेचा उपयोग आहे, त्याचप्रमाणे समाजवादाच्या संस्थापनेस व शुद्धीकरणास सत्याग्रहाची आवश्यकता आहे. युरोपातील लोकशाही संग्रहवादामुळे भ्रष्ट झालेली असून रशियातील समाजवाद हिंसावादाने विकृत झालेला आहे असे गांधीजींचे मत होते. असंग्रह आणि अहिंसा यांच्यावर अधिष्ठित झालेली सत्याग्रहनिष्ठा जागृत करून लोकशाहीचे व समाजवादाचे शुद्ध स्वरूप प्रकट करण्याचे कार्य भारताला करता येईल व ते त्याने करावे हाच गांधीजींचा भारताला संदेश आहे. सत्याग्रहनिष्ठा हा आधुनिक मानवाचा धर्म आहे. त्याच्या आश्रयाने बुद्धि-स्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचेही शुद्धीकरण होईल. कारण युरोपात बुद्धिस्वातंत्र्याचा उपयोग स्वार्थसंपादन आणि धनसंग्रह यांच्या कामी होऊ लागल्यामुळे ती तत्त्वेही भ्रष्ट झालेली आहेत. स्वार्थ आणि संग्रह यांच्यातून मुक्त होऊन बुद्धी अव्यभिचारी सत्यनिष्ठेचा आश्रय करील आणि सामाजिक सत्याच्या संस्थापनेसाठी स्वार्थमूलक व संग्रहप्रधान समाज-रचनेविरुद्ध अहिंसक क्रांती करण्यास प्रवृत्त होईल तेव्हाच बुद्धिस्वातंत्र्याचे व व्यक्ति-स्वातंत्र्याचे तत्त्व शुद्ध बनू शकेल. अशा रीतीने विचार केल्यास गांधीजींनी बुद्धिस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही आणि समाजवाद या आधुनिक युगात निर्माण झालेल्या तत्त्वांचे

शुद्धीकरण करून मानवाला आत्मोद्धाराचा व समाजोद्धाराचा मार्ग दाखवून देण्याचे कार्य केले आहे हे दिसून येईल. आधुनिक युरोपात निर्माण झालेल्या या ध्येयांना शुद्ध व उन्नत करून आधुनिक काळास अनुरूप अशी मानवसंस्कृती निर्माण करण्याचे कार्य भारताला करून दाखवावयाचे आहे. या नव्या मानवसंस्कृतीत आजपर्यंतच्या मानवी इतिहासात उदय पावलेली सर्व सत्त्वे अंतर्भूत झालेली असतील.

आज मानवसंस्कृती युद्ध आणि वर्गयुद्ध या दोन अरिष्टांनी जर्जर झालेली आहे. या अरिष्टांतून तिची मुक्तता झाल्यावाचून मानवाला आपले अस्तित्व सुरक्षित करता येत नाही. युद्धाचा आणि वर्गयुद्धाचा व्याप आज इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला आहे की मानवाचे मन आणि बुद्धी यांचा समग्र ग्रास केल्यासारखा दिसत आहे. युद्ध आणि वर्गयुद्ध हे राहू-केतू प्रमाणे जणू काय एकाच शरीराचे दोन विभाग असून ते मानवाच्या मन-बुद्धीरूप चंद्र-सूर्यांना ग्रासीत आहेत. असे असेपर्यंत त्यांचा प्रकाश पडू शकणार नाही व मानव संस्कृती सुरक्षित होणार नाही. सत्याग्रहाच्या अंगी युद्ध आणि वर्गयुद्ध या दोहोंचाही उपशम करण्याचे सामर्थ्य आहे. हे सामर्थ्य अमेरिकेच्या संग्रहप्रधान व स्वार्थमूलक लोकशाहीत निर्माण होणाऱ्या ॲटमबॉम्बमध्ये नाही अथवा सर्व जगभर वर्गयुद्धाची रक्तक्रांती करू पाहणाऱ्या बोल्शेव्हिक रशियापाशीही नाही असा आत्मविश्वास भारतीयांच्या अंतःकरणात म. गांधींनी निर्माण केलेला आहे. इतकेच नाही तर हा आत्मविश्वास यथार्थ करून दाखविण्याची दीक्षा घेतलेले आचार्य विनोबा, श्री. जयप्रकाश आणि पंडित नेहरू यांच्यासारखे थोर नेतेही त्यांनीच भारताला दिलेले आहेत. अशा थोर नेत्यांच्या मार्गदर्शनाने आधुनिक भारत आपल्या देशातील भांडवलशाहीचा अंत करून समाजवादी लोकशाही स्थापन करील आणि हिंसेचा आश्रय न करता एकवर्ग समाजाचे ध्येय प्राप्त करण्याचा मार्ग जगाला दाखवून देईल अशी आशा या गांधीजयंतीच्या वेळी वाटत आहे.

## गांधींचा वारसा

गांधीजींचा सत्याग्रही संदेश त्यांच्या देहावसानानंतर नष्ट न होता तो राष्ट्रातील सर्व पक्षातील लोकांच्या अंतःकरणात प्रविष्ट होत असल्याचे दृश्य कोणाही सूक्ष्म निरीक्षकास आज दिसल्यावाचून राहणार नाही. जेव्हा हे कार्य मूर्त स्वरूपात येईल तेव्हाच म. गांधींनी आधुनिक मानवाला दिलेल्या क्रांतिकारक धर्मनिष्ठेचे खरे माहात्म्य लोकांना कळू लागेल. सत्याग्रहातून वर्गयुद्धाचा व युद्धाचा अंत होईल तरच मानवसंस्कृतीत भर पाडून तिला सुरक्षित केल्याचे श्रेय भारताच्या पदरी पडू शकेल.

[*साधना, ४ ऑक्टोबर १९५२, पृ. ३–४*]

## २०

# समाजवादी क्रांतीला सत्याग्रही दीक्षा

(उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असली म्हणजे विनाकष्ट धनसंपादनाचे मार्ग कायदेशीर बनतात आणि खाजगी धनसंग्रह वाढत जातो. हा खाजगी धनसंग्रह नष्ट करावयाचा तर उत्पादनाची साधने सामाजिक मालकीची बनली पाहिजेत हाच समाजवादी क्रांतीमागील मूलभूत विचार आहे. हा मूलभूत विचार सर्वोदयवादी व सत्याग्रही तत्त्वज्ञानात अंतर्भूत झालेला आहे अशी निःसंदिग्ध घोषणा सर्वोदयपुरीतील (बोधगया, सर्वोदय संमेलन, एप्रिल १९५२) या क्रांतिकारक ठरावाने केलेली आहे. यामुळे गांधीवाद व समाजवाद यांचा पूर्ण समन्वय झालेला असून श्री. जयप्रकाश यांच्यासारखे क्रांतिकारक समाजवादी सत्याग्रही दीक्षा घेऊन आचार्य विनोबा यांनी प्रवृत्त केलेल्या भूदान व संपत्तिदान यज्ञाचे अपत्यं बनले आहेत. आजच्या समाजात रूढ असलेले धनसंपादनाचे मार्ग अन्यायाचे असून आजची समाजव्यवस्था स्तेयमूलक व संग्रहप्रधान बनलेली आहे. ही समाजव्यवस्था यापुढे चालू देणे हा अधर्म आहे आणि तिच्यात अहिंसेने क्रांती घडवून आणणे हाच आजचा युगधर्म आहे असे सर्वोदयपुरीतील या क्रांतिकारक ठरावाने उद्घोषित केले आहे.)

गेल्या २० तारखेस सर्वोदयपुरी येथे जमलेल्या सर्वोदय लोकसेवकांनी एक अत्यंत क्रांतिकारक असा ठराव आपल्या संमेलनात एकमताने मंजूर केला. आचार्य विनोबा यांनी भूदान आंदोलनाची सुरुवात केल्यापासून भारतीय जनतेत आर्थिक क्रांतीची प्रेरणा फार जोमाने फैलावू लागली आहे. भूदान आंदोलनाचे ध्येय केवळ बेकारांना रोजगार देणे अथवा धनिकांपाशी असलेल्या संपत्तीपैकी काही अंश निर्धन जनतेला दान म्हणून देण्याची याचना करणे अशासारखे क्षुद्र नाही. समाजातील मालमत्तेची आजची व्यवस्था कायम ठेवून त्या समाजव्यवस्थेखाली पुरवून जाणाऱ्या दलित जनतेला भोगावे लागणारे क्लेश सुसह्य व्हावेत म्हणून आजच्या समाजव्यवस्थेप्रमाणे ज्यांना कोणतेही कष्ट न करता

इतरांच्या कष्टाने निर्माण झालेली संपत्ती कायदेशीरपणे संपादन करता येते त्यांनी औदार्याचा आव आणून निर्धन व बेकार जनतेला सहानुभूती दाखवावी आणि तुमचे क्लेश निवारण करण्यासाठी आम्ही उदारपणाने तुम्हास आमच्या संपत्तीचा काही भाग दान करीत आहो असे प्रदर्शन करावे हाही भूदान आंदोलनाचा हेतू नाही.

याच्या उलट समाजात निर्माण होणारी संपत्ती ही सामाजिक मालकीची आहे, ती कोणाही व्यक्तीच्या मालकीची नाही, खाजगी व्यक्ती या आपणाजवळ असलेल्या संपत्तीच्या मालक नसून त्या सामाजिक संपत्तीच्या निधिधारक आहेत आणि म्हणून त्यांनी आपल्या-जवळील जमिनीची मालकी सोडून देऊन ती समाजापाशी दिली पाहिजे अशा वृत्तीने आपण आंदोलन सुरू केले आहे अशी स्पष्टता आचार्य विनोबा यांनी प्रथमपासूनच केलेली आहे. ज्यांचेजवळ अधिक जमीन आहे त्यांनी त्यापैकी अधिक असलेली जमीन ज्यांच्याजवळ मुळीच जमीन नाही त्यांना त्यांचा तो हक्क आहे, म्हणून दिली पाहिजे. ही भिक्षा नसून ती गरिबांच्या हक्कांची बजावणी आहे अशी भूमिका आचार्यांनी प्रथमपासूनच घेतलेली आहे. तथापि भूदान-यज्ञ या शब्दापैकी "दान" हा शब्द सामान्य व्यवहारात भिक्षे-कऱ्याला घातलेल्या भिक्षेला वापरण्यात येत असल्यामुळे ही चळवळ सामाजिक क्रांतीची नसून ती केवळ धनिकांच्या औदार्याला आवाहन करणारी आहे असा गैरसमज झाला होता. वस्तुतः भूदान हा यज्ञ आहे, म्हणजे ते अवश्य सामाजिक कर्तव्य आहे आणि त्या सामाजिक कर्तव्याची पूर्तता होण्यावर समाजाचे सर्व जीवन अवलंबून आहे इतका बोध भूदान याच्यापुढे यज्ञ हा शब्द लावल्याने व्हावयास हवा होता. पण आमची सर्व संस्कृती यज्ञाच्या उच्च तत्त्वांवर अधिष्ठित झालेली आहे अशी नित्य घोषणा करणाऱ्या आम्हास या यज्ञाच्या कल्पनेसाठी आमच्या जमिनीचा व संपत्तीचा त्याग करावा लागणार आहे अशी कल्पना येऊ शकली नाही. सर्वोदयपुरी येथे जो ठराव करण्यात आला आहे त्या ठरावात आम्हास आमच्या समाजात मालकी हक्कासंबंधी ज्या कल्पना रूढ आहेत त्या कल्पनांत आमूलाग्र क्रांती घडवून आणावयाची आहे असे निःसंदिग्धपणे घोषित करण्यात आले आहे.

सर्वोदयपुरीत जो ठराव करण्यात आला त्यात हे आंदोलन आता भूदान यज्ञापुरते मर्यादित राहिलेले नसून ते सर्व प्रकारच्या खाजगी स्वामित्वाविरुद्ध सुरू झालेले आंदोलन बनलेले आहे असे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. ...

... उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असली म्हणजे विनाकष्ट धनसंपादनाचे मार्ग कायदेशीर बनतात आणि खाजगी धनसंग्रह वाढत जातो. हा खाजगी धनसंग्रह नष्ट करावयाचा तर उत्पादनाची साधने सामाजिक मालकीची बनली पाहिजेत. हाच समाजवादी क्रांतीमागील मूलभूत विचार आहे.

हा मूलभूत विचार सर्वोदयवादी व सत्याग्रही तत्त्वज्ञानात अंतर्भूत झालेला आहे अशी निःसंदिग्ध घोषणा सर्वोदयपुरातील या क्रांतिकारक ठरावाने केलेली आहे. यामुळे गांधीवाद आणि समाजवाद यांचा पूर्ण समन्वय झालेला असून श्री. जयप्रकाश यांच्यासारखे क्रांतिकारक समाजवादी सत्याग्रही दीक्षा घेऊन आचार्य विनोबा यांनी प्रवृत्त केलेल्या भूदान व संपत्तिदान यज्ञाचे अध्वर्यु बनले आहेत. आजच्या समाजात रूढ असलेले धन-संपादनाचे मार्ग अन्यायाचे असून आजची समाजव्यवस्था स्तेयमूलक व संग्रहप्रधान बनलेली आहे. ही समाजव्यवस्था यापुढे चालू देणे हा अधर्म आहे आणि तिच्यात अहिंसेने क्रांती घडवून आणणे हाच आजचा युगधर्म आहे असे सर्वोदयपुरीतील या क्रांतिकारक ठरावाने उद्घोषित केले आहे. या यज्ञकार्याला आपले सर्व जीवन समर्पित केले पाहिजे असे अंतःकरणाच्या तळमळीचे उद्गार श्री. जयप्रकाश यांनी या संमेलनात काढले. त्याबरोबर आचार्य विनोबा यांनी या अहिंसक क्रांतियज्ञाला जीवन समर्पण करणारा पहिला सत्याग्रही म्हणून माझे नाव मी तुमच्या हाती देतो अशा अर्थाचे पत्र श्री. जयप्रकाश यांना लिहून दिले. अर्थात जयप्रकाश यांनी आपण एवढ्या थोर पदवीस पात्र नाही असे म्हणून आम्हीच सर्वांनी आचार्य विनोबा यांना या क्रांतियज्ञासाठी आपली जीविते समर्पण केली पाहिजेत अशी भावना प्रकट केली. अशा रीतीने विनोबा आणि जयप्रकाश यांनी भारतात आर्थिक क्रांती सत्याग्रही मार्गाने घडवून आणावयाची भीष्मप्रतिज्ञा केली....

## आत्मराज्याचे अंतिम ध्येय

सर्वोदयपुरीत जो क्रांतिकारक ठराव सर्वानुमते मंजूर झाला व त्याच्या पूर्ततेसाठी आचार्य विनोबा व जयप्रकाश यांच्याबरोबर सुमारे साडेपाचशे अहिंसक क्रांतिकारकांनी जीवनसमर्पणाची प्रतिज्ञा केली त्या ठरावात समाजवादाचे ध्येय नमूद करण्यात आलेले नसून दंडहीन समाजाचे अथवा आत्मराज्याचे म्हणजेच गांधीजींच्या रामराज्याचे ध्येय नमूद करण्यात आले आहे. मार्क्सवादाचे सुद्धा अंतिम ध्येय हेच असून केवळ ध्येयाच्या संपादनाचा त्यांचा मार्ग हिंसेतून जाणारा आहे. मार्क्सवादातील ही एक मोठीच विसंगती असून ती विसंगती दूर करण्याचे ज्ञान सत्याग्रही क्रांतीच्या संशोधनामुळे आधुनिक भारताला झालेले आहे. याच संशोधनामुळे आधुनिक भारतात मानवजातीचे मार्गदर्शन करण्याची पात्रता आलेली आहे आणि याच संशोधनाच्या अभावी आधुनिक युरोपात लोकशाही क्रांतीच्या रूपाने सुरू झालेल्या यज्ञाला भीषण हिंसक स्वरूप प्राप्त होऊन त्या यज्ञा-तून कम्युनिस्ट हुकूमशाहीचा राक्षस जन्माला आला आहे. या कम्युनिस्ट हुकूमशाहीच्या राक्षसाला नष्ट करण्याचे सामर्थ्य अमेरिकेच्या हैड्रोजन बॉम्बमध्ये नसून ते सत्याग्रही क्रांति-यज्ञातून निर्माण होणाऱ्या आत्मबलात आहे. आत्मबलातून निर्माण होणारी सत्याग्रही क्रांती

ही केवळ संपत्तीचे सामाजिक स्वामित्व स्थापन करून स्वस्थ बसणारी क्रांती नसून ती दंडहीन समाजाच्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग दाखवून देणारी क्रांती आहे. म्हणून संपत्तीचे सामाजिक स्वामित्व स्थापन करूनही समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य व स्वावलंबन यांचे संरक्षण करण्याची पूर्ण दक्षता या सत्याग्रही क्रांतिकारकांना घ्यावयाची आहे. समाजातील प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक घटक अन्नवस्त्रासारख्या आवश्यक वस्तूंच्या बाबतीत स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनावा अशी आर्थिक रचना या क्रांतीतून निर्माण करावयाची आहे. हे करावयाचे तर विकेंद्रीकरणाचे तत्त्व सर्वमान्य झाले पाहिजे. अन्न आणि वस्त्र यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण व स्वावलंबी कुटुंबाचा समाज स्थापन करण्याच्या उद्देशानेच अन्नवस्त्रासारख्या आवश्यक गरजांच्या बाबतीत केंद्रीकृत कारखान्यात निपजणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार घालावा असा ठराव सेवापुरी येथील अधिवेशनात करण्यात आला होता. या ठरावाचा उल्लेख करून ग्रामोद्योगाला चालना देण्याची आठवण सर्वोदयपुरीतील ठरावाने करून दिली आहे. ग्रामोद्योग, अन्नवस्त्रस्वावलंबन आणि आर्थिक आधार यालाच आर्थिक विकेंद्रीकरण असे नाव असून ते तत्त्व संपत्तीच्या सामाजिक स्वामित्वाच्या तत्त्वाशी निगडित करून गांधीवाद व समाजवाद यांचा सुंदर समन्वय साधण्यात आला आहे. भारतीय समाजवादी पक्षाने हे आर्थिक विकेंद्रीकरणाचे तत्त्व अधिकृत रीतीने पूर्वीच मान्य केले आहे. अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या दोनही दृष्टींनी त्याची मांडणी डॉ. लोहिया व अशोक मेहता यांनी अनेकवार केलेली आहे.

## विकेंद्रित समाजवादी लोकशाही

अशा रीतीने जी तत्त्वे गांधीवादी व समाजवादी या दोनही संप्रदायातील लोकांना मान्य आहेत त्यांच्या अधिष्ठानावर भारतातील सत्याग्रही क्रांतीचे हे कार्य पुढे चालणार आहे. आपल्या देशातील गांधीवादी, समाजवादी या दोन क्रांतिकारक संप्रदायांप्रमाणेच युरोपात अराज्यवादी व कम्युनिस्ट असे दोन क्रांतिकारक संप्रदाय निर्माण झाले होते. कार्ल मार्क्सविरुद्ध बाकुनिन आणि लेनिन विरुद्ध क्रापोटकिन यांच्यामध्ये जे वाद झाले ते कम्युनिस्ट विरुद्ध अराज्यवादी या दोन संप्रदायातील वादच होते. कम्युनिस्ट हे सत्तेचे व संपत्तीचे केंद्रीकरण अपरिहार्य मानणारे तर अराज्यवादी हे सत्तेचे व संपत्तीचे विकेंद्रीकरण पुरस्कारणारे असे होते. रशियात कम्युनिस्टांनी अराज्यवाद्यांचा पाडाव करून आपल्या पक्षाची हुकूमशाही स्थापन केली. याच्या उलट भारतात घटना घडणार आहे. या राष्ट्रातील अहिंसक अराज्यवादी समाजवाद्यांना आत्मसात करून विकेंद्रित समाजवादी लोकशाही स्थापन करून आत्मराज्याचा मार्ग दाखवून देणार आहेत.

[*साधना, १ मे १९५४, पृ. ३ व ११–१४*]

## समन्वयाश्रमाचे महत्त्व

... पण याहूनही अधिक क्रांतिकारक अशी एक घटना पवनारच्या संमेलनाच्या प्रसंगी घडून आली : ती म्हणजे आचार्य विनोबा यांनी केलेली समन्वयाश्रमाच्या संस्थापनेची योजना व घोषणा हीच होय.

आचार्य विनोबा यांनी समन्वयाश्रमाची आपली योजना विशद करताना असे सांगितले की, या आश्रमात वेदान्त आणि अहिंसा या दोन दर्शनांचा समन्वय साधण्यांचा प्रयत्न करण्यात येईल. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात शंकराचार्यांच्या काळापासून आधुनिक युगाच्या उदयापर्यंत जो काळ गेला त्यात वेदान्तदर्शन आणि जैन व बौद्धदर्शन यांच्यात विरोध असल्याचे बहुतेक सर्वांनी गृहीत धरल्याचे दिसून येते. शंकराचार्यांनी बौद्धदर्शन व जैनदर्शन यांचा पाडाव करून वेदान्ताला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. हा त्यांचा एक मोठा पराक्रमच होय असे आपण मानत आलो. पण आधुनिक भारताला वेदान्तदर्शन आणि अहिंसादर्शन यांच्यात मूलतः विरोध नसून त्यांचा समन्वय होऊ शकतो व झाला पाहिजे अशी नवी दृष्टी आता प्राप्त होऊ लागली आहे. आचार्य विनोबा यांनी आपला हा विचार विशद करताना त्याचवेळी असेही सांगितले की गांधीजी ज्याला सत्य असे म्हणत असत तेच वेदान्त या नावाने आपण व्यक्त करीत आहो, वेदान्त हे सत्याच्या सर्वांगीण संशोधनाचे शास्त्र आहे आणि अहिंसा हे या सत्यसंशोधनाचे सर्वश्रेष्ठ साधन आहे.

सत्य ज्यांना शोधावयाचे असेल त्यांनी केवळ बुद्धी सत्यनिष्ठ करून भागणार नाही, तर त्यांचे अंतःकरणही प्रेममय झाले पाहिजे. सत्यनिष्ठ बुद्धी आणि प्रेममय अंतःकरण यांच्याच-बरोबर मानवाने आपल्या इंद्रियवृत्ती सत्यनिष्ठेच्या व प्रेमाच्या आचरणासाठी भोगाव्या लागणाऱ्या तपश्चर्येने पवित्र बनविल्या पाहिजेत. अशा रीतीने सत्यनिष्ठ बुद्धी, प्रेममय अंतःकरण आणि तपःपूत इंद्रियवृत्ती या सर्वांगानी जीवनातील व जगातील सत्य समजून घेणे व त्या सत्यास अनुसरून आपले जीवन व्यतीत करणे हाच मानवाचा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. हा धर्म ज्यांनी आचरिला व जे या धर्मांशी सर्वभावांनी एकरूप झाले तेच जीवन्मुक्त होत. हाच जीवन्मुक्तीचा आदर्श वेदान्त, बौद्ध व जैन या दर्शनांनी मानवाला दाखवून दिला आहे. याच आदर्शाच्या प्राप्तीचे मार्ग व साधने यांचे विवेचन या दर्शनांनी निरनिराळ्या प्रकारे केलेले आहे. अशा अद्वैत दृष्टीने विचार केल्यास वेदान्त्यांचा आत्मसाक्षात्कार, बौद्धांचे निर्वाणपद आणि जैनांचे अर्हत्पद ही सर्व एकच आहेत असे दिसून येते. तरीही त्या एकाच अवस्थेची निरनिराळी शब्दचित्रे का रेखाटली जावीत हे एक कोडेच आहे.

## समन्वयाची दृष्टी

बुद्धीच्या पलीकडील अनुभव आपल्या शब्दात व्यक्त करण्याचा प्रयत्न करताना अशी विविधता निर्माण होते व त्या विविधतेतून अंतिम सत्याचा मार्ग शोधावा लागतो एवढे

म्हणूनच येथे स्वस्थ बसावे लागते. पण या विविध शब्दचित्रांपैकी एकच शब्दचित्र यथार्थ अथवा पूर्ण आहे असे मानून ह्या व्यतिरिक्त इतर दर्शनांचा अनादर करणे हे सत्य-संशोधकाला शोभण्यासारखे नाही. निदान आधुनिक भारताने तरी अशी एकांगी व्यतिरेक दृष्टी धर्माच्या व तत्त्वज्ञानाच्या बाबतीत सोडून दिलेली असून तो याबाबतीत समन्वय दृष्टीने विचार करू लागला आहे. वेदान्त म्हणजे केवळ शंकराचार्य प्रणीत विशिष्ट सिद्धांत असे मानून शांकर संप्रदायातील वेदान्ती जैन व बौद्ध दर्शनांना तुच्छ मानीत असले तरी भारतीय जनतेने श्रीकृष्णाइतकाच गौतम बुद्धाचाही अवतारी धर्मपुरुष म्हणून स्वीकार केलेला आहे. ही समन्वयाची दृष्टी मध्ययुगात होऊन गेलेल्या साधुसंतांनी भारतीय जनतेच्या अंतःकरणात खोल ठसविली. यामुळे केवळ श्रीकृष्ण व बुद्ध यांचाच नव्हे तर राम व रहीम यांचाही समन्वय बुद्धीने सारखाच आदर करून हिंदु-मुसलमानांचे ऐक्य साधण्याचे प्रयत्न कबीर व अकबर यांच्या काळापासून भारतात सुरू झाले.

हे प्रयत्न अपुरे पडून हिंदु-मुसलमानांच्या झगड्यात दोघेही क्षीण-बल झाले आणि ब्रिटिशांचे गुलाम बनले. या गुलामगिरीच्या काळात राममोहन रॉय व रामकृष्ण परमहंस यांनी सर्व धर्मांचा व तत्त्वज्ञानांचा समन्वय साधणारी नवी दृष्टी आधुनिक भारताला दिली. स्वामी विवेकानंद यांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील बुद्धिवाद आणि भारतीय तत्त्वज्ञानातील आत्मवाद यांचा समन्वय साधून वेदान्त म्हणजे केवळ शंकराचार्यप्रणित विशिष्ट सिद्धांत नसून ते एक अनुभव व तर्क यांच्यावर अधिष्ठित झालेले वर्धिष्णु अध्यात्मशास्त्र आहे अशी नवी दृष्टी दिली. याच नव्या दृष्टीने म. गांधींनी सर्वधर्मसमन्वयाचा सिद्धांत आपल्या सत्याग्रहदर्शनात अंतर्भूत केला. त्याच सिद्धांतास अनुसरून सर्व धर्मांचा व सर्व तत्त्वज्ञानांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणारा समन्वयाश्रम आज स्थापन केला आहे. "एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति" हे ऋग्वेदकालीन सूत्र प्राचीन भारतात उदय पावले. त्याच सूत्राच्या आधारावर या समन्वयाश्रमाच्या पायाची उभारणी झालेली आहे. यामुळे वेदान्त हे एक सत्यसंशोधनाचे वर्धिष्णु शास्त्र बनणार असून समन्वयवृत्तीशी म्हणजेच अहिंसावृत्तीशी त्याचे तादात्म्य करण्यात आले आहे. यामुळे वेदान्त म्हणजे केवळ शांकर सांप्रदायिक सिद्धांत नसून शंकराचार्यांचा अद्वैतवाद, गौतमबुद्धाचा अनात्मवाद आणि महावीरांचा अनेकांतवाद ही सर्व सत्यसंशोधनाच्या प्रयत्नातील फळे आहेत अशा सम-दृष्टीने त्यांच्याकडे पाहून त्या ज्ञानवृक्षाची अधिक वाढ करावी व त्याची नवी फळे चाखावी अशी आकांक्षा आधुनिक भारताच्या हृदयात उदय पावली आहे, त्याची साक्ष हा समन्वयाश्रम देत आहे. ...

## द्वंद्वातीत समन्वय दृष्टी

आज मानव संस्कृतीत अनेक द्वंद्वे निर्माण झालेली आहेत. या अनेक प्रकारच्या द्वंद्वांत अत्याचार निर्माण होऊन हिंसक क्रांती व महायुद्धे यांचा वणवा जगभर पसरू

लागला आहे. या द्वंद्वांचा निरास हिंसक क्रांतीवाचून होऊ शकणार नाही असा दुराग्रह धरणारे कम्युनिस्ट पक्ष आणि कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाचा पाडाव महायुद्धावाचून होणार नाही म्हणून त्याच्या पूर्वतयारीच्या प्रयोगांनी सर्व जगाला भेडसावू पाहणारे अमेरिकन मुत्सद्दी यांच्यापैकी कोणाचेही अनुयायी बनून आजच्या मानवसंस्कृतीपुढील प्रश्न सुटू शकत नाहीत. हे प्रश्न सोडविण्यास बुद्धी द्वंद्वातीत बनून त्या द्वंद्वांचा अंत करून नवा समन्वय साधणारे तत्त्व शोधून काढू शकली पाहिजे. बुद्धीला अशी समन्वय शोधणारी द्वंद्वातीत अवस्था प्राप्त करून घेण्याचे शास्त्र प्राचीन वेदान्तात निर्माण झाले होते. जगातील द्वंद्वे आभासात्मक ठरविणाऱ्या विवर्तवादी वेदान्ताहून भिन्न असा एक वितर्क वेदान्त (Dialectical logic) प्राचीन काळी भारतीय तत्त्वज्ञानात उदय पावला होता असे आचार्य विनोबा यांनी 'ईशावास्यवृत्ति' या आपल्या पुस्तकात लिहिले आहे. या वितर्कवादात सिद्धांत, प्रतिसिद्धांत व समन्वय अशा पद्धतीने विचार करून समन्वय-सिद्धांत मांडण्यात येत असे. पुढे शंकराचार्यांच्या विवर्तवादाने जग व त्यातील द्वंद्वे यांना माया ठरवून त्यांच्याकडे पाठ फिरविली. यामुळे वेदान्त हा क्रांती-पराङ्मुख बनला, आता पुन्हा वेदान्त क्रांतिकारक व समाजसन्मुख बनला आहे. म्हणून त्याने समन्वयदृष्टी स्वीकारून जगातील द्वंद्वांचा निरास करण्याचा क्रांतिकारक पण अहिंसक मार्ग दाखवून दिला आहे. आचार्य विनोबा यांनी याच सत्याग्रह तत्त्वास अनुसरून बुद्धीला द्वंद्वातीत होऊन समन्वय शोधून काढण्याची दीक्षा देण्यासाठी समन्वयाश्रमाची योजना आखली आहे.

आजच्या जगात धनिक व श्रमिक यांच्यामध्ये जो वर्गकलह माजला आहे त्याचा अंत संपत्तिदान व श्रमदान यज्ञानेच होऊ शकेल व संपत्तीचे सामाजीकरण व विकेंद्रीकरण हाच या यज्ञाचा अंतिम हेतू आहे आणि श्रमदानाने श्रमिकांनीसुद्धा समाजाच्या जीवनाला आपले जीवन समर्पण करण्यास तयार असले पाहिजे असा संदेश ते देत आहेत. मार्क्स-वादातही समन्वयाचे तत्त्व अंतर्भूत आहे, पण त्यात बुद्धीची प्रेरक शक्ती ही आत्म्यात नसून बाह्य परिस्थितीत आहे असा चुकीचा सिद्धांत गृहीत धरला आहे. यामुळे मार्क्सवाद समन्वयाकडे दुर्लक्ष करून द्वंद्वांनाच प्रेरणा देत असतो. ही चूक दुरुस्ती करून बुद्धीला द्वंद्वातीत बनून समन्वयाचा शोध करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणे हे या समन्वयाश्रमाचे साध्य समजले पाहिजे. या दृष्टीने विचार केल्यास या आश्रमाचे महत्त्व मानवसंस्कृतीच्या दृष्टीने किती आहे ते लक्षात येईल.

[*साधना, ८ मे १९५४, पृ. ३ व १०*]

## २१

# भूदान आंदोलन आणि सत्याग्रही समाजवाद

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर येथील जनतेत निर्माण झालेली सत्याग्रही शक्ती सामाजिक क्रांतीच्या रूपाने प्रकट होईल आणि तिच्या प्रभावाने येथे समाजवादी क्रांती घडून येईल हा विचार म. गांधींच्या लेखांतून व भाषणांतून अनेकवार प्रकट झालेला होता. तथापि, गांधीजींच्या मृत्युनंतर ही घटना कशी घडून येणार आणि सत्याग्रही शक्तीला समाजवादी आंदोलनाचे स्वरूप कसे व कोणाकडून दिले जाणार याबद्दल काही काळ सर्वत्र अंधार पसरल्यासारखे दिसत होते. आचार्य विनोबा यांनी भूदानयज्ञाचे आंदोलन सुरू केल्याबरोबर सर्वत्र हा अंधार एकदम नाहीसा होऊ लागला आणि खेड्यापाड्यात पसरलेल्या जनतेमध्ये एक नवे चैतन्य संचार करीत असल्याचे दिसू लागले. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात लोकांतील त्यागबुद्धीला आणि समाजनिष्ठेला ज्या प्रकारचे आवाहन दिले जात होते व ज्या आवाहनामुळे ती त्यागबुद्धी समाजनिष्ठेच्या रूपाने प्रकट होत होती त्या प्रकारचे आवाहन विनोबांनी दिले आणि ही त्यागबुद्धी भूदानाच्या रूपाने प्रकट होऊ लागली. काही थोडे लोक का होईनात पण आपल्या मालकीची जमीन समाजातील बेकारीचे व विषमतेचे समूळ उच्चाटन करण्याच्या कार्यासाठी अर्पण करू लागले. अशा रीतीने आर्थिक विषमतेच्या निर्मूलनाचा यज्ञ सुरू झाला. हळूहळू या यज्ञाचे स्वरूप आणि शास्त्र विशद होऊ लागले. ही केवळ आर्थिक विषमतेच्या यातना ह्या सुसह्य करण्यासाठी चालू झालेली चळवळ नसून त्या विषमतेचे पूर्ण निर्मूलन करून जमिनीवरील स्वामित्वाचा हक्क नष्ट करण्यासाठी व नवी समाजरचना निर्माण करण्यासाठी सुरू झालेली ही चळवळ आहे अशी घोषणा विनोबांनी केल्याबरोबर भारतात समाजवादी क्रांती घडवून आणण्याची उत्कंठा बाळगणारे श्री. जयप्रकाश यांच्यासारखे क्रांतिकारक या आंदोलनात वेगाने ओढले गेले. हळूहळू हे आंदोलन केवळ जमिनीवरीलच स्वामित्व संपुष्टात आणणारे नसून सर्वच संपत्तीचे स्वामित्व परमेश्वराचे आहे व आपण सर्व त्या परमेश्वराचे सेवक आहोत या भूमिकेवर नवी समाजरचना

उभारण्यासाठी हे आंदोलन सुरू झालेले आहे, अशी घोषणा विनोबांनी केली. त्याबरोबर श्री. जयप्रकाश यांच्या मागोमाग त्यांचा सर्व समाजवादी पक्ष या आंदोलनास पाठिंबा देण्यास पुढे सरसावला आणि आचार्य कृपलानी यांनी गांधीवादी विचारसरणीवर भारतात सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने जो एक नवा पक्ष स्थापन केला होता तोही या आंदोलनाच्या प्रभावाने समाजवादी पक्षात विलीन होऊन त्या दोघांचा एक नवा प्रजासमाजवादी पक्ष निर्माण झाला. या पक्षाने भूदान यज्ञाच्या आंदोलनाचे क्रांतिकारक स्वरूप ओळखून त्याला आता अधिकृत मान्यता दिलेली आहे.

देशातील सत्ताधारी काँग्रेस पक्षाने सुद्धा या आंदोलनास आपला नैतिक पाठिंबा दिलेला असून संपत्तीचे स्वामित्व व्यक्तींचे नसून समाजाचे आहे अशा विचाराची सामाजिक क्रांती घडून येण्याची आवश्यकता त्या पक्षानेही मान्य केली आहे. काँग्रेस पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष या दोन राजकीय पक्षांप्रमाणेच जो कोणत्याही राजकीय पक्षात सामील न होता जनतेची विधायक सेवा करणारा लोकसेवक वर्ग आहे, तो तर आचार्य विनोबांच्या या यज्ञकार्यात प्रथमपासूनच सामील झालेला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या सत्याग्रह संग्रामात या तीन शक्ती सहकार्याने भाग घेत होत्या. त्याचप्रमाणे त्या शक्ती आज भूदान यज्ञाला पाठिंबा देण्याच्या निमित्ताने सामाजिक क्रांतीच्या कार्यात एकत्र गोविल्या जात आहेत. आणि त्यांपैकी प्रत्येक शक्ती हे कार्य आपले आहे असे म्हणून त्याचा प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे.

### सत्याग्रह, लोकशाही आणि समाजवाद

गेल्या तीन शतकांत युरोपखंडात लोकशाही आणि समाजवाद या सामाजिक ध्येयांचा उदय झाला आणि त्या ध्येयांच्या प्रेरणेने व उपासनेने आधुनिक युरोपीय संस्कृतीला एक प्रभावी आणि प्रगतिपर स्वरूप प्राप्त झाले सतराव्या शतकापासूनचा युरोपखंडाचा इतिहास हा लोकशाही व समाजवाद या दोन ध्येयांच्या संस्थापनेसाठी केलेल्या प्रयत्नांचा इतिहास होय, असे म्हटल्यास ते बरेचसे यथार्थ होईल. या दोनही ध्येयांचा मूळ उगम खिस्ताच्या सत्यनिष्ठेत व अहिंसावृत्तीत आढळतो असे प्रतिपादन करणारे अनेक विचारवंत व धर्मनिष्ठ या काळात युरोपात होऊन गेले. मात्र खिस्ताच्या जीवननिष्ठेतून लोकशाही व समाजवाद या ध्येयांची प्रेरणा ज्यांनी घेतली, त्यांनी त्या ध्येयांच्या संस्थापनेसाठी खिस्ताने उपदेशिलेल्या अहिंसक मार्गाचा उपयोग केला नाही. यामुळे या ध्येयांनी प्रेरित होऊन केलेल्या प्रयत्नांतून खरी लोकशाही व खरा समाजवाद यांचा उदय न होता लोकशाहीला धनिकशाहीचे आणि समाजवादाला हुकूमशाहीचे स्वरूप प्राप्त झाले. युरोपीय लोकशाही धनिकशाहीच्या आहारी गेल्यामुळे तिच्यातून साम्राज्यशाहीचा उदय झाला आणि समाजवादी क्रांतीने हिंसक साधनांचा अवलंब केल्यामुळे हुकूमशाहीचे सर्वंकष स्वरूप तिला प्राप्त

झाले. यामुळे आधुनिक युरोपात निर्माण झालेल्या संस्कृतीची दोन शकले पडलेली आज दिसत आहेत आणि त्यांच्या संघर्षातून युरोपीय संस्कृतीची राखरांगोळी होत आहे.

आधुनिक युरोपीय संस्कृतीचा हा इतिहास लक्षात घेऊनच महात्मा गांधींनी लोकशाही व समाजवाद यांच्या संस्थापनेसाठी कराव्या लागणाऱ्या क्रांतीचा अहिंसक मार्ग सत्याग्रहाच्या रूपाने शोधून काढिला. सत्याग्रह हा एक सामाजिक क्रांतीचा मार्ग आहे आणि या सामाजिक क्रांतीचे उद्दिष्ट मानव समाजात सत्ययुगाची संस्थापना करणे हे आहे असे महात्मा गांधींनी अनेकवार प्रतिपादन केले होते. त्याचप्रमाणे या अभिप्रेत सामाजिक क्रांतीचे स्वरूप लोकशाही व समाजवादी असेच असणार हेही त्यांनी वारंवार बोलून दाखविले होते.

असे असले तरी लोकशाही राज्य आणि समाजवादी क्रांती हे विचार अथवा ही ध्येये आधुनिक युरोपातून इकडे आली असल्यामुळे आणि आधुनिक युरोपीय संस्कृती ही केवळ भौतिकवादी असल्यामुळे त्यांचा सत्याग्रहाच्या आध्यात्मिक मार्गाशी अथवा निष्ठेशी कसा मेळ बसवावयाचा याचा उलगडा अनेक विचारवंत समाजवाद्यांना व गांधीवाद्यांना झालेला नव्हता. पण भूदान आंदोलन सुरू झाल्यापासून समाजवादी व गांधीवादी म्हणविणारे बहुतेक सर्व विचारवंत या आंदोलनातून आपणास अभिप्रेत असणारी सामाजिक व आर्थिक क्रांती घडून येणार आहे असे म्हणून त्या आंदोलनात सामील झाले आहेत. आचार्य विनोबा भावे यांनी "या आंदोलनास सर्व पक्षांनी पाठिंबा दिल्यास सामाजिक व आर्थिक क्रांती घडून येऊन एकवर्ग समाज स्थापन होईल आणि दंडधारी राज्यसंस्थेची गरज न ठेविता सर्व समाज आपले नियमन व नियंत्रण स्वयंप्रेरित अनत्याचारी व सर्वोदयनिष्ठ सेवावृत्तीने करू लागेल" असे वारंवार घोषित केले आहे. त्यांच्या या घोषणांतून समाजवादी क्रांतीचे सर्व रहस्य अंतर्भूत झालेले आहे हे कोणाही विचारवंतास पटण्यासारखे आहे. सत्याग्रहाच्या आध्यात्मिक निष्ठेतून लोकशाहीचे व समाजवादी क्रांतीचे ध्येय कसे निर्माण झाले याबद्दल आश्चर्य वाटणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की आधुनिक युरोपातही या ध्येयांचा उदय खिस्ताच्या आध्यात्मिक संदेशातूनच झालेला आहे. खिस्ताने वर्णिलेले परमेश्वरी साम्राज्य भूतलावर अवतीर्ण व्हावे आणि त्याने उपदेशिल्याप्रमाणे विश्वकुटुंबाची वृत्ती धारण करून समाजातील सर्व घटकांना परस्परांशी समतेने व बंधुभावनेने वागून सर्वांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करावे हेच ध्येय युरोपातील समाजवाद्यांनीही पुरस्कारिलेले आढळते. फक्त या ध्येयाच्या संस्थापनेसाठी त्यांनी अनुसरलेला मार्ग खिस्ताच्या शिकवणीशी पूर्णपणे विरोधी असा आहे. व म्हणूनच म. गांधींचा मार्क्सवादी क्रांतिकारकांना विरोध होता. पण हा विरोध व्यक्त करीत असता त्यांनी लोकशाहीच्या व समाजवादी क्रांतीच्या ध्येयांना केव्हाही विरोध दर्शविला नाही. इतकेच नव्हे तर प्रत्येक वेळी त्या ध्येयांचा पुरस्कारच केलेला आढळून येईल. ...

## मालकीहक्काविरुद्ध क्रांती

अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध लोकसत्ताक क्रांती होत असता, सत्याग्रहाच्या उपासकांनी लोकसत्तेच्या बाजूने लढा करण्यास पुढे यावे हे म. गांधींनी स्वतःच्या नेतृत्वाने प्रत्यक्षच दाखवून दिले. पण भारतात स्थापन झालेली लोकसत्ता धनिकांच्या हाती जाऊ नये म्हणून मालकी हक्काविरुद्ध सत्याग्रही क्रांती करून संपत्तीवरील व्यक्तींचे स्वामित्व नाहीसे करण्याचे आणि वर्गहीन समाज निर्माण करण्याचे कार्य त्यांच्या पुढील पिढीला करावे लागत आहे. या कार्यास प्रारंभ करण्याचे श्रेय भूदान आंदोलनाचे पुरस्कर्ते आचार्य विनोबा यांनी संपादन केले आहे. लोकसत्तेची स्थापना आणि तिचे शुद्धीकरण ही दोनही कार्ये सत्याग्रहाने व्हावयाची तर समाजाची उभारणी वैयक्तिक धनसंग्रहावर होता कामा नये, हे म. गांधींचे असंग्रहाचे तत्त्व भारतीय लोकसत्तेच्या आजच्या राज्यघटनेत अंतर्भूत झालेले नाही. ही राज्यघटना प्रचलित समाजातील द्विवर्ग आर्थिक घटना आणि वैयक्तिक धनसंग्रह यांच्या रक्षणाच्या धोरणावर उभारलेली आहे. यामुळेच जमिनीवरील वैयक्तिक स्वामित्व नष्ट करण्याची सुधारणा करणारे कायदे ही राज्यघटना बदलल्या वाचून करिता येत नाहीत, हाच समाजवादी विचाराच्या लोकांचा तिच्यावर मूलग्राही आक्षेप आहे. आणि गांधीवादी म्हणविणाऱ्यांनाही त्या राज्य घटनेत गांधीवादी तत्त्वांचा अंतर्भाव झाला आहे असे म्हणता येत नाही. असे असले तरी ही राज्यघटना आज राष्ट्रात प्रस्थापित झाली असून ती बहुमान्यही झालेली आहे असे म्हणता येईल, कारण ही राज्यघटना बनविणारा व तिच्यात मूलग्राही फरक करू न इच्छिणारा राजकीय पक्ष आज सार्वत्रिक निवडणुकीनंतर अधिकारावर आलेला आहे. अशा परिस्थितीत आजच्या सामाजिक व आर्थिक घटनेत बद्धमूल झालेले व राज्यघटनेने सुरक्षित बनविलेले खाजगी धनसंग्रहाचे तत्त्व बदलून घेऊन सामाजिक स्वामित्वाचे तत्त्व समाजाकडून व राज्यसंस्थेकडून मान्य करवून घेण्याची क्रांती कशी घडवून आणावयाची हाच आजच्या भारतापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे हा प्रश्न आपल्या हाती घेऊन तो विशिष्ट कालमर्यादेत सोडवून दाखविण्याची प्रतिज्ञा आचार्य विनोबा यांनी केली आणि या कार्यास समाजवादी पक्षाप्रमाणे अधिकारारूढ काँग्रेस पक्षानेही आपला नैतिक पाठिंबा दिला. याचवेळी खाजगी मालकीहक्काच्या आधारावर उभारलेल्या आर्थिक घटनेचे व राज्यघटनेचे जीवित नैतिक दृष्टीने संपुष्टात आले. समाजवादी क्रांतीच्या तत्त्वाला सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा, इतकेच नव्हे तर सत्याग्रही आंदोलनाचाही पाठिंबा देऊन आजच्या भारतीय लोकशाहीच्या राज्यघटनेचा विधाता असा जो काँग्रेसपक्ष त्याचाही नैतिक पाठिंबा मिळवून देण्याचे महान कार्य आचार्य विनोबा यांनी प्रत्यक्ष करून दाखविले आहे. सतराव्या शतकातील ब्रिटनमधील प्युरिटन क्रांती व अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रान्समध्ये झालेली फ्रेंच क्रांती यांपैकी कोणत्याही क्रांतीच्या वेळी खाजगी मालकी हक्काच्या तत्त्वाला एवढा जबरदस्त नैतिक आघात पोहचलेला नव्हता. भूदान आंदोलनातून जनतेमध्ये जी स्वार्थत्यागाची व तत्त्वनिष्ठेची क्रांतिकारक प्रेरणा जागृत होत आहे, त्या प्रेरणेतून

एक नैतिक विचारक्रांती घडून येत आहे. ही विचारक्रांती अखेरीस या राष्ट्रात सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती घडवून आणल्यावाचून राहणार नाही. ज्या लोकांना भारत स्वतंत्र झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या सत्याग्रही आंदोलनाची अथवा क्रांतीची भाषा खपत नव्हती, त्याच लोकांना आता सामाजिक व आर्थिक क्रांतीची घोषणा करावी लागत आहे. ही त्यांची घोषणा प्रत्यक्ष क्रांती घडवून आणण्याचा मार्ग चोखाळणारांना उपकारक ठरल्यावाचून राहणार नाही. देशातील सुप्त जनता जागृत होऊन ज्या क्रांतीची घोषणा करू लागते ती क्रांती घडून येण्यास केवळ निश्चयाच्या बळाचीच आवश्यकता असते. हे निश्चयाचे बळ जनतेच्या अंगी जागृत करण्याचे कार्यच आचार्य विनोबा यांच्या-सारख्या तपोधनांनी करावयाचे असते. आज ते कार्य सुरू झालेले आहे व त्याची चिन्हे स्पष्ट स्वरूपाने जनतेत दिसू लागली आहेत.

## अध्यात्मवृत्ती आणि सामाजिक क्रांती

भारतात राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा चालू असताना त्याला आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा विचार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस स्वामी विवेकानंद यांच्या काळापासून पुढे आला. म. गांधींनी या आध्यात्मिक अधिष्ठानाचे स्वरूप अधिक विशद केले आणि त्याचे रूपान्तर अहिंसक लढ्यात केले. यामुळे भारतीय राष्ट्रवाद हा आध्यात्मिक व अहिंसक वृत्तीचा झाला व तो अंतर्मुख बनला. भारतीय राष्ट्रवादाला असे अंतर्मुख स्वरूप प्राप्त होताच राष्ट्रीय क्रांतीच्या लढ्याचे रूपांतर सामाजिक व आर्थिक क्रांतीत होण्याची प्रवृत्ती त्यात स्पष्टपणे दिसू लागली. ही प्रवृत्ती वाढवून तिचे सामाजिक व आर्थिक क्रांतीत विकसन व संवर्धन करण्याचे कार्य आज आचार्य विनोबा हे करीत आहेत. भारतीय राष्ट्रवादानेच असे अंतर्मुख बनून सामाजिक व आर्थिक क्रांतीचे कार्य सुरू केले असल्या-मुळे या राष्ट्रात राष्ट्रवादाला युरोपखंडातल्याप्रमाणे प्रतिगामी स्वरूप प्राप्त झाले नाही. अध्यात्मनिष्ठा आणि अहिंसावृत्ती यांच्या बळावर तोच राष्ट्रवाद समाजवादी क्रांतीचे कार्य करू लागला आहे. राष्ट्रीय लढ्याच्या काळात राष्ट्रवाद व समाजवाद या दोन शक्ती एकाच कॉंग्रेस संस्थेत नांदत होत्या. आज त्याच शक्ती कॉंग्रेस पक्ष व समाजवादी पक्ष अशा राजकीय पक्षांमध्ये विभागल्या गेल्या असल्या तरी त्या दोनही शक्तींचे मुख समाजवादी दिशेलाच वळलेले आहे. या दोनही पक्षांना सामाजिक क्रांतीच्या आध्यात्मिक व अहिंसक अधिष्ठानाचे महत्त्व पटलेले आहे. अहिंसक क्रांतीच्या मार्गाने कमी-अधिक वेगाने प्रगती करू इच्छिणारे कॉंग्रेस व प्रजासमाजवादी असे दोन राजकीय पक्ष आज या देशात निर्माण झाले आहेत असे म्हणण्यास काही प्रत्यवाय नाही. या दोनही पक्षांचे राजकारण समाजवादी दिशेनेच चालू असले तरी समाजवादी क्रांतीचे भवितव्य, त्यांपैकी तीव्र वेगाने प्रगती करू इच्छिणाऱ्या राजकीय पक्षाला जनतेचा कितपत व किती लवकर पाठिंबा मिळतो, यावर अवलंबून आहे.

सामाजिक क्रांतीचे कार्य आध्यात्मिक वृत्तीने चालू ठेविले असता या क्रांतीसाठी कराव्या लागणाऱ्या लढ्याचे स्वरूप दोन वर्गांच्या स्वार्थातील लढा असे न राहता त्याला न्यायसंस्थापनेच्या लढ्याचे स्वरूप प्राप्त होते. न्यायसंस्थापनेसाठी प्रत्येकाने आपला स्वार्थ सोडला पाहिजे आणि त्या स्वार्थत्यागामुळे भोगावे लागणारे क्लेश हे आनंदाने सहन केले पाहिजेत. ही वृत्ती चेतविण्याचे कार्य सुरू झाले असता वर्गावर्गातील द्वेषभावना जागृत होत नाही. हा लढा अहिंसक साधनांनीच चालू असला तरी समाजातील सर्व वर्गांत न्यायसंस्थापनेची प्रेरणा जागृत होते व समाजाची न्यायबुद्धी संघटित होऊन ती सामाजिक अन्यायाविरुद्ध असहकार करण्यास प्रवृत्त होते. अशा रीतीने रूढ सामाजिक व आर्थिक घटनेमुळे जे अन्याय चालू असतात व त्यातून जी द्वेषभावना फैलावत असते त्या अन्याया-विरुद्ध सामाजिक न्यायबुद्धीने असहकार पुकारताच तो अन्याय चालू ठेवणारांचे सामर्थ्य नष्ट होते. अशा रीतीने सामाजिक क्रांतीचे कार्य हे दोन वर्गांतील स्वार्थांमधील झगडा चालू ठेवण्याचे काम नसून ते सामाजिक न्यायबुद्धीला जागृत करून तिचा प्रभाव सामाजिक व आर्थिक घटनेवर पाडण्याचे कार्य आहे अशी दृष्टी सत्याग्रही क्रांतितंत्रामुळे प्राप्त होऊ लागते. या जागृत सामाजिक न्यायबुद्धीचा प्रभाव समाजावर पाडीत असता व त्या समाजाच्या घटनेचे परिवर्तन घडवून आणीत असता अत्याचाराचा व हिंसेचा उपयोग करावयाचा नाही या सत्याग्रही निष्ठेमुळे या संघर्षातून एकपक्षीय हुकूमशाहीची निर्मिती होण्याचा धोका टळतो. सामाजिक क्रांतीचे कार्य हे सामाजिक घटनेला न्यायाचे, नीतीचे अथवा खऱ्या धर्माचे अधिष्ठान निर्माण करण्याचे कार्य आहे अशी निष्ठा जागृत झाली म्हणजे समाजाच्या बाह्य घटनेतील क्रांतीबरोबरच त्याच्या अंतरंगातही क्रांती घडून येऊ लागते. काम, क्रोध आणि लोभ या तीन वृत्तींना चालना देऊन नव्हे तर या तीन वृत्तींतून मुक्त होऊन समाजाला आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून देणारे सत्याग्रही नेते आपल्या उदाहरणाने आणि सामाजिक क्रांतीवरील अविचल निष्ठेने समाजाच्या अंतरंगात ही क्रांती घडवून आणतात. सामाजिक घटनेतील बाह्य क्रांतीच्या बरोबर ही अंतरंगक्रांती घडवून आणणे किंबहुना या अंतरंगक्रांतीच्या प्रेरणेतूनच बाह्य सामाजिक क्रांतीचे संचालन करीत राहणे हेच या आध्यात्मिक व अहिंसक क्रांतीचे वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व आहे. या क्रांतीतून निर्माण होणारा एकवर्ग समाज अखेरीस समाजवादातून आत्मराज्याकडे म्हणजेच दण्डहीन सामाजिक अवस्थेकडे जाण्याचा मार्ग मानवाला दाखवून देऊ शकेल. मानवी अंतःकरणा-तील न्यायबुद्धी अनेक प्रकारच्या अन्यायांनी व जुलुमांनी दडपून गेली असता व सर्वत्र अन्यायाचे व जुलुमाचे साम्राज्य पसरले असता त्या न्यायबुद्धीला जागृत, संघटित व प्रभावी बनविण्याचे हे क्रांतीतंत्र समाजाच्या भौतिक गरजांप्रमाणे नैतिक व आध्यात्मिक गरजांचेही प्रश्न सोडवून दाखविणारे आहे. याच्या अवलंबनाने समाजधारणा आणि आत्मोन्नती किंवा लोकसंग्रह व मोक्षप्राप्ती ही दोन्ही कार्ये मानवाला एकदमच साधता येतील. या क्रांतिकार्यात भौतिक व आत्मिक उन्नतीत भेद किंवा विरोध उरत नाही.

म्हणूनच हा क्रांतीचा मार्ग मानवसमाजाला जसा भौतिक आपत्तींतून मुक्त करू शकेल तसाच तो त्याला काम, क्रोध व लोभ या आत्मविनाशक त्रिविध नरकाच्या द्वारांपासून दूर नेऊन आत्मप्राप्तीचा स्वर्गही ऐहिक जीवनात उपभोगण्याचा मार्ग दाखवून देऊ शकेल. आधुनिक युरोपांत भौतिक व आत्मिक उन्नतीकडे अद्वैतभावनेने पाहण्याची ही दृष्टी नष्ट झाल्यामुळेच मानव संस्कृतीवर आज आपत्तींची परंपरा ओढवली आहे. या आपत्तींच्या परंपरेतून मुक्त होण्याचा मार्ग सत्याग्रही तंत्राने समाजवादी क्रांती घडवून आणल्याने मानव समाजाला दिसू लागेल. हे कार्य करण्यास भूदानयज्ञाच्या आंदोलनाने सुरुवात केली आहे. हे पाहून भारतीय जनतेत आत्मविश्वासाचा उत्साह आज निर्माण होत आहे. या उत्साहाला लवकरच भरती येईल आणि भारतातील सर्व राजकीय पक्ष या क्रांतिकार्यात वेगाने ओढले जातील अशी आशा आज वाटू लागली आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर काही काळ सर्वत्र फैलावलेला नैराश्याचा अंधार नष्ट करून या उत्साहाचा प्रकाश पसरविण्याचे कार्य भूदानयज्ञाचे आंदोलन आज मोठ्या प्रमाणावर करीत आहे. याच दृष्टीने हे आंदोलन म्हणजे सत्याग्रही समाजवादाच्या संस्थापनेचेच आंदोलन होय असे मी समजतो.

[*नवभारत, मे १९५४, पृ. १ ते ११*]

## २२

# भूदान यज्ञ आणि समाजवादी क्रांती

निरपेक्ष क्रांतीचे उपासक गरीब भूदात्यांतून निर्माण होत आहेत व ते जेवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील तेवढा या क्रांतीचा प्रभाव अधिक पडेल आणि तिच्यासाठी जो सत्याग्रह संग्राम करावा लागेल असे वाटत आहे तो संग्राम प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वीच त्या क्रांतीला कायदेशीर व घटनात्मक मूर्त स्वरूप देण्याचे काम प्रचंड बहुमताने निवडून आलेला व अधिकारारूढ बनलेला एखादा पक्ष सहज करून दाखवील. अशा रीतीने या सामाजिक क्रांतीची मूर्ती भारतात स्थापन होऊन तिच्यामध्ये सत्याग्रहाने प्राणप्रतिष्ठा झाली तर त्या क्रांतीविरुद्ध प्रतिक्रांतीचा ध्वज उभारण्याचे धैर्य अथवा नैतिक बल या राष्ट्रातील अथवा बाहेरील कोणत्याही शक्तीपाशी असणार नाही.

आचार्य विनोबा भावे यांनी तयार केलेल्या भूदान यज्ञांच्या आंदोलनातून भारतात समाजवादी क्रांती घडून येणार आहे असे आम्ही म्हणतो. हे मत आता समाजवादी पक्षाच्या अनेक सभासदांना पटलेले आहे व समाजवादी पक्षाने आपल्या सभासदांनी व कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सक्रिय भाग घ्यावा असा ठरावही केला आहे. हे खरे असले तरी स्वतः आचार्य विनोबा हे समाजवादी पक्षाचे इतकेच नव्हे तर कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासद नाहीत आणि ते आपणास समाजवादी ही संज्ञाही लावून घेऊ इच्छित नाहीत. ते स्वतःस सामाजिक क्रांतिकारक व आर्थिक क्रांतिकारक असे म्हणवून घेतात. त्यांना राजकीय पक्ष या संस्थेप्रमाणे राज्य ही संस्थाही अंतिम दृष्टीने मान्य नाही. ते अराज्य-वादी आहेत असे वाटल्यास तुम्ही म्हणा, मी सत्याग्रही आहे व मला रामराज्य स्थापन करावयाचे आहे, अशी त्यांची भाषा असते. तथापि त्यांनी जे भूदान यज्ञाचे आंदोलन सुरू केले आहे त्या आंदोलनातून अखेरीस म्हणजे फार नजीकच्या काळात आजच्या लोकशाही राज्याला समाजवादी लोकशाहीचे स्वरूप येणार आहे अशी आमची खात्री आहे आणि म्हणूनच समाजवादी पक्षाने या आंदोलनात सक्रिय भाग घ्यावा असे आमचे मत आहे.

म. गांधींना अभिप्रेत असणारे रामराज्य त्यांनी केलेल्या आंदोलनातून निर्माण झालेले नसले तरी त्या आंदोलनातून पार्लमेंटरी स्वराज्य किंवा राष्ट्रीय लोकशाही राज्य स्थापन झालेले आहे. त्याचप्रमाणे आज आचार्य विनोबा भावे जे भूदान यज्ञाचे आंदोलन निर्माण करीत आहेत त्यातून भारतात लोकशाही समाजवादाची घडण होत असून फार थोड्या काळात लोकशाही पद्धतीने येथील आर्थिक घटना समाजवादी आकार धारण करील अशी आशा आम्हास वाटत आहे.

## स्वामित्वभावनेत क्रांती

समाजवादी क्रांतीतील खरे रहस्य अथवा अंतरंग संपत्तीच्या स्वामित्वासंबंधीची रूढ कल्पना बदलून घेणे ही आहे. जमिनी, कारखाने इत्यादी उत्पादन साधने वैयक्तिक अथवा खाजगी मालकीची न राहता त्यांचे स्वामित्व समाजाकडे आले पाहिजे. ही वैचारिक क्रांती घडवून आणून उत्पादन साधनांवर समाजाची सामुदायिक मालकी स्थापन करणे हे आपले साध्य आहे असे विनोबांनी निःसंदिग्ध शब्दात जाहीर केले आहे. परवाच्याच ता. २८ मे १९५३ च्या भूदान यज्ञ पत्रिकेत त्यांनी कम्युनिस्ट मित्रांना दिलेली उत्तरे प्रसिद्ध झालेली आहेत. त्यात ते म्हणतात "जमिनीवर कोणाचाच स्वामित्वाचा हक्क राहता कामा नये ही गोष्ट मी समाजाला शिकवू इच्छितो. श्रीमंत जसे स्वतःला आपल्या जमिनीचे मालक समजतात तसे गरीबही आपल्या एवढ्याशा जमिनीचे आपण मालक आहो असे समजतात. या दोघांचीही स्वामित्वाच्या भावनेपासून मी मुक्तता करू पाहतो."

ज्यांना आपल्या समाजात लोकशाही पद्धतीने समाजवादाची संस्थापना करावयाची असेल त्यांना या स्वामित्वासंबंधीच्या वैचारिक क्रांतीचे महत्त्व पटवून देण्याची फारशी गरज नाही. गावातील सर्व जमिनी वैयक्तिक कौटुंबिक मालकीच्या नसून त्या सर्व गावाच्या मालकीच्या आहेत हा विचार व ही भावना खेड्यापाड्यांतील शेतकरी वर्गात व्यापकत्वाने फैलावल्यावाचून लोकशाही पद्धतीचा समाजवाद निर्माण होऊ शकणार नाही. रशियातील क्रांतीच्या वेळी मोठमोठ्या जमीनदारांच्या जमिनी छोट्या शेतकऱ्यांना वाटून दिल्यानंतर या छोट्या शेतकऱ्यांचे स्वामित्व विसर्जन करण्याची क्रांती घडवून आणताना लेनिनला माघार घ्यावी लागली आणि स्टॅलिनला पक्षाची हुकूमशाही गाजवावी लागली. चीनमध्ये जमिनीच्या स्वामित्वासंबंधीच्या विचारात क्रांती अर्धवटच घडून आलेली आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता मोठे व छोटे जमीन मालक यांच्या विचारात व भावनात स्वामित्वा-संबंधी क्रांती घडवून आणण्याचे कार्य किती महत्त्वाचे आहे व किती बिकट आहे याची कल्पना येऊ शकेल. आज आपल्या राष्ट्रात सत्याग्रही तत्त्वज्ञान प्रतिष्ठा पावलेले आहे. त्या तत्त्वज्ञानाचे मूर्तिमंत आचार्य विनोबा ही क्रांती घडवून आणण्याचे राष्ट्रव्यापी आंदोलन करण्यास पुढे सरसावले आहेत. श्री. जयप्रकाश आणि पं. नेहरू यांच्यासारखे राजकीय

नेते या आंदोलनाला तात्त्विक व नैतिक पाठिंबा देत आहेत. इतकेच नाही तर त्यांनी आपल्या पक्षाची या कार्यास अधिकृत संमतीही मिळविली आहे. या सर्व शक्तींचे पाठबळ या आंदोलनामागे उभे राहिल्यास जमिनीच्या स्वामित्वासंबंधी वैचारिक क्रांती घडून येण्यास फार काळ लागणार नाही. एकदा ही वैचारिक क्रांती सर्वसामान्य जनतेच्या अंतःकरणात व्यापकतेने घडून आली तर जमिनीवरील स्वामित्व समाजाकडे कायदेशीर पद्धतीने देण्यास जनतेची मान्यता मिळवणारा पक्ष अधिकारारूढ बनेल आणि समाजाचे स्वामित्व प्रस्थापित करण्यास लागणारे राज्यघटनेतील बदल व इतर कायद्यातील सुधारणा तो सहज आणू शकेल.

जमिनीच्या स्वामित्वासंबंधीचे सामाजिक मालकीचे हे तत्त्व कारखान्यांच्या मालकीसही लागू केले पाहिजे, हे मतही आचार्य भावे यांनी मान्य केले असून भूदान यज्ञाच्याप्रमाणे संपत्तिदान यज्ञाचा संकल्पही त्यांनी जाहीर केलेला आहे. अशा रीतीने विचार केल्यास समाजवादी क्रांतीला आवश्यक असणारी वैचारिक क्रांती भूदान यज्ञाच्या रूपाने किती मोठ्या प्रमाणावर घडून येत आहे ते दिसून येईल. आपल्या राष्ट्रात निर्माण झालेल्या व होत असलेल्या या वैचारिक समाजक्रांतीचे महत्त्व जर केवळ समाजवादी पक्षच नव्हे तर कम्युनिस्ट पक्षही ओळखील, तर तो पक्षही आपला पूर्वग्रह सोडून देऊन या राष्ट्रात लोकशाही पद्धतीने समाजवादी क्रांती घडून येणे शक्य आहे असे मानू लागेल.

## वर्गहीन समाजरचना

ज्याप्रमाणे उत्पादन साधनांच्या स्वामित्वासंबंधी वैचारिक क्रांती घडवून आणणे हे भूदान यज्ञाचे एक आवश्यक अंग आहे त्याचप्रमाणे समाजातील आर्थिक वर्गभेद नष्ट करून मानवामानवामधील बंधुभावनेला अडथळा करणारी वर्गसंस्था नाहीशी करणे व वर्गहीन समाज निर्माण करणे, हेही भूदान यज्ञाचे व संपत्तिदान यज्ञाचे एक साध्य आहे. समाजवादी विचारात या वर्गहीन समाजाच्या ध्येयाला प्रथमस्थान देण्यात येत असते. तात्पर्य, संपत्तीचे सामाजिक स्वामित्व आणि वर्गहीन समाजरचना ही जी दोन समाजवादी क्रांतीत अंतर्भूत होणारी सामाजिक ध्येये आहेत त्यांना भूदान यज्ञाच्या आंदोलनाने धर्मभावनेचा व अध्यात्मवृत्तीचा आधार मिळवून दिलेला आहे. भांडवलदार समाजरचना ही केवळ मानवाच्या स्वार्थनिष्ठेवर व लोभप्रवृत्तीवर उभारलेली असल्यामुळे अधार्मिक आहे आणि आध्यात्मिक दृष्टीने मानव संस्कृतीला अधोगतीस नेणारी आहे, अशा उच्च भूमिकेने हे भूदान यज्ञाचे आंदोलन भारतात निर्माण झाले असल्यामुळे त्या आंदोलनात मानवी अंतःकरणातील धर्मभावनेस आणि आत्मप्रेरणेला आवाहन देण्यात येत आहे. सत्याग्रह हे एक सामाजिक क्रांतिशास्त्र आहे. आणि या सामाजिक क्रांतिशास्त्रात धर्मांचे व अध्यात्माचे क्रांतिकारक स्वरूप प्रकट होत आहे व होणार आहे असे जे वारंवार सांगण्यात येत असते त्याचा प्रत्यक्ष अनुभव या भूदान यज्ञाच्या आंदोलनास प्रारंभ

झाल्यापासून भारतीयांना येऊ लागला आहे. आज जगात प्रचलित असलेले सर्व धर्म अथवा सर्व धर्मसंस्था सांप्रदायिक दुराग्रही आणि प्रतिगामी बनलेल्या असल्या तरी मानवी अंतःकरणातील धर्मभावना व आत्मप्रेरणा या मूलतः पुरोगामी व क्रांतिकारक आहेत हे मानवसमाजाच्या प्रत्ययास आणून देणे आणि वर्गहीन समाजाच्या निर्मितीस व धारणेस अवश्य असणारा नवा मानवधर्म जगाला दाखवून देणे हेच भारतात निर्माण झालेल्या सत्याग्रहदर्शनाचे ऐतिहासिक कार्य आहे.

मानवी संस्कृतीच्या उभारणीत मालमत्तेवरील वैयक्तिक स्वामित्व आणि सामाजिक वर्ग-संस्था यांना फार प्राचीन काळापासून मान्यता देण्यात आलेली असल्यामुळे समाजवादी क्रांती ही अधार्मिक आहे आणि मानवसमाजाच्या आत्मिक उन्नतीस विघातक आहे अशी दुर्मते फार मोठ्या प्रमाणावर फैलावण्यात आलेली आहेत. भांडवलदार वर्ग आणि भांडवलदार संस्कृतीचे उपासक या दुर्मताचा आधार घेऊन आपले आसन स्थिर करीत असतात आणि आपणास नैतिक व आध्यात्मिक प्रतिष्ठा मिळवून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. आज अमेरिकेमध्ये ज्या भांडवलदार लोकशाहीची स्तुतिस्तोत्रे गाण्यात येत आहेत व जी भांडवलदार संस्कृती आदर्श मानवसंस्कृती म्हणून अमेरिकेकडून जगापुढे मांडण्यात येत आहे त्या भांडवलदार लोकशाहीला व त्या संस्कृतीला खऱ्या धर्माचा व अध्यात्माचा आधार नाही. हे भारतात निर्माण झालेल्या व होत असलेल्या क्रांतिकारक धर्मभावनेवरून व आत्मप्रेरणेवरून जगाच्या निदर्शनास येणार आहे. त्याचप्रमाणे संपत्ती-वरील सामाजिक स्वामित्वाची आणि वर्गहीन समाजाची संस्थापना कम्युनिस्टांच्या हुकूम-शाही क्रांतितंत्राकडून होणार नसून ती सत्याग्रहाच्या अहिंसक क्रांतितंत्राने होणार आहे याचा अनुभव कम्युनिझमच्या व मार्क्सवादाच्या उपासकांस आणून देण्याचे कार्यही याच सत्याग्रहदर्शनाला करावयाचे आहे. जोपर्यंत सत्याग्रह ही शक्ती केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यातच गुंतलेली होती, तोपर्यंत ही शक्ती सामाजिक सर्वांगीण क्रांतीच्या कामी कशी उपयोगी पडणार याबद्दल शंका वाटणे साहजिकच होते. म. गांधींच्या निधनानंतर राष्ट्रीय राजकारणात ज्या प्रतिगामी घटना घडून आल्या त्यामुळे ही शंका अधिक वाढण्याचा संभवही होता. परंतु आता या शक्तीने सामाजिक व आर्थिक क्रांतीची उघड घोषणा करून तिची प्रेरणा सर्वसामान्य जनतेत प्रत्यक्ष निर्माण केली असताही अशा प्रकारची शंका धारण करणे हे संयुक्तिक म्हणता येणार नाही.

## सामाजिक क्रांतीचे सैनिक

कोणत्याही मार्गाने सामाजिक क्रांती घडवून आणावयाची असली तरी त्या क्रांतिकार्याला आपले सर्वस्व अर्पण करणारे सैनिक पुढे यावे लागतात. ही क्रांती सत्याग्रही मार्गाने घडवून आणावयाची असल्याने या कार्यासाठी जे सैनिक जमवावयाचे ते सैनिकही शुद्ध सत्याग्रही वृत्तीचेच असले पाहिजेत हे उघड आहे. त्यातून जी क्रांती केवळ नैतिक व

आत्मिक बलाने घडवून आणावयाची आहे अशा क्रांतीचे सैनिक त्या क्रांतीच्या तत्त्वाचे सक्रिय उपासक असतील तरच ते आपला नैतिक प्रभाव समाजावर पाडू शकतील हे उघड आहे. भूदान यज्ञाचे आंदोलन सुरू केले असता जे जमिनीचे मोठे मालक आहेत त्यांनीच केवळ जमिनीचे दान करावयाचे असे नसून जे छोटे मालक आहेत त्यांनीही या भूदान यज्ञात स्वयंप्रेरणेने भाग घ्यावा असे मत आचार्य विनोबा प्रतिपादन करीत असतात. या मताचे रहस्य व कार्य विशद करून सांगत असताना आचार्य विनोबांनी फार समर्पक व बिनतोड असा युक्तिवाद केलेला आहे. हा युक्तिवाद समजून घेतल्यास त्यांना आपण करीत असलेल्या क्रांतिकार्याचे स्वरूप किती यथार्थ आकलन झालेले आहे याची कल्पना येते. यासंबंधी ते म्हणतात,

"मी कित्येक वेळा सांगितले आहे की आम्ही आमची सेना गरीब भूदात्यांतून उभी करीत आहोत. उच्च-नीच भेद आम्हास नाहीसे करावयाचे आहेत आणि अशी सेना तयार करावयाची आहे की जिच्या साह्याने आम्ही आमची लढाई लढू शकू. ज्यांनी दान केले आहे, ज्यांनी काही त्याग केला आहे किंवा ज्यांनी आमच्याबद्दल सहानुभूती दाखविली आहे तेच सारे आमचे सैनिक होतील. श्रीमंतांची हृदये आमच्या आजच्या प्रयत्नांनी खुली झाली नाहीत तर आम्हाला आणखी एक पाऊल पुढे टाकावे लागेल .... माझ्या सेनेचे सामर्थ्य इतके जबरदस्त असेल की तिला कदाचित लढाईही करावी लागणार नाही. "हुंकारेणैव धनुष्यः" तीर सोडावयाचीही जरूरी राहणार नाही. धनुष्याचा नुसता टणत्कार ऐकूनच समोरच्या शत्रूंची दाणादाण उडावी, तसे आमच्या सेनेचा नुसता हुंकार ऐकूनच आमचे काम फत्ते होईल." या शब्दात एक प्रकारचा निर्धारही प्रकट झालेला आहे. हा आत्मविश्वास बसत असून एक प्रकारचा निर्धार हे दोनही वास्तववादी आहेत, यात केवळ आदर्शवादाचे स्वप्नरंजन नाही हे ज्यांना दिसून येईल त्यांना भूदान यज्ञाच्या आंदोलनात असणारी क्रांतिकारक शक्ती प्रतीत झाल्याबाचून राहणार नाही. ...

[*साधना, १३ जून १९५३, पृ. ५ व ८*]

[ "**भूदान यज्ञ आणि समाजवादी क्रांती**" याच शीर्षकाचा लेख आचार्यांनी फेब्रुवारी १९५५ च्या "नवभारता"तही लिहिला आहे. भूदानामुळे भारतातील समाजवादी क्रांती निकट आल्याचा अभिप्राय याही लेखात व्यक्त होतो. शासनमुक्त समाज हे सनातन स्वरूपाचे अमूर्त ध्येय असून समाजवाद हे मूर्त ध्येय आहे असे या लेखात म्हटले आहे.

याच लेखात "भारतात निर्माण होणारा समाजवाद हा सत्याग्रही स्वरूपाचा बनणार आहे व बनला पाहिजे" असे आपले मत १९३० पासूनच असल्याचा उल्लेख केलेला आढळतो.

भूदान यज्ञाच्या प्रभावाचे उदाहरण म्हणून आणि १९५३ नंतरच्या वर्ष-दीडवर्षात भूदान यज्ञाविषयीच्या आचार्यांच्या प्रचंड आशावादात फरक पडलेला नव्हता याचे उदाहरण म्हणून येथे सदर लेखाचा काही भाग घेतला आहे.]

## लोकशाही समाजवाद व शासनमुक्त समाज

प्रस्तुत लेखकाच्या मताने, शासनमुक्त समाज किंवा आत्मराज्य हे नेहमीच अमूर्त राहणारे परंतु समाजातील सर्व व्यवहारांवर आपला प्रभाव गाजविणारे आध्यात्मिक ध्येय राहणार आहे. ते अमूर्त राहूनही समाजातील व्यवहारांवर प्रभाव गाजवू लागले तर आजच्या समाजघटनेत आमूलाग्र क्रांती घडून येऊन भांडवलदार लोकशाहीचे रूपांतर समाजवादी लोकशाहीत व विकेंद्रित समाजवादात होईल. म्हणून आत्मराज्य हे मानवी समाजाचे सनातन अमूर्त ध्येय आणि विकेंद्रित लोकशाही समाजवाद हे त्या अमूर्त आदर्शाचे आजच्या परिस्थितीस अनुरूप असे मूर्त स्वरूप होय असे मी मानितो. आत्मराज्याच्या अमूर्त आदर्शाच्या अभावी लोकशाही समाजवाद हे एक जड समाजघटनायंत्र बनेल आणि लोकशाही समाजवादाच्या अभावी आत्मराज्याचे सनातन ध्येय हे अंतःसृष्टीतूनही लोप पाऊन प्रभावहीन बनेल. म्हणून लोकशाही समाजवादाच्या भोक्त्यांनी आत्मराज्याचे अमूर्त स्वरूप व त्याचा प्रभाव समजून घेऊन त्यासाठी जीवनदान करण्याची वृत्ती स्वीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे आत्मराज्यवाद्यांनी आपल्या सनातन आदर्शाचे आजचे मूर्त स्वरूप म्हणजे विकेंद्रित लोकशाही समाजवाद हेच आहे हे ओळखून भारतात लोकशाही समाजवाद स्थापन करणाऱ्या शक्तींना आपला नैतिक पाठिंबा दिला पाहिजे. या दृष्टीनेच भूदानयज्ञाचे प्रणेते आचार्य विनोबा भावे आणि भारतीय समाजवादाचे मूर्त प्रतीक असे जयप्रकाश नारायण यांचे सहकार्य ही भारतीय इतिहासातील स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची अत्यंत महत्त्वाची आणि भारतीय इतिहासाला नवी कलाटणी देणारी अशी घटना आहे असे मी समजतो. भारतात निर्माण होणारा समाजवाद हा सत्याग्रही स्वरूपाचा बनणार आहे व बनला पाहिजे असे माझे मत १९३० सालापासूनच बनलेले असल्यामुळे, आचार्य विनोबा आणि जयप्रकाश नारायण यांची युती होऊन भारतीय जनतेत क्रांतिकारक आंदोलन सुरू झाल्याचे पाहून मला अत्यंत समाधान झाले. या आंदोलनाचा प्रभाव राष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांवर पडत असून समाजवादाची घोषणा करण्यास कचरणारा अधिकारारूढ काँग्रेस पक्षही आता लोकशाही समाजवाद हेच आपले ध्येय आहे असे घोषित करू लागला आहे. माझ्या मताने हाही एक भूदान यज्ञाचाच प्रभाव आहे....

भारतातील समाजवादी क्रांतीला आजचे सत्याग्रही स्वरूप प्राप्त होत आहे त्याचे श्रेय आचार्य विनोबा आणि साथी जयप्रकाश यांना आहे. महात्मा गांधींनी "आपण समाजवादी आहो आणि भारतात समाजवादी क्रांती घडून आली पाहिजे" असे वारंवार म्हटलेले असले तरी त्यांनी आपला समाजवाद हा भिन्न स्वरूपाचा असणार असेही म्हटले होते. तसेच त्यांनी प्रतिपादिलेला धनिक हे निधिधारक आहेत हा सिद्धांत आणि वर्गसमन्वयाचे त्यांचे धोरण या दोन दृष्टिकोनातून अखेरीस वर्गहीन समाज आणि संपत्तीचे सामाजिक स्वामित्व या दोन कल्पांवर सत्याग्रही क्रांतीची गाडी कशी व केव्हा येणार

याविषयी फार मुग्धता होती. काहींना तर वर्गहीन समाज आणि संपत्तीचे सामाजिक स्वामित्व हे विचार गांधीवादाशी पूर्णपणे विसंगत असल्याचेच वाटत होते. यामुळे म. गांधींच्या वधानंतर सत्याग्रही क्रांतीचा रोख कोणीकडे वळणार याबद्दल जनता बुचकळ्यात पडली होती. अशा परिस्थितीत आचार्य विनोबा भावे यांनी भूदानाचा यज्ञ सुरू करून त्याच्या होमकुंडात संपत्तीच्या खाजगी स्वामित्वाची आहुती द्यावयाची आणि त्यातून अखेरीस वर्गहीन व शासनमुक्त समाज निर्माण करावयाचा असा संकल्प जाहीर केला. यावेळेपासून स्वतंत्र भारतात सत्याग्रही क्रांतीचा रोख संपत्तीच्या खाजगी मालकीविरुद्ध राहील आणि आर्थिक क्रांती करून वर्गहीन समाज स्थापन करणे हेच सर्व सत्याग्रहींचे आजचे आद्य कर्तव्य आहे अशी गांधीवाद्यांची खात्री झाली.

मध्यंतरीच्या काळात जयप्रकाश नारायण यांनी गांधीवादातील साधनशुद्धीचा आणि अनत्याचारी वृत्तीचा सिद्धांत समाजवादी पक्षाकडून मान्य करवून घेतला होता. त्याचप्रमाणे समाजवाद्यांनी मार्क्सवादाची सर्व गृहीततत्त्वे सत्याग्रही दृष्टीने फेरतपासून पाहिली पाहिजेत अशी वृत्ती समाजवादी पक्षात निर्माण केली होती. इतकेच नाही तर मानवी जीवनातील अत्यंत खोल व संकीर्ण समस्या सोडविण्याच्या दृष्टीने भौतिकवाद पुरा पडत नाही आणि म्हणून त्याच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान बनविले पाहिजे असा आपला नवा दृष्टिकोन असल्याची घोषणा केली होती. अशा रीतीने भारतातील समाजवादी क्रांतिकारक आणि सत्याग्रही लोकसेवक हे येथील समाजवादी क्रांती घडवून आणण्यास उत्सुक झाले होते. त्यांना समन्वय करून आणि समाजवादी पक्षाचे प्रजासमाजवादी पक्षात रूपांतर करून जयप्रकाश नारायण यांनी भारतीय राजकारणात सत्याग्रही तत्त्वाच्या अधिष्ठानावर समाजवादी क्रांती करू पाहणारा एक राजकीय पक्ष निर्माण करून त्यात आचार्य कृपलानी व प्रफुल्लचंद्र घोष यांच्यासारख्या निष्ठावंत गांधीवाद्यांचा समावेश करवून घेतला होता. भारतीय समाजवादी शक्तीला हा विशिष्ट आकार देण्यात जयप्रकाश नारायण यांनी फार मोठी मुत्सद्देगिरी प्रकट केलेली असून त्यांनी भूदान-आंदोलनातून निर्माण झालेल्या क्रांतिकार्याला आपले जीवन समर्पण केले हे त्याहूनही मोठे कार्य त्यांनी केलेले आहे. आचार्य विनोबा आणि जयप्रकाश नारायण या दोघांनी भारतात सत्याग्रही क्रांतीला हे जे नवे वळण लावून दिले आहे त्यामुळे भारतात निर्माण झालेल्या सत्याग्रही क्रांतिशक्तीला समाजवादी आकार येणार अशी आता सर्वांची खात्री होत आहे. काँग्रेस पक्षाने लोकशाही समाजवादी ध्येयाची निःसंदिग्ध घोषणा केली हा एक या सत्याग्रही क्रांतिशक्तीचाच प्रभाव आहे.

विनोबा आणि जयप्रकाश हे जी क्रांतिशक्ती निर्माण करीत आहेत ती पक्षातीत राहावी असे त्यांचे धोरण आहे. या धोरणामुळे संपत्तीचे सामाजिक स्वामित्व, वर्गहीन समाज-रचना आणि विकेंद्रित उत्पादन ही तत्त्वे राष्ट्रातील सर्व पक्षांनी मान्य केलीच पाहिजेत

अशी परिस्थिती निर्माण होत आहे. प्रजासमाजवादी पक्षाने आधीच ही तत्त्वे मान्य केली असून कॉंग्रेस पक्षाने सुद्धा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत समाजवादी ध्येयाला मान्यता देऊन बेकारी निवारणाच्या दृष्टीने का होईना, ग्रामोद्योगाला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे अशी मान्यता दिली आहे. म्हणजे नवसमाजाची उभारणी ज्या आर्थिक तत्त्वांवर व्हावयाची ती आर्थिक तत्त्वे आता प्रजासमाजवादी पक्ष आणि कॉंग्रेस पक्ष या दोनही पक्षांना समान बनली आहेत. या पक्षांमधील मतभेद आता नेमस्त आणि जहाल या पक्षांमधील मतभेदासारखा बनलेला आहे. तो मतभेद साध्यासंबंधी नसून त्या साध्याकडे प्रगती करण्याचा वेग तीव्र असावा की मंद असावा आणि हा वेग तीव्र करण्यासाठी कायद्याचा व राजदंडाचा उपयोग किती प्रमाणात करावा यासंबंधीचा हा मतभेद आहे. साध्याचे स्वरूप आणि प्रगतीची दिशा दोघांना समान असल्यामुळे त्यांपैकी एक पक्ष क्रांतिकारक व दुसरा पक्ष प्रतिक्रांतिकारक अशी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका उरला नाही. लोकशाही राज्यात एक पक्ष क्रांतिकारक आणि दुसरा पक्ष प्रतिक्रांतिकारक असा पक्षभेद निर्माण होऊन ते दोन पक्ष एकमेकांचा पाडाव करण्यास उद्युक्त झाले म्हणजे लोकशाही राज्यतंत्र मोडून पडते असा अनुभव १९२० पासून १९४० पर्यंतच्या काळात युरोपखंडात झालेला आहे. आपल्या देशात क्रांतिकारक विरुद्ध प्रतिक्रांतिकारक असे दोन पक्ष निर्माण होत नसून आपल्या लोकशाहीचा विकास तीव्र वेगाने करावा किंवा मंद गतीने करावा अशा प्रकारच्या मतभेदांवर आपले राजकीय पक्ष संघटित होऊ लागले आहेत. ही घटना लोकशाहीला तारक आणि शांततेला पोषक अशीच आहे. हे दोन पक्ष एकमेकांविरुद्ध टीका करीत असता कोणतीही भाषा वापरीत असले अथवा त्यांपैकी प्रत्येकजण प्रतिपक्षासंबंधी कोणतीही भावना धरीत असला तरी त्यांपैकी एक पक्ष समाजवादी क्रांतीच्या आघाडीवर राहणार आणि दुसरा पक्ष समाजवादी क्रांतीच्या पिछाडीवर राहून लोकशाहीला धक्का बसू नये एवढी दक्षता घेणारा पक्ष ठरणार आहे, असे आम्हास वाटते.

या दोन पक्षांच्याहून भिन्न परंतु दोनही पक्षांना अभिप्रेत असणाऱ्या समाजवादी क्रांतीकडे जाण्याचा वेग वाढविणारा असा तिसरा एक सत्याग्रही लोकसेवक वर्ग आचार्य विनोबा निर्माण करीत आहेत. या सत्याग्रही लोकसेवकांचे अंतिम ध्येय शासनमुक्त समाज हे असले तरी तो शासनमुक्त समाज कोणताही राजकीय पक्ष निर्माण करू शकणार नाही हे त्यांना मान्य आहे. लोकशाही राज्यात राजकीय पक्ष असणार आणि अशा राजकीय पक्षांपैकी कोणत्या पक्षाच्या हाती केव्हा राज्ययंत्र द्यावे हे ठरविणे लोकांच्या हातीच राहणार हे उघड आहे. मात्र एका पक्षाच्या हातचे राज्य दुसऱ्या पक्षाच्या हाती गेल्यावर त्याने पूर्वीच्या पक्षाने केलेली प्रगती उखडून टाकता कामा नये यासाठी लोकांना आपल्या प्रगतीची दिशा कोणती आहे ते बरोबर समजले पाहिजे आणि त्या दिशेच्या विरुद्ध कोणताही राजकीय पक्ष जाणार नाही अशी दक्षता घेण्याचे कार्य लोकांनी कोणत्याही एका

पक्षाच्या आधीन न होता आपल्या पायावर उभे राहून केले पाहिजे, अशी पक्षातीत क्रांतिशक्ती निर्माण करून तिचा प्रभाव सत्याग्रहाच्या मार्गाने सर्व पक्षांवर पाडण्याचे कार्य आचार्य विनोबा आणि जयप्रकाश हे करीत आहेत. समाजवादी क्रांतीचा वेग या त्यांच्या कार्यातील प्रगतीवर अवलंबून असून १९५७ सालापर्यंत त्यांना समाधान वाटेल इतक्या प्रमाणात या क्रांतिकारक आंदोलनाला यश आले तर आमच्या राष्ट्रातील लोकशाहीला समाजवादी स्वरूप देण्यासाठी कायद्यात व राज्यघटनेत ज्या सुधारणा करणे अवश्य आहे, अशा रीतीने भूदान-आंदोलनाचा प्रत्यक्ष परिणाम भारतात समाजवादी राज्य स्थापन करणे हा होणार आहे.

## सत्याग्रही निष्ठा

भारतातील सर्व पक्षांना व लोकांना लोकशाही, समाजवाद आणि सत्याग्रह ही तीनही तत्त्वे पटलेली असून सत्याग्रह हेच मानवी जीवनाचे अंतिम तत्त्वज्ञान आहे अशी निष्ठा आधुनिक भारतात निर्माण झाली आहे. तथापि, या सत्याग्रही निष्ठेचे दोन प्रकार असून त्यांना आम्ही शुद्ध सत्याग्रही निष्ठा आणि शबल सत्याग्रही निष्ठा अशी नावे देतो. शुद्ध सत्याग्रही निष्ठेने लोक पूर्णपणे अराज्यवृत्तीने वागण्याचे व्रत अंगीकारून कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासद राहत नाहीत. कोणताही राजकीय पक्ष राज्यसंस्थेवर आरूढ होऊन दंडशक्तीचा उपयोग करणारा अथवा करू इच्छिणारा असतो. हे कार्य शुद्ध सत्याग्रही निष्ठेत बसू शकत नाही म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाची निष्ठा ही शुद्ध सत्याग्रही निष्ठा असू शकत नाही. पण कोणत्याही राजकीय पक्षाने क्रांतिकार्यासाठी हिंसेचा उपयोग करावयाचा नाही तर ते कार्य सत्याग्रहानेच घडवून आणावयाचे आणि राजदंडाचा वापर लोकशाही पद्धतीनेच करावयाचा अशी निष्ठा स्वीकारली तर त्याच्या त्या निष्ठेला शबल सत्याग्रही निष्ठा असे नाव देता येईल. या दृष्टीने प्रजासमाजवादी पक्ष याची निष्ठा शबल-सत्याग्रही आहे असे म्हणता येईल. हीच निष्ठा काँग्रेस पक्षासही स्वीकारता येईल. म्हणून काँग्रेस पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष हे शबल-सत्याग्रही पक्ष असून आचार्य विनोबा व त्यांच्यासारखे सर्वोदयवादी यांची निष्ठा शुद्ध सत्याग्रही आहे. शबल सत्याग्रही निष्ठेचे दोन राजकीय पक्ष असून त्यांपैकी एक तीव्र वेगाने लोकशाही समाजवादाकडे जाऊ इच्छिणारा व दुसरा मंदगतीने तिकडे प्रगती करावी असे इच्छिणारा आहे. हे दोनही पक्ष जर भूदान आंदोलनाच्या प्रभावाखाली येत राहिले तर त्या दोघांना लोकशाही राज्य न मोडू देता समाजवादाची स्थापना करण्यात यश येऊ शकेल. म्हणून भारतीय समाजवादाची स्थापना होण्यास हे दोनही पक्ष आपापल्या परी उपयोगी पडणार असून त्यांची प्रचिती शुद्ध सत्याग्रही निष्ठेच्या लोकसेवकांच्या कार्यावर बऱ्याच अंशी अवलंबून आहे. जर या तीन शक्ती एकमेकांना मारक न होता आपापले कार्य करीत राहतील तर भारताला कम्युनिस्ट क्रांतीची व तिच्यातून निर्माण होणाऱ्या हुकूमशाहीची

भीती धरण्याचे मुळीच कारण नाही. या तीन शक्तींचा प्रभाव वाढत जाईल. त्यामानाने कम्युनिस्ट पक्ष भारतातून लुप्त होत जाईल, मात्र या तीन शक्तींना आपले कार्य करता आले नाही व त्यांपैकी कोणतीही शक्ती नष्ट झाली तर भारतात हुकूमशाही किंवा अराजक माजण्याचा धोका आहे. आचार्य विनोबा यांनी शुद्ध सत्याग्रही निष्ठेने भूदान आंदोलन सुरू केल्यापासून हा धोका आता फारच कमी झाला आहे. थोड्याच काळात तो पूर्णपणे नष्ट होऊन भारतात समाजवादी राज्याची स्थापना होईल अशी आम्हास आशा वाटते.

[*नवभारत, फेब्रुवारी १९५५, पृ. १० ते ११*]

## २३

# भूदान आंदोलन : तत्त्वज्ञान, ध्येय व कार्यपद्धती

['नवभारत' च्या भूदान विशेषांकात प्रा. ना. ल. मावळंकर आणि प्रा. मा. वि. कानेटकर यांचा "भूदान आंदोलन— तत्त्वज्ञान, ध्येय व कार्यपद्धती" या शीर्षकाचा भूदान आंदोलनावर काही आक्षेप घेणारा लेख प्रसिद्ध झाला (पृ. १४–१९). त्याच अंकात जावडेकरांनी या दोघांच्या मुख्य आक्षेपांना प्रश्नोत्तरांच्या रूपात उत्तर दिले आहे. **भूदान यज्ञ आणि समाजवादी क्रांती** हा लेखही त्यांनी या अंकात लिहिला असून त्याचा काही भाग वर आलेला आहेच.]

शंका : तुमचे हे भूदान आंदोलन कशासाठी आहे व त्याचे साध्य सिद्ध करण्याचे तुमचे साधन कोणते ?

उत्तर : सामाजिक क्रांती घडवून आणून वर्गविहीन समाज निर्माण करणे हे आमचे साध्य आहे व त्यासाठी भूमिदान, संपत्तिदान, श्रमदान आणि जीवनदान ही आमची साधने आहेत. आमचं साध्य व आमची साधने ही सर्वमान्य होण्याजोगी असून ती निरपवाद आहेत. यामुळे हे आंदोलन एकसारखे वाढत जाऊन त्यातून संपत्तीचे सामाजिक स्वामित्व आणि वर्गविहीन आर्थिक घटना यांच्या आधारावर नवसमाज निर्माण होईल अशी आमची निष्ठा आहे. या निष्ठेने प्रेरित होऊन आम्ही १९५७ सालापर्यंत पाच कोटी एकर जमीन जमीनमालकांकडून मिळवून ती भूमिहीन बेकारांना वाटून देण्याचे पहिले कार्य हाती घेतले आहे. क्रांतीची ही पहिली पायरी आहे आणि तिच्यावर चढून जाण्यात जर समाजाला यश मिळाले तर आमचा विश्वास वाढेल व समाजाला पुढील मार्ग दिसू लागेल. पायरीपायरीने क्रांतीच्या शिखरावर चढण्याची ही मोहीम असल्यामुळे तिला आंदोलन म्हणण्यापेक्षा आरोहण हे नाव अधिक साजेल असे विनोबा म्हणतात.

शंका : तुमचे साध्य व साधने जर इतकी निरपवाद व सर्वमान्य होण्यासारखी आहेत तर तुम्हाला इतका प्रचार करण्याची काय गरज आहे ? इतका प्रचार करूनही तुम्ही

आतापर्यंत ३५-३६ लक्ष एकर जमीन मिळविली आहे. तेव्हा तुम्हाला १९५७ सालापर्यंत पाच कोटी एकर जमीन मिळणे वाटते तितके सोपे नाही. ते का सोपे नाही ते पहा : समाजात असामान्य विभूतीसारखे जे अनासक्त सत्पुरुष असतील त्यांना तुमच्या प्रचाराची काहीच गरज नाही. ते आधीच भूमी व संपत्ती यांच्या पाशातून मुक्त झालेले आहेत. तेव्हा त्यांच्याकडे जाऊन तुम्ही काय प्रचार करणार ? जे स्थितप्रज्ञ किंवा मुक्त नाहीत पण जे संपत्तीवर किंवा जमिनीवर अनुरक्त आहेत ते तुमच्या प्रचाराने भूमी किंवा संपत्ती यांचे दान करण्यास तयार होणार नाहीत व त्यांच्या दृष्टीने ते योग्यच आहे. आजच्या समाजाची सर्व उभारणी भूमीच्या व संपत्तीच्या खाजगी स्वामित्वावर झालेली असल्यामुळे व अशा स्वामित्वामुळेच प्रत्येकास थोडीफार शाश्वती व प्रतिष्ठा लाभू शकते ती हातची सोडून तुमच्या उपदेशाप्रमाणे त्यांनी भूदान व संपत्तिदान करण्यास उद्युक्त होणे म्हणजे हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्यासारखा मूर्खपणा आहे हे त्यांना समजते. जर आज आपणाला लाभलेली थोडीफार शाश्वती व प्रतिष्ठा नवा समाज प्राप्त करून देणार असेल तर ते भूमिदान व संपत्तिदान करण्यास तयार होतील. पण त्याच्या आधी तसा समाज निर्माण होण्यापूर्वी "तुम्ही भूमिदान व संपत्तिदान करा" म्हणाल तर ते तसे करणार नाहीत. तेव्हा आपला प्रचार कमी आहे म्हणून आपणाला यश येत नाही या भ्रमात तुम्ही राहू नका. तो प्रचार कितीही असला तरी आजच्या समाजातील सामान्य व्यक्ती तुमच्या प्रचाराच्या जाळ्यात सापडणार नाहीत. सामान्य माणसाच्या कुवतीला न झेपणारे असे तुमचे साधन आहे. असे असल्यामुळे तुम्हास १९५७ सालापर्यंत अपेक्षित यश येणार नाही.

**उत्तर :** आम्हाला आमचा प्रचार जे स्थितप्रज्ञ आहेत व जे अनुरक्त आहेत अशा दोनही प्रकारच्या लोकांत करावयाचा आहे. जे स्थितप्रज्ञ आहेत व ज्यांची आसक्ती सुटलेली आहे त्यांना आम्ही सांगतो की, जे सामान्य लोक जमिनीच्या व संपत्तीच्या आसक्तीत गुंगून जाऊन घोरत पडले आहेत त्यांना जागे करा व सांगा की आता जर तुम्ही खाजगी संपत्ती व खाजगी जमिनी यांच्या मोहातून मुक्त होऊन सामाजिक स्वामित्वावर उभारलेला नवसमाज निर्माण केला नाही तर हा संपत्तीचा व जमिनीच्या स्वामित्वाचा मोह तुमचा घात केल्याशिवाय राहणार नाही. समाजरचनेत ही आमूलाग्र क्रांती घडून आली नाही तर समाज जिवंतच राहणार नाही अशी क्रांतिकारक अवस्था आज प्राप्त झाली आहे. सर्व स्थितप्रज्ञांनी यावेळी ही सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी आपले जीवनदान केले पाहिजे. ही जागृती करण्याचे क्रांतिकार्य सर्व स्थितप्रज्ञ करू लागतील तर अपरिहार्य असलेली सामाजिक क्रांती अहिंसेने घडून येईल, असा प्रचार आम्ही जे स्थितप्रज्ञ आहेत त्यांच्याकडे जाऊन करीत असतो.

याच्या उलट, जे संपत्तीच्या व जमिनीच्या मोहात गुरफटून शाश्वतीच्या भ्रमात घोरत पडले आहेत त्यांना आम्ही असे सांगतो की, तुम्हाला या स्वामित्वाच्या हक्कातून शाश्वती

व सुख मिळणे अशक्य आहे. आता क्रांतिकाळ आलेला आहे. आता जुन्या घरात झोपाल तर त्या घराबरोबर तुमची शरीरेही भस्मसात होतील. वडिलार्जित घराला आता आग लागलेली आहे. त्यात घोरत पडल्याने तुम्हाला व तुमच्या मुलाबाळांना सुख व शाश्वती लाभेल असा भ्रम धरू नका. जागे होऊन खाजगी स्वामित्व विसर्जन करून सामाजिक स्वामित्वाच्या पायावर नव्या समाजाची उभारणी करा. आजपर्यंत या संपत्तीच्या स्वामित्वाला जे बिलगून राहिले ते मुक्त झाले नाहीत तरी जगू शकत होते. त्यांचे भौतिक जीवन थोडेतरी सुरक्षित होते. पण आज या खाजगी स्वामित्वामुळे समाजाच्या भौतिक जीवनालाच धोका उत्पन्न झाला आहे. हा क्रांतिकाळ आहे व या काळात जे आपल्या स्वामित्वाला कवटाळून शाश्वती व सुख लाभेल अशी आशा बाळगून राहतील ते व्यवहार-शून्य व मूर्ख ठरणार आहेत. धनिकांची सामाजिक प्रतिष्ठा आता नष्ट झालेली असून धनिक हे चोर आहेत असा आवाज जगभर घुमू लागला आहे. केवळ धनिकच चोर आहेत असे नव्हे तर त्यांच्या मालकी हक्काचे संरक्षण करणारे वकील, न्यायाधीश व सरकारे यांचासुद्धा अंतर्भाव त्याच वर्गात होतो असे सांगण्यापर्यंत विनोबांच्या प्रचाराची मर्यादा गेलेली आहे. यामुळे धनिक व निर्धन या दोनही वर्गांत एक नवी दृष्टी निर्माण होऊन अपूर्व जागृती होत आहे. अशा क्रांतिकाळात समाजातील सामान्य व्यक्तींना शाश्वती व सुख यांचा लाभ होऊ शकत नाही असा अनुभव येत असल्यामुळे ज्यांना तुम्ही सामान्य समजता तेही फार मोठ्या प्रमाणावर स्वार्थत्याग करण्यास तयार होतात. जोपर्यंत प्रस्थापित समाजरचना सुस्थिर व निरंतन टिकणारी आहे असा अनुभव येत असतो व सर्वांची जीवितयात्रा सुखाने चालू असते तोपर्यंत सामान्य मनुष्ये संपत्तीच्या व भौतिकसुखाच्या पाशात गुंतून स्वार्थत्यागास तयार होत नाहीत. पण आता तशी स्थिती उरलेली नाही. भांडवलदारी समाजरचना सर्वत्र पसरत जाणारी बेकारी, विषमता आणि अशाश्वती यांचा अंत करू शकत नाही याचा अनुभव आल्यामुळे समाजवादी आर्थिक रचना आणि ग्रामोद्योगांची संघटना यांच्यावाचून बहुजनसमाजाचे प्रश्न सुटू शकत नाहीत असे आपले सरकारही म्हणू लागले आहे. हा सुद्धा आमच्या आंदोलनाचाच एक प्रभाव आहे. जर अहिंसक क्रांतीने मालकी हक्क खाजगी व्यक्तींकडून काढून ते समाजाकडे देता आले नाहीत तर ही क्रांती कायद्याने किंवा हिंसक क्रांतीच्या मार्गाने झाल्यावाचून रहात नाही. याचीही जाणीव सर्वसामान्य मनुष्यांना आता होऊ लागली आहे. अशा रीतीने मालकी हक्क विरुद्ध आकाशच फाटले असल्यामुळे धनिकवर्ग भूदान-आंदोलनाला थोडेफार सहाय्य करून आपली प्रतिष्ठा कायम करील आणि त्यामुळे भांडवलशाही समाज चिरंजीव होईल असा धोकाही आता उरलेला नाही. तो धोका लक्षात घेऊनच आचार्य विनोबा यांनी आपल्या भूदान यज्ञाचे ध्येय व साध्य आर्थिक क्रांती हे आहे व ती क्रांती अहिंसेने घडवून आणणे हेच आपले वैशिष्ट्य आहे असा प्रचार धूमधडाक्याने चालू केला आहे.

कोणाकडूनही भूदान व संपत्तिदान पत्र स्वीकारताना त्यांना आर्थिक क्रांतीची बरोबर कल्पना दिली पाहिजे असा त्यांचा प्रचारकांना आदेश आहे.

**शंका :** म्हणजे तुम्ही भांडवलदारांना वाचविण्यासाठी व त्यांचे हित करण्यासाठी हे आंदोलन सुरू केले आहे असे आमच्यासारख्या त्रयस्थांनी किंवा शेतकरी-कामगारांनी मानिले तर तुमचा त्यास विरोध असता कामा नये.

**उत्तर :** आम्ही भांडवलदार व्यक्ती आणि शेतकरी-कामकरी या सर्वांचाच उद्धार व्हावा आणि शेतकरी-कामकऱ्यांनी भांडवलदार व जमीनदारांची हिंसा करून आपला उद्धार होईल अशा भ्रमात राहू नये हाही प्रचार करीत असतो. आम्ही सर्वोदयवादी व निर्भेळ सत्याग्रही आहोत. आमच्या मार्गाने भांडवलदार व कामकरी तसेच जमीनदार व शेतकरी हे चालू लागतील तर केवळ वर्गहीन समाज निर्माण होईल. इतकेच नाही तर शासनमुक्त समाजाचा मार्गही स्पष्ट दिसू लागेल. हिंसेच्या मार्गाने क्रांती झाल्यास बहुजन-समाजाचे पाय एका खोड्यातून निघून दुसऱ्या खोड्यात अडकले जातात असा अनुभव इतर देशांतील क्रांत्यांवरून येत आहे, ही गोष्ट आम्ही आमच्या प्रचाराने लोकांच्या निदर्शनास आणतो.

**शंका :** मग तुम्हाला अद्यापि फक्त ३५-३६ लक्ष एकर जमीनच का मिळाली? अशा वेगाने ५ कोटी एकर जमीन मिळावयास किती वर्षे लागतील? या अनुभवावरून तुमचे काही चुकत आहे असे तुम्हाला वाटत नाही काय? की अनुभवावरून बोध घ्यावा हे तत्त्वच तुम्हास मान्य नाही? अनुभवाने पडताळा आला नाही तर केवळ अधिक प्रचार करा ही भाषा तुम्ही किती दिवस वापरणार?

**उत्तर :** अनुभवावरून बोध घ्यावा हे तत्त्व मान्य करूनच आम्ही १९५७ सालापर्यंत आजच्या मार्गाने जावयाचे असे ठरविले असून या मुदतीच्या अखेरीस आलेल्या अनुभवावरून कोणता बोध घेता येईल याचा विचार करणे यालाच आम्ही शास्त्रीय पद्धती समजतो. दर दिवशी अनुभवाचा आढावा घेऊन त्यावरून बोध घेणे व रोज नवे धोरण आखणे बरोबर नाही. म्हणून आपल्यासारख्यांनी इतक्यातच लोकांचा बुद्धिभेद न करिता या क्रांतिकारक आंदोलनाचे स्वरूप समजून घेऊन १९५७ सालापर्यंत आम्हास म्हणजे आमच्या कार्यास साहाय्य करावे. म्हणजे पुढे अनुभवाचा आढावा घेऊन नवे धोरण आखताना आपल्या विचारांना साहजिकच अधिक महत्त्व प्राप्त होईल, मग आपण आमच्या कार्यास १९५७ सालापर्यंत प्रचाराचे साहाय्य का करू नये? वर्गहीन समाज आणि संपत्तीचे सामाजिक स्वामित्व ही साध्ये आपणास संमत आहेत ना? ही क्रांती घडवून आणण्याचा प्रचार करणेही आपले एक कर्तव्यच आहे.

शंका : पण या क्रांतीचे नेतृत्व ग्रामराज्ये स्थापन करावीत असे ज्यांचे मत आहे त्यांच्याकडे असल्यामुळे आम्हास या आंदोलनास साहाय्य करता येणार नाही. कारण, वर्गहीन समाज स्थापन झाला तरी ग्रामराज्यामुळे हा समाज मध्ययुगीन बनेल आणि औद्योगिक क्रांतीने घडून आलेली प्रगती नष्ट होईल. तसेच ही प्रगती करण्यासाठी जी साधने उत्पादनासाठी व दळणवळणासाठी निर्माण झाली ती सर्व साधने नाश पावून समाजाचे भयंकर आर्थिक नुकसान होईल. म्हणून तुमचा प्रचार यशस्वी झाला तरी ते यश आम्हास नको आहे. कारण त्या यशामुळे समाजाची प्रगती नष्ट होऊन परागती होणार आहे.

उत्तर : आम्ही जी ग्रामराज्ये निर्माण करणार आहोत ती ग्रामराज्ये सर्व समाजाच्या संमतीने केवळ बहुमतानेच नव्हे तर सर्वानुमते करणार आहोत. अर्थात ज्याच्यामुळे समाजाची प्रगती नष्ट होईल आणि सर्वांना बेकार व दरिद्री बनावे लागेल अशी ती राज्ये असू शकणार नाहीत हे उघड आहे. सर्वांना उद्योग मिळावा, सर्वांना समान दर्जा व स्वातंत्र्य यांचा उपभोग मिळावा, सामाजिक किंवा आर्थिक वर्गभेद असू नयेत, जमीन व इतर साधनसंपत्ती समाईक बनून सर्वांना आपापल्या गरजा भागविण्याइतका संपत्तीचा उपभोग घेता यावा, राजकीय, सामाजिक व आर्थिक दास्य नष्ट व्हावे अशा तीनही आवश्यक स्वावलंबी आणि अन्नवस्त्रादी गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण ग्रामराज्ये निर्माण करणे असे आमचे ध्येय आहे. अशा राज्यांना मध्ययुगीन असे नाव देऊन आपण असे सुचवित आहा की मध्ययुगातील ग्रामराज्ये अशा प्रकारे समत्व, बंधुत्व आणि स्वातंत्र्य या तत्त्वांवर चालणारी सर्वोदयवादी ग्रामराज्ये होती. ती तशी असती तर त्यांना भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्यापुढे हार खाऊन नष्ट व्हावेच लागले नसते. आम्हास आधुनिक युगात झालेली प्रगती नष्ट करावयाची नाही. वैज्ञानिक प्रगती, लोकशाहीचे राजकारण आणि समाजवादी अर्थघटना यांचा नाश न करिता पण त्यातील दोष नष्ट करून आम्हास नव्या समाजाची रचना करावयाची आहे. या कामी वैज्ञानिक संशोधन, नैसर्गिक शक्ती, यंत्रकला आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय इत्यादी सर्व व्यवहारात समत्व, बंधुत्व आणि स्वातंत्र्य यांचा अवलंब या नव्या अधिष्ठानावरच आमची स्वावलंबी व स्वयंपूर्ण ग्रामराज्ये निर्माण करण्यात येतील. असे आम्ही करू तरच आधुनिक भारतातील जनतेला ते आकर्षक व स्पृहणीय वाटतील, नाहीतर समाज आमच्या मागून येणारच नाही. ग्रामराज्ये आणि ग्रामोद्योग हे शब्द उच्चारल्याबरोबर आम्ही आंधळेपणाने मध्ययुगात उडी घेणार आहोत असा आपला गैरसमज करून घेऊ नका.

[*नवभारत*, फेब्रुवारी १९५५, पृ. १११ ते ११५]

२४

# ब्रह्मर्षी विनोबा

[भूदान आंदोलनापासून आचार्य जावडेकरांच्या लेखनातील विनोबाविषयीचा आदर द्विगुणित झालेला आढळतो. खालील उतारा हा विनोबांच्या षष्ठ्यब्दी निमित्ताने आचार्य जावडेकरांनी लिहिलेल्या लेखातील आहे. येथेही भूदान आंदोलनाविषयीचा त्यांचा दुर्दम्य आशावाद स्पष्टपणे दिसून येतो. विनोबांनी हे आंदोलन सुरू केलेले असल्यामुळे आता ग्रामराज्याच्या दिशेने भारताची वाटचाल होत आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. विनोबांच्या षष्ठ्यब्दीच्या वेळच्या या लेखात विनोबांना संत, ऋषी, ब्रह्मर्षी इ. म्हटले असले तरी त्यांच्या फक्त भूदान कार्यावरच संपूर्ण लेखात भर दिलेला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. लेखातील जगन्नाथपुरीचा संदर्भ तेथे मार्च १९५५ मध्ये भरलेल्या सर्वोदय संमेलनाचा आहे.]

भारताच्या महत् भाग्याने आचार्य विनोबा हे एक फार मोठे ब्रह्मर्षी निर्माण झाले आहेत. ब्रह्मर्षीचे समाजधारणेत व समाजक्रांतीत कोणते विशिष्ट कार्य आहे ते आपण प्रथम समजून घेतले पाहिजे. ब्रह्मर्षी हा फार प्राचीन शब्द कोणास पसंत नसेल, अथवा समजत नसेल तर "संत" हा शब्द योजावा. पण ब्रह्मर्षी हा शब्द जसा प्राचीन तसा "संत" हा शब्द मध्ययुगीन म्हणून कोणास रुचणार नाही. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ व आधुनिक काळ या सर्वांना पूज्य अशी काही जीवनमूल्ये आहेत, हे ज्यांना मान्यच करवत नाही, त्यांना विनोबा हे आधुनिक जगात महत्कार्य करू शकतील किंबहुना ते तसे आजही करीत आहेत हे पटवून देणे फार कठीण आहे. पण ते त्यांना पटले नाही, तरी भारतीय जनतेला विनोबांचे महत्कार्य पटू लागले आहे, यात शंका नाही. गांधीजींच्या निधनानंतर भारतीय जनतेच्या अंतःकरणावर आत्मबलाचे अधिराज्य उपभोगू लागलेला एक प्राचीन ऋषी किंवा मध्ययुगीन संत आधुनिक काळात अवतरला आहे, अशी भारतातील ग्रामीण जनतेची खात्री होऊ लागली आहे. म. गांधी हे ज्या प्रकारे संत असून क्रांतिकारक होते, त्याच प्रकारे आचार्य विनोबा हे सामान्य जनतेला एका ऋषीप्रमाणे किंवा संताप्रमाणे भासत असले तरी ते जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या हाडाच्या क्रांतिकारकांना क्रांतिकारकही दिसत आहेत. "ऋषी" किंवा "संत" हा क्रांतिकारक असूच शकत नाही असा ठाम

निर्णय ज्यांच्या बुद्धीने घेतलेला आहे त्यांना बऱ्याच सूक्ष्म दृष्टीने विनोबांच्या कार्यातील प्रतिक्रांतिकारक अंश शोधून काढावे लागत आहेत. विनोबा हे भारतात सर्वांगीण सामाजिक क्रांती घडवून आणणारे एक अहिंसक क्रांतिकारक आहेत ही त्यांची कीर्ती आज भरतखंडाच्या मर्यादा उल्लंघून सर्व जगात फैलावली आहे. ...

आचार्य विनोबा हे जसे संत आहेत अथवा ब्रह्मर्षी आहेत तसेच म. गांधी हे सुद्धा संत व ब्रह्मर्षीच होते. पण या दोन संतांत थोडा फरक आहे. दोघेही क्रांतिकारक संतच आहेत, परंतु म. गांधी हे प्रत्यक्ष राजकारण करणारे व मुख्यतः राजकीय क्रांतीवरच विशेष भर देणारे होते. परतंत्र भारताच्या परिस्थितीस अनुरूप असे त्यांचे ते धोरण असून त्या कार्यास अनुरूप असेच त्यांचे प्रकृतीगुणही होते. स्वतंत्र भारतातील क्रांतिकार्याला आता केवळ अथवा मुख्यतः राजकीय क्रांतीचे स्वरूप उरलेले नाही. राजकीय क्रांती ही या कार्यात अवश्यमेव अंतर्भूत होत असली तरी ती तिची आद्यप्रेरणा नाही. सर्वांगीण व अंतर्बाह्य जीवनक्रांती ही आज भारतीय क्रांतीची आद्यप्रेरणा बनली पाहिजे व बनत आहे.

वैयक्तिक जीवननिष्ठा या दृष्टीने विचार केल्यास म. गांधी व आचार्य विनोबा या दोघांचीही जीवननिष्ठा नेहमीच अंतर्बाह्य व सर्वांगीण क्रांतिकारकच होती व आहे. पण महात्मा गांधींचे सार्वजनिक व्यवहार आणि त्यांनी निर्माण केलेल्या राष्ट्रीय वृत्तीचे मूर्त फल एवढ्याचाच विचार केल्यास त्यांनी भारतात प्रामुख्याने राष्ट्रीय वृत्ता व राजकीय क्रांतीची भावना याच फार मोठ्या प्रमाणावर जागृत करण्यात यश मिळविले, असे म्हणावे लागते. सर्वसामान्य हिंदी नागरिक त्यावेळा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा व राजकीय क्रांतीचाच विचार करीत असे. यामुळेच आमच्या राष्ट्रसभेची क्रांतिकारकता ब्रिटिश व अमेरिकन लोकशाहीच्या पलीकडे जाऊ शकली नाही....

काही काळ भांडवलशाहीला अशी आशा वाटत होती की, या भूदान यज्ञात जमिनीवरील स्वामित्वाची आहुती पडली तरी आपल्या कारखानदारीच्या स्वामित्वाची आहुती या यज्ञकुण्डात पडणार नाही. जेव्हा आचार्य विनोबा यांनी तीही आहुती टाकण्याचा मंत्र उच्चारिला आणि श्री. जयप्रकाश नारायण यांनी त्या यज्ञकार्यास आपले जीवित समर्पण केल्याची घोषणा केली, त्यावेळी भारतीय धनिकशाहीचा सर्व आधार भस्मसात झाला. आता धनिकांच्या स्वामित्वहक्काला नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान उरले नाही, अशी भारतीय जनतेची खात्री झाली आहे. तिचे नेतृत्व करू इच्छिणाऱ्या सांप्रदायिक गांधीवाद्यांची आणि धूर्तपणाने राष्ट्रसभा पक्षात समाविष्ट झालेल्या धनिकशाहीनिष्ठ मुत्सद्यांचीही अशी खात्री झाली की, आता भारतात समाजवादी क्रांती व समाजवादी समाजरचना या गोष्टी अटळ आहेत. तरीही ही समाजवादी क्रांती अहिंसेने घडवून आणावयाची

असल्याने ती सावकाशीनेच झाली पाहिजे, असा आग्रह काहींनी धरला होता. पण आचार्य विनोबा यांनी तोही त्यांचा भ्रम जगन्नाथपुरीस दूर केला.

"अहिंसेची क्रांती म्हणजे सावकाशीची क्रांती नव्हे, अहिंसक क्रांती त्वरितच घडली पाहिजे. सावकाशी करणे हा हिंसावाद किंवा ही हिंसावृत्ती आहे आणि या वृत्तीने वाग-ल्यास हिंसक क्रांती ओढवून घ्याल" असा स्पष्ट इशारा पुरी येथे विनोबांनी दिला. अशा रीतीने मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणेला व धर्मभावनेला त्यांनी अंतर्बाह्य व सर्वांगीण सामाजिक क्रांतीचे स्वरूप दिले. गांधीवादाचे शुद्ध स्वरूप त्यांनी जगापुढे मांडले. हे कार्य इतके सर्वस्पर्शी व सर्वव्यापक होते की ते केवळ राजकीय किंवा पक्षीय दृष्टीने विचार करणाऱ्याच्या आवाक्याबाहेरचे होते. "समाजवादी समाजरचना" अथवा "सर्वोदयवाद" ही केवळ राजकीय ध्येये नाहीत. सर्वांगीण समाजरचनेची आणि अंतर्बाह्य जीवननिष्ठेची ती ध्येये आहेत. आजची समाजरचना त्यांना विघातक अशी बनलेली आहे. या समाज-रचनेत आमूलाग्र क्रांती घडवून आणल्यावाचून समाजधारणा होणार नाही. या स्फोटक परिस्थितीची जाणीव केवळ आदर्शनिष्ठ साधुसंतांना किंवा वेदान्त्यांनाच आली आहे, असे नसून ती वास्तववादी व व्यवहारदक्ष मुत्सद्यांनाही झाली आहे. यामुळे सामाजिक क्रांती व आर्थिक क्रांती हा युगधर्म बनला आहे. या सामाजिक व आर्थिक क्रांतीचे स्वरूप व्यक्तिवादी समाजरचना मोडून समाजवादी रचना स्थापन करणे अशा स्वरूपाचे असले तरी ते मानवाची धर्मभावना व मोक्षवृत्ती यांना अनुरूप असेच आहे व त्यांना अनुरूप अशा साधनांनीच ते खऱ्या अर्थाने घडू शकेल, याची जाणीव प्रथम महात्मा गांधींना झाली व त्याच जाणीवेने प्रेरित होऊन आज विनोबा ते कार्य पुढे चालवीत आहेत.

मानवी अंतःकरणातील धर्मभावनेला व आत्मप्रेरणेला जागृत करून सामाजिक क्रांती घडवून आणण्यास केवळ मुत्सद्दी किंवा समाजाचा भौतिक दृष्टीनेच विचार करणारा क्रांति-कारक पुरा पडणारा नव्हता. ते कार्य करण्यास एका क्रांतिकारक स्थितप्रज्ञ यतीची अथवा संताची आवश्यकता होती. असा संत विनोबांच्या रूपाने आज भारतात संचार करीत आहे. त्यांनी भारतीय जनतेची खात्री करून दिली आहे की आज समाजात सर्वांगीण क्रांती घडवून आणल्यावाचून मानवाची धर्मभावना व मोक्षवृत्ती या जिवंत राहू शकत नाहीत. आजच्या मानवाचा भौतिक मृत्यू ओढवलेला आहे ही खरी आपत्ती नसून त्याचा आत्मिक मृत्यू ओढवला आहे ही त्याहूनही अधिक मोठी आपत्ती आहे. ही निष्ठा मानवी अंतःकरणात जागृत करून विनोबांनी सर्वांगीण क्रांतीची ज्वाला प्रज्वलित केली आहे.

विनोबांना गांधींच्यासारखे राजकारण करावयाचे नसून त्यांनी केलेल्या राजकारणापुढील राजकारण करावयाचे आहे. राज्यसंस्थेच्या शासनातून समाजाला मुक्त कसे होता येईल आणि केवळ धर्मभावनेने आपले संरक्षण कसे करता येईल ते दाखवून देऊन समाजाला

सहकारी व स्वावलंबी बनण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणे हे विनोबांचे राजकारण आहे. त्यांनी सामाजिक व आर्थिक क्रांतिकार्याला धर्मसंस्थापनेची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली असून मोक्षप्राप्तीच्या मागे लागलेल्यांना अथवा लागू इच्छिणाऱ्यांना क्रांतिकार्याची दीक्षा दिली आहे. जर भारतीय अंतःकरणात धर्मभावना व मोक्षप्रवृत्ती सुप्त स्वरूपात का होईना अस्तित्वात असतील तर त्या जागृत व प्रभावी होऊन आपल्या राष्ट्रात व जगात शांततायुगाची स्थापन करतील.

... आचार्य विनोबा यांनी साठाव्या वर्षाच्या पूर्ततेच्या वेळी घडवून आणिलेली ही अपूर्व क्रांती केवळ आत्मबलाच्याच जोरावर घडवून आणिलेली आहे. त्यांनी ही गोष्ट राज्य-सत्तेच्या साहाय्याने केलेली नाही. ती करण्यासाठी त्यांनी कोणाला धाकदपटशा दाखविलेला नाही. कोणाची अडवणूक केलेली नाही. त्यांनी भारतीय जनतेच्या अंतःकरणात सुप्त असलेला राम जागृत केला आहे.

जमिनीवर व संपत्तीवर ईश्वराचे स्वामित्व आहे आणि म्हणून धनसंचय ही चोरी आहे असे ते धनिकांना व निर्धनांना पटवून देतात. धनिकांना आपल्या संग्रहाची लज्जा वाटू लागते. भूमिहीनांना जमीन देणे आणि बेकारांना धंदे देणे हाच आपला आजचा धर्म आहे याची जाणीव होऊन संग्रह हे पाप आहे याचा ध्वनी धनिकांच्याही अंतःकरणात उमटू लागतो. हा ध्वनी वातावरणात सर्वत्र घुमू लागला आहे. खेड्यापाड्यातून जमिनी सामाजिक मालकीच्या बनू लागल्या आहेत. दोनतीनशे खेडी तरी एकत्र कुटुंबाप्रमाणे वागण्याची प्रतिज्ञा करून भूदान आंदोलनाशी समरस झाली आहेत. त्यांच्या दुंदुभी रशिया-अमेरिकेपर्यंत पोहोचल्या आहेत.

चाळीस वर्षांपूर्वी रशियात घडून आलेल्या क्रांतीहून अधिक प्रभावी व अधिक चिरंतन आणि अधिक मंगलमय क्रांती भारतात घडून येत आहे. हा ध्वनी आता अधिकाधिक जोराने घुमू लागणार आहे. "आचार्य विनोबा यांच्या प्रेरणेने भारतात चालू झालेले हे धर्मचक्रप्रवर्तनाचे कार्य असेच वेगाने चालू राहावे आणि त्यात आपले सर्वस्व अर्पण करण्याची सद्बुद्धी आपणास व्हावी" अशी प्रार्थना विनोबांच्या साठाव्या जयंतीच्या निमित्ताने आज सर्व भारतीय करीत आहेत.

[*साधना, १० सप्टेंबर १९५५, पृ. ३*]

## २८

# भारतीय संस्कृती आणि महात्मा गांधी

[या लेखाच्या पूर्वार्धात म. गांधींची तुलना महावीर आणि गौतम बुद्ध यांच्याशी केली आहे. बुद्ध व महावीर राजकारणातून निवृत्त झाले होते तसे गांधी झाले नाहीत. राम आणि कृष्णाप्रमाणे त्यांनी शस्त्राचा वापरही केला नाही. अशा प्रकारे अहिंसा-तत्त्वाचे पालन करीत त्यांनी राजकीय व्यवहार केले. गांधींनी आधुनिक भारताला सत्याग्रह आणि आत्मबलाची शिकवण दिली. सत्याग्रह आणि आत्मबल हे भारतीय लोकशाहीचे अधिष्ठान बनले आहे असे सांगून आचार्यांनी गांधींच्या विचारांची भारतीय संस्कृतीच्या संदर्भात खालीलप्रमाणे चर्चा केली आहे.]

म. गांधींनी आधुनिक भारताला जी नवी जीवनविषयक दृष्टी दिली तिला सर्वोदयनिष्ठा अथवा "सत्याग्रहनिष्ठा" असे नाव प्राप्त झाले आहे. इतर प्राण्यांहून मनुष्यप्राण्याचे वैशिष्ट्य केवळ त्याच्या बुद्धिबलात नसून ते त्याच्या अंतःकरणात वसत असणाऱ्या आत्म-बलात आहे अशी ही दृष्टी आहे. मानवाने आपल्या बुद्धीचा विनियोग केवळ स्वहितासाठी न करता तो सर्वहितासाठी केला पाहिजे हाच त्याचा खरा धर्म होय. हा धर्म ज्याला समजला नाही त्याची बुद्धी केवढीही प्रभावी असली तरी त्याला खरा मानव म्हणता येणार नाही. बुद्धी हे सर्व इंद्रियांहून श्रेष्ठ असे इंद्रिय मानवापाशी असले तरी ते इंद्रिय जर सर्वहितासाठी अथवा सर्वोदयासाठी उपयोगात आणिले नाही व त्याचा उपयोग केवळ स्वहितासाठीच केला तर त्या मानवाला "असुर" असेच म्हणावे लागेल. बुद्धी हे सर्वश्रेष्ठ साधन आहे. पण तिचे पावित्र्य तिच्या सर्वोदयनिष्ठेवर अवलंबून आहे. सत्याग्रही दृष्टी अशी असल्यामुळे बुद्धिस्वातंत्र्याचे तत्त्व या निष्ठेत अंतर्भूत झाले असले तरी ते साधनरूपाने अंतर्भूत झालेले आहे. ज्या बुद्धीने स्वहितनिष्ठा सोडून सर्वहितनिष्ठा स्वीकारली ती बुद्धीच खरी स्वतंत्र व खरी पवित्र होय अशी ही दृष्टी आहे. अव्यभिचारी सत्यनिष्ठा, सत्याचे अखंड संशोधन आणि सत्यसंस्थापनेचा अविरत प्रयत्न याला ज्याने आपले जीवन समर्पण केले तोच खरा आदर्श मानव होय. आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व धर्मपुरुषांची शिकवण हीच आहे, धर्मांचे

रहस्य हेच आहे आणि आजच्या मानवाला जर कोणत्या जीवननिष्ठेची आवश्यकता असेल तर ती याच जीवननिष्ठेची होय, असे गांधीजी मानीत होते. मानवाची सर्वात्मभावना जागृत झाली पाहिजे हेच आजचे सत्य असून त्या सत्याची उपासना करणारांनी संग्रहवृत्तीचा व हिंसावृत्तीचा त्याग केला पाहिजे. "अहिंसा" व "असंग्रह" ही सर्वात्मभावनेच्या सत्याची साधने आहेत आणि सर्वात्मभावना हाच "मोक्ष" अथवा मानवाचा परमपुरुषार्थ आहे. स्वहित, स्वकुलहित, स्वराष्ट्रहित या वृत्ती जोपर्यंत सर्वात्मभावनेला पोषक व सहायक होत असतील तोपर्यंतच त्या समर्थनीय व ग्राह्य समजल्या पाहिजेत. अशा सर्व प्रकारच्या "स्व" मधून व सर्व प्रकारच्या अहंकारामधून तसेच सर्व प्रकारच्या ममत्वामधून मुक्त झालेली बुद्धी हीच शुद्ध बुद्धी स्थितप्रज्ञ अथवा आत्मनिष्ठ बुद्धी होय. ही शुद्ध अथवा आत्मनिष्ठ बुद्धी प्राप्त होण्यास मानवाने हिंसावृत्तीचा व संग्रहवृत्तीचा त्याग केला पाहिजे. यातूनच खरी सत्यसंस्थापना अथवा न्यायसंस्थापना होऊ शकेल. या जीवननिष्ठेस अनुरूप अशीच मानवाची समाजरचनाही असली पाहिजे. जर अशी समाजरचना स्थापना करावयाची तर मानवसमाजाची अहिंसावृत्ती व असंग्रहवृत्ती यांना जागृत करूनच ती करता येईल. आधुनिक युरोपात व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद अशी जी तीन परस्परांशी विरुद्ध भासणारी सामाजिक रचनेची तत्त्वज्ञाने निघाली त्यांचा समन्वय अध्यात्मदृष्टीने विचार करणारास करता येतो, तसेच लोकशाही व समाजवाद या राजकीय व आर्थिक ध्येयांचाही अंतर्भाव सत्याग्रही सर्वोदयवादात होऊ शकतो अशी दृष्टी गांधीजींनी आधुनिक भारताला दिलेली आहे. ज्यांनी भारत स्वतंत्र झाल्यानंतर येथील लोकशाहीची राज्यघटना बनविली त्यांनी मात्र ती बनविताना या दृष्टीने बनविलेली नाही. ती बनविताना त्यांनी ब्रिटिश व अमेरिकन लोकशाहीच्या नमुन्यावरच ती बनविली आहे. म्हणूनच भारतातील समाज-वाद्यांना व सर्वोदयवाद्यांना तिच्यात आमूलाग्र क्रांती घडवून आणण्याची आवश्यकता भासत आहे. हेच कार्य आचार्य विनोबा व जयप्रकाश इत्यादी भूदान-आंदोलनाचे पुरस्कर्ते आज करू लागले आहेत. त्यांच्या या कार्यातून निर्माण होणारी क्रांतिशक्ती लक्षात घेऊनच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने "समाजवादी समाजरचने"चे ध्येय स्वीकारले आहे. पण या समाजरचनेच्या ध्येयास मूर्त स्वरूप देण्यासाठी जे कायदे करणे अवश्य आहे त्या कायद्यांच्या मार्गात काँग्रेस पक्षाने बनविलेली राज्यघटनाच आज अडथळे निर्माण करीत आहे. पण भूदान-आंदोलनातून निर्माण होणारी क्रांतिशक्ती ज्या मानाने भारतात प्रभावी ठरेल त्या मानाने राज्यघटनेचे अडथळे दूर होत जातील व भारतात स्थापन झालेल्या लोकशाहीला "समाजवादी" स्वरूप येत जाईल. भारतीय समाजवादाला अहिंसेचे आणि भारतीय लोकशाहीला असंग्रहाचे अधिष्ठान निर्माण करणे असे द्विविध कार्य आज आचार्य विनोबा व जयप्रकाश नारायण हे करीत आहेत. त्या कार्याचे अधिष्ठान सत्याग्रही वृत्ती व सर्वोदयी दृष्टी हे आहे. एका अर्थाने हा सत्याग्रही सर्वोदयवाद ही भारतीय संस्कृतीची मानवसंस्कृतीला देणगी आहे. या देणगीमुळे अखिल जगातील मानव संस्कृती आणि हिंदू,


H—333-14

बौद्ध, इस्लाम, खिस्ती, पारशी इत्यादी सर्व धर्म यांना आपले जीवन चिरंतन करण्याचा मार्ग सापडणार आहे.

## हिंदू संस्कृती व सत्याग्रह

सत्याग्रही सर्वोदयवाद हा हिंदू संस्कृतीतूनच उदय पावलेला असला तरी त्याच्यामुळे हिंदु धर्मशास्त्रात व हिंदू समाजरचनेत क्रांतिकारक बदल घडून आलेले आहेत. हिंदू संस्कृती म्हणून जिला म्हणतात तिला दोन आधार आहेत. एक वेदान्त आणि दुसरा मन्वादी स्मृतिशास्त्रे. वेदान्त म्हणजे उपनिषदे आणि स्मृतिशास्त्रे म्हणजे हिंदूंचे वर्णाश्रम-धर्म या दोहोंनाही मूळ आधार वेदाचा आहे. वेदातूनच उपनिषदातील तत्त्वज्ञान आणि स्मृतिशास्त्रातील वर्णाश्रमधर्मांचा उगम झालेला आहे, अशी हिंदू संस्कृतीची श्रद्धा आहे. औपनिषदीय तत्त्वज्ञानाला व वर्णाश्रमधर्माला हिंदूंचे अध्यात्मशास्त्र व समाजशास्त्र अशी नावे अनुक्रमाने देता येतील. गांधीजींनी औपनिषदतत्त्वज्ञान आणि वर्णाश्रमधर्म या दोहों-नाही मान्यता दिलेली होती. असे असले तरी त्यांनी या दोहोंतही आपल्या सत्याग्रही वृत्तीने व तत्त्वज्ञानाने क्रांतिकारक बदल घडवून आणले. त्यामुळे सत्याग्रही सर्वोदयवाद ही केवळ हिंदू संस्कृती उरलेली नसून तिला आता सर्व-धर्म-समानत्वावर अधिष्ठित झालेल्या आधुनिक मानवसंस्कृतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सत्याग्रही तत्त्वज्ञानामुळे वेदान्ताला सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झाले असून, वर्णाश्रमधर्मात अंतर्भूत झालेली सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट झाली आहे.

गांधीजींनी वर्णाश्रमधर्माला मान्यता दिली पण त्यातील आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट केली, या म्हणण्याचा अर्थच अनेक बुद्धिमंतांना कळत नाही. त्यांच्या मते वर्णाश्रम-धर्माला मान्यता देणे म्हणजे सामाजिक व आर्थिक विषमतेला मान्यता देणेच होय. पण गांधीजी तसे समजत नव्हते. त्यांचा वर्णाश्रमधर्म स्मृतिग्रंथातून घेतलेला नसून भगवद्गीतेत चातुर्वर्ण्यासंबंधी जे सिद्धान्त मांडिलेले आहेत त्यावर त्यांचा वर्णाश्रमधर्म अथवा त्यासंबंधीचे त्यांचे विचार उभारलेले होते. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धीं लभते नरः।" म्हणजे "आपण अंगीकृत केलेल्या कर्मात" म्हणजे समाजसेवेच्या प्रकारात आनंद मानणे यातच मनुष्याचा मोक्ष आहे. अथवा "स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः।" "आपल्या कर्मांनी परमात्म्याची पूजा केल्याने मनुष्याला परमात्मप्राप्ती होते." या भिंगेतून गांधीजी वर्णाश्रम-धर्मांचे रहस्य समजत होते व या रहस्यात सर्व प्रकारच्या समाजसेवेची व श्रमकार्यांची प्रतिष्ठा सारखीच आहे, हे तत्त्व अंतर्भूत झालेले आहे असे ते मानीत. समाजाची सेवा कोण-त्याही प्रकाराने केली तरी त्या सर्व प्रकारच्या सेवेची प्रतिष्ठा सारखीच असली पाहिजे, इतकेच नव्हे तर त्या सेवेबद्दल मिळणारे आर्थिक वेतनही सारखेच असले पाहिजे असा त्यांचा वर्णाश्रमधर्म होता. ते जसे "वर्णाश्रमधर्म मला मान्य आहे" असे म्हणत होते तसेच

ते प्रथमपासून असेही म्हणत होते की, डॉक्टर आणि वकील, शेतकरी आणि कामकरी, तसेच न्हावी आणि भंगी या सर्वांची सामाजिक प्रतिष्ठा सारखीच असली पाहिजे. इतकेच नाही तर त्या सर्वांना समाजाकडून मिळणारे वेतनही सारखेच असले पाहिजे. सर्व श्रमप्रकारांच्या समान प्रतिष्ठेचे, समान वेतनाचे हे तत्त्व त्यांनी सत्याग्रहात व सर्वोदयात आधारभूत मानिले असल्यामुळे हिंदूंच्या परंपरागत वर्णाश्रमधर्माच्या कल्पनेत सत्याग्रहाने सामाजिक व आर्थिक क्रांतीचे बीज रोविले. ही सामाजिक व आर्थिक समानतेची वृत्ती व तिच्यावरील निष्ठा हे आधुनिक भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य बनले असून त्या वैशिष्ट्यामुळेच आधुनिक भारताने लोकशाही व समाजवाद या समाजघटनेच्या ध्येयांना मान्यता दिली आहे. तसेच गांधीजींनी स्पृश्यास्पृश्य सर्व जातींत रोटीबेटीव्यवहार सुरू करून जातिभेदभावनेलाही तिलांजली दिली आहे.

त्याचप्रमाणे धर्मभावना व अध्यात्मवृत्ती यांना सर्वधर्मसमन्वयाचे अधिष्ठान वेदान्ताच्या आधारे दिल्यामुळे भारतीय राष्ट्र हे आता केवळ हिंदू राष्ट्र उरलेले नसून ते सर्वधर्मसमन्वयवादी राष्ट्र बनले आहे. भारत राष्ट्र हे "Secular" आहे असा इंग्रजी शब्द जेव्हा वापरतात तेव्हा त्याचा अर्थ हे राष्ट्र धर्महीन किंवा निधर्मी आहे असा नसून ते राष्ट्र सर्वधर्मसमन्वयी आहे व त्यातील राज्य सर्व धर्मांचा व सर्व जीवननिष्ठांचा समबुद्धीने प्रतिपाळ करील असा अभिप्रेत आहे. "सर्व धर्मांचा व सर्व निष्ठांचा" हे शब्द बुद्धिपुरस्सर योजिलेले आहेत. त्यात निरीश्वरवाद्यांची निरीश्वरवादावरील निष्ठा ही सुद्धा राज्यसंस्थेने संरक्षण करण्याची वस्तू आहे असा अर्थ गृहीत धरलेला आहे. सत्याग्रही तत्त्वज्ञानात ज्याला जे अंतिम सत्य वाटते त्याची त्या सत्यावरील निष्ठा ही ईश्वरवाद्यांच्या ईश्वरनिष्ठेइतकीच पवित्र, पूज्य व संरक्षणीय निष्ठा होय असे सत्याग्रही तत्त्वज्ञान आहे. अशा निरीश्वरवाद्यांचा समावेश सत्याग्रही तत्त्वज्ञानात व्हावा म्हणूनच आपण "सत्य हाच परमेश्वर अथवा परब्रह्म" अशी नवी शब्दयोजना अनेक वर्षांच्या विचारानंतर स्वीकारिली असे स्पष्टीकरण म. गांधींनी केलेले आहे. कोणाही नागरिकाला कोणतीही जीवननिष्ठा देणे हे येथील राज्यसंस्थेचे कर्तव्य नसून प्रत्येक नागरिकाच्या प्रामाणिक जीवननिष्ठेचे इतरांच्या उपद्रवापासून संरक्षण करणे हेच येथील राज्याचे कर्तव्य आहे. कोणतीही विशिष्ट जीवननिष्ठा इतरांना पटवून देता येईल पण तिची सक्ती करता येणार नाही. ईश्वरवादी असोत किंवा निरीश्वरवादी असोत, मूर्तिपूजक असोत किंवा अमूर्ताची उपासना करणारे असोत—सर्वांना सारखे संरक्षण दिले जाईल. पण अमूर्ताच्या उपासकाला मूर्तिपूजकाच्या मूर्ती फोडण्याचे स्वातंत्र्य मिळणार नाही. तसेच आपल्या मूर्ती व त्यांची पूजा कोणासही इतरांवर लादता येणार नाही. येथील राज्य अशी सक्ती करणाराचे समबुद्धीने पारिपत्य करील. सर्वांना केवळ भौतिकवादी बनविणे किंवा सर्वांना अध्यात्मवादाची दीक्षा देणे हेही येथील राज्यकर्त्यांचे कर्तव्य नाही. सर्वांचे समबुद्धीने संरक्षण करणे आणि कोणावरही

कोणाची सत्ती चालू न देणे हेच या राष्ट्राचे ब्रीद असून, या ब्रीदाची उभारणी प्रत्येकास अहिंसेने सत्याची उपासना करण्यास पूर्ण स्वातंत्र्य असावे या सत्याग्रही निष्ठेवर झालेली आहे. या सत्याग्रही निष्ठेमुळे राष्ट्र आता हिंदू राष्ट्र, मुसलमान राष्ट्र, ख्रिस्ती राष्ट्र किंवा पारशी राष्ट्र अथवा बौद्ध राष्ट्र उरलेले नसून ते सत्याग्रही व सर्वोदयवादी राष्ट्र बनलेले आहे. सर्वांचा उदय व्हावा आणि प्रत्येकाला आपापल्या निष्ठेस व सत्यास उपासिता यावे असे हे एक असामान्य व अभिनव राष्ट्र बनले आहे. यातून जातिभेद, धर्मभेद व आर्थिक वर्गभेद कायमचे नष्ट झाले पाहिजेत अशी आमची निष्ठा बनली आहे.

## वेदान्त, समाजक्रांती आणि अहिंसा

भारतीय संस्कृतीचा इतिहास अवलोकन केल्यास असे दिसून येते की, भारतात समाजक्रांतीचे प्रयत्न प्राचीन काळी अहिंसावादी बौद्धांनी व जैनांनी केले. या समाजक्रांतीला विरोध करण्याचे कार्य वैदिक अभिमान्यांनी केले. प्रथमतः बौद्ध धर्म हा हिंदू धर्माहून भिन्न असा धर्म नसून उपनिषदातील वेदान्ताचा आधार घेऊन समाजक्रांती करणारा एक संप्रदाय होता. पुढे ब्राह्मणांनी बौद्धांना वैदिक संस्कृतीतून दूर लोटले आणि वेदान्ताला समाजक्रांतीपासून पराङ्मुख केले. शंकराचार्यांच्या काळापासून वैदिक संस्कृती ही समाजक्रांतीपासून कायमची पराङ्मुख झाली. शांकर वेदान्तातील अद्वैत-तत्त्वज्ञान वेदप्रामाण्याच्या बंधनात गुरफटून गेले आणि वेदान्ताने वर्णाश्रमधर्मातील उच्चनीच भाव, सामाजिक विषमता आणि हिंसावाद यांना व्यवहारक्षेत्रात मान्यता दिली. यानंतर मध्ययुगीन साधुसंतांनी वेदान्ताला अहिंसावृत्तीचे व समतावृत्तीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण तेही कार्य अपुरेच राहिले. ते साधुसंतांचे कार्य पुरे करण्याचा आणि वेदान्ताला समाजक्रांतिकारक व अहिंसावादी स्वरूप देण्याचा मान म. गांधींनी मिळविला. यामुळे सत्याग्रही तत्त्वज्ञानात वेदान्ताचे अद्वैतदर्शन, साधुसंतांची अहिंसावृत्ती व समता आणि आधुनिक युरोपात निर्माण झालेली सामाजिक क्रांतिवृत्ती यांचा सुंदर समन्वय झालेला दिसून येतो. या सर्व समन्वयाची तर्कशुद्ध मांडणी व मीमांसा अद्याप झालेली नसली तरी आचार्य विनोबा यांनी ते कार्य करण्यास प्रारंभ केला असून त्यासाठी त्यांनी बुद्धगया येथे एक समन्वय-आश्रमही स्थापन केला आहे. या समन्वयाश्रमात वेदान्त आणि अहिंसादर्शने यांचा समन्वय करण्याचे कार्य जसे होणार आहे तसेच व्यक्तिवाद-विरुद्ध-समाजवाद आणि राष्ट्रवाद-विरुद्ध-मानवतावाद असे जे निरनिराळे वाद आधुनिक युरोपात उगम पावून आधुनिक भारतात आले आहेत, त्या सर्वांचा समन्वयही करण्याचे प्रयत्न सुरू होणार आहेत. सत्याग्रही वृत्तीचा आश्रय केलेल्या आधुनिक भारताने भारतातून एकेकाळी निर्वासित झालेली बौद्ध धर्माच्या अनुयायांना व बुद्धाच्या शिष्यांना गौरवाचे स्थान दिले आहे. बौद्धधर्मीय सम्राट अशोक याचे धर्मचक्र भारतीय ध्वजाचे चिन्ह बनलेले आहे आणि शांततेची अहिंसक समाजक्रांती हे भारताचे नियोजित व अंगीकृत कार्य

बनलेले आहे. या दृष्टींनी विचार केल्यास अठराव्या शतकाच्या अखेरीस परतंत्र बनलेला भारत आणि विसाव्या शतकाच्या मध्यास स्वतंत्र बनलेला भारत याची संस्कृती एकच असली, तरी तिचा कायापालट झाला असून तिच्यात आंतरबाह्य क्रांती घडून आलेली आहे. या क्रांतीचे श्रेय राममोहन रॉय यांच्यापासून गांधीजींपर्यंत होऊन गेलेल्या सर्वप्रकारच्या क्रांतिकारकांना असले तरी त्या सर्वांच्या कार्यांवर गांधीजींनी मुकुट चढविला असे म्हटले तर त्यात कोणतीही अतिशयोक्ती होणार नाही. भारतीय संस्कृतीला आजच्या जगात जे मानाचे स्थान व प्रतिष्ठा लाभली आहे त्याचे श्रेय म. गांधींनाच आहे. ही संस्कृती मानवाला सर्व प्रकारच्या दास्यातून, विषमतेतून व बंधनांतून मुक्त करण्याचा प्रयत्न करीत असून शासनमुक्तीच्या ध्येयाचा खरा मार्ग दाखवित आहे. मानवाला पुन्हा एकदा "धिग् बलं क्षत्रिय बलं ब्रह्म तेजोबलं बलम्" असा संदेश देऊन नवे जग निर्माण करू पाहणारे ऋषी राष्ट्रात निर्माण होत आहेत हा या राष्ट्राचा महिमा नव्हे काय? असे ऋषी केवळ एका राष्ट्राचा किंवा एका धर्माचा उद्धार करून थांबत नाहीत. ते सर्व जगाला नवे जग निर्माण करण्याचा मार्ग दाखवित असतात कारण त्यांना मानव-धर्मांची सनातन तत्त्वे अवगत असतात अथवा आपल्या तपश्चर्येने ती तत्त्वे अवगत करून घेतात व जुन्या जगात क्रांती घडवून नवे जग निर्माण करितात. तसे करण्यात त्यांचा हेतू अव्यभिचारी सत्यनिष्ठा व निर्मम प्रेम याहून दुसरा कोणताही नसतो.

[*नवभारत, ऑक्टोबर १९६९, पृ. १७ ते २२*]

विभाग तिसरा

# सत्याग्रही समाजवाद

## २६

# सत्याग्रह व समाजवाद

सत्याग्रही तत्त्वज्ञान हे समाजवादी तत्त्वज्ञानाच्या अगदी विरुद्ध आहे असे जेव्हा प्रतिपादण्यात येत असते, तेव्हा सत्याग्रही तत्त्वज्ञान हे धनसत्ताक व्यक्तिवादाच्या त्याहूनही अधिक विरुद्ध आहे इकडे दुर्लक्ष करण्यात येत असते. सत्याग्रही समाजरचनेत व्यक्तिवादाला स्थान आहे, परंतु धनसत्ताक व्यक्तिवादाला त्यात मुळीच स्थान नाही. धनसत्ताक समाजाची रचना सामुदायिक धनोत्पादन आणि वैयक्तिक धनविनिमय व धनविभाजन या दोहोंच्या एकत्र स्थितीवर झालेली असते. औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगधंद्याचे प्रमाण वाढले आणि यांत्रिक कारखाने निर्माण होऊन सामुदायिक धनोत्पादन चालू झाले. असे सामुदायिक धनोत्पादन चालू झाल्यानंतर धनविनिमयाचे व धनविभाजनाचे पूर्वीचेच स्वरूप अबाधित ठेवून कारखान्यावर व त्यात निर्माण होणाऱ्या मालावर वैयक्तिक स्वामित्व चालू देणे हे अनर्थावह आहे आणि म्हणून त्यावर समाजाचे सामायिक स्वामित्व स्थापन करावे, हा समाजवादी विचारसरणीचा आधारभूत सिद्धान्त आहे. सामुदायिक यांत्रिक धनोत्पादन व वैयक्तिक कारखानदारी या दोहोंच्या एकत्र स्थितीमुळे समाजात आर्थिक विषमता, परोपजीवन व वर्गयुद्ध यांची अभिवृद्धी होऊन राष्ट्रीयत्व व लोकसत्ता ही दुभंगतात आणि त्यांना धनिकसत्तेचे गुलामी स्वरूप प्राप्त होते, हा समाजवादाचा सिद्धांत सत्याग्रही तत्त्वज्ञानास अमान्य करता येणार नाही. तसेच सामुदायिक यांत्रिक धनोत्पादन चालू झाल्यानंतर, कारखान्यांवर भांडवलदारांचे वैयक्तिक स्वामित्व ठेवून भांडवलदार व कामगार या वर्गांतील आर्थिक संबंध व व्यवहार केवळ अनिर्बंध स्पर्धा व वर्गीय किंवा वैयक्तिक स्वार्थसाधनांची ओढाताण यांच्या अधीनच ठेवावेत आणि त्यांचे नियमन समाजाने किंवा सरकारने करू नये, हे अनिर्बंध धनसत्तेचे तत्त्वज्ञान सत्याग्रही तत्त्वज्ञानास केव्हाही मान्य होणार नाही. कारखाने ही धनिक लोकांची मालमत्ता नव्हे, समाजातील धनोत्पादनाचे सार्वजनिक कार्य योग्य प्रकारे चालू ठेवण्याची जबाबदारी वाटून धनिक वर्गाकडे सोपविलेला, कारखाने हा

एक सार्वजनिक निधी आहे आणि ज्यांना आज धनी म्हणतात ते समाजाने नेमिलेले निधिधारक आहेत, असे तत्त्व म. गांधींनी अनेकवार प्रतिपादिलेले आहे. अर्थात या निधीची व्यवस्था कशी करावी हे नियमन करण्याची सत्ता समाजाकडेच असली पाहिजे. तसेच कारखानदार वर्ग हा असा समाजाचा निधिधारक म्हणजे एक प्रकारचा सेवक आहे, तसाच कामगारवर्गही समाजाचा सेवक असून कारखान्यात त्यासही भांडवलदारासारखेच हक्क समाजाने दिले पाहिजेत. कारखाने ही जशी भांडवलदारांची वैयक्तिक मालमत्ता नव्हे, तसेच कामगार हे भांडवलदारांचे व्यक्तिशः नोकर नव्हेत. ते दोघेही समाजाचे सेवक आहेत आणि दोघांच्याही योग्य हक्कांचे व कर्तव्यांचे नियमन करून त्यांचे संबंध न्यायावर अधिष्ठित करणे हे समाजाचे कर्तव्य आहे, असे म. गांधींचे सामुदायिक धनोत्पानासंबंधी आजचे धोरण आहे. पण हेच धोरण त्रिकालाबाधित आहे किंवा सत्याग्रही तत्त्वज्ञानाशी या विशिष्ट धोरणाचा नित्य संबंध आहे, असे आम्हास वाटत नाही. जर हे धोरण कारखानदार व कामगार यांच्यात न्यायप्रस्थापना करण्यास पुरे पडले नाही, तर कारखानदारांकडून कारखाने काढून घेऊन ते प्रत्यक्ष समाजाच्या ताब्यात घ्यावेत हे धोरणही सत्याग्रही तत्त्वज्ञानाशी विसंगत नाही.

कोणतेही स्वामित्वाचे हक्क केवळ परंपरागत म्हणून अबाधित ठेविलेच पाहिजेत आणि ते अबाधित ठेवण्यापासून समाजाचे अहित होत असले तरी ते नष्ट करू नयेत, हे तत्त्वच सत्याग्रहाशी पूर्णपणे विसंगत आहे. वैयक्तिक मालमत्ता व स्वामित्वाचा हक्क या त्रिकालाबाधित सनातन वस्तू नाहीत किंबहुना या संस्था समाजात लागणारे धनोत्पादन होत राहावे आणि त्यासाठी श्रम करण्यास लोकांना उत्साह वाटावा म्हणून निर्माण झालेल्या आहेत, असेच सत्याग्रही तत्त्वज्ञान आहे. जोपर्यंत व जितक्या प्रमाणात हे कार्य या संस्थाकडून होत राहील तोपर्यंत व तितक्या प्रमाणात त्या संस्था समर्थनीय ठरतील. तथापि या संस्थांच्या आधारे कोणतेही श्रम न करता द्रव्य संपादन करण्याच्या मार्गाचे समर्थन होऊ शकत नाही आणि म्हणूनच वैयक्तिक कारखानदारीमुळे समाजात अकष्टार्जित धनसंपादनाचे जे मार्ग रूढ होतात त्यांचे सत्याग्रही तत्त्वज्ञानाप्रमाणे समर्थन करता येत नाही, असे प्रस्तुत लेखकाचे स्वतःचे मत आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे श्रम न करता केवळ स्वामित्वाच्या हक्कावर जमिनीचा खंड उपभोगणे हेही सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध आहे. खंड, व्याज व नफा हे द्रव्यार्जनाचे मार्ग वैयक्तिक जमीनदारी, सावकारी व कारखानदारी अबाधित आहे तोपर्यंत नष्ट होऊ शकत नाहीत आणि या तीनही द्रव्यार्जनाच्या मार्गांत दुसऱ्याच्या श्रमाचे फळ विनाश्रम उपटता येण्याचे तत्त्व अंतर्भूत झालेले आहे. याचाच अर्थ स्तेय व हिंसा यांच्या आधारे या प्रकारचे द्रव्यार्जन होत असते असा होतो, परंतु सत्याग्रही समाजरचनेत या स्तेयास व हिंसेस मान्यता देता येणार नाही. याच दृष्टीने समाजवादी आर्थिक विचारसरणी व्यक्तिवादी आर्थिक विचारसरणीहून सत्याग्रही तत्त्वज्ञानाला

निकट आहे, असे आम्ही म्हणतो. सत्याग्रही तत्त्वान्वये धनसत्ताक संस्कृतीचे तर समर्थन होऊ शकत नाहीच, परंतु खाजगी जमीनदारी, सावकारी व कारखानदारी यांच्यामुळे जे द्रव्यार्जनाचे मार्ग कायदेशीर म्हणून अस्तित्वात येतात त्यांचेही समर्थन होऊ शकत नाही. दुसऱ्याच्या श्रमाने उत्पन्न झालेल्या संपत्तीचा अंश स्वतः कोणतेही श्रम न करता उपभोगणे हे नैतिकदृष्ट्या चौर्य होय.

हे चौर्य नष्ट करण्यास समाजवादी आर्थिक घटना स्वीकारणे किंवा सामुदायिक धनोत्पादन करणे हे दोनच मार्ग आहेत. केवळ हस्तव्यवसाय व वैयक्तिक धनोत्पादन यामुळे समाजात जे भौतिक धन निर्माण होईल तेवढ्यावरच संतुष्ट राहण्यास सर्व समाज स्वेच्छेने तयार झाला तर समाजवादाचा प्रश्नच निर्माण होत नाही. परंतु तसे व्हावयाचे तर समाजाच्या भौतिक राहणीचे मान फारच साधे असावे लागेल. म. गांधींची स्वाभाविक प्रवृत्ती या साध्या राहणीकडेच आहे आणि त्यांचा सामुदायिक यांत्रिक धनोत्पादनास तत्त्वतःच विरोध आहे. समाजाची भौतिक राहणी साधी बनण्याने त्याची संस्कृती हीन बनते अथवा तो रानटी बनतो असे त्यांना वाटत नाही. "साधी राहणी व उच्च विचार-सरणी" यांचा समन्वय होऊन श्रेष्ठ प्रतीची मानवसंस्कृती निर्माण करता येईल, असा त्यांना आत्मविश्वास वाटतो आणि समाजातील ज्या व्यक्तींनी सत्याग्रहाची दीक्षा घेतली असेल त्यांनी या तत्त्वाप्रमाणेच आपले जीवन व्यतीत केले पाहिजे, असे त्यांचे सांगणे आहे. तथापि सर्व समाज या उच्च आदर्शभूत अवस्थेस पोहोचू शकेल आणि समाजातील सामुदायिक यांत्रिक धनोत्पादन समूळ बंद पडेल असेही त्यांस वाटत नाही. समाजातील सामान्य लोकांची भौतिक संपत्तीची अभिलाषा तीव्र आहे आणि ती तृप्त करण्यासाठी सामुदायिक यांत्रिक धनोत्पादन आज अपरिहार्य असे त्यांनाही वाटते. अर्थात या सामुदायिक यांत्रिक धनोत्पादनाबरोबर येणारे सामाजिक प्रश्न सोडविताना समाजवादाचा आश्रय करणे सत्याग्रही तत्त्वज्ञानास भाग पडणार आहे आणि याच दृष्टीने म. गांधी स्वतःस समाजवादीही म्हणवितात. मात्र त्यांना समाजवादाची प्रस्थापना हिंसामार्गाने करणे संमत होणे शक्य नाही. कारण, हिंसामार्गाने सामाजिक क्रांती करून न्यायाची प्रस्थापना होऊ शकत नाही आणि तसा जे प्रयत्न करतात ते स्वतःच तत्त्वभ्रष्ट होऊन अन्यायी बनतात. म्हणून समाजवादाची प्रस्थापना करावयाची झाली तरी ती अनत्याचारी क्रांतीनेच केली पाहिजे हे सत्याग्रहाचे यासंबंधातील अंतिम तत्त्व समजण्यास प्रत्यवाय नाही.

सामुदायिक यांत्रिक धनोत्पादनाची पद्धती शेतीसुधारणेच्या दृष्टीनेही हिंदुस्थान देशास अवलंबावी लागणार आहे. ही यांत्रिक शेती सामाजिक स्वामित्वाच्या तत्त्वावर करावी, सहकार तत्त्वावर करावी, की वैयक्तिक स्वामित्वाच्या तत्त्वावर करावी, हा प्रश्न हिंदुस्थाना-पुढे लवकरच उभा राहणार आहे. वैयक्तिक स्वामित्वाच्या तत्त्वावर यांत्रिक शेती मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्यास जमीनदार व शेतकरी यांच्यात इतकी आर्थिक विषमता

निर्माण होईल व एवढे प्रचंड वर्गयुद्ध माजेल की, त्याचे निवारण कोणाच्यानेही होणार नाही. तेव्हा हिंदुस्थानात शांतता नांदण्याच्या दृष्टीने यांत्रिक शेती सहकारी तत्त्वावर किंवा सामाजिक स्वामित्वाच्या तत्त्वावर करण्याशिवाय गत्यंतर नाही, हे आता बहुतेक राष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञांस मान्य होऊ लागले आहे. हिंदुस्थानातील बेकारी व दारिद्र्य यांचे निवारण करण्यास ज्याप्रमाणे वैयक्तिक यांत्रिक कारखानदारी समर्थ होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे वैयक्तिक यांत्रिक शेती हीही समर्थ होऊ शकत नाही, हे कोणासही मान्य करावे लागणार आहे. हिंदुस्थानचा दारिद्र्य निवारणाचा व बेकारी-निवारणाचा प्रश्न इतका प्रचंड आहे की, तो सोडविण्यास धनसत्ताक आर्थिक घटना केव्हाही समर्थ होणार नाही. चाळीस कोटी जनतेच्या दारिद्र्याचे निवारण करण्यास इंग्लंड, जर्मनी, इटली, जपान यासारख्या पाच–सात कोटी लोकसंख्येच्या राष्ट्राचे साम्राज्यवादी अर्थशास्त्र केव्हाही उपयोगी पडणे शक्य नाही. हिंदुस्थान, चीन, रशिया, युरोप अशी खंडराष्ट्रे निर्माण होण्याचा काळ आज आलेला आहे, ... अशा खंडराष्ट्राची आर्थिक घटना धनसत्ताक व साम्राज्यसत्ताक तत्त्वांवर होऊ शकणार नाही. त्यांना आर्थिक दृष्टीने प्रायः स्वयंपूर्णतेचे धोरण स्वीकारून राष्ट्रांतर्गत व्यापारानेच आपला प्रश्न सोडवावा लागेल आणि असे करताना आर्थिक समता व औद्योगिक लोकसत्ता या तत्त्वांचा आश्रय करावा लागेल. आर्थिक समता व औद्योगिक लोकसत्ता म्हणजेच समाजवादी आर्थिक घटना होय.

## परंपरा, प्रगती व क्रांती

अशा प्रकारे सामुदायिक यांत्रिक उत्पादनाचा आश्रय केल्यामुळे व्यक्तिवादी आर्थिक घटनेतून समाजवादी आर्थिक घटनेत प्रवेश करणे भाग असून परंपरागत धनार्जनाचे मार्ग व स्वामित्वाचे हक्क यांसंबंधीच्या कल्पनांमध्ये क्रांती होणे अपरिहार्य होणार आहे. तेव्हा प्रस्तुत परंपरागत हक्काचे नियंत्रण करण्यासंबंधी अथवा त्यांपैकी काही नष्ट करण्यासंबंधी सत्याग्रही तत्त्वज्ञानाची वृत्ती कशा प्रकारची आहे याचा येथे थोडासा विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक रूढी, धार्मिक बंधने किंवा कायदे यासंबंधी सत्याग्रहाची जी वृत्ती आहे तीच स्वामित्वाच्या हक्कासंबंधीही असणार व आहे. याविषयी पाश्चात्त्य राष्ट्रांत परंपरावाद, प्रगतिवाद व क्रांतिवाद असे तीन विचारसंप्रदाय आढळतात. परंपरावादाचे पुरस्कर्ते असे प्रतिपादितात की, परंपरागत स्वामित्व नष्ट करण्याचा समाजाला मुळीच हक्क नाही. प्रगतिवादी म्हणतात की, परंपरागत स्वामित्व परिस्थितिभेदामुळे समाजाला अहितावह होत असेल तर ते नष्ट करण्यास प्रत्यवाय नाही, पण ते नष्ट करताना ज्यांचे हक्क नष्ट करावयाचे त्यांना योग्य मोबदला दिला पाहिजे. क्रांतिवादी याच्यापुढे जाऊन असा युक्तिवाद करितात की, परंपरागत स्वामित्व समाजहिताला विघातक व अन्याय्य आहे असे सिद्ध झाल्यानंतर ते नष्ट करताना कोणताही मोबदला देणे म्हणजे आजपर्यंत चालत आलेला अन्याय पुढेही चालू ठेवण्यासाठी इतरांवर अन्याय्य भार लादण्यासारखे आहे. सत्याग्रही तत्त्वज्ञानात या

तीनही वृत्तींना योग्य प्रमाणात अवसर मिळू शकतो. परंपरागत हक्क सामाजिक उपयुक्ततेतून निर्माण झालेले असतात, तसे त्यापैकी काही हीन प्रकारे वर्तन करूनही मिळविलेले असतात. तेव्हा सर्व परंपरागत हक्क एकाच कोटीत घालता येणार नाहीत. ज्या हक्कांचा उद्‌भव सामाजिक उपयुक्ततेतून व कायदेशीर मार्गांनी झाला असेल त्यांपैकीसुद्धा काही हक्क कालांतराने अपकारक ठरतात आणि म्हणून ते नष्ट करण्याचा हक्क समाजाला असला पाहिजे. असे हक्क नष्ट करताना परंपरागत धन्यांना नुकसानभरपाईसाठी काही द्यावे हे तत्त्व सामान्यतः उचित असले, तरी ती नुकसानभरपाई कोणाकडून वसूल करून कोणाला देण्यात येणार याचाही विचार केला पाहिजे. ज्या वर्गाने अनेक वर्षे अन्याय्य हक्क उपभोगिले असतील आणि ज्याला ते नष्ट केल्याने भोगावे लागणारे नुकसान सोसण्याची शक्ती असेल अशा वर्गांना नुकसानभरपाई देण्यासाठी गरिबांवर भार टाकणे न्यायाचे होणार नाही. अर्थात ज्यांच्यापाशी अधिक धन आहे त्यांच्यावर निर्धन वर्गाला न्याय मिळण्यासाठी अधिक बंधने घालणे, त्यांचे हक्क मर्यादित करणे, अवश्य तर ते नष्ट करणे आणि प्रसंगी मुळीच मोबदला न देता नष्ट करणे, या सर्व गोष्टी लोकहित व लोकसंग्रह यांकडे लक्ष देऊन समाजाने करण्यास प्रत्यवाय नाही. मात्र असे करीत असता कोणत्याही वर्गावर सूड उगविण्याची भावना धरू नये. ज्यांचे हक्क नष्ट व्हावयाचे त्यांच्या योगक्षेमाचीही जबाबदारी समाजाने घेतली पाहिजे आणि त्यांना नव्या परिस्थितीशी समरस बनण्यास योग्य संधी व योग्य काल दिला पाहिजे, हेही तितकेच खरे आहे. अहिंसात्मक क्रांतीत या सर्व गोष्टींकडे पूर्ण लक्ष दिले जाईल आणि हिंसात्मक क्रांतीत ते दिले जात नाही. एवढाच खरा भेद सत्याग्रह व सशस्त्र क्रांतिवाद यांच्यामध्ये आहे. सत्याग्रही तत्त्वज्ञान हे स्वामित्वाच्या संबंधीही क्रांतिवादी आहे आणि केवळ दीर्घ परंपरेने कोणतेही हक्क अविनाशी अथवा शाश्वत बनतात असे ते मानू शकत नाही. जमिनी व कारखाने ही व्यक्तींच्या अधीन असली तरी तो राष्ट्राचा निधी आहे आणि जमीनदार व कारखानदार हे समाजाचे निधिधारक आहेत. या दृष्टीनेच सत्याग्रह तिकडे पाहत असतो. म्हणून सर्व प्रकारच्या स्वामित्वाला व वैयक्तिक मालमत्तेच्या हक्काला सापेक्षत्व प्राप्त होते. जमिनी व कारखाने ही धनोत्पादनाची साधने सार्वजनिक स्वामित्वाची बनविणे हेच लोकहितास पोषक आहे असे समाजाने ठरविले, तर तसे करण्याच्या मार्गात कोणासही अडथळा आणता येणार नाही. या प्रश्नाचा निर्णय वर्गयुद्धाने न लावता समाजाच्या न्यायबुद्धीस जागृत करून लाविला पाहिजे आणि समाजाची न्याय-बुद्धी व्यक्त करण्यास व जागृत करण्यास लोकसत्ताक राज्यपद्धतीचा आश्रय दोनही पक्षांनी करावा हाच व्यावहारिक मार्ग आहे, असे सत्याग्रही तत्त्वास मान्य करणे भाग आहे. लोकसत्तेचा मार्ग सोडल्यास आज 'फॅसिझम' व 'कम्युनिझम' हेच दोन अत्याचारी मार्ग उरतात आणि ते मार्ग सत्याग्रहास केव्हाही त्याज्यच आहेत. तेव्हा लोकसत्ताक मार्गाने व आत्मबलाच्या आश्रयाने प्रस्थापित होणारी समाजवादी आर्थिक घटना हीच सत्याग्रही तत्त्व-ज्ञानास मान्य होईल हे उघड आहे. मात्र सत्याग्रही राजकारण म्हणजे ब्रिटिश समाजवाद्यांचे

केवळ बुद्धिबलावर विसंबून राहणारे कायदेशीर किंवा सनदशीर राजकारण नव्हे, हे येथे स्पष्ट केले पाहिजे. जो सत्याग्रहाचा मार्ग परकीय साम्राज्यसत्तेविरुद्ध आज अवलंबिण्यात येतो, तोच मार्ग स्वराज्यात स्वदेशी धनसत्तेविरुद्धही अवलंबिण्यात येईल व आला पाहिजे. मात्र यास योग्य असे नेते निर्माण झाले पाहिजेत. तथापि योग्य वेळी योग्य नेते निर्माण होण्याइतके आत्मबल आज भरतखंडात निर्माण झाले आहे. या आत्मबलाच्या अभावी स्वराज्यातील अनेक संकीर्ण प्रश्न सोडविताना हिंसेचा व अत्याचारांचा फार मोठा प्रादुर्भाव झाल्याशिवाय राहणार नाही. हिंसात्मक क्रांती व सर्वनाश या दोनही आपत्ती टाळून शांततेने राष्ट्रीय जीवनात क्रांती घडवून आणण्यास केवळ हे आत्मबलच समर्थ होणार आहे. समाजातून हे आत्मबल नष्ट होऊन त्याची बुद्धी तमोगुणाने व रजोगुणाने मलिन बनली, तर हिंसात्मक क्रांती व सर्वनाश यांपैकी कोणतीही आपत्ती त्याच्यावर ओढवण्यास वेळ लागणार नाही. विशेषतः अनेक वर्षांच्या आर्थिक पिळवणुकीने बुभुक्षित बनलेल्या भारतीय जनतेत माथेफिरू वृत्ती पसरण्यास फार काल लागेल असे वाटत नाही. इंग्लंडची न्यायबुद्धी तमोगुणाने मलिन झाली तेव्हा ती सुस्त बनली. कारण हे राष्ट्र सुस्थितीत होते. पण ज्या देशातील जनता बुभुक्षित बनलेली आहे त्या देशात न्यायबुद्धी मलिन झाल्यास माथेफिरूपणा हा एकच परिणाम अपरिहार्यपणे घडून येणार आणि त्यातूनच हिंसात्मक क्रांती किंवा सर्वनाश यांचा उद्भव होणार. याचा परिहार करण्यास केवळ आत्मबलच समर्थ होऊ शकेल. या आत्मबलाच्या आश्रयानेच लोकसत्तेतून समाजसत्तेत प्रवेश करण्याचा शांततेचा मार्ग जगाला लाभणार आहे. अर्थात अशा मार्गानेच व्यक्तिवाद व राष्ट्रवाद यांचा समाजवादाशी समन्वय होऊ शकेल.

## एकवर्गी समाज, चातुर्वर्ण्य व सत्याग्रह

समाजवाद व व्यक्तिवाद यांचा समन्वय समाजवादी लोकसत्ताक राज्यात होऊ शकतो. कारण, अशा राज्यात विचार, प्रचार व आचार याविषयी व्यक्तींना शांततेचे स्वातंत्र्य उपभोगता येते आणि लोकसत्ताक तत्त्वे औद्योगिक क्षेत्रात लागू होऊन जमिनी व कारखाने यांच्यावर समाजाचे स्वामित्व प्रस्थापित होत असते. अशा राज्यात एकवर्गी समाज अस्तित्वात येईल आणि त्यामुळे समाजात खरी बंधुभावना नांदू लागेल. या एकवर्गी समाजातील बंधुभावनेच्या आधारावरच खरी लोकसत्ता नांदू शकते. धनसत्ताक समाजात जिकडे तिकडे जीवनकलह, वैयक्तिक स्पर्धा, जीवितवित्तांची अशाश्वती व वर्गकलह असे वातावरण असल्याने खरी लोकसत्ता नांदू शकत नाही. तसेच समाजसत्ताक राज्यात लोकसत्तेच्या तत्त्वांना हरताळ फासून अनियंत्रित एकपक्षी सत्ता प्रस्थापित असेपर्यंत व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगता येत नाही. यामुळे रूढ राज्यकारभारात सुधारणा होण्यास लागणारे मतस्वातंत्र्य व मतप्रचारस्वातंत्र्य यांच्या अभावी राजकीय अन्यायांचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असतो. या अन्यायामुळे वरिष्ठ अधिकारीवर्ग व सामान्य जनता असे दोन वर्ग

अस्तित्वात येऊन समाजसत्तेला अनियंत्रित नोकरशाहीचे स्वरूप प्राप्त होण्याचा निश्चित धोका आहे. याकरिताच लोकसत्तेचा नाश न करता समाजसत्तेची प्रस्थापना करण्याचा मार्ग म. गांधींच्या सत्याग्रहनीतीतून सापडेल असे वाटल्यावरूनच पं. जवाहरलाल नेहरू हे स्वतःला समाजवादी, लोकसत्तावादी व अनत्याचारी क्रांतितंत्राचे पुरस्कर्ते मानू लागले आहेत.

परंतु अनेकवर्गी समाजातून एकवर्गी समाजात प्रविष्ट होणे हे तत्त्व सत्याग्रहास कितपत मान्य आहे, याचा येथे विचार केला पाहिजे. सत्याग्रहाचे प्रणेते म. गांधी स्वतःस वर्णाश्रमसंस्थेचे पुरस्कर्ते मानितात आणि चातुर्वर्ण्य हा वर्णाश्रमसंस्थेचा आधार असल्यामुळे काही लोकांना एकवर्गी समाजाचे ध्येय सत्याग्रही तत्त्वज्ञानाशी विसंगत वाटते. परंतु हा केवळ शाब्दिक वाद आहे किंवा या वादात बराच गैरसमजही असण्याचा संभव आहे. वास्तव चातुर्वर्ण्याचे सामाजिक तत्त्वज्ञान म्हणजे काय हे प्रथम निश्चित केले पाहिजे. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः" व "स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः" हा चातुर्वर्ण्य संस्थेचा आध्यात्मिक आधार मानिला जातो आणि प्रस्तुत तत्त्वांच्या आधारे समाजरचना करावयाची म्हणजे प्रत्येक मनुष्याने आपल्या गुणानुसार समाजाची कोणतीही सेवा केली तरी ती निरहंकार व निःस्वार्थ बुद्धीने केली असता त्यास श्रेष्ठत्व प्राप्त होते, समाजसेवा ही एक परमेश्वराचीच सेवा असून तीतच व्यक्तीचे आत्मिक हित आहे व समाजातील सर्व उपयुक्त व्यवसायांची योग्यता सामाजिकदृष्ट्या सारखीच असल्याने निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या लोकांत सामाजिक, आर्थिक किंवा राजकीयदृष्ट्या उचनीचभाव कल्पिणे व विषमता रूढ करणे हा अधर्म होय, असा अर्थ होतो. हा अर्थ लोकसत्तेच्या किंवा समाजसत्तेच्या ध्येयाशी विसंगत नसून सांप्रतच्या यांत्रिक धनोत्पादनाच्या युगात समाजवादी लोकसत्ता प्रस्थापित होईल तेव्हाच समाजातील कोणताही व्यवसाय करणे ही लोकसेवा, म्हणजेच लोकसंग्रह किंवा ईशसेवा होय असे म्हणता येईल. धनोत्पादनाची साधने व्यक्तिगत स्वामित्वाची आहेत तोपर्यंत समाजातील कष्टाळू जनतेला आपली श्रमशक्ती धनिकवर्गाची लक्ष्मी वाढविण्यासाठीच वेचावी लागणार आहे. जनतेला भोगाव्या लागणाऱ्या या कष्टांना परमेश्वरसेवा म्हणणे म्हणजे लक्ष्मीवंत ते परमेश्वर, असा अर्थ करावा लागतो.

समाजातील निरनिराळ्या शक्ती याच देवता आहेत. प्रस्तुत देवतांच्या प्रसन्नतेतून सर्व भोग किंवा संपत्ती उत्पन्न होत असते. ही संपत्ती हे एक "हवनद्रव्य" समजून ती पुन्हा त्या देवतांकडे गेली पाहिजे. हाच एक सामाजिक यज्ञ आहे आणि या यज्ञाची उत्पत्ती कर्मातून होत असते. हे यज्ञचक्र चालविण्यासाठी कोणतेही श्रम किंवा कर्म न करता जे वर्ग सामाजिक संपत्तीचा उपभोग घेतात, ते परपीडेचे पाप करीत असतात आणि दुसऱ्यांच्या श्रमाचे फल उपभोगून स्वतः श्रम करीत नाहीत म्हणून चोर ठरत असतात. त्यांच्यावर

सामाजिक श्रमशक्तिरूप देवतांचा कोप होऊन त्यांचा कालांतराने नाश होणे हीच धर्मस्थापना म्हणता येईल. या दृष्टीने विचार केला तरी भोगप्रधान धनसत्ताक संस्कृतीपेक्षा कर्मप्रधान समाजवादी संस्कृती हीच वर्णाश्रमधर्माच्या मूलतत्त्वास अनुसरून आहे, हे मान्य करावे लागेल. वर्णाश्रमधर्म समाजसेवा व समता यावर अधिष्ठित असेल तर त्यापासून लोकसंग्रह किंवा समाजधारणा होईल. त्यात ज्या प्रमाणात परोपजीवन चालू होते तितक्या प्रमाणात त्याच्यातून विषमता, अन्याय, असत्य व अधर्म यांची उत्पत्ती झालेली आहे. तितक्या प्रमाणात त्यातून वर्गविग्रहही निर्माण झालेला आहे आणि या वर्गविग्रहामुळेच भरतखंड परतंत्र होऊन अद्यापि ते परतंत्रच राहिलेले आहे.

चातुर्वर्ण्यसंस्थेत शूद्रवर्ग हा संपत्ती व संस्कृती यापासून दूर ठेवण्यात आला होता. यामुळे वर्णाश्रमसंस्कृती ही केवळ त्रैवर्णिक संस्कृतीच बनली आणि तिने शूद्र-अतिशूद्र वर्गांना दास बनविले. यातून सामाजिक विषमता, जन्मसिद्ध उच्चनीचभाव व वर्गविग्रह यांची निर्मिती झालेली आहे. जन्मसिद्ध उच्चनीचभाव, जातीय स्वार्थ हा अद्यापि भरतखंडाच्या राष्ट्रीकरणाच्या आड येत आहे आणि अशा प्रकारे तो त्याच्या पारतंत्र्यासही कारण होत आहे. भरतखंडाच्या पारतंत्र्यास राष्ट्रबुद्धीचा अभाव हे मुख्य कारण झालेले आहे आणि ही राष्ट्रबुद्धी न वाढण्यास सामाजिक जातिभेद व तज्जन्य जन्मसिद्ध उच्चनीचभाव, म्हणजेच सामाजिक विषमता, कारण झालेली आहे. ही विषमता ज्या काळी धनोत्पादनाची शक्ती वाढलेली नव्हती त्या काळी अपरिहार्य असेल, पण आज ती परिहार्य आहे. अशी परिहार्य विषमता चालू देणे ही हिंसा आहे.

चातुर्वर्ण्याच्या अभिमान्यांसही ही संस्था अनादि व शाश्वत नसून सत्ययुगात एकवर्णी समाजच होता असे पुराणादी ग्रंथांत केलेले वर्णन मान्य आहे. एकवर्णी समाजव्यवस्था हीच आदर्शभूत समाजव्यवस्था होय असा याचा स्पष्ट अर्थ होतो. चातुर्वर्ण्यातील शूद्रवर्ग हा केवळ सेवा करणारा वर्ग असून तो संपत्ती व संस्कृती यांपासून दुरावलेला ठेवणे हे समाजाचे ध्येय होऊ शकत नाही आणि सांपत्तिक व सांस्कृतिक दृष्ट्या शूद्रांना समतेचे हक्क देण्याचे तत्त्व गृहीत केल्यानंतर केवळ त्रैवर्णिकच समाज उरतो. जोपर्यंत राज्यसंस्था आहे तोपर्यंतच क्षत्रिय वर्णाची आवश्यकता आहे. राज्यसंस्थेची आवश्यकता नष्ट झाली म्हणजे क्षत्रिय वर्ण आपोआपच नष्ट होतो. सत्याग्रह व समाजवाद ही दोनही तत्त्वज्ञाने दंडहीन समाजालाच आदर्शभूत समाज मानीत असल्यामुळे त्यांच्या आदर्शभूत समाजात क्षत्रिय वर्णाला अवकाशच नाही. अशा प्रकारे शूद्र व क्षत्रिय हे दोन वर्ण नष्ट करणे हे ध्येय समाजवाद व सत्याग्रह या दोनही तत्त्वज्ञानास साधारण असेच म्हटले पाहिजे. मग केवळ ब्राह्मण व वैश्य हे दोनच वर्ण राहतात. यापैकी ब्राह्मण हे संन्यस्त व वैराग्यशील आणि वैश्य हे कर्मशील व भोगशील असा भेद आहे. या भेदाच्या दृष्टीने सत्याग्रहाचे ध्येय सर्वांस ब्राह्मण बनवावे असे असून समाजवादाचे ध्येय सर्वांस वैश्य बनवावे, म्हणजे

कर्मशील व भोगशील बनवावे असे आहे असे काही लोक म्हणू शकतील. हाच अर्थ दुसऱ्या शब्दात सांगावयाचा तर असा सांगता येईल की, समाज एकवर्गी बनावा हे ध्येय दोहोंसही समान असले तरी सत्याग्रही समाज अपरिग्रही, अध्यात्मप्रवण व निवृत्तिपर बनेल, तर समाजवादी समाज परिग्रही, भौतिकसुखप्रवण व प्रवृत्तिपर बनेल.

### भौतिक सुख व आत्मिक सुख

वरील भेदही तितकासा खरा नाही. कारण, समाजवादही केवळ भौतिक सुख हेच आपले ध्येय मानीत नाही आणि सत्याग्रहसुद्धा समाजातील कोणत्याही व्यक्तीने केवळ अध्यात्मात व ज्ञानात गढून जाऊन भौतिक धनोत्पादनाचे श्रम करू नयेत असे प्रतिपादीत नाही. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवितयात्रेस लागणारे भौतिक धन निर्माण करण्यासाठी श्रम केले पाहिजेत हे शरीरश्रमतत्त्व सत्याग्रहात अंतर्भूत झालेले आहे. तेव्हा सत्याग्रही समाज केवळ ब्राह्मणांचा समाज असेल असे म्हणता येणार नाही आणि समाजसत्ताक समाज केवळ वैश्यांचा होईल असेही म्हणता येणार नाही. कारण, त्यातील व्यक्ती अशा भौतिक धनोत्पादनाचे कार्य करीत असतील, त्याचप्रमाणे त्या बौद्धिक व आत्मिक सुखाचाही आस्वाद घेत असतील असेच समाजवादाचे सुद्धा मत आहे. सारांश, समाज हा एकवर्गी बनला म्हणजे त्याला सांप्रतच्या किंवा मध्ययुगीन समाजातील कोणत्याही एका वर्गाचे स्वरूप येईल असे मानणे हे चूक आहे. फार तर एवढेच म्हणता येईल की, समाजवाद्यांचे एकवर्गी समजाचे ध्येय अधिक भोगप्रधान आहे आणि सत्याग्रही एकवर्गी समाजाचे ध्येय अधिक त्यागप्रधान आहे. सत्याग्रही समाज अपरिग्रही होऊ इच्छितो, तर समाजवादी समाज भौतिक परिग्रह वाढवू इच्छितो.

हा एक अंतिमदृष्ट्या महत्त्वाचा वृत्तिभेद आहे यात शंका नाही, पण तोही उभयपक्षी समन्वय होऊनच सोडवावा लागेल. समाजवादी ध्येय हे धनसत्ताक संस्कृतीच्या दृष्टीने अपरिग्रहीच आहे. कारण, त्यात वैयक्तिक परिग्रह अगदी मर्यादित होणार आहे. सामुदायिक परिग्रह हा वैयक्तिक स्वार्थ, लोभ, स्पर्धा, असूया या हीन वृत्तींना चालना देऊ शकत नाही आणि समाजभावना, सहकार्य, सेवावृत्ती व प्रेम यांची तो अभिवृद्धी करितो. या दृष्टीने धनप्रधान लोकसत्तेला समाजवादी लोकसत्तेचे स्वरूप देणे आपल्या अंतिम ध्येयाच्या दृष्टीनेही आपले आद्य कर्तव्य आहे हे सत्याग्रही पक्षास मान्य केले पाहिजे. हे स्वरूप देत असता आजच्या धनप्रधान संस्कृतीतील निर्धन वर्गाची भौतिक राहणी अधिक उन्नत बनविली पाहिजे हेही त्यांस मान्य आहे. पण हे करीत असता सधन वर्गात अपरिग्रही वृत्ती बाणविण्याचा प्रयत्न होत राहिल्यास त्या वर्गाकडून समाजवादी लोकसत्तेच्या प्रस्थापनेस अत्याचारी विरोध होणार नाही हे उघड आहे. केवळ अपरिग्रही वृत्तीचा उपदेश करून सधन-निर्धन वर्गभेद नष्ट होणे अशक्य असल्याने लोकसत्तेला समाजवादी लोकसत्तेचे स्वरूप दिले पाहिजे हेही सत्याग्रही पक्षाने निःसंदिग्धपणे मान्य केले पाहिजे.

समाजाला आत्मसत्तेचे स्वरूप प्राप्त होणे हे सत्याग्रहाचे अंतिम ध्येय असले तरी आज धनप्रधान लोकसत्तेतून समाजवादी लोकसत्तेत प्रवेश करणे हेच निकटवर्ती ध्येय आहे, हे सत्याग्रही तत्त्वज्ञानास मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही. समाजवादी लोकसत्तेचे राज्य-यंत्रही अंती गळून पडले पाहिजे आणि समाजाला सर्वांगीण मुक्तावस्था प्राप्त झाली पाहिजे हे समाजवादाचेही ध्येय आहे. तो या अवस्थेला "अराजक" अवस्था असे नाव देतो. पण ही अराजक अवस्था नसून ती आत्मसत्ताक अवस्था असली पाहिजे हे तत्त्व समाज-वाद्यांनी ओळखले पाहिजे. आत्मसत्तेची आध्यात्मिक दृष्टी प्राप्त झाल्याशिवाय समाजवादी लोकसत्तेचे राज्ययंत्र गळून पडणार नाही. या आध्यात्मिक वृत्तीतच भौतिक सुखाचा परिग्रह वाढविण्याकडचे लक्ष उठवून बौद्धिक व आत्मिक सुखांच्या बुद्धीकडे लक्ष लाव-ण्याची शक्ती आहे. समाजवादालाही भौतिक सुखाचा सामाजिक परिग्रह एकसारखा वाढवीत जाण्याचे ध्येय अभिप्रेत नसून समाजाला भौतिक गरजांच्या दास्यातून मुक्त करण्यासाठीच तो समाजसत्तेची प्रस्थापना करू इच्छित असतो. हा भौतिक सुखाचा परि-ग्रह किती असावा हे निरनिराळ्या समाजाच्या भौतिक बाह्य परिस्थितीवर आणि आत्मिक व बौद्धिक विकासावर अवलंबून राहील. युरोपीय समाजाची बाह्य भौतिक परिस्थिती व भारतीय समाजाची बाह्य भौतिक परिस्थिती, तसेच या दोन समाजांची बौद्धिक व आत्मिक विकासांची अवस्था, यांच्यातील भेद लक्षात घेता युरोपीय समाजवाद अधिक भोगप्रवण होईल आणि भारतीय समाजवाद अधिक त्यागप्रवण होईल असे म्हणावे लागते. अर्थात समाजवाद जे अराजक अवस्थेचे ध्येयशिखर गाठण्याची भाषा आज बोलत आहे, त्या ध्येयाच्या दिशेने प्रगती करण्याचेही सामर्थ्य भारतीय समाजाला अधिक लवकर प्राप्त होईल असे म्हणता येईल.

भारतीय समाज निवृत्तिपर बनला याचे एक कारण त्याची भौतिक परिस्थिती हे आहे हे विसरून चालणार नाही. या निवृत्तिपरतेतून एक प्रकारची अराजक वृत्तीही या समा-जात पूर्वीपासून रुजलेली आहे आणि त्याला आजच्या स्पर्धाप्रधान धनसत्ताक संस्कृतीच्या चक्रात सापडल्यामुळे जी प्रवृत्तिपरता प्राप्त होत आहे ती समाजसत्ताक अवस्था प्राप्त होऊन जीवनकलहाची तीव्रता मंद होताच कमी होईल, अशी आमची कल्पना आहे. विशेषतः या समाजात आज जे सत्याग्रही तत्त्वज्ञान निर्माण झाले आहे त्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या आश्रयानेच येथील लोकसत्तेला समाजवादी लोकसत्तेचे स्वरूप प्राप्त होईल असा आमचा तर्क असल्याने, समाजवादी लोकसत्तेनंतर आत्मसत्तेच्या दिशेने होणारी प्रगती भरतखंडात अधिक झपाट्याने होईल आणि भौतिक सुखांचा परिग्रह वाढविण्याच्या मोहातून मुक्त होऊन सत्यसंशोधन, सौंदर्यसंदर्शन व सौजन्यसंवर्धन ही उच्च सुखे अनुभविण्यातच मानवसंस्कृतीचे खरे रहस्य आहे हे जगाला दाखवून देण्याचे कार्य भारतीय समाजवाद सत्याग्रही नेतृत्वाखाली

करू लागेल असे आमचे मत आहे. या सत्याग्रही समाजवादातून मानवसंस्कृतीला आत्मसत्तेचा ध्रुवतारा दिसू लागेल आणि त्या ध्रुवताऱ्याच्या दिग्दर्शनाचा आश्रय करून मानवसंस्कृतीची प्रगती झपाट्याने सत्ययुगाकडे होऊ लागेल.

आत्मसत्तेचे अंतिम ध्येय ठेवून आपल्या समाजाची रचना करावयाची तर आर्थिक व राजकीय सत्तेचे शक्य तितके विकेंद्रीकरणच केले पाहिजे आणि सामुदायिक यांत्रिक धनोत्पादनाचा आश्रय केला तरी प्रत्येक देशविभाग औद्योगिकदृष्ट्या शक्य तितका स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविला पाहिजे. समाजवादी लोकसत्ता प्रस्थापित झाली तरी प्रादेशिक स्वयंपूर्णतेचे आणि राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणाचे ध्येय स्वीकारल्याशिवाय खरे स्वातंत्र्य, समता व बंधुभावना यांचे साम्राज्य निर्माण होणार नाही आणि समाजातील सर्व घटकांचा व प्रदेशांचा सर्वांगीण विकास होणार नाही.

सत्तेचे व संपत्तीचे केंद्रीकरण झाले असता समाजवादी लोकसत्तेखालीही सत्तेची केंद्रे आपल्या हाती घेऊन एखाद्या पक्षास लोकहिताच्या मिषाने सर्व समाजावर बलात्कार करणे शक्य आहे. ही आपत्ती टाळून समाजाची प्रगती आत्मसत्तेच्या दिशेने होत राहण्यास प्रादेशिक स्वयंपूर्णता व प्रादेशिक स्वावलंबन, ही तत्त्वे औद्योगिक घटनेत अवलंबिली पाहिजेत. तसेच प्रादेशिक स्वयंपूर्णतेचा अवलंब केल्याने शेती व इतर उद्योग यांचाही योग्य प्रकारे समन्वय करता येऊन समाजातील सर्व लोकांना शेतात व कारखान्यात दोहींकडे काम करण्याची संधी मिळेल. शेतावरील काम व कारखान्यातील काम यांच्याप्रमाणेच बौद्धिक श्रम व शारीरिक श्रम यांचाही समन्वय समाजात दिसू लागला पाहिजे. हे होण्यास कारखाने खेड्यात गेले पाहिजेत आणि ते वैयक्तिक स्वामित्वाचे न उरता समाजाच्या स्वामित्वाचे बनले पाहिजेत. अशा प्रकारे शेती व कारखाने, शेतावरील काम व कारखान्यातील काम, शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम यांचा योग्य समन्वय सर्व प्रदेशांत दिसू लागला म्हणजे श्रमविभाग व श्रमसंयोग, स्वावलंबन व सहकार्य, आरोग्य व संपत्ती, भौतिक सुख व आत्मिक समाधान या सर्वांचा लाभ सर्वांस होऊन मरणोत्तर स्वर्गसुखाची वांछा कोणासही उरणार नाही. प्रत्येकाच्या आत्मविकासास लागणारी भौतिक सुखे अनायासे मिळू लागली आणि त्यासाठी करावा लागणारा आजचा जीवनकलह स्मृतिशेषही उरला नाही, म्हणजे मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती सत्यसंशोधन, सौंदर्योपासना व आत्मोन्नती यासाठीच होत राहील. या उच्च सुखाचा ध्यास लागला म्हणजेच मानवसमाज सर्वांगीण मुक्तावस्थेचे ध्येयशिखर गाठू लागेल.

[*'आधुनिक राज्यमीमांसा', भाग २,*
*लोकशिक्षण लघुग्रंथमाला, पुणे, १९४१, पृ. १२९ ते १४६*]

२७

# सत्याग्रही समाजवाद

ता. २० जुलै १९४७ च्या 'हरिजन' मध्ये म. गांधींनी समाजवादासंबंधी एक अत्यंत विचारप्रवर्तक असा लेख लिहिला आहे. ज्यांना सत्य आणि अहिंसा यांची खरी उपासना करावयाची असेल त्यांनी समाजवादी बनलं पाहिजे आणि ज्यांना खरा समाजवाद हवा असेल त्यांनी सत्याग्रही बनलं पाहिजे, असे त्यातील मुख्य सूत्र आहे. सत्याग्रह म्हणजे ज्ञान आणि प्रेम किंवा सत्यनिष्ठा आणि अहिंसावृत्ती यासंबंधीचा आग्रह. मनुष्य आणि पशु यांच्यातील भेद ज्ञान आणि प्रेम या दोन शब्दांनीच व्यक्त करता येईल. केवळ ज्ञान अधिक वाढल्याने माणुसकी वाढली असे होत नाही, तसेच केवळ प्रेम असल्यानेही मनुष्यत्वाची परिणती होत नाही. सर्व विश्वाचे ज्ञान करून घ्यावे आणि सर्व विश्वावर प्रेम करावे, अशी जी मानवी अंतःकरणातील प्रचंड प्रेरणा, तिलाच म. गांधींच्यासारखे संत ईश्वर किंवा परमेश्वर असे नाव देत असतात. ही प्रेरणा प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणात आहे आणि ती प्रेरणा प्रज्वलित करून तिच्यासाठी आपल्या सर्वस्वाचा होम करण्यास तयार होणे हीच सत्याग्रही निष्ठा होय. ही प्रेरणा आपल्या शरीरात आहे. पण आपले शरीर म्हणजे ती प्रेरणा नव्हे, असे म. गांधी म्हणतात. कारण मानवी अंतःकरणातील ही प्रचंड प्रेरणा किंवा शक्ती, जागृत झाली असता मनुष्य आपल्या देहाचे समर्पणही करण्यास तयार होतो. अर्थात ही शक्ती आपल्या शरीराहून श्रेष्ठ आहे हे सिद्ध होते. पण आपले शरीर हे त्या शक्तीचे एक साधन आहे. जोपर्यंत ज्ञानाचा आणि प्रेमाचा प्रसार करण्याच्या कामी आपल्या शरीराचा उपयोग होत असतो, तोपर्यंतच त्या शरीराचे महत्त्व सत्याग्रही मनुष्यास वाटत असते. पण ज्यावेळी ते शरीर आपल्या ज्ञानाच्या व प्रेमाच्या विकासाच्या आड येऊ लागते, तेव्हा त्या शरीराचा त्याग करूनही आपली सत्यनिष्ठा कायम ठेवणे हेच आपले जीवनातील रहस्य होय, असे सत्याग्रही मनुष्यास वाटू लागले पाहिजे. अर्थातच अशा वेळी आपण सत्यनिष्ठ राहावे की देहनिष्ठ राहावे, म्हणजेच

सत्याचा सांभाळ करावा की देहाचा सांभाळ करावा, असा पेच सत्याग्रही मनुष्यापुढे उभा राहतो. तेव्हा त्याला आपला देह हे बंधन वाटू लागते आणि त्या बंधनाचा त्याग करण्यास तो आनंदाने तयार होतो. आजच्या समाजात ज्यांना सत्यनिष्ठेने आणि प्रेमाने वागावयाचे असेल त्यांनी समाजवादी बनलेच पाहिजे, असे म. गांधींनी जितक्या निर्धाराने सांगितले आहे, तितक्याच निर्धाराने ते असेही म्हणतात, की ज्यांना खरा समाजवाद हवा असेल त्यांना सत्याग्रही बनलेच पाहिजे. सत्याग्रह हे एकच साधन असे आहे, की ज्याच्या योगाने समाजातील सर्व अन्यायाचे निवारण लोकांना करता येईल, मग ते अन्याय राजकीय असोत, आर्थिक असोत किंवा नैतिक असोत.

म. गांधी यांनी सत्यनिष्ठा, प्रेमभावना आणि ईश्वरनिष्ठा या सर्वांचे जे एक समीकरण प्रस्तुत लेखात मांडलेले आहे, ते समीकरण जर आपण समजून घेतले नाही तर गांधीजींच्या या लेखाचा बरोबर उलगडा आपल्या बुद्धीस होऊ शकणार नाही. गांधीजींची ईश्वरनिष्ठा ही सत्यनिष्ठेहून किंवा न्यायनिष्ठेहून भिन्न वस्तु नाही. स्वहित बुद्धी व सर्वहितबुद्धी अशा दोन वृत्ती प्रत्येकाच्या अंतःकरणात असतात. यापैकी जी सर्वहितबुद्धी तिलाच ईश्वरनिष्ठा असे म्हणता येते. म. गांधी जेव्हा प्रत्येकाने ईश्वरनिष्ठ झाले पाहिजे असे म्हणतात, तेव्हा प्रत्येकाने स्वतःचे हित करण्याची वृत्ती न धरता सर्वांचे हित होईल अशा बुद्धीने वागत राहिले पाहिजे व त्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करावयास पाहिजे, एवढेच ते प्रतिपादीत असतात. अर्थातच ही सर्वहितबुद्धी जर जागृत असेल, तर त्या त्या काळी जी समाजघटना सर्वांना हितप्रद होईल ती समाजघटना यावी असे मनुष्याला वाटू लागेल. आज समाजवाद स्थापन झाल्याखेरीज सर्वांचे हित होऊ शकणार नाही, हे म. गांधींना पटल्यामुळेच ते म्हणू लागले आहेत की, "सत्याचे आणि अहिंसेचे मूर्त स्वरूप समाजवाद हेच असले पाहिजे." अर्थात हा समाजवाद सर्वांना न्याय देणारा पाहिजे हे जितके खरे आहे, तितके हेही खरे आहे की, त्या समाजवादी घटनेखाली सर्वांनी एकमेकांवर प्रेम करीत राहिले पाहिजे. हा न्यायनिष्ठेचा व प्रेमाचा संदेश देणारा समाजवाद सत्याग्रहाच्या साधनानेच निर्माण करता येईल, हे म. गांधींचे मतही सूक्ष्म दृष्टीने विचार केल्यास सर्वांना मान्य करावे लागेल. आपल्यावरील प्रत्येक अन्यायाशी असहकार करावयाची ही वृत्ती सर्व जनतेला पटली आणि ती त्या वृत्तीने संघटित होऊन भांडवलशाहीशी असहकार करू लागली, तर तिला समाजवादाची स्थापना करण्यास कोणत्याही अत्याचाराची आवश्यकता उरणार नाही हे उघड आहे. समाजातील सर्व शेतकरी व कामकरी संघटित होऊन एकमुखाने असे जाहीर करतील की, आम्ही यापुढे कोणाचेही नोकर नसून आम्हीच देशातील सर्व संपत्तीचे मालक आहोत आणि या जाहीर घोषणेप्रमाणे ते भांडवलशाही समाज आपल्या अनत्याचारी असहकाराने बंद पाडतील. कोणाचीही हिंसा किंवा द्वेष न करता त्यांना शेतकरी-कामकरी यांचे राज्य आपल्या देशात स्थापन करता येईल, याबद्दल

कोणाचाही मतभेद होण्याची गरज नाही. ही प्रचंड आत्मनिष्ठा व हा आत्मविश्वास शेतकरी-कामकरी वर्गात निर्माण करणे हेच प्रत्येक सत्याग्रही व्यक्तीचे यापुढील कार्य आहे, असे महात्मा गांधी आपल्या या लेखाने जाहीर करीत आहेत. हिंदुस्थानातील सर्व सत्याग्रहींनी या आदेशाप्रमाणे समाजवादाची उपासना करण्याचे ठरविल्यास, या देशात कोणताही अत्याचार न करता सत्याग्रही समाजवादाची स्थापना करता येईल आणि अशा रीतीने प्रस्थापित झालेला समाजवाद सर्व जगाला सत्यनिष्ठेचा व प्रेमाचा संदेश देत राहील. म. गांधींचे सर्व शिष्य या रीतीने समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी आपणास वाहून घेतील, तर हिंदुस्थानात तरी केवळ अनत्याचारी क्रांतीने समाजवादाची संस्थापना होऊ शकेल, हे मत आम्ही आजपर्यंत अनेकवार मराठी वाचकांपुढे मांडिलेले आहेच. आता देशात लोकशाही राष्ट्रीय राज्य स्थापन झालेले आहे. अशा वेळी देशात अत्याचारी वातावरण फैलावले गेल्यास त्याचा फायदा समाजवाद्यांना न मिळता निजामासारखे अनियंत्रित राजे प्रबळ बनून सरंजामशाही व भांडवलशाही यांचे राज्य स्थापन होईल व ही भीती भाई जयप्रकाश यांनीही प्रकट केली असून तेही समाजवाद्यांना शांततेचा व अनत्याचाराचा उपदेश करीत आहेत. राष्ट्रीय सभेने देशात अनत्याचारी क्रांती करून शेतकरी-कामकऱ्यांचे राज्य स्थापन करण्याची प्रतिज्ञा केलेली आहे. या प्रतिज्ञेचे तिला पालन करावयाचे असेल, तर तिने यापुढे समाजवादाचा उघड अंगीकार केला पाहिजे व पुरस्कार केला पाहिजे, हेच तत्त्व म. गांधी व भाई जयप्रकाश हे दोघे आपापल्या वृत्तीनुसार जनतेला सांगत आहेत. राष्ट्रीय सभा व तिचे अनुयायी योग्य तो बोध घेतील अशी आम्हास आशा आहे. यापुढे समाजवादाच्या प्रस्थापनेचे ध्येय जर राष्ट्रसभेने अंगीकारले नाही, तर देशात शांततारक्षण करून समाजाची योग्य धारणा करण्याचे कर्तव्य तिला पार पाडता येणार नाही.

[*वाल्मिकी आश्रमातील प्रवचने*, पुणे, १९४७, पृ. ११ ते १४]

## सत्याग्रही समाजवाद-काही प्रश्नोत्तरे

(ता. ३० एप्रिल रोजी दादरच्या वसंत व्याख्यानमालेत वरील विषयावर माझे व्याख्यान झाले. त्या वेळी श्रोत्यांनी मला अनेक प्रश्न विचारले. त्यांपैकी काही महत्त्वाच्या प्रश्नांना उत्तरे तेथेच दिली. इतर काही प्रश्नांची उत्तरे येथे प्रसिद्ध करीत आहे. ती सामान्यतः सर्व जिज्ञासू वाचकांना उद्बोधक वाटतील अशी आशा आहे.— आचार्य जावडेकर)

**प्रश्न १ ला :** (अ) उच्च प्रकारच्या नीतिमान सत्याग्रही समाजवादी राष्ट्राजवळ लष्करी सामर्थ्य असावे का?

(आ) अशा प्रकारच्या लष्करी सामर्थ्यावर ज्यांची सत्ता आहे त्यांना त्याचा स्वार्थासाठी वापर करावा अशी इच्छा होणार नाही का?

(इ) उच्च नीतिमान आणि निःस्वार्थी अशा चार-पाच मुत्सद्यांनी राष्ट्राचा कारभार चालवावा याविषयी आपले काय मत आहे?

उत्तर : (अ) जोपर्यंत जगातील सर्व राष्ट्रांचे एक राज्य झालेले नाही, तोपर्यंत उच्च प्रकारच्या नीतिमान सत्याग्रही समाजवादी राष्ट्राजवळही लष्करी सामर्थ्य असणे अपरिहार्य व आवश्यक आहे. हे राष्ट्र सत्याग्रही समाजवादी असले तरी त्यापैकी सत्याग्रही लोकांनी हे लष्करी सामर्थ्य आपल्या हाती ठेवू नये व घेऊ नये. ते समाजवादी पक्षाच्या हाती द्यावे आणि तो पक्ष आपल्या समाजवादी तत्त्वानुसारच त्या सामर्थ्याचा उपयोग करीत असेल तोपर्यंत त्याला तसे करू द्यावे.

(आ) ज्यावेळी हा समाजवादी पक्ष स्वार्थासाठी त्या लष्करी सत्तेचा उपयोग करू लागेल त्यावेळी त्याच्या सत्तेशी अनत्याचारी असहकार करण्याचे शिक्षण जनतेला व सर्व राष्ट्रिकांना देण्याचे कार्य सत्याग्रही लोकांनी करीत राहावे. या सत्याग्रही लोकांचे व प्रजाजनांचे अनत्याचारी असहकाररूपी दडपण अशा सत्ताधारी पक्षाला कर्तव्यच्युत होऊ देणार नाही व तो कर्तव्यच्युत झाल्यास पदभ्रष्ट करून त्याच्या विरोधी पक्षास प्रजेने सत्ताधारी बनवावे.

(इ) उच्च नीतिमान आणि निःस्वार्थी अशा चार-पाच मुत्सद्यांनी राष्ट्राचा कारभार चालवावा, हे म्हणणे मला पटत नाही. प्रत्येक वेळी चार-पाच मुत्सद्यांचे वर्चस्व असलेलेच मंत्रिमंडळ असते. पण हे मंत्रिमंडळ लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधी-सभेस जबाबदार असले पाहिजे. ह्या प्रतिनिधी-सभेत त्याला एक विरोधी पक्ष असावा. या विरोधी पक्षातही त्याच्या धोरणाचे चार-पाच प्रमुख मुत्सद्दी असतील. जेव्हा पहिले मंत्रिमंडळ प्रतिनिधी-सभेचा विश्वास गमाविल तेव्हा दुसऱ्या पक्षाच्या मुत्सद्यांनी पहिल्या मंत्रिमंडळास अधिकारभ्रष्ट करून आपल्या हाती सत्ता घ्यावी हीच पद्धती योग्य आहे.

**प्रश्न २ रा :** हल्लीच्या असेंब्लीत विरोधी पक्ष (Opposition Party) नाही. तर ही असेंब्ली "फॅसिस्ट" आहे असे आपण म्हणाल काय?

उत्तर : एखाद्या असेंब्लीत सर्व सभासद एकाच पक्षाचे निवडून आले, एवढ्यानेच केवळ त्या असेंब्लीला फॅसिस्ट म्हणता येणार नाही. जोपर्यंत ह्या असेंब्लीने विरोधी पक्षाच्या निवडणुकीचा हक्क काढून घेतलेला नाही आणि विरोधी पक्ष संघटित करणाऱ्या नागरिकांचे अनत्याचारी संघस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य व प्रचारस्वातंत्र्य हिरावून घेतले नाही तोपर्यंत अशा असेंब्लीला फॅसिस्ट म्हणता येणार नाही. मात्र त्या असेंब्लीत विरोधी पक्ष नसल्यामुळे फॅसिस्ट प्रवृत्ती बळावण्याचा धोका आहे.

**प्रश्न ३ रा :** आपल्या देशात लोकशाही निर्मितीसाठी चार वर्ण प्रथम नष्ट केले पाहिजेत की दोन वर्ग प्रथम नष्ट केले पाहिजेत? आणि चार वर्ण कोणत्या मार्गाने नष्ट होतील?

उत्तर : माझ्या मताने आपल्या देशातील चार वर्ण आधीच नष्ट झालेले आहेत. फक्त काहींना आपल्या वर्णासंबंधी अहंकार आहे. तो अहंकार नष्ट झाला म्हणजे संपले. दोन

वर्ग नष्ट करणे हाच आपल्यापुढील प्रश्न आहे व हे दोन वर्ग नष्ट करण्यास उत्पादनाची साधने सार्वजनिक मालकीची बनविणे हाच मार्ग आहे.

**प्रश्न ४ था :** गांधीवाद अथवा सर्वोदयवाद आपल्या देशाला अत्यंत पोषक आहे हे जरी खरे असले तरी गांधीजींच्या मरणोत्तर त्या वादाच्या प्रसाराला फारच कमतरता आलेली दिसत आहे. मग त्या वादाचे भवितव्य काय समजावे?

**उत्तर :** ज्यांचा त्या वादावर विश्वास असेल त्यांनी त्या वादाच्या तत्त्वानुसार आपले वर्तन ठेवावे आणि देशातील राज्यसत्ता निष्ठावंत, लोकशाही समाजवादी पक्षाच्या हाती शक्य तो लवकर जाईल अशी खटपट करावी. स्वतः राज्यसत्ता आपल्या हाती घेऊ नये आणि राज्यसत्ता धारण करणाऱ्या अथवा करू इच्छिणाऱ्या कोणत्याही पक्षाचे सभासद स्वतः राहू नये. समाजवाद स्थापन करणे व तो त्वरित करणे हेच गांधीवादाच्या उज्ज्वल भवितव्याचे खरे साधन आहे.

**प्रश्न ५ वा :** (अ) हिंदुस्थानात समाजवाद आणण्यासाठी क्रांती करावी लागेल का? लागेल तर ती कोणत्या प्रकारची असणार? (आ) अहिंसा आजच्या सरकारला पाळता येईल काय? (इ) आज समाजवादी पक्षात काही संधिसाधू लोक शिरत आहेत, त्यामुळे समाजवादी पक्षाची काँग्रेससारखी अवस्था होणार नाही काय?

**उत्तर :** (अ) हिंदुस्थानातील समाजवादी क्रांती तीन प्रकारे होणे शक्य आहे असे क्षणभर मानता येईल. पहिला प्रकार म्हणजे कोणताही कायदा उल्लघन न करता केवळ समाजवादी कायदे कायदेमंडळांतून मंजूर करून त्यांची अंमलबजावणी करणे. याला केवळ कायदेशीर मार्ग म्हणता येईल. पण अशा कायदेशीर मार्गाने समाजवाद आणण्याचे प्रयत्न करताना लोकांचे मूलभूत राष्ट्रिक हक्क हिरावून घेणारे जुलमी कायदे उल्लंघन केल्या-वाचून समाजवाद्यांना आपले कार्य करता येणार नाही म्हणून जुलमी कायदे उल्लंघन करून आपले क्रांतीचे कार्य पुढे कसे चालवावे असा प्रश्न उपस्थित होतो. त्याची दोन उत्तरे आहेत. एक अनत्याचारी असहकाराचा मार्ग आणि दुसरा सशस्त्र क्रांतीचा मार्ग. माझ्या मताने हिंदुस्थानातील समाजवाद्यांनी अनत्याचारी असहकाराच्या मार्गाने समाज-वादी क्रांती करण्याचा निर्धार करावा. असा निर्धार ते करतील तर त्यांना यश येईल अशी परिस्थिती या देशात आहे. असे असल्यामुळे सशस्त्र क्रांतीचा मार्ग येथे अवलंबिणे राष्ट्राला व समाजाला विघातक आहे. त्यामुळे समाजद्रोह व राष्ट्रद्रोह केल्यासारखे होते. शिवाय सशस्त्र क्रांतीतून एकपक्षीय हुकूमशाही येण्याचा व रशियाचे दास्य पत्करावे लाग-ण्याचा धोका आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांना धोक्यात न आणता समाजवादाची स्थापना करण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे भांडवलशाहीशी अनत्याचारी असहकार किंवा सत्याग्रही मार्ग होय.

**प्रश्न ६ वा :** सत्याग्रही लोकांनी राजदंड धारण केल्यास त्यांना अपरिहार्य हिंसा करावी लागणार आणि त्यामुळे समाजाची धारणा होणार नाही असे आपले मत आहे. परंतु "असत्य" आणि "अन्याय" याला "दंड" दिल्यास ती एक प्रकारची अहिंसाच नव्हे काय ? आणि त्या दृष्टीने या दंडात समाजधारणेला घातक असे काय आहे ?

**उत्तर :** आपण माझे विचार योग्य शब्दात मांडलेले नाहीत. तरीही मी त्याचा आशय समजू शकतो. समाजात राजदंड असूच नये ही अवस्था आज निर्माण झालेली नाही हे उघड आहे. तेव्हा समाजधारणेला आज राजदंडाची आवश्यकता आहे. असत्यशील व्यक्तींना किंवा अन्यायी व्यक्तींना राजदंडाने शासन करणे ही एक प्रकारची अहिंसाच होय हे मत मला पटत नाही. राजदंडाचे शासन जर न्यायानुसारी असेल तर ते मी समाजधारणेसाठी करावी लागणारी अपरिहार्य हिंसा असे म्हणतो. ही अपरिहार्य हिंसासुद्धा केवळ आपल्या बलाने समाजधारणा करू शकणार नाही. समाजात असत्याची व अन्यायाची वृत्तीच वाढू नये असे प्रयत्न करणारे व तसे आचरण करणारे सत्याग्रही लोक जितके असतील तितक्या मानाने समाजातील ही असत्याची व अन्यायाची प्रवृत्ती कमी होईल. पण हे कार्य सत्याग्रहींनी राजदंड स्वतःच्या हाती घेऊन होणार नाही. त्यांचे कार्य याहून श्रेष्ठ आहे. ज्यांनी राजदंड हातात घेतला असेल त्यांना समाजधारणेसाठी करावी लागणारी हिंसा किमान प्रमाणात राहावी व ते तत्त्वभ्रष्ट होणार नाहीत यासाठी जनतेचे आत्मबळ संघटित व प्रभावी बनविणे हे सत्याग्रहींचे कार्य आहे. त्यांनी समाजधारणेचे हे अहिंसक साधन आपल्या हाती ठेवून त्याचे सामर्थ्य एकसारखे वाढवित राहिले पाहिजे. स्वतः सत्याग्रही जर राजदंड हाती घेतील तर ते अहिंसेपासून भ्रष्ट होतीलच पण समाजातील आत्मबलावरची श्रद्धाही नष्ट करतील आणि त्यांच्या हातून घडणारी अपरिहार्य हिंसा हीच अहिंसा या नावाने प्रतिष्ठितपणे मिरवू लागेल. असे होण्यातच समाजधारणेला व समाजाच्या आत्मोन्नतीला निश्चित धोका आहे असे मला वाटते. म्हणून राजदंडाने केलेली हिंसाच, पण ती आज अपरिहार्य आहे, असे म्हणणे इष्ट आहे.

**प्रश्न ७ वा :** रामराज्य ही कल्पना अस्तित्वात येणे कधीकाळी शक्य होईल असे तुम्हास वाटते काय ? Complete anarchy कधी काळी नांदू शकेल काय ?

**उत्तर :** रामराज्य याला आत्मराज्य हे नाव मी पसंत करतो. आत्मराज्य म्हणजे ज्यात दंडशक्तीची गरजच उरणार नाही अशी समाजस्थिती, दंडहीन अवस्था, हा एक अमूर्त असा आदर्श आहे व तो समाजाची पूर्णावस्था दिग्दर्शित करतो. हा आदर्श जरी अव्यक्त व अमूर्त असला तरी तो समाजाच्या प्रगतीची दिशा दाखविणारा आणि उन्नतीचे मोजमाप करण्यास साहाय्य करणारा आहे. ज्या समाजात राजदंड वारंवार उपयोगात आणावा लागतो त्यापेक्षा ज्या समाजात तो क्वचित उपयोगात आणावा लागतो तो समाज

अधिक उन्नत असे म्हणता येईल. वास्तववादी दृष्टीने म. गांधी म्हणतात, "The nearest approach to purest anarchy is democracy based on nonviolence." म्हणजे शुद्ध अशा दंडहीन समाजास निकटतम असे साध्य म्हणजे अहिंसाधिष्ठित लोकशाही हेच होय. अहिंसाधिष्ठित लोकशाही म्हणजेच सत्याग्रही प्रजाधर्माने नियमित अशी समाजवादी लोकशाही. आत्मराज्य हे ध्येय आहे व सत्याग्रही समाजवादी लोकशाही हे त्याचे मूर्त साध्य आहे असे म्हणता येईल.

**प्रश्न ८ वा :** सर्वोदयवादी कमीत कमी गरजा आणि जास्तीत जास्त साधेपणा ही कल्पना ध्येय मानतात असे वाटते. पण या तत्त्वांचा पुरस्कार करणे आपणास योग्य वाटते काय? या तत्त्वाचा सर्वसामान्य जनतेत प्रचार करणे आणि त्याची दीक्षा देणे म्हणजे त्याची बुद्धी खुंटविणे नव्हे काय? या तत्त्वाचा प्रचार करणे मानवाच्या प्रगतीच्या आड येणारा नाही काय?

**उत्तर :** गरजा आणि वासना यात फरक आहे. मनुष्याने आपल्या योग्य गरजा भागविल्याच पाहिजेत. योग्य गरजा म्हणजे ज्या भागविल्याने त्याच्या अंगच्या सर्व शक्तींचा विकास होऊन त्याची उन्नतीच होईल व समाजाची सेवा करण्याचे त्याचे सामर्थ्य वाढेल. अशा गरजा भागविण्याची वासना असावी. उलट ज्या वासना भागविण्याची आपल्या विकासास किंवा समाजाच्या सेवेस गरज नाही त्या वासना कमीच केल्या पाहिजेत. राहणीच्या आर्थिक मानाच्या दृष्टीने बोलावयाचे तर समाजातील धनिक वर्गातील राहणीचे मान कमी केले पाहिजे व निर्धन वर्गाचे राहणीचे मान वाढविले पाहिजे. महात्मा गांधींनी आर्थिक समतेचे तत्त्व सांगताना या दोनही दृष्टींनी ते सांगितले आहे व तसे आपण केले पाहिजे. विधायक कार्यक्रमातील आर्थिक समतेसंबंधी ते लिहितात : "Working for economic equality means abolishing the eternal conflict between capital and labour. It means levelling down of the rich few in whose hands is concentrated the bulk of the nation's wealth on the one hand and the levelling up of the semi-starved naked millions on the other." अशा रीतीने वरिष्ठ धनिक वर्गाचे राहणीचे मान कमी करणे व कनिष्ठ निर्धन वर्गाचे राहणीचे मान उंचावणे अशा द्विविध प्रकारे हे समतेचे ध्येय उपदेशिले पाहिजे.

[*नवभारत, जून १९४९, पृ. ७१२–७११*]

## २८

# गांधीवाद–समाजवाद

स्वतः गांधीजी म्हणत की गांधीवाद अशी काही वस्तूच नाही आणि गांधीवादी अशी कोणती व्यक्तीही नाही. परंतु गांधीजींच्या जीवनापासून स्फूर्ती घेऊन त्यांचा जीवनसंदेश शक्य तितका आचरणात आणण्याचा जे प्रयत्न करीत आहेत त्यांना गांधीवादी असे नाव देण्यास काहीच प्रत्यवाय नाही. गांधीवादाचे निश्चित स्वरूप कालांतरानेच निर्णीत होणार आहे. तथापि सत्य व अहिंसा हीच गांधीवादाची आधारभूत तत्त्वे गणिली जाणार याबद्दल कोणासही शंका नाही. या दोन तत्त्वांपैकी "सत्य" यासंबंधी येथे थोडा अधिक विचार करू. "सत्य" याचे अनेक अर्थ आहेत, त्यांपैकी "सत्य बोलावे" म्हणजे आपल्या मनात असेल ते बोलावे, मनात असेल त्याच्या उलट बोलू नये, लपवून ठेवू नये, असा एक अर्थ आहे. पण आपणास जे पटले असेल, माहीत असेल, अथवा वाटत असेल, ते बोलले म्हणजे आपले सत्यनिष्ठेसंबंधीचे कर्तव्य संपले असे म्हणता येत नाही. आपणास जे पटले आहे, माहीत आहे अथवा वाटत आहे, ते वास्तविक तसे आहे काय याचाही विचार आपण केला पाहिजे. आपणास जे पटले ते बोललो म्हणजे आपण स्वतःशी व इतरांशी प्रामाणिक झालो. पण आपण वस्तुस्थितीशीही प्रामाणिक असले पाहिजे. वस्तुस्थितीशी प्रामाणिक असणे हे आपले कर्तव्य आहे असे म्हटल्याने आपल्या सत्यनिष्ठेच्या क्षेत्राची मर्यादा वाढते.

पण जेव्हा सत्य बोलावे, या विषयातून आपण सत्य आचरावे या विषयाचा विचार करू लागतो तेव्हा आपल्या सर्व सामाजिक कर्तव्यांच्या क्षेत्रात आपणास प्रवेश करावा लागतो. मी जन्माला येतो, तेव्हाच अनेक सामाजिक संबंध व नाती निर्माण करीत असतो. मी ज्यांच्या पोटी जन्मास आलो, त्यांचा मी मुलगा ठरतो. माझी आई, माझे वडील, माझी बहीण, माझे भाऊ अशा अनेक नाती मी जन्मताच उत्पन्न होतात. माझ्या सामाजिक संबंधातून हा जी नाती निर्माण झाली, त्या सर्वांचा अभिमान बाळगून मी जगात

मिरवीत असतो. मी अमक्या कुलात जन्मास आलो, मी अमक्या जातीत, धर्मात, राष्ट्रात जन्मास आलो, अमक्याशी माझा अमुक संबंध आहे असे मी समजत असतो व जगाला तसे सांगत असतो. पण या वस्तुस्थितीशी मी नेहमी सत्यनिष्ठ अथवा प्रामाणिक असतो काय? मी अमक्याचा मुलगा आहे, या वस्तुस्थितीशी प्रामाणिक असणे, म्हणजे माझी मुलगा या नात्याने जी कर्तव्ये आहेत, ती दक्षतेने पाळणे. जोपर्यंत मी ही पुत्रकर्तव्ये पाळीत नाही तोपर्यंत मी प्रामाणिक किंवा सत्यनिष्ठ नाही असेच म्हणावे लागेल. हाच न्याय पती-पत्नी, राज्यकर्ते-प्रजाजन, पुढारी-अनुयायी इत्यादी सर्व सामाजिक संबंधांना लागू पडतो. या सर्व सामाजिक संबधांतून अनेक कर्तव्ये माझ्यावर येतात. ही सर्व कर्तव्ये जोपर्यंत मी दक्षतेने पार पाडीत नाही, तोपर्यंत मी सत्यनिष्ठ नाही असेच म्हणावे लागते. अशा रीतीने सत्याचरण म्हणजे कर्तव्याचरण असा अर्थ होतो. यालाच नैतिक सत्य असे म्हणता येईल.

कर्तव्याच्या बुडाशी न्यायाची कल्पना असते. सर्वांनी आपापली कर्तव्ये दक्षतेने पार पाडिली तरच न्याय प्रस्थापित होईल. न्याय म्हणजे तरी काय? न्याय म्हणजे सर्वांचे हित, सर्वोदय असे म्हणता येईल. याच अर्थाने सर्वहित किंवा सर्वोदय हे सर्व नैतिक कर्तव्यांचे अंतिम साध्य असले पाहिजे. या ध्येयासही सत्य असे म्हणतात. महाभारतात "यद् भूतहितमत्यन्तमेतद् सत्यं मतं मम।" असे म्हटले आहे. ज्यात अधिकात अधिक भूतहित आहे, त्याला सत्य म्हणावे असा याचा अर्थ आहे. याच न्यायाने सर्वोदय हे नैतिक किंवा सामाजिक व्यवहारातील परम सत्य असे म्हणता येईल.

पण कर्तव्याची व न्यायाची कल्पना नेहमी एकच असत नाही. कर्तव्यासंबंधी व न्यायासंबंधी परंपरागत कल्पना यथार्थ आहेत काय? म्हणजे या कल्पनांप्रमाणे सर्वांनी आचरण केल्यास खरोखर सर्वहित किंवा सर्वोदय होईल काय? जर होत नसेल तर परंपरागत कर्तव्यांच्या व न्यायाच्या कल्पना सोडून नव्या कल्पना स्वीकारणे सत्यनिष्ठ व्यक्तींचे कर्तव्य बनते. अशा परिस्थितीत न्यायाच्या जुन्या कल्पना आणि न्यायाच्या नव्या कल्पना यात फरक पडून क्रांतिकाल प्राप्त होतो. परंपरा व शब्दप्रामाण्य यांच्या पलीकडे जाऊन स्वतःचे अंतःकरण व बुद्धी यांना प्रमाण ठेवून वास्तविक न्याय कोणत्या पक्षास आहे याचा निर्णय करावा लागतो. अशा परिस्थितीत सर्वोदयवादी अथवा सत्य-निष्ठ व्यक्तीला क्रांतिकारक बनावे लागते. सत्याग्रही व्यक्तीच्या कसोटीचा हा प्रसंग असतो. सत्यासाठी म्हणजेच वास्तविक सर्वोदय ज्यात आहे त्या तत्त्वाच्या प्रचारासाठी व संस्थापनेसाठी परंपरागत सामाजिक कर्तव्ये, रूढ धर्मबंधने आणि प्रस्थापित राजकीय संस्था अथवा कायदे यांच्याविरुद्ध उभे राहून आपल्या स्वतःच्या अंतरात्म्याला साक्षी ठेवून त्याच्या आदेशानुसार वागावे लागते. सर्व जुने जग आपल्या विरुद्ध उठते आहे

असे दृश्य दिसत असते आणि स्वतःचा अंतरात्मा त्या जुन्या जगाविरुद्ध बंड करण्याचा आदेश देत असतो. अशा वेळी त्या अंतरात्म्याच्या आदेशास अनुसरून न्यायासाठी राजकीय कायद्यांचा, समतेसाठी सामाजिक रूढींचा आणि सत्यासाठी धर्मबंधनांचा त्याग करणे हे सत्याग्रहीचे कर्तव्य ठरते. ज्याला रूढ धर्मबंधने, परंपरागत सामाजिक कर्तव्ये आणि प्रस्थापित राज्यसत्तेचे कायदे यातील अन्याय दिसत नाही तो सत्याग्रही किंवा खऱ्या अर्थाने सर्वोदयवादी होऊच शकत नाही. त्याला परंपरागत न्याय आणि वास्तविक न्याय यातील भेद समजत नाही असेच म्हणावे लागेल. सत्याग्रहीला हा विवेक करता आला पाहिजे. तो त्याला करता येईल, तर तो अशा परिस्थितीत क्रांतिकारक बनेल. नाही तर प्रतिक्रांतिकारक बनेल. सत्याग्रही हा क्रांतिकारक असला पाहिजे. म्हणजेच त्याची दृष्टी सामाजिक परंपरा, धार्मिक रूढी आणि प्रस्थापित कायदे यांच्या पलिकडे जाऊन सर्वोदयाचा, न्यायान्यायाचा म्हणजेच सत्यासत्याचा विवेक करू शकली पाहिजे.

पण हा विवेक करूनही सत्याग्रही क्रांतिकारकाने अहिंसावृत्ती सोडता कामा नये. क्रांतिवृत्ती आणि अहिंसावृत्ती या दोहोंचा समन्वय हाच सत्याग्रहाचा अभिप्रेत अर्थ आहे. केवळ अहिंसावृत्ती अथवा केवळ क्रांतिवृत्ती या अर्थाने सत्याग्रहाचा अर्थ विशद करता येणार नाही. केवळ सत्याचा आग्रह एवढ्या एकाच वृत्तीवर भर दिला, तर म. गांधी यांच्याप्रमाणे कार्ल मार्क्स व लेनिन हेही सत्याग्रही होते असे म्हणावे लागेल कारण तेही सत्यासाठी, सर्वहितासाठी व सर्वोदयासाठीच लढले असे म्हणता येईल. पण सत्याग्रही वृत्ती किंवा सर्वोदयनिष्ठा यात सत्याच्या "साध्या" इतकाच अहिंसेच्या "साधना" वरही भर द्यावा लागतो. सत्याग्रही हा क्रांतिकारक असतो, तसाच तो ही क्रांती अहिंसेने करू इच्छितो. म्हणून सत्याग्रह व सर्वोदयवाद यात क्रांतिवृत्ती आणि अहिंसावृत्ती या दोहोंचाही अंतर्भाव होतो. म. गांधींच्या जीवनाचा हाच खरा संदेश असून त्यांनी आधुनिक भारताच्या अंतःकरणात पेटविलेली सत्याग्रहाची ज्योत जेव्हा सर्वांगीण क्रांतीची अखंड ज्योत बनेल आणि भारतीयांच्या राजकीय दास्याप्रमाणे सामाजिक, आर्थिक व धार्मिक दास्याचाही अंत करील, तेव्हाच भारताने सत्याग्रह संस्कृती आत्मसात केली आणि गांधीजी अमर झाले असे आपणास म्हणता येईल.

## समाजवाद अपरिहार्यच आहे ?

आता गांधीवादात समाजवाद किंवा समाजवादी क्रांती अभिप्रेत आहे काय या प्रश्नाचा थोडा विचार करू. या प्रश्नासंबंधी सर्व गांधीवाद्यांचे मतैक्य नाही. .... माझे स्वतःचे मत, सत्याग्रही निष्ठेच्या लोकांनी समाजवादी क्रांतीला पाठिंबा देणे अवश्य आहे असे आहे. स्वतः महात्मा गांधी आपण समाजवादी आहोत, असे अनेकवार म्हणत असत....

..... तथापि माझी स्वतःची मते मी म. गांधींच्या शब्दांच्या आधारे सिद्ध करू इच्छित नाही. माझ्या सर्व मतांना गांधीजींचा आधार मिळेलच अथवा मिळाला पाहिजे, असा माझा आग्रह नाही व त्या अर्थाने मी स्वतःला "गांधीवादी" किंवा "मार्क्सवादी" यांपैकी कोणतीही संज्ञा घेऊ इच्छित नाही. मी स्वतःला "सत्याग्रही समाजवादा"चा पुरस्कर्ता हे नाव घेतो व अनेक लोक मला तसे म्हणतात. पण "सत्याग्रही समाजवादा" संबंधीची माझ्या मनातील कल्पना म. गांधींच्या कल्पनेशी जुळणारीच असेल, असे माझे म्हणणे नाही. गांधी आणि मार्क्स यांसारख्या थोर व्यक्तींनी एखादा विचारसांप्रदाय किंवा एखादी जीवनदृष्टी दिली, म्हणजे ती त्या त्या व्यक्तीच्या नावाने प्रसिद्ध होते. तरीही त्या व्यक्तीच्या विशिष्ट अशा सर्व मतांना त्या विचारसांप्रदायात किंवा जीवनदृष्टीत सारखेच स्थान नसते. या दृष्टीने विचार केल्यास "समाजवाद" हा मार्क्सवादाहून भिन्न व अधिक व्यापक आहे हे लक्षात येईल. असे अनेक समाजवादी आहेत, की जे मार्क्सचे काही सिद्धान्त मान्य करीत नाहीत व करणार नाहीत. हीच स्थिती सत्याग्रही जीवनदृष्टी अथवा विचारसांप्रदाय यांना लागू केली जाईल व पुढे सत्याग्रहनिष्ठा व गांधीवाद यातही फरक होईल अशी माझी कल्पना आहे. कोणाही मोठ्या व्यक्तीने प्रचलित केलेल्या विचारसांप्रदायास हा नियम लागू पडतो असे माझे मत असल्याने "सत्याग्रही समाजवाद" या दोनही शब्दांनी व्यक्त होणाऱ्या निष्ठांना म. गांधींचा आधार देता येईल, असे मी म्हणत असलो, तरी "सत्याग्रही समाजवादा"संबंधीचे माझे विचार मी म. गांधींच्या शब्दप्रामाण्यावर आधारू इच्छित नाही.

आज आपल्या राष्ट्रात समाजवादाची स्थापना करणे अपरिहार्य आहे असे जेव्हा समाजवादी म्हणतात, तेव्हा आजच्या समाजात जेवढा न्याय मिळतो, त्याहून समाजवादी घटनेने अधिक न्याय मिळेल, एवढा एकच युक्तिवाद ते करीत नाहीत. त्यांचे असे म्हणणे आहे की, आज जी खाजगी कारखानदारी, खाजगी जमीनदारी व खाजगी सावकारी चालू आहे, ती तशीच चालू ठेविल्यास समाजाचे धारणपोषण होण्यास जे उत्पादनाचे कार्य चालावयास हवे ते चालणारच नाही. ज्याप्रमाणे चोरीचा बंदोबस्त केला नाही तर स्वतः श्रम करून कोणी धान्यादी पदार्थ निर्माणच करणार नाही, तशीच अनवस्था भांडवलशाही उत्पादनपद्धती चालू ठेविल्यास यापुढे होईल. एक तर मोठ्या प्रमाणावरचे उत्पादन व दळणवळण बंदच केले पाहिजे, नाहीतर ही उत्पादनाची व दळणवळणाची साधने समाजाच्या मालकीची बनविली पाहिजेत. यापैकी सर्व मोठ्या प्रमाणावरचे उत्पादन बंद करणे, हेही अव्यवहार्य आहे. कारण तसे केल्यास जो माल निपजेल तो फार थोडा निपजेल व एवढ्या थोड्या मालाचा वापर करून संतुष्ट राहण्यास सामान्य जनता आज तयार होणार नाही. तिला आज जितका जो माल वापरण्यास हवा आहे, तितका तो माल तिला पुरविणे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केल्यावाचून शक्यच नाही. उदाहरणार्थ, असे जर खेड्यातील लोकांना सांगितले की, आम्ही तुम्हास कापड न देता फक्त कापूस, चरखे, माग वगैरे

उत्पादनाची साधने पुरवू आणि त्यापासून कापड करून तुम्ही ते वापरा, त्याचप्रमाणे पत्रे, सिमेंट वगैरे न देता तुम्ही कौलेच फक्त वापरा व दगड, माती, चुना एवढ्यावरच आपली घरे बांधा. रॉकेल न वापरता गोड्या तेलाचेच दिवे लावा आणि मोटारी किंवा रेल्वे यातून मालाची वाहतूक न करता बैलगाड्यांनीच वाहतूक करा. तर हा उपदेश ऐकण्यास कोणत्याही खेड्यातील लोक तयार होतील असे मला वाटत नाही. आज खेड्यातील लोकांनाही गिरणीचे कापड, रॉकेल तेल, सिमेंट, पत्रे, मोटारींची व रेल्वेची वाहतूक या गोष्टी आवश्यक वाटू लागल्या आहेत. अर्थात लोकांच्या या गरजा भागविण्यासाठी यांत्रिक व मोठ्या प्रमाणावरचे उत्पादन अवश्य आहे. आता हे कारखाने समाजाच्या मालकीचे बनवावेत, की खाजगी व्यक्तींच्या मालकीचे ठेवावेत एवढाच प्रश्न आहे. त्यांपैकी पहिला मार्ग स्वीकारला तरच समाजात शांतता व सुव्यवस्था नांदू शकेल, नाहीतर भांडवलशाहीतून निर्माण होणारा वर्गकलह या देशात वाढत जाऊन त्यातून देशात गोंधळ व अराजक माजत जाईल. ...

## वर्गकलहाचे मूळ

शरीरश्रम, अस्तेय आणि असंग्रह ही जी सत्याग्रही जीवनातील तीन तत्त्वे, त्यांना मारक अशी आजची भांडवलशाही रचना आहे. आज शरीरश्रमाला समाजात मुळीच प्रतिष्ठा नसून समाजाच्या शरीरश्रमशक्तीचा बाजारात जड वस्तुप्रमाणे क्रयविक्रय चालू आहे. ही श्रमशक्ती भांडवलदार वर्ग विकत घेतो आणि कामगार वर्ग आपली श्रमशक्ती विकून आपले पोट भरतो. या क्रयविक्रयात कामगारांना निर्वाहवेतन देऊन त्यांच्या श्रमशक्तीतून निर्माण होणारे उरलेले सर्व फल भांडवलदारास स्वतःच्या मालकीचे बनविता येते. हा विनिमय कायदेशीर गणला जातो, पण या विनिमयात सामाजिक श्रमातून निर्माण होणारी संपत्ती केवळ स्वामित्वाच्या हक्काने विनाश्रम भांडवलदारांच्या हाती जाते. हे कायदेशीर स्तेय आहे असे समाजवादी मानतात व ते व्याज, खंड व नफा या तीन रूपांनी धनिकांना मिळत राहते. आपल्या समाजात हे जे द्रव्यार्जनाचे तीन कायदेशीर मार्ग व्यक्तीला उपलब्ध आहेत, ते विनाकष्टाने द्रव्यार्जन करून इतरांच्या श्रमफलांचा कायदेशीर अपहार करणारे आहेत. भांडवलशाहीच्या निर्मितीपूर्वी जरी हे मार्ग समाजात रूढ होते, तरी ते फारच अल्प प्रमाणात होते. उत्पादनाचे प्रमाण वाढले, दळणवळणाची साधने वाढली आणि सामुदायिक पद्धतीने उत्पादन व ने-आण सुरू झाली. यामुळे व्यापारी, सावकार, कारखानदार यांच्या हाती जीवनाची साधने गोळा होऊ लागली, शेतात पिकणारा माल परदेशात जाऊन विकू लागला आणि तो विकून मिळणाऱ्या पैशातून नित्याच्या गरजा भागविण्यास लागणारा माल विकत घेतला, तर तोही दूरच्या कारखान्यातून येऊ लागला. यामुळे शेतकऱ्याचे जीवन व्यापारी-सावकारांच्या हाती गेले, गावातील इतरांचे धंदे ठार

होऊन त्यांचा भार शेतीवर वाढू लागला आणि खेड्यातील बेकारांना कारखानदारांची मजुरी करण्यासाठी शहरात यावे लागले. या सर्व उलाढालीत धनिकांना अकष्टार्जित उत्पन्नाचे हजारो मार्ग उपलब्ध झाले आणि शेकडा नव्वद लोकांची श्रमशक्ती शेकडा दहा पाच धनिकांच्या क्रयविक्रयाची वस्तू बनली. या आर्थिक व्यवहारातून जे कायदेशीर स्तेय अस्तित्वात येते त्याची मीमांसा कार्ल मार्क्सने केली. हे स्तेयच आजच्या वर्गकलहाचे मूळ असून भांडवलशाही संस्कृतीचे हे मूळ समाजरचनेचा पायाच उखडून काढीत आहे. भांडवलदारांचा संग्रह हा श्रमजन्य, साहसजन्य किंवा संयमदर्शक नसून तो स्तेयमूलक आहे. हे तत्त्व समाजवाद्यांनी जगाच्या निदर्शनास आणिले आहे. यामुळे आजच्या समाजातील आर्थिक विषमता असमर्थनीय ठरली आहे. या कायदेशीर स्तेयालाच समाजवादी "पिळवणूक" असे नाव देतात. ते स्तेय नियंत्रित करणे हे आपले ध्येय नसून ते समूळ बंद करणे हे आपले ध्येय आहे असे ते समजतात. ही बंदी कायद्यानेच केली पाहिजे व ती कायद्याने करण्याचा मार्ग देशातील कारखाने व जमिनी यांच्यावर समाजाची मालकी स्थापन करणे एवढा एकच आहे.

आजच्या आर्थिक घटनेत ही एक क्रांती असून ती क्रांती घडवून आणण्यास सत्याग्रह, अनत्याचारी असहकार व सविनय कायदेभंग, या साधनांचा उपयोग केला तर तेवढ्याने समाजवाद्यांचे कार्य सिद्धीस जाईल, या विचारास मी सत्याग्रही समाजवाद असे नाव देतो. या साधनांचा उपयोग करून ही क्रांती घडवून आणिल्यास देशातील कोणत्याही राज्ययंत्रास धक्का लागणार नाही व म्हणून त्या क्रांतीनंतर जो समाजवाद स्थापन होईल, तो हुकूमशाही पद्धतीचा न होता लोकशाही पद्धतीचा होईल. यामुळे समाजात व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य जिवंत राहतील. फक्त आजच्या समाजात अमर्याद नफा मिळविण्याचे जे स्वातंत्र्य भांडवलदारांना आहे ते पुढे उरणार नाही. पण भांडवलदारांचे हे स्वातंत्र्य म्हणजे दुसऱ्याच्या श्रमफलाचा अपहार करण्याचे स्वातंत्र्य असल्याने ते बंद करण्यापासून इतरांच्या सुखात व स्वातंत्र्यात भरच पडणार आहे.

## राष्ट्रीकरण की विकेंद्रीकरण

काही गांधीवादी असे प्रतिपादन करतात की, राष्ट्रीकरण झाले तरी तेवढ्याने सामाजिक अन्याय व आपत्ती यांचे निवारण होणार नाही. कारखाने समाजाच्या मालकीचे असले तरी जोपर्यंत शेकडो किंवा हजारो मजुरांना एकच काम करावे लागत आहे, तोपर्यंत त्यांच्यावर व्यवस्थापकांच्या हुकूमानुसार वागण्याची पाळी येते. यातच एक प्रकारची गुलामगिरी आहे आणि त्यातून व्यवस्थापकशाही (Managerial Autocracy) किंवा एक प्रकारची नोकरशाही अस्तित्वात येते. म्हणून उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीकरणापेक्षा हस्तोद्योगाने होणारे उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरणच इष्ट आहे व त्यासाठीच आपण प्रयत्न केले पाहिजेत.

समाजवाद्यांनाही उद्योगधंद्यांच्या केंद्रीकरणावरील हा आक्षेप मान्य आहे. त्यांनाही उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण इष्ट वाटते व विकेंद्रीकरणाचे अनेक फायदे ते मान्य करतात. अनेक समाजवाद्यांनी सत्तेच्या व संपत्तीच्या विकेंद्रीकरणाच्या योजना तयार केलेल्या आहेत. पण हे उत्पादनाचे विकेंद्रीकरण हस्तोद्योगाने तडीस जाणार नसून ते यंत्रोद्योगानेच तडीस जाणार आहे. त्यासाठी विजेवर चालणारी छोटी यंत्रे खेड्यापाड्यातून स्थापन करावी लागतील आणि शहरातील प्रचंड कारखाने मोडून खेड्यात छोटे कारखाने आणि यंत्रकला व विजेसारखी निसर्गशक्ती यांच्या साहाय्याने चालणारे घरगुती धंदेही शक्य तर सुरू करावे लागतील. पण या सर्व गोष्टी यांत्रिक संशोधनानंतर अस्तित्वात येऊ शकतील. तोपर्यंत देशातील प्रचंड कारखाने आणि व्यापारधंदे खाजगी मालकीचे ठेवून देशात वर्गकलह पेटू देता येणार नाही. म्हणून समाजाच्या आर्थिक जीवनावर सत्ता गाजविणाऱ्या भांडवलशाहीच्या हातातील आर्थिक सत्ता प्रथम काढून घेतली पाहिजे व वर्गकलहाचा अंत केला पाहिजे. त्यानंतर यंत्रोत्पादनाची पद्धती खेड्यापाड्यात कशी व कोणत्या साधनांनी स्थापन करता येईल व छोटे भौगोलिक विभाग औद्योगिक दृष्टीने स्वयंपूर्ण व स्वावलंबी कसे होतील ते पाहिले पाहिजे....

विकेंद्रीकरणासंबंधी समाजवाद्यांची अशी विचारसरणी असून ती लक्षात घेतल्यास राष्ट्रीकरण आणि विकेंद्रीकरण यात विरोध नसून राष्ट्रीकरण हा शास्त्रीय विकेंद्रीकरणाचा पाया आहे असे दिसून येईल. म्हणून "राष्ट्रीकरण की विकेंद्रीकरण" या प्रश्नास माझे उत्तर प्रथम राष्ट्रीकरण आणि मग विकेंद्रीकरण असे आहे....

## समाजवादी आर्थिक घटना आणि मनुष्यस्वभाव

समाजवाद्यांचा मनुष्यस्वभावासंबंधी जो सिद्धान्त आहे त्याच्यावर भांडवलदारांचा एक आक्षेप आहे, तर गांधीवादी त्यावर अगदी विरुद्ध असा आक्षेप घेताना आढळतात. भांडवलदार म्हणतात की, मनुष्य जितका निःस्वार्थी आहे असे समाजवादी मानतात तितका तो वस्तुतः नाही. तो तितका निःस्वार्थी असता तरच समाजवाद यशस्वी झाला असता पण समाजवादी आर्थिक घटनेत स्वार्थसाधनाला व धनसंग्रहाला जेवढा अवसर देणे शक्य आहे, त्याहून त्याला अधिक अवसर दिल्यावाचून मनुष्य कामच करणार नाही. अर्थात माणसांनी उत्पादनाचे काम करावे आणि समाजाच्या संपत्तीत वाढ करावी असे वाटत असेल, तर हल्लीप्रमाणे त्याला नफा मिळविण्यास व संग्रह करण्यास अवसर दिलाच पाहिजे. तात्पर्य, समाजवादी मानितात त्याहून मनुष्य अधिक स्वार्थी आहे असे भांडवलदार म्हणतात.

गांधीवाद्यांचा समाजवाद्यांवर याच्या उलट आक्षेप आहे. ते म्हणतात की, समाजवाद्यांचा मनुष्यस्वभावाच्या चांगुलपणावर विश्वास नाही. गांधीवादी जो ट्रस्टीशिपचा

सिद्धांत मानतात तो मानण्यास समाजवादी तयार नाहीत. या दोनही आक्षेपांचा विचार करून माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत समाजवाद्यांचेच मत खरे आहे. सर्वसामान्य मनुष्य भांडवलदार मानतात तितका स्वार्थी नाही आणि गांधीवादी समजतात तितका तो निःस्वार्थी बनणेही निदान आज तरी शक्य नाही. आज भांडवलदारांना अमर्याद नफ्याचे जे आमिष आहे ते नष्ट झाले, तर मनुष्य कामच करणार नाही हेही खरे नाही आणि धनिक लोक स्वयंप्रेरणेने आपल्याजवळच्या संपत्तीचा सामाजिक निधी म्हणून उपयोग करू लागतील, हेही खरे नाही. सर्वसामान्य धनिक तसे करणार नाहीत असे समाजवादी म्हणतात, पण काही व्यक्ती स्वयंप्रेरणेने आपली संपत्ती समाजाला अर्पण करतील याबद्दल त्यांना शंका वाटण्याचे कारण नाही. पण एवढ्या स्वयंप्रेरित त्यागाने सामाजिक क्रांती घडून येईल असे समाजवाद्यांना वाटत नाही. मनुष्य हा केवळ स्वार्थी किंवा केवळ परार्थी नाही. त्याच्या अंतःकरणात दोनही वृत्ती आहेत. कोणती वृत्ती केव्हा किती प्रमाणात जागृत होईल याचा विचार करून समाजरचना करावी लागते आणि क्रांतिशास्त्रही बनवावे लागते. स्वार्थ सोडून परार्थ करणारांचा एक क्रांतिकारक वर्ग निर्माण होऊ शकेल व होऊ शकतो हे समाजवाद्यांनाही मान्य आहे. पण त्यामुळे सामाजिक क्रांती तेवढ्याच बळावर घडून येणार नाही. भांडवलदार आपल्या स्वेच्छेने स्वतःच्या संपत्तीचा संन्यास घेऊन ट्रस्ट करतील हा विचार जरी समाजवाद्यांना अव्यवहार्य वाटला तरी भांडवलदारांचे मनुष्यस्वभावासंबंधीचे मतही एकांतिक आहे असे समाजवादी मानितात.

आजच्या समाजात मनुष्य स्वभावाला जे विशिष्ट स्वरूप प्राप्त झालेले आहे ते आजच्या समाजरचनेचे फळ आहे. स्वार्थ, संग्रहबुद्धी आणि स्पर्धा यांना एकांतिक चालना भांडवलदार समाजरचनेमुळेच मिळते. आज धंदेवाल्यांना जो अमर्याद नफा मिळतो, तितका मिळाला तरच समाजाचे उत्पादनकार्य चालेल हे खरे नाही. आजच्या समाजात भांडवलदारांना अमर्याद नफ्याचे आमिष असते आणि कामगारांना उपासमारीचे भय असते. उपासमार आणि बेकारी यांची भीती असेल तरच कामगार काम करतात, नाहीतर ते काम करणार नाहीत असाही आपला सिद्धांत भांडवलदार सांगत असतात. पण हाही त्यांचा सिद्धांत तितकाच एकांतिक आहे. काही लोकांना पिढ्यानुपिढ्या आळसात गेल्या तरी कुटुंबात कधी पैशाची वाण पडू नये, इतक्या संग्रहाचे आमिष दाखवावे आणि इतरांना सदैव बेकारीचे व उपासमारीचे भय दाखवावे, याच मार्गाने धनोत्पादनाचे कार्य चालेल हा अपसिद्धांत असून आजची अन्याय्य समाजरचना ही सनातन व शाश्वत आहे आणि तिच्या खाली मनुष्यस्वभावाला जे विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले आहे, तेच त्याचे नित्य स्वरूप आहे या भ्रमावर हा अपसिद्धांत उभारलेला आहे. सामान्य मनुष्य हा केवळ निष्कामकर्मयोग आचरणारा अनासक्त यती होणार नाही व आपला धनसंग्रह

स्वेच्छेनें समाजाला अर्पण करणार नाही असे समाजवाद्यांना वाटते. तसेच जन्मभर सुखात व चैनीत कालक्रमणा करण्याची सोय झाल्यावर आपण होऊन समाजोपयोगी उद्योग अंगावर घेण्यास तो तयार होईल असेही त्यांना वाटत नाही. तरी निश्चित जीवनमानाची शाश्वती सर्वांस मिळाली, कोणाही प्रौढ सुदृढ मनुष्यास विनाकष्ट द्रव्यार्जन करण्याचा मार्ग कायद्याने मोकळा ठेविला नाही आणि समाजाने आपणास दिलेले काम सतत कर्तव्यदक्षतेने करीत राहिलो तर आपल्या श्रमाचे नियत फल आपल्या पदरात पडेल व आपल्या अंगच्या विशेष गुणांचेही चीज समाजाकडून होत राहील अशी शाश्वती सर्वांस वाटू लागली तर समाजाचे उत्पादन कार्य जोरात चालेल आणि सर्व समाजात समता व सुख नांदू लागेल अशी समाजवाद्यांची खात्री आहे. याच्या उलट उपासमारीचे व बेकारीचे भय दाखवून कामगारांकडून सक्तीने कामे करवून घेण्याची आणि किमान निर्वाहवेतन कामगारांना देऊन निरुद्योगी मालकशाहीच्या हाती समाजजीवनावरील सर्व सत्ता व धन-संग्रहाचा बहुतेक भाग साठू देण्याची आजची उत्पादनपद्धती अगदीच क्षणभंगुर असून ती वर्गकलहाने मोडून पडणार आहे. हे भविष्य शंभर वर्षांपूर्वीच मार्क्सप्रभृती समाजवाद्यांनी केले होते. ते भविष्य खरे ठरत असून भांडवलदार अर्थशास्त्रज्ञांपेक्षा मनुष्यस्वभाव व समाज-धारणाशास्त्र यांचे ज्ञान समाजवाद्यांना अधिक आहे असेच त्यावरून सिद्ध होत आहे.

समाजवाद्यांच्या मानसशास्त्रात व समाजधारणा व क्रांती यासंबंधीच्या ज्ञानात एक नवी भर म. गांधींनी घातली आहे. सत्याग्रह नावाचे एक नवे क्रांतितंत्र हिंदी समाजाला शिकविले आहे. या तंत्राचा उपयोग केल्यास समाजवादी क्रांती लोकशाही मार्गाने व शक्य तितक्या शांततेने घडून येईल. आपल्या देशातील अनेक समाजवाद्यांनी ही वृत्ती स्वीकारली असून त्यातून आपल्या देशातील समाजवादात सत्याग्रही वृत्तीचे व शुद्ध साधनाचे तेज चमकू लागेल.

## समाजवादाचे तीन नमुने

ब्रिटन, रशिया आणि हिंदुस्थान या तीन राष्ट्रांत समाजवादाचे तीन नमुने अस्तित्वात येत आहेत. ब्रिटिश समाजवादी हे केवळ कायदेशीर मार्गांचेच अनुकरण करणारे आणि सत्याग्रह किंवा सविनय कायदेभंग यासारख्या प्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गांचा उपयोग न करणारे असे लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते आहेत. कायदा कितीही अन्यायाचा असला तरी त्याचा अनत्याचारी वृत्तीनेही भंग करावा अशी त्यांची वृत्ती नाही. कोणत्याही प्रकारच्या क्रांतिवृत्तीचे ते विरोधक असून सुधारणावाद व क्रमविकास याव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने खरी सुधारणा होणे शक्य नाही अशीच त्यांची निष्ठा आहे. याच्या उलट रशिया-तील कम्युनिस्ट हे सर्व प्रकारच्या सुधारणावादांचे विरोधक असून लोकशाही समाजवाद हे

एक थोतांड असे ते समजतात. समाजवादी क्रांती ही अखेरीस सशस्त्र मार्गानीच होईल व ती झाल्यानंतर काही काळ कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली अनियंत्रित एकपक्षीय कामगारशाही (Dictatorship of the proletariat) स्थापन होणे अपरिहार्य व इष्ट आहे असे त्यांचे धोरण आहे.

हिंदी समाजवादाचे धोरण या दोहोंहून भिन्न असून तो लोकशाही समाजवादाचा पुरस्कर्ता असला तरी सविनय कायदेभंग व अनत्याचारी असहकार हे म. गांधींनी शिकविलेले सत्याग्रही लढ्याचे अथवा प्रत्यक्ष प्रतिकाराचे तंत्र योजून आपल्या देशात स्थापन होत असलेल्या लोकशाही राज्याचे समाजवादी लोकशाहीत त्वरित रूपांतर करता येईल असे या पक्षास वाटत आहे. गांधीवाद्यांनी हीच भूमिका स्वीकारून प्रथम सत्याग्रहाच्या बलावर समाजवादी लोकशाहीची स्थापना करावी आणि आपल्या देशात पेटत असलेल्या वर्गकलहाचा अंत त्वरित करावा. अशा प्रकारे गांधीवाद व समाजवाद या दोघांचाही सामान शत्रू असा भांडवलशाहीचा भस्मासूर आणि वर्गकलहाचा ज्वालामुखी शांत झाला, म्हणजे मग समाजवाद व गांधीवाद यांच्यातील मतभेदांवर भर देण्याचा काल येऊ शकेल. तोपर्यंत देशातील राज्ययंत्रावर व समाजजीवनावर होणारे भांडवलशाहीचे आक्रमण थोपवून शेतकरी-कामकरी वर्गाच्या हाती राज्ययंत्राची व समाजजीवनाची सूत्रे जातील असा प्रयत्न करणे हेच अहिंसा व सर्वोदय यांना पोषक व उपकारक ठरणार आहे. गांधीवादी व समाजवादी यांनी हे धोरण स्वीकारिल्यास या देशात निर्माण होणाऱ्या समाजवादी संस्कृतीस सत्याग्रही अधिष्ठान मिळून तीत सत्य व अहिंसा यांचे आध्यात्मिक तेज निर्माण होईल.

### शुद्ध अहिंसा, सर्वोदय आणि आत्मराज्य

अशा प्रकारे गांधीवादी व समाजवादी या दोघांच्या संयुक्त आघाडीने आजचा वर्गकलह मिटून एकवर्ग किंवा वर्गहीन समाज स्थापन झाला तरी त्या समाजात संपूर्ण आर्थिक समता व असंग्रह ही तत्त्वे एकदम स्थापन होणार नाहीत आणि अर्थात ते राज्य पूर्ण अहिंसेने चालणारे रामराज्य किंवा आत्मराज्यही होणार नाही. आज भांडवलशाही समाजात खंड व नफा या रूपाने कष्टजीवी वर्गाच्या श्रमफलांचा जो अपहार चालू आहे तो बंद होईल, कारण जमिनी व कारखाने हे समाजाच्या मालकीचे झाल्याने त्यांच्या स्वामित्वाने खाजगी व्यक्तींना मिळणारा खंड व नफा हे समाजाकडेच जाऊ लागतील. तसेच समाजाकडे हा जो खंड व नफा येत राहील त्यातूनच नवे उद्योगधंदे उभारण्यास लागणारे भांडवल किंवा संग्रह समाज करीत गेल्याने उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी व्याजावर कर्ज उभारून औद्योगिक भांडवल उभारण्याचा प्रकारही बहुतेक प्रमाणात बंद होईल. तरीही व्याजाचा प्रकार पूर्ण आर्थिक समता व असंग्रह ही तत्त्वे अमलात येईपर्यंत अत्यल्प प्रमाणात चालू राहील....

... खाजगी जमीनदारी, कारखानदारी, सावकारी व व्यापार हे द्रव्यार्जनाचे मार्ग बंद झाल्याने कष्टजीवी वर्गाच्या श्रमाचे फळ विनाश्रम मिळविण्याचे म्हणजे आजच्या समाजातील स्तेयमूलक व्यवहार बंद झालेले असतात. म्हणजे अस्तेयाचे तत्त्व कायद्याने अमलात आलेले असते; तरीही निरनिराळ्या श्रेणीतील भिन्न प्रमाणामुळे निर्माण होणारी विषमता आणि त्यांमुळे शक्य होणारा खाजगी संग्रह चालू असतो. याचे कारण, चोरी बंद करण्यात कायदेशीर सक्तीचा उपयोग जितका उपयुक्त ठरतो, तितका श्रममूल्यातील विषमता व तज्जन्य संग्रह बंद करण्यात कायदेशीर सक्तीचा उपयोग प्रभावी ठरत नाही. यावरून समाजवाद हा अस्तेयाचे तत्त्व अमलात आणण्याचा मार्ग असला तरी असंग्रहाचे तत्त्व अमलात आणण्यात त्याला तितके यश येत नाही.

या ठिकाणी हृदयपरिवर्तनाची अद्यापि फार आवश्यकता आहे. आज ज्या कामांना विशेष मोल मिळते ती कामे करणारे जोपर्यंत कमी मोल घेऊन तितकेच काम करण्यास उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत ही विषमता नष्ट करता येणार नाही. मुळीच काम न करता केवळ स्वामित्वावर द्रव्यार्जन करण्याचे मार्ग बंद करता येतात तसे येथे नाही. ज्यांच्या कामाची गरज लागते, पण जे काम करणारे लोक दुर्मिळ असल्याने अधिक पैसा घेतल्यावाचून ते काम करीत नाहीत, त्यांना अधिक पैसा देऊन ते काम करून घेतलेच पाहिजे, समाजाच्या संपत्तीत त्यांच्या कामांमुळे पडणारी भर आणि त्यांना द्यावे लागणारे वेतन यांचा ताळमेळ पाहून त्यांना काही अधिक वेतन देणे अवश्य आहे. ही विषमता समाजहितदृष्टीने आज अपरिहार्य आहे.

पण एवढ्याने त्यांनी समाजाकडून असे अधिक वेतन घेण्यात काही चूक केली नाही असे म्हणता येणार नाही. जर या अधिक वेतनामुळे त्यांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होत असेल तर त्यात अन्याय आहे असे म्हणता येणार नाही. ती त्यांची योग्य गरजच ठरेल. कुवतीनुसार काम आणि गरजांनुसार वेतन या तत्त्वात ते बसेल. हे तत्त्व न्यायाचेच आहे. पण अशी गरज सिद्ध न करताही केवळ ते काम करण्यास कमी वेतनावर कोणी मिळू शकत नाही म्हणून समाजाला असे अधिक वेतन द्यावे लागणे हे न्यायाचे नाही. पण उत्पादनकार्य चालण्यास अपरिहार्य असणारी विषमता एवढेच तिचे समर्थन, पण व्यवहारदृष्टीने ते समर्थनीय आहे. या ठिकाणी ज्यांनी असंग्रहाचे व्रत घेतले असेल त्यांनी आपल्या अधिक वेतनातील वाढावा स्वेच्छेने समाजाला अर्पण करून इतरांना उदाहरण घालून द्यावे. सत्याग्रहातील असंग्रहाच्या तत्त्वाची समाजाला येथेच गरज आहे. उत्पादनाचे कार्य चालण्यास जी विषमता आज अपरिहार्य ठरते व जी नष्ट करण्याचा प्रयत्न कायद्याने करता येत नाही तेथे सत्याग्रहींनी आपल्या उदाहरणाने समाजाला असंग्रहाचे तत्त्व शिकविले पाहिजे. चोरी व बलात्कार हे गुन्हे कायद्याने बंद करता येतात, पण संन्यास व ब्रह्मचर्य

ही व्रते कायद्याने लादता येत नाहीत, तसाच हा प्रकार आहे. संन्यासी व ब्रह्मचारी यांच्या उदाहरणांची समाजाच्या आत्मोन्नतीस गरज आहे. तथापि त्यांच्या उदाहरणाने व उपदेशाने पोलीस व तुरुंग ही खाती बंद करून समाज चालेल अशी आशा करणे शहाणपणाचे ठरत नाही किंवा चोरीचा व बलात्काराचा कायदा नसला तरी नैतिक उपदेशाने काम भागेल असे आपण म्हणत नाही. त्याचप्रमाणे समाजवादी कायद्यांच्या अभावी केवळ नैतिक उपदेशाने भांडवलदार आपली संपत्ती समाजाला देऊन टाकतील किंवा तिचा ट्रस्ट करतील हे समाजवाद्यांना पटत नाही. तरीही समाजवादातही जी आर्थिक विषमता आज अपरिहार्य दिसत आहे, ती नष्ट करण्यास सत्याग्रही वृत्तीची जोपासना करणे अवश्य आहे हे समाजवाद्यांनाही मान्य करावेच लागेल. समाजसेवेचे निष्काम व्रत घेणारे सत्याग्रही लोकशाही समाजवादास अवश्य अशी मनोवृत्ती निर्माण करतील. इतकेच नाही तर या समाजसत्ताक अवस्थेतून आत्मसत्तेच्या दंडहीन समाजाकडे जाण्यास जी मनः प्रवृत्ती समाजघटकांच्या अंतःकरणात निर्माण करावयास हवी ती ते करीत राहतील.

गांधीवाद ही जशी अंतिम दृष्टीने आत्मराज्याकडे नेणारी निष्ठा आहे तशी समाजवादही अंतिम दृष्टीने अराज्यवादाकडे नेणारी निष्ठा आहे. रशियात पहिली निष्ठा टॉलस्टॉयच्या रूपाने अवतीर्ण झाली होती व दुसरी निष्ठा लेनिनने मूर्त स्वरूपात आणण्याचा प्रयत्न केला. अराज्यवाद हे अंतिम ध्येय आहे असे म्हटले तरी या अराज्यवादाकडे आजच्या द्विवर्ग समाजातून एकदम जाता येणार नाही. त्यासाठी प्रथम समाजसत्ताक अवस्थेत जाऊन एकवर्ग समाज स्थापन करावा लागेल व नंतर आर्थिक विषमता नष्ट होऊन उत्पादन-शक्तीची पुष्कळ वाढ झाली, सर्वांच्या योग्य गरजा भागविण्यास लागणारे कष्ट फारसे पडेनासे झाले, समाजसेवेची सवय अंगवळणी पडून दुसऱ्याच्या श्रमाचे फळ उपटण्याच्या पद्धतीचा पूर्ण विसर पडला, समाजामार्फत सर्वांच्या सुखसोयी भागतात असा विश्वास निर्माण होऊन संग्रहबुद्धी लयास गेली म्हणजे समाजातील राजदंड निरुपयोगाने गंजून जाईल अथवा गळून पडेल असे लेनिनने प्रतिपादन केले आहे.

लेनिनचे हे विवेचन मान्य केले तरी एकपक्षीय अनियंत्रित कामगारशाहीतून अराज्य-वादाकडे समाजाची प्रगती कशी होईल ते समजू शकत नाही. त्यापेक्षा लोकशाही पद्धतीने समाजवाद अथवा एकवर्ग समाज निर्माण होईल, तर राजदंडाचे स्वरूप पुढे पुढे सौम्य होत जाईल हेच मत अधिक सयुक्तिक दिसते.

म. गांधींची राजकीय हिंसेच्या प्रश्नाकडे पाहण्याची सत्याग्रही दृष्टी टॉलस्टॉय व लेनिन या दोघांच्याही दृष्टीहून भिन्न होती. त्या दृष्टीत टॉलस्टॉयपेक्षा अधिक वास्तववाद आणि लेनिनपेक्षा अधिक आदर्शवाद आहे. भेकडपणापेक्षा हिंसाही श्रेष्ठ आहे. या सूत्राची

मर त्यांनी येशू खिस्त किंवा त्यांचे टॉलस्टॉयसारखे भक्त यांच्या मतात घातली असून राजदंडाला विशिष्ट परिस्थितीत समाजधारणेसाठी जी अपरिहार्य हिंसा करावी लागते तिचे समर्थन ते करतात. तरीही ही हिंसासुद्धा नष्ट करण्याच्या अंतिम दृष्टीने ते सत्याग्रहाचे आत्मबल आजपासूनच प्रजेत निर्माण करू पाहतात. प्रजेतील आत्मबल संघटित व प्रभावी करूनच क्रांतिकारकांनी सामाजिक क्रांतीचा प्रयत्न करीत राहावे, त्यांच्या या प्रयत्नांनी जितके आत्मबल जागृत होईल, तितकी राजकीय हिंसा कमी कमी होईल आणि समाज-घटनाही अधिकाधिक समताधिष्ठित व अहिंसक बनत जाईल. या दृष्टीने परकीय राज्यापेक्षा स्वराज्य अधिक अहिंसक, हुकूमशाहीपेक्षा लोकशाही अधिक अहिंसक, भांडवलशाहीपेक्षा समाजवाद त्याहून अधिक अहिंसक, अशा तारतम्याने उत्तरोत्तर अधिकाधिक अहिंसक, समताधिष्ठित समाज व राज्य निर्माण करण्याचे प्रयोग सत्याग्रहींनी करीत राहावेत, त्यांचे अंतिम ध्येय दंडहीन समाज हे असले तरी आजचे आपले संनिकट ध्येय ते होऊ शकत नाही. साम्राज्यशाहीच्या अंकित राष्ट्राचे संनिकट ध्येय राष्ट्रीय स्वातंत्र्य, तसे भांड-वलशाही स्वतंत्र राष्ट्राचे संनिकट ध्येय समाजसत्तावादी लोकशाही हेच होऊ शकेल. म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्याग्रही शक्तीचा विनियोग भांडवलशाहीने निर्माण केलेला अथवा चालविलेला वर्गविग्रह थांबवून एकवर्ग समाज स्थापण्याच्या कामीच झाला पाहिजे. अशा क्रमाक्रमाने समाजाला सर्वोदयाचे रामराज्य किंवा आत्मराज्य या ध्येयाकडे आपली प्रगती करीत राहिले पाहिजे. म्हणून सर्वोदयाचे रामराज्य हे जरी अंतिम ध्येय सर्वांचे असले तरी ते गाठण्यापूर्वी एक त्याहून संनिकट असे साध्य आपण मान्य केले पाहिजे. हे साध्य आज लोकशाही समाजवादच असू शकते. कम्युनिस्टांना भांडवलदार लोकशाहीतून समाजवादी लोकशाहीत जाता येईल असे वाटत नाही. या दृष्टीने गांधीजींचे समाजवाद्यांशी सख्य होऊ शकले, तरी कम्युनिस्टांशी तसे सख्य होऊ शकले नाही. कारण जे प्रजेत क्रांतीसाठी हिंसावृत्ती जागृत करतात त्यांच्या मार्गाने ते केव्हाही जाण्यास तयार नव्हते.

पण त्याचबरोबर सत्याग्रही शक्ती प्रजेत निर्माण करू इच्छिणाऱ्यांनी तिच्या आजच्या मर्यादा ओळखून राजदंडाचा उपयोग समाजरक्षणासाठी करणाराची अपरिहार्य हिंसा निंद्य समजून चालणार नाही. पण एकदा ही राजदंडाची अपरिहार्य हिंसा अनिंद्य समजली, तर विशिष्ट परिस्थितीत क्रांतीकारकांचीही हिंसा अनिंद्य समजावी लागेल. या दोनही प्रकारची हिंसा विशिष्ट परिस्थितीत अपरिहार्य म्हणून अनिंद्य ठरली तरी ज्यांना सत्याग्रहाचे आत्म-बल प्रजेत जागृत करावयाचे आहे, त्यांनी या मार्गांचा मोह धरून त्या मार्गावर स्वतः जाऊ नये असा त्यांचा कटाक्ष होता. प्रजेतील आत्मबल जितके वाढेल तितकी राजकीय हिंसा कमी होत जाईल, या श्रद्धेने व निष्ठेने शुद्ध सत्याग्रहींनी आपले कार्य अखंड करीत राहावे. या कार्याचा प्रभाव प्रत्येक परिस्थितीत जितका राजकारणावर पडेल तितका पाडीत राहावे. या दृष्टीने राष्ट्रवाद्यांप्रमाणे समाजवाद्यांशी शुद्ध सत्याग्रहींनी सहकार्य केले तरी

समाजवादी लोकशाहीतही त्यांनी स्वतःच्या हाती राजदंड घेता कामा नये. तर त्या अमदानीतील समाजवादी पक्षांपैकी जो आपल्या ध्येयाशी अधिक जवळचा व पुरोगामी असेल त्या पक्षाच्या हाती तो राजदंड देण्यास त्यांनी साहाय्य करावे. पुढे जर या समाजवादी पक्षाने लोकशाही मोडून हुकूमशाही अथवा अनावश्यक हिंसा करण्यासाठी राजदंडाचा दुरुपयोग केला तर त्या पक्षाशीही अनत्याचारी असहकार करण्यास जनतेला सत्याग्रही नेत्यांनी प्रवृत्त करावे. अशा प्रकारे जनतेवर आपल्या आत्मबलाचा प्रभाव नित्य ठेवणारे व कोणत्याही राजदंडधारी पक्षाला प्रजेच्या आत्मबलापुढे नमविणारे सत्याग्रही नेते अथवा लोकसेवक कोणतीही क्रांती सत्याग्रहाने घडवून आणतील. मात्र त्यांनी स्वतःच्या हाती राजदंड न घेता अखंड क्रांतिकारक बनावे, हाच गांधीवादाचा राजकीय संदेश आहे. या दृष्टीने आपल्या देशातील गांधीवादी व समाजवादी वागतील तर येथे सत्याग्रही समाजवाद निर्माण होऊन त्यात एक अभिनव संस्कृती उदयास येईल.

[*गांधीवाद, समाजवाद : संपा. भाऊ धर्माधिकारी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९४९, 'प्रस्तावना', पृ. १ ते ३०*]

२९

# गांधी आणि मार्क्स

"गांधी आणि मार्क्स" या विषयावर 'हरिजन'चे संपादक श्री. किशोरीलाल मश्रुवाला यांचे एक पुस्तक गेल्या साली सप्टेंबर महिन्यात प्रसिद्ध झाले आहे. त्याला आचार्य विनोबा भावे यांनी प्रस्तावना लिहिली असून, गांधीवाद्यांचे मार्क्सवादासंबंधीचे मत या पुस्तकात थोडक्यात प्रकट झालेले आहे, असे समजण्यास हरकत नाही. दोघांचाही या विषयावर लिहिण्याचा अधिकार मोठा असून, त्यांचे मत हे गांधीवादी दृष्टिकोनाचे अधिकृत मत म्हणून मानले जाणे साहजिकच आहे....

...तथापि मार्क्सवादासंबंधी त्यांनी केलेली काही विधाने गैरसमजावर उभारलेली आहेत असे मला वाटते. अर्थात त्यांनी मार्क्सवादासंबंधी केलेली ही विधाने मार्क्सवादावरील आक्षेप या दृष्टीने अनेकांनी केलेली आहेत. हे खरे असले तरी ती सर्वस्वी यथार्थ आहेत असे मला वाटत नाही. तसेच गांधीवादासंबंधीच्याही त्यांच्या काही विधानांबद्दल मला स्वतःला शंका वाटते. शिवाय, माझी स्वतःची या विषयाकडे पाहण्याची जी दृष्टी आहे ती या दोहोंपैकी कोणत्याही एका वादाशी पूर्ण तादात्म्य पावण्याची नसून त्या दोहोंचा समन्वय साधण्याची असल्याने, मार्क्सवाद व गांधीवाद या दोहोंचेही मला दिसणारे स्वरूप हे, गांधीवाद्यांना व मार्क्सवाद्यांना परस्परांचे स्वरूप जसे वाटते, त्याहून थोडे भिन्न आहे. म्हणून या पुस्तकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने मी यासंबंधी माझी स्वतःची दृष्टी वाचकांपुढे ठेवणार आहे.

## मार्क्स आणि नियतिवाद

मार्क्सवाद हा भौतिकवादी असल्यामुळे तो नियतिवादी असलाच पाहिजे, त्यात मानवी बुद्धीच्या स्वातंत्र्याला व मानवी कर्तृत्वाला अवसर असणेच शक्य नाही असे आक्षेप त्याच्यावर घेण्यात येत असतात. पण हे आक्षेप सर्वस्वी खरे नाहीत असे मला वाटते. हे

आक्षेप मार्क्सवादाची कार्यकारणसंबंधाबद्दल जी विचारसरणी आहे तिचे वैशिष्ट्य लक्षात न घेतल्यामुळे येत असतात. मानवी बुद्धीचे व कर्तृत्वाचे स्वातंत्र्य आणि विश्व घटनेतील नियती यांच्याबद्दल मार्क्सवाद्यांचे मत हेगेलच्या मतासारखे आहे....

...मार्क्सवादात एक प्रकारचा नियतिवाद असला तरी तो मानवी बुद्धीच्या व कर्तृत्वाच्या आड येणारा आहे किंवा त्याच्या योग्य स्वातंत्र्याला विघातक आहे, असे म्हणता येणार नाही. विश्वातील नियतीचे उल्लघन करण्याचे स्वातंत्र्य मानवाला नाही, हे तत्त्व आज सर्वमान्य होण्यासारखेच आहे. स्वतःच्या कर्तृत्वाने नराचा नारायण बनतो असे मानणाऱ्या अध्यात्मवादी वेदान्त्यांना सुद्धा असे नराचे नारायण बनलेले लोक जगत्व्यापारांवर वाटेल तशी सत्ता चालवू शकत नाहीत हे मान्य करावे लागते. त्याचप्रमाणे भौतिकवाद्यांना, भौतिक नियती समजून घेऊन तिचा आपल्या कार्यासाठी उपयोग करण्याचे स्वातंत्र्य मानवी बुद्धीला व कर्तृत्ववान मनुष्याला असते हे मान्य करावे लागते. अशा प्रकारे नियती आणि स्वातंत्र्य या दोनही तत्त्वांना योग्य मर्यादेत मान्यता देऊन मार्क्सवाद्यांनी आपला विरोधविकासी भौतिकवाद बनविलेला आहे....

## सामाजिक घडामोडी आणि मनोव्यापार

मनुष्याचे विचार अथवा त्याचे मनोव्यापार बाह्य सामाजिक व भौतिक परिस्थितीचे प्रतिबिंबरूप असतात, या मार्क्सच्या वचनापासून असा निष्कर्ष काढण्यात येत असतो की, मार्क्सच्या मताप्रमाणे मानवी मनोव्यापारांना बाह्य सामाजिक व भौतिक परिस्थितीवर आपला प्रभाव पाडता येत नाही. कारण प्रतिबिंब मूळ बिंबावर आपला प्रभाव कसे पाडणार? जर मानवाचे मनोव्यापार ही बाह्य घटनांची प्रतिबिंबेच आहेत आणि मानवी मन हे स्वतंत्र वस्तू नसून भौतिक तत्त्वाचेच कार्य आहे, तर त्या मनाला अथवा त्याच्या व्यापारांना मूळ बिंबरूप अथवा कारणरूप भौतिक तत्त्वावर अथवा घटनांवर आपला प्रभाव पाडता येणे शक्य नाही, म्हणून सर्व प्रकारचे मानवी मनोव्यापार आणि मानवी व्यवहार बाह्य परिस्थितीने पूर्णपणे निबद्ध असतात, असेच मार्क्सवादी तत्त्वज्ञान सांगते. असा मार्क्सवादाचा अर्थ आचार्य विनोबा भावे यांनी केला आहे. त्यांच्या मते ऐतिहासिक घटनांवर आपला प्रभाव पाडण्याचे स्वातंत्र्य मार्क्सवादाप्रमाणे मानवाला मिळू शकत नाही. यासंबंधी त्यांचे पुढील विचार वाचनीय आहेत :

"....Just as the sons of Sagar discovered the source of Ganga, as also these thinkers have traced the whole course of human history. And they have arrived at the conclusion that just as an arrow, that has been shot, will not deflect from its path but must take determinable course, so also it is with mankind. Its past history decided once for all its future course. There is no longer any freedom of action left us. Everything is determined. There will be first rivers of blood, then rivers of milk and honey and then will follow those of fresh and cool water flowing by each happy home assuaging the thirst of all mankind."

आचार्य विनोबा यांनी मार्क्सवादाची इतिहासमीमांसा वर ज्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे ते शब्द अगदी अवास्तव व अनाठायी आहेत असे मला वाटते. एकदा धनुष्यापासून सोडलेला बाण ज्याप्रमाणे आपल्या पूर्वनियत मार्गाने जात असतो त्याप्रमाणे मानवी इतिहासातील घटना पूर्वीच ठरून गेलेल्या नियतीप्रमाणे घडणार आहे, त्यात यत्किंचित्‌ही फेरबदल घडविण्याचे स्वातंत्र्य आपणास आता उरलेले नाही असे मार्क्सवादी समजतात, हा आरोप सिद्ध करणे शक्य होईलसे वाटत नाही. मनुष्याचे विचार परिस्थितीप्रमाणे बदलत जातात आणि ते परिस्थितीचे प्रतिबिंबरूप असतात. अशा अर्थाच्या मार्क्सवादाच्या विधानांवरून काढलेला निष्कर्ष साधार नाही. कारण मनुष्याला परिस्थितीवर आपला प्रभाव पाडता येतो आणि परिस्थितीत बदल घडवून आणण्याचे स्वातंत्र्य मानवाला आहे, याचा उलगडा करण्यासाठीच मार्क्सने त्याच्यापूर्वी रूढ असलेल्या यांत्रिक भौतिकवादा (Mechanical Materialism) चा त्याग करून विरोधविकासी भौतिकवाद (Dialectical Materialism) हे नवे तत्त्वज्ञान निर्माण केले. या नव्या तत्त्वज्ञानावर आचार्य विनोबा भावे यांचा आक्षेप लागू पडणार नाही. कारण या तत्त्वज्ञानात मानवी मन, बुद्धी आणि कर्तृत्व यांना मर्यादित अवसर करून दिलेला आहे.

कार्ल मार्क्सने आपल्या पूर्वीच्या यांत्रिक भौतिकवादावर जो आक्षेप घेतला तो मार्क्सच्याच शब्दांत पुढे देतो :

"The materialist doctrine that men are the products of circumstances and education, and that changed men are therefore the products of other circumstances and a changed education, forgets that circumstances are changed by men, and that the educator must himself be educated. Consequently, materialism necessarily leads to a division of all society (e. g. in Robert Owen).

The coincidence of the transformation of circumstances and of human activity can only be conceived and rationally understood as revolutionising practice."
*Theses on Feuerbach, III*].

कार्ल मार्क्सने वरील प्रकारची टीका फायरबाकवर केलेली आहे. ही टीका सूत्ररूपात असून अशाच प्रकारच्या अकरा सूत्रांत ती संक्षिप्त रूपाने करण्यात आली आहे. या मार्क्सच्या अकरा सूत्रांवर अनेक भाष्ये झालेली आहेत, पण आपल्या चालू मुद्यापुरते हे सूत्र निर्णायक असून त्यात परिस्थितीमुळे मनुष्ये बदलतात, या तत्त्वाची दुसरी बाजू म्हणजे मनुष्ये स्वतः परिस्थिती बदलू शकतात अशी मांडलेली असून, या दुसऱ्या बाजूकडे भौतिकवाद्यांनी दुर्लक्ष केलेले आहे असे स्पष्ट म्हटलेले आहे. असे असता मनुष्यांना आपल्या परिस्थितीवर कोणताही प्रभाव पाडता येत नाही, हे मत मार्क्सवर लादता येणार नाही हे उघड आहे. मार्क्सच्या तत्त्वज्ञानात मनुष्ये परिस्थिती बदलत असतात हे गृहीत धरलेले असून परिस्थिती बदलण्याच्या या प्रयत्नात मनुष्ये स्वतःसही बदलून घेतात असे

त्याने दाखवून दिलेले आहे. त्याने केलेल्या इतिहासाच्या भौतिक मीमांसेत मनुष्यसमाज बाह्य परिस्थितीच्या हातातील खेळणे आहे असे कोठेही म्हटलेले नाही. उलट, त्याने असे सिद्ध केले आहे की, ज्याप्रमाणे जड भौतिक विश्वाचे नियम समजून घेतल्याने मनुष्याला भौतिक विश्वावर प्रभुत्व संपादन करता येते, त्याचप्रमाणे सामाजिक घडामोडींचे नियम समजून घेतल्यानेच मनुष्यांना आपल्या सामाजिक घटनांवर व परिस्थितीवर आपला प्रभाव पाडता येईल. भांडवलशाही समाजात प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या स्वार्थाच्या दृष्टीने सामाजिक परिस्थितीवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु आजच्या संकीर्ण समाजात प्रत्येक व्यक्तीने असा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करण्याने मूठभर धनिक वर्गाशिवाय कोणाचेही हित होत नाही. म्हणून सामाजिक परिस्थितीवर आपला प्रभाव पाडू इच्छिणाऱ्या कष्टजीवी जनतेने परस्पराशी सहकार्य करून सामाजिक जीवनाची साधने आज धनिक वर्गाच्या खासगी मालकीखाली गेली आहेत, ती सामाजिक मालकीची बनवावीत, म्हणजे समाजाला आपल्या भौतिक जीवनावर व सामाजिक परिस्थितीवर आपला प्रभाव पाडता येईल. याच्या उलट, प्रत्येक व्यक्तीने एकेकट्याने संकुचित प्रयत्न केल्यास कष्टजीवी जनतेचे आर्थिक दारिद्य व दास्य यांची वाढ होईल, इतकेच नाही तर समाजात वर्गलढा आणि आर्थिक अराजक बेसुमार वाढून सर्व समाजरचना कोसळून पडेल. पण ही आर्थिक व राजकीय अराजकाची अवस्था निमूटपणे सहन करीत लोक स्वस्थ बसणार नाहीत, तर भांडवलशाही समाजघटनेमुळे एकत्र आलेले व संघटित होत असलेले कामगार अशा अवस्थेत समाजसत्ताक क्रांती करून एकवर्ग समाज स्थापन करतील. हे त्याचे विचार कोणास पसंत असतील अगर नसतील, पण ह्या विचारांत मनुष्य हा आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीचा केवळ गुलाम बनतो आणि त्याला आपल्या परिस्थितीवर स्वतःचा प्रभाव पाडता येत नाही असे कोठेही गृहीत धरलेले अगर प्रतिपादिलेले नाही. मार्क्स हा भौतिकवादी आहे. एवढ्यावरून मार्क्सच्या विशिष्ट भौतिकवादाचे स्वरूप लक्षात न घेता त्याच्यावर केलेला हा एक आरोप आहे. पण तो साधार आहे असे वाटत नाही.

## वर्गहीन समाज म्हणजे काय?

या पुस्तकामध्ये आणखी एका मुद्यासंबंधी मार्क्सवादी विचारसरणीबद्दल बराच घोटाळा किंवा गैरसमज झाल्याचे दिसून येते. समाजातील आर्थिक वर्गभेद नाहीसे करून एकवर्ग समाज किंवा वर्गहीन समाज स्थापन करावा असे मार्क्सवादी आणि समाजवादी प्रतिपादन करतात. तेव्हा त्याचा निश्चित अर्थ काय असतो? श्रमविभागाच्या तत्त्वानुसार निरनिराळी कामे निरनिराळ्या वर्गांमध्ये विभागून देणे यामुळे जे वर्गीकरण समाजात निर्माण होते ते वर्गीकरणच नाहीसे करावे आणि प्रत्येकाच्या जीवनास लागणाऱ्या सर्व वस्तू ज्याच्या त्याने निर्माण कराव्यात असा त्याचा अर्थ असतो काय? कोणी शेती करावी, कोणी सुतारकी करावी, कोणी गवंडीकाम करावे, कोणी शिक्षकाचे काम करावे, कोणी वैद्यकीचा धंदा करावा,

अशी निरनिराळी कामे ज्याच्या त्याच्या गुणाप्रमाणे विभागून घेण्याने जो व्यवसायभेद समाजात निर्माण होतो, तो नष्ट करावा असा मार्क्सवादाचा अभिप्राय नाही. अशा प्रकारचा व्यवसायभेद असला तरी प्रत्येकाने आपल्या गुणानुसार समाजाची सेवा करावी आणि त्या सेवेचे फल म्हणून समाजाने प्रत्येकाच्या गरजा भागवाव्यात (From each according to his capacity, to each according to his needs.) असे मार्क्सवादी वर्गहीन समाजाचे अंतिम ध्येय आहे. त्यात श्रमविभागजन्य वर्गीकरणास विरोध नाही. केवळ स्वामित्वावर आधारलेले द्रव्यसंपादन करण्याचे मार्ग बंद करावेत आणि मालक-मजूर असा उत्पादनपद्धतीत निर्माण होणारा वर्गभेद नाहीसा व्हावा, एवढेच मार्क्सवादास अभिप्रेत आहे. अर्थात हे ध्येय प्राप्त करून घेण्याच्या मार्गात अनेक व्यावहारिक अडचणी असल्यामुळे ते तात्काळ प्राप्त होणार नाही असे म्हणता येईल. पण हे ध्येय गांधीवाद्यांना मान्यच नाही असे म्हणण्याचे कारण नाही. सध्याच्या संकीर्ण समाजात या ध्येयाची संस्थापना करणे इष्ट नाही किंवा शक्य नाही असे गांधीवादाला का वाटावे ते समजत नाही. .....

वर्गहीन समाज निर्माण करण्याचे ध्येय म. गांधींना मान्यच नव्हते आणि ते शक्यच नाही. कारण काही झाले तरी श्रमविभागाच्या तत्त्वाप्रमाणे व्यवसायभेद समाजात राहणारच असा हा [किशोरीलाल मश्रुवालांचा] युक्तिवाद आहे. पण कम्युनिस्टांना किंवा समाजवाद्यांना समाजातील व्यवसायभेद नष्ट करावयाचा आहे असे मानण्याचे काहीच कारण नाही. व्यवसायभेद असूनही कोणताही व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला समान दर्जा व समान वेतन मिळावे आणि निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या लोकांत कोणत्याही प्रकारचा उच्चनीच भाव किंवा स्वामीसेवक संबंध असू नये हाच आर्थिक वर्गभेद नष्ट करणे याचा खरा अर्थ आहे. या अर्थाने वर्गहीन समाजाचे ध्येय म. गांधींना मान्य होते याबद्दल मतभेद होण्याचे काहीच कारण नाही. असे असता ते मान्य करण्यास गांधीवादाने नाखुषी का दर्शवावी हे समजत नाही. ...

... येथे [मश्रुवालांनी] गांधीजींना आंतरजातीय विवाह, आंतरजातीय सहभोजने व निरनिराळे धंदे करणाऱ्या किंवा एकाच धंद्यातील निरनिराळी कामे करणाऱ्या लोकांच्या उत्पन्नातील विषमता नष्ट करावी हे ध्येय मान्य होते असे म्हटले असूनही त्यांना वर्गहीन समाजाचे ध्येय मान्य नव्हते असे सूचित केले आहे. पण निरनिराळे धंदे करणाऱ्या लोकांची उत्पन्ने समान असावीत असे म्हटल्यानंतर वर्गहीन समाजाचे ध्येय ते दुसरे काय उरले? हा केवळ शब्दासंबंधीचाच वाद बनतो, असे मला वाटते. पण वर्गहीन समाजाचे कम्युनिस्टांचे ध्येय आपणास मान्य आहे असे उद्गारही म. गांधींनी काढलेले नाहीत असे नाही. 'The Mind of M. Gandhi' (*R. K. Prabhu* and *U. R. Rao*) या पुस्तकातील पुढील उताराच पहा :

"What does communism mean in the last analysis? It means a classless society-an ideal that is worth striving for. Only I part company with it when force is called to aid for achieving it."

येथे वर्गहीन समाजाचे कम्युनिस्टांचे ध्येय मान्य करून त्याच्या प्रस्थापनेसाठी हिंसेचा उपयोग करावा हे त्यांचे मत आपणास मान्य नाही एवढाच आपला मतभेद असल्याचे गांधीजी स्पष्टपणे सांगतात. वस्तुतः आर्थिक समता हाच अहिंसक समाजाचा पाया आहे– असे एकदा मान्य झाल्यानंतर वर्गहीन समाजाचे ध्येय अहिंसावाद्यांनी मान्य केलेच पाहिजे असा निष्कर्ष निघतो. तेव्हा याबाबतीत जो मतभेद आहे तो साध्यासंबंधीचा नसून साधनासंबंधीचाच आहे असे म्हणणे हेच संयुक्तिक दिसते.

## वर्णव्यवस्था आणि विश्वस्तवृत्ती

समाजरचनेसंबंधीं म. गांधींची अशी विशिष्ट म्हणून वर्णधर्म किंवा वर्णव्यवस्था आणि विश्वस्तवृत्ती अशी दोन तत्त्वे सांगण्यात आलेली आहेत. समाजामध्ये सुख आणि स्वास्थ्य नांदावयाची तर पुढील दोन तत्त्वांवर त्यांची उभारणी झाली पाहिजे, असे या पुस्तकातील ६८ व्या पृष्ठावर म्हटले आहे. ही दोन तत्त्वे अशी की, (१) समाजातील निरनिराळी कार्ये करीत असता व्यक्तींनी नफ्याच्या, सुखाच्या किंवा महत्त्वाकांक्षेच्या मागे लागून ती न करता कर्तव्यबुद्धीने करावीत आणि (२) समाजाने व्यक्तीला मालमत्ता, अधिकार, सत्ता, विद्वत्ता, ज्ञान, शारीरिक सामर्थ्य इत्यादी जे जे दिले असेल त्या सर्वांचे आपण केवळ निधिधारक आहोत असे मानून त्यांचा उपयोग करावा. समाजात जे परावलंबी, पंगु अथवा मुले असतील त्या सर्वांच्या संरक्षणाची जबाबदारी आपणावर आहे असे मानून प्रत्येक व्यक्तीने वागावे. वस्तुतः ही सामाजिक नीतीची तत्त्वे समाजवाद्यांना मान्य अशीच आहेत. भांडवलशाही समाज हा स्वार्थसाधनाच्या किंवा नफेबाजीच्या प्रेरणे (profit motive) वर उभारलेला असून समाजवादी समाज सेवावृत्ती (service motive) वर उभारला जावा असे सर्वच समाजवादी मानतात. तसेच समाजाने जी संपत्ती अथवा जी सत्ता आपल्या हाती दिली असेल तिचा उपभोग आपण केवळ स्वतःच्या हिताच्या दृष्टीने न घेता तो समाजातील सर्व व्यक्तींच्या हिताला पोषक होईल अशा वृत्तीनेच घ्यावा. या सामाजिक नीतीबद्दल समाजवादी व गांधीवादी यांच्यात काही मतभेद होईल असे आम्हाला वाटत नाही. पण समाजवाद्यांचे असे म्हणणे आहे की, जोपर्यंत आजच्या समाजात सामुदायिक धनोत्पादन चालू असून त्या उत्पादनाची साधने खाजगी मालकीची आहेत तोपर्यंत ही सामाजिक नीतीची तत्त्वे समाजाच्या आर्थिक घटनेत प्रकट झालेली नाहीत. जी सामाजिक नीती समाजाच्या आर्थिक व्यवहारात व आर्थिक घटनेत प्रकट झालेली नाही आणि समाजातील धनसंपादनाच्या मार्गासंबंधीचे व मालमत्तेसंबंधीचे कायदे ज्या तत्त्वांना अनुसरून बनविलेले नाहीत ती सामाजिक नीती व ती नैतिक तत्त्वे

समाजाच्या व्यवहारात प्रकट होत नाहीत. म्हणून वरील सामाजिक नीती व नैतिक तत्त्वे यांना अनुसरून आजच्या समाजातील धनार्जनाचे मार्ग नव्याने ठरवून दिले पाहिजेत आणि आजचे मालमत्तेसंबंधीचे कायदे त्या तत्त्वानुसार बदलून घेतले पाहिजेत. "जोपर्यंत समाजातील कायदेशीर गणलेल्या व्यवहारात अशा प्रकारची क्रांती घडवून आणण्यात आलेली नाही, तोपर्यंत समाजातील आर्थिक व्यवहार लोभवृत्तीने व स्वार्थबुद्धीनेच घडत राहतील, या व्यवहारात शिरलेली कायदेशीर चोरी नष्ट होणार नाही. हा दोष ज्यांना नष्ट करावयाचा असेल त्यांनी धनिक व्यक्तींचा द्वेष न करता धनिकशाही पद्धतीचा द्वेष करा आणि या धनिकशाही पद्धतीशी अनत्याचारी असहकार आचरून त्या पद्धतीत शांततेने क्रांती घडवून आणा" असा उपदेश करून या सामाजिक व आर्थिक क्रांतीचे नेतृत्व स्वीकारले पाहिजे. यासंबंधी अन्यायी व्यक्तींचा द्वेष न करता अन्यायाचा व अन्यायी संस्थेचा द्वेष करता येतो व केला पाहिजे असे शिक्षण महात्मा गांधी देत असत. ...

... आज भांडवलशाहीविरुद्ध आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे नेतृत्व गांधीवादी स्वीकारतील तर हिंदी जनतेच्या अंतःकरणात धनिकवर्गातील व्यक्तींविरुद्ध जी द्वेषभावना वाढीस लागली आहे ती नष्ट करून अहिंसक आर्थिक क्रांती घडवून आणता येईल. हिंदी समाजवाद्यांनी हे ओळखले आहे व म्हणूनच ते "गांधींच्या मार्गाने आपण वर्गहीन समाज निर्माण करू" अशी आशा बाळगीत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या या कार्यात सहकार्य करून त्यांना अहिंसेचे तत्त्व अधिक निष्ठेने आचरुन दाखविणे व त्यांची अनत्याचारी क्रांतीवरील निष्ठा अधिक रूढ बनविणे हेच गांधीवादी मुत्सद्यांचे आजचे कर्तव्य आहे. वर्गहीन समाज हे ध्येयच अमान्य करणे अथवा गांधीवाद व मार्क्सवाद यांच्यामधील तात्त्विक दृष्टिकोनातील मतभेदांवर जोर देऊन आर्थिक क्रांतीचे तात्कालिक कार्य विलंबावर टाकणे हे व्यावहारिक राजकारणात घोटाळे निर्माण करणारे आहे. ही आर्थिक क्रांती त्वरित घडवून आणण्याची निकड आज निर्माण झाली असून, ज्याप्रमाणे गांधीवादी व समाजवादी या दोघांनी एक होऊन साम्राज्यशाहीविरुद्ध लढा यशस्वी केला, त्याचप्रमाणे या दोघांनी पुन्हा एकत्र होऊन भांडवलशाहीविरुद्ध अनत्याचारी क्रांती त्वरित यशस्वी करून दाखविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे....

## सामाजिक नीती आणि कायदेशीर व्यवस्था

समाजवाद आणि गांधीवाद किंवा मार्क्स व गांधी या दोहोंतील फरक अथवा साम्य यांची चर्चा करताना सामाजिक नीतीचे अंतिम स्वरूप काय आहे अथवा असावे हा प्रश्न आणि समाजातील कायदेशीर व्यवस्था कशी असावी हा प्रश्न हे दोन प्रश्न अलग करून विचार केला पाहिजे. सामाजिक नीतीचे जे अंतिम स्वरूप ते सर्व कायद्याने प्रस्थापित करता येत नाही. अंतिम नीतीदृष्टीने जे व्यवहार निंद्य किंवा गर्हणीय समजले जातात ते

सर्व व्यवहार बेकायदेशीर ठरविता येत नाहीत, इतकेच नाही तर ते सर्व समाजाच्या भौतिक व नैतिक ऱ्हासास कारण होण्याचा धोका असतो. उदा. गांधीवादाच्या मताप्रमाणे संग्रह आणि चोरी ही दोन्हीही नैतिकदृष्ट्या पापे आहेत. असे असले तरी, चोरी हा कायदेशीर गुन्हा ठरविल्यावाचून समाजात स्वास्थ्य व शांतता नांदत नाहीत. म्हणून चोरी हे असे पाप आहे की ते कायद्याने बंद केले पाहिजे. पण संग्रह हे सुद्धा पाप असले तरी ते सर्वस्वी कायद्याने बंद करणे शक्य व इष्टही नाही. विशिष्ट प्रमाणात कष्टार्जित संग्रह कायदेशीर ठरविला नाही तर धनोत्पादनास लागणारे श्रम करण्यास लोक तयार होत नाहीत हे जाणून, उत्पादक श्रमाला प्रोत्साहन देणारा संग्रह व उत्पादक श्रमांना प्रोत्साहन न देता समाजातील आळस आणि चैन यांना प्रोत्साहन देणारा संग्रह असा भेद करून पहिला कायदेशीर व दुसरा बेकायदेशीर ठरविण्याचा प्रयत्न करणे हे समाजाच्या भौतिक व नैतिक उन्नतीस कारण होत असते. म्हणून पहिल्या प्रकारचा संग्रह कायदेशीर केल्यावाचून समाज चालणार नाही. त्याचप्रमाणे दुसऱ्या प्रकारच्या संग्रहास कायद्याने मर्यादा घातली नाही तरीही समाजाचा नैतिक व भौतिक ऱ्हास झाल्यावाचून राहत नाही. आज अशा प्रकारचा संग्रह फार मोठ्या प्रमाणावर करणे शक्य झाले असून त्याला कायदेशीर मर्यादा घातली नसल्यामुळे सामाजिक नीती आणि धनोत्पादनाचे कार्य यात विकृती निर्माण झाली आहे. शिवाय उत्पादन-कार्यात जो स्वामी–सेवक संबंध कायदेशीर बनला आहे त्यातून कष्ट करणाऱ्यांच्या श्रमाचे फळ बिनकष्ट करणाऱ्या मालकवर्गाला मिळवून देण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झालेला आहे. ही एक प्रकारची कायदेशीर चोरी असून ती चोरी बंद केल्यावाचून समाजात शांतता व स्नेहभाव नांदणार नाहीत. म्हणून ही कायदेशीर चोरी कायद्याने बंद केली पाहिजे, असा समाजवाद्यांचा आग्रह आहे. याबाबतीत मार्क्सवादी व इतर समाजवादी यांचा मतभेद नाही. यासंबंधी गांधीवाद्यांचे मत निःसंदिग्ध व स्पष्टपणे निदान मला तरी समजलेले नाही. ते एकदा सर्वच संग्रह पाप आहे हे टोक गाठतात आणि दुसऱ्या वेळी चोराला सुद्धा शिक्षा करणे हे पाप आहे असे दुसरे टोक गाठतात. केवळ अंतिम नीतिमत्ता किंवा अध्यात्मशास्त्र या दृष्टीने त्यांचे हे मत मला समजू शकते. पण समाजाची कायदेशीर व्यवस्था कशी असावी या प्रश्नाचा निर्णय करू लागले असता मला या मतापासून काहीच बोध होत नाही. तसेच उत्पादनाचे कार्य सामुदायिक स्वरूपात सुरू झाल्यामुळे धनसंपादनाचे पूर्वीचेच मार्ग आजही कायदेशीर ठरलेले असल्यामुळे कायदेशीर चोरीचा प्रकार फार मोठ्या प्रमाणावर रूढ झालेला आहे, तो प्रथम बंद केलाच पाहिजे, ही गोष्ट गांधीवाद्यांनी मार्क्सवाद व समाजवाद यांच्यापासून योग्य प्रकारे समजून घेतलेली नाही असे मला वाटते. स्वतः म. गांधीसुद्धा याबाबतीत निश्चित बोलत नसत. त्यांनी समाजवाद किंवा मार्क्सवाद हा एक असंग्रहाचे तत्त्व समाजाला लागू करण्याचा प्रयत्न आहे असे म्हटले आहे. पण समाजवादाच्या मताचे हे यथार्थ स्वरूप नव्हे. चोरी आणि संग्रह ही दोन्हीही पापे आहेत एवढे म्हटल्याने समाजाच्या कायदेशीर व्यवस्थेचा प्रश्न सुटू शकणार नाही.

याबाबतीत समाजवादाचे मत सांगावयाचे तर ते पुढीलप्रमाणे सांगता येईल : आजच्या कायदेशीर व्यवहारात जेथे चोरीचे तत्त्व शिरले आहे तेथे त्याचा पूर्ण प्रतिबंध कायद्याने केला पाहिजे. उत्पादक श्रम करण्यास प्रोत्साहन मिळेल इतक्या प्रमाणात संग्रह करण्याचे स्वातंत्र्य कायदेशीर रीतीने मान्य केले पाहिजे. अशा संग्रहाला विशिष्ट प्रमाणाबाहेर कायदेशीर मर्यादा घालून त्यावरील संग्रह बेकायदा ठरविला पाहिजे. सर्वच संग्रह पाप आहे या तत्त्वावर आजच्या समाजाची धारणा होऊ शकत नाही. व्यवहारदृष्टीने जो संग्रह उत्पादनकार्यास प्रोत्साहक असल्याचे दिसून येईल, तो कायदेशीर ठरवून त्यामुळे समाजात जी थोडी फार विषमता निर्माण होणे आज अपरिहार्य आहे तिला समाजाने मान्यता दिली पाहिजे. समाजातील व्यक्तींच्या उत्पन्नाचे व मालमत्तेचे किमान व कमाल प्रमाण कायद्याने ठरवून द्यावे असा समाजवाद्यांचा आग्रह आहे. या त्यांच्या मताला "समाजाला असंग्रहाचे तत्त्व लागू करण्याचा प्रयत्न" असे म्हणता येणार नाही. हा प्रयत्न अस्तेयाचे तत्त्व लागू करण्याचा आहे. जोपर्यंत हे अस्तेयाचे तत्त्व आजच्या समाजाला लागू करण्यात येत नाही तोपर्यंत समाजात शांतता व स्नेह नांदणार नाहीत एवढेच त्यांचे मत आहे. यावर "केवळ चोरीचा नव्हे" तर सर्वच प्रकारचा संग्रह हे आम्ही पाप समजतो आणि कष्टार्जित संग्रहाचासुद्धा गरजेपेक्षा अधिक उपभोग घेणे हेही आम्ही पाप समजतो, अशी अंतिम नीतितत्त्वे सांगून गांधीवादाचे श्रेष्ठत्व सिद्ध करता येणार नाही. कारण अंतिम नीतिमत्तेसंबंधी कोणाची काय मते आहेत हा मुद्दा येथे लागू नसून आज समाजाची कायदेशीर व्यवस्था कशी असावी यासंबंधीचा प्रश्न उपस्थित झाला आहे. तेव्हा या प्रश्नासंबंधी कोणाचे काय मत आहे ते विचारात घेऊन त्याचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरवावे लागेल. या मुद्यावद्दल गांधीवाद्यांनी आपली भूमिका निःसंदिग्ध व स्पष्ट केलेली नाही. जर ते ती तशी करतील, तर समाजवादी व गांधीवादी यांच्या मतात निकटवर्ती कार्य व निकटवर्ती ध्येय यासंबंधी एकवाक्यता होईल. निदान व्यवहारदृष्टीने तरी त्यांचे सहकार्य होऊ शकेल व ते होणे इष्ट आहे असे मी मानतो. याला माझा पुरावा म्हणून मी एवढेच सांगू शकेन की, रामगड काँग्रेसच्या वेळी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे निकटवर्ती राजकीय व आर्थिक घटनेचे ध्येय म्हणून जी योजना श्री. जयप्रकाश नारायण यांनी महात्मा गांधींच्या जवळ दिली होती, तिला केवळ बड्या संस्थानांसंबंधीचे एक कलम वगळून, महात्मा गांधींनी आपला जाहीर पाठिंबा दिला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे निकटवर्ती ध्येय या दृष्टीने त्यांनी त्या योजनेस दिलेली ही मान्यता लक्षात घेतल्यास, समाजाच्या कायदेशीर व घटनात्मक व्यवस्थेबद्दल समाजवाद्यांचे विचार महात्मा गांधी किती आत्मसात करीत असत ते दिसून येईल. गांधीजींच्या मृत्यूनंतर इतरांच्या मतातील सत्यांश आत्मसात करण्याची वृत्ती मावळून अंतिम नीती आणि अध्यात्मशास्त्र यासंबंधीच्या मतभेदावर जोर देण्याची वृत्ती गांधीवाद्यांत बळावली आहे. अर्थात राष्ट्रात राज्यघटना आणि कायदेशीर आर्थिक व्यवस्था करण्याचे जे महत्त्वाचे कार्य आज सुरू झाले आहे त्या कार्यावर आपल्या या अंतिम

ध्येयात्मक विचारांचा कोणताही प्रभाव गांधीवादी पाडू शकत नाहीत. आपल्या अंतिम ध्येयांना अनुसरून आजच्या राज्यघटनेच्या व मालमत्तेच्या कायद्यात आपण कोणत्या सुधारणा करू इच्छितो त्याचे तपशीलवार विवेचन करण्यास गांधीवाद्यांनी पुढे आले पाहिजे. या दृष्टीने प्रस्तुत पुस्तक अगदी निराशाजनक आहे. जगातील सर्व वस्तुजातीचा स्वामी केवळ ईश्वर आहे आणि सर्व प्राणिमात्रांचे हित होईल अशा प्रकारची वृत्ती धारण करून सर्व मानवांनी आपापले सर्व व्यवहार केले पाहिजेत. एवढी तत्त्वे सांगून आजच्या समाजापुढील कोणताही व्यावहारिक प्रश्न सुटू शकत नाही. ही वृत्ती सर्वसामान्य मानवाच्या अंत:करणात रूजून ती फोफावत जाण्यास कोणत्या प्रकारची राजकीय, आर्थिक व सामाजिक घटना असली पाहिजे यासंबंधीचे आपले विचार गांधीवादी मांडू लागतील तर लोकशाही समाजवाद हे निकटवर्ती साध्य आणि सत्याग्रह हे त्याचे साधन याच विचारावर ते येतील असे आम्हास वाटते. आजच्या जगाचे सांस्कृतिक प्रश्न सोडविण्याचे काम असो किंवा आपल्या राष्ट्राची राजकीय व आर्थिक घटना खंबीर बनवून त्याला अमेरिका व रशिया यांच्यापासून निर्माण होणाऱ्या धोक्यातून बचावण्याचे कार्य असो, गांधीवाद्यांनी आपले संघटित बळ लोकशाही समाजवादाच्या संस्थापनेमागे उभे केले पाहिजे.

[*'नवभारत', एप्रिल १९५१, पृ. २९ ते ३४*]

## [गांधी आणि मार्क्स : समन्वय]

... मार्क्सवाद हा एक विकास न पावणारा जडस्वरूपी अंतिम सिद्धांत नसून तो एक विशिष्ट क्रांतिकारक दृष्टिकोन आहे व त्या दृष्टिकोनास अनुसरून मार्क्सने मांडलेल्या सिद्धांतात भर घातली तरीही त्याला मार्क्सवाद म्हणण्यास हरकत नाही, असे मानणारे अनेक लोक आहेत. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे मार्क्सच्या विशिष्ट दृष्टिकोनाचा महात्मा गांधींच्या दृष्टिकोनाशी समन्वय साधणे अथवा गांधीवादी दृष्टिकोनापासून प्राप्त होणाऱ्या नव्या दृष्टीने मार्क्सवादात भर घालणे हेही शक्य आहे अथवा मार्क्स व गांधी या दोघांच्या दर्शनांचा समन्वय होणे शक्य व इष्ट आहे असे कोणी म्हटल्यास ते वदतोव्याघाताचे उदाहरण आहे असे मानण्याचे मला काही कारण वाटत नाही. किंबहुना मार्क्सदर्शन व गांधीदर्शन यांचा समन्वय व्हावा व तो भारतात होऊ शकेल असे माझे स्वतःचे मत आहे. ...

महात्मा गांधींचा दृष्टिकोन हा मूलतः आध्यात्मिक व नैतिक असून मार्क्सचा दृष्टिकोन भौतिक व समाजशास्त्रीय आहे असे स्थूलमानाने म्हणता येते. हे खरे असले तरी मार्क्सवादी जशी अध्यात्माची हेटाळणी करून त्याची अवहेलना करतात, तशी समाजशास्त्राची हेटाळणी किंवा भौतिक विद्येची अवहेलना गांधीवादी करीत नाहीत व त्यांना तसे करताही येणार नाही. कारण गांधीवाद हा मूलतः आध्यात्मिक असला तरी त्याला सामाजिक क्रांती अभिप्रेत आहे आणि म्हणून त्याला आध्यात्मिक अधिष्ठानावर समाजाच्या भौतिक जीवनाची इमारत उठवावयाची आहे. ...

"आपणास अध्यात्मशास्त्राची गरजच नाही किंवा ते शास्त्र हे एक थोतांड आहे" असे जसे मार्क्सवादी म्हणू शकतात, तसे "समाजशास्त्र हे एक थोतांड आहे किंवा त्याची आम्हास मुळीच गरज नाही" अशी भूमिका गांधीवादी घेऊ शकत नाहीत. त्यांना अध्यात्मशास्त्राची दृष्टी आणि समाजशास्त्राची दृष्टी यांचा समन्वयच करावा लागतो.

अध्यात्मशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्या दृष्टिकोनातील फरक व त्यामुळे नीतिशास्त्रातील नियमात करावा लागणारा भेद यांचे एक उत्कृष्ट उदाहरण आचार्य विनोबा यांच्या 'स्थितप्रज्ञदर्शन' या ग्रंथात आलेले आहे. ..... या ठिकाणी ज्याचे कर्म त्याचे फळ ही दृष्टी समाजशास्त्राची व नीतिशास्त्राची आणि "कर्म न सोडता फलत्याग कर" ही दृष्टी आध्यात्मिक कर्मयोगाची असे सांगून विनोबाजींनी समाजशास्त्र व अध्यात्मशास्त्र यांच्यातील सिद्धान्ताचा समन्वय करून दाखविला आहे. समाजशास्त्र व नीतिशास्त्र यांच्या दृष्टीने विचार केला तरीही गीतेतील निष्काम कर्मयोगाच्या दृष्टीचा अवलंब केल्यावाचून ती शास्त्रे पुरी होणार नाहीत, असे मला वाटते. म्हणून समाजशास्त्र व नीतिशास्त्र यांनाही वास्तववादी व आदर्शवादी अशा दोन्हीही दृष्टींचा अवलंब करून प्रतिपादन करावे लागेल. तसेच अध्यात्मशास्त्रालाही या दोन दृष्टींचा समन्वय करावा लागेल असे मी मानतो. तथापि, समाजशास्त्राची इतर सामाजिक शास्त्रांची दृष्टी मुख्यतः वास्तववादी असून अध्यात्मशास्त्राची दृष्टी मुख्यतः आदर्शनिष्ठ असते, हे मला मान्य आहे. यामुळे समाजशास्त्राच्या दृष्टीत व अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीत वस्तुनिष्ठ व आदर्शनिष्ठ असा दृष्टीभेद होणे स्वाभाविक आहे. नीतिशास्त्राला वास्तववादी व आदर्शवादी या दोन्हीही दृष्टींचा समन्वय नित्य ठेवावा लागतो.

## मार्क्सवादातील उणीव

मार्क्सवादात नीतिशास्त्राचा केवळ वास्तववादी दृष्टीने विचार केलेला आहे. त्याच्या नीतिशास्त्रात अध्यात्म तर नाहीच पण आदर्शवादी नैतिक दृष्टीलाही त्यांनी स्थान ठेवलेले नाही. सर्वसामान्य मनुष्य कसा वागतो व तो कसा वागू शकेल एवढीच दृष्टी ते नीतिशास्त्रात स्वीकारतात. पण आदर्श पुरुषाच्या नीतीचे स्वरूपविवेचन करण्याचे महत्त्व त्यांना वाटत नाही. म्हणून सामाजिक नीतिनियमांची सापेक्षता ते दाखवून देतात व त्या सापेक्षतेचे कारणही ते उलगडून दाखवितात. परंतु सर्व सापेक्ष नीतिमत्तेच्या बुडाशी काही निरपेक्ष अशी शाश्वत मूल्ये आहेत ते त्यांना पटत नाही. त्यामुळे त्यांचे नीतिशास्त्र हे सापेक्षतेच्या कक्षेबाहेर पडू शकत नाही. याउलट केवळ अध्यात्मदृष्टीने नीतिशास्त्राचा विचार करणारांना आदर्श नैतिक तत्त्वेच तेवढी महत्त्वाची वाटतात आणि एकंदर समाजाच्या विकासाबरोबर त्यांचे रूढ नीतिशास्त्र कसे विकास पावत जाते ते समजत नाही. सामाजिक नीतिशास्त्राचा विचार करताना वास्तववादी व सापेक्ष दृष्टी स्वीकारावी लागते हे त्यांच्या लक्षात येत नाही. म. गांधींनी अध्यात्मशास्त्रात, नीतिशास्त्रात

व समाजशास्त्रात सर्वत्र सापेक्ष व निरपेक्ष, वास्तववादी व आदर्शवादी या दोनही दृष्टींचा समन्वय साधून जीवनतत्त्वज्ञानाचे विवेचन केलेले आहे. यामुळे आध्यात्मिक आदर्शवाद आणि भौतिक वास्तववाद या दोन्हीही दृष्टींचा अवलंब त्यांनी केला असल्याचे आढळून येते. मात्र या दोन्हीही दृष्टींचा समन्वय साधून समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र यांच्यातील सिद्धांताची फेरमांडणी करण्याचे काम त्यांनी केलेले नाही. त्यांनी फक्त मानवी जीवनदर्शनाचा एक नवा दृष्टिकोन आपणास दिलेला आहे. या दृष्टिकोनाच्या आधारे एक नवी संस्कृती निर्माण होईल व त्या संस्कृतीत नवी सामाजिक शास्त्रे अस्तित्वात येतील एवढेच आज गांधीवाद्यांना म्हणता येईल.

पण याबाबतीत मार्क्सवाद्यांची सुद्धा त्यांच्यासारखीच स्थिती आहे हे फारसे कोणाच्या लक्षात येत नाही. मार्क्सवादाने समाजशास्त्राला व इतर सामाजिक शास्त्रांना एक नवा दृष्टिकोन दिलेला आहे आणि आजच्या भांडवलदारी संस्कृतीचा विनाश होऊन नवी समाजवादी संस्कृती अस्तित्वात येईल एवढे दाखवून दिलेले आहे. या नव्या संस्कृतीत नवी सामाजिक शास्त्रे अस्तित्वात येतील असे त्याने म्हटले असले तरी या नव्या सामाजिक शास्त्रांचे विवेचन त्याने केलेले नाही. किंबहुना ती नवी सामाजिक संस्कृती अस्तित्वात येण्यापूर्वी तिच्यातील सामाजिक शास्त्रांचे विवेचन करण्याची अपेक्षा करणे हेच अशास्त्रीय बुद्धीचे लक्षण आहे असे मार्क्स समजतो. हाच न्याय गांधीवादालाही आजच्या स्थितीत लागू पडतो. म्हणून "गांधीवादाचे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र अशी सामाजिक शास्त्रे विवेचन करून सांगा" असे म्हणण्याचा काळ अद्यापि प्राप्तच झालेला नाही. मार्क्सवाद व गांधीवाद या दोघांची याबाबतीत सारखीच स्थिती असली, तरी मार्क्स-वादाची शास्त्रीय दृष्टी अध्यात्मशास्त्र आणि आदर्शनिष्ठा यांना विरोधक आहे आणि गांधीवादाची शास्त्रीय दृष्टी आध्यात्मिक आदर्शवाद (Spiritual Idealism) आणि भौतिक वास्तववाद (Material Realism) यांचा समन्वय साधणारी आहे, एवढे आज निश्चित म्हणता येईल. यापैकी कोणाची शास्त्रीय दृष्टी अधिक सूक्ष्म व शुद्ध आहे आणि कोणती दृष्टी खऱ्या अर्थाने "शास्त्रीय" म्हणता येईल यावर मार्क्सवाद व गांधी-वाद यांचे भवितव्य व श्रेष्ठ-कनिष्ठ ठरणार आहे.

आता गांधीवादातील सामाजिक शास्त्रातील विशेष म्हणून जे तीन सिद्धांत सांगितले जातात त्यांचा विचार करू. हे तीन सिद्धांत म्हणजे (१) विश्वस्तवृत्ती, (२) विकेंद्रीकरण व (३) वर्णव्यवस्था हे होय.

## "विश्वस्त" सिद्धान्ताची मर्यादा

श्रीमंत लोक हे समाजाच्या संपत्ती निधिधारक किंवा विश्वस्त (Trustee) आहेत, असा गांधीवादाचा सिद्धांत आहे. आपल्या योग्य गरजेपेक्षा जी अधिक संपत्ती समाजव्यवस्थेप्रमाणे

आपणापाशी आली असेल ती आपल्या मालकीची न समजता तिचा मालक समाज आहे असे मानून श्रीमंतांनी या संपत्तीचा विनियोग सर्वहितबुद्धीने करीत जावा, अशी ही दृष्टी आहे. या सिद्धान्ताचा उगम 'ईशावास्योपनिषदा' तील पहिल्या श्लोकात आहे असे म. गांधी मानतात. ...

... त्या श्लोकाचा अर्थ गांधीवादात असा करण्यात येतो की, "जगातील सर्व वस्तुजातीचा मालक ईश्वर आहे. सर्व वस्तू त्याला अर्पण करून (त्याच्या मालकीच्या आहेत असे समजून) संपत्तीचा उपभोग घ्या. कोणाच्याही (स्वतःच्या सुद्धा) धनाचा लोभ धरू नका." अध्यात्म-दृष्टीने पूर्ण निष्कामत्व प्राप्त करून घेणाऱ्या मुमुक्षूने कोणत्या वृत्तीने वागावे याचा विचार करीत असता एवढे विवेचन पुरेसे आहे. पण समाजरचना, समाजाची आर्थिक घटना आणि तिच्यातील आज अवश्य असलेली आर्थिक क्रांती यांचा विचार करताना, एवढे विवेचन पुरे पडणे शक्य नाही. या प्रश्नांची उत्तरे द्यावयाची तर खासगी मालमत्तेसंबंधीचा व धनार्जनाचा कायदा आज कसा आहे व तो आज किती प्रमाणात बदलून घेणे शक्य आहे व इष्ट आहे यासंबंधीचे विवेचन वास्तववादी दृष्टी स्वीकारून केले पाहिजे. तसे केले म्हणजे आजच्या सामाजिक अवस्थेत कोणते प्रश्न विश्वस्तवृत्तीच्या सिद्धांताने सुटू शकतील आणि कोणते प्रश्न सोडविण्यासाठी मालमत्तेच्या कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे याची फोड होऊन आज अवश्य असणाऱ्या सामाजिक व आर्थिक क्रांतीने मूर्त स्वरूप आपल्या डोळ्यांपुढे उभे राहील.

आपणाजवळ असलेल्या अथवा आपणास मिळालेल्या संपत्तीचे आपण मालक नसून निधिधारक आहोत हा सिद्धांत सर्वत्र लागू करता येत नाही व तेवढ्याने सर्व सामाजिक प्रश्न सुटू शकत नाही हे वास्तववादी दृष्टीने मान्य केलेच पाहिजे उदा. चोराने बेकायदेशीर मार्गाने जी संपत्ती मिळविली असेल तिचा "मी 'निधिधारक' म्हणून विनियोग करतो" असे जर एखादा चोर म्हणू लागला, तर तेथे विश्वस्तवृत्तीचा सिद्धांत लागू करून त्याच्यावर विश्वासून समाजाने वागावे असे वास्तववादी दृष्टीने कोणीही म्हणू शकत नाही. ज्याअर्थी त्याने हीन अथवा अशुद्ध मार्गाने धनसंपादन केले आहे त्याअर्थी त्या धनाचा सर्वहित-बुद्धीने विनियोग करण्याइतका शुद्ध तो राहिलेला नाही, असेच वास्तववादी दृष्टीने म्हणणे भाग आहे. अशुद्ध साधने वापरून व्यवहार करणारा मनुष्य शुद्ध राहू शकत नाही हे गांधीवादी तत्त्व येथे लागू केल्यास चोराने आपल्याजवळची संपत्ती प्रथम समाजाच्या ताब्यात दिली पाहिजे व तसे करण्यास तो तयार नसेल, तर समाजाला कायदेशीर मार्गाने त्याच्यापासून ती काढून घेण्याचा हक्क असला पाहिजे असेच कोणीही वास्तववादी मनुष्य म्हणेल. समाजाला असा कायदेशीर हक्क असावा हे वास्तववादी दृष्टीने मान्य करून गांधीवादी याच्यापुढे जाऊन असे म्हणू शकतात की, "त्या चोराची सुद्धा धारणपोषणाची

व्यवस्था समाजाने केली पाहिजे आणि सत्याग्रही निष्ठेच्या लोकांनी त्या चोरालाही शिक्षा न करता त्याचे हृदयपरिवर्तन करण्याचे मार्ग शोधून काढिले पाहिजेत."

हाच न्याय आजच्या समाजात कायदेशीर असलेल्या व्यवहारांनी संपन्न बनणाऱ्या व्यक्तींना लागू करावयाचा झाल्यास तो कसा करता येईल ते पाहू. ज्या व्यक्ती आज कायदेशीर मार्गांने लक्षाधीश अथवा कोट्याधीश बनतात त्यांनी त्या संपत्तीचे निधिधारक विश्वस्त अथवा "ट्रस्टी" बनावे आणि समाजहिताच्या कामी त्याचा विनियोग करावा अशी अपेक्षा करताना, ज्या मार्गांनी त्यांनी संपत्ती संपादन केली ते मार्ग त्यांचे चारित्र्य भ्रष्ट बनविणारे नसतील असे गृहीत धरावे लागते. पण वस्तुस्थिती अशी आहे काय? आजच्या समाजात संपन्न बनविण्याचे जे मार्ग कायदेशीर गणलेले आहेत त्या मार्गांचा अवलंब करीत असता मनुष्य स्वार्थी, लोभी, निष्ठुर, न्याय-अन्यायाबद्दल बेफिकीर, आर्थिक व्यवहारातील चढाओढ आणि ओढाताण यांतून मिळणारा नफा ही आपली कष्टाची न्याय्य कमाई आहे असे मानणारा बनतो. ज्या समाजपद्धतीमुळे व ज्या कायदेशीर व्यवहारांमुळे आपण संपन्न बनलो ती समाजपद्धती आणि ते कायदेशीर व्यवहार नैसर्गिक व न्यायाचे आहेत असा भ्रम त्यांना होतो. निदान या समाजपद्धतीतून व रूढ कायदेशीर व्यवहारातून अधिक न्यायी समाजपद्धती किंवा अधिक न्यायी कायदे करणे व्यवहार्य होऊ शकेल असे तरी त्यांना वाटत नाही. धनसंपादन करण्याच्या कार्यात ज्यांची ही वृत्ती वाढत गेली, ते त्यांच्यापाशी जमलेल्या संपत्तीचे निधिधारक बनण्यास लायक होतील आणि समाजहिताच्या दृष्टीने ते आपल्या ताब्यातील संपत्तीचा विनियोग करू शकतील अशी अपेक्षा करणे हे साध्य-साधनासंबंधीच्या गांधीवादी विचाराशी विसंगत वाटते. ज्या समाजात कष्ट आणि धनसंपादन याच्या प्रमाणात कोणताही भेद न्यायबुद्धीला घालता आला नाही आणि ज्या समाजात अकष्टार्जित धनसंपादनाचे अनेक कायदेशीर मार्ग आहेत अशा समाजात संपन्न बनणाऱ्या व्यक्ती आपल्या संपत्तीचा विनियोग निःस्वार्थ बुद्धीने समाजहितासाठी करण्यास आणि समाजाच्या संपत्तीचे निधिधारक बनण्यास लायक बनतात असे मानणे, हे अशुद्ध साधनांनी आपले साध्य संपादन करणारा मनुष्य शुद्ध राहू शकेल असा विश्वास धरण्यासारखेच नाही काय? पण ही दृष्टी गांधीवादातील साधनशुद्धीच्या सिद्धांताशी विसंगत आहे म्हणून आजच्या समाजातील धनसंपादनाचे मार्ग शक्य तितके बेकायदा ठरवून उत्पादक श्रम आणि तद्जन्य धनसंग्रह यांचे बऱ्याच अंशी समप्रमाणात राहील अशी व्यवस्था केल्यावाचून "विश्वस्त" वृत्तीचा किंवा निधिधारकत्वाचा सिद्धांत समाजास लागू करण्यास अनुकूल अशी पार्श्वभूमीच निर्माण होऊ शकत नाही. याचा अर्थ आपणास कायदेशीर मार्गाने प्राप्त झालेले धन स्वतःच्या मालकीचे न मानता समाजाच्या मालकीचे मानावे असा उपदेश करण्याची आज गरज नाही, असा होत नाही. वरील विवेचनाचा अर्थ इतकाच आहे की, हा उपदेश

करण्यानेच केवळ समाजात न्यायाची प्रस्थापना होईल अशी अपेक्षा करता कामा नये. हा उपदेश करीत असतानाच समाजात रूढ असलेले मालकी हक्कांचे व धनसंपादनाचे कायदे बदलून घेण्याची चळवळही न्यायसंस्थापना करू इच्छिणाऱ्यांनी सुरू ठेवली पाहिजे. तसेच न्यायसंस्थापनेच्या या कार्यास जे वर्ग अथवा जी सरकारे अडथळा करतील त्या वर्गांविरुद्ध व त्या सरकाराविरुद्ध अनत्याचारी असहकार व सत्याग्रह करण्यास न्यायसंस्थापना करू इच्छिणाऱ्यांनी पुढे आले पाहिजे. असे ते करतील तरच गांधीवाद हे मार्क्सवादाप्रमाणे सामाजिक क्रांतिदर्शन आहे हे मत यथार्थ ठरेल. हे मत यथार्थ असेल तरच क्रॉमवेल, रुसो, मार्क्स किंवा लेनिन यांच्यासारख्या क्रांतिकारकांच्या कोटीत म. गांधींना बसविता येऊन त्यांच्याशी त्यांची तुलना करता येईल. नाहीतर मार्क्सवादाहून गांधीवादाचे श्रेष्ठत्व दाखवून देणे किंवा गांधीवाद मार्क्सवादाशी मुकाबला करण्यास समर्थ होईल अशी अपेक्षा धरणे संयुक्तिक ठरणार नाही. गांधी हे स्वतःला क्रांतिकारक समजत असत आणि फ्रेंच व रशियन क्रांतीहून श्रेष्ठ अशी क्रांती करण्याचा मी मार्ग दाखवून देत आहे, असे म्हणत असत. हे त्यांचे कार्य सफल केल्यावाचून भारतीय संस्कृतीला आजच्या मानवसंस्कृतीचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य येईल ही आशाही फोल ठरणार आहे.

## सामाजिक क्रांती आणि विकेंद्रीकरण

विश्वस्त वृत्ताच्या सिद्धांताला स्वाभाविक मर्यादा आहेत आणि समाजरचनेला आधारभूत असणारा मालमत्तेचा कायदा व धनसंपादनाचे कायदेशीर मार्ग हे जेव्हा न्यायाधिष्ठित असतील तेव्हाच समाजात विश्वस्तवृत्ती वाढू शकते, हे म. गांधींना माहित होते. म्हणूनच त्यांनी केवळ विश्वस्तवृत्तीच्या सिद्धांताचा उपदेश करून न थांबता राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही राज्य आणि सामाजिक स्वामित्वाचे समाजवादी तत्त्व यांच्या प्रस्थापनेसाठी क्रांतिकारक प्रयत्न करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व आचरून दाखविली. राज्यसंस्थेचे राजकीय प्रभुत्व प्रजेकडे असले पाहिजे आणि समाजातील सर्व संपत्तीचे स्वामित्व अंतिम दृष्टीने समाजाचे ( किंवा परमेश्वराचे ) असले पाहिजे हे दोन विचार लोकशाहीच्या व समाजवादाच्या बुडाशी आहेत. ते आधुनिक काळात युरोपखंडात पुढे आले असले, तरी आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचे ते निष्कर्षच आहेत. म्हणून ते आपण आत्मसात् केले पाहिजेत आणि त्यामध्ये विकेंद्रीकरणाच्या सिद्धान्ताची भर घातली पाहिजे असे म. गांधी मानीत होते. सत्ता व संपत्ती यांचे विकेंद्रीकरण झाले नाही तर लोकशाही व समाजवाद हे दोन्हीही विकृत बनतात आणि समाजातील विश्वस्तवृत्तीच्या वाढीसही अनुकूल परिस्थिती राहत नाही. म्हणून सत्तेच्या व संपत्तीच्या केंद्रीकरणास त्यांचा विरोध होता आणि कम्युनिस्ट तत्त्वज्ञानामध्ये क्रांतिकालात अनियंत्रित कामगारशाही अटळ मानली जाते आणि तिच्यामुळे सत्ता आणि संपत्ती या दोन्हीही शक्ती निदान काही काळ तरी एकाच राज्यसंस्थेच्या हाती एकवटतात हाच त्यांचा कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर व विशेषतः

त्यातील क्रांतिशास्त्रावर मूलभूत आक्षेप होता. म्हणून राज्यसत्ता आणि आर्थिक सत्ता यांचे एकीकरण होऊ नये असाही त्यांच्या विकेंद्रीकरणाच्या सिद्धान्ताचा एक अर्थ होता. धनोत्पादनसंस्था राज्यसंस्थेहून अलग असावी आणि अशा अलग धनोत्पादनसंस्थेतही विकेंद्रीकरण झालेले असावे हा त्यांचा आग्रह होता. विकेंद्रीकरणावाचून लोकशाही आणि समाजवाद या दोन्हींचीही पूर्तता होऊ शकत नाही हे तत्त्व समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या तिन्हीही शास्त्रांना मान्य करणे भाग आहे. ह्या विकेंद्रीकरणाचा विचार युरोपखंडात बाकुनिन, क्रोपोटकिन आणि टॉलस्टॉय या अराज्यवादी क्रांतिकारकांच्या लेखनात सविस्तर मांडलेला असून महात्मा गांधींच्या विचारांवर टॉलस्टॉयच्या अराज्यवादी विचारसरणीचा केवढा मोठा प्रभाव पडलेला होता हे ज्यांना माहित आहे त्यांना अंतिम दृष्टीने म. गांधी हे अराज्यवादीच होते हेही पटू शकते. अशा रीतीने अराज्यवादाला आधारभूत असलेला विकेंद्रीकरणाचा सिद्धांत गांधीवादात आलेला असून ख्रिस्ताने उपदेशिलेले परमेश्वरी राज्य अथवा गांधींचे रामराज्य यांचाही या विकेंद्रीकरणाच्या अराज्यवादी तत्त्वाशी जिव्हाळ्याचा संबंध आहे.

## अराज्यवाद व मार्क्सवाद

पण गांधीवादाप्रमाणे मार्क्सवाद हाही अंतिम दृष्टीने अराज्यवादीच असून त्यालाही वर्गहीन समाजात राज्यसंस्था व राजदंड यांचा लोप झाला पाहिजे हे तत्त्व मान्य आहे. फार तर असे म्हणता येईल की, दंडहीन समाजाची कल्पना व वर्गहीन समाजाचे ध्येय या दोहोंचाही मूळ उगम ख्रिस्ताच्या शिकवणीत असून त्या दोहोंचाही प्रभाव मार्क्सवादावर व गांधीवादावर पडलेला आहे. यामुळे दंडहीन समाजाचे ध्येय आणि ते प्राप्त करण्यासाठी अनियंत्रित कामगारशाहीच्या मार्गाचा अवलंब या दोहोंच्या पुरस्कारामुळे मार्क्सवादात एक प्रकारचा आंतरविरोध निर्माण झाला आहे. हा आंतरविरोध दूर करण्याचा एक प्रयत्न लेनिनने आपल्या राज्यसंस्थेच्या मीमांसेत केलेला आहे. तो असा की, क्रांतिकाळात स्थापन होणारी अनियंत्रित कामगारशाही भांडवलदारांचे मालकी हक्क हिरावून घेऊन वर्गहीन समाज स्थापन करील व हा समाज अनेक वर्षे रूढ होऊन त्याची सामाजिक नीती मानवसमाजाच्या अंगात मुरून गेली म्हणजे राज्यसंस्था निरुपयोगी ठरून सर्पाच्या कातेप्रमाणे आपोआप गळून पडेल.

पण एकदा आर्थिक क्रांतीसाठी म्हणून जर राज्यसंस्था अनियंत्रित बनली व तिने केवळ दंडशक्तीने भांडवलशाही नष्ट केली आणि ती हिंसावादात गुरफटली गेली तर सापाच्या विळख्यात सापडलेल्या मनुष्याची जशी त्यातून मुक्तता होऊ शकत नाही, त्याप्रमाणे राज्यसंस्थाही एकदा अनियंत्रित व केवळ दंडरूप बनली तर तिची या हिंसावादातून केव्हाही सुटका होणार नाही, असा म. गांधींचा वरील युक्तिवादावर आक्षेप आहे....

मार्क्स आणि लेनिन यांना कामगारशाहीतून निर्माण होणारा वर्गहीन समाज अभिप्रेत असला, तरी एकदा कामगारशाहीच्या नावाने अनियंत्रित एकपक्षीय सत्ता स्थापन झाली म्हणजे ती उत्तरोत्तर विलीन होत जाईल आणि दंडहीन व वर्गहीन समाज स्थापन होईल; हे त्यांचे भविष्य आज रशियातील अनुभवाने अवास्तव आणि केवळ काल्पनिक ठरलेले आहे. याच्या उलट एकदा कोणत्याही मिषाने एकपक्षीय अनियंत्रित सत्ता स्थापन झाली असता ती हिंसेच्या विळख्यात अधिकाधिक गुरफटली जाते, हेच खरे ठरले आहे. आपल्या क्रांतीनंतर लोकशाहीची पूर्ण परिणती करणारा वर्गहीन समाज निर्माण होऊन जनतेचे सर्व प्रकारचे दास्य नष्ट होईल ही मार्क्सवादी आशा आज रशियाच्या अनुभवाने फोल ठरलेली आहे. यामुळे लेनिनच्या विचारावर जो आक्षेप म. गांधींच्या शब्दात वर दिला आहे, तो प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध झाल्यासारखाच आहे. अर्थात् समाजवादाच्या प्रस्थापनेचे दुसरे मार्ग शोधून काढण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

त्याचबरोबर वर्गयुद्ध आणि कामगारशाही हा मार्ग टाळण्यासाठी पार्लमेंटरी राजकारणाचा अथवा सनदशीर राजकारणाचा मार्ग चोखाळावा हे मतही इंग्लंडच्या अनुभवावरून फारसे आशादायक वाटत नाही. कारण अद्यापि इंग्लंडने या कामात यश संपादन केल्याचे निःसंदिग्धपणे सिद्ध होत नाही आणि इंग्लंडच्या विशिष्ट परिस्थितीमुळे राजकीय व औद्योगिक प्रगतावस्थेमुळे तेथील राष्ट्रात शेकडो वर्षे चालत आलेल्या परंपरेमुळे हा मार्ग यशस्वी झाला तरी यापैकी कोणतीही गोष्ट ज्या राष्ट्रांना लाभलेली नाही अशा राष्ट्रांना इंग्लंडचे उदाहरण अनुकरणीय ठरणे शक्य नाही. यामुळे रशिया व इंग्लंड या दोन्हीही राष्ट्रातील मार्गांहून श्रेष्ठ व भिन्न असा लोकशाहीच्या समाजवादी परिणतीचा मार्ग आशियातील राष्ट्रांना शोधून काढावा लागणार आहे. असा एक मार्ग सत्याग्रहाच्या रूपाने म. गांधींनी आपणास दाखवून दिला आहे. म्हणून भारतीय लोकशाहीला रशियाचे किंवा ब्रिटनचे अंधानुकरण न करता समाजवादाच्या स्थापनेचा तिसरा अनत्याचारी क्रांतीचा मार्ग चोखाळता येईल, असा विश्वास हिंदी समाजवादी धरून आहेत. म. गांधींनी अनत्याचारी क्रांतीची जी शक्ती भारतीय जनतेत निर्माण केली त्या शक्तीचेच हे मूर्त स्वरूप आहे.

पण मार्क्सवादी क्रांतिशास्त्रात अनियंत्रित कामगारशाहीतून लोकशाहीचा समूळ लोप होऊन एकपक्षीय हुकूमशाही निर्माण होण्याचा जसा धोका आहे त्याचप्रमाणे राज्यसत्तेने भांडवलदार व जमीनदार यांचे मालकी हक्क शाश्वत आणि शाबूत ठेवण्याचे अभिवचन दिले तर ते वर्ग दलित जनतेचे जे शोषण करीत आहेत त्या शोषणपद्धतीचे संरक्षण करण्याचा घोर अन्याय आपल्या दंडसामर्थ्याने चालू ठेवण्याचे पाप राज्यसंस्थेला करावे लागते. मग राज्यसंस्था ही न्यायसंस्थापनेसाठी नसून ती कष्टजीवी जनतेचे शोषण सुरक्षितपणे चालू ठेवण्यासाठी धनिकांनी स्थापन केलेली आसुरी संस्था आहे ही राज्यमीमांसा

मान्य करावी लागते. म्हणून वरिष्ठ धनिकवर्गाचे आजचे सर्व हक्क शाबूत ठेवण्याच्या शर्तीवर उभारलेली राज्यघटना आपणास मान्य होणार नाही, असे म. गांधींनी ब्रिटिशांना बजावले होते, कारण दलित जनतेला किंवा हरिजनादी पीडित वर्गांना उद्धारण्यासाठी जो पैसा लागेल तो धनिकवर्गाकडूनच राष्ट्रीय सरकारला उभारावा लागणार. जर असा पैसा उभारताना प्रत्येक वेळी वरिष्ठ वर्ग आपल्या मालकी हक्कांचे पिस्तुल राष्ट्रीय सरकारवर रोखू लागले तर त्या राष्ट्रीय सरकारला कोणतीही सुधारणा करता येणार नाही ... म्हणून राष्ट्रीय लोकशाही सरकारला धनिकवर्गाचे जे मालकी हक्क जनतेच्या हिताला बाधक वाटतील, ते विनामोबदला काढून घेण्याचा हक्क असला पाहिजे, असा म. गांधींचा आग्रह होता. म्हणून धनिकवर्गाचे हक्क शाबूत राहावेत या कलमाला त्यांनी दोन उपसूचना सुचविल्या होत्या :

(१) हे हक्क कायदेशीरपणे संपादन केलेले असावेत आणि

(२) ते राष्ट्राच्या श्रेष्ठ हिताला बाधक नसावेत.

पण दुर्दैवाने आमच्या आजच्या राज्यघटनेने सरकारला विनामोबदला धनिकांचे राष्ट्र-विघातक मालकी हक्क काढून घेण्याचा हक्क दिलेला नाही. यामुळे ही राज्यघटना बदलून घेतल्यावाचून आर्थिक समतेच्या प्रस्थापनेचे कार्य कोणत्याही सरकारला करता येणार नाही. या घटनेने धनिक व निर्धन वर्गांत लढा निर्माण केला असून ज्यांना अहिंसक क्रांतीच्या मार्गाने आर्थिक समता स्थापन करावयाची असेल, त्यांनी या वर्ग-लढ्याचा अहिंसक पर्याय जनतेला दाखवून दिला पाहिजे, तसे ते न करतील तर मार्क्स व लेनिन यांचे क्रांतिशास्त्र कितीही सदोष असले तरी ते या देशात फैलावल्यावाचून राहणार नाही असे माझे मत आहे. या मतातूनच सत्याग्रही समाजवादाचा विचार पुढे येतो. मार्क्स, लेनिन प्रभृतींच्या वर्गलढ्याच्या सिद्धांताला आजची वस्तुस्थिती या दृष्टीने मान्यता देऊन त्या लढ्याला अहिंसक पर्याय शोधून काढावा अशी ही विचारसरणी आहे. तिचे स्पष्टीकरण करताना मार्क्स व गांधी यांची इतिहासमीमांसा, राज्यमीमांसा व क्रांतीसिद्धांत यांची फेरमांडणी करणे अवश्य आहे.

[*'नवभारत', जून १९५२, पृ. १ ते ८*]

## आदर्शवाद आणि वास्तववाद

सर्वसामान्य समाजाच्या दृष्टीने राज्यसंस्थेची व राजदंडाची उपयुक्तता व इष्टता मान्य केली, तरी तिच्यामुळे निर्माण होणारी हिंसा व हिंसावृत्ती यांचा लोप कसा करावा व राज्यसंस्थेकडून होणाऱ्या अन्याय्य हिंसेचा प्रतिकार अहिंसा-बलाने कसा करावा, हे सामान्य जनतेला शिकविण्याचे कार्य गांधीवादाला सतत करीत राहिले पाहिजे. म्हणून सर्वसामान्य जनतेला आदर्शनिष्ठ राहण्यास आवश्यक असणारी सामाजिक व आर्थिक

घटना टिकवून धरण्यासाठी राजदंडाची आवश्यकता वास्तववादी दृष्टीने मान्य करूनही त्या राजदंडाने आपल्या योग्य मर्यादांचे अतिक्रमण करू नये, यासाठी सत्याग्रहाचे प्रत्यक्ष प्रतिकार करण्याचे शस्त्र सतत सज्ज ठेवण्याचा उपदेश गांधीवाद्यांना जनतेला करावा लागतो. किंबहुना गांधीवाद्यांचे राज्यसंस्थेसंबंधीचे हेच खरे व विशिष्ट कर्तव्य आहे असे माझे मत आहे, म्हणूनच गांधीवाद्यांनी राज्यसंस्थेवर अधिकारारूढ होऊ नये आणि राजदंडाचा आश्रय करून लोकसंग्रह साधण्याच्या नादी लागू नये, असे मला वाटते. गांधीवादी जर या गोष्टी करू लागले तर ते तत्त्वभ्रष्ट बनतील आणि समाजोन्नतीला लागणारे आत्मबळ वाढविण्याचे कार्य सोडून देऊन हिंसक मार्गाने समाजधारणा करण्याच्या प्रयत्नात गुरफटले जातील व तो त्यांची स्वधर्मच्युती ठरेल. शिवाय असे करीत असताही आपण रामराज्याची पूर्व तयारीच करीत आहो असा अहंकार ते धारण करतील, तर ते वस्तुतः रावणराज्यच निर्माण करण्यास सहाय्य करतील, अशी भीती मला वाटते. गांधीवादाच्या नावाने राज्यसंस्था चालविण्याचा प्रयत्न आज जे करीत आहेत त्यांच्याकडे पाहून माझी भीती साधार असल्याचाच मला अनुभव येतो. म्हणून गांधीवाद हे राज्य चालविण्याचे शास्त्र नसून ते राज्यसंस्थेची शुद्धी करण्याचे व अखेरीस राजदंडाचा लोप करण्याचे शास्त्र आहे, असे मी मानतो.

याबाबतीत गांधींचे निःसंदिग्ध मत आपणापुढे नाही. या मुद्याचे स्पष्टीकरण गांधीवाद्यांनी करण्याचा काळ आता आला आहे. माझ्या मताप्रमाणे गांधीवादाला यतिधर्मातील व प्रजाधर्मातील राजकारण तेवढेच करता येईल. पण राजधर्मातील राजकारण त्याला करता येणार नाही. कारण, राजधर्माचे आचरण करीत असता शस्त्रबळ व हिंसामार्ग यांचा अवलंब केल्यावाचून आज समाजधारणा करता येणार नाही.

## राजधर्माचे स्वरूप

राजदंडाचे भय दाखवून, अपराधी मनुष्यास शासन करत, समाजसंस्थेचे संरक्षण करणे असे राजधर्माचे स्वरूप आहे. राजदंडाच्या भीतीने दुर्जनाचे हृदयपरिवर्तन होऊ शकत नाही. त्याने केवळ सज्जनांना दुर्जनांपासून होणारा उपद्रव काही काळ थांबविता येतो. दुर्जनांच्या हृदयपरिवर्तनाचा प्रयत्न करणारे अथवा करू इच्छिणारे गांधीवादी राज्यसत्तेवर आरूढ झाले तरी त्यांना आपला हृदयपरिवर्तनाचा सिद्धांत बाजूस ठेवून दुर्जनांना व परपीडकांना काही प्रसंगी शासन करावेच लागेल. हे कार्य ते करू लागतील तर त्यांना आत्मबलाने हृदयपरिवर्तन करण्याचे कार्य सोडून द्यावे लागेल. ही दोन कार्ये एका व्यक्तीस एकाच वेळी करता येणे शक्य नाही. आज समाजधारणेला ही दोन्हीही कार्ये आवश्यक आहेत हे जाणून, त्यांपैकी कोणते कार्य आपल्या प्रकृतिगुणांस अनुरूप व झेपणारे आहे याचा निर्णय करत, श्रमविभागाच्या तत्त्वानुसार व आपल्या अधिकारानुरूप

आपले कार्यक्षेत्र व आपला स्वधर्म प्रत्येकाने ठरवून घेतला पाहिजे. शस्त्रबलाने सामाजिक प्रगती अथवा सामाजिक क्रांती घडवून आणू इच्छिणाऱ्या शक्तींच्या मार्गातील अडथळे दूर करणे, एवढेच कार्य राजसत्तारूढ व्यक्तींना अथवा पक्षांना करता येईल.

प्रजेचे आत्मबल जागृत, संघटित व प्रभावी करण्याचे कार्य करून समाजात प्रगती व क्रांती घडवून आणण्याचे कार्य सत्याग्रही निष्ठेच्या गांधीवाद्यांनाच करता येईल. हे कार्य करीत असता त्यांना सत्ताधारी पक्षाशी विवेकपूर्वक सहकाराचे अथवा असहकाराचे धोरण स्वीकारून वेळप्रसंगी सविनय कायदेभंग व सार्वत्रिक अनत्याचारी असहकार यांचाही अवलंब करावा लागेल. या त्यांच्या अंगीकृत कार्याच्या दृष्टीने, कोणता राजकीय पक्ष पुरोगामी म्हणजे क्रांतिकार्यास अनुकूल आहे व कोणत्या पक्षाचे धोरण आपणास म्हणजे आपल्या कार्यास सहाय्यक होईल याचा विचार करून सत्याग्रहींनी आपले दैनंदिन राजकारण करीत राहिले पाहिजे. मात्र त्यांनी सत्ताधारी अथवा सत्ताकांक्षी अशा कोणत्याही विशिष्ट पक्षाचे कायमचे बंधन स्वीकारता कामा नये. तसेच दंडहीन समाज हे अंतिम राजकीय ध्येय असले तरी आजचे आपले राजकीय उद्दिष्ट अहिंसाधिष्ठित लोकशाही (Democracy based on non-violence) हेच आहे. याचा विसर त्यांनी केव्हाही पडू देता कामा नये. या बाबतीत म. गांधींचे मत निःसंदिग्ध शब्दात व्यक्त झालेले आहे: "The nearest approach to purest anarchy would be a democracy based on non-violence. The European democracies are to my mind a negation of democracy. (*'Harijan', July 21, 1940*). येथे दंडहीन समाज हा आपला अंतिम आदर्श असला तरी वास्तववादी दृष्टीने अहिंसक लोकशाही हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे असे स्पष्टीकरण गांधींनी केले आहे. आदर्शनिष्ठा आणि वास्तववाद या दोहोंचे अनुसंधान नित्य राखावयाचे ही गांधीजींची हातोटी या उताऱ्यात पूर्णपणे प्रकट झालेली आहे. आजची युरोपीय लोकशाही ही खरी लोकशाही नसून तीत लोकशाहीचा अभावच आहे असे त्यांनी म्हटले आहे. "युरोपीय लोकशाही ही आपणास नको " एवढेच त्यांनी येथे स्पष्टपणे म्हटले आहे. पण आपणास इष्ट असणारी लोकशाही अहिंसाधिष्ठित असावी या त्यांच्या उद्‌गारांचे स्पष्टीकरण करण्याचा आज काळ आलेला आहे. हे स्पष्टीकरण करू लागले म्हणजे अहिंसक लोकशाही ही समाजवादी लोकशाही असली पाहिजे असे दिसू लागते. हे तत्त्व मान्य करून अहिंसक लोकशाही व समाजवादी लोकशाही (Democracy based on non-violence and Socialist Democracy) यांतील भेद व त्यांचे परस्पर-संबंध गांधीवाद्यांनी आज विशद केले पाहिजेत.

[लोकशाही]

गांधींनी जशी लोकशाहीच्या ध्येयाला मान्यता दिली आहे तशीच समाजवादाच्या ध्येयालाही मान्यता दिली आहे. पण या दोनही ध्येयांना मान्यता देत असता, ते त्यांच्या

पाठीमागे "अहिंसक" किंवा "अहिंसाधिष्ठित" अशी विशेषणे लावण्यास केव्हाही चुकत नाहीत. यामुळे गांधींची लोकशाही व गांधींचा समाजवाद यांचे काही वैशिष्ट्य आहे हे मान्य करावे लागते. तसेच आज रूढ असणारी लोकशाही व आज रूढ असलेले समाजवादासंबंधीचे विचार याहून गांधींना अभिप्रेत असणारी लोकशाही व समाजवाद हे भिन्न आहेत असा स्पष्ट बोध होतो. युरोपीय लोकशाही व युरोपीय समाजवाद हे अहिंसेवर अधिष्ठित झालेले नाहीत आणि म्हणून ती लोकशाही व तो समाजवाद हे खरे नाहीत असे गांधी मानीत असत. ..

युरोपातील प्रचलित लोकशाही ही खरी लोकशाही नाही व खरी लोकशाही आपणास निर्माण करावयाची आहे हे गांधीजींचे मत आणि युरोपातील लोकशाही ही भांडवलदार लोकशाही आहे व म्हणून ती खरी नाही व खरी लोकशाही अद्यापि निर्माण व्हावयाची आहे व भांडवलदारीच्या विनाशानंतरच ती निर्माण होऊ शकेल हे मार्क्सवाद्यांचे मत यांची तुलना करून त्यातील साम्य–विरोध समजून घेतला पाहिजे. गांधीजींना अभिप्रेत असणारी लोकशाही अहिंसक अथवा अहिंसाधिष्ठित असली पाहिजे म्हणजे काय? माझ्या मते, अहिंसक लोकशाही ही आर्थिक समतेवरच अधिष्ठित असली पाहिजे. आर्थिक समतेवर अधिष्ठित झालेल्या समाजात भांडवलदार आणि कामगार असा वर्गभेद असता कामा नये. मूठभर धनिकवर्ग आणि कोट्यवधी अन्नवस्त्रहीन जनता यांच्यातील आर्थिक विषमता खऱ्या लोकशाही राज्यात एक दिवसभरही टिकणार नाही व टिकणे इष्टही नाही, असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. राजकीय लोकशाहीच्या व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेनंतर आर्थिक समतेच्या प्रस्थापनेचा प्रश्नच तीव्रतेने धसास लागणार आहे व लावला पाहिजे, अशी गांधीजींची भावना होती. म्हणूनच अहिंसक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आर्थिक समता हीच आहे असा त्यांचा सिद्धांत होता. ...

...लोकशाहीची काय किंवा अहिंसक समाजाची काय, खरी बाह्य कसोटी आर्थिक समता हीच आणि एकवर्ग समाज हेच आर्थिक समतेचे स्पष्ट लक्षण आहे. या मुद्यासंबंधी गांधीवाद्यांनी आपली भूमिका निःसंदिग्धपणे मांडली, म्हणजे मार्क्स व गांधी यांच्या विचारातील साम्य लक्षात येते.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मार्क्सवादाचा जन्म झाला. युरोपात जन्म पावलेली लोकशाही भांडवलदार वर्गाने काबीज केली आहे व त्यामुळे खरी लोकशाही जन्मास येऊ शकत नाही हे दृश्य पाहून मार्क्सने, भांडवलदार व कामगार यांच्यातील वर्गकलह वाढत जाऊन त्यातूनच अखेरीस समाजवादी क्रांती घडून येईल व तेव्हाच लोकशाहीच्या क्रांतीचा वणवा शांत होईल, असे भविष्य वर्तविले. समाजवादी क्रांती ही लोकशाहीच्या क्रांतीची पूर्तता आहे आणि या समाजवादी क्रांतीतून काही काळ कामगार

वर्गाची अनियंत्रित सत्ता प्रस्थापित झाली, तरी तिच्यामुळे लोकशाही विचारातून निर्माण झालेले एकवर्ग समाजाचे ध्येय मूर्त स्वरूपास येईल असे मार्क्सचे दर्शन होते. या एकवर्ग समाजाच्या संस्थापनेनंतर लोकशाही स्वरूपाचेही राज्ययंत्र समाजाला आवश्यक वाटणार नाही व ते कृतकार्य होऊन नष्ट होईल, अशी मार्क्सची विचारसरणी आहे. गांधीवादाप्रमाणे मार्क्सवादही लोकशाही व समाजवाद ही ध्येये पुरोगामी मानीत असला, तरी दोघांचेही अंतिम ध्येय दंडहीन समाज हे अथवा अराज्यवाद हेच आहे व त्या दृष्टीनेही गांधीवाद व मार्क्सवाद यांचा समन्वय होणे शक्य आहे असे मला वाटते. ही दंडहीन समाजाची अवस्था प्राप्त होण्यास आर्थिक समता व राजकीय लोकशाही या दोहोंचीही संस्थापना प्रथम केली पाहिजे, याबद्दलही दोघांचे एकमत आहे. पण राजकीय व आर्थिक समता यांची संस्थापना वर्गकलहात्मक सशस्त्र क्रांतीनेच सामान्यतः होऊ शकेल असा मार्क्सचा विश्वास होता. याच्या उलट सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने राजकीय लोकशाही किंवा आर्थिक समता यांचा खरा उद्भव होऊ शकणार नाही व तो व्हावयाचा तर अहिंसक अनत्याचारी क्रांतीच्या मार्गानेच होईल असा गांधीजींचा सिद्धांत आहे. ही अहिंसक अनत्याचारी क्रांतीची कल्पना हीच गांधीजींनी राज्यशास्त्रात व क्रांतिशास्त्रात टाकलेली महत्त्वाची भर असून तिच्याच आधारावर मार्क्सवादाला जे साधले नाही ते साध्य करून दाखविण्याची जबाबदारी भारतीयांना पार पाडता येणार आहे. या अहिंसक क्रांतिकारक आंदोलनाची प्रेरणा भारतीय अंतःकरणात गांधींनी निर्माण केलेली असून, हिंदी समाजवादी या क्रांतिशक्तीला आर्थिक समता व एकवर्ग समाज यांच्या संस्थापनेसाठी योजण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मार्क्सवादाची मूळ प्रेरणा लोकशाहीच्या क्रांतीची पूर्तता करावी हीच असली, तरी त्याची सशस्त्र क्रांतीवरील निष्ठा ही लोकशाहीला मारक व हुकूमशाहीला पोषक अशी ठरलेली आहे. आजची लोकशाही खरी लोकशाही नाही हे त्यांचे मत खरे आहे. तरीही कामगारवर्गाच्या हुकूमशाहीतून लोकशाहीच्या क्रांतीची पूर्तता होईल व समाजवादाची स्थापना होऊन एकवर्ग व दंडहीन समाज निर्माण होईल हे त्यांचे मत अवास्तव व अशास्त्रीय ठरले आहे. लोकशाहीच्या क्रांतीची पूर्तता, समाजवादाची संस्थापना आणि दंडहीन समाजाच्या ध्येयाकडे प्रवृत्ती या गोष्टी साध्य करण्याचा खरा मार्ग सत्याग्रह हाच आहे. हे मार्क्सवाद्यांना चर्चा व चिंतन करून पटत नसेल, तर ते प्रत्यक्ष प्रयोगाने त्यांना पटवून देण्याचा आत्मविश्वास गांधीवाद्यांनी धारण केला पाहिजे आणि व्यावहारिक राजकीय क्षेत्रात आपला प्रभाव पाडून सर्व सत्ताधारी व सत्ताकांक्षी राजकीय पक्षांत हा विश्वास निर्माण केला पाहिजे. लोकशाहीच्या क्रांतीची पूर्तता, समाजवादाची संस्थापना, एकवर्ग समाजाची निर्मिती आणि दंडहीन समाजाचे अंतिम ध्येय यांना निःसंदिग्ध मान्यता देऊन सत्याग्रहाच्या मार्गाने सर्वोदयाचे शिखर गाठण्याचा प्रयत्न त्यांनी केला पाहिजे. गांधी हत्येनंतर

काही काळ माजलेला वैचारिक गोंधळ अपरिहार्य व स्वाभाविक असला तरी आता तो नष्ट होऊन या राष्ट्रातील विचारशक्ती व सार्वजनिक जीवन यांचा प्रवाह याच दिशेने लवकरच वाहू लागेल याची स्पष्ट चिन्हे आज दिसत आहेत. कम्युनिस्ट पक्ष व त्याचे तत्त्वज्ञान यांचे आकर्षण कमी होत असून, त्याच्या हातून लोकशाहीची पूर्तता व समाजवादी संस्थापना होऊ शकत नाही, याचीही जाणीव आता येथील विचारवंतांना व जनतेला झपाट्याने होऊ लागली आहे.

## [ इतिहासमीमांसा ]

इतिहासमीमांसा आणि वर्गयुद्ध यासंबंधी मार्क्स व गांधी यांच्या विचारसणीत जो विरोध दृष्टीस पडतो त्याचाही योग्य प्रकारे समन्वय होऊ शकतो, असे माझे मत आहे. मार्क्सने इतिहासाची भौतिक मीमांसा केलेली असून, गांधींना भौतिकवादच पसंत नसल्यामुळे त्यांचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्या एकंदर जीवनविषयक तत्त्वज्ञानाशी सुसंगत असा म्हणजे आध्यात्मिक आहे. एकंदर मानवसमाजाची आजपर्यंतची प्रगती लक्षात घेऊन गांधीजी असे दाखवून देऊ पाहतात की, मानवी समाजाच्या व्यवहारात अहिंसेचा प्रभाव अधिकाधिक पडत आलेला आहे आणि यापुढेही मानवसमाजाची प्रगती अहिंसेच्या दृष्टीनेच होत राहील....

... म. गांधींनी मानवी समाजाची प्रगती अहिंसेच्या दिशेनेच कशी होत आहे ते मानवसमाजाच्या चरित्राचा दीर्घकालीन आढावा घेऊन दाखवून दिले आहे. मनुष्यसमाज एके काळी नरमांसभक्षक होता. नंतर त्याला नरमांसभक्षणाची लाज वाटू लागून तो इतर प्राण्यांची शिकार करून आपली उपजीविका करू लागला. यानंतर ही हिंसक शिकारी वृत्तीसुद्धा सोडून देऊन तो शेतीवर आपला उदरनिर्वाह करू लागला आणि एके जागी स्थिर राहून गावे व शहरे वसवून कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्ये पार पाडून परस्परांशी प्रेमाने व कर्तव्यनिष्ठेने वागू लागला. त्याची ही सर्व प्रगती दीर्घकालीन दृष्टी स्वीकारून पाहिल्यास अहिंसेच्या दिशेनेच होत आहे. या ऐतिहासिक दृष्टीने विचार करून ते असा निष्कर्ष काढतात की, मानवाची अहिंसेकडे होणारी ही प्रगती अशीच पुढे अधिक प्रमाणात अहिंसावादी बनली पाहिजे. जर याहून अधिक अहिंसेचे आचरण करण्यात मानवसमाजाला यश संपादन करता आले नाही, तर त्याची प्रगती थांबेल, एवढेच नव्हे तर त्याची अधोगती होऊन त्याचा विनाशच ओढवेल. जगात स्थिर अशी कोणतीही वस्तू टिकू शकत नाही. एक तर तिचा विकास झाला पाहिजे, नाही तर तिचा विनाशच होणार. आजपर्यंत केलेली प्रगती लक्षात घेऊन मानवसमाज अधिकाधिक अहिंसक बनेल तर त्याच्या संस्कृतीचा विकास होईल आणि त्याने अहिंसेकडे प्रगती करण्याचे कार्य सोडून दिले तर त्याच्या संस्कृतीचा व त्याचा विनाश होईल. मावनसमाजाच्या संस्कृतीत आजपर्यंत वहून

आलेली स्थित्यंतरे व रूपांतरे लक्षात घेऊन गांधीजींनी काढलेला हा निष्कर्ष हीच गांधींची आध्यात्मिक इतिहासमीमांसा आहे असे म्हणता येईल. यासंबंधीचा त्यांचा सिद्धांत एकाच वाक्यात त्यांनी पुढीलप्रमाणे मांडला आहे : "Human Society is a ceaseless growth, an unfoldment in terms of spirituality." (*'Young India', 16th September 1926*)

आता मार्क्सने मानवसमाजाच्या इतिहासाची जी भौतिक मीमांसा ( Materialistic Interpretation of History or Historical Materialism) केली आहे, तिचा थोडा विचार करू. मानवसमाजात एके काळी नरमांसभक्षण रूढ होते. त्यानंतर तो प्रघात निषिद्ध ठरला. कालांतराने इतर प्राण्यांचा मांसाहारही अनिष्ट वाटू लागला. मृगयावृत्ती सोडून मनुष्ये शेतीवर उपजीविका करू लागली. त्यानंतर त्यांची कर्तव्यभावना व बंधुभावना वाढत जाऊन एकमेकांसंबंधीची अहिंसावृत्ती निरनिराळ्या रूपाने प्रकट होऊ लागली. ही सर्व स्थित्यंतरे घडून येण्यात मानवसमाजाच्या उत्पादन सामर्थ्यात जी भर पडली आहे व उत्पादन पद्धतीत ज्या सुधारणा घडून आल्या आहेत, त्यांचे फार मोठे सहाय्य झालेले आहे, या गोष्टीकडे मार्क्सने आपले लक्ष वेधिलेले आहे. मानवसमाजाच्या एकंदर संस्कृतीचा आधार त्यातील उत्पादनपद्धती, त्या उत्पादनपद्धतीतून निर्माण होणारे आर्थिक संबंध आणि सामाजिक कर्तव्ये हा आहे. ही उत्पादनपद्धती मनुष्याच्या भौतिक ज्ञानाबरोबर बदलत जाते आणि मनुष्याचे धनोत्पादन सामर्थ्यही वाढत जाते. उत्पादन-सामर्थ्याचा विकास आणि उत्पादनपद्धतीची सुधारणा होत गेली तरच मानवसमाजाची संस्कृती वाढत जाते. नाही तर उत्पादन-सामर्थ्याच्या ऱ्हासाबरोबर त्याच्या एकंदर संस्कृतीचा ऱ्हास होऊन ती विनाश पावू लागते. मानवामानवांमध्ये समतेचे, स्वातंत्र्याचे व बंधुभावनेचे संबंध निर्माण होणे ही मानवसंस्कृतीच्या उन्नतीची दिशा आहे हे मत मार्क्सवाद्यांना मान्य आहे. पण हे स्वातंत्र्याचे, समतेचे व बंधुभावनेचे ध्येय लोकशाहीच्या क्रांतिकारकांनी अनेक वर्षे पुकारले असताही अद्यापि मूर्त स्वरूपास का येत नाही याचा विचार करीत असता, मार्क्सला असे दिसून आले की, मानवसमाजाची अगदी प्राथमिक अवस्था सोडून दिल्यास, त्याच्या समाजघटनेत वर्गभेद बद्धमूल झालेला आहे. प्रत्येक मानवसमाजात बहुसंख्य जनता कष्टजीवी असून या बहुसंख्य जनतेच्या कष्टातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा काही अंश एक अल्पसंख्य वर्ग परंपरागत मालकी हक्काने व बिनकष्टाने उपभोगित असतात. या मालकवर्गाला बिनकष्टाने मिळणारी ही संपत्ती सुरक्षित ठेवून तिचे समर्थन करण्याचे कार्य राज्यसंस्था आणि धर्मसंस्था या करीत असतात. अशा प्रकारे आजपर्यंतच्या सर्व मानव-संस्कृती वर्गभेदाने दुभंगलेल्या आणि सामाजिक व आर्थिक विषमतेवर उभारलेल्या अशा आहेत. प्रत्येक समाजात कष्टजीवी सामान्य जनता इच्छेने अथवा अनिच्छेने आपल्या कष्टातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा अंश मूठभर धनिक वर्गाच्या पदरात टाकीत असते आणि हा अल्पसंख्य धनिक वर्ग स्वामित्वाच्या हक्काने या परकष्टार्जित व सामाजिक विषमतेचा व्यवहार समाजधारणेला आवश्यक व पोषक आहे असे मानून राज्यसंस्था, धर्मसंस्था व

नीती यांनी त्याला आजपर्यंत मान्यता दिलेली आहे. यालाच उद्देशून मार्क्स असे म्हणतो की, "आजपर्यंतचा मानवसमाजाचा इतिहास हा एक वर्गयुद्धाचा इतिहासच आहे" आणि या वर्गयुद्धात धर्मसंस्था, राज्यसंस्था व सामाजिक रूढी, नीतिशास्त्र (Positive Social Morality) यांनी दलित जनतेचा पक्ष न स्वीकारता तिचे दलन करणाऱ्या धनिकवर्गाचाच पक्ष स्वीकारलेला आहे. आजपर्यंत ज्या क्रांत्या घडून आल्या त्या क्रांत्यांचे स्वरूपही वर्गभेद नष्ट करण्याचे नसून समाजात वरिष्ठ व कनिष्ठ असे दोन वर्ग कायम ठेवून एका वरिष्ठ वर्गाच्या हातची सत्ता काढून ती दुसऱ्या वर्गाच्या हाती द्यावयाची व त्या दुसऱ्या वर्गाला वरिष्ठ बनवावयाचे अशाच प्रकारचे होते. लोकशाही क्रांती ही सुद्धा या नियमाला अपवाद नसून, तिने अद्यापि वर्गभेद नष्ट केलेला नाही. केवळ समाजातील सरंजामदारवर्गाचे वरिष्ठपण नष्ट करून ते भांडवलदार वर्गाच्या हाती दिले आहे. यामुळे प्राचीन काळापासून चालत आलेला वर्गकलह भांडवलदार लोकशाहीत तसाच चालू असून त्याचे फक्त स्वरूप बदललेले आहे. मात्र भांडवलशाही उत्पादनपद्धतीमुळे हा भांडवलदार व कामगारवर्गात वाढत जाणारा वर्गकलह लवकरच निकरास येऊन बहुसंख्य कामगार अल्पसंख्य भांडवलदार वर्गाच्या हातची सत्ता व संपत्ती हिरावून घेईल. या समाजवादी क्रांतीचे स्वरूप आजपर्यंत होऊन गेलेल्या सामाजिक व राजकीय क्रांत्यांहून अगदीच भिन्न होईल. कारण, बहुसंख्य कामगारवर्ग हा समाजाच्या तळाशी असणारा सर्वांत कनिष्ठ व निकृष्ट वर्ग असल्यामुळे तो ज्याच्यावर आपला वरिष्ठपणा गाजवू शकेल असा दुसरा वर्गच यापुढे समाजात राहणार नाही. यामुळे समाजातील वर्गभेद कायमचा नष्ट होऊन वर्गहीन समाज अस्तित्वात येईल आणि वर्गसंस्थाच नष्ट झाल्यामुळे ह्या संस्थेच्या अस्तित्वाबरोबर जन्मास आलेली, तिच्या विकासाबरोबर वाढत गेलेली राज्यसंस्था तिच्या विनाशाबरोबर विनाश पावेल. ही वर्गसंस्था ऐतिहासिक काळात समाजधारणेला सापेक्ष दृष्टीने उपयुक्त ठरलेली आहे हे मत मार्क्सवादास मान्य आहे. पण तीच एकेकाळी उपयुक्त ठरलेली वर्गसंस्था आजच्या समाजाला घातक ठरत आहे आणि तरीही आजच्या समाजरचनेत वरिष्ठ बनलेला भांडवलदारवर्ग ती संस्था टिकवून धरण्यासाठी राज्यसंस्थेवर आपला प्रभाव पाडून समाजवादी क्रांती दडपून टाकीत आहे, पण या त्याच्या प्रयत्नात त्याला यश येणार नसून सर्व जगातील कामगारवर्ग आज ना उद्या एक होऊन ही क्रांती घडवून आणतील, अशी मार्क्सची भौतिक इतिहासमीमांसा आहे.

### योग्य समन्वयाची आवश्यकता

गांधी आणि मार्क्स हे दोघे मानवसमाजशास्त्राच्या इतिहासाकडे कोणत्या दृष्टीने पाहात आहेत आणि आजपर्यंतच्या मानव समाजाच्या चरित्रातील दीर्घकालीन घडामोडींचे व त्यांच्या प्रगतीचे निरीक्षण करून त्यांनी त्याची मीमांसा कशी केली आहे याची संक्षिप्त कल्पना वर दिली आहे. यापैकी कोणतीही एक मीमांसा खरी व दुसरी खोटी ठरेल असे मला वाटत नाही. ज्याप्रमाणे मानवी जीवनाचा सर्वांगीण उलगडा करावयाचा तर त्याच्या

जीवनातील भौतिक व आत्मिक अशा दोन्हीही प्रेरणांचा विचार करतच तो करावा लागतो. त्याचप्रमाणे एकंदर मानवसमाजाच्या चरित्राचे वर्णन करून त्याचे रहस्य उलगडावयाचे तर मानवी इतिहासाची मीमांसा भौतिक आणि आत्मिक या दोन्हीही दृष्टींचा उपयोग करून केली पाहिजे व त्याचा योग्य समन्वय साधूनच याचे रहस्य उलगडले पाहिजे असे माझे मत आहे. मानवसमाजाच्या संस्कृतीचा विकास आणि त्याच्या प्रगतीचा एकंदर प्रवाह अहिंसेच्या दिशेने होत आहे व झाला पाहिजे, हे गांधीजींचे मत मार्क्सवाद्यांनी मान्य केले पाहिजे आणि आजपर्यंतची मानवसमाजाची संस्कृती वर्गभेदांनी दुभंगलेली आणि आर्थिक व सामाजिक विषमतेवर उभारलेली अशी होती व आजही ती तशीच आहे हे मार्क्सवादाचे मत गांधीवाद्यांनी मान्य करून मानवी समाजाच्या इतिहासाची मीमांसा शास्त्रीय व वास्तववादी दृष्टीने करण्यास शिकले पाहिजे. मार्क्सच्या इतिहासमीमांसेचे एकांगीपण आज सर्वमान्य झालेले आहे. हे खरे असले तरी, वर्गसंस्थेची उत्पत्ती, अभिवृद्धी आणि विलय यासंबंधी त्याने केलेले विवेचन राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि इतिहासशास्त्र यांना आत्मसात करावे लागत आहे. गांधीवाद्यांनाही हा बोध मार्क्सवाद्यांपासून आत्मसात करण्याची आवश्यकता आहे.

एकंदर मानवसमाजाच्या आजपर्यंतच्या चरित्रात वर्गविरोधाचा आणि वर्गकलहाचा धागा अगदी प्राथमिक, सामाजिक अवस्था वगळली, तर सर्वत्र अप्रगटपणे अथवा प्रगटपणे गुंफला गेलेला आहे. वर्गसंस्था व आर्थिक विषमता यांनी एकेकाळी उत्पादनकार्यास व समाजधारणेस सहाय्य केलेले असले तरी वर्गसंस्था व आर्थिक विषमता यांचा अंत घडवून आणल्यावाचून यापुढे धनोत्पादन व समाजधारणा ही कार्ये चालू शकणार नाहीत, याची स्पष्ट जाणीव गांधीवाद्यांनी करून घेतली पाहिजे. आर्थिक विषमता आणि सामाजिक वर्गभेद या संस्था आम्हास आध्यात्मिक दृष्टीने अमान्य आहेत असे गांधीवाद्यांनी म्हटले, तरी तेवढ्याने त्यांचे मानवसमाजाच्या चरित्राचे विवेचन शास्त्रीय ठरणार नाही. कारण, आध्यात्मिक दृष्टीने असमर्थनीय वाटणाऱ्या या गोष्टी एकेकाळी धर्मसंस्थेने, इतकेच नाही तर अध्यात्मनिष्ठ साधुसंतांनीसुद्धा, व्यावहारिक दृष्टीने समर्थनीय व संरक्षणीय अशा का मानल्या होत्या व आजच त्या असमर्थनीय व असंरक्षणीय आहेत असे का ठरत आहे, या प्रश्नाचे उत्तर मार्क्सवादाने रूढ केलेल्या इतिहासाच्या भौतिक मीमांसेचा आश्रय केल्यावाचून आपणास देता येणार नाही. भारतीय धर्मशास्त्रज्ञांनी ज्या वर्णाश्रमधर्माला आध्यात्मिक समाजघटनेचा आदर्श म्हणून जगापुढे ठेविले होते त्या समाजघटनेतही प्रथमपासून शूद्र आणि द्विज असा पीडित–पीडक संबंध खोल रुजलेला होता. अर्थात या द्विज–शूद्र वर्गभेदाने भारतीयांची आध्यात्मिक संस्कृती दुभंगून विकृत झालेली असल्यामुळेच या विकृत संस्कृतीचा अभिमान धरणारे लोक इस्लाम-संस्कृतीचे बराच काळ गुलाम बनले आणि हिंदु व मुसलमान या दोन्हीही संस्कृती विकृत व गुलामवृत्तीच्या बनल्यामुळेच अठराव्या शतकात दोन्हीही

संस्कृतीचे उपासक, आधुनिक युरोपात निर्माण झालेल्या भौतिक शास्त्रीय संस्कृतीचे गुलाम बनले. भारतीय संस्कृतीत वर्गविरोध नव्हता किंवा आज आपणास वर्गकलहाचा विचारच करण्याचे कारण नाही. कारण आमची भारतीय संस्कृती अध्यात्मिक असून तशीच राहणार आहे, असा काही विचारवंत म्हणविणाऱ्या भारतीयांचा अभिमान मला साधार वाटत नाही. आधुनिक युरोपने वर्गकलहाचा आश्रय धरून लोकशाहीच्या व समाजवादाच्या संस्थापनेसाठी जे प्रयत्न केले, त्याच्यामागील प्रेरणा सामाजिक सत्यसंशोधनाची व सत्य-संस्थापनेचीच आहे. मात्र या सत्याच्या संस्थापनेसाठी ते हिंसेने प्रयत्न करीत आहेत व म्हणून त्यांना त्याची संस्थापना करता येत नाही, असे गांधीवादी म्हणू शकतात. मात्र हे त्यांचे म्हणणे साधार व सत्य ठरावयाचे, तर त्यांनी अहिंसक मार्गांनी लोकशाहीची व समाजवादाची संस्थापना करण्याचे कार्य अंगिकारून ते यशस्वी करून दाखविले पाहिजे. निदान म. गांधींनी भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी सत्याग्रहाच्या तंत्राला जितके यश मिळवून दिले, तितक्या प्रमाणात तरी त्यांनी स्वतंत्र भारतात उदय पावलेल्या लोकशाहीला समाजवादी स्वरूप देण्यात यश संपादन करून दिले पाहिजे.

['नवभारत', जुलै १९५२, पृ. ३१–३९]

## [हिंसेचा प्रश्न]

मार्क्सवाद हा हिंसावादी आहे आणि गांधीवाद हा अहिंसावादी आहे आणि म्हणून या दोहोंचा समन्वय होणे कदापीही शक्य नाही, या आक्षेपाचा विचार आता करावयाचा आहे. हा विचार करीत असताना समाजधारणेसाठी जी हिंसा व विषमता करावी लागते अशी समाजशास्त्रज्ञांची व धर्मशास्त्रज्ञांची समजूत आहे, त्या समजुतीचा विचार करणे प्राप्त होते.

समाजधारणेच्या कार्यात हिंसेचा व विषमतेचा उपयोग करावा लागतो, या विचारास कोणीही मान्यता दिलीच नसती तर मार्क्सवाद व गांधीवाद अशी दोन तत्त्वज्ञाने निर्माणच होऊ शकली नसती. राजकीय हिंसेचे आणि आर्थिक व सामाजिक विषमतेचे समर्थन राज्यशास्त्रज्ञांना व अर्थशास्त्रज्ञांना करावे लागते, इतकेच नाही तर त्या समर्थनास काही प्रमाणात धर्मशास्त्राला व नीतिशास्त्रालाही मान्यता द्यावी लागते. म्हणून सामाजिक क्रांति-शास्त्रात मार्क्सला मानाचे स्थान प्राप्त झालेले असून, गांधीवादालाही मार्क्सवादातील सत्याचा अंश आत्मसात केल्यावाचून शास्त्रीय स्वरूप प्राप्त होणार नाही व सामाजिक क्रांतीचा व्यवहार करता येणार नाही.

लोकसंग्रह साधण्यासाठी समाजाचे रक्षण करावे लागते आणि समाजरक्षणासाठी अपरि-हार्य असणारी हिंसा (minimum necessary violence) किमान प्रमाणात करण्याचा हक्क राज्यसंस्थेला दिला पाहिजे, असे राज्यशास्त्राला मान्य करावे लागते. त्याचप्रमाणे उत्पादनकार्यासाठी जे श्रम करावे लागतात ते करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी जी विषमता

अपरिहार्य असेल तेवढी विषमता अर्थशास्त्राला न्याय्य म्हणून किंवा कायदेशीर म्हणून मान्य करावी लागते. आर्थिक विषमता हे एक हिंसेचेच स्वरूप आहे हे लक्षात घेतल्यास, राज्यशास्त्राप्रमाणे अर्थशास्त्रालाही वास्तववादी दृष्टीने लोकसंग्रहार्थ करावी लागणारी "किमान अपरिहार्य हिंसा" मान्य करावी लागते, असे म्हणता येते. पण त्याचबरोबर ही किमान अपरिहार्य भासणारी हिंसासुद्धा उत्तरोत्तर कमी कमी होत जाऊन अखेरीस पूर्णपणे नष्ट झाली पाहिजे, हे तत्त्व नीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांना प्रतिपादन करावे लागते. इतकेच नाही तर त्या तत्त्वाला राज्यशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ यांच्याकडूनही मान्यता मिळवून घ्यावी लागते. अशी मान्यता गांधीवाद व मार्क्सवाद मान्य करणाऱ्या राज्यशास्त्रज्ञांना व अर्थशास्त्रज्ञांना देण्यात मुळीच अडचण पडण्याचे कारण नाही. दोघांनाही अभिप्रेत असणाऱ्या आदर्श मानव समाजात दंडधारी राज्यसत्तेची व विषमतामूलक वर्गसंस्थेची आवश्यकता भासत नाही. दंडहीन व वर्गहीन समाज हे दोघांचेही अंतिम ध्येय आहे. त्याचप्रमाणे वास्तववादी दृष्टीने आजपर्यंत जी राजकीय हिंसा अपरिहार्य गणण्यात आलेली होती किंवा आहे, त्या अपरिहार्य हिंसेचीही काही तरी तात्त्विक मीमांसा व सापेक्ष समर्थन मार्क्सवादाला व गांधीवादालाही करावेच लागते. पण वर्गसंस्था ऐतिहासिक काळात अपरिहार्य होती व म्हणून तिचे सापेक्ष समर्थन करणे आवश्यक आहे. ही गोष्ट मान्य करताना मार्क्सवाद्यांना जड जाते. त्याचप्रमाणे ऐतिहासिक व वास्तववादी दृष्टीने राजदंडामार्फत होणाऱ्या अपरिहार्य हिंसेचे समर्थन करताना गांधीवाद्यांना जड जाते. असे असले तरी उत्पादनाची साधने अविकसित असल्यामुळे ऐतिहासिक काळात वर्गसंस्था अपरिहार्य होती ही वस्तुस्थिती मार्क्सवाद्यांना तात्त्विक दृष्टीने मान्य करणे भाग असते. तसेच राज्यसंस्थेकडून होणाऱ्या रक्षणाच्या अभावी सामान्य जनता भयभीत होऊन शील भ्रष्ट होते, म्हणून भेकडपणापेक्षा हिंसा बरी या न्यायाने राज्यसंस्थेमार्फत समाजरक्षण करवून घेताना घडणाऱ्या अपरिहार्य हिंसेचे समर्थन गांधीवादाला करावे लागते. गांधीवाद व मार्क्सवाद या दोहोंतही आदर्शनिष्ठ वृत्ती आणि वस्तुनिष्ठ दृष्टी यांच्या समन्वयाची आवश्यकता आहे. मात्र आपण आदर्शनिष्ठ आहोत असे मार्क्सवादी म्हणणार नाहीत आणि आपण वस्तुनिष्ठ बनले पाहिजे याची जाणीव गांधीवाद्यांना राहणार नाही.

सांप्रदायिक आग्रह सोडून देऊन विचार केल्यास राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या दोहोंतही आदर्शनिष्ठ वृत्ती आणि वस्तुनिष्ठ दृष्टी यांची सारखीच आवश्यकता असून, मार्क्स व गांधी या दोघांच्याही विचारात त्या दोनही कमीअधिक प्रमाणात वसत असल्याचे दिसून येते. मार्क्स व त्याचे अनुयायी यांच्यामध्ये जर आदर्शनिष्ठा नसती तर ते क्रांतिवादी झाले नसते व क्रांतिकार्यात त्यांनी आपल्या सर्वस्वाचा होमही केला नसता. याच्या उलट गांधींच्या आदर्शनिष्ठेत वस्तुनिष्ठ दृष्टीची भर पडलेली नसती, तर त्यांना राज्यघटनेत व अर्थघटनेत क्रांती घडवून आणण्याचे महत्त्व समजले नसते आणि त्यांनी राजकीय क्रांती

घडवून आणण्यात व आर्थिक क्रांतीचे भविष्य वर्तविण्यात भाग घेतला नसता. तात्पर्य, मार्क्सवाद काय किंवा गांधीवाद काय ही जर क्रांतिशास्त्रे असतील तर त्यामध्ये कोणत्याही क्रांतिशास्त्रात अवश्य असणारी आदर्शनिष्ठ वृत्ती आणि वस्तुनिष्ठ दृष्टी यांचा समन्वय घडून आलाच पाहिजे. आदर्शनिष्ठ वृत्ती नसेल तर क्रांतिकारक जीवन जगण्यात समाधान वाटणार नाही आणि वस्तुनिष्ठ दृष्टी नसेल तर क्रांतिकारक व्यवहार यशस्वी करता येणार नाही. म्हणून प्रत्येक क्रांतिशास्त्रात या दोन वृत्तींचा समन्वय होणे अपरिहार्य ठरते.

उत्पादनकार्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून आर्थिक घटनेत वर्गसंस्थेला स्थान मिळाले आणि समाजाचे रक्षण होऊन त्यातील घटकांना किमान जीवित-वित्ताची तरी शाश्वती वाटावी म्हणून राजदंडाला हिंसा करण्याचा अधिकार मिळाला. अशा रीतीने या दोनही स्वरूपांची हिंसा सापेक्षतः समर्थनीय ठरली तरी तिच्यातून समाजाची मुक्तता झाली पाहिजे व त्यासाठी समाजातील अहिंसाबल संघटित करून आर्थिक विषमतेचे आणि राजकीय हिंसेचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न सतत करीत राहिले पाहिजे, असा गांधीवादाचा सिद्धांत आहे. अर्थात, असे प्रयत्न ज्यांनी करावयाचे त्यांनी असंग्रह आणि अहिंसा ही व्रते स्वीकारून निर्लोभ वृत्तीने उत्पादनाचे कार्य चालू ठेवले पाहिजे आणि जीवित-वित्ताच्या रक्षणासाठीही हिंसेचा आश्रय न करण्याची वृत्ती आपल्या अंगी बाणविली पाहिजे. तसेच, राज्यसंस्थेच्या रूपाने जे शस्त्रबल संघटित झालेले असते त्याने योग्य मर्यादांचे अतिक्रमण केले असता त्याचा अनत्याचारी असहकाराने प्रतिकार करण्याचे शिक्षण दलित जनतेला नित्य देत राहिले पाहिजे. ही अनत्याचाराची असहकाराची वृत्ती समाजात जागृत राहिली तर राज्यसंस्थेकडून होणारी अन्याय्य हिंसा कमी होत जाऊन, अहिंसेने आत्मरक्षण करण्याचे बल आणि असंग्रहवृत्ती यांची वाढ समाजात होत राहील. अशा रीतीने समाजातील आर्थिक विषमतेचा, वर्गसंस्थेचा आणि राजदंडाचा उत्तरोत्तर लोप होत जाईल हे गांधीवादी क्रांतिशास्त्राचे राजकीय व आर्थिक क्षेत्रातील धोरण असले पाहिजे. पण आर्थिक विषमता, वर्गसंस्था आणि राजदंड या सर्व संस्था हिंसक आहेत आणि त्यांचे समर्थन केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीनेच होऊ शकते याचा स्पष्ट बोध गांधीवादी क्रांतिकारकांनी करून घेतला पाहिजे.

याच्या उलट मार्क्सवाद्यांनी हे मान्य केले पाहिजे की, वर्गसंस्था नष्ट करून वर्गहीन समाज स्थापन करण्याचा काळ उत्पादनसाधनांतील प्रगतीमुळे आज नजीक आलेला असला, तरी त्याची संस्थापना करण्यापूर्वी समाजाच्या अंतःकरणात सामाजिक भावनांत आणि विचारसृष्टीत जी आमूलाग्र क्रांती घडून येणे अवश्य आहे, ती क्रांती केवळ राजदंडाच्या जोरावर घडवून आणता येणार नाही. रशियातील बोल्शेव्हिक पक्षाप्रमाणे विशिष्ट क्रांतिकारक परिस्थितीत राजदंड हाती घेता येऊन आपल्या पक्षाची हुकूमशाही स्थापन करता आली तरी तेवढ्याने एकवर्ग समाज निर्माण करता येत नाही आणि दंडहीन अवस्था प्राप्त होऊ शकत नाही.

हे सर्व खरे असले, तरी आज वर्गसंस्था नष्ट करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे व प्रभावी रूपात सुरू झाल्याचे दलित वर्गाला दिसू लागल्यावाचून समाजात पेटणारा वर्गकलह शांत होऊ शकत नाही आणि आर्थिक विषमता नष्ट करण्याचे प्रयत्न राजदंडधारी पक्षाकडून होत असल्याचे जनतेच्या अनुभवास येत नाही, तोपर्यंत त्या राज्यसंस्थेला जनतेची हार्दिक निष्ठा संपादन करता येणे शक्य नाही हा बोध गांधीवाद्यांनी घेतलाच पाहिजे. असा बोध घेऊन जर ते वर्गहीन समाज निर्माण करण्यासाठी आपण क्रांतिकारक प्रयत्न करीत आहो असा विश्वास जनतेत निर्माण करू शकले आणि आपल्या देशात, राजदंड वर्गहीन समाजाची संस्थापना करण्याचे ध्येय मान्य करणाऱ्या व आर्थिक विषमतेचे निर्मूलन करण्यास अनुकूल धोरण अवलंबिणाऱ्या राजकीय पक्षास राज्यसंस्थेवर आरूढ करू शकले, तरच त्यांना आपल्या देशातील कम्युनिस्ट क्रांती टाळता येईल. जर या कामी त्यांनी दिरंगाई केली तर कम्युनिस्ट क्रांतीने एकवर्ग समाज स्थापन होणार नाही हे खरे असले तरी कम्युनिस्ट क्रांतीचे प्रयत्न थांबविण्यात त्यांना यश येणार नाही. अर्थात त्यामुळे देशातील अराजक वाढत गेल्यावाचून राहणार नाही. कम्युनिस्टांचा काही काळ विजय झाला तरी अखेरीस सर्व जगाला गांधीवादाकडेच यावे लागेल असे मानून स्वस्थ बसणे हा वेदान्त म्हणता आला तरी त्याला गांधीवाद किंवा अहिंसक क्रांतिशास्त्र हे नाव देता येणार नाही. वर्गकलहात्मक क्रांतीतून निर्माण होणाऱ्या कामगारशाहीच्या मार्गाने वर्गहीन व दंडहीन समाज निर्माण होईल हा मार्क्सवादातील आशावाद जरी अनुभवाने खोटा ठरला तरी भांडवलशाही आर्थिक घटनेत वर्गविग्रह वाढत जातो आणि त्यातून अराजक माजून समाजधारणेस अवश्य असणारे उत्पादनकार्य बंद पडते व अखेरीस राज्यसंस्था कोसळू लागते, हे मार्क्सवाद्यांचे मत खोटे ठरलेले असून त्याचा अधिकाधिक प्रत्ययच जगाला येत आहे.

आजच्या जगाला प्राप्त झालेली ही अवस्था लक्षात घेऊन भांडवलदार लोकशाहीत आर्थिक क्रांती करून दाखविण्याचा विचार जर येथील सत्याग्रही करणार नाहीत, तर सत्याग्रह हे अहिंसक क्रांतिशास्त्र आहे हा त्यांचा दावा त्यांना सोडून द्यावा लागेल. मग तो त्यांचा दावा एक आध्यात्मिक वेदान्तच ठरेल. पण असा विचार गांधीवाद्यांनी केला नाही तरी हिंदी समाजवादी करीत आहेत. आणि गांधींच्या राजकारणाचा वारसा आपणासच मिळाला आहे असे मानणारा कॉंग्रेस पक्ष या क्रांतिकार्यात अग्रेसर बनला नाही, तरी समाजवादी पक्ष तसा बनू पाहत आहे. वस्तुतः कॉंग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष आणि गांधीवादाची जीवनदीक्षा घेतलेले सर्वोदयवादी या तीनही शक्ती एकत्र येतील तर या देशात स्थापन झालेली लोकशाही सर्व क्षेत्रात प्रभावी बनून तिला समाजवादी क्रांती घडवून आणण्यास फार काळ लागण्याचे कारण नाही. पण आज सत्याग्रही क्रांती घडवून आणणारा मुत्सद्दी नसल्यामुळे या तीन शक्ती असूनही वर्गहीन समाज निर्माण करण्याच्या क्रांतिकार्यास प्रारंभही झाल्याचे दिसत नाही. ...

मानवसमाजाची प्रगती हिंसावृत्तीकडून अहिंसावृत्तीकडे होत आहे व झाली पाहिजे हे खरे असले, तरी मानवातील हिंसावृत्ती कमी होऊन अहिंसावृत्तीची वाढ होण्यास अनुरूप अशी सामाजिक परिस्थिती कशी निर्माण करावी, हा प्रश्न प्रत्येक युगात समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र यांना सोडवावा लागतो. या सामाजिक शास्त्रांचा दृष्टिकोन परिस्थितिनिष्ठ आणि वास्तववादी असावा लागतो. कारण सर्वसामान्य मनुष्याची आदर्शनिष्ठा, ध्येयनिष्ठा अथवा अध्यात्मप्रवृत्ती यांची वाढ होण्यास कोणती सामाजिक परिस्थिती उपयुक्त ठरेल याचाच विचार प्रामुख्याने ही शास्त्रे करीत असतात. तेव्हा मनुष्यस्वभावाचे आदर्श स्वरूप कोणते आहे एवढेच लक्षात घेऊन न थांबता सर्वसामान्य मनुष्य आज कोणत्या अवस्थेत आहे याचा विचार करून, त्याची उन्नतीही होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण करावी याचा विचार त्यांना करणे भाग पडते. आधुनिक युरोपात अलीकडे समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या शास्त्रांचा विचार पुष्कळ वाढला असला असला तरी त्यात मनुष्यस्वभावाच्या आदर्श स्वरूपाकडे आणि ते आदर्श स्वरूप प्राप्त करून घेण्याच्या मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणेकडे दुर्लक्ष झालेले आहे. यामुळे मानवसमाजाच्या व्यवहारांची शास्त्रे बनविताना मानवाच्या या आध्यात्मिक प्रेरणेचा विचार होत नाही. ही सामाजिक शास्त्रे भौतिक शास्त्राप्रमाणे नियतिवादी बनू लागलेली आहेत. भौतिकशास्त्रांप्रमाणे सामाजिक शास्त्रांना नियतिवादी व यांत्रिक स्वरूप देता येत नाही. याची जाणीव मार्क्सवाद्यांनी आवश्य ठेवली पाहिजे. कारण, ती जाणीव झाल्यामुळेच मार्क्सने यांत्रिक भौतिकवाद सोडून देऊन विरोधविकासी भौतिकवादाचा पुरस्कार केला. पण ही जाणीव मार्क्सवादी क्रांतिकारक आपल्या राजकीय व्यवहारात व धोरणात ठेवीत नाहीत. यामुळे त्यांचे सामाजिक शास्त्रातील विवेचनही यांत्रिक पद्धतीचे व नियतिवादी होत असते. त्यांनी मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणेचे स्वरूप आणि महत्त्व समजून घेतलेले नाही, तोपर्यंत त्यांच्या सामाजिक शास्त्रीय विवेचनावर यांत्रिक भौतिकवादाची व नियतिवादाची पडलेली ही छाप त्यांना दूर करता येणार नाही. मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणेकडे दुर्लक्ष करून बनविलेली सामाजिक शास्त्रे नियतिवादाच्या खोड्यात अडकल्यावाचून राहत नाहीत हा नियम मार्क्सवादालाही लागू पडतो. मार्क्सवादासहित सर्वच आधुनिक युरोपीय सामाजिक शास्त्रांना या आत्मप्रेरणेचे स्वरूप व महत्त्व लक्षात घेऊन आपल्या सिद्धान्ताची फेरमांडणी करावी लागणार आहे.

त्याचप्रमाणे मानवी अंतःकरणातील भौतिक प्रेरणांकडे दुर्लक्ष करून त्याच्या केवळ आत्मप्रेरणेच्या आधारावर सामाजिक शास्त्रांची उभारणी करण्याचा प्रयत्न ज्या प्राचीन धर्मशास्त्रज्ञांनी केला, त्यांच्याही हातून समाजघटनेच्या शास्त्राला एकांगी स्वरूप प्राप्त झालेले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ज्यांनी आध्यात्मिक दृष्टीने समाजघटनेचा विचार केला

त्यांच्या हातून प्राचीन काळी दोन प्रकारचे प्रमाद घडल्याचे दिसून येते. त्यांच्यापैकी काहींनी समाजाच्या भौतिक गरजांचा व प्रेरणांचा प्रश्न न सोडविता सर्वांना संन्यास घेण्याचा उपदेश केला, तर इतरांनी, समाजाचे धारणपोषण आणि संरक्षण होण्यास अथवा करण्यास तत्कालीन ज्ञानास अनुसरून जेवढी हिंसा व जेवढी विषमता त्यांना अपरिहार्य वाटली, त्या हिंसेला व त्या विषमतेला त्यांनी सनातन धर्माचे व मानवी अंतःकरणातील शाश्वत आत्मप्रेरणेचे चिरंतन स्वरूप देऊन टाकले. यामुळे केवळ आध्यात्मिक क्षेत्रात अहिंसा व समता यांना मान्यता देऊन, सामाजिक व्यवहाराच्या क्षेत्रात जी हिंसा व विषमता त्यांनी मान्य केली, त्या हिंसेला व विषमतेला धर्माचे पावित्र्य प्राप्त झाले आणि त्या हिंसेचे व विषमतेचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न धर्माला व अध्यात्माला बाधक होतील अशी समजूत समाजात रूढ झाली. अशा गैरसमजुतीमुळेच प्रत्येक धर्मसंस्था व राज्यसंस्था यांनी समताप्रस्थापक क्रांतिकार्यांना व क्रांतिकारकांना विरोध करून धर्माला व अध्यात्माला प्रतिक्रांतिकारक व समाजद्रोही स्वरूप प्राप्त करून दिले आहे. म. गांधी यांनी धर्मभावना आणि आत्मप्रेरणा यांचे क्रांतिकारक स्वरूप जगाला प्रकट करून दाखविले आणि म्हणूनच त्यांच्या सत्याग्रही जीवनापासून आधुनिक मानवाला खऱ्या मानवधर्माचे व खऱ्या अध्यात्माचे स्वरूप व महत्त्व पटण्याची आशा वाटू लागली आहे. धर्माला व अध्यात्माला म. गांधींनी हे जे क्रांतिकारक स्वरूप आणून दिले आहे, ते प्रभावी ठरवायचे तर मानव-समाजाच्या भौतिक गरजांचा व प्रेरणांचा प्रश्न सोडवून दाखवून ते प्रश्न सोडविताना अवश्य वाटणारी हिंसा व सामाजिक विषमता किंवा वर्गभेद कसे नष्ट करावेत याचे सोपपत्तिक शास्त्रीय विवेचन गांधीवाद्यांनी केले पाहिजे.

वर्गसंस्था आणि युद्धसंस्था यांचा विनाश करण्याचा काळ आज आलेला आहे. आज-पर्यंत या संस्थांचा उपयोग काही प्रमाणात मानवसमाजाला झालेला आहे आणि तरीही त्या संस्था आज मानवसमाजाच्या संस्कृतीस विघातक ठरत आहेत. याचे कारण मानवाचे भौतिक ज्ञान व त्याची भौतिक साधने यांच्यात झालेली वाढ हेच आहे. तथापि या भौतिक ज्ञानाची व भौतिक साधनांची वाढ ही मानवाच्या नैतिक व आत्मिक उन्नतीस आजपर्यंत पोषक झालेली आहे आणि युद्धसंस्था व वर्गसंस्था नष्ट करून सर्व जगाचे एक राज्य व सर्व जगात एकवर्गसमाज स्थापन करून आपण यापुढेही या भौतिक ज्ञानाचा व साधनांचा उपयोग मानवाच्या नैतिक व आत्मिक उन्नतीस करून घेऊ शकू अशी त्यांच्याकडे पाहण्याची आशावादी दृष्टी गांधीवादाने स्वीकारली पाहिजे. भौतिक ज्ञान आणि भौतिक साधने यांचा उपयोग करून सर्वसामान्य मनुष्याची भौतिक राहणी सुधारण्याची व त्याला बौद्धिक, नैतिक व आत्मिक विकासास आवश्यक असणारी विश्रांती व फुरसत मिळवून देण्याची शक्यता आज निर्माण झाली आहे, हे भौतिक शास्त्रीय प्रगतीचे व संस्कृतीचे ऋण गांधीवादाने मान्य केले पाहिजे. एकवर्ग समाज आणि समाजाची दंडहीन अवस्था या

ध्येयांचा उदय होऊन त्यांच्या संस्थापनेसाठी आपल्या जीविताचा होम करण्याची प्रेरणा मानवसमाजात जागृत आहे, ही गोष्ट आशादायक आहे. त्यावरून मानवसमाजाच्या भवितव्याबद्दल आशा वाटते. तसेच मानवाची आत्मप्रेरणा शुद्ध झालेली नसली, तरी ती नष्ट झालेली नाही, इतकेच नाही तर ती प्रज्वलित होत आहे, याबद्दल समाधानाची वृत्ती धारण करण्यासही भरपूर आधार आहे. वर्गहीन समाज हे आपले निकटचे क्रांतिकार्य आहे आणि दंडहीन समाज हे आपले अंतिम साध्य आहे, हे ओळखणारे सत्याग्रही हेच लोकशाही समाजवादाची स्थापना करून मार्क्सवादाचे निर्मूलन करू शकतील. पण तसे करावयाचे तर आम्ही वर्गविग्रह करणारच नाही, असा आग्रह त्यांनी न धरता या वर्गविग्रहाचा अहिंसक पर्याय सत्याग्रह हा आहे, हे ओळखून त्यांनी पीडित जनतेचा पक्ष घ्यावा आणि धनिक वर्गाशी अहिंसक युद्ध करण्यास प्रवृत्त व्हावे हेच इष्ट आहे.

आज भांडवलदार व कामगार हे दोनही वर्ग एकमेकांशी हिंसक वृत्ती धारण करून लढू पाहत आहेत. असे असले तरी त्या दोहोंपैकी भांडवलदारांचा पक्ष हा अन्यायाचा आहे व कामगारांचा पक्ष हा न्यायाचा आहे असा विवेक गांधीवाद्यांनी केला पाहिजे. दोन व्यक्ती, दोन वर्ग किंवा दोन राष्ट्रे एकमेकांशी हिंसक वृत्ती धारण करून लढा करण्यास प्रवृत्त झाले असले, तरी ते दोघे सारखेच दोषी अथवा अपराधी आहेत असे मानून, अहिंसेच्या उपासकांना स्वस्थ बसता येत नाही व तटस्थ वृत्तीही स्वीकारता येत नाही. हिंसक वृत्तीने लढू पाहणाऱ्या व दोघांपैकी कोणाचा पक्ष न्यायाचा आहे, कोणाचा अन्यायाचा आहे, याचा आपल्या बुद्धीप्रमाणे निर्णय करून ज्याचा पक्ष न्यायाचा असेल त्याला अहिंसाबलाने त्या न्यायाची संस्थापना करण्याचा मार्ग दाखवून द्यावा लागतो....

भांडवलशाही संस्कृतीत जे मालकी हक्क कायदेशीर गणले जातात आणि जी उत्पादन-पद्धती अवलंबिण्यात येते, त्यांच्यामुळे कामगारवर्ग लुबाडला जात असतो आणि भांडवलदारवर्ग ही लुबाडणूक करीत असतो. अशा रीतीने या संस्कृतीत लुबाडले जाणारे व लुबाडणारे अशा दोन्हीही वर्गांत नित्य कलह किंवा हितविरोध निर्माण होत असताना दोनही वर्ग आपआपल्या वर्गीय स्वार्थासाठी लढत असलेले वरकरणी दिसत असले, तरी एकाचा स्वार्थ न्याय्य व दुसऱ्याचा अन्याय्य आहे हे लक्षात घेतल्यास, या वर्गलढ्यात लुबाडला जाणाऱ्या कामगारवर्गाचा पक्ष सत्याग्रहींनी घेतला पाहिजे आणि ही लुबाडणूक थांबविण्यासाठी आवश्यक असणारी सामाजिक क्रांती म्हणजे समाजवादी क्रांती करू इच्छिणाऱ्यास साहाय्य केले पाहिजे. सत्याग्रही लढ्याचे तंत्र वर्गविरोधाच्या कामी कसे उपयोगात आणावे ते म. गांधींनी प्रत्यक्ष दाखवून दिलेले नाही व याबाबतीत त्यांचे उद्‌गारही निःसंदिग्ध व निर्णायक असे नाहीत. ज्याप्रमाणे साम्राज्यशाहीविरुद्ध चालू असलेला लढा सत्याग्रही पद्धतीने जित राष्ट्राला चालविता येईल हे त्यांनी दाखवून दिले, त्याचप्रमाणे पीडितवर्गाला पीडकवर्गाविरुद्ध आपला लढा अनत्याचारी असहकाराने व

सत्याग्रहाने चालविता येईल असे त्यांनी म्हटलेले आहे. याच्या उलट वर्गलढा हे तत्त्वच आपणास मान्य नाही. वर्गविग्रह हा विचारच अहिंसेच्या विरुद्ध आहे आणि वर्गसमन्वय हेच धोरण अहिंसावाद्यांनी नेहमी धारण केले पाहिजे असेही किंवा अशा अर्थाचेही त्यांचे उद्गार दाखवून देता येतात. यामुळेच वर्गहीन समाजाचे ध्येय त्यांना मान्य नव्हते असेही प्रतिपादन करता येते. पण हा मतभेद केवळ गांधीजींच्या शब्दप्रमाण्याने सुटणारा नसून त्याचा सत्याग्रही निष्ठेच्या लोकांनी स्वतंत्र बुद्धीने निर्णय केला पाहिजे. आजच्या जगाची वास्तव परिस्थिती लक्षात घेऊन आणि आजच्या जगात चालू असलेल्या वर्ग-लढ्यातील दोन्हीही पक्षांचे मत व युक्तिवाद यांचा विचार करून न्यायसंस्थापनेचा वास्तववादी दृष्टीने विचार करता मला असे वाटते की, जोपर्यंत जित राष्ट्र साम्राज्यशाही-विरुद्ध लढत होते तोपर्यंत वर्गसमन्वयाचे धोरण समर्थनीय व इष्टच होते. पण आपले जितराष्ट्र स्वतंत्र होऊन त्यात भांडवलदार लोकशाही, राज्यघटनेच्या कायद्याने स्थापन झाल्यानंतर आता सत्याग्रहींना वर्गसमन्वयाचे धोरण सोडून देऊन आज राष्ट्रात चालू असलेला वर्गविग्रह सत्याग्रही पद्धतीने शेतकरी–कामकरी वर्गाला कसा चालविता येईल ते दाखवून देऊन, आपल्या राष्ट्रातील लोकशाहीला समाजवादी स्वरूप देण्याचेच धोरण स्वीकारले पाहिजे. समाजवाद व मार्क्सवाद यांच्यातील सत्याचा अंश आत्मसात करण्याचे आणि समाजवादी क्रांतीत अपरिहार्य भासणारी हिंसा परिहार्य होऊ शकते हे दाखवून देण्याचे कार्य सत्याग्रहींनी आपल्या अंगावर घेतले पाहिजे. अहिंसक लोकशाही व अहिंसक समाजवाद यांची संस्थापना करण्याच्या मार्गानेच मानवसमाजाला गांधीजींना अभिप्रेत असणाऱ्या रामराज्याकडे किंवा आत्मराज्याकडे आपली प्रगती करता येईल असे मी मानतो. अर्थात हा अहिंसक लोकशाही समाजवाद विकेंद्रित उत्पादनपद्धती आणि विकेंद्रित राज्यसंस्था यांच्या अधिष्ठानावरच उभारता येईल हे तत्त्व गांधीवादापासून किंवा युरोपातील अराज्यवादापासून समाजवाद्यांनी शिकले पाहिजे. हा बोध भारतीय समाज-वाद्यांनी आत्मसात केला असून त्यांनी वर्गविग्रहाला सत्याग्रही स्वरूप देण्याचे धोरणही स्वीकारलेले आहे. यातूनच सत्याग्रही समाजवादाची निर्मिती होणार आहे.

## युगधर्म आणि सनातन धर्म

मानवधर्माचा विचार करीत असता त्याचे एक अंतःस्वरूप आहे व दुसरे बाह्यस्वरूप आहे, असे दिसून येते. मानवधर्माचे अंतःस्वरूप मानवाच्या अंतःकरणात नित्य वसत असलेल्या आत्मप्रेरणेच्या रूपाने प्रकट होते आणि त्याला सर्व प्राणिमात्रांशी व विश्वाशी तादात्म्य पावून सर्वात्मभावनेचा आनंद उपभोगण्यास आणि सर्वहितबुद्धी धारण करून, भूतमात्रांचे क्लेश निवारण करण्याच्या सेवाकार्यास प्रवृत्त करीत असते. यासंबंधाची अंतःकरणातील ओढ ही त्याची मुमुक्षावृत्ती असून त्या वृत्तीच्या अधीन झालेला मनुष्य जीवनाशा व विनाशा यांच्या बंधनातूनही मुक्त होऊन जेव्हा सर्वात्मभावनेने सर्वभूतहित

करण्यात रत होतो तेव्हाच त्याला मोक्षप्राप्ती झाली किंवा आत्म साक्षात्कार झाला असे आपण मानतो. हा आत्मसाक्षात्कार म्हणजे आपण मेल्यानंतर प्राप्त होणारा एखादा परलोक किंवा मृत्यूनंतरची विशिष्ट अवस्था आहे, असे असून तो साक्षात्कार ऐहिक जीवनातच इहलोकीच प्राप्त झाला पाहिजे अशी तळमळ आपणास लागली पाहिजे....

... सर्व मानवांचा हा मोक्षरूप सनातन धर्म असून त्याचे स्वरूप शाश्वत असले तरी त्यासंबंधीचे मानवाचे विचार व बौद्धिक ज्ञान यात कालक्रमानुसार भर पडत जाते. या सनातन मोक्षधर्माच्या शास्त्राला अध्यात्म किंवा वेदान्त असे नाव आम्ही दिलेले असून जगातील सर्व धर्मांचे अंतरंग अशाच प्रकारचे आहे. यासंबंधीचे वेद, भगवद्गीता, धम्मपद, बायबल व कुराण या ग्रंथांतील विवेचन सामान्यतः एकाच प्रकारचे आहे असे सूक्ष्म विचारांती दिसून येते.

मानवी अंतःकरणात आत्मप्रेरणेच्या रूपाने प्रकट होणाऱ्या धर्माच्या या अंतःस्वरूपासारखेच त्याचे एक बाह्य स्वरूप असून आत्मप्रेरणेने जागृत झालेली सर्वहितबुद्धी आणि सर्वात्मभावना यांच्या आधारावर उभारलेल्या समाजघटनेसंबंधीच्या व सामाजिक कर्तव्यासंबंधींच्या विधिनिषेधांच्या रूपाने प्रकट होणारे धर्माचे बाह्यांग किंवा बाह्यस्वरूप आहे. धर्माच्या या बाह्यांगासच धर्मशास्त्र किंवा स्मृति अशी नावे असून समाजधारणेची तत्त्वे आणि सामाजिक कर्तव्यांची नीती यांचा विचार या धर्मशास्त्रात केलेला असतो. धर्माचे हे बाह्यांग युगायुगानुसार बदलणारे व नित्य प्रगती करणारे असेच असले पाहिजे. या धर्मशास्त्राची अथवा समाजशास्त्राची उभारणी करताना केवळ संतांची गूढ आत्मसाक्षात्कारी वृत्ती (mystic intuition) आधारास घेऊन काम भागत नाही. तर या गूढ आत्मसाक्षात्कारी वृत्तीमुळे मानवबुद्धीसमोर जे समाजरचनेचे निरनिराळे आदर्श दिसू लागतात त्यांना मूर्त स्वरूप कसे देता येईल, ती अमूर्त ध्येये मानवसमाजाच्या रचनेत कशी साकार करता येतील आणि त्या ध्येयांची उपासना सर्वसामान्य जनतेला करता येईल अशी सामाजिक, आर्थिक व राजकीय रचना कशी स्थापन करता येईल व तिचे संरक्षण कसे होईल या प्रश्नांचा विवेचक शास्त्रीय बुद्धीने व वास्तववादी दृष्टीने निर्णय करावा लागतो. अर्थात विवेचक शास्त्रीय बुद्धी (analytical reason) ने वास्तववादी दृष्टीने दिलेले हे निर्णय देश-काल-परिस्थितीच्या बंधनांनी मर्यादित झालेले असतात. अर्थात, ही देशकालपरिस्थिती पालटेल त्याप्रमाणे हे निर्णय पालटावे लागतात आणि परिस्थित्यनुसार आपले निर्णय व सिद्धांत पालटण्याची ही बुद्धी नष्ट झाली म्हणजे त्या विवेचक शास्त्रीय बुद्धीतून निर्माण झालेले धर्मशास्त्र प्रतिगामी व प्रतिक्रांतिकारक बनून समाजाच्या ऱ्हासास कारण होत असते, शास्त्रीय बुद्धीवर चढलेल्या तमोगुणाचा हा परिणाम असतो. आज जगात निरनिराळी धर्मशास्त्रे धर्माच्या नावाने मिरवीत आहेत, ती याच तमोगुणातून निर्माण झालेल्या विकृत व अहंकारी शास्त्रीय बुद्धीची प्रतीके आहेत. आज मानवसमाजाला नवा युगधर्म

समजावून सांगण्याची व तो पटवून देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असून लोकशाही समाजवाद असेच आजच्या युगधर्माचे स्वरूप आहे. या युगधर्माची संस्थापना करण्यानेच मानवी अंतःकरणातील आत्मप्रेरणा शांत होईल व काही काळ मानवसमाजाला शांतीसुखाचा अनुभव घेता येईल. मानवाचा सनातन धर्म कोणता व त्यासंबंधीचे अद्ययावत् विचार काय आहेत असा प्रश्न केल्यास, त्याचे उत्तर "सत्याग्रह" असे देता येईल. त्याचप्रमाणे, मानवाचा युगधर्म कोणता असा प्रश्न उपस्थित झाल्यास या सत्याग्रहाच्या शक्तीने निर्माण होणारा "लोकशाही समाजवाद" असेच उत्तर आजची विवेचक शास्त्रीय बुद्धी देऊ शकेल असे मला वाटते. मानवसमाजाला आजच्या संकटमय अवस्थेतून आपला उद्धार करून घ्यावयाचा असेल तर सत्याग्रह आणि समाजवाद या दोहोंचीही आपणास आवश्यकता आहे व त्या दोहोंच्या समन्वयानेच आपल्यापुढील सर्व प्रश्न सुटणार आहेत. हे प्रश्न सोडविताना संतांची गूढ साक्षात्कारी वृत्ती आणि त्यांची आदर्शनिष्ठा यांचा जसा उपयोग होणार आहे, तसाच विवेचक शास्त्रीय बुद्धीचाही उपयोग आपणास करावा लागणार आहे. मार्क्सवाद्यांनी संतांच्या गूढ साक्षात्कारी वृत्तीची हेटाळणी चालविली आहे तर गांधीवाद्यांनी विवेचक शास्त्रीय बुद्धीकडे दुर्लक्ष चालविले आहे. गांधी व मार्क्स यांच्या दर्शनांचा समन्वय होईल तेव्हा संतांची साक्षात्कारवृत्ती आणि शास्त्रज्ञांची विवेचन बुद्धी यांचाही समन्वय होईल. असे झाल्यावाचून आजच्या मानवसंस्कृतीपुढील समस्या उलगडता येणार नाहीत. ह्या समन्वयाचे कार्य आधुनिक भारतातच होणार आहे. कारण आधुनिक युरोपात उदय पावलेली व काही काळ जगावर प्रभाव गाजविणारी संस्कृती आज नष्ट होत असून, मानवाला नवा धर्म आणि नवे अध्यात्म शिकविण्याचे कार्य भारतीयांवाचून करण्यास आज कोणीही समर्थ दिसत नाही. भारताचे सुप्त सामर्थ्य म. गांधींच्या तपश्चर्येने आज जागृत झाले असल्यामुळे आणि पंडित नेहरू व जयप्रकाश यांच्यासारखे असामान्य राजकीय नेते भारताला लाभल्यामुळे त्यांच्या हातून हे कार्य निश्चित घडून येईल अशी दृढ आशा वाटते. विनोबांसारखे तपस्वी व धर्मशास्त्रज्ञ गांधीजींचे जीवनदर्शन नवराष्ट्राच्या रूपाने साकार करण्यास लाभलेले आहेत. या सर्वांच्या विचारांचा समन्वय जितका त्वरित घडून येईल तितके त्वरित फल भारतीयांच्या अंतःकरणातील आकांक्षेला लाभणार आहे.

['नवभारत', नोव्हेंबर १९५२, पृ. १ ते ९]

३०

# मार्क्स–गांधी [प्रजासमाजवादी पक्षाच्या निमित्ताने]

[ "प्रजासमाजवादी पक्ष आणि मार्क्स – गांधी" या नोव्हेंबर १९५२ मध्ये लिहिलेल्या लेखमालेत पहिला लेख व दुसऱ्याच्या आरंभीचा भाग यात प्रजासमाजवादी पक्षाची चर्चा असून उर्वरित लेखमालेत मार्क्स आणि गांधी यांच्या विचारांची तुलना केली आहे. याच विषयावरील दुसरी एक लेखमाला या संग्रहात वर समाविष्ट केली असल्यामुळे "प्रजासमाजवादी पक्ष आणि मार्क्स–गांधी" या लेखमालेतील निवडक भागच तेवढा येथे घेतला आहे. ]

मानवी जीवनाच्या सर्वांगीण निष्ठेचा आणि विश्वघटनेच्या आदितत्त्वांचा विचार करताना मानवाला आपल्या जीवनाच्या सर्व पैलूंचा विचार करावा लागतो. माझ्या मते मानवी जीवनाला भौतिक आणि आत्मिक तसेच सामाजिक आणि वैयक्तिक असे चार पैलू आहेत. या चारांपैकी कोणत्याही पैलूस वगळून मानवाची जीवननिष्ठा बनविता येणार नाही. मानवाला सत्य आणि प्रेम यांच्याकडे ओढणारी प्रेरणा आत्मिक असून त्याला इंद्रिय सुखांकडे आणि प्राणरक्षणाकडे ओढणारी प्रेरणा भौतिक होय. या दोहोंपैकी कोणतीही एक प्रेरणा त्याज्य किंवा उपेक्षणीय मानणे तात्त्विक व व्यावहारिक दृष्टीने समर्थनीय ठरत नाही. भौतिक प्रेरणा ही साधनरूप असून आत्मिक प्रेरणा ही साध्यरूप आहे असेही म्हणता येईल.

जेव्हा भौतिक जीवन हे आत्मविकासाचे व आत्मिक सुखाचे साधन बनत असेल तेव्हाच या दोहोंचा समन्वय साधला जाऊन मानवी जीवनात खरे समाधान आणि शांती नांदू लागतील. ज्यावेळी भौतिक जीवन आणि भौतिक सुखे ही आत्मविकासाची साधने न बनता त्याच्या आड येऊ लागतात तेव्हा ती त्याज्य ठरवून त्यांचा संन्यास घ्यावा लागतो. या आत्मसुखाच्या व आत्मविकासाच्या आड येणारे भौतिक जीवन कित्येक वेळा पूर्णपणे समर्पण करून प्राणार्पण करण्याचेही प्रसंग मनुष्यावर येतात. अशा वेळीच मानवाची

सत्वपरीक्षा होते. या सत्वपरीक्षेस उतरण्याचे सामर्थ्य ज्यांच्या अंगी जितके असेल तितकी त्या मानवाची नैतिक पदवी श्रेष्ठ ठरत असते.

मानवाला भौतिक जीवनाचा कंटाळा येऊन त्याने भौतिक जीवनाची कायमची रजा घेण्याचा विचार करावा हे त्याच्या आत्मप्रेरणेचे खरे व श्रेष्ठ स्वरूप मानता येणार नाही. याच्या उलट आत्मिक प्रेरणेच्या बळावर भौतिक जीवनाची पातळी उंचावत नेणे आणि आत्मप्रेरणेतून निर्माण होणारी विश्वकुटुंबासारखी सामाजिक जीवनाची ध्येये मानवी समाजात साकार करणे आणि मानवाला ऐहिक जीवनात आत्मिक आनंदाचा उपभोग घेण्यास समर्थ करणे हेच मानवी जीवनातील आत्मिक प्रेरणेचे खरे व श्रेष्ठ स्वरूप आहे. भौतिक जीवनाचा कंटाळा वाटून इहलोकाच्या पलीकडे असणाऱ्या स्वर्गीय सुखाचा ध्यास घेऊन बसणे अथवा जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्यासाठी देहपाताची वाट पाहत बसून ऐहिक कर्तव्यातून व सामाजिक बंधनातून मुक्त होण्याचा प्रयत्न करणे हेही मानवी जीवनातील आत्मिक वृत्तीचे उन्नत स्वरूप नव्हे. असे मानणाऱ्या अध्यात्मवाद्यांप्रमाणेच निःस्वार्थ बुद्धीने व मानवतेच्या प्रेमाने मानवसमाजात बंधुभावनेचे, समतेचे व स्वातंत्र्याचे युग स्थापन करण्यासाठी आपल्या सर्वस्वाचा होम करणारे थोर पुरुष स्वतःस भौतिकवादी म्हणवीत असले तरी त्यांच्या जीवनात आत्मप्रेरणा अधिक शुद्ध स्वरूपात प्रकट होणे शक्य आहे. याचा अर्थ त्यांनी बनविलेले भौतिक तत्त्वज्ञान योग्य किंवा निर्दोष आहे असा नाही. तसेच त्यांच्या सदोष तत्त्वज्ञानाचा मानवी जीवनावर दुष्परिणाम घडून येणार नाही, असाही याचा अर्थ नाही. माझ्या म्हणण्याचा भावार्थ एवढाच आहे की, ज्याप्रमाणे मानवाच्या आध्यात्मिक वृत्तीकडे दुर्लक्ष करून बनविलेले भौतिक तत्त्वज्ञान हे सदोष व म्हणून दुष्परिणामी बनते तसेच मानवाच्या भौतिक व सामाजिक जीवनाकडे दुर्लक्ष करून बनविलेले आध्यात्मिक तत्त्वज्ञानही सदोष व दुष्परिणामी बनत असते.

आधुनिक युगापूर्वीचा युरोप खंडाचा इतिहास आणि गेल्या ५०–७५ वर्षांचा काळ सोडून दिल्यास तोपर्यंतचा भारतीय संस्कृतीचा इतिहास आध्यात्मिक तत्त्वज्ञानांचे दुष्परिणाम कसे घडतात ते दाखवून देण्यास भरपूर पुरावा देणारा साक्षीदार आहे. हा पुरावा लक्षात घेऊन मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान बनवावयाचे झाल्यास भौतिकवाद व आत्मिकवाद या दोहोंचा समन्वय साधणारेच ते बनवावे लागेल. मानवाच्या नैतिक प्रेरणेचे स्वरूप आकलन करण्यास भौतिकतेच्या पलीकडे जावे लागते हा श्री. जयप्रकाश यांचा अनुभव अत्यंत महत्त्वाचा व खरा आहे. पण त्याचबरोबर हेही खरे आहे की भौतिक व सामाजिक जीवनात प्रकट होणे हेच आत्मप्रेरणेचे खरे कार्य आहे. या सत्याकडे दुर्लक्ष करून केवळ वैयक्तिक आत्मसुखाकडे व्यक्तीला ओढून नेणारी आत्मप्रेरणा हीही सामाजिक नीतिमत्तेस विघातक झाल्यावाचून राहत नाही.

आत्मिक तत्त्व हे भौतिक तत्त्वाच्या पलीकडे आहे, ते त्याच्या आड आहे. अथवा ते त्याच्या अंतर्गत आहे अशी जशी भाषा वापरता येते तशीच अशीही भाषा यथार्थपणे योजता येते की, आत्मिक तत्त्वच भौतिकतेच्या रूपाने प्रकट होत असते व नटत असते. भौतिक आणि सामाजिक जीवनाला संपन्न आणि उन्नत बनविणे, त्याला सुखी व शांत बनविणे, हेच आत्मिक तत्त्वाचे खरे कार्य आहे. किंबहुना भौतिक तत्त्वाचे संपन्न, उन्नत, श्रेष्ठ आणि शांत स्वरूप म्हणजेच आत्मिक तत्त्व होय.

एकदा भौतिक व आत्मिक तत्त्वांतील अद्वैताचा सिद्धांत मान्य केला म्हणजे भौतिकवाद श्रेष्ठ की आत्मिकवाद श्रेष्ठ या वादविवादाच्या पलीकडे जाऊन आपण त्या दोहोंचा समन्वय साधणाऱ्या अथवा साधू पाहणाऱ्या निरनिराळ्या अद्वैत सिद्धांतातील तारतम्याची चर्चा करू लागतो. भौतिक व आत्मिक ही तत्त्वे दोन दिसत असली तरी त्यांच्या द्वैताच्या बुडाशी अद्वैत आहे, असे म्हणून एक प्रकारचा "द्वैताद्वैत सिद्धांत" (Unity of Opposites) मान्य करण्यापलीकडे आपली प्रवृत्ती होऊ लागते. त्यांच्यातील द्वैत आणि अद्वैत ही दोनही खरी आहेत, केवळ त्यांच्यात अद्वैत आहे हेही खरे नाही आणि त्यांच्यात केवळ द्वैत आहे हेही म्हणणे बरोबर नाही असे मानणारे एक तर्कशास्त्र आधुनिक काळात उदय पावत आहे.

हेगेल व मार्क्स या दोघांनाही मान्य असणारे विरोधविकासी तर्कशास्त्र (Dialectical Logic) हे असेच तर्कशास्त्र आहे. पण त्या दोघांचा तत्त्वज्ञानातील निष्कर्षरूप सिद्धांत पूर्णपणे या तर्कशास्त्रावर उभारलेला आहे असे नाही. हेगेलने आपला अद्वैतवाद केवळ आत्मिक बनविण्याचा आग्रह धरलेला असून मार्क्सने आपला अद्वैतवाद केवळ भौतिक बनविण्याचा दुराग्रह धरलेला आहे. वस्तुतः या दोघांचाही हा दुराग्रह त्यांच्या विरोध-विकासी तर्कशास्त्राशी विसंगत आहे.

## अद्वैतवादाचे निरनिराळे प्रकार

अद्वैतवाद म्हटले की, आम्हास शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचे स्मरण होते. प्रकृती आणि पुरुष अथवा जड आणि चेतन यांचा समन्वय करण्याचा एक प्रकार शंकराचार्य यांनी मायावादाच्या अथवा विवर्तवादाच्या तर्कशास्त्राचा आश्रय करून भारतीय तत्त्वज्ञानात रूढ केलेला आहे. भौतिक तत्त्वाला मायामय अथवा आभासात्मक ठरवून त्याचे चैतन्याशी अद्वैत सिद्ध करणे अशी ही दृष्टी आहे. भौतिक सृष्टी आभासात्मक न ठरविता आत्मिक तत्त्व व भौतिक तत्त्व या दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न प्राचीन उपनिषदात केलेला असून त्यात जगाला आभासात्मक ठरविण्याचे शंकराचार्य यांचे विवर्तवादी तर्कशास्त्र अवलंबिलेले नसून "वितर्कवादी तर्कशास्त्र" (Dialectical Logic) अवलंबिलेले होते असे आचार्य विनोबा यांनी 'ईशावास्यवृत्ति' या पुस्तकात सूचित केले आहे. या तर्कशास्त्रात

आत्मतत्त्व किंवा चैतन्य हे परस्परविरुद्ध गुणांचे अधिष्ठान आहे असे कल्पून अद्वैत सिद्धांत मांडलेला असतो. त्यामुळे इंद्रियगोचर भौतिक विश्व आणि आत्मगोचर चैतन्य यांपैकी कोणासही दुसऱ्याचा केवळ आभास असे न मानता अद्वैत सिद्धांत मांडलेला असतो.

आधुनिक भारतात भौतिकतेला मिथ्या ठरविणारे शंकराचार्यांचे अध्यात्मशास्त्र आपल्या उद्धाराचा खरा मार्ग दाखवून देण्यास पुरे पडत नाही याची जाणीव अलीकडे होऊ लागली आहे. यामुळे मायावादाचा त्याग करून अथवा त्याचा अर्थ विशद करण्याच्या मिषाने तो अर्थ बदलून घेऊन अद्वैत सिद्धांताची फेरमांडणी करण्यास सुरुवात झाली आहे. ही फेरमांडणी करताना विवर्तवाद सोडून देऊन 'वितर्कवादी तर्कशास्त्र' (Dialectical Logic) किंवा विरोधविकासी तर्कशास्त्र असे ज्याला अलीकडे म्हणतात त्याचा अवलंब करावा लागेल, असा संभव आहे.

आधुनिक युरोपीय तत्त्वज्ञानात स्पिनोझा हा पहिला व श्रेष्ठ अद्वैतवादी गणला जातो. त्याच्या अद्वैत सिद्धांतास 'चिदचिद् विशिष्ट अद्वैत' असे नाव देता येईल. त्याने चित् आणि अचित् यांपैकी कोणतेही तत्त्व आभासात्मक न ठरविता त्यांचे अद्वैत कल्पिलेले आहे. यादृष्टीने भौतिक सृष्टीला आभासात्मक मानणाऱ्या शंकराचार्यांच्या अद्वैताहून स्पिनोझाचा अद्वैत सिद्धांत आधुनिक मानवाला अधिक पटणारा असला तरी स्पिनोझाच्या तत्त्वज्ञानात नियतिवादाचे अवलंबन केलेले असल्यामुळे ते तत्त्वज्ञान मानवाचे बुद्धिस्वातंत्र्य आणि आत्मस्वातंत्र्य यांना अवसर देत नाही. म्हणूनच अठराव्या शतकाच्या अखेरीस जर्मन तत्त्वज्ञ हेगेल याने मानवी बुद्धीच्या व आत्म्याच्या स्वातंत्र्यास अवसर देणारा "विरोधविकासी अध्यात्मवाद" अथवा "विरोधविकासी कल्पनावाद" (Dialectical Spiritualism or Idealism) या नावाचा अद्वैत सिद्धांत प्रतिपादन केला. नियतिवादाची कोंडी फोडण्याच्या दृष्टीने हा सिद्धांत स्पिनोझाच्या अद्वैत सिद्धांताहून पुरोगामी असला तरी त्यात भौतिक सृष्टीला कल्पनामय किंवा आभासात्मक ठरविणारा सिद्धांत मिसळून गेलेला आहे.

हेगेलने इंद्रियगोचर वस्तुसृष्टी हा परमात्म्याच्या विचारसृष्टीचा केवळ बाह्य आविष्कार आहे असे म्हणून स्वयंविकासाचे तत्त्व विचारसृष्टीला व वस्तुसृष्टीलाही लागू करून दाखविले आहे. या दोन्ही सृष्टीतील विकास विरोधातून होत असतो असे म्हणून हा विरोधविकासाचा सिद्धांत त्याने केवळ विचारसृष्टीत लागू पडणाऱ्या सिद्धांत, प्रतिसिद्धांत व समन्वय (Thesis, Anti-thesis, Synthesis) या रूपाने प्रकट होत असल्याचे दाखवून दिले आहे.

हेगेलच्या विरोधविकासी अद्वैतवादात जो कल्पनावाद शिरला होता तो मायावादाप्रमाणेच मानवाच्या सामाजिक व भौतिक उन्नतीस मारक होणारा आहे व होत आहे हे

ओळखून मार्क्सने हेगेलच्या विरोधविकासी अद्वैत सिद्धांताची फेरमांडणी करून आपला "विरोधविकासी भौतिकवाद" (Dialectical Materialism) हा सिद्धांत बनविला. मात्र त्याने भौतिकवादामध्ये अंतर्भूत होणारा यंत्रवाद अथवा नियतिवाद यांचा बुद्धिपूर्वक त्याग करून हेगेलच्या विरोधविकासी सिद्धांतावर त्याची उभारणी केली. हेगेलने विचार-सृष्टीत स्वयंविकास होतो हे मान्य करून या विचारसृष्टीच्या स्वयंविकासाला विरोध विकासाचे तत्त्व लागू केले. परंतु विचारसृष्टीचा विकास हा केवळ अंतःप्रेरित स्वयंविकासातून घडून येत नसून तो वस्तुसृष्टीतील स्वयंविकासामुळे होत असतो या सत्याकडे मार्क्सने आपले लक्ष वेधिले आणि भौतिक विश्वातच स्वयंविकासाचे तत्त्व आहे असे प्रतिपादून विचारसृष्टीतील विकास हा वस्तुसृष्टीतील विकासाचे प्रतिबिंब आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न करताना त्याने भौतिक तत्त्वांतील स्वयंविकास मान्य केला. पण विचारसृष्टीतील अंतःप्रेरित स्वयंविकासाकडे दुर्लक्ष केले. शिवाय आपल्या विरोध-विकासी अद्वैत सिद्धांतास भौतिकवाद असे नाव देऊन विचारसृष्टीतील विकासाला केवळ यांत्रिक व जड स्वरूप प्राप्त होईल अशी भाषा योजिली आहे. त्यामुळे मार्क्सवादात मानवाच्या बुद्धिस्वातंत्र्याला अथवा आत्मस्वातंत्र्याला अवसर आहे असे केवळ तात्त्विक दृष्टीने दाखवून देता आले तरी मार्क्सवादी क्रांतिशास्त्राचा व्यवहार मानवाच्या बुद्धि-स्वातंत्र्याला व आत्मस्वातंत्र्याला मारक बनतो हे आता निर्विवादपणे सिद्ध झाले आहे.

लेनिनपासून स्टॅलिनपर्यंतच्या बोल्शेव्हिक पक्षाच्या व्यवहारावरून विरोधविकासी भौतिकवादसुद्धा मानवाच्या बुद्धिस्वातंत्र्याला व आत्मस्वातंत्र्याला विघातक ठरतो हे सिद्ध करण्यास भरपूर पुरावा उपलब्ध झाला आहे आणि म्हणूनच कोणत्याही प्रकारचा भौतिक-वाद हा मानवाच्या नैतिक व आत्मिक उन्नतीस पुरा पडू शकत नाही असे सामाजिक शास्त्रज्ञांनाही मान्य करावे लागत आहे. श्री. जयप्रकाश यांचे, भौतिकवादाच्या पलीकडे गेल्यावाचून मानवाच्या नैतिक प्रेरणेचे विवेचन करता येत नाही अशा अर्थाचे उद्गार हे याच सत्याच्या अनुभूतीवर आधारलेले आहेत. विरोधविकासी सिद्धांतावर आधारलेला भौतिकवादही मानवाच्या उन्नतीस पुरा पडत नाही. याचा अर्थ मानवाच्या नैतिक प्रेरणेचे विवेचन करण्यास अथवा तिला चोदना देण्यास केवळ अध्यात्मवाद पुरा पडू शकतो असा होऊ शकत नाही. मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान व मानवाची निष्ठा यांचे विवेचन करताना त्याच्या जीवनातील भौतिक आणि आत्मिक तसेच सामाजिक आणि वैयक्तिक या चारही पैलूंचा योग्य विचार करून ते विवेचन केले पाहिजे. हाच यापासून खरा निष्कर्ष निघू शकतो. मार्क्सचा विरोधविकासी भौतिकवाद हा अपुरा ठरल्यामुळे आपणास आता हेगेलच्या किंवा शंकराचार्यांच्या अध्यात्मवादाकडे जाता येईल किंवा गेले पाहिजे हे मत प्रतिगामी प्रवृत्तीचेच लक्षण समजावे लागेल. ...

*['साधना', ८ नोव्हेंबर १९५२, पृ. १०]*

[मार्क्सचा विचार]

विश्वाची घटना आणि सामाजिक घडामोडी या दोहोंना लागू पडणारे असे चार सिद्धांत मार्क्सवादी मानतात : (१) विश्वातील सर्व घटना एकमेकांशी संबंधित असतात. (२) विश्वातील सर्व घटनांत गतिमानता आहे. (३) सर्व घटना द्वंद्वात्मक असतात. (४) बौद्धिक आंदोलनाचा सिद्धांत. या चारही सिद्धांतासंबंधी आपण प्रथम माहिती घेऊ.

विश्वातील प्रत्येक घटना एकमेकांशी संबंधित असते. त्यामुळे विश्वातील इतर घटनांशी तिचे असलेले संबंध लक्षात घेतल्यावाचून तिच्या स्वरूपाचे नीट आकलन होऊ शकत नाही. या सिद्धांताला विश्वघटनेचा अद्वैत सिद्धांत असे म्हणता येईल. विश्वाच्या बुडाशी काहीतरी एकच तत्त्व आहे व त्यातूनच सर्व विविधता निर्माण झालेली आहे हा विचार ह्या सिद्धांताच्या बुडाशी आहे. विश्वात एकत्व व अनेकत्व ही दोन्ही एकत्र नांदत असतात. अशा शब्दांनीही तो सिद्धांत व्यक्त करता येईल.

विश्वातील प्रत्येक घटना नित्य पालटत असते, गतिमान अथवा परिवर्ती असते. विश्वाला जगत, संसार ही नावे ते गतिमान, प्रवाहरूप किंवा पालटणारे आहे हा अर्थ व्यक्त करण्यासाठीच दिलेली असतात. विश्वाच्या दृश्य स्वरूपाचे हे वर्णन भारतीय तत्त्वज्ञानात सर्वमान्य झालेले आहे. मात्र या क्षर-सृष्टीच्या बुडाशी एक अक्षर तत्त्व आहे व ते इंद्रिय, मन आणि बुद्धी यांच्या अतीत आहे असे आमच्या वेदान्त तत्त्वज्ञानात मानले जाते. गौतम बुद्ध क्षर विश्वाच्या आणि मनोबुद्धीच्या अतीत असणाऱ्या निर्वाणपदाची प्राप्ती करून घेणे हेच मानवाचे ऐहिक ध्येय अथवा साध्य आहे असे सांगतो. गौतम बुद्ध या निर्वाणपद प्राप्तीचे वर्णन करताना परमात्मा, परब्रह्म अथवा परमेश्वर यांपैकी कोणाचाही निर्देश करीत नाही. क्षर–विश्वाच्या बुडाशी एखादे अक्षर तत्त्व असलेच पाहिजे हा सिद्धांत बुद्ध तत्त्वज्ञानात अंतर्भूत झालेला नाही. मानवी जीवननिष्ठेच्या दृष्टीने निर्वाणपद प्राप्तीचे महत्त्व मार्क्सवाद्यांनी मान्य केल्यास विश्वातील सर्व घटना क्षरस्वरूपी आहेत यावाबतीत मार्क्सवाद व बुद्धतत्त्वज्ञान यांची एकवाक्यता होऊ शकेल.

विश्वातील सर्व घटना द्वंद्वात्मक असतात हा विरोधविकासी तर्कशास्त्रातील तिसरा सिद्धांत. पण त्याला केवळ द्वंद्वात्मकतेचा आधार आहे हे खरे नसून त्या सिद्धांतात प्रत्येक घटनेच्या बुडाशी असणाऱ्या एकत्वाचाही अंतर्भाव झालेला असतो. इंग्रजीत या सिद्धांताचा निर्देश Unity of Opposites अशा शब्दांनी करतात. त्याला केवळ द्वंद्वात्मकता असे नाव देण्यापेक्षा "द्वैताद्वैत" अशासारखे नाव दिल्यास तो अर्थ अधिक विशद होईल. तथापि प्रत्येक घटनेमध्ये जी गतिमत्ता असते तिचे कारण तिच्या अंतर्गत परस्परविरुद्ध धर्मांचे जे द्वंद्व नित्य चालू असते त्या द्वंद्वातच आढळते असे हा सिद्धांत सांगतो. या अंतर्गत द्वंद्वामुळे त्या घटनेचा विकास होता होता तिचे पूर्वस्वरूप नष्ट होते आणि तिला तद्विरोधी असे नवे

स्वरूप प्राप्त होते. यालाच प्रमाणभेदातून प्रकारभेद निर्माण होतो असे म्हणतात. म्हणून या सिद्धांताला प्रमाणभेदाचा व प्रकारभेदाचा सिद्धांत असेही म्हणता येईल.

बौद्धिक आंदोलनाचा सिद्धांत हा या तर्कशास्त्रातील चौथा होय. विश्वघटनेतील द्वंद्वातून प्रत्येक घटनेचा विकास होत असताना तिला परस्परविरुद्ध अशी स्वरूपे प्राप्त होतात. यामुळे कोणत्याही घटनेसंबंधीच्या मानवी विचारास परस्परविरुद्ध आंदोलने प्राप्त होऊन एकदा स्वीकारलेल्या सिद्धांताचा निषेध करावा लागतो आणि पुन्हा त्या निषेधाचाही निषेध करून पूर्वी स्वीकारलेल्या सिद्धांतासारखा भासणारा सिद्धांत मान्य करावा लागतो. या तत्त्वास "निषेधाचा निषेध" (Negation of Negation) असे नाव विरोधविकासी तर्कशास्त्रज्ञ देत असतात. मानवी विचारांची वाढ होत असता ती परस्परविरोधी तत्त्वांच्या आश्रयाने होत जाते आणि सिद्धांत, प्रतिसिद्धांत आणि त्यांचा समन्वय ( Thesis, Antithesis, Synthesis ) अशा आंदोलनात्मक पद्धतीने मानवाला सत्यसंशोधनाचा मार्ग आक्रमावा लागतो हे दाखवून देणे हेच या तर्कपद्धतीचे महत्त्व व श्रेष्ठत्व आहे. या तर्कपद्धतीच्या बुडाशी विश्व हे अद्वैतमूलक आहे, ते नित्य गतिमान आहे, त्याच्या द्वंद्वात्मकतेतून ही गतिमत्ता प्रकट होत असते आणि या द्वंद्वात्मक स्वयंगतीमुळे त्यातील प्रत्येक घटनेचा विकास व विनाश होत असल्यामुळे तिला परस्परांशी विरुद्ध अशी स्वरूपे एकामागून एक प्राप्त होत असतात. वस्तुसृष्टी आणि विचारसृष्टी या दोहोंना हे विरोधविकासाचे तत्त्व लागू करून दाखविण्याचा प्रयत्न हेगेल व मार्क्सवादी या दोघांनीही कमी-अधिक प्रमाणात केलेला आहे. पण विश्वाच्या बुडाशी असणारे अद्वैत तत्त्व हे स्वयंविकासी अथवा विरोधविकासी असले तरी ते केवळ भौतिक आहे असा आग्रह मार्क्सवादी धरीत असतात आणि याच्या उलट ते केवळ आत्मिक आहे असा आग्रह हेगेल व त्याचे अनुयायी यांचा असतो.

## हेगेल विरुद्ध मार्क्स

वरील विचारसरणी सामान्यतः हेगेल व मार्क्स या दोघांनाही मान्य असली तरी, भौतिक व ऐतिहासिक घटनांची मीमांसा करताना भौतिकवादाचा स्वीकार का केला ते लक्षात घेतले पाहिजे. मानवी विचारसृष्टीतील विरोधविकासाचे विवेचन करताना हेगेल मानवाच्या विचारसृष्टीतून परमात्म्याच्या विचारसृष्टीकडे किंवा परब्रह्माच्या संकल्पसृष्टीकडे वळतो. कारण मानवाची विचारसृष्टी आणि त्याला प्रतीत होणारी बाह्य वस्तुसृष्टी या दोहोंच्याही बुडाशी परमात्म्याचा संकल्प आहे असे मानून तो त्यांचा उलगडा करू लागतो. भौतिक व ऐतिहासिक घटनांची वस्तुसृष्टी आणि मानवाची विचारसृष्टी यांची मीमांसा करताना ब्रह्मज्ञानाची ही गूढ भाषा बोलू लागणे अथवा परमात्म्याच्या विचारसृष्टीच्या गूढ प्रदेशात संचार करू लागणे हा हेगेलच्या एकंदर विचारपद्धतीतील खरा दोष आहे असा

मार्क्सचा आक्षेप आहे. या विचारपद्धतीमुळे भौतिक व सामाजिक वस्तुसृष्टी कल्पनामय ठरू लागते आणि त्यातील प्रत्येक घटना हे परमात्म्याच्या विचाराचे बाह्य स्वरूप आहे असे मानून लोक प्रस्थापित सामाजिक घटनेविरुद्ध क्रांती करण्यास प्रवृत्त होत नाहीत व म्हणून हे अध्यात्मशास्त्र सामाजिक दृष्टीने प्रतिक्रांतिकारक बनते असा अनुभव मार्क्सच्या काळात युरोपातील क्रांतिकारकांना येऊ लागला होता. हेगेलच्या विरोधविकासी तर्कशास्त्रातील गूढ गूंजनाचा हा दोष काढून टाकण्याच्या हेतूने मार्क्सने आपले नवे विरोधविकासी तर्कशास्त्र बनविले आणि त्याची उभारणी भौतिकवादावर केली. मात्र तसे करताना भौतिकवादातील जड यांत्रिक नियतिवादाचा त्याने स्वीकार केला नाही. त्याचे भौतिक तत्त्व हे केवळ जड यांत्रिकस्वरूपी नसून ते द्वंद्वात्मक स्वयंगतीने युक्त आहे.

या भौतिक तत्त्वातील द्वंद्वात्मक स्वयंगतीमुळे भौतिक व सामाजिक घटनांची रूपांतरे व त्यांचा विकास-विनाश होत असतो. याच वस्तुसृष्टीतील द्वंद्वात्मक स्वयंगतीमुळे किंवा विकास-विनाशांच्या दृश्यामुळे मानवी विचारसृष्टीतही विरोधविकासाचे तत्त्व प्रतिबिंबीत होत असते. मानवी विचारसृष्टीतील विरोधविकासाची मीमांसा करताना परब्रह्म्याच्या संकल्पसृष्टीकडे धाव घेण्याचे काहीही कारण नसून भौतिक व सामाजिक सृष्टीतील द्वंद्वात्मक स्वयंगतीचे व विकास-विनाशांचे निरीक्षण करा म्हणजे सर्व उलगडा होईल असे सिद्ध करण्याचा मार्क्सचा उद्देश आहे. युरोपीय बुद्धिमंतांवर हेगेलने पुनरुज्जीवीत केलेल्या अध्यात्मवादाची जी पकड बसली होती तिच्यातून त्यांची मुक्तता करणे आणि हेगेलच्या इतिहासमीमांसेचा दुरुपयोग करून सामाजिक क्रांतीला विरोध करण्याचे जे प्रयत्न युरोपातील अध्यात्मवादी करीत होते त्याचे खंडन करणे हे मार्क्सच्या भौतिकवादाचे ऐतिहासिक कार्य आहे. या दृष्टीने त्यासारख्या कार्याची अद्यापही आवश्यकता आहे.

भौतिक व सामाजिक वस्तुसृष्टी आणि मानवाची विचारसृष्टी यांपैकी केवळ पहिलीलाच सर्व कर्तृत्व देऊन टाकावे आणि मानवाच्या विचारसृष्टीचे महत्त्व व कर्तृत्व नाकारावे असा मार्क्सचा हेतू नव्हता. वस्तुसृष्टी व विचारसृष्टी या दोहोंतही त्याला विरोधविकासाचे तत्त्व दिसत असले तरी ऐतिहासिक घटनांवर मानवी विचारसृष्टीचा प्रभाव पडत नाही असे त्याचे मत नव्हते, म्हणूनच विचारसृष्टीला केवळ आभासात्मक व प्रभावहीन ठरविणाऱ्या यांत्रिक भौतिकवादाचा त्याने बुद्धिपूर्वक त्याग केला. मानवी विचार, त्याचे स्वातंत्र्य आणि मानवाचे स्वयंकर्तृत्व यांचा परब्रह्माच्या संकल्पसृष्टीत अध्यात्मवादी लोप करतात म्हणून त्याने अध्यात्मवाद सोडून भौतिकवादाचा आश्रय केला आणि यांत्रिक नियतिवादाच्या पकडीत मानवाचे विचारस्वातंत्र्य व स्वयंकर्तृत्व नष्ट होऊ नये म्हणून भौतिकवादात स्वयंविकासाचे अथवा विरोधविकासाचे तत्त्व समाविष्ट केले. मानवाला स्वतःच्या कर्तृत्वाने आपला इतिहास बनविता येतो आणि भौतिक व सामाजिक घटनांवर प्रभुत्व संपादन करता येते ह्याबद्दल त्याला शंका नव्हती. मात्र मानवाच्या या स्वातंत्र्याला व कर्तृत्वाला भौतिक व

सामाजिक सृष्टीतील नियमांची व त्या नियमांच्या ज्ञानाची मर्यादा आहे हे त्याला दाखवून द्यावयाचे होते.

मार्क्सपुढे दोन प्रकारच्या लोकांच्या मतांचे खंडन करण्याचा प्रश्न होता. काही लोक हेगेलच्या गूढगुंजनात्मक अध्यात्माचा उपयोग करून प्रस्थापित सामाजिक घटनेला अवास्तव पावित्र्य देऊन चिरंतन बनविण्याचा प्रयत्न करीत होते. ह्या प्रतिक्रांतिकारक विचारांचा पंथ खोडून काढण्यासाठी त्याला हेगेलच्या विरोधविकासी तर्कशास्त्रातील दोष दाखवून द्यावा लागला. दुसरे काही लोक समाजवादी क्रांतीला अनुकूल असले तरी सामाजिक परिवर्तनाचे नियम शोधून न काढता केवळ नैतिक भावनेची शक्ती जागृत करून वाटेल तेव्हा समाजवादी क्रांती घडवून आणता येईल अशा स्वप्नरंजनात गुंगून गेले होते. या भावनावश समाजवाद्यांचे (Utopian Socialists) खंडन करणे हे मार्क्सच्या विरोधविकासी भौतिकवादाचे दुसरे कार्य होते. हे कार्य करण्यासही त्याला भौतिकवादाचा आश्रय करणे अवश्य होते. मार्क्सने खोडून काढलेल्या हेगेलच्या अध्यात्मवादासारखा प्रतिगामी अध्यात्मवाद आणि स्वप्नरंजनात गुंगून जाणारा केवळ भावनात्मक समाजवाद हे दोन्ही थोड्याफार फरकाने आजच्या भारतात आढळून येतील. या दोन प्रवृत्तींचे खंडन करण्याची आवश्यकता आजही भारतात आहे, या दृष्टीने मार्क्सच्या विरोधविकासी भौतिकवादातील "सत्यांशाचा प्रचार" करण्याची गरज अद्यापि नष्ट झालेली नाही हे खरे असले तरी आपल्या विरोधविकासी तत्त्वज्ञानाला केवळ भौतिक बनविण्याचा जो दुराग्रह मार्क्सने धरला आणि मानवी अंतःकरणातील सर्व प्रकारची धर्मभावना आणि आत्मप्रेरणा यांचे आमूलाग्र उच्चाटन करण्याचा जो प्रयत्न मार्क्सवाद्यांनी सुरू ठेवला आहे त्याचे दुष्परिणाम जगाला दाखवून देण्याची गरज त्याहूनही अधिक प्रमाणात आज निर्माण झाली आहे.

क्रांतिकारक धर्मभावना आणि आत्मप्रेरणा जनतेत जागृत करून सामाजिक जीवनाच्या भौतिक अंगात क्रांती घडवून आणणे हाच मार्क्सचा भौतिकवाद खोडून काढण्याचा खरा व प्रभावी मार्ग आहे. धर्माचे व अध्यात्माचे क्रांतिकारक स्वरूप विशद करण्याचे कार्य मार्क्सच्या काळातही रशियामध्ये टॉलस्टॉय करीत होता. पण टॉलस्टॉयच्या या आध्यात्मिक क्रांतिकार्याला रशियात यावे तितके यश आले नाही आणि म्हणूनच रशियातील क्रांतीनंतर मार्क्सवादी बोल्शेव्हिक पक्ष तेथे सर्वसत्ताधारी बनला. टॉलस्टॉयने सुरू केलेले क्रांतिकारक धर्माचे व अध्यात्माचे कार्य सत्याग्रहाच्या रूपाने म. गांधींनी आधुनिक भारतात प्रभावी बनविले. यामुळेच गेल्या तीस वर्षांत भारतीय इतिहासावर मार्क्सवादाचा प्रभाव फारसा पडलेला नाही. ...

## विरोधविकासी सत्याग्रहशास्त्र

सत्याग्रही व्यक्तीने आपल्या सभोवारच्या बदलत्या वस्तुसृष्टीस अथवा परिस्थितीस अनुरूप अशा प्रकारचे बदल नित्य आपल्या विचारात व मनात करीत राहिले पाहिजे असा गांधींचा

उपदेश असे. आपले विचार आपण व्यक्त केलेल्या पूर्वीच्या मताशी सुसंगत असले पाहिजेत एवढा एकच आग्रह धरून बसता कामा नये. बदलत्या परिस्थितीशी आपले विचार सुसंगत राहण्यासाठी सत्याग्रहीने आपली पूर्वीची मते सोडून देऊन त्यांच्या विरुद्ध मतांचा आश्रय करावा लागला तरीही तो करण्यास तयार असले पाहिजे. परिस्थितीच्या बदलानुरूप आपल्या मतात झालेल्या बदलामुळे कित्येक वेळा परस्परांशी विरुद्ध अशी मते व्यक्त केल्याचा आरोप इतर लोक आपणावर करितात असे म. गांधी म्हणत....

सत्याग्रही मनुष्याचे विचार परिस्थितीच्या आघातप्रत्याघाताबरोबर बदलत जात असल्यामुळे परिस्थितीच्या वाढीबरोबर त्या विचारांतही वाढ होत जाते. अशा रीतीने परिस्थितीच्या जबाबास प्रतिजबाब देणाऱ्या सत्याग्रही मनुष्याचे विचार, ज्यांना परिस्थितीतील परिवर्तनाची यथार्थ कल्पना करता येत नाही, त्यांना विसंगत व म्हणून तर्कदुष्ट वाटतात. पण सत्याग्रही व्यक्तीने परिस्थितीच्या बदलत्या सत्याशी एकनिष्ठ राहिले पाहिजे.

परिस्थितीतील परिवर्तनाबरोबर आपल्या विचारातही परिवर्तने घडवून आणली तरच त्याची सत्यनिष्ठा जागृत आहे किंवा जिवंत आहे, असे म्हणता येईल. वस्तुसृष्टीचे प्रतिबिंब विचारसृष्टीत पडत असते व पडत राहिले पाहिजे या तत्त्वाकडे लक्ष देऊनच मार्क्सने हेगेलचे विरोधविकासी तर्कशास्त्र सोडून दिले व आपले विरोधविकासी भौतिक तर्कशास्त्र बनविले. यात बाह्य वस्तुसृष्टीतील किंवा परिस्थितीतील परिवर्तनाची प्रतिबिंबे विचारसृष्टीत पडतात व पडली पाहिजेत, यावर सव भर दिलेला आहे. पण आपल्या विचारात बदल घडवून आणण्याची आवश्यकता एवढ्या एकाच कारणामुळे निर्माण होते असे नाही. सत्याचे आकलन करण्याची स्वतःची पात्रता वाढत गेल्यामुळे सुद्धा आपल्या पूर्वीच्या विचारांत भर टाकण्याची, त्यांची वाढ करण्याची अथवा त्यात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता सत्याग्रही व्यक्तीला अथवा समाजाला वाटली पाहिजे. सत्यसंशोधनाची आपली पात्रता वाढल्यामुळे आपणास सत्याचे स्वरूप अधिकाधिक विशद होत जाते व त्यामुळे सत्याग्रहीला कित्येक वेळा आपली पूर्वीची मते सोडून देऊन नवीन मते धारण करावी लागतात....

म. गांधींचे ... सत्याग्रहशास्त्र आणि त्यातील तर्कशास्त्र हे परिवर्तनशील अशा जगाचे, समाजाचे आणि मानवी व्यवहारांचे शास्त्र असल्यामुळे त्यात वस्तुसृष्टीत व विचारसृष्टीत आढळून येणारे स्वयंविकासाचे तत्त्व अंतर्भूत झालेले आहे. भौतिक व सामाजिक सृष्टीतील स्वयंविकास आणि त्यांच्यातील द्वंद्वे यांच्याकडे दुर्लक्ष करून अथवा त्यांच्याकडे पाठ फिरवून, मानवी जीवनातील अध्यात्माचे संशोधन अथवा आत्मिक सत्याचा साक्षात्कार करून घेऊ इच्छिणारे संन्यासमार्गी अध्यात्म हे निराळे, आणि मानवाला सामाजिक विकासाबरोबर आत्मविकास साधण्यासाठी सामाजिक द्वंद्वाचा उपयोग कसा करावा आणि त्या द्वंद्वात सत्पक्षाचा उपयोग असत्पक्षावर विजय घडवून आणण्यासाठी नित्य

झगडत राहून त्या झगड्यातच निर्द्वंद्व अवस्था कशी उपभोगावी हे दाखवून देणारे सत्याग्रही अध्यात्मशास्त्र हे अगदी वेगळे आहे. या अध्यात्मशास्त्राला क्रांतिकारक वृत्ती टिकविणारे विरोधविकासी तर्कशास्त्रही अवलंबावे लागते आणि एके काळी सत्य म्हणून कवटाळलेले सिद्धांत कालांतराने असत्य म्हणून सोडून द्यावे लागतात.

(१) जगातील सर्व घटनांच्या मागे असणारे अद्वैत, (२) वस्तुसृष्टीची व विचारसृष्टीची वाढ, (३) या दोनही सृष्टीतील घटनांचा विनाश व विकास आणि (४) सत्यसंशोधनाच्या कार्यात निमग्न झालेल्या बुद्धीला परस्परविरुद्ध सिद्धांतांचा स्वीकार व त्याग करण्यामुळे अनुभवावी लागणारी आंदोलने, ही सर्व तत्त्वे या दृष्टीत आत्मसात केलेली आहेत. या दृष्टीनेच सत्याग्रहशास्त्राला आपले तर्कशास्त्र बनवावे लागणार आहे. कारण त्याला केवळ अक्षरपरमात्म्याच्या साक्षात्काराचाच ध्यास लागलेला नसून सत्य आणि प्रेम ही मानवी जीवनातील अक्षरमूल्ये सर्व मानवी व्यवहारात प्रकट करून मानवसमाजाला आत्मराज्याची अथवा सत्ययुगाची प्राप्ती करून देण्याचे मार्ग संशोधन करण्याचा ध्यास लागलेला आहे. यातच त्याला श्रेष्ठ प्रकारची परमेश्वराची उपासना करण्याचा आनंद लाभू शकतो आणि गौतमबुद्धाला निर्वाणप्राप्तीपासून जी शांती लाभली ती शांतीही लाभू शकते. अशा क्रांतिकारक सत्याग्रहशास्त्राचे ज्ञान म. गांधींनी आम्हास करून दिले. ...

*['साधना', १९ नोव्हेंबर १९५२, पृ. ९–१०]*

## [क्रांतीचे तंत्र]

मानवाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावना यांचे युग अवतरावे असे वाटत असेल तर त्याने खऱ्या मानवधर्माचे अनुसरण केले पाहिजे. मानवाचा खरा धर्म अहिंसेने सत्याची उपासना करणे हाच आहे व त्याचे आचरण केल्यावाचून आजच्या मानवसमाजापुढे उभ्या असलेल्या कोणत्याही समस्या सुटणे शक्य नाही अशी म. गांधींची दृढ निष्ठा होती. याच्या उलट मानवसमाजाची मुक्तता व्हावयाची तर ती हिंसक वर्गयुद्धावाचून होणे शक्य नाही आणि या अपरिहार्य युद्धांतून काही काळ मानवसमाजाला अनियंत्रित कामगारशाहीच्या अवस्थेतून जाण्यावाचून गत्यंतर नाही असा मार्क्सचा शास्त्रीय सिद्धांत आहे. या परस्परविरोधी सिद्धांतावर निष्ठा असणारे हे दोन क्रांतिकारक आपल्या सिद्धांतास विश्वघटनेतील भौतिक व ऐतिहासिक घटनांचा भरपूर आधार आहे असे प्रतिपादन करतात. मार्क्सला ज्याप्रमाणे विश्वघटनेत व सामाजिक घडामोडीत क्रांतीचे महत्त्व प्रतीत होत होते, तसेच विश्वाच्या घटनेत व ऐतिहासिक घडामोडींत क्रांतीला फार महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते अशी भाषा म. गांधी वापरीत. दोघांचीही अंतःकरणे क्रांतिकारक होती म्हणून त्यांना मानवसमाजाच्या जीवनात व विश्वाच्या भौतिक घटनेतही क्रांतीचे दृश्य दिसत होते व तिचे महत्त्व वाटत होते असे आपण म्हणू शकू. ते काही असले तरी त्यांना

विश्वघटनेत व ऐतिहासिक घडामोडींत क्रांती ही एक स्फूर्तिप्रद घटना वाटत होती यात शंका नाही. त्यांच्या सर्व विचारसरणीवर या क्रांतिकारक स्फूर्तीचा ठसा उमटलेला दिसून येतो. कार्ल मार्क्स हा विश्वाच्या बुडाशी असलेल्या अधिकारणाचा अथवा अव्यक्त तत्त्वाचा विचारच करीत नाही. म. गांधी हे अव्यक्त परमात्म्याचे अथवा परमेश्वराचे अनन्य भक्त म्हणवितात, पण त्यांना दिसणारा परमेश्वरही महान क्रांतिकारक दिसत होता.

ज्यावेळी कार्ल मार्क्स आपले क्रांतिकारक विश्वदर्शन युरोपपुढे मांडीत होता त्यावेळी डार्विनप्रभृती जीवशास्त्रज्ञ विश्वविकासाचा क्रम शोधून काढून मानवप्राणी हा इतर जीव-कोटीतूनच क्रमविकासाच्या तत्त्वानुसार निर्माण झालेला आहे असे प्रतिपादन करून युरोपात रूढ असलेल्या विश्वविकाससंबंधीच्या धार्मिक सिद्धांतांना धक्का देत होते. मानवाची उत्पत्ती माकडासारख्या इतर प्राणिकोटीतूनच झालेली आहे, हा डार्विनचा सिद्धांत खिस्ती धर्मशास्त्रज्ञांना नास्तिक व क्रांतिकारक वाटला. पण लवकरच क्रांतिविरोधी धर्मशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांनी डार्विनचा सिद्धांत आत्मसात केला आणि त्याच विश्वविकासाच्या सिद्धांताचा आधार घेऊन सामाजिक क्रांतिकारकांना विरोध करण्याचे एक नवे तत्त्वज्ञान निर्माण केले. विश्वाचा विकास क्रांतिरूपाने होत नसून तो क्रमविकासाच्या अत्यंत मंदगतीने होत असतो आणि म्हणून समाजशास्त्रज्ञांनीही क्रमविकासाचे सुधारणा-वादी धोरणच शास्त्रीय म्हणून प्रतिपादिले पाहिजे, त्यांनी कोणत्याही प्रकारची आमूलाग्र क्रांती सामाजिक जीवनात घडवून आणण्याचा विचार अशास्त्रीय समजला पाहिजे, असा बोध या समाजशास्त्रज्ञांनी व धर्मशास्त्रज्ञांनी डार्विनच्या विश्वविकासाच्या सिद्धांतापासून घेतला. त्यांच्या या तत्त्वज्ञानाने क्रांतिवाद हा अशास्त्रीय, अनैसर्गिक किंबहुना परमेश्वराच्या इच्छेशी विसंगत आहे असे ठरविले. एकोणिसाव्या शतकाच्या सर्व युरोपीय राजकारणात हीच सुधारणावादी विचारसरणी प्रभावी होत गेली. आपल्या राष्ट्रातही प्रागतिक राजकीय पुढाऱ्यांनी व सामाजिक सुधारकांनी हीच सुधारणावादी दृष्टी शास्त्रीय ठरवून तिला विश्व-घटनेचा व परमेश्वरी संकल्पाचा आधार घेऊन क्रांतिवाद हा अनैसर्गिक, अनैतिहासिक आणि परमेश्वरी संकल्पाविरुद्ध असल्याचे प्रतिपादन करण्यास सुरुवात केली.

विसाव्या शतकातील पहिल्या महायुद्धानंतर म. गांधींनी सत्याग्रहाच्या रूपाने भारतात एक नवे क्रांतिकारक आंदोलन निर्माण केले. त्यावेळी म्हणजे १९२२ साली पहिले असहकाराचे आंदोलन चालू असता म. गांधींना अशाच एका क्रमविकासवादी व धर्मनिष्ठ समाजशास्त्रज्ञाने पुढील सवाल केल्याचे 'यंग इंडिया'च्या २ फेब्रुवारी १९२२ च्या अंकात दिसून येते. गांधीजींना लेखक महाशय विचारतात : "आपण इतिहासाचा अभ्यास करून राष्ट्राची प्रगती कशी होते ते लक्षात घेतले आहे काय? प्रगती ही क्रमविकासाच्या तत्त्वानुसार वाढ होऊन घडत असते, ती क्रांती आणि विनाश या मार्गांनी घडत नाही हे आपल्या लक्षात आले आहे काय? प्राणिसृष्टीत आणि वनस्पतिसृष्टीत परमेश्वर क्रमाक्रमाने

जीवनाचा विकास घडवून आणीत असतो, निसर्गात क्रांती घडवून नव्हे, हे आपण पाहिले आहे काय ? आपण आकाश आणि त्यातील तारकांची गती याचे कधी निरीक्षण केले आहे काय ? युगानुयुगे टिकून राहणारे सूर्य आणि त्यांच्या ग्रहमाला या फिरत आहेत हे कधी लक्षातही येत नाही. मनुष्याला जर एखाद्या पर्वताच्या शिखरावर चढावयाचे असेल तर त्याला एकेक पाऊल कष्टाने व सावकाशीने टाकूनच वर चढावे लागते. याच्या उलट त्याला जर खालीच पडावयाचे असेल तर एखादे पाऊल वाकडे पडताच तो १-२ सेकंदातच दरीच्या तळाशी जाऊन पोहोचेल."

या सवालांना म. गांधींनी पुढीप्रमाणे उत्तर दिले आहे : "राष्ट्राची प्रगती क्रमविकास आणि क्रांती अशा दोन्ही मार्गांनी घडून आलेली आहे, एकाची जितकी आवश्यकता आहे तितकीच दुसऱ्याचीही आहे. मृत्यू हेही क्रांतीप्रमाणेच एक शाश्वत तत्त्व आहे. जनन आणि मरण या घटना क्रांतिकारक असल्या तर त्यानंतरच्या घटना क्रमविकासी असतात. मानवी जीवनाच्या विकासाच्या दृष्टीने विचार केल्यास मृत्युचीही तितकीच आवश्यकता आहे. जगात आजपर्यंत जितके क्रांतिकारक होऊन गेल्याचे आपण जाणतो किंवा जितके यापुढे होतील त्या सर्वांहून श्रेष्ठ असा क्रांतिकारक परमेश्वर आहे. तो प्रलय निर्माण करतो. क्षणापूर्वी शांत असलेल्या वातावरणात एकदम तुफान निर्माण करतो. अत्यंत दक्षतेने आणि अनंत कष्टाने निर्माण केलेले पर्वतप्राय काम तो जमीनदोस्त करतो. आकाशाचेही निरीक्षण मी करतो आणि त्यातील चमत्कार पाहून मी थक्क होतो. हिंदुस्थान आणि ब्रिटन या दोन्ही राष्ट्रांतील नीलगंभीर आकाशात एकदम ढग जमून आलेले आणि त्यांनी अचानक तुफान वृष्टी केलेली पाहून अनेक वेळा मी आश्चर्यचकित झालो आहे. इतिहासाकडे पाहिले तरीसुद्धा त्यात क्रमविकासानुसार घडणाऱ्या प्रगतीहून विलक्षण क्रांत्यांच्या घटनांची नोंदच अधिक आहे. हा न्याय इतर कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासाहून इंग्लिश इतिहासाला कमी प्रमाणात लागू पडत नाही. आणि लेखकमहाशयांना मी नम्रपणे असे सांगू इच्छितो की, क्रमाक्रमाने एकेक पाऊल टाकून पर्वतावर चढणारे लोक जसे मी पाहिले आहेत, तसेच एकदम मोठ्या उंचीवर आकाशात उड्डाण करणारे लोकही माझ्या दृष्टीस पडले आहेत." (*Selections From Gandhi* By N. K. Bose, page nos. 35–36).

म. गांधींचे वरील उताऱ्यातील विचार वाचले असता विश्वघटना आणि ऐतिहासिक घडामोडी यांच्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन कसा क्रांतिकारक होता ते दिसून येईल. सुमारे १०० वर्षांपूर्वी कार्ल मार्क्सने जे क्रांतिकारक जीवनदर्शन मानवाला दिले ते विरोधविकासी भौतिकवादावर उभारलेले होते. गेल्या अर्धशतकात म. गांधींनी आधुनिक मानवाला जे जीवनदर्शन सत्याग्रहाच्या रूपाने दिलेले आहे ते अध्यात्मवादी आहे. तथापि तेही क्रांतिकारक जीवनदर्शन असून त्याच्या विचारपद्धतीत विरोधविकासी तर्कशास्त्र कसे अंतर्भूत झालेले आहे ते मागील लेखात दाखवून दिलेलेच आहे. या सत्याग्रहाच्या रूपाने

येणाऱ्या मानवी जीवनदर्शनाची मूळ प्रेरणा अध्यात्माची असली तरी ते अध्यात्म कोणाच्याही बुद्धिस्वातंत्र्याला मारक नसून ते मानवी बुद्धीला अधिक शुद्ध आणि पवित्र बनवून तिचे तेज वाढविणारे आहे. मानवी जीवनाचे सर्वांगीण तत्त्वज्ञान बनविण्यास आणि विश्वाकडे पाहण्याचा त्याचा मूलभूत दृष्टिकोन घडविण्यास मानवाला त्याच्या अंतःकरणातील इतर अंगांकडे दुर्लक्ष करणारा शुष्क बुद्धिवाद पुरा पडत नाही तर त्याच्या अंतःकरणाला उदात्त व पवित्र बनवून त्याची बुद्धी निर्विकार व तेजस्वी बनविणारा आत्मप्रेरणेचा आधार त्याला द्यावा लागतो.

## मार्क्सचे जीवनदर्शन आणि बुद्धी व भावना

जगाकडे व जीवनाकडे पाहण्याचा मूलभूत दृष्टिकोन व्यक्त करणारे जीवनदर्शन बनवावयाचे तर विश्वाच्या भौतिक घटनांचा उलगडा करण्यास उपयोगी पडणारे एखादे बौद्धिक सूत्र हस्तगत करून काम भागत नाही, याची जाणीव मार्क्सवाद्यांनाही असावयास हवी. मानवी जीवनदर्शनात विश्वाकडे पाहण्याचा भावानक दृष्टिकोनही अंतर्भूत होणे अवश्य असते. बुद्धी व भावना या दोहोंचीही सतत शुद्धी करून आपले सर्व जीवन ही एक प्रयोगशाळा बनविल्यावाचून जीवनातील सत्य हस्तगत करता येत नाही आणि म्हणून आपल्या तर्कास व अनुभवास प्रतीत होणारे सत्य प्रत्यक्ष प्रयोगाने पडताळून पाहिले पाहिजे व त्याची एकसारखी शुद्धी करीत राहिले पाहिजे असा म. गांधींचा दृष्टिकोन आहे. क्रांतिकार्य हे केवळ बुद्धिवादाने घडून येऊ शकत नाही याची जाणीव मार्क्सवाद्यांना भरपूर आहे. त्यामुळे मार्क्सवादी जीवनदर्शन हे केवळ बुद्धिवादी म्हणता येत नाही.

पण बुद्धी आणि भावना या दोहोंचा योग्य समन्वय साधून विश्वाशी तादात्म्य पावण्याची आणि विश्वविकासात स्वतःची भर घालून व्यक्तीजीवन एक प्रकारे अमर करण्याची ही भाषा केवळ पुस्तकातच रहावयाची नसेल तर अध्यात्मवादी तत्त्वज्ञान्यांनी शोधून काढलेली अनेक तत्त्वे या विरोधविकासी भौतिकवाद्यांना आत्मसात करावी लागणार आहेत. अशा सर्व तत्त्वात अत्यंत महत्त्वाचे तत्त्व "सत्य" हे असून त्याच्या प्राप्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग "अहिंसा" हाच आहे या गोष्टीसही तात्त्विक मान्यता या "भौतिकवाद्यांना" द्यावी लागेल, मग ते स्वतःस भौतिकवादी म्हणवोत किंवा दुसरे काही नाव देवोत. "सर्व विश्वच आपले कुटुंब आहे" ही वृत्ती मानवसमाजात रूजावयाची असेल, तर ती सत्याग्रही क्रांतिशास्त्राचा अवलंब करण्यानेच रुजू शकेल हे तात्त्विक दृष्टीने मान्य होण्यासारखे असले, तरी सर्वच परिस्थितीत मानवाला ही सत्याग्रही वृत्ती टिकविता येईल किंवा नाही, याबद्दल मतभेद होणे शक्य आहे.

याबाबतीत सर्वसामान्य मनुष्य कसा वागतो यासंबंधीचा वस्तुनिष्ठ सिद्धांत आणि आदर्श मनुष्य कसा असतो यासंबंधीचा आदर्शवादी सिद्धांत या दोहोंचा समन्वय

करूनच व्यवहार करावा लागतो. यांतूनच शबल सत्याग्रही व शुद्ध सत्याग्रही असे दोन संप्रदाय निर्माण होत आहेत. यापैकी शबल सत्याग्रही व लोकशाही समाजवादी यांची भूमिका एकच आहे व म्हणून ते दोघे एका राजकीय पक्षात नांदू शकतात. याच्या उलट शुद्ध सत्याग्रही कोणत्याही राजकीय पक्षात समाविष्ट न होता व्यावहारिक राजकारणासाठी प्रसंगानुसार कोणत्यातरी पक्षास जवळ करून आपले कार्य करून घेऊ शकतील. पण हे मतभेद व्यावहारिक क्षेत्रातील असले तरी मार्क्सवाद्यांनाही अभिप्रेत असणारी विश्वकुटुंबाची मनोवृत्ती मानवात निर्माण व्हावयाची तर त्यांनी "हिंसक क्रांतीचा आदर्श" दूर करून अहिंसक क्रांतीचा आदर्शच स्वीकारला पाहिजे हे स्पष्ट आहे. याच जाणीवेमुळे भारतातील मार्क्सवादी "अहिंसक क्रांतीचा" आदर्श आज मान्य करीत आहेत. मात्र तसे करताना ते आपली वास्तववादी दृष्टी सोडीत नाहीत व सोडणार नाहीत. वास्तववादी दृष्टीने त्यांनी सत्याग्रह क्रांतितंत्राचा अवलंब केला तरी त्यांची निष्ठा समाजवादीच राहील. शुद्ध सत्याग्रहींना जो अराज्यवाद अथवा जे आत्मराज्य अभिप्रेत आहे, त्याला ते केवळ अंतिम आदर्श म्हणून मान्यता देतील. पण त्यांचे व्यवहार लोकशाही समाजवादाच्या दिशेचे व शबल सत्याग्रही वृत्तीचेच राहतील.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानात समाजवादी क्रांती आणि अराज्यवादी अंतिम आदर्श या दोहोंचा संघर्ष आणि त्यातून घडून येणारा त्या दोन तत्त्वांचा समन्वय या पद्धतीने मार्क्सवादाने त्यांचा समन्वय केलेला नाही. मार्क्सच्या काळात समाजवादी क्रांतीच इतकी दूर होती की त्यावेळी असा समन्वय करणे कठीणही झाले असते. आता रशियात समाजवादी क्रांती घडून येऊन तेथे चुरडून गेलेला अराज्यवाद म. गांधींनी अधिक शुद्ध व प्रभावी बनवून भारतात सत्याग्रह रूपाने रुजविला आहे. अर्थात मार्क्सवादी तत्त्वज्ञानात अपुरे राहून गेलेले समाजवादी क्रांती व अराज्यवाद यांच्या समन्वयाचे हे कार्य भारताला करून दाखविण्याचा काळ आलेला आहे. या दृष्टीने सत्याग्रह व समाजवाद यांचाही समन्वय येथे झालाच पाहिजे. म्हणूनच गांधीवादी व मार्क्सवादी हे एकत्र येऊन येथील सामाजिक क्रांतीचा विचार करीत असल्याचे दिसत आहे. जगाला मार्क्सवाद अपुरा भासू लागला व गांधीवादाचे सामाजिक क्रांतिकार्य सुरू झाले याचा हा पुरावा आहे. रशियातील क्रांतीत मार्क्सवादाने अराज्यवाद चुरडून टाकला व त्यातून हुकूमशाही निर्माण होऊन त्या क्रांतीची विकृती झाली. या घटनेपासून आपणास बोध घ्यावयाचा तर तो हाच घेता येईल की मार्क्सवादाने न सोडविलेला समाजवाद व अराज्यवाद यांच्या समन्वयाचा प्रश्न आपण सोडवून दाखविला पाहिजे. ...

['*साधना*, २१ नोव्हेंबर १९५२, पृ. ५ आणि ८]

## ३१

# भारतीय संस्कृतीचे अमृत-तत्त्व

['आधुनिक भारत' हा ग्रंथ प्रथम १९३८ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करताना आचार्यांनी त्यात १९३८ ते १९५३ दरम्यानच्या घटनांचा आढावा तर घेतलाच पण शिवाय "सत्याग्रही क्रांतिशास्त्र" आणि "भारतीय संस्कृतीचे अमृत-तत्त्व" ही प्रकरणे "अद्ययावत बनविण्याच्या दृष्टीने सुधारून व वाढवून" घेतली. "भारतीय संस्कृतीचे अमृत-तत्त्व" या प्रकरणाच्या पूर्वार्धात युरोपीय संस्कृतीचा विकास, तिची वैशिष्टये यांचा धावता आढावा घेतला असून युरोपातील बुद्धिवाद (पृ. ५४३ ते ५४७) आणि मार्क्सचे क्रांतिकारक ध्येय (पृ. ५४७ ते ५६२) यांची चर्चा केली आहे. "ऋषित्व, ब्रम्हतेज, आत्मबल अथवा साधुत्व हा भारतीय संस्कृतीने आपणांपुढे ठेवलेला मानव्याचा आदर्श आहे. भारतीय संस्कृती जगाला जर काही शिकविणार असेल, तर हे साधुत्वच होय." (पृ. ५४२) या भूमिकेतून आचार्यांनी गांधींचे तत्त्वज्ञान आणि मार्क्सचा विचार यांची तुलना केली आहे. खालील दीर्घ उतारा या प्रकरणातील पृ. ५६२ पासून पुढील मजकुरातून घेतला आहे. (पृष्ठांकांचे संदर्भ १९९४ च्या पुनर्मुद्रणाचे आहेत.)]

## मार्क्सवाद आणि हिंदी राजकारण

हिंदी राजकारणात पहिल्या महायुद्धानंतर थोड्याच वर्षांत मार्क्सवादी विचारांनी प्रवेश केला. महात्मा गांधींनी १९२० साली जी अनत्याचारी असहकाराची पहिली मोहीम सुरू केली, तिची लाट ओसरू लागताच हिंदुस्थानात १९२२ सालापासून कम्युनिस्ट पक्ष स्थापन होऊन १९२८ सालापर्यंत मोठमोठ्या ओद्योगिक शहरांतील कामगारवर्गात याचा बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. पण यानंतर थोड्याच दिवसांत सायमनकमिशनच्या बहिष्काराच्या रूपाने सुरू झालेले राष्ट्रीय आंदोलन अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करू लागले आणि त्याचे रूपांतर १९३० साली भारतीय स्वातंत्र्याच्या सत्याग्रहसंग्रामात झाले. या वेळी कम्युनिस्ट पक्षाने या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीशी मुळीच सहकार्य केले नाही. यामुळे १९३४ च्या सुमारास मार्क्सवादाच्या आधारावरच, पण राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याशी आणि तो लढा चालविणाऱ्या राष्ट्रसभेशी अधिक समरस होणारा हिंदी समाजवादी पक्ष राष्ट्रसभेतच निर्माण झाला. यानंतर थोड्याच दिवसांत भाई मानवेंद्रनाथ रॉय

यांनी मार्क्सवादाच्याच आधारावर तिसरा एक पक्ष निर्माण केला. हा रॉयवादी पक्ष आता राजकारणातून निवृत्त होऊन विलय पावला आहे. हिंदी समाजवादी पक्षाने प्रजा समाजवादी पक्षात आपले रुपांतर करून घेतले आहे आणि समाजवाद्यांनी गांधीवादाचे क्रांतिकारक स्वरूप ओळखून व त्याच्यातील क्रांतिकारक अहिंसातत्त्व आत्मसात करून मार्क्सवादाची पुनर्घटना केली पाहिजे अशी भूमिका स्वीकारली आहे. कम्युनिस्ट पक्ष मात्र मार्क्सवादाला गांधीवादापासून अथवा भारतात झालेल्या राजकीय क्रांतीपासून काहीही बोध घेण्याची गरज नाही असे समजून आपला मार्ग आक्रमीत आहे! मात्र १९३० साली झालेल्या सत्याग्रहमोहिमेत ज्याप्रमाणे त्याने भाग घेतला नाही, त्याचप्रमाणे १९४२ साली भारतात जे प्रचंड आंदोलन झाले त्यातही त्याने भाग घेतला नाही. इतकेच नाही तर या बेचाळीसच्या आंदोलनात त्या पक्षाने विरोधी भूमिका स्वीकारून हिंदी राजकारणातील आपले स्थान सर्वस्वी गमावले. यापुढेही या शुद्ध मार्क्सवादी सनातन वृत्तीच्या पक्षाला तेथे फारसे महत्त्वाचे स्थान प्राप्त होईल असा संभव दिसत नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतर एकंदर विचारी जगात मार्क्सवादाची पुनर्घटना किंवा मार्क्सवादी तत्त्वज्ञानातील गुण-दोष विवेचन करून समाजवादी तत्त्वज्ञान नव्याने मांडिले पाहिजे, ही विचारसरणी फार जोराने प्रसार पावू लागली आहे. पण त्याचबरोबर समाजवादी क्रांतीची निकडही अधिक भासू लागली आहे. युरोप खंडात मार्क्सवादाच्या आधारावर उभारलेल्या कम्युनिस्ट विचारसरणीहून भिन्न अशी दुसरी एक लोकशाही समाजवादी विचारसरणी ( Democratic Socialism ) किंवा सामाजिक लोकशाही ( Social Democracy ) या नावाने प्रसिद्धीस आलेले एक तत्त्वज्ञान व त्याच्या आधारावर उभारलेले राजकीय पक्ष निरनिराळ्या देशांत आहेत. पण या राजकीय पक्षात क्रांतिकारक वृत्ती किंवा कार्यक्रम मुळीच दिसून येत नसून, केवळ प्रातिनिधिक संस्थांतील राजकारण एवढेच त्यांचे समाजवादी परिवर्तन घडवून आणण्याचे साधन बनलेले आहे. याशिवाय संपाचे एक प्रत्यक्ष प्रतिकाराचे साधन ते योजीत असतात, पण हा संपाचा हक्क बेकायदा ठरविला गेल्यास अथवा एकंदर मतप्रचाराचे व संघटनेचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेल्यास समाजवादी पक्षाने आपले कार्य कसे चालू ठेवावे याबद्दल त्यांच्यापाशी निश्चित विचार अथवा कार्यक्रम नाही. अशा प्रसंगी सविनय कायदेभंग आणि अनत्याचारी असहकार या रूपांनी सत्याग्रहाचा अवलंब करून आपणास समाजवादी क्रांतीचे कार्य स्वार्थत्यागाच्या व आत्मक्लेशाच्या मार्गाने तडीस नेता येईल. हा बोध भारतीय समाजवाद्यांनी म. गांधींच्या क्रांतिकारक नेतृत्वापासून घेतला असून त्या सत्याग्रही अधिष्ठानावर भारतीय समाजवादाची उभारणी करण्याचा प्रयत्न व प्रयोग ते करीत आहेत. असे करताना म. गांधींचे सत्याग्रही क्रांतिकारक तत्त्व आणि लोकशाही समाजवाद यांचा समन्वय होऊन मार्क्सवादाहून श्रेष्ठ असे सामाजिक तत्त्वज्ञान व क्रांतिशास्त्र भारतात निर्माण होईल असा प्रस्तुत लेखकाचा

कयास आहे. गेल्या पंचवीस–तीस वर्षांत भारतात ज्यांनी मार्क्सवादाचा फैलाव करण्याचे निरनिराळे प्रयोग केले त्यांनी या राष्ट्रात त्याच काळात गांधीवादाने जे राजकारण केले त्याचे सहानुभूतिपूर्वक निरीक्षण केले असते तर त्यांना हे स्पष्टपणे दिसून आले असते. की मार्क्सवादात न आढळणारी अशी काही तत्त्वे गांधीवादात असून नेमक्या त्याच तत्त्वांची आवश्यकता हिंदी राजकारणाच्या लढ्यात भासत होती. म्हणूनच हिंदी राजकारणावर गांधीवादाचा व गांधीनेतृत्वाचा प्रभाव वाढत गेला आणि येथील राजकारणावर गांधीजींची पकड बसली. यावरून मार्क्सवादात कोणत्या तत्त्वाची उणीव आहे ते लक्षात घेऊन समाजवादी तत्त्वज्ञानाची व क्रांतिशास्त्राची मार्क्सवादाहून अधिक निर्दोष व खोल तत्त्वावर उभारणी करण्याची गरज हिंदी समाजवाद्यांस वाटावयास हवी होती. त्याप्रमाणे ती गरज ओळखूनच प्रजासमाजवादी पक्षाच्या नेत्यांनी आजचे आपले धोरण स्वीकारलेले आहे. रॉयवादाने येथील राजकीय क्षेत्राचा आता त्यागच केलेला आहे. राहता राहिला कम्युनिस्ट पक्ष. त्याला मात्र मार्क्सवादात कोणतीही उणीव असल्याचे अद्यापि पटलेले नाही. तेव्हा मार्क्सवादात ज्या तत्त्वाची उणीव असल्यामुळे त्याचा प्रभाव येथील राजकारणावर पडू शकला नाही असे दिसते, त्याचे थोडक्यात दिग्दर्शन येथे करण्यात येत आहे.

या प्रश्नाचा विचार करीत असता पुढील तीन-चार मुद्यांवर आपले लक्ष विशेष केंद्रित केले पाहिजे : (१) राष्ट्रीय भावना व वर्गविग्रह, (२) रक्तपाती क्रांती टाळण्याचे तंत्र, (३) सामाजिक विचारसृष्टी आणि बाह्य वस्तुसृष्टी, (४) धर्मभावना व क्रांतिवृत्ती. या चार मुद्यांसंबंधी मार्क्सवादाची जी भूमिका आहे, त्या भूमिकेने विचार करणारांना आपल्या विचारांचा फेरविचार करण्यास लावील अशीच या राष्ट्रातील एकंदर परिस्थिती ज्यावेळी हिंदुस्थानात मार्क्सवाद आला त्यावेळेपासून आतापर्यंत राहिलेली आहे. यामुळेच मार्क्सवादी चष्मा बदलून निरहंकार व निर्विकार मनाने येथील परिस्थितीचे निरीक्षण ज्यांनी केले नाही, त्यांना हिंदी राजकारणावर आपला प्रभाव पाडता आला नाही व येणार नाही असे आम्हास वाटते. त्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी वरील प्रत्येक मुद्दा थोडा अधिक विशद केला पाहिजे.

## राष्ट्रीय भावना व वर्गविग्रह

हिंदुस्थानात ज्यावेळी मार्क्सवाद प्रथम आला त्यावेळी म्हणजे पहिले महायुद्ध संपून गेल्यानंतर हिंदी राष्ट्रसभेने सुमारे तीस–पस्तीस वर्षे प्रयत्न करून हिंदी जनतेच्या अंतःकरणात जी आधुनिक राष्ट्रीय भावना निर्माण केली होती, ती युयुत्सु स्वरूप धारण करून परकीय साम्राज्यशाहीशी संपूर्ण स्वराज्याचा लढा करण्यास प्रवृत्त झाली होती. या भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील आद्य प्रेरणा राष्ट्रीय भावना ही होती. मार्क्सवादी क्रांतिशास्त्राची आद्य प्रेरणा वर्गविग्रह ही असून ज्यावेळी आपल्या राष्ट्रावरील परकीय राष्ट्राचे आक्रमण झुगारून देण्यासाठी त्यातील सर्व वर्ग आपापसातील मतभेद विसरून सहकार्याने प्रवृत्त

होतात असा हा काळ होता. अशा अवस्थेतील राष्ट्राच्या राजकारणातही निरनिराळ्या वर्गांच्या हितसंबंधात विरोध नांदत नसतात असे नाही, पण अशा अवस्थेतील राष्ट्रात ज्यांना क्रांती करावयाची असेल त्यांनी केवळ वर्गविग्रहाच्या तत्त्वावर आपल्या राजकारणाची उभारणी न करता वर्गसमन्वयाचे तत्त्व गृहीत धरूनच तेथील क्रांतिकार्यात भाग घेतला पाहिजे. पण मार्क्सवाद व त्याचे तत्त्वज्ञान यात कोणतीही नवी भर घालण्याची आवश्यकता नाही किंवा ते एक पूर्णतेस पावलेले क्रांतिशास्त्र व तत्त्वज्ञान आहे असा अहंकार ज्यांना झाला होता, त्यांना राष्ट्रीय भावनेस प्राधान्य देऊन चालू असलेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामाशी समरस होणे शक्य नव्हते आणि हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्ष भारताच्या राष्ट्रीय लक्ष्याशी व त्याच्या राष्ट्रीय वृत्तीशी केव्हाही समरस बनू शकला नाही. १९२० सालापासून १९४७ सालापर्यंत ज्या ज्या वेळी भारताने परकीय साम्राज्यशाहीविरुद्ध प्रचंड आंदोलने उठविली, त्या त्या वेळी कम्युनिस्ट पक्षाने त्या आंदोलनापासून अलिप्त राहण्याचे, किंबहुना त्याला विरोध करण्याचेच धोरण स्वीकारले. त्याच्या उलट, भारत स्वतंत्र होऊन त्यात लोकशाही स्वरूपाचे पहिले राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यानंतर त्याच्या विरुद्ध मात्र वर्गविग्रहाच्या अधिष्ठानावर सशस्त्र क्रांतीचे हत्यार त्याने उपसले आणि निजामासारख्या सरंजामशाहीच्या संस्थानाचा आश्रय करून भारतीय राष्ट्राचे तुकडे करू पाहणाऱ्या पाकिस्तानवाद्यांशी समेट करून, भारतातील राष्ट्रीय सरकारविरुद्ध आपल्या राजकारणाची मोहीम त्याने चालू ठेवली. हिंदी कम्युनिस्ट राजकारणाचा गेल्या तीस–बत्तीस वर्षांतील हा इतिहास लक्षात घेतल्यास वेळी-अवेळी वर्गयुद्धाचा पुकारा करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाचे धोरण किती अविवेकाचे झालेले आहे ते दिसून येईल. जॉर्ज वॉशिंग्टनच्या बाळपणी त्याच्या वडिलांनी त्याला एक कुऱ्हाड आणून दिली आणि त्या कुऱ्हाडीचा उपयोग कोठे करावयाचा व कोठे करावयाचा नाही हे न जाणणाऱ्या त्या मुलाने, आपल्या वडिलांनी बागेत लावलेली सर्व झाडे तोडून टाकण्यास प्रारंभ केला अशी एक कथा आहे. त्याचप्रमाणे हिंदी कम्युनिस्ट पक्षाने वर्गविग्रहाचे तत्त्व मार्क्सवादातून आपल्या हाती घेतले आणि त्याचा कोठे व कसा उपयोग करावा हे न जाणता व त्याच्या मर्यादा न ओळखता हिंदी राजकारणात त्याचा दुरुपयोग करून हिंदी राष्ट्रीयत्वाच्या प्रगतीच्या कार्यात आपल्या अविवेकाने अनेक निष्कारण अडथळे निर्माण केले. वस्तुतः गेल्या तीस–पस्तीस वर्षांत भरतखंडात चालू असलेल्या राष्ट्रीय क्रांतिकारक आंदोलनांपासून अनेक प्रकारचा बोध घेऊन मार्क्सवाद्यांना आपल्या तत्त्वज्ञानाची वाढ करता आली असती. पण स्वतंत्र प्रज्ञेचा हा मार्ग न स्वीकारिता त्यांनी हिंदी राजकारणातील आपले स्थान कायमचे गमावले.

## रक्तपाती क्रांती व ती टाळण्याचे तंत्र

हिंदुस्थानात ब्रिटिशांची साम्राज्यसत्ता सार्वभौम बनल्यापासून तो १९४७ साली तिने आपले सार्वभौमत्व विसर्जन करीपर्यंतच्या काळात ब्रिटिश मुत्सद्द्यांनी आपल्या राष्ट्रास

आज ना उद्या हिंदुस्थानावरील सार्वभौम सत्ता सोडावी लागणार आहे हे दूरदर्शीपणाने ओळखून आपल्या हिंदी राजकीय धोरणात ही क्रांती शक्य तो रक्तपात टाळून घडून यावी असे धोरण आखण्याचा प्रयत्न सतत चालू ठेविलेला दिसून येतो. राष्ट्रसभेची संस्थापना करण्यात ह्यूम–वेडरबर्न इ. ज्या ब्रिटिश मुत्सद्यांनी हिंदी पुढाऱ्यांशी सहकार्य केले आणि हिंदुस्थानात लोकशाही राजकारणाचा प्रारंभ केला, त्यांच्या डोळ्यांपुढे हिंदुस्थानला स्वराज्य मिळण्याचे राजकारण रक्तपात टाळून सिद्धीस जावे असा हेतू होता. या त्यांच्या समंजस व उदार धोरणाचे परिणाम दादाभाई, रानडे, टिळक व गोखले या सर्वांच्या अंतःकरणावर व राजकरणावर झाल्याचे आपणास दिसून येते. असा परिणाम झाल्यामुळेच १९०५ सालानंतर हिंदी राजकारणात जो राष्ट्रीय पक्ष निर्माण झाला, त्यानेही आपले धोरण शक्य तो रक्तपात टाळण्याचे व बहिष्कारयोगाच्या निःशस्त्र क्रांतीचेच असावे असा निर्णय व्यवहारदृष्टीने केलेला होता. याच बहिष्कारयोगाला पुढे म. गांधींनी क्रांतिकारक अहिंसेचे अधिष्ठान निर्माण करून संपूर्ण स्वराज्याचा लढा अनेक प्रकारे तीस वर्षे चालवून तो यशस्वी केला आणि ब्रिटिश मुत्सद्यांनीही त्यांच्या या लढ्यास कसून विरोध केला, तरी गांधींच्या अहिंसानिष्ठेमुळे ब्रिटन व भारत या दोन राष्ट्रांमधील राजकीय लढा रक्तपात टाळून यशस्वी होणे शक्य आहे हे पूर्णपणे आपल्या दृष्टीआड केव्हाही होऊ दिले नाही. लॉर्ड रीडिंग, लॉर्ड आयर्विन आणि अखेरीस लॉर्ड लिनलिथगो या तीन व्हाईसरॉयांच्या अमदानीत महात्मा गांधींनी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे एकाहून एक अधिक मोठे असे अनत्याचारी लढे ब्रिटिश सत्तेविरुद्ध दिले. या प्रत्येक वेळी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ही आंदोलने दडपून टाकण्याचे व जुलमी दडपशाहीचे प्रयोग केले. तरीही ती आंदोलने थांबल्यानंतर पुन्हा राष्ट्रसभेशी व म. गांधींशी शिष्टाईचे व समेटाचे धोरण स्वीकारून अखेरीस भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न तडजोडीने व शक्य तो रक्तपात टाळून सोडविला. या सर्व इतिहासातून निःशस्त्र क्रांतीची कल्पना उदय पावली असून भारतीय जनतेच्या व तिच्या नेत्यांच्या अंतःकरणात ती दृढमूल झालेली आहे. भारतीय राजकारणाच्या इतिहासात क्रांतिकारक परिवर्तने रक्तपात टाळून घडवून आणण्याचे जे हे एक तंत्र विकास पावत आले आहे व प्रतिष्ठा पावलेले आहे, त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून हिंदी कम्युनिस्टांनी मार्क्सवादात प्रायः गृहीत धरलेली सशस्त्र क्रांतीची घटना अपरिहार्य आहे, या वृत्तीनेच आपले राजकारण चालविले. मार्क्सवादात हिंदी राष्ट्रात उदय पावलेली ही अनत्याचारी निःशस्त्र क्रांतीची वृत्ती महत्त्वाची भर टाकू शकेल, हे सत्य हिंदुस्थानात ज्यांनी मार्क्सवादाचे प्रयोग केले त्यापैकी केवळ हिंदी समाजवादी पुढाऱ्यांनी ओळखले आणि हिंदी समाजवादाला सत्याग्रही अधिष्ठान देऊन त्याचे वैशिष्ट्य जगापुढे मांडले. कम्युनिस्ट पक्ष मात्र भारतीय राजकारणात ज्या घडामोडी घडून आलेल्या आहेत त्यांच्यामुळे मार्क्सवादाला नवे शिकण्यासारखे काहीच नाही असे समजून आपले व्यवहार करीत राहिला आहे.

## सामाजिक विचारसृष्टी आणि बाह्य वस्तुसृष्टी

मार्क्सवादी विचारसृष्टीत सामान्यतः समाजाच्या बाह्य परिस्थितीत बदल होत गेला म्हणजे त्या बदलाचे प्रतिबिंब समाजाच्या विचारांवर पडते आणि समाजात रूढ असलेली विचारसरणी बदलत्या परिस्थितीस अनुसरून विशेष प्रयास न पडता बदलत जाते असे गृहीत धरलेले असते. यामुळे परिस्थितीतील बदलाबरोबर समाजाचे विचार बदलण्यासाठी काही विशेष प्रयास करावे लागतील किंवा विशिष्ट समाजाच्या विचारात बदल घडवून आणण्यासाठी त्याच्या मनावर झालेल्या पूर्वसंस्कारांचा विशेष अभ्यास करून त्या त्या समाजाच्या अवस्थेस अनुरूप असे उपाय योजावे लागतील असे मार्क्सवाद्यांना वाटत नाही. परंतु त्यांनी भारतीय समाजाची विशिष्ट मानसिक अवस्था व त्याच्या संस्कृतीची वाढ यांचा अभ्यास केला असता तर त्यांना कळून आले असते, की या समाजाने शेकडो वर्षे आपल्या सामाजिक विचारसृष्टीत बुद्धिपूर्वक बदल घडवून आणण्याचे कार्य सोडून दिलेले आहे. या समाजाच्या बाह्य परिस्थितीत कितीही बदल झाले तरी तो जाणूनबुजून आपली सामाजिक विचारसृष्टी बदलत नाही. नव्या परिस्थितीस अनुरूप अशी नवी विचारसृष्टी निर्माण न करता किंवा इतरांकडून तिचा स्वीकारही न करता हा समाज प्राचीन परिस्थितीस अनुरूप अशा विचारसृष्टीला चिकटून राहण्याचा प्रयत्न करीत असतो. ही एक या समाजाची बौद्धिक मूढता किंवा जडता असून त्याच्या बुद्धीवरील या मूढत्वाचे अथवा जडत्वाचे दडपण दूर करण्यासाठी त्यांच्या अंतःकरणात नवे चैतन्य निर्माण करणारे अनासक्त बुद्धीचे निष्काम कर्मयोगी लोकसेवक पुढे आले पाहिजेत. या समाजाची मानसिक अवस्था युरोप खंडातील मध्ययुगीन समाजाच्या अवस्थेसारखी आहे. त्याला आधुनिक युरोपात ज्या सर्वांगीण सामाजिक क्रांतीच्या कल्पना किंवा जी ध्येये निर्माण झाली, त्यांचे रहस्य व महत्त्व अद्यापि यथार्थ आकलन झालेले नाही. अशा समाजात क्रांती करू इच्छिणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे, की या समाजाचा उद्धार होण्याच्या आड बाह्य परिस्थितीपेक्षा त्याची मागासलेली विचारसृष्टी आणि त्याच्या विकृत भावना यांचाच अधिक अडथळा होत असतो. अशा समाजाला क्रांतिप्रवण करू इच्छिणाऱ्यांनी त्याला अत्याचाराच्या अविवेकापासून शक्य तितके दूर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करून त्याच्या मानससृष्टीत व विचारसृष्टीत योग्य प्रकारची क्रांती प्रथम घडवून आणली पाहिजे आणि त्याच्या प्रतिकारशक्तीला संयमाचे व शिस्तीचे बंधन लावून ती प्रतिकारशक्ती विशिष्ट दिशेनेच कार्य करीत राहील व तिचा अवेळी स्फोट होऊन ती सर्वांच्या नाशास कारण होणार नाही याबद्दल कमालीची दक्षता घेतली पाहिजे. अशा प्रकारे समाजाच्या अंतःकरणात नवचैतन्य निर्माण करण्याच्या आणि त्याच्या विचारसृष्टीत क्रांती घडविण्याच्या कार्यात म. गांधींनी शोधून काढलेले सत्याग्रही क्रांतिशास्त्र अत्यंत प्रभावी ठरलेले आहे. या क्रांतिशास्त्राची महती समाजाच्या बाह्य परिस्थितीबरोबर त्याच्या विचारसृष्टीत आपोआप होत जाते, अशा गृहीतकृत्यावर उभारलेल्या कम्युनिस्ट क्रांतिकारकांना समजणे

फार कठीण होते व ते त्यांना अद्यापिही समजलेले नाही. युरोप खंडात मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद निर्माण होण्यापूर्वी दोन-अडीच शतके तेथे धार्मिक व सामाजिक क्रांतिकारकांचे जे दिव्य बलिदान घडून आले, त्याच्यातून निर्माण झालेल्या आत्मतेजामुळे युरोपीय जनता क्रांतिकारक विचारांचा स्वीकार करण्यास पात्र बनली होती. पण तेथील जनतेला ही पात्रता येण्यास अशा प्रकारचे बलिदान तिच्यामध्ये क्रांतीची प्रेरणा जागृत करणाऱ्यांनी केले पाहिजे आणि ते करीत असता ही क्रांतीची शक्ती अविवेकाने व असंयमाने विकृत होऊन फुकट जाणार नाही याबद्दल दक्षता ठेवली पाहिजे. ही दोन्ही कार्ये एकाच वेळी साधावयाची तर सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या अंगी अनासक्त स्थितप्रज्ञाचे व निष्काम कर्मयोग्याचे आध्यात्मिक गुण निर्माण झाले पाहिजेत हा म. गांधी व लो. टिळक यांनी भारतीय क्रांतिकारकापुढे ठेवलेला आदर्श भरतखंडात समाजवादी क्रांती करू इच्छिणाऱ्या समाजवाद्यांनी आत्मसात केला पाहिजे. पण सर्वच धर्मभावना व अध्यात्म-शास्त्र यांना खणून काढू इच्छिणाऱ्या मार्क्सवाद्यांना तो आदर्श आत्मसात करणे केव्हाही शक्य नव्हते. तो आत्मसात करावयाचा तर मानवी जीवनदर्शन केवळ भौतिकवादाच्या आधारावर उभारता येत नाही याची जाणीव व्हावयास हवी. अशी जाणीव होऊनच श्री. जयप्रकाश नारायण यांनी भौतिकवादाच्या पलीकडे गेल्यावाचून मानवी अंतःकरणातील नैतिक प्रेरणेची समाधानकारक मीमांसा करता येत नाही, असे जाहीर केल्याचे सर्वांना विदित आहे. मार्क्सवाद्यांनी मानवी अंतःकरणातील धर्मभावना आणि अध्यात्मवृत्ती यांचा अधिक खोल अभ्यास केला पाहिजे एवढा तरी बोध त्यांनी श्री. जयप्रकाश यांच्या या उद्‌गारांपासून घेतला पाहिजे.

भारतीय क्रांतीत महत्त्वाची गोष्ट भारतीय समाजाच्या मनःस्थितीत व विचारसृष्टीत क्रांती घडवून आणून त्याच्या अंतःकरणातील अन्यायाविरुद्ध झगडण्याची वृत्ती किंवा प्रतिकारभावना जागृत करणे हीच असून ही मानसिक क्रांती घडून आल्यानंतर येथे राजकीय व सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी प्रत्यक्ष सशस्त्र क्रांती करण्याची आवश्यकताच नाही हे ज्ञान कम्युनिस्टांना केव्हाही झाले नाही. याच्या उलट, या राष्ट्रातील राजकारण गेली पन्नास-साठ वर्षे तरी याच सिद्धांताच्या आधारे चालू असून या काळात त्या राजकारणाची जी प्रगती झालेली आहे, ती प्रगती लक्षात घेता येथून पुढील राजकारणही त्याच सिद्धांताच्या अधिष्ठानावर चालत राहील असे दिसते. त्याचप्रमाणे जनतेच्या अंतःकरणातील ही क्रांती घडवून आणणाऱ्यांनी ती केवळ राजकीय व सामाजिक विचारांना चालना देण्याच्या रूपाने घडवून आणलेली नसून समाजाच्या अंतःकरणातील शुद्ध धर्मभावना आणि क्रांतिकारक अध्यात्मवृत्ती यांचा उपयोग करून ही क्रांती घडवून आणलेली आहे व अशा रीतीने भारतात आधुनिक काळात धर्माचे व अध्यात्माचे एक क्रांतिकारक स्वरूप प्रकट होत आलेले आहे याचाही विचार कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने केला पाहिजे.

## धर्मभावना व क्रांतिवृत्ती

कम्युनिस्ट तत्त्वज्ञानात धर्मभावनेचा विचार केवळ ती एक क्रांतिविरोधी शक्ती आहे आणि मानवसमाजाला ऐहिक अभ्युदयाच्या राजकीय व सामाजिक लक्ष्यापासून परावृत्त करून पारलौकिक काल्पनिक सुखाच्या गुंगीत ठेवणारी अफूची गोळी आहे याच दृष्टीने करण्यात आला आहे. आधुनिक भारतात निर्माण झालेल्या राजकीय नेत्यांनी येथील जनतेच्या अंतःकरणात खोल रुजलेल्या या धर्मभावनेस व अध्यात्मवृत्तीस जागृत करून तिला क्रांतिकारक स्वरूप देण्याचा प्रयत्न केलेला असून धर्माचे व अध्यात्माचे हे क्रांतिकारक स्वरूप लक्षात घेतल्यावाचून यापुढे तरी कोणास सामाजिक घडामोडी व मानवी इतिहास यांच्यातील धर्मभावनेची व अध्यात्मवृत्तीची शास्त्रीय मीमांसा करता येणार नाही. कार्ल मार्क्सला आपल्या काळात व युरोप खंडात धर्मसंस्थेचे जे दर्शन झाले ते केवळ सामाजिक क्रांतीच्या विरोधासाठी प्रस्थापित राज्यसंस्थेला जनतेचा नैतिक पाठिंबा मिळवून देणारी प्रतिक्रांतिकारक शक्ती याच स्वरूपात झाले. पण कार्ल मार्क्सला आपल्या काळात झालेले धर्मसंस्थेचे हे प्रतिक्रांतिकारक दर्शन हेच धर्माचे व अध्यात्माचे खरे व नित्य स्वरूप नव्हे. लो. टिळक, महात्मा गांधी किंवा आजचे विनोबा भावे यांच्या जीवनात धर्माला व अध्यात्माला जे क्रांतिकारक स्वरूप प्राप्त झालेले दिसते त्याचे दर्शन झाल्यानंतर तरी मार्क्सवादाने केलेली धर्माची व अध्यात्माची मीमांसा ही अपुरी व एकांगी आहे हे ज्ञान हिंदी कम्युनिस्टांना व्हावयास हवे होते. पण ते त्यांना झालेले नसून अद्यापिही श्री. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या एखाद्या सामाजिक क्रांतिकारकाने अध्यात्माची भाषा वापरली, की तो प्रतिक्रांतिकारक बनू लागला अशी ओरड मार्क्सवादी करू लागतात. हे पाहिले म्हणजे कोणतेही खरे ज्ञान ग्रंथांच्या वाचनापासून प्राप्त होत नसून परिस्थितीचे वाचन करण्यानेच ते प्राप्त होऊ शकते, याचीही विस्मृती या सांप्रदायिक विचारवंतांना झालेली आहे किंवा काय अशी शंका येऊ लागते. तात्पर्य, गेल्या पन्नास–साठ वर्षांतील भारतीय राजकारणाचा इतिहास, येथील सामाजिक व धार्मिक घडामोडी आणि त्या सर्वांच्या मागे असणारे येथील नेत्यांचे तत्त्वज्ञान यांच्याशी कम्युनिस्ट पक्ष व त्या विचारसरणीचे लोक समरस होऊ शकले नाहीत व त्यापासून त्यांनी कोणताही बोध घेतलेला नाही असेच म्हणावे लागते.

भरतखंडात आज राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या क्रांतीचे पर्व संपलेले असून येथे समाजवादी क्रांतीचे नवे पर्व सुरू झालेले आहे हे कोणासही स्पष्ट दिसत आहे. पण या भारतीय समाजवादी क्रांतीच्या बुडाशी असणारे तत्त्वज्ञान आणि त्यांचे क्रांतिकारक प्रयत्न हे केवळ मार्क्सवादी तत्त्वज्ञानास व क्रांतिशास्त्रास अनुसरूनच घडून येतील अशी अपेक्षा करणे हे शास्त्रीय बुद्धीचे लक्षण नव्हे. मार्क्सवादी तत्त्वज्ञान व त्याचे क्रांतिशास्त्र एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर त्याला दिसलेल्या युरोपीय इतिहासातील घडामोडींवरून त्याने

बनविलेले होते. आज भारतात व आशिया खंडात जे समाजवादाचे नवे युग निर्माण होत आहे त्याचे तत्त्वज्ञान व क्रांतिशास्त्र मार्क्सवादाहून अधिक खोल आणि व्यापक दृष्टी स्वीकारल्यानेच बनविता येईल. या अधिक खोल आणि व्यापक तात्त्विक दृष्टीने विचार केल्यास धर्मभावना आणि अध्यात्मवृत्ती यांचे क्रांतिकारक स्वरूप समाजवाद्यांना प्रतीत होईल आणि त्या दृष्टीने सत्याग्रही क्रांतिशास्त्राचे महत्त्वही त्यांना पटेल अशी आम्हास आशा आहे.

## गांधीवाद व मार्क्सवाद

येथपर्यंत मार्क्सवाद्यांनी आधुनिक भारतात निर्माण झालेल्या सत्याग्रही तत्त्वज्ञानापासून काही बाबतीत बोध घेण्याची आवश्यकता कशी आहे त्याचे विवेचन केले. त्यावरून गांधी-वाद्यांना मार्क्सवादापासून बोध घेण्यासारख्या काहीही गोष्टी नाहीत असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये. वर ज्या चार मुद्यांचे विवेचन केले आहे, त्यांपैकी प्रत्येक मुद्या-संबंधी काही तरी बोध गांधीवादाला मार्क्सवादापासून घेण्याजोगा आहे असे आम्हास वाटते. राष्ट्रीय भावना आणि वर्गभावना यांपैकी राष्ट्रीय भावना तेवढीच श्रेष्ठ आहे आणि वर्गभावना कनिष्ठ आहे किंवा हीन आहे असे मानण्याची प्रवृत्ती गांधीवाद्यांमध्ये दिसून येते. परंतु तर्कशास्त्राच्या किंवा न्यायशास्त्राच्या दृष्टीने ही प्रवृत्ती समर्थनीय आहे असे वाटत नाही. ज्याप्रमाणे परतंत्र राष्ट्रातील राष्ट्रीय भावना पुरोगामी राजकारणाचे अधिष्ठान बनू शकते, त्याचप्रमाणे पीडित आणि पीडक, किंवा मालक आणि मजूर अशा वर्गभेदाने दुभंगलेल्या समाजात पीडित वर्गाची किंवा मजूर वर्गाची संघटना आणि वर्गभावना ही पुरोगामी राजकारणाचे अधिष्ठान बनून वर्गहीन समाजाच्या ध्येयाकडे जाण्यास साहाय्यक होऊ शकते. अर्थात अनत्याचारी असहकाराचे व सविनय कायदेभंगाचे तत्त्व जसे परतंत्र राष्ट्राच्या उद्धारास उपयुक्त म्हणून लागू करता येते व ते समर्थनीय ठरते, त्याचप्रमाणे ते तत्त्व आर्थिक व सामाजिक दास्यात रखडणाऱ्या शेतकरी–कामकरी वर्गाच्या उद्धारास उपयुक्त व समर्थनीय ठरते आणि म्हणून त्याचा या कामी उपयोग करणे हे सत्याग्रही क्रांतिकारकांचे कर्तव्य आहे ही विचारसरणी गांधीवादाने निःसंकोचपणे मान्य केली पाहिजे. यासंबंधीचे अधिक विवेचन टॉलस्टॉय व मार्क्स यांच्या आधारे पुढे केलेले आहे.

सत्याग्रही क्रांतिकारकांनी व्यावहारिक राजकारणात भाग घेताना केवळ आदर्शनिष्ठेचे धोरण न स्वीकारता राज्यशास्त्रातील वास्तववादी दृष्टी स्वीकारूनच त्यांनी तसा भाग घेतला पाहिजे. राज्यसंस्था ही दंडधारी संस्था असल्यामुळे ती चालविणाऱ्यांचे सर्व व्यवहार शुद्ध अहिंसेच्या कसोटीस उतरू शकत नाहीत; असे असले, तरी आजच्या मानवसमाजाच्या अवस्थेत राज्यसंस्थेच्या दंडशक्तीला व्यवहारदृष्टीने त्यांनी मान्यता दिली पाहिजे. ही मान्यता दिल्यानंतर केवळ तात्त्विक दृष्टीने ज्यांना सशस्त्र क्रांती काही विशिष्ट परिस्थितीत

अपरिहार्य किंवा समर्थनीय वाटते, परंतु जे अशी रक्तपाती क्रांती टाळण्याचे अनत्याचारी मार्गाने शक्य ते प्रयत्न करीत असतील व ज्यांनी राजकीय धोरण या दृष्टीने अनत्याचारी क्रांतीचे तत्त्व मनापासून स्वीकारले असेल, त्यांच्याशी राजकीय व्यवहारात सशर्त सहकार्य करून वागण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. राज्यक्रांती याचा व्यावहारिक अर्थ एक राज्ययंत्र जाऊन दुसरे राज्ययंत्र निर्माण होणे असाच असून, पहिल्या राज्ययंत्रास जसा समाजरक्षणासाठी दंडशक्तीचा आधार घेणे अवश्य वाटते, तसाच त्याच्या ठिकाणी येणाऱ्या दुसऱ्या राज्ययंत्रासही दंडशक्तीचा आधार घ्यावा लागणार आहे. अशा दंडशक्तीच्या आधारावाचून चालणारी समाजव्यवस्था अद्यापि व्यवहारदृष्टीने कोणाच्याही दृष्टिपथात येऊ शकत नाही, म्हणून वास्तववादी दृष्टीने दंडशक्तीला सत्याग्रही क्रांतिकारकांनाही मान्यता द्यावी लागते. अशा दृष्टीने राज्ययंत्राच्या दंडशक्तीस त्यांनी सशर्त मान्यता दिली, तरी तेवढ्याने सशस्त्र क्रांतिकारकांच्या हिंसेला त्यांनी मान्यता दिली पाहिजे असे म्हणणे सयुक्तिक नाही. कारण राज्ययंत्राची दंडशक्ती ही समाजाच्या न्यायबुद्धीने व संरक्षणबुद्धीने समाजाकडून मान्यता मिळविलेली शक्ती असते. समाजाच्या न्यायबुद्धीने व संरक्षणबुद्धीने क्रांतिकारकांची हिंसा मान्य केलेली नाही. इतकेच नाही, तर क्रांतिकालात समाजाची न्यायबुद्धी दुभंगली जाऊन न्याय-अन्यायासंबंधीच्या निरनिराळ्या मतामतांचा गलबला माजून एक प्रकारची अंदाधुंदी किंवा अराजक अवस्था निर्माण झालेली असते. अशा अराजक अंदाधुंदीच्या अवस्थेतून जे मत शस्त्रबलाच्या झटापटीत विजयी होईल किंवा सत्ताधारी बनेल, ते समाजात अधिक न्यायसंस्थापना करण्यास अधिक पात्र ठरेलच असे कोणासही म्हणता येणार नाही. म्हणून राज्ययंत्राच्या दंडशक्तीस वास्तववादी दृष्टीने मान्यता देणाऱ्या सत्याग्रहींनी सशस्त्र क्रांतिकारकांशी सहकार्य करावे हे मत सयुक्तिक ठरत नाही. असे असले तरी समाजातील घटनेत बद्धमूल झालेले अन्याय समाजाला असह्य झाले, समाजाची न्यायबुद्धी त्याच्या विरुद्ध बंड करून उठली आणि तिने प्रस्थापित राज्ययंत्राच्या दंडशक्तीस दिलेला आपल्या न्यायबुद्धीचा पाठिंबा काढून घेतला, तर अशा समाजात काही काळ दंडशक्तीच्या रूपाने जी सत्ता आपले प्रभुत्व चालविण्याचा प्रयत्न करीत असेल, ती सत्ता म्हणजे समाजाच्या न्यायबुद्धीने मान्यता दिलेली दंडशक्ती नसून ती एक संघटित हिंसाशक्तीच आहे हे मान्य करावे लागेल. अशा प्रकारची संघटित हिंसाशक्ती आपल्या हाती आलेले राज्ययंत्र टिकवून धरण्यासाठी जे अत्याचार करू लागेल त्यांच्याखाली दडपून जाण्यापेक्षा अशा अवस्थेत प्रजेने केलेली सशस्त्र क्रांती हीसुद्धा समाजाच्या प्रगतीस कारण होत असते व तशी ती होत आलेली आहे हे ऐतिहासिक सत्य सत्याग्रही क्रांतिकारक नाकारू शकणार नाहीत. गांधीवाद्यांनाही राज्यशास्त्र व इतिहासमीमांसा यांचा विचार करताना मार्क्सवाद्यांनी प्रतिपादन केलेल्या क्रांतिशास्त्रापासून याबाबतीत काही बोध घ्यावा लागेल. दंडशक्तीच्या उपयोगात अंतर्भूत होणारी अपरिहार्य हिंसा व अपरिहार्य झालेल्या सशस्त्र क्रांतीत घडून येणारी हिंसा यातील भेद हा नित्य व देशकालपरिस्थितिनिरपेक्ष

नाही. तो सापेक्ष प्रमाणभेदच असून काही प्रसंगी त्या दोहोंतील हिंसेचे प्रमाण उलटसुलटही होऊ शकते हे विसरता कामा नये. एवढा बोध लक्षात घेऊन सत्याग्रही क्रांतिकारकांनी रक्तपाती क्रांती टाळण्याचे शक्य ते मार्ग त्वरित अवलंबिले पाहिजेत. या कामी त्यांनी मंत्रचळी वृत्ती धारण करून दिरंगाई करता कामा नये आणि आपली निरपवाद अहिंसा जे प्रथम मान्य करतील त्यांच्याशीच आम्ही सहकार्य करू अशी वृत्तीही धारण करता कामा नये.

केवळ तात्त्विक दृष्टीने राज्यमीमांसा व इतिहासमीमांसा करीत असता सशस्त्र क्रांतीच्या पुरोगामित्वासंबंधी किंवा गुणदोषासंबंधी काहीही मतभेद झाले, तरी आधुनिक भारताप्रमाणे ज्या राष्ट्रात प्राप्त करून घेतलेल्या नागरिक-स्वातंत्र्याच्या सत्याग्रहाचे व अनत्याचारी क्रांतीचे शिक्षण जनतेला देण्यात आलेले आहे व त्या अधिष्ठानावर लोकशाही राज्याची निर्मिती करण्यात आलेली आहे, अशा राष्ट्रात हे सत्याग्रही क्रांतितंत्र व लोकशाही राज्ययंत्र यांच्या आधारे समाजवादी क्रांती पूर्ण अनत्याचाराने घडून येऊ शकेल याबद्दल विवेकी समाजवाद्यांना आता शंका उरलेली नाही व त्यांनी त्यामुळेच आपल्या पक्षास अनत्याचारी धोरण लावून दिलेले आहे. अर्थात या क्रांतिकार्यांत लोकशाही राज्ययंत्रातील दंड-शक्तीचा उपयोग करावा लागेल, या अर्थाने या पक्षाचे धोरणही शुद्ध सत्याग्रही किंवा पूर्ण अहिंसक म्हणता येणार नाही. तथापि वास्तववादी दृष्टीने शुद्ध सत्याग्रहींनी समाजवादी क्रांतीच्या कार्यासाठी अशा पक्षाशी सशर्त सहकार्य करून ते कार्य अविलंबाने तडीस नेले पाहिजे. सामाजिक क्रांतीसंबंधीची जनतेमधील ही उत्कंठा तीव्र करण्याचे कार्य आज भूदानयज्ञाच्या व संपत्तिदानयज्ञाच्या रूपाने भारतात सुरू झालेले आहे. यातूनच वरील प्रकारचे गांधीवादी व समाजवादी यांचे सहकार्य निर्माण होईल व होत आहे.

वर्गहीन समाजाची संस्थापना करण्याचे ध्येय मान्य केल्यानंतर समाजातील वर्गसंस्था आणि आर्थिक विषमता नष्ट करणे हे मनुष्याचे उत्पादनसामर्थ्य वाढल्यामुळे आज कसे शक्य व अपरिहार्य झालेले आहे याची समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय मीमांसा गांधीवादाने मार्क्सवादापासून शिकण्यासारखी आहे. बंधुभावना आणि समता ही ध्येये नैतिक व आध्यात्मिक दृष्टीने हजारो वर्षे मानवसमाजात मान्यता पावलेली असली, तरी उत्पादनकार्य चालू राहण्याच्या दृष्टीने व त्याचा विकास होण्याच्या दृष्टीने एके काळी आर्थिक विषमता आणि वर्गसंस्था यांची आवश्यकता व उपयुक्तता वाटत होती. म्हणूनच धर्मसंस्थांनीसुद्धा त्यांना मान्यता दिलेली असून साधुसंतांनीही समाजधारणेला आवश्यक म्हणून सामाजिक व आर्थिक वर्गभेद नैसर्गिक व न्याय्य मानलेले होते. पण आज मानवाची उत्पादनशक्ती वाढल्यामुळे समतेचे व बंधुभावनेचे ध्येय सामाजिक व आर्थिक क्षेत्रात प्रस्थापित करून वर्गसंस्था नष्ट करणे शक्य व आवश्यक झालेले आहे. ही वर्गसंस्थेच्या उत्पत्तीची, अभिवृद्धीची व विनाशाची समाजशास्त्रीय मीमांसा मार्क्सवादाने जशी केलेली आहे तशी ती इतर कोणत्याही सामाजिक तत्त्वज्ञानाने केलेली नाही.

त्याचप्रमाणे धर्मभावना किंवा अध्यात्मवृत्ती यांच्या आधारे सामाजिक क्रांतीचे कार्य चालू ठेवावयाचे तर ही धर्मभावना विशिष्ट अशा कोणत्याही धर्मांशी एकरूप समजली जाता कामा नये, तर मानवी अंतःकरणातील समाजहितबुद्धीशी व सर्वोदयबुद्धीशी ती निगडित झाली पाहिजे याचीही दक्षतापूर्वक जाणीव सत्याग्रही क्रांतिकारकांनी नित्य ठेवली पाहिजे. तसेच मानवी अंतःकरणातील आत्मवृत्ती कोणत्याही विशिष्ट सामाजिक किंवा राजकीय संघटनेशी अथवा अध्यात्मशास्त्रातील कोणत्याही सांप्रदायिक सिद्धांताशी एकरूप बनू देता कामा नये. मानवी अंतःकरणातील सत्यनिष्ठा व प्रेमभावना या नित्य व सनातन वृत्ती असल्या, तरी सामाजिक, नैतिक अथवा आध्यात्मिक शास्त्रातील कोणताही विशिष्ट सिद्धांत हा नित्य व सनातन समजता कामा नये. मानवी बुद्धीला आकलन झालेले कोणतेही सत्य पूर्ण व अंतिम सत्य समजता कामा नये. त्या पूर्ण व अंतिम सत्याच्या संशोधनाचे कार्य मानवाने आपल्या जीवनातील सर्व शक्तींचा उपयोग करून सतत चालू ठेवले पाहिजे आणि अशा सत्याग्रही निष्ठेने आपल्या बुद्धीस व अंतःकरणास जे सत्य ज्या वेळी प्रतीत होईल, त्यावेळी त्या सत्याप्रमाणे वर्तन करीत राहिले पाहिजे, हीच मानवाची निरपेक्ष व आदर्शभूत जीवननिष्ठा होय आणि या जीवन-निष्ठेच्या उपासनेसाठी भौतिक, सामाजिक व आध्यात्मिक अशा कोणत्याही शास्त्रातील अथवा व्यवहारातील सुप्रतिष्ठित गणलेल्या सिद्धांताविरुद्ध क्रांती करण्यास सत्याग्रहींनी तयार असले पाहिजे. ही वृत्ती टिकून राहील तरच सत्याग्रही जीवननिष्ठेचे क्रांतिकारक स्वरूप प्रकट होऊन तिला आज मानवाला हवी असणारी नवसंस्कृती निर्माण करता येईल.

## निःशस्त्र क्रांती व मार्क्स

वर्गयुद्ध आणि सशस्त्र क्रांती यासंबंधी कार्ल मार्क्स याचा तात्त्विक सिद्धांत काय आहे आणि त्यात निःशस्त्र क्रांतीच्या मार्गाने समाजसत्तेची प्रस्थापना करणे ही कल्पना अंतर्भूत होऊ शकेल किंवा नाही याचा विचार आता करू. समाजसत्ताक क्रांती ही सामान्यतः सशस्त्र मार्गानेच करावी असे कार्ल मार्क्स याचे मत असले, तरी ही क्रांती करण्याची साधने प्रत्येक देशातील विशिष्ट परिस्थिती आणि परंपरा यांचा विचार करून बदलावी लागतील आणि इंग्लंड किंवा अमेरिका यांसारख्या काही लोकसत्ताक राज्यात ती शांततेच्या मार्गानेही घडून येऊ शकेल, असे मार्क्सने म्हटले आहे. ...

[येथे आचार्यांनी मार्क्सच्या १८७२ मधील भाषणातील एक उतारा उद्धृत केला आहे. सिडने हूक यांच्या *Towards the Understanding of Karl Marx* या पुस्तकातून (पृ. २४४) हे अवतरण घेतले असून सर्वच देशांमध्ये कामगार क्रांतीचा एकच एक मार्ग असणार नाही असे मार्क्सने त्यात सूचित केले आहे :

"Of course, I must not be supposed to imply that the means to this end will be everywhere the same ....... and we do not deny that there are certain countries such as the United States and England in which the workers may hope to

secure their ends by peaceful means"—*Marx-Engels, Collected Works, Vol. 23, p. 255, Progress, Moscow, 1988.*]

...साधनांचा निर्णय करताना त्या त्या देशातील संस्था, रूढी आणि परंपरा यांच्याकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे, असा सामान्य सिद्धांत सांगून नंतर याचे उदाहरण म्हणून इंग्लंड किंवा अमेरिका या देशात कामगारवर्गात अभिप्रेत असणारी क्रांती शांततेच्या मार्गाने होऊ शकेल असे [मार्क्सने] म्हटले आहे. लेनिनने कार्ल मार्क्सच्या या मतासंबंधी स्पष्टीकरण करताना १८७१ च्या सुमारास इंग्लंडात नोकरशाही व लष्करशाही यांचे प्रस्थ माजलेले नसल्याने अशा वेळी कार्ल मार्क्सला इंग्लंडात शांततेच्या मार्गाने समाजसत्ताक क्रांती होऊ शकेल असे वाटणे साहजिक होते. परंतु आज (१९१७ मध्ये) इंग्लंड आणि अमेरिका यात लष्करशाही व नोकरशाही यांचे पूर्ण साम्राज्य माजल्यामुळे कार्ल मार्क्सने युरोपातील इतर देश व इंग्लंड-अमेरिका यांच्यात केलेला हा भेद लागू पडत नाही असे म्हटले आहे. १८७५ नंतर इंग्लंडात साम्राज्यशाही विचारसरणी अधिकाधिक फैलावू लागली, कारण हिंदुस्थानसारख्या जित राष्ट्रातील आर्थिक लुटीच्या ओघामुळे इंग्लंडातील सर्व वर्गांच्या पोटापाण्याचा व सुखसोयीचा प्रश्न सुटू शकेल अशी आशा तेथील जनतेस वाटू लागली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत ही आशा तेथील कामगारवर्गास वाटत नसल्याने तेथे कार्ल मार्क्सचे वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान रुजू लागले होते. पण पुढे अशी आशा उत्पन्न झाल्यानंतर इंग्लंडात वर्गविग्रहाचे तत्त्व मागे पडून साम्राज्यशाही लोकप्रिय होऊ लागली. तेथील समाजवादीही वर्गविग्रहाचे तत्त्व झुगारून देऊन वर्गसहकार्याचे तत्त्व अवलंबू लागले; आणि ब्रिटिश राष्ट्रवाद लोकशाहीच्या तत्त्वावरून ढळून साम्राज्यशाहीचे स्वरूप धारण करू लागला. पहिल्या महायुद्धाच्या वेळी या वर्गसहकार्याच्या किंवा साम्राज्यशाहीच्या राष्ट्रवादाच्या भावनेस अनुसरूनच इंग्लंडातील कामगारवर्ग व त्याचे पुढारी यांनी आपल्या भांडवलशाही सरकाराशी सहकार्य केले. आज ही साम्राज्यशाही आपला प्रश्न कायमचा सोडवू शकत नाही याची जाणीव तेथील जनतेस झाली आहे. म्हणूनच हिंदुस्थानातील आपले साम्राज्य सोडून देण्यास तेथील जनता तयार झाली.

सत्याग्रह आणि वर्गविग्रहात्मक सामाजिक क्रांती या दोन गोष्टी तत्त्वतःच भिन्न आहेत व त्यांचा समन्वय होऊ शकत नाही असे मानण्याचा अलिकडे एक प्रघात पडू लागला आहे. हा प्रघात पडण्यास जसे सत्याग्रही तत्त्वज्ञानाचे विरोधक कारण आहेत तसेच त्याचे काही भक्तही कारण आहेत. यासाठी वर्गविग्रहाचे तत्त्व कितपत यथार्थ आहे व वर्गसंधी अथवा वर्गसहकार्य हे तत्त्व कितपत यथार्थ आहे यासंबंधी येथे विवेचन करणे भाग आहे. ..

... एकाच राष्ट्रात वागणारे निरनिराळे वर्ग कोणत्या तरी समान हितसंबंधांसाठी जसे एक होत असतात तसेच ते हितसंबंधातील विरोधाच्या तीव्रतेच्या प्रमाणात परस्परांशी विग्रह करण्यास तयार होतात. एका राष्ट्रातील भिन्न वर्गीयांत जसा हितविरोध असतो

तसेच त्यांच्यात काही बाबतींत हितसामान्यही असू शकते. ज्या वेळी समाजातील हितसामान्याची भावना अधिक तीव्र असते त्यावेळी वर्गविग्रहात्मक क्रांती होऊ शकत नाही आणि ज्यावेळी वर्गविरोधाची भावना हितसामान्याच्या भावनेहून अधिक तीव्र असते त्यावेळी वर्गविग्रहात्मक क्रांती टळू शकत नाही. वर्गविरोधाची भावना अधिक तीव्र होणे अथवा हितसामान्याची भावना अधिक तीव्र बनणे या गोष्टी केवळ प्रचारावर अवलंबून नसून त्या समाजाच्या अथवा राष्ट्राच्या आर्थिक किंवा राजकीय परिस्थितीवर अवलंबून असतात. ज्या देशातील सर्वच वर्ग सत्ताहीन बनून परकीयांच्या जुलुमाचे व द्रव्यहरणाचे स्थान बनलेले असतात, त्या देशात वर्गविग्रहाच्या क्रांतीचे तत्त्व रुजण्यास अनुकूल परिस्थिती असत नाही. अशीच स्थिती दुसऱ्या राष्ट्रास लुबाडणाऱ्या साम्राज्यवादी राष्ट्रातील वर्गाची असते. त्यांच्यातही वर्गविग्रहाच्या भावनेपेक्षा हितसामान्याची भावनाच अधिक तीव्र असते व त्यामुळे तेथील परिस्थितीही वर्गविग्रहात्मक क्रांतीस प्रतिकूलच असते. अशा वेळी वरील दोन्ही परिस्थितीतील राष्ट्रांत एक प्रकारच्या राष्ट्रवादाची भावना प्रबल बनते. पहिल्या राष्ट्रात आपल्यावरील परकीय आक्रमणाच्या प्रतिकाराच्या स्वरूपाने ती व्यक्त होते आणि दुसऱ्या राष्ट्रात परकीयांवरील आक्रमणाच्या रूपाने ती व्यक्त होते. यांपैकी पहिले स्वरूप हे जगाच्या शांततेस पोषक, तर दुसरे स्वरूप जगाच्या शांततेस विरोधक असते. पहिल्या स्वरूपाचा राष्ट्रवाद हा मानवसंस्कृतीच्या प्रगतीस कारण होतो. तर दुसऱ्या स्वरूपाचा राष्ट्रवाद हा तिच्या अधोगतीस कारण होतो. हिंदुस्थानातील आजपर्यंतचा राष्ट्रवाद हा पहिल्या प्रकारचा असून तो मानवसंस्कृतीच्या प्रगतीस व जगाच्या शांततेस पोषक असा ठरलेला आहे. हिंदुस्थानात कोणताच वर्ग आजपर्यंत सत्ताधारी बनला नसल्यामुळे येथील लढ्यास वर्गविग्रहाचे अथवा समाजसत्ताक क्रांतीचे स्वरूप येणे शक्य नव्हते. आता विलायतेतील राजसत्ता हिंदुस्थानात आली असल्यामुळे येथील राष्ट्रवादातून निर्माण होणारी शक्ती काही काळ सधन-निर्धनवर्गातील विरोधाच्या किंबहुना विग्रहाच्या स्वरूपाने व्यक्त झाल्याखेरीज राहणार नाही. मात्र हा वर्गविग्रह चालू असता येथील लोकशाहीतील राजसत्ता आपल्या हाती घेऊन तिचा उपयोग निर्धनवर्गाच्या बाजूने करणे सत्याग्रही समाजवाद्यांस शक्य होईल. ज्यावेळी हिंदुस्थानातील सधनवर्ग एकजूट होऊन आपल्या देशात निर्माण झालेली लोकशाही हस्तगत करण्याच्या आणि त्या सत्तेच्या आश्रयाने निर्धनवर्गाच्या उन्नतीस विरोध करण्याच्या प्रयत्नास लागेल, त्यावेळी आपले सत्याग्रही तत्त्वज्ञान सोडावयाचे नसेल तर वर्गविग्रहाचे तत्त्व काही काळ अवलंबिणे समाजवादाच्या स्थापनेसाठी अपरिहार्य होईल. यावेळी समाजवादी पक्षास आपल्या देशात निर्माण होणारी राजसत्ता हस्तगत करता आली नाही, तर त्याला प्रस्थापित राजसत्तेशी असहकारयुद्धही पुकारावे लागेल. परकीय सरकारच्या आश्रयाने जे हितसंबंध प्रबल झाले आहेत, त्यांना विरोध केल्याखेरीज या देशात खरी लोकशाही अथवा खरे स्वराज्य प्रस्थापित करता येणार नाही.

## हिंदी जनता आणि भांडवलशाही

भारतातील स्वराज्य सरकारपुढे येथील चाळीस कोटी लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न अत्यंत तीव्र स्वरूपात येऊन उभा राहिला आहे. आजपर्यंत हिंदुस्थानातील सामान्य जनतेचे जे द्रव्यहरण झालेले आहे त्यामुळे येथील जनता आणि मध्यमवर्ग हे दोघेही आज उपासमारीने व बेकारीने जर्जर झालेले आहेत. या चाळीस कोटी लोकांच्या राष्ट्राचा प्रश्न भांडवलशाही व साम्राज्यशाही पद्धतीने सुटणे अशक्य आहे. इंग्लंड किंवा जपान यांसारख्या छोट्या राष्ट्रांना आपल्या जनतेचा व मध्यमवर्गाचा प्रश्न काही काळ तरी हिंदुस्थान किंवा चीन पादाक्रांत करून सोडावणे शक्य झाले असेल, पण हिंदुस्थान किंवा चीन यांसारखे खंडतुल्य देश या मार्गाने आपल्या पस्तीस किंवा चाळीस कोटी जनतेचा प्रश्न सोडवू शकत नाहीत. यामुळे हिंदी राष्ट्रवादास इंग्लिश किंवा जपानी राष्ट्रवादाप्रमाणे साम्राज्य-शाहीचे स्वरूप येणे निसर्गतःच अशक्य आहे. अर्थात ब्रिटिश साम्राज्याच्या आश्रयाने येथे उदयास आलेली भांडवलशाही आपले आसन सुस्थिर करू शकणार नाही व देशा-तील राजसत्ता तिने काही काळ हस्तगत केली, तरीही येथील सामान्य जनतेचा व मध्यम-वर्गाचा प्रश्न तिला सोडविता न आल्याने तिला ती सत्ता आपल्या हाती टिकविता येणार नाही. आजपर्यंत येथे जे ब्रिटिश भांडवलवाले आपले आसन स्थिर करीत होते, त्यांचे ते आसन काढून घेऊन त्यावर हिंदी भांडवलवाल्यांना बसविले, तरी तेवढ्याने हिंदी जनतेचा प्रश्न सुटत नाही. हिंदुस्थानातील धनोत्पादनाच्या नाड्या हिंदी भांडवलवाल्यांच्या हाती आल्या किंवा ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या हाती राहिल्या, तरी त्यातील फरक हिंदी जनतेच्या हितसंवर्धनाच्या दृष्टीने फारसा महत्त्वाचा होऊ शकत नाही. त्या नाड्या हिंदी जनतेच्या हाती येणे म्हणजेच कोणत्या तरी स्वरूपात समाजसत्तेची प्रस्थापना होणे, हेच हिंदी जनतेच्या हितसंवर्धनास आवश्यक आहे; व ही प्रस्थापना वर्गविग्रहाच्या तत्त्वाचे आकलन व अवलंबन केल्याखेरीज करता येणार नाही.

## वर्गविग्रह आणि सत्याग्रह

आता वर्गविग्रहाचे तत्त्व भारतीय संस्कृतीशी आणि सत्याग्रही तत्त्वज्ञानाशी विसंगत आहे या मताचा अधिक विचार करू. प्रथमतः सत्याग्रही तत्त्वज्ञान आणि वर्गविग्रहाचे तत्त्व यात मूलतःच विरोध आहे की काय ते पाहू व नंतर भारतीय संस्कृतीच्या इतिहासाच्या दृष्टीने त्याचा विचार करू. आतापर्यंत सत्याग्रही तत्त्वज्ञानाची उत्पत्ती व अभिवृद्धी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यातूनच झाली असल्यामुळे त्याने वर्गविग्रहाचे धोरण अवलंबिले नाही हे यथायोग्यच झाले. आज या तत्त्वज्ञानातून राष्ट्रातील सर्व लोक हे एका मोठ्या एकत्र कुटुंबातील अनेक व्यक्तींप्रमाणे आहेत आणि त्या सर्वांचे हितसंबंध परस्परविरोधी नसून परस्परावलंबी आहेत अशा प्रकारची राष्ट्रीय बंधुभावना जागृत झाली आहे. ही बंधुभावना अथवा राष्ट्रीय कुटुंबाची भावना समाजसत्तेच्या तत्त्वाशी मुळीच विसंगत नसून ती त्यास

पोषकच आहे. परंतु एकत्र कुटुंब हे समाईक संपत्तीच्या आणि श्रमसहकार्याच्या तत्त्वावरच नांदू शकते व टिकू शकते याची विस्मृती मात्र होऊ देता कामा नये. ज्या एकत्र कुटुंबातील संपत्ती समाईक नाही अथवा समाईक असली तरी तिचा उपभोग सर्वांस समत्वाने घेता येत नाही आणि ज्यातील सर्व प्रौढ व सुदृढ व्यक्ती त्या कुटुंबाच्या संपत्तीत व सुखात भर घालण्यासाठी मनोभावाने झटत नाहीत, ते एकत्र कुटुंब अखेरीस नष्ट झाल्याखेरीज राहात नाही. एकत्र कुटुंबातील एक दोन व्यक्तींनीच समाईक संपत्तीचा उपभोग घ्यावा व इतरांनी केवळ कष्ट करावेत, या तत्त्वावर एकत्र कुटुंबात विग्रह उत्पन्न झाला, तर त्याची जबाबदारी समाईक संपत्तीचा बिनकष्टाने उपभोग घेणाऱ्या व्यक्तीवरच येते, हे उघड आहे. अशा व्यक्तीच्या वर्तनासच सामान्य भाषेत एकत्र कुटुंबातील दादागिरी असे नाव देण्यात येते. भांडवलशाही म्हणजे अशाच प्रकारची राष्ट्रीय कुटुंबातील दादागिरी आहे. ही भांडवलशाहीची दादागिरी कायम ठेवून राष्ट्रीय कुटुंबाची जीवितयात्रा चालू शकत नाही आणि त्या कुटुंबात वर्गविग्रह निर्माण होतो. म्हणून ही दादागिरी नष्ट करणे आणि राष्ट्रातील प्रत्येक प्रौढ व सुदृढ नागरिकास शारीरिक अथवा बौद्धिक कष्ट केल्याखेरीज संपत्तीचा उपभोग घेता येणार नाही या तत्त्वावर राष्ट्राच्या औद्योगिक जीवनाची उभारणी करणे आणि एकत्र कुटुंबातील व्यक्तींप्रमाणे राष्ट्रातील सर्व व्यक्तींच्या सर्वांगीण विकासास आवश्यक व पोषक अशा प्रकारे राष्ट्रीय संपत्तीचा उपभोग घेता येईल असे कायदे करणे, म्हणजेच समाजवादाची प्रस्थापना करणे होय. याच्या उलट, राष्ट्रातील सर्व व्यक्तींची जीवितसाधने भांडवलशाहीच्या हातात देणे आणि बहुजनसमाजाला तिच्या आर्थिक दास्यात लोटणे, म्हणजे राष्ट्रातील वर्गविग्रह चिरंतन करणेच होय. वर्गविग्रह चिरंतन करणे हे समाजवादाचे ध्येय नाही, भांडवलशाहीच्या दादागिरीमुळे उत्पन्न होणारा वर्गविग्रह नष्ट करून राष्ट्रीय एकत्र कुटुंबाची न्यायाच्या व समतेच्या पायावर स्थापना करणे हे समाजवादाचे ध्येय आहे. समाजवाद हा खरोखर सर्वोदयवादच आहे. मात्र ही सर्वोदयाची व सहकार्याची भावना समाजात भांडवलशाही कायम ठेवून नांदू शकत नाही, असे त्याचे स्पष्ट मत आहे. भांडवलशाहीच्या दादागिरीमुळे निर्माण होणारा वर्गविग्रह नष्ट करणे भांडवलशाहीशी झगडा केल्याखेरीज शक्य नाही. हा झगडा करणे म्हणजे वर्गविग्रह निर्माण करणे नसून भांडवलशाहीने निर्माण केलेल्या वर्गविग्रहाला बळी पडणाऱ्या सामान्य जनतेला सत्याग्रही बनविणे होय. न्यायप्रस्थापनेच्या लढ्यास सत्याग्रही भीत नाही, तसा भिईल, तर तो सत्याग्रही उरणार नाही.

दुसऱ्या एका दृष्टीने सत्याग्रही तत्त्वज्ञान आणि समाजवाद यात अनुल्लंघनीय मतभेद असल्याचे प्रतिपादण्यात येत असते. सत्याग्रही तत्त्वज्ञानात मनुष्यस्वभाव सुधारणाक्षम आहे अथवा प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणात न्यायबुद्धीच्या रूपाने परमेश्वर वसत असतो असे गृहीत धरण्यात येत असते. याच्या उलट, समाजवादी तत्त्वज्ञानात प्रत्येक मनुष्य

स्वार्थसाधू असतो असे गृहीत धरण्यात येत असते, अशा स्वरूपात हा मतभेद काही लोक मांडितात. पण अशा प्रकारे मनुष्यस्वभावाच्या स्वरूपाबद्दल सत्याग्रही तत्त्वज्ञान आणि समाजवादी तत्त्वज्ञान यांच्यातील मतभेदाची मांडणी करणे हेही आमच्या मते शास्त्रशुद्ध नाही. मनुष्यस्वभाव केवळ स्वार्थप्रधान आहे असे समाजवादाचे मत नाही; आणि याच्या उलट मनुष्यस्वभाव हा केवळ न्यायप्रधान आहे असेही सत्याग्रही तत्त्वज्ञानाचे मत नाही. मनुष्यस्वभावात स्वार्थबुद्धी व न्यायबुद्धी ही दोन्हीही तत्त्वे असून त्यांपैकी स्वार्थबुद्धी न्यायबुद्धीच्या अंकित झाल्याखेरीज मनुष्यसमाजात शांततेचे राज्य प्रस्थापित होणार नाही हे दोन्हीही तत्त्वज्ञानात गृहीत धरावेच लागते. समाजातील स्वार्थबुद्धीवर न्यायबुद्धीचे नियंत्रण राहण्यास त्या समाजाची आर्थिक घटना विशिष्ट प्रकारची असणे अवश्य आहे व ती तशी बनली नाही तोपर्यंत समाजात न्यायप्रस्थापना होणार नाही... असे समाजवादी तत्त्वज्ञान म्हणते. मनुष्यस्वभावाचे व्यक्त स्वरूप कशा प्रकारचे असणार हेही समाजाच्या आर्थिक घटनेवर अवलंबून असते. जोपर्यंत ही घटना न्यायाधिष्ठित बनली नाही तोपर्यंत त्या समाजातील सामान्य व्यक्ती न्यायनिष्ठ बनू शकणार नाहीत. भांडवलशाही समाजरचना अन्यायावर उभारलेली आहे आणि म्हणून ती रचना बदलल्याखेरीज अशा समाजातील सामान्य व्यक्तींचा स्वभाव न्यायप्रधान न होता स्वार्थप्रधान राहणार. भांडवलवाले तेवढेच स्वार्थी आणि कामगार तेवढे सर्वच न्यायप्रिय असे समाजवादाचे म्हणणे नाही. कामगार व भांडवलवाले यांच्यातील लढा हा वर्गीय स्वार्थाचाच लढा आहे हे त्यास मान्य आहे. तथापि, भांडवलवाल्यांचा वर्गीय स्वार्थ अधिक न्यायी समाजरचना प्रस्थापित करण्याच्या आड येतो तसा कामगारांचा वर्गीय स्वार्थ न्यायी समाजरचना प्रस्थापित करण्याच्या आड येत नाही. किंबहुना, तो त्या कार्यास साहाय्यकच बनतो असे त्याचे मत आहे. सामाजिक ध्येय हे समाजात न्यायप्रस्थापना करण्यासाठीच असते आणि ही न्यायप्रस्थापना झाल्यानंतर त्या समाजातील सर्वच व्यक्तींचे हित होणार असते. परंतु तिच्यामुळे सर्वच वर्गांचा स्वार्थ अधिक साधतो असे नाही. काही वर्गांचा स्वार्थ आजच्या समाजात जितका साधतो तितका पुढील समाजात साधणार नाही. यामुळे अशा वर्गातील सामान्य लोक त्या ध्येयाच्या प्रस्थापनेस विरोध करतात आणि आजच्या समाजात ज्या वर्गाचा न्याय्य स्वार्थही चुरडला जात आहे त्या वर्गातील लोक नव्या ध्येयाच्या प्रस्थापनेसाठी करावा लागणारा स्वार्थत्याग करण्यास फार मोठ्या प्रमाणावर तयार होतात अशी समाजवादी विचारसरणी आहे. समाजसत्ताक आर्थिक घटना ही न्यायप्रस्थापनेसाठी असली, तरी तिच्यामुळे जमीनदार-कारखानदारवर्गाच्या स्वार्थाला धक्का बसणार असल्यामुळे त्या वर्गातील सामान्य व्यक्ती समाजसत्ताक क्रांतीत सामील होणार नाहीत. इतकेच नाही, तर अशा सामान्य व्यक्ती या क्रांतीस विरोधच करतील असे समजून समाजवादी कार्यकर्त्यांनी आपले धोरण आखले पाहिजे असे समाजवादी तत्त्वज्ञान आहे. ज्या वेळी सत्याग्रही तत्त्वज्ञान सामाजिक क्रांतीचे कार्य हाती

येईल, त्या वेळी त्यासही अशाच प्रकारचे धोरण स्वीकारावे लागेल असे आम्हास वाटते. आजपर्यंत ज्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयाचा लढा राष्ट्रसभा चालवीत होती त्यातील धोरण अशा तत्त्वावरच आखलेले होते. भारतीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी जो झगडा करावयाचा त्या झगड्यात भारतीय लोकच अधिक भाग घेणार किंबहुना त्याचा सर्व भार तेच उचलणार असे गृहीत धरूनच सत्याग्रहाची व असहकाराची योजना करण्यात आली होती. भारतीयांच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांनी का झगडू नये, असा प्रश्न सहसा कोणी उपस्थित करीत नाही. भारतीय स्वातंत्र्य हा केवळ जगात न्यायप्रस्थापना करण्याचा झगडा आहे व म्हणून जगातील कोणत्याही देशातील न्यायप्रिय किंवा न्यायनिष्ठ लोक या झगड्यात सारख्याच प्रमाणात सामील होतील असे गृहीत धरून कोणीही वागत नाही. भारतीय स्वातंत्र्य हा जगातील न्यायप्रस्थापनेचा प्रश्न असला, तरी या न्यायप्रस्थापनेचा ज्या भारतीयांच्या न्याय्य राष्ट्रीय स्वार्थसाधनाशी त्याचा निकट संबंध आहे, ते भारतीयच या झगड्यात जास्तीत जास्त स्वार्थत्याग करतील आणि ज्या ब्रिटिश लोकांच्या राष्ट्रीय स्वार्थाच्या विरुद्ध हा झगडा चालू आहे, ते ब्रिटिश लोक या झगड्यात जास्तीत जास्त विरोध करतील असे गृहीत धरूनच सत्याग्रहसंग्रामाचेही धोरण आखण्यात येत असे. याचा अर्थ या झगड्यात कोणतेच ब्रिटिश लोक सामील झाले नाहीत किंवा त्यास त्यांनी सहानुभूती दाखविली नाही असा होत नाही. काही अपवादभूत ब्रिटिश व्यक्ती या झगड्यात सामील झाल्या व अनेक ब्रिटिश लोकांनी त्याच्याशी सहानुभूतीही व्यक्त केली. पण तेवढ्याने वरील सामान्य सिद्धांतास बाध येत नाही. हिंदी स्वातंत्र्याचा हक्क ब्रिटिश राष्ट्राने मान्य करण्यापूर्वी साम्राज्यशाहीने येथे प्रस्थापित केलेले राज्ययंत्र स्थगित झाले पाहिजे आणि साम्राज्यशाहीच्या मार्गाने आपला स्वार्थ साधणे यापुढे अशक्य आहे अशी ब्रिटिश राष्ट्राची खात्री झाली पाहिजे तरच आपणास स्वातंत्र्यप्राप्ती होईल असे सत्याग्रहाच्या स्वातंत्र्यसंग्रामातही गृहीत धरलेले होते. या गृहीत धरण्यात सामान्य मनुष्यस्वभावासंबंधी जी विचारसरणी अवलंबिण्यात येत होती, तीच विचारसरणी अवलंबिल्याखेरीज समाजसत्ताक क्रांती घडवून आणता येणार नाही. ती विचारसरणी म्हणजे भांडवलशाही समाजरचना यापुढे चालू शकत नाही असे भांडवलवाल्यांस दिसून आल्याखेरीज अथवा देशातील प्रस्थापित राजसत्तेने आपल्या सत्तेच्या जोरावर समाजातील न्यायप्रस्थापनेस आवश्यक असणारी ही क्रांती बहुजन समाजाच्या पाठिंब्याने आम्ही घडवून आणणार असा निर्धार केल्याखेरीज समाजसत्तेची प्रस्थापना होणार नाही हीच होय. या न्यायप्रस्थापनेच्या कार्यात कोणीच भांडवलवाले सामील होणार नाहीत असे नाही, परंतु त्या वर्गातील सामान्य व्यक्ती त्यात सामील होणार नाहीत व ज्या थोड्या असामान्य व्यक्ती सामील होतील त्या आपला स्वार्थ सोडूनच सामील होतील. ज्या भांडवलवाल्यांना या न्यायप्रस्थापनेच्या कार्यात सामील व्हावयाचे असेल त्यांनी आपले भांडवलवालेपण सोडून देण्यास तयार झाले पाहिजे. "एक वेळ सुईच्या नेढ्यातून उंट जाऊ शकेल, पण परमेश्वरी साम्राज्यात श्रीमंतास

प्रवेश करता येणार नाही," असे ख्रिस्त म्हणाला. परिग्रही मनुष्य सत्याग्रही बनू शकत नाही असे महात्मा गांधी म्हणतात आणि दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या मोहिमेस सधनांपेक्षा निर्धनांनीच खरे साहाय्य केले असा आपला अनुभव निवेदन करतात. या मतात व अनुभवात मनुष्यस्वभावाच्या स्वरूपासंबंधी जो सिद्धात अंतर्भूत झाला आहे त्याहून दुसरा कोणताही सिद्धांत समाजसत्ताक क्रांतीला भांडवलवाले विरोध करतील, या मतात अंतर्भूत झाला आहे असे मानण्याची आवश्यकता नाही. समाजातील अन्यायाचा प्रतिकार त्या अन्यायाने पीडलेले लोक करतात व त्या अन्यायावर स्वार्थ साधणारे लोक या प्रतिकारास विरोध करतात, हा सामान्य व्यवहार ज्यांस माहीत नाही असे लोक समाजातील अन्यायनिवारणाचा लढा यशस्वी करू शकतील असे वाटत नाही. सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा व्यवहारही अशाच धोरणाने चालावा लागतो व चालतो.

सत्याग्रहातील अनत्याचारी असहकारक्रांतीचे तत्त्व केवळ परकीय राजसत्तेसच लागू न करता स्वकीय राजसत्ता व स्वकीय धनिकवर्ग यांच्याविरुद्धही हे तत्त्व अमलात आणता येईल असे जे आम्ही म्हणतो, त्यास काउंट टॉलस्टॉय यांच्या विचारसरणीचा पूर्ण आधार देता येईल. टॉलस्टॉय हे ज्या राष्ट्रात जन्मले ते राष्ट्र राजकीय दृष्ट्या परतंत्र नव्हते. त्यामुळे त्यांनी अनत्याचारी असहकाराचे तत्त्व आपल्या देशातील व इतर स्वतंत्र देशातील धनिक-वर्ग व सरकार यांच्याविरुद्ध उपयोगात आणून जगातील श्रमजीवी कामगारवर्गास आपली मुक्तता कशी करून घेता येईल त्याचाच विचार केलेला आहे. ...

काउंट टॉलस्टॉय यांनी ... स्वावलंबनाच्या आणि संघटित आत्मबलाच्या जोरावर जगातील कष्टाळू सामान्य जनतेस आपल्या देशातील भांडवलशाहीच्या व लष्करशाहीच्या जुलमातून कसे मुक्त होता येईल त्याचे योग्य प्रकारे स्पष्टीकरण केले आहे. सामान्य जनतेची या आत्मबलाच्या मार्गाने संघटना करून मुक्तता करण्याचे प्रत्यक्ष कार्य टॉलस्टॉय यांच्याकडून रशियात घडले नाही, म्हणूनच तेथे लेनिनप्रभृतींचा शस्त्रबलाचा क्रांतिवाद फैलावला. म. गांधींनी टॉलस्टॉय यांनी उपदेशिलेला ... अनात्याचारी असहकारितेचा मार्ग अवलंबून हिंदुस्थानातील राष्ट्रीय स्वातंत्र्याचा झगडा कसा यशस्वी करावा त्याचे शिक्षण तीस वर्षे हिंदी जनतेस दिले. महात्मा गांधींच्या अंगी काउंट टॉलस्टॉय यांच्यापेक्षा व्यावहारिक मुत्सद्देगिरी व नेतृत्वकला अधिक असून येथील राज्यकर्त्यांनीही दूरदर्शी स्वार्थाने का होईना, या निःशस्त्र क्रांतिवादाची प्रचंड संघटना घडवून आणण्यास थोडा-फार अवसर दिला. झारशाहीपेक्षा ब्रिटिश साम्राज्यशाहीखाली नागरिक-स्वातंत्र्याचा उपभोग थोडा अधिक घेता येत असल्यामुळे महात्मा गांधींना काउंट टॉलस्टॉय यांचे निःशस्त्र क्रांतिशास्त्र बऱ्याच परिणत अवस्थेस पोहोचविता आले. तथापि, आजपर्यंत त्यांचे कार्य केवळ परकीय सत्तेतून आपल्या जनतेस मुक्त करण्याचेच असल्याने त्याला स्वकीय राजे व धनिकवर्ग यांच्याविरुद्ध चाललेल्या लढ्याचे स्वरूप प्राप्त झालेले नव्हते.

स्वातंत्र्याचे कार्य यशस्वी केल्यानंतर त्यास याच क्रांतिशास्त्राचा उपयोग काउंट टॉलस्टॉय यांनी दिग्दर्शित केल्याप्रमाणे त्या कार्यासाठी करावा लागेल. हे भावी कार्य अर्थातच महात्मा गांधींच्या पुढील पिढीतील सत्याग्रही पुढाऱ्यांना करावे लागणार आहे.

## समाजवाद व औद्योगिक विकद्रीकरण

भारतीय संस्कृतीचे भावी स्वरूप समाजसत्ताक बनणार याबद्दल भारतातील नव्या पिढीची आज बहुतेक एकवाक्यता होऊ लागली आहे. तथापि, या बाबतीत आणखी एका मुद्याचा विशेष विचार व्हावयास हवा. तो मुद्दा म्हणजे औद्योगिक विकेंद्रीकरण (Industrial Decentralisation) होय. या मुद्याचा विचार करताना आधुनिक युरोपातील चार प्रमुख अर्थशास्त्रज्ञांच्या विचारसरणीचा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. ॲडॅम स्मिथ, फ्रेडरिक लिस्ट, कार्ल मार्क्स आणि प्रिन्स क्रोपोटकिन हे ते चार अर्थशास्त्रज्ञ होत. यांपैकी ॲडॅम स्मिथ हा व्यक्तिवादी, फ्रेडरिक लिस्ट हा राष्ट्रवादी, कार्ल मार्क्स समाजवादी व प्रिन्स क्रोपोटकिन अराज्यवादी असे चार अर्थशास्त्रज्ञ होते. ॲडॅम स्मिथच्या व्यक्तिवादी अर्थशास्त्रातून खुल्या मदानाचे, अनिर्बंध स्पर्धेचे आणि भौगोलिक श्रमविभागाचे तत्त्व निर्माण झाले. याच्याच आधारावर भांडवलशाही आणि ब्रिटिश साम्राज्यशाही यांची वाढ झाली. भौगोलिक श्रमविभागाच्या तत्त्वानुसार आशिया खंडातील सुपीक राष्ट्रांनी केवळ शेती करून अन्नाचा व कच्च्या मालाचा पुरवठा करावा आणि इंग्लंडादी युरोपीय राष्ट्रांनी या कच्च्या मालाचा पक्का माल बनविणारे अधिक किफायतशीर धंदे करावेत हा श्रमविभाग निसर्गसिद्ध मानण्यात येऊ लागला.

खुल्या व्यापाराच्या व अनिर्बंध स्पर्धेच्या तत्त्वामुळे नेपोलियनने सर्व युरोपात महायुद्धाचा वणवा पेटविला होता. त्या काळात हिंदुस्थान घशात घालून बसलेल्या ब्रिटिश भांडवलशाहीला एकदा औद्योगिक क्षेत्रात मिळालेली आघाडी कायम टिकविता येऊ लागली आणि आशिया खंडाप्रमाणे युरोप खंडातीलही लोकांना पक्का माल पुरविण्याचा मक्ता ब्रिटिश भांडवलशाहीला मिळू लागला. हे पाहून फ्रेडरिक लिस्ट या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने खुल्या व्यापाराच्या तत्त्वावर आघात करून संरक्षक जकातीचे नवे राष्ट्रीय अर्थशास्त्र निर्माण केले. या अर्थशास्त्राच्या तत्त्वानुसार आपल्या बाल्यावस्थेतील कारखानदारीला परदेशी मालावरील जकातीचे संरक्षण देऊन प्रत्येक युरोपीय देशाने इंग्लंडप्रमाणे प्रचंड कारखानदारी निर्माण करावी आणि आशियातील देशातून अन्न आणि पक्का माल आणून मागासलेल्या राष्ट्रांना पक्का माल पुरविण्याच्या मक्तेदारीत सर्व युरोपीय राष्ट्रांनी ब्रिटिशांशी स्पर्धा करावी असे नवे साम्राज्यवादी राष्ट्रीय अर्थशास्त्र निर्माण झाले. फ्रेडरिक लिस्ट याने ॲडॅम स्मिथप्रभृती अर्थशास्त्रज्ञांच्या व्यक्तिवादी तत्त्वज्ञानाच्या वेदान्तामागे लपलेला राष्ट्रीय स्वार्थ उघडकीस आणिला, पण तसे करताना त्यानेही आपल्या राष्ट्रीय स्वार्थाचा त्याग

केला नाही. आशियातील राष्ट्रे ही युरोपीय राष्ट्रांच्या कारखानदारीस लागणारा कच्चा माल तयार करण्यासाठीच निसर्गाने अथवा परमेश्वराने निर्माण केली आहेत असे त्याने आपल्या 'राष्ट्रीय अर्थशास्त्रा'त स्पष्टपणे लिहिले आहे.

अशा प्रकारे फ्रेडरिक लिस्ट याने जर्मन राष्ट्रवादाला साम्राज्यशाही दीक्षा देण्याच्या कल्पनेचा अर्थशास्त्रीय पाया एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास घातला. आपल्या इकडे न्या. रानडे यांच्या काळापासून याच राष्ट्रीय अर्थशास्त्राच्या धर्तीवर भारतीय अर्थशास्त्र निर्माण करण्यात आले, परंतु हिंदुस्थानात साम्राज्यशाही अर्थशास्त्र निर्माण होणे शक्य नसल्याने हे भारतीय अर्थशास्त्र यापुढील भारतीय संस्कृतीचा पाया घालण्यास पुरे पडणे शक्य नाही. यानंतर जर्मनीत कार्ल मार्क्स याने जगप्रसिद्ध समाजवादी अर्थशास्त्र निर्माण केले. त्याचा मुख्य सिद्धांत देशातील कारखाने व जमिनी खाजगी मालकीच्या न ठेवता त्यावर समाजाची समाईक मालकी स्थापन करावी हा आहे. हा सिद्धांत स्वीकारल्याखेरीज भारतीयांच्या पोटापाण्याचा प्रश्नही सुटत नाही, राष्ट्रीय भावना वर्गविग्रहाने दुभंगल्याखेरीज राहात नाही, आणि लोकशाहीला धनिकशाहीचे स्वरूप आल्याखेरीज राहात नाही. ही तत्त्वे आज भारतीय समाजवाद्यांनी मान्य केलेली आहेत. तथापि एवढ्याच तत्त्वांच्या आधारावर भावी भारतीय संस्कृतीचा आर्थिक पाया घालता येणार नाही. तो घालण्यात औद्योगिक विकेंद्रीकरणाचे प्रिन्स क्रोपोटकिन याने प्रतिपादिलेले तत्त्व हिंदुस्थानास स्वीकारावे लागेल. क्रोपोटकिन हा समाजवादी पण अराज्यवादी होता. हिंदुस्थानात जो समाजवाद प्रथम आला तो कार्ल मार्क्सच्या अनुयायांमार्फत आल्यामुळे, क्रोपोटकिनच्या या औद्योगिक विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाकडे समाजवादी पक्षाचे जावे तितके लक्ष प्रथम गेले नाही. हे तत्त्व ग्रामोद्योगांची संघटना करणाऱ्या गांधी अनुयायांकडून अनेक वर्षे प्रतिपादण्यात येत आहे. पण ग्रामोद्योगांच्या संघटनेत नैसर्गिक शक्तींचा आणि यंत्रकलेचा उपयोग करून घेतला पाहिजे आणि धनोत्पादनाची सर्व साधने सामाजिक मालकीची बनविली पाहिजेत, या क्रोपोटकिनच्या समाजवादी विचारांचा फारसा उल्लेख ते करीत नाहीत. वस्तुतः भरतखंडास औद्योगिक विकेंद्रीकरण आणि धनोत्पादनाच्या साधनांवरील सामुदायिक मालकी, या दोन्ही तत्त्वांचा अवलंब करावा लागणार आहे. तसे होईल तरच हिंदुस्थानात शेती आणि उद्योगधंदे या दोहोंची सांगड योग्य प्रकारे घालता येईल. भारतीय संस्कृतीचे ग्रामप्रधान स्वरूप कायम ठेवता येईल. औद्योगिक विकेंद्रीकरणाबरोबर राजसत्तेचेही विकेंद्रीकरण घडवून आणून लोकसत्तेचा अधिक परिपोष करता येईल आणि भरतखंडातील सर्व विभागांची सर्वांगीण उन्नती होऊन राजसत्तेच्या व धनोत्पादनाच्या केंद्रीकरणापासून उत्पन्न होणाऱ्या सर्व आपत्ती टाळता येतील.

प्रत्येक राष्ट्र, त्यातील प्रांत आणि प्रांतविभाग हे आर्थिक दृष्ट्या शक्य तितके स्वयंपूर्ण बनवावयाचे, प्रत्येक विभागास लागणारा कच्चा व पक्का माल शक्य तितका तेथल्या तेथे

बनवावयाचा, प्रत्येक विभागातील लोकांच्या सर्व शक्तींचा विकास होण्यासाठी प्रत्येक विभागाचे औद्योगिक जीवन शक्य तितके विविधतेने संपन्न बनवावयाचे आणि अशा रीतीने प्रत्येक राष्ट्रविभाग स्वावलंबी व शक्य तितका सर्वगुणसंपन्न बनावा असे ध्येय आपल्या दृष्टीपुढे ठेवावयाचे, ही क्रोपोटकिन याची आर्थिक विचारसरणी आहे. अशा रीतीने स्थानिक स्वयंपूर्णतेचे व स्वावलंबनाचे तत्त्व अवलंबिल्यास शेती व इतर उद्योगधंदे, कच्चा व पक्का माल यांची निपज, उत्पादक आणि उपभोक्ते, शेतीतील काम आणि कारखान्यातील काम या सर्वांचा योग्य मेळ बसवून नियोजित आर्थिक घटना (Planned Economy) स्थापन करणे फार सोयीचे व सुलभ बनते. ही आर्थिक घटना छोट्या छोट्या क्षेत्रावर आणि लहान लोकसमुदायावर सुरू करावयाची असल्याने तिला फार संकीर्ण स्वरूप येत नाही. यामुळे तिच्यावर स्थानिक लोकांच्या गरजांचा व मतांचा योग्य प्रभाव पडून ती अधिक लोकमतानुवर्ती राहू शकते आणि तिच्यातील प्रत्येक विभागातील लोकांचे स्वातंत्र्य व सुख अधिक सुरक्षित राहू शकते. याखेरीज मोकळी हवा, मुबलक पाणीपुरवठा, उघडी मैदाने आणि सूर्यकिरणांचा भरपूर पुरवठा या निसर्गदत्त संपत्तीचा फार मोठ्या प्रमाणावर सर्वांस उपभोग घेता येत असल्यामुळे, राष्ट्रीय जीवन अधिक निरोगी, जोमदार, संपन्न आणि सुसंस्कृत होऊ शकते. उद्योगधंदे व शेती या दोहोंच्या कामी विद्युच्छक्ती सारख्या नैसर्गिक शक्तींचा उपयोग करण्याचे भौतिक ज्ञान आज प्राप्त झाले असल्याकारणाने आणि लोकसत्ता व समाजसत्ता यासारख्या राज्य संघटनेच्या व समाजसंघटनेच्या पद्धती उपलब्ध असल्याने त्यांचा उपयोग केल्यास भावी भारतीय संस्कृती पूर्वीप्रमाणे ग्रामप्रधान व कृषिप्रधान राहूनही ती भौतिकदृष्ट्या अधिक संपन्न, बौद्धिकदृष्ट्या अधिक प्रगतिपर, सामाजिक दृष्ट्या अधिक समतापूर्ण, राजकीय दृष्ट्या अधिक लोकसत्ताक आणि धार्मिक दृष्ट्या अधिक प्रवृत्तिपर पण शांतिप्रधान बनविता येणे शक्य आहे. मात्र ती तशी बनवावयाची, तर भौतिक विद्या, यंत्रकला, बुद्धिस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक आणि आर्थिक समता, लोकसत्ता आणि समाजसत्ता या आधुनिक जगातील सर्व भौतिक व सामाजिक शोधांचा आम्ही भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे आणि तसे करताना आपली प्राचीन आध्यात्मिक संपत्ती न गमावता तिच्या वृद्धीसाठीच या सर्वांचा उपयोग आम्ही केला पाहिजे. अशा भावी भारतीय संस्कृतीचा पाया घालताना क्रोपोटकिन याने राष्ट्रवादी व समाजवादी अर्थशास्त्रांचा समन्वय करून जे अर्थशास्त्र प्रतिपादिले आहे, त्याचा आपणास उपयोग करावा लागेल असे आमचे मत आहे.

क्रोपोटकिनच्या अर्थशास्त्राचा आज जर्मनी व इटली या देशात राष्ट्रीय समाजवादी अर्थशास्त्र म्हणून पुढे येऊ लागलेल्या साम्राज्यशाही अर्थशास्त्राशी कोणताही संबंध नाही हे ओळखून त्याचा फॅसिस्ट किंवा नाझी अर्थशास्त्राशी घोटाळा होऊ देता कामा नये. हिटलरशाहीचे नाझी अर्थशास्त्र हे आपणास राष्ट्रीय समाजवादी म्हणवीत होते, तरी ते वस्तुतः

भांडवलशाही व साम्राज्यशाही अर्थशास्त्र असून त्याने समाजवादास झुगारून दिलेले होते. एका अर्थाने ते व्यक्तिवादी अर्थशास्त्राच्या विरुद्ध असल्यामुळे त्याला राष्ट्रीय म्हणत. याचा उगम फ्रेडरिक लिस्ट याच्या अर्थशास्त्रातच असून त्याचा समाजवादाशी काही संबंध नाही. ब्रिटिश साम्राज्यशाहीची वाढ व्यक्तिवादी वातावरणात झालेली असल्यामुळे तेथील भांडवलवाले वाघाप्रमाणे बनले आहेत व ते संघ करून राहण्याची व वागण्याची प्रवृत्ती फारशी दाखवीत नाहीत आणि जर्मन भांडवलवाले राष्ट्रवादी अर्थशास्त्राच्या संरक्षणाखाली वाढल्यामुळे त्यांच्यात संघभावना वाढून ते लांडग्याप्रमाणे बनले आहेत. दोघेही सारखेच हिंस्र आहेत आणि दोघांचेही खरे अर्थशास्त्र साम्राज्यवादीच आहे. खरे राष्ट्रवादी अर्थशास्त्र व खरे समाजवादी अर्थशास्त्र यांच्यात विरोध नसून त्यांचा समन्वय होऊ शकतो व तो कसा करावा हे प्रिन्स क्रोपोटकिन याने योग्य प्रकारे दाखवून दिले आहे. याच अर्थशास्त्राच्या पायावर भावी भारतीय संस्कृतीची इमारत आपणास उठवावी लागेल.

## वर्गविग्रह व युरोपीय संस्कृती

आता आपण वर्गविग्रह आणि समाजवाद या दोहोंचा भारतीय संस्कृतीच्या परंपरेच्या दृष्टीने विचार करून भारतीय संस्कृतीची प्रगती कशी व कोठे खुंटली ते लक्षात घेऊन भावी भारतीय संस्कृतीचे स्वरूप कसे होईल, अथवा मानवसंस्कृतीला भारतीय संस्कृतीचा कोणता महत्त्वाचा संदेश आहे त्याचा थोडक्यात विचार करू. भारतीय संस्कृती ही जगातील एक अत्यंत प्राचीन संस्कृती आहे व तिच्यापासून जगाला शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत हे जितके खरे, तितकेच या संस्कृतीची प्रगती खुंटली आणि ती आधुनिक काळात युरोपीय संस्कृतीच्या पाठीमागे राहिली होती हेही खरे आहे. आपल्या संस्कृतीची प्रगती का खुंटली याचा विचार करून पुढे पाऊल टाकण्याचे ठरविल्याखेरीज आपल्या संस्कृतीला उज्ज्वल स्वरूप प्राप्त होणार नाही आणि मानवसंस्कृतीत भर टाकण्याची आपली आकांक्षाही सफल होणार नाही. मानवसंस्कृतीची वाढ करण्याचे कार्य मध्ययुगापर्यंत युरोपीय व भारतीय संस्कृती सामान्यतः बरोबरीनेच करीत होत्या, किंबहुना, काही बाबतीत मध्ययुगीन भारतीय संस्कृती तत्कालीन युरोपीय संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ व अधिक संपन्न होती असे म्हणता येईल. पण आधुनिक काळात मात्र युरोपीय संस्कृती पुढे गेली. तथापि, आज तिचीही गती खुंटली असून येथून पुढील मार्ग काढण्याची शक्ती तिच्यापाशी उरली नाही. पुढील मार्ग युरोपातील तत्त्ववेत्त्यांना दिसत नाही असे नाही. पण या मार्गाने आपल्या लोकांना नेण्याचे सामर्थ्य तेथील लोकनायकांपाशी आहे असे दिसत नाही. युरोपीय संस्कृती भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या भोवऱ्यात सापडली असून तो भोवरा फोडून आपल्या संस्कृतीची नौका पुढे हाकारण्याची ताकद तेथील नाविकांस अथवा कर्णधारास असल्याचे दिसत नाही. युरोपीय राष्ट्रांपैकी प्रमुख चार राष्ट्रे म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व इटली हीच होत. यांपैकी जर्मनी व इटली यात सामर्थ्योपासकांचा एकेक संप्रदाय निर्माण

झालेला होता व हिटलर आणि मुसोलिनी यांसारखे दोन समर्थ व कर्तृत्ववान राष्ट्रनायकही त्यांना लाभले होते. अशा प्रकारे जर्मनी व इटली या देशांत सामर्थ्य उत्पन्न झाले होते, पण या सामर्थ्याचा उपयोग मानवसंस्कृतीची प्रगती करण्याकडे त्यांनी न करता ती प्रगती थोपवून धरून मानवसंस्कृतीला प्रतिगामी व आसुरी स्वरूप देण्याकडे स्वतःच्या व आपल्या राष्ट्रांच्या शक्तीचा उपयोग ते करीत गेले. आधुनिक युरोपात निर्माण झालेले लोकशाहीचे आणि नागरिक स्वातंत्र्याचे तत्त्व त्यांनी उघडपणे पायाखाली तुडवून सर्व मानवसंस्कृतीचा अथवा युरोपीय संस्कृतीचा अंत झाला तरी हरकत नाही, पण लोकसत्तेतून निर्माण होणारी समाजसत्ताक संस्कृती आपण युरोपात स्थापन होऊ देणार नाही असा चंग त्यांनी बांधला होता. आपल्या राष्ट्रातील धनिकवर्गाचा त्यांना पाठिंबा होता. या धनिकवर्गाच्या सेवेने लाचार झालेला आणि भावी साम्राज्यशाही लोभाने मोहित झालेला बुद्धिप्रधान मध्यमवर्ग तत्त्वभ्रष्ट होऊन त्यांची सेवा करण्यास तत्पर होता आणि अज्ञानी शेतकरीवर्गाला कामगारवर्गापासून फोडून घेऊन त्यांनी समाजसत्तेच्या प्रस्थापनेसाठी झगडणाऱ्या जनतेची फळी फोडली होती. त्यांनी स्थापन केलेल्या हुकूमशाहीतून जनतेची मुक्तता होण्यास रक्ताच्या नद्या वाहविणाऱ्या सशस्त्र क्रांतीखेरीज दुसरा कोणताही मार्ग तेथील जनतेच्या पुढाऱ्यांस दिसत नव्हता. पण झारशाहीपेक्षा हिटलरशाही व मुसोलिनीशाही यांना अधिक शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले होते आणि राज्ययंत्रही अधिक कार्यक्षम दिसत होते. यामुळे प्रचंड महायुद्धाच्या होमकुंडात त्यांची आहुती पडल्याखेरीज त्यांच्या मगरमिठीतून युरोपीय संस्कृतीची मुक्तता होईल असे दिसत नव्हते. दुसऱ्या महायुद्धाच्या रूपाने हे होमकुंड पेटल्यानंतर त्यात हिटलरशाही व मुसोलिनीशाही यांच्या संपूर्ण आहुती पडल्या, पण त्याचबरोबर सर्व युरोप खंडाची राखरांगोळी होऊन तेथील संस्कृतीही नष्ट झाली.

युरोपातील इंग्लंड व फ्रान्स हे जे दुसरे दोन देश, त्यांनी अद्यापि लोकसत्तेचा बुरखा उघडपणे फेकून दिलेला नाही आणि आधुनिक युरोपात निर्माण झालेली संस्कृती आम्हीच संरक्षून ठेविलेली आहे असे जगाला भासवीत आहेत. या राष्ट्रात आज कोणत्याही प्रकारचे सामर्थ्यच उरलेले नाही असे दिसत आहे. आपल्या साम्राज्याचे संरक्षण करणे हेही त्यांस कठीण झालेले असून त्या साम्राज्याचा लोभही त्यांस सुटत नाही. युरोपीय संस्कृतीची वाढ व प्रगती समाजसत्तेनेच होऊ शकेल हे त्यांच्यापैकी अनेक विद्वानांना पटलेले आहे, पण ही त्यांची विद्वत्ता राष्ट्राच्या गळी उतरविण्याचे व राष्ट्राकडून समाजसत्तेची प्रस्थापना करविण्याचे सामर्थ्य आज त्यांच्यापैकी कोणापाशीही आहे असे दिसत नाही. ज्या वेळी राष्ट्रास थोर, समर्थ व कर्तृत्ववान पुढाऱ्याची आवश्यकता असते, त्या वेळी ते निर्माण होत नाहीतसे झाले, म्हणजे त्या राष्ट्राच्या अधःपाताचा काळ आला अथवा त्याच्या संस्कृतीच्या विनाशाचा काळ ओढवला असे म्हणण्यास हरकत नाही. संस्कृतिवृक्षाला कीड लागली म्हणजे थोर कर्त्या पुरुषांची फळे त्यास येत नाहीत. युरोपमधील इंग्लंड व फ्रान्स या

देशांची व त्यांच्या संस्कृतीची आज अशीच शोचनीय अवस्था झालेली आहे असे दिसते. आधुनिक काळात राष्ट्रीयत्व, लोकशाही व भांडवलशाही यांचा उदय या राष्ट्रात झाला. त्यांनी काही काळ मानवसंस्कृतीचे नेतृत्वही केले. भौतिक विद्या व सामाजिक विद्या यांची बरीच वाढ केली आणि यापुढील इतिहासात मानवसंस्कृती कोणत्या युगात प्रवेश करणार याचेही शोध लाविले. पण आपल्या संस्कृतीची प्रगती करण्याचे सामर्थ्य आज त्यांच्यापाशी उरलेले नाही. संस्कृतीची प्रगती खुंटली की तिचा अधःपात सुरू होतो, हाच अनुभव इंग्लंड व फ्रान्स या देशांस आज येत आहे. त्यांचे राष्ट्रीयत्व आज दुभंगले आहे आणि त्यांची लोकसत्ता धनिक सत्ता बनली आहे. आज या दोहोंच्यापुढे जाण्याचा काळ आलेला आहे हे त्यांच्या बुद्धीला कळते, पण हातून वळत नाही अशी दुर्बल शोचनीय अवस्था त्यांस प्राप्त झाली आहे. "जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः।जानाम्य-धर्मं न च मे निवृत्तिः।" अशा अवस्थेत आज ही राष्ट्र आहेत.

आधुनिक भारतातील महात्मा गांधी अथवा पं. जवाहरलाल नेहरु किंवा श्री. जयप्रकाश यांच्याइतके कर्ते पुरुष आज इंग्लंडात किंवा फ्रान्समध्ये दिसत नाहीत. तेथील सामान्य जनता साम्राज्यशाहीच्या लुटीतून मिळणाऱ्या संपत्तीने तत्त्वभ्रष्ट झाली आहे. प्युरिटन काळात प्रस्थापित राजसत्तेविरुद्ध बंड करून आपल्या राष्ट्राच्या संस्कृतीच्या प्रवाहाला सत्ताधारी वर्गाने घातलेला बांध फोडून टाकण्याचे सामर्थ्य ज्या राष्ट्राने दाखविले, त्या राष्ट्रात आज निःशस्त्र क्रांतीचेही सामर्थ्य उरलेले नाही. आधुनिक भारताने १९३०, १९३२ साली व १९४० ते १९४५ या काळात अपूर्व सत्याग्रहसंग्राम केले आणि प्रस्थापित राजसत्तेने बेकायदा ठरविलेल्या राष्ट्रसभेचे लढाऊ क्रांतियंत्र सत्ताधारी प्रतिपक्षाकडून होणाऱ्या दडपशाहीच्या उग्र व भयानक शस्त्रसंपातासही न जुमानता काही वर्षे चालू ठेवले. परंतु १९२६ साली ब्रिटिश कामगारांनी सार्वत्रिक संपाचे प्रत्यक्ष प्रतिकाराचे जे हत्यार प्रस्थापित राजसत्तेविरुद्ध उचलले होते, ते बेकायदेशीर ठरणार अशी नुसती धमकी मिळाल्याबरोबर त्यांनी दूर फेकून दिले आणि कोणत्याही प्रकारची राज्यक्रांती करण्याचे सामर्थ्य आपल्या-पाशी नाही असे जणू काय आपल्या कृतीने जगजाहीर केले. यानंतर मॅक्डोनाल्डसारख्या पुढाऱ्यांनी कॉंझरवेटिव्ह पक्षास मिळून आपण आजन्म नेतृत्व करून वाढविलेल्या समाज-वादी पक्षास व तत्त्वज्ञानास दगा द्यावा हे क्रमप्राप्तच होते. महात्मा गांधींनी आधुनिक भारतात सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या साहाय्याने एक प्रचंड सामर्थ्य निर्माण केले आहे. या सामर्थ्याचे अधिष्ठान प्राचीन भारताचे आत्मबल आहे आणि या सामर्थ्यामुळे आधुनिक भारतास आपल्या प्राचीन संस्कृतीचा अभिमानही उत्पन्न झालेला आहे. त्याचबरोबर आधुनिक युरोपीय संस्कृतीसंबंधी एक प्रकारचा अनादर व तुच्छताही निर्माण झाली आहे. या अनादरबुद्धीमुळे कदाचित आधुनिक भारताचा अधःपातही होण्याचा संभव आहे. आधुनिक युरोपात निर्माण झालेली प्रत्येक गोष्ट अथवा प्रत्येक विचारसरणी त्याज्य व तुच्छ

आहे, ही वृत्ती भारतीय अंतःकरणात बळावत गेली, तर प्राचीन भारतीय संस्कृतीतील दोषांनाच आधुनिक भारत चिकटून बसेल, एवढेच नाही, तर आधुनिक युरोपीय संस्कृतीचा अनादर करता करता तिच्या उज्ज्वल अंगांचा मात्र तो अनादर करील आणि तिच्या हीन अंगांचा नकळत आदर करू लागेल अशी भीती काही विचारवंतांना आज वाटू लागली आहे व ती सर्वस्वी निराधार आहे असे आम्हालाही म्हणवत नाही. मात्र एवढे खास, की आधुनिक भारत आज कार्यक्षम व समर्थ बनू लागला आहे. ही त्याची कार्यक्षमता व सामर्थ्य एकसारखे वाढत आहे. यामुळे अशी भीती खरी ठरण्याचा संभव फारच अल्प दिसतो. कोणतेही राष्ट्र एकदा आत्मोद्धाराच्या उद्योगास झटून लागले व त्याकरिता त्याग करण्याची प्रवृत्ती त्याच्यातील बुद्धिमानवर्गात वाढू लागली, तर त्याचे तत्त्वज्ञान सदोष असले तरीही त्याचा अधःपात न होता त्याच्या उद्योगाच्या सामर्थ्याने ते तत्त्वज्ञान हळूहळू निर्दोष बनू लागते. आत्मोद्धाराचा उद्योग करण्याची ही आत्मप्रेरणा आज भारतात जागृत झाली असल्यामुळे आपले राष्ट्रीय तत्त्वज्ञान तो अधिकाधिक निर्दोष आणि शुद्ध बनवील अशी आम्हास निश्चित आशा वाटते. असे असले तरी अलीकडे भारतीय संस्कृतीचा अभिमान व युरोपीय संस्कृतीसंबंधी तुच्छताबुद्धी निर्माण झाल्यामुळे आमच्या तत्त्वज्ञानात कोणते दोष निर्माण होण्याचा संभव आहे आणि कोणत्या दोषांमुळे प्राचीन भारतीय संस्कृतीची प्रगती खुंटून गेली व तिला आधुनिक युरोपीय संस्कृतीपुढे हार खावी लागली याचे येथे थोडक्यात विवेचन केल्याखेरीज या पुस्तकाचा समारोप योग्य प्रकारे होणार नाही. म्हणून आता त्याच विषयाकडे वळणे भाग आहे.

## वर्गविग्रह आणि भारतीय संस्कृती

आधुनिक युरोपीय संस्कृतीची उत्पत्ती वर्गकलहाच्या रूपाने झाली आणि आज तिचा विनाशही कदाचित या वर्गकलहातच होईल असे वाटत आहे. त्यामुळे हे वर्गकलहाचे तत्त्व आपणास मुळीच नको असे मानण्याकडे काही लोकांची प्रवृत्ती होत आहे. आमच्या मते ही प्रवृत्ती कदाचित आमच्या प्रगतीच्या आड येण्याचा संभव आहे. आम्ही राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या झगड्यात गुंतलो असताना वर्गकलह बाजूस ठेवून केवळ राष्ट्रीय बंधुत्वावर भर देण्याचे धोरण त्या स्थितीस व तत्कालीन राजकारणास अनुरूप होते असे म्हणता येईल. तथापि, संपूर्ण स्वराज्याच्या प्राप्तीनंतर आता आपणास वर्गविग्रहाचे तत्त्व स्वीकारावे लागेल आणि त्याचा सत्याग्रहाशी समन्वय करावा लागेल असे आमचे स्पष्ट मत आहे. आधुनिक युरोपने वर्गविग्रह केला अथवा अवलंबिला यात त्याची चूक झालेली नाही. हा विग्रह करीत असता अत्याचारी मार्गांचा अतिरेक केला, राष्ट्रीय बंधुत्वाशी त्याचा समन्वय मुळीच केला नाही आणि या वर्गविग्रहाच्या कामी लोकसत्ताक संस्थांचा मुळीच उपयोग होणार नाही असे गृहीत धरून लोकशाहीवरच हत्यार उपसले, या बाबतीत युरोपची चूक झाली असे आपण म्हणू शकू. सत्याग्रहाने वर्गविग्रहाचे धोरण स्वीकारले,

तरी त्यामुळे राष्ट्रीय बधुंत्वाला बाध येण्याची गरज नाही. कारण सत्याग्रही संग्रामात प्रतिपक्षातील व्यक्तींचा द्वेष अंतर्भूत होत नाही. सत्याग्रही संग्राम हा विशिष्ट प्रकारच्या अन्यायी समाजरचनेविरुद्ध किंवा विशिष्ट संस्थेविरुद्ध असू शकतो; त्या समाजरचनेत किंवा संस्थेत नांदणाऱ्या व्यक्तींविरुद्ध हा संग्राम असू शकत नाही. भांडवलशाही संस्था नष्ट करणे अथवा भांडवलवाला वर्ग नष्ट करणे याचा अर्थ भांडवलवाल्या व्यक्ती नष्ट करणे असा नाही. समाजवादी तत्त्वज्ञानाचीही तत्त्वतः हीच भूमिका आहे. कार्ल मार्क्सने 'कॅपिटल' ग्रंथाच्या प्रस्तावनेत ही गोष्ट स्पष्टपणे मांडली आहे. आमचा झगडा भांडवल-वाल्या व्यक्तींविरुद्ध नसून तो भांडवलशाही संस्थेविरुद्ध आहे असे त्याने म्हटले आहे. सत्याग्रही तत्त्वज्ञानाने समाजसत्ताक रचना स्थापन करण्याचे ठरविले, तर ते ही विचारसरणी अधिक जोमाने पुरस्कारील आणि अनत्याचारी वातावरण क्रांतिकाळातही कायम ठेवील असा आम्हास विश्वास आहे. त्याचप्रमाणे लोकसत्ता आणि सत्याग्रही प्रत्यक्ष प्रतिकार यांचा समन्वय करून निःशस्त्र क्रांती यशस्वी करण्याचे व समाजसत्ताक क्रांतीचा स्वीकार करूनही त्यांचा राष्ट्रीयत्व व लोकसत्ता यांच्याशी समन्वय करणे सत्याग्रही तत्त्वज्ञानास शक्य आहे. मात्र वर्गविग्रह व समाजसत्ताक क्रांती यांचा अवलंब केल्याखेरीज त्यास भावी भारतीय संस्कृतीची इमारत उठविता येणार नाही.

वर्गविग्रहाचे तत्त्व प्राचीन भारतीय संस्कृतीशी सर्वस्वी विसंगत आहे हे मत आम्हास मुळीच पटत नाही. एवढे खरे आहे, की आधुनिक युरोपातील व्यापारी भांडवलवाल्या वर्गाने सरंजामदारवर्गाविरुद्ध ज्या प्रकारचा वर्गकलह केला, अथवा तेथील कामगारवर्ग भांडवलशाहीविरुद्ध आज ज्या प्रकारचा वर्गकलह करीत आहे त्या प्रकारचा वर्गकलह भारतातील वैश्यवर्गाने केला नाही व अद्यापि येथील कामगारवर्गही भांडवलशाहीविरुद्ध तशा स्वरूपाचा वर्गकलह करीत नाही. तथापि त्याचबरोबर हेही खरे आहे की, प्राचीन भारतीय संस्कृती आधुनिक युरोपीय संस्कृतीच्या मागे पडली आणि तिची प्रगती खुंटून तिला अखेरीस आधुनिक युरोपीय संस्कृतीपुढे हार खावी लागली. आधुनिक युरोपातील व्यापारी मध्यमवर्गाने धर्माधिकारी व सरंजामदार या वर्गाविरुद्ध शेतकरीवर्गाच्या साहाय्याने यशस्वी बंड उभारले, युरोपीय जनतेला, निदान मध्यमवर्गाला, श्रद्धायुगातून बुद्धियुगात आणून सोडले, नागरिक स्वातंत्र्याची बंधने राजसत्तेला घालून तिला लोकनियंत्रित बन-विले, सरंजामदारवर्ग नष्ट करून सामाजिक समतेचे व लोकसत्तेचे ध्येय पुरस्कारिले आणि मानवसंस्कृतीतील समाजसत्ताक युगाचे भविष्य वर्तविले. हे सर्व करीत असता त्याने अध्यात्मविद्येकडे पूर्ण दुर्लक्ष केले, सर्व विद्यांना व कलांना केवळ धनोत्पादनाच्या दासी बनविल्या, आत्मबलाची उपेक्षा केली आणि केवळ शस्त्रबलावरच सर्व भर दिला. आधुनिक युरोपच्या सर्व संस्कृतीवर तुच्छताबुद्धीचा पडदा टाकून आपणास भावी संस्कृती निर्माण करता येणार नाही. समाजातील कनिष्ठवर्गाला वरिष्ठवर्गाविरुद्ध कलह करून आपले

हक्क प्राप्त करून घेण्याची कला आम्ही शिकविली नाही. यावरून आमच्या प्राचीन संस्कृतीत वर्गकलह नव्हता असे म्हणता येत नाही. प्राचीन भारतात ब्राह्मण-क्षत्रियांचा वर्गकलह झालेला आहे. यानंतर ब्राह्मण-क्षत्रियांनी वैश्य-शूद्रांविरुद्धही कलह केलेला आहे. द्विजांनी शूद्र अतिशूद्रांना दास्यात ठेवण्यासाठी अनेक प्रयत्न केलेले आहेत.

या सर्व ऐतिहासिक घडामोडी वर्गकलहाखेरीज झालेल्या नाहीत. तथापि आधुनिक युरोपीय वैश्यांनी सामाजिक समतेची व लोकसत्तेची ग्वाही पुकारून, शेतकरीवर्गाच्या साहाय्याने सरंजामदारवर्गाविरुद्ध वर्गकलह करून एकराष्ट्रीयत्वाची व लोकसत्तेची स्थापना केली आणि नागरिकत्वाचे हक्क सर्वांना देऊन समाजात कोणताही शूद्रवर्ग राहू नये असे ध्येय पुकारिले, तशी गोष्ट इकडे झाली नाही. पण हा आमच्या संस्कृतीचा मोठेपणा म्हणता येणार नाही. युरोपीय वैश्यांनी वर्गकलहात अत्याचारी धोरण स्वीकारिले ही चूक असेल, पण आमच्या वैश्यांनी ही त्यांची चूक टाळली याबद्दल त्यांची स्तुती करता येत नाही. त्यांनी युरोपीय वैश्यांचा पराक्रम व कर्तृत्वही दाखविले नाही आणि राष्ट्रीयत्व व लोकसत्ता यांची निर्मितीही केली नाही. ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत आमचे सर्व वर्ग राष्ट्रीयत्वाला व लोकसत्तेला पारखे राहिले आणि ईस्ट इंडिया कंपनीला साहाय्य करून आपला सर्व देश त्यांनी पारतंत्र्यात लोटला. वरिष्ठ वर्गाच्या दडपणाखाली चुरडून गेलेले वैश्य, शूद्र व अतिशूद्र, हे वर्ग कर्तृत्वहीन बनले व त्यांनी आपल्या बळावर वर्गविग्रह केला नाही हे खरे असले, तरी परकीय नेत्यांना साहाय्य करून त्यांनी एक प्रकारे आपल्यावर वरिष्ठ वर्गांनी केलेल्या एकतर्फी वर्गविग्रहाचा सूडच घेतला असेही म्हणता येईल. यापेक्षा युरोपीय मध्यमवर्गीय व्यापाऱ्यांनी जो वर्गकलह केला आणि आधुनिक युरोपीय संस्कृतीची निर्मिती केली, तो वर्गकलह अथवा आज तेथील कामगार स्वातंत्र्यभावनेने प्रेरित होऊन भांडवलशाहीविरुद्ध जो वर्गकलह करीत आहेत तो आमच्यातील वैश्यांनी व शूद्रांनी व अतिशूद्रांनी अन्याय सहन करण्याचे जे व्रत पाळिले व अखेरीस परकीयांस मिळून आपले राष्ट्र पारतंत्र्यात लोटले त्याहून हीन असे कोणासही म्हणता येणार नाही. उलट आधुनिक युरोपने वर्गकलह करताना अत्याचाराचा अवलंब केला, तरी वरिष्ठांच्या अन्यायाविरुद्ध झगडण्याचे तत्त्व कायम ठेविले आणि या झगड्यात अनेक श्रेष्ठ सामाजिक व राजकीय ध्येये निर्माण केली याबद्दल आधुनिक युरोपचे गुणानुवाद मानवी संस्कृतीच्या इतिहासलेखकांस गावे लागतात. आधुनिक भारताने आधुनिक युरोपच्या इतिहासातील वरिष्ठांच्या अन्यायाविरुद्ध बंड करण्याचे तत्त्व अंगिकारल्याखेरीज त्याचा उद्धार होणार नाही. मात्र हे बंड शांततेच्या मार्गाने यशस्वी करण्याचे महत्कार्य त्याने करून दाखविले, तरच आधुनिक युरोपचे दोष दाखविण्याचा अधिकार त्यास प्राप्त होईल.

भरतखंडात आर्य लोक येऊन राहिल्यानंतर त्यांनी वर्णाश्रमधर्माच्या स्वरूपात आपली संस्कृती निर्माण केली. यांपैकी शूद्रवर्ण आणि अतिशूद्रवर्ण हे दासकर्म करणारे वर्ण होते.

वर्णाश्रमधर्माची संस्कृती ही ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांचीच संस्कृती असून शूद्र व अतिशूद्र हे त्यांचे दास होते. तत्कालीन सर्व समाजात दाससंस्था होती. युरोपीय समाजातही मध्ययुगाच्या अखेरीपर्यंत इकडील चातुर्वर्ण्यासारखे चार वर्ग होते. त्या काळात सामाजिक समता याचा अर्थ समाजातील चार वर्ग मोडणे असा नसून ते वर्ग कायम ठेवूनही प्रत्येक वर्गात जन्मलेल्या कोणत्याही व्यक्तीला आपल्या गुणकर्मानुसार वाटेल त्या वर्गात प्रवेश मिळावा असा होता. सर्वांत खालच्या शूद्रवर्णासही सर्वांत वरच्या ब्राह्मणवर्गापर्यंतचा दर्जा प्राप्त करून घेण्याचा मार्ग मोकळा असावा एवढीच सामाजिक सुधारणेची कल्पना त्यावेळी होती. ज्यावेळी समाजातील धनोत्पादन फार अल्प प्रमाणातच होऊ शकते, त्यावेळी समाजातील बहुजनसमाज हा संस्कृती व संपत्ती यापासून पारखाच असतो. सर्वांना सुसंस्कृत व सुसंपन्न करण्याचे ध्येय अशा काळी बहुधा कोणास सुचत नाही व सुचले तरी त्याचा व्यवहारात उपयोग होऊ शकत नाही. आपल्या इकडेही शूद्रवर्गाचे दास्य कमी करावे, त्यांना भौतिक उन्नतीचे आणि ज्ञानप्राप्तीचे मार्ग मोकळे करावेत, अशाबद्दल प्रयत्न करणारे पंथ जैन-बौद्धांच्या काळापासून किंवा त्यांच्या पूर्वीच्या काळापासूनही निघालेले आहेत. चार्वाकाचे लोकायत-मत हे अशाच प्रकारचे एक मत असावे, असा पुष्कळांचा अंदाज आहे. वसिष्ठ–विश्वामित्रांच्या काळापासून वाटेल त्या वर्णात जन्मलेल्या व्यक्तीस ब्राह्मण व ब्राह्मणाचा दर्जा प्राप्त करून घेण्याची कल्पना निघालेली असून या कल्पनेच्या प्रचारातून एक विचारकलह आणि या विचारकलहातून एक प्रकारचा वर्गकलहही निर्माण झालेला होता. श्रीकृष्णाच्या भागवतधर्मात 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्' हे मत मान्य करून स्त्रियांना व शूद्रांना समाजातील सर्वश्रेष्ठ दर्जा प्राप्त करून घेण्याची मुभा दिलेली आहे. बौद्धकाली जी क्रांती झाली, ती एक प्रकारची सर्वांगीण समाजक्रांती होती आणि त्या वेळी विचारकलह व वर्गकलह चालू असावा असे वाटते. नंतरच्या काळात शूद्रांना वैदिक संस्कृतीचा अधिकार देण्यात आला नाही हे खरे असले, तरी ती वैदिक संस्कृतीच मागे पडून बौद्ध संस्कृती व भागवत संस्कृती पुढे आली असे म्हणावयास हरकत नाही. बौद्ध संस्कृतीने वैदिक परंपरेविरुद्ध उघड बंड पुकारले. भागवतसंस्कृतीने हा उघड बंडाचा मार्ग स्वीकारला नाही, तरी एकपरीने भगवद्‌गीतेला वेदांपेक्षा अधिक श्रेष्ठ स्थान देऊन वैदिक संस्कृतीला गौणत्व दिले. ज्ञानेश्वरी वेदांसंबंधी म्हणते :

> वेदु संपन्न होये ठाईं। परि कृपणु आन नाहीं ॥
> जे कानिं लागला तिहिं। वर्णाचां चि ॥
> एरां भवव्यथा ठेलेयां। स्त्रीशूद्रादिकां प्राणियां ॥
> अनवसरू मांडूनियां। असे नव्हे ॥
> तरी मज पांतां तें उणें। फेडावेया गीतापणें ॥
> वेदु वेटला भलेतेणें। सेव्यु होआवेया ॥

*'राजवाडे ज्ञानेश्वरी', अध्याय १८, श्लोक १४४७–४९*

अशाच प्रकारे एकनाथ, तुकाराम वगैरे साधुसंतांनी स्त्रीशूद्रादिकांना वेदाचा अधिकार नाही म्हणून वेदालाच गौण ठरविले आहे. वेदांतील व उपनिषदांतील आत्मोद्धाराचे सर्व तत्त्वज्ञान भगवद्गीतेत आहे आणि भक्तिमार्गातील इतर प्राकृत भाषांतील ग्रंथांतही ते भरपूर आहे, मग आम्हास तुमच्या वैदिक ज्ञानाचे तरी काय महत्त्व आहे असे भागवत-धर्मी संत उघडपणे बोलू लागले. "वेदाचा तो अर्थ आम्हांसचि ठावा। इतरांनी वहाव भार माथा॥" असे तुकाराम छातीठोकपणे सांगतो. शूद्र कितीही मोठा झाला तरी त्याला आम्ही ब्राह्मण म्हणणार नाही किंवा राज्याभिषेक करणार नाही असा दुराग्रह वैदिक म्हणविणारे ब्राह्मण अद्यापिही धरितात! पण व्यास-वाल्मिकी हे ऋषिकोटीत गेले आणि शूद्र-अतिशूद्र जातीतील साधुसंत हजारो ब्राह्मणांचे आध्यात्मिक गुरू बनले. शूद्रांना वैदिक पद्धतीने राज्याभिषेक केला नाही, तरी त्यांनी राजसत्ता व साम्राज्यसत्ता उपभोगिली आणि त्यांची सेवा करून ब्राह्मणांनी त्यांची स्तुतिस्तोत्रेही गाईली. जो शूद्र केवळ परिचर्यात्मक कर्म करण्यासच लायक असे मानण्यात येत होते, तो कृषिगौरक्ष्यवाणिज्य कर्म तर करू लागलाच, पण मंत्री, राजा, इतकेच नाही तर साधुसंत, कवी व आध्यात्मिक गुरुही बनला. भारतीय संस्कृतीत घडून आलेली ही एक प्रचंड विचारक्रांती होती. तिचे वर्णन इतिहासाचार्य कै. राजवाडे हे पुढील शब्दात करतात : "उत्तरकुरूत जो अर्धरानटी शूद्र केवळ दासकर्म करून समाजसोपानाच्या अगदी खालच्या पायरीवर लाथाडला जात होता, तो आता नंदांच्या व मौर्यांच्या शूद्र व वृषल राजवटीत अध्यात्म, नीती, प्रव्रज्या, एकवर्णता, सर्वसमता व साम्राज्य यांचा विजयी चालक झाला. बुद्ध व जिन यांनी, विशेषतः गौतमबुद्ध याने केलेली ही क्रांती केवळ सामान्य धर्मक्रांती नव्हे किंवा राज्यक्रांती नव्हे किंवा मतक्रांती नव्हे, ही सर्वव्यापी अशी भयंकर सामाजिक क्रांती होती. त्या प्रचंड क्रांतीने वैदिक समाजाचे पाय उखडून चातुर्वर्णिक समाज सुलटाचा उलटा होऊन गेला." ('राधामाधव विलास चंपू', प्रस्तावना, पृ. १५१) ही प्रचंड समाजक्रांती वर्गविग्रहाखेरीज झालेली नाही. यानंतर बौद्धधर्म जरी हिंदुस्थानात उरला नाही, तरी त्याने केलेले हे कार्य कायम टिकले. बुद्धाने वैदिक देवताकांड, यज्ञयागादि कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांच्याविरुद्ध बंड उभारिले. पुढे बौद्धधर्म जाऊन मूर्तिपूजा उदयास आली आणि काही काळ पौराणिक देवताकांड, व्रतोद्यापने व पूजाविधाने आणि कुमारीलभट्टादींचा कर्मठ मीमांसाधर्म यांचे स्तोम माजले. तथापि, शंकराचार्यांनी अद्वैतवेदान्ताचे ज्ञानकांड पुढे आणून देवताकांडास व कर्मठपणास गौणत्व दिले आणि भागवतधर्मीय संतांनी अद्वैत-वेदान्ताचे शुद्ध तत्त्वज्ञान भक्तिमार्गात आणून सामान्य जनतेला निष्काम भक्तीने आत्मोद्धाराचा व मोक्षाचा मार्ग दाखवून दिला. या सर्व गोष्टी घडत असता कर्मठ मीमांसकांनी ज्ञानमार्गीयांचा व भक्तिमार्गीयांचा पिच्छा पुरविला. प्रत्येक साधुसंतांच्या वेळी त्यांच्या समताप्रस्थापनेच्या कार्यास विरोध केला व एक प्रकारचा वर्गकलहही निर्माण केला. पण साधुसंतांनी सत्याग्रही वृत्ती धारण करून आपले धर्मसुधारणेचे कार्य पुढे चालविले. जो

गौतम बुद्ध नास्तिक व वेदनिंदक मानला जात होता, त्याला हिंदू जनतेने ईश्वरी अवतार बनविले! अशा संस्कृतिसुधारणेचे हे कार्य झाले, तरी मध्ययुगीन भारत आधुनिक युगात येऊ शकला नाही. ब्रिटिश अमदानीत आता महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भागवतधर्मीय साधुसंतांच्या सत्याग्रही वृत्तीतून एक निःशस्त्र राज्यक्रांतिशास्त्र निर्माण झाले आहे. हे क्रांतिशास्त्र स्वतंत्र भारतात निर्माण झाले असते, तर त्याला सहजच सर्वांगीण क्रांतीचे स्वरूप आले असते ते अद्यापि आले नाही. तथापि लवकरच ते येईल आणि त्याच्या आश्रयाने वर्गविग्रहाची सर्वांगीण समाजक्रांती झाली, तरीही भारतीय राष्ट्रीयत्व व लोकसत्ता यांना धक्का न लागता ती होईल अशी आमची कल्पना आहे. अशा प्रकारे आधुनिक युरोपात निर्माण झालेली संस्कृती आत्मसात करून त्याला जी क्रांती घडवून आणता आली नाही, ती शांततेच्या मार्गाने घडवून दाखविली, म्हणजेच सत्याग्रही तत्त्वज्ञानाची खरी महती जगाला कळणार आहे आणि आधुनिक भारत निर्माण करणारी संस्कृती आधुनिक युरोपीय संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ ठरणार आहे.

## आजचे क्रांतिकार्य

महात्मा गांधी ही भारतात निर्माण झालेल्या श्रीकृष्ण किंवा गौतम बुद्ध यांच्यासारखीच एक अत्यंत थोर विभूती आहे. त्यांच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानात भागवतधर्म आणि बौद्धधर्म या दोहोंतील तत्त्वांचा समन्वय झाला असून त्यास त्यांनी राजकीय व सामाजिक क्रांतीचे स्वरूप दिलेले आहे. श्रीकृष्णाच्या अगर बुद्धाच्या वेळी ज्या प्रकारची सर्वांगीण क्रांती भरतखंडात झाली, त्याहून अधिक व्यापक अशा प्रकारची सर्वांगीण क्रांती घडवून आणण्याचा काळ आज प्राप्त झाला आहे. शूद्र किंवा अतिशूद्र वर्गांपैकी कोणत्याही लायक व्यक्तीला गुणधर्मानुसार द्विजत्व प्राप्त व्हावे, अथवा वैश्य, क्षत्रिय किंवा ब्राह्मण बनता यावे एवढाच आजचा प्रश्न नाही. आज समाजातील वर्गभेदच नष्ट करून एकवर्ग-समाज स्थापन करण्याची आवश्यकता आणि शक्यता वाटू लागली आहे. आधुनिक युरोपात व्यापारी वर्गाच्या नेतृत्वाखाली जी संस्कृती निर्माण झाली, तिच्यातून लोकसत्तेचे सामाजिक समतेचे ध्येय उदय पावल्यापासून ही एकवर्गसमाजाची कल्पना जगापुढे आलेली आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी समता, स्वतंत्रता व बंधुता या तत्त्वांवर मानवसंस्कृतीची उभारणी करण्याचा प्रयोग प्रथम झाला. लोकसत्तेची व नागरिकस्वातंत्र्याची स्थापना झाली म्हणजे सर्व लोक एकाच वर्गात येतात अशी त्या वेळी कल्पना होती. सरंजामशाही मोडून जमीनदारवर्ग नाहीसा झाला आणि सर्वांना सामाजिक समतेचे व नागरिकस्वातंत्र्याचे हक्क मिळून शूद्रवर्ग मोडून समाजात केवळ शेतकरी, कारागीर व व्यापारी यांचा एक वैश्यवर्ग राहिला. प्रत्येकास बौद्धिक व धार्मिक स्वातंत्र्य मिळाले आणि नैतिक, आध्यात्मिक अगर धार्मिक उन्नती करण्यासाठी स्वतंत्र धर्माधिकारीवर्गाचीही आवश्यकता उरली नाही. प्रत्येक शेतकऱ्यास स्वतःची जमीन मिळाली. व्यापारी व कारागीर यांना धंद्यात मिळणारा नफा

त्यांच्या कष्टाच्या, साहसाच्या व संयमाच्या प्रमाणातच मिळाल्यास समाजातील कोणत्याही व्यक्तीला वाटेल ते स्थान प्राप्त करून घेता येते व त्यामुळे एखाद्या व्यवसायातील लोकांना काही काळ वाजवीपेक्षा जास्त फायदा मिळाला, तर त्या व्यवसायात इतर लोक शिरतात व अवास्तव फायद्याचे प्रमाण कमी होते. याच्या उलट, कोणत्याही व्यवसायात काम करणाऱ्यांना त्यांच्या श्रमाचे योग्य मोलही मिळेनासे झाले म्हणजे त्या व्यवसायातील लोक इतर धंद्यात शिरतात आणि उरलेल्या लोकांना योग्य नफा मिळू लागतो. अशा प्रकारे व्यवसायस्वातंत्र्य आणि करारस्वातंत्र्य यांच्या पायावर सर्वांना आपापल्या श्रमाच्या प्रमाणात संपत्ती कमाविता येईल व आपोआपच एकवर्ग-समाज निर्माण होईल अशी त्या वेळी अपेक्षा होती. ही अपेक्षा औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या प्रचंड कारखानदारीचे स्वरूप आणि परिणाम लक्षात न घेतल्यामुळे निर्माण झालेली होती. औद्योगिक क्रांतीचे स्वरूप जसजसे दिसून येऊ लागले तसतसे नागरिक स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य व करार स्वातंत्र्य एवढ्या पायावर लोकशाहीतून एकवर्ग-समाजरचना निर्माण होऊ शकत नाही असे दिसून येऊ लागले. कारखानदारीमुळे घरगुती धंदे बुडून गेले आणि शेतकऱ्यास मिळालेल्या जमिनीच्या विक्रयस्वातंत्र्यातून सावकार, दुकानदार व भांडवलदार यांच्या दडपणाखाली पुन्हा मोठी जमीनदारी निर्माण होऊ लागली. यांत्रिक साहाय्याने प्रचंड कारखानदारीप्रमाणे प्रचंड प्रमाणावर शेती करणेही शक्य आहे हे लक्षात येताच, छोटी शेती मोडून कारखानदारी पद्धतीची शेती निर्माण होऊ लागली. या सर्व प्रवृत्तींचा स्वाभाविक परिणाम प्रत्येक देशातील कारखाने, जमिनी व खाणी एका अल्पसंख्य धनिकवर्गाच्या हाती जाण्यात होणार आणि प्रत्येक राष्ट्रातील बहुसंख्य जनता या अल्पसंख्य मालकवर्गाच्या आर्थिक दास्यात जाणार हे पाहून कारखाने, जमिनी व खाणी यांच्यावर सार्वजनिक मालकी स्थापन केल्याखेरीज एकवर्ग-समाज, स्वतंत्रता, समता व बंधुता ही ध्येये अंमलात येत नाहीत असे समाजवादी तत्त्वज्ञांनी ठरविले. हे समाजसत्तेचे तत्त्व म्हणजे औद्योगिक क्षेत्रात लागू केलेले लोकसत्तेचेच तत्त्व आहे. या लोकसत्तेची प्रस्थापना मालकवर्गाच्या औदार्यातून न होता कामगारवर्गाच्या बंडातून होईल, अशी शास्त्रीय समाजवादाची मांडणी कार्ल मार्क्सने करून भांडवलशाहीतील अंतर्विरोध आणि वर्गकलह यांच्या आधारावर भावी समाजसत्ताक क्रांतीचे शास्त्रीय भविष्य वर्तविले. हे भविष्य रशियात स्थूल मानाने खरे झाले आणि त्या वेळेपासून समाजसत्तेचे व एकवर्ग-समाजाचे ध्येय जगभर पसरले. हिंदुस्थानास लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांबरोबरच हे समाजसत्तेचे ध्येय स्वीकारावे लागणार आहे आणि जमिनी व कारखाने यांच्यावरील खाजगी मालकी नष्ट करून सार्वजनिक मालकी स्थापन करण्याचे क्रांतिकार्य निःशस्त्र मार्गाने यशस्वी करून दाखवावयाचे आहे. ही क्रांती संघटित असहकाराच्या व सत्याग्रहाच्या तत्त्वानुसार घडवून आणणे शेतकरी-कामकरी वर्गाला कसे शक्य आहे ते मागे याच प्रकरणात टॉलस्टॉयचा जो उतारा दिला आहे त्यावरून दिसून येईल. *[ येथे उतारा वगळला आहे. ]*

आधुनिक जगातील भौतिक विद्या, तिच्यामुळे प्राप्त झालेली धनोत्पादनाची भौतिक साधने, यंत्रकला आणि विद्युच्छक्तीसारख्या नैसर्गिक शक्ती यांचा उपयोग करून घेणे शक्य असल्यामुळे आज समाजात शूद्र-अतिशूद्रवर्ग यांसारखा दासवर्ग किंवा दाससदृश वर्ग ठेवण्याची आवश्यकता कोणत्याही समाजास आवश्यकता उरलेली नाही. ज्यावेळी राज्यशास्त्र व युद्धकला ही बाल्यावस्थेत होती, त्यावेळी सरंजामशाही समाजाच्या संरक्षणाचे कार्य योग्य प्रकारे करीत होती आणि एखाद्या राजाने किंवा सरंजामदाराने जुलूम केला तर त्याचे बाहुबलाने पारिपत्य करणे समाजाला अवघड नव्हते. पुढे प्रचंड राज्ये निर्माण झाली तेव्हा सरंजामशाही मोडावी लागली आणि सर्व लष्कर व लष्करी अधिकारी यांना राज्यातील पगारी नोकर बनवावे लागले. वाटेल त्याने वाटेल तितका प्रदेश जिंकावा व बाहुबलाच्या गुणावर राजा बनावे हे व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट झाले तेव्हाच सामान्य जनतेचे स्वातंत्र्य वाढले. आज कारखानदार-जमीनदारवर्ग नाहीसा करून सामान्य जनतेचे स्वातंत्र्य वाढविण्याचा व तिचे दास्य नष्ट करण्याचा काळ आलेला आहे. ज्या वेळी प्रत्येकास कष्टाच्या प्रमाणातच धनार्जन करता येत होते आणि कष्टाखेरीज फारसा धनसंचय करताच येत नव्हता, अशा प्राथमिक औद्योगिक अवस्थेत वाटेल तितका पैसा मिळवावा व त्याची मालकी उपभोगावी हे तत्त्व समाजाच्या अभिवृद्धीस पोषक ठरले. आजच्या प्रचंड धनोत्पादनाच्या काळात असे स्वातंत्र्य कोणासही देता येणार नाही. आज समाजात मिळणारी संपत्ती आणि ती मिळविण्यास करावे लागणारे कष्ट यांचे प्रमाण व्यस्त झाले आहे. संपत्तीवानांस हजारो लोकांच्या जीवितावर सत्ता मिळू लागली आहे. ही सत्ता व संपत्ती यांचा उपभोग तुम्ही केवळ समाजाचे निधिधारक म्हणून करा असे सांगून हा प्रश्न सुटणार नाही. ज्या वेळी समाजातील धनार्जनाचे मार्ग हे न्याय्य असतात म्हणजे धनार्जनाचे कष्टाशी समप्रमाण असते-त्या वेळी अशा मार्गांनी मिळविलेली संपत्ती समाजाचा ठेवा म्हणून उपभोगा, तिचा जबाबदारीने उपभोग घ्या, हा उपभोग घेताना आत्मकल्याण व लोककल्याण इकडे लक्ष ठेवा आणि अवास्तव उपभोग न घेता उरलेली संपत्ती दान करा असा उपदेश करून हे कार्य भागते. परंतु समाजात धनार्जन करण्याचे कोणते मार्ग कायदेशीर असावेत हे ठरविण्याचे कायद्याचे कार्य वरील नैतिक उपदेशाने होऊ शकत नाही. धनोत्पादनाची पद्धती बदलली म्हणजे धनार्जनाच्या मार्गांचे स्वरूपही बदलते आणि या बदललेल्या आर्थिक परिस्थितीत धनार्जनाचे कोणते मार्ग मोकळे असावेत व कोणते असू नयेत, हे कायद्याने ठरवून द्यावे लागते. पूर्वीच्या पद्धतीत जे मार्ग समाजाला हानिकारक नव्हते किंवा ज्यांच्यामुळे समाजाची फारशी हानी होण्यासारखी नव्हती तेच मार्ग नव्या परिस्थितीत समाजास अत्यंत हानिकारक ठरतात. तथापि, हे मार्ग ज्यांना लाभदायक असतात त्यांना त्या मार्गाने मिळणारी संपत्ती कष्टार्जित वाटत असते व अशा मार्गांनी मिळालेली संपत्ती जुलुमाने मिळविलेली आहे असे ते कबूल करीत नाहीत. हे मार्ग बंद करण्याच्या कार्यास अशा वर्गाचा विरोध होतो आणि हा विरोध परंपरेच्या व मालकी

हक्कांच्या नावाने होत असतो. धनार्जनाच्या मार्गांची परंपरा व तिच्यातून निर्माण होणारे हे मालकीहक्क परिस्थितिसापेक्ष असतात आणि व्यक्तींच्या मालकी-हक्कांना कायदेशीर मर्यादा घातल्याखेरीज आणि समाजाला हानिकारक होणारे हे मालकी-हक्क काढून घेतल्याखेरीज समाजाची प्रगती होऊ शकत नाही हे तत्त्व असे वर्ग कबूल करीत नाहीत. अशा वर्गांच्या विरोधामुळेच समाजात क्रांतीची आवश्यकता उत्पन्न होते. औद्योगिक क्रांतीमुळे आज समाजसत्ताक क्रांतीची आवश्यकता निर्माण झाली आहे आणि या क्रांतीचे कार्य व्यक्तीला मिळणारी संपत्ती अथवा सत्ता यांचा उपभोग तिने समाजाचे निधिधारक म्हणून घ्यावा, एवढ्या तत्त्वाने होऊ शकत नाही. समाजातील सत्तेची व संपत्तीची विभागणी कशी असावी, समाजातील व्यक्तीस सत्तेचा व संपत्तीचा लाभ कोणत्या मार्गांनी व्हावा आणि सत्ता व संपत्ती यांच्या विभागणीत समाजाची नैतिक उन्नती व भौतिक साधने ही लक्षात घेऊन किती प्रमाणात समता कायद्याने अंमलात आणावी व किती प्रमाणात विषमता कायम ठेवावी हे एकदा ठरून गेले आणि तत्कालीन भौतिक व नैतिक उन्नतीस अनुरूप अशी समाजरचनेची कायदेशीर घडी बसली म्हणजे त्या समाजरचनेनुसार सत्तेचा व संपत्तीचा जो भाग कोणत्याही व्यक्तीस प्राप्त होईल त्याचा उपभोग त्या व्यक्तीने कसा घ्यावा हे सांगण्यासाठी सत्ताधारी व संपत्तिमान व्यक्ती या समाजाच्या निधिधारक आहेत हे तत्त्व निघालेले आहे. या तत्त्वाने लोकसत्ताक अगर समाजसत्ताक क्रांतीचे कार्य होणार नाही, परंतु समाजसत्ताक क्रांतीनंतरही काही व्यक्तींच्या हाती अधिक सत्ता द्यावी लागेल आणि काहींना इतरांहून अधिक संपत्तीचा उपभोग घेऊ द्यावा लागेल. या सत्तेचा व संपत्तीचा उपभोग त्यांनी कसा घ्यावा याला काही कायद्याची बंधने असली तरी या कायद्याच्या बंधनांनी हे कार्य पूर्णपणे होणार नाही. त्यासाठी वरील नैतिक तत्त्वांचा उपदेश आवश्यकच राहील. पण या कामासही हा उपदेश प्रत्यक्ष आचरून दाखविणारे आणि कायदेशीर मार्गाने जी सत्ता व संपत्ती मिळणे शक्य आहे तीही मिळविण्याच्या मार्गास न लागता केवळ आपल्या किमान गरजा भागतील इतकी संपत्ती आपल्या कष्टाने मिळवून अधिक संपत्तीचा व सत्तेचा अभिलाष न धरणारे, तसेच अधिकारीवर्गाने जनतेवर जुलूम केल्यास जनतेला त्याचा प्रतिकार कसा करावा हे दाखवून देणारे आणि असा जुलूम असह्य होईल तेव्हा समाजसत्ताक लोकशाहीविरुद्धही अनत्याचारी असहकारितेचा प्रयोग करून प्रस्थापित राज्ययंत्र बंद पाडणारे सत्याग्रही लागतील. समाजसत्ताक लोकशाही प्रस्थापित झाली तरी अधिकारी व प्रजा, अथवा शास्ते व शासित असा भेद राहणारच आहे आणि हा भेद कायम आहे तोपर्यंत खरी एकवर्ग समाजरचना होऊ शकत नाही. समाजसत्ताक लोकशाही ही मानवसमाजाची पूर्णावस्था नव्हे. या समाजसत्ताक लोकशाहीतही अधिकारीवर्गास आणि बहुमतास न कळणारे किंवा अपरिहार्य वाटणारे, अन्याय जाणणारे व हे अन्याय परिहार्य आहेत असे ओळखणारे दूरदर्शी निस्वार्थी लोकसेवक लागतील. सत्यसंशोधन आणि सत्यसंस्थापन हाच ज्यांनी आपला नित्य व्यवसाय बनविला आहे आणि त्यासाठी

आपल्या शारीरिक, बौद्धिक व आत्मिक शक्तींचा उपयोग करणे यातच ज्यांना खरा आनंद व जीवितसाफल्य वाटत आहे असा सत्याग्रहीवर्ग समाजसत्ताक व लोकशाहीच्या भावी विकासास अत्यंत अवश्य आहे.

## आत्मबलाची परंपरा

महात्मा गांधींनी सत्याग्रहाच्या रूपाने जे आत्मबल संघटित व संवर्धित करण्याचा प्रयत्न केला त्या आत्मबलाची परंपरा भरतखंडात फार मोठी आहे. अत्यंत प्राचीन काली आश्रमवासी ऋषींच्या ब्राह्मतेजाच्या रूपाने ते भरतखंडात निर्माण झाले. पुढे ब्राह्मणवर्गाने यज्ञयागादी कर्मकांडाचे आणि देवताकांडाचे स्तोम माजवून स्वर्गप्राप्तीच्या सकाम धर्माला प्राधान्य दिले. तेव्हा गौतम बुद्धाने या आत्मबलाचे संरक्षण व संवर्धन करून देवताकांड, कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांच्याविरुद्ध क्रांती करण्यासाठी बौद्धधर्माची व भिक्षुसंघाची संघटना केली. नंतर हा भिक्षुसंघही अवनत होऊन परिग्रही बनला व राजेलोकांच्या दास्यात गेला. यानंतर कुमारिलभट्टादींनी वैदिक धर्माचे जे पुनरुज्जीवन केले त्यात पुन्हा कर्मकांडाचे व देवताकांडाचे प्रस्थ माजले. यानंतर श्रीशंकराचार्यांनी पीठे स्थापून अद्वैतवेदान्ताच्या आधारावर जाणत्या लोकांत शुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार केला आणि भागवतधर्मीय संतांनी याच अद्वैताच्या आधारावर निष्काम भक्तीचा मार्ग उपदेशून सामान्य लोकांतील आत्मबल जागृत केले. आज महात्मा गांधींनी याच परंपरागत प्राचीन आत्मबलाची संघटना करून त्याला राजकीय व सामाजिक क्रांतिकारक स्वरूप दिले आहे. सत्याग्रहीवर्ग हा आता विशिष्ट मतावर अधिष्ठित असलेला एखादा धर्मसंप्रदाय उरलेला नाही. केवळ व्यक्तिगत आध्यात्मिक मोक्ष हे सत्याग्रहाचे ध्येय नाही. लोकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांना सर्वांगीण क्रांतीचा मार्ग दाखवून देणारे ते एक सामाजिक अखंड क्रांतिशास्त्र आहे. लोकसत्ता व समाजसत्ता या रूपांनी उदित झालेली एकवर्ग–समाजाची ध्येये आत्मसात करून मानवसमाजाला पूर्णावस्था प्राप्त होईपर्यंत त्याचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य या सत्याग्रही तत्त्वज्ञानात आहे. भौतिक विद्या व यंत्रकला यांच्याशी त्याचा विरोध नाही. बाह्य सृष्टीशी कसे व्यवहार करावे आणि तिची नियती आपणास अनुकूल आणि उन्नतिकारक कशी बनवून घ्यावी, हे ज्ञान मनुष्यास भौतिक विद्येनेच प्राप्त होणार आहे. अन्नमय प्राण आणि प्राणमय पराक्रम या भौतिक सत्याकडे प्राचीन भारताचे दुर्लक्ष झालेले नव्हते. बुभुक्षित मनुष्याला ब्रह्म हे अन्नाच्याच रूपाने प्रतीत होते आणि वेदान्ती मनुष्यासही दोन प्रहरी बारा वाजले म्हणजे "अन्न हे पूर्ण ब्रह्म" असे म्हणून भोजन करावे लागते याची विस्मृती ठेवून कोणतीही समाजरचना टिकणार नाही व ती टिकविण्याचा प्रयत्न केला तरी तो साधणार नाही. भांडवलशाही धनोत्पादनपद्धतीमुळे बहुसंख्य लोकांच्या भुकेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटत नाही आणि श्रीमंत–गरिबांतील सापेक्ष अंतर वाढत जाऊन समाजाचे व राष्ट्राचे दोन विरोधी गट पडतात. बहुसंख्य सामान्य जनतेला

जीविताची व वित्ताची क्षणभरही शाश्वती मिळत नसल्यामुळे तिची नीतिमत्ताही भ्रष्ट होऊ लागते. "बुभुक्षितः किं न करोति पापम्। क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति॥" यात वर्णिल्याप्रमाणे सामाजिक नीतिमत्तेचा पाया अन्नप्राप्तीच्या भौतिक आधारावर उभारलेला आहे इकडे सत्याग्रही तत्त्वज्ञान दुर्लक्ष करीत नाही. तथापि, मनुष्यसमाजाच्या आवश्यक भौतिक गरजा भागल्यानंतर भौतिक संपत्तीच्या वाढीच्या प्रमाणात त्याची नैतिक उन्नती होते अथवा त्याची संस्कृती अधिक उन्नत बनते, हे तत्त्व मात्र सत्याग्रहास संमत नाही. "नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः।" म्हणजे फार खाल्ल्यानेही योगप्राप्ती होत नाही, त्याचप्रमाणे मुळीच न खाल्ल्यानेही योगप्राप्ती होत नाही असा आध्यात्मिक उन्नतीचा सिद्धांत आहे.

भांडवलशाही समाजात अपरिमित भौतिक उपभोग घेणारा एक छोटा मालकवर्ग आणि त्याच्या आर्थिक दास्यात रखडणारा दुसरा बुभुक्षित बहुसंख्य सेवकवर्ग असे निर्माण होत असल्याने अशा समाजात शांततेची व नीतीची अपेक्षा करताच येत नाही. ज्या समाजातील बहुसंख्य लोकांना आपल्या जीविताची व जीवितसाधनांची मुळीच शाश्वती नाही अशा समाजात शांतता व नीतिमत्ता नांदणे अशक्य आहे. हिंदुस्थानसारख्या खंडतुल्य राष्ट्रातील पस्तीस कोटी लोकसंख्येच्या पोटापाण्याचा प्रश्न भांडवलशाहीच्या व साम्राज्यशाहीच्या मार्गाने सोडविणे अशक्य आहे. आणि एवढ्या मोठ्या लोकसंख्येची जीवितयात्रा सुखाने चालविण्याचे सामर्थ्य केवळ हस्तव्यवसायाच्या ग्रामोद्योगात अथवा छोट्या प्रमाणावरच्या वैयक्तिक शेतीत आहे असे वाटत नाही. शिवाय, एवढा मोठा भारतीय समाज हा केवळ आश्रमवासी ऋषीप्रमाणे भौतिक सुखाविषयी विरक्त आणि आत्मिक सुखावर संतुष्ट राहील ही गोष्टही शक्य कोटीतील नाही. या खंडतुल्य भारताचा प्रश्न सोडविण्यास भौतिक विद्या आणि यंत्रकला यांचा भरपूर उपयोग केला पाहिजे व तो धनोत्पादनाचे व धनविभाजनाचे कार्य समाजसत्तेखाली आणूनच केला पाहिजे. पण ही समाजसत्ता स्थापन करताना व स्थापन केल्यावरही सत्याग्रहीवर्गाची आवश्यकता भरतखंडालाच नव्हे, तर सर्व मानवसंस्कृतीलाही आहे.

## सत्याग्रही आत्मविद्या

यापुढे भारतीय संस्कृती व मानवसंस्कृती असा भेद राहणार नाही. भौतिक दृष्ट्या आज सर्व मानवसमाज एका कुटुंबात अथवा एका घरात आणून कोंडल्यासारखा झाला आहे. त्यातील लोकांना एकत्र नांदल्याखेरीज सुटका नाही व त्यांनी एकत्र नांदावे यातच मानवकुलाची उन्नती आहे. पण एका घरात एकत्र नांदणाऱ्या लोकांप्रमाणे त्यांनी बंधुभावनेने नांदावयास शिकले पाहिजे. येथून पुढे मानवसंस्कृतीची उन्नती या बंधुभावनेच्या प्रचारावर आणि प्रस्थापनेवर अवलंबून आहे. मानवांच्या अंतःकरणातील या बंधुभावनेस

प्रेम अशी संज्ञा आहे आणि हा प्रेमरूप परमेश्वर प्रत्येकाच्या अंतःकरणात वास करीत असतो, या सिद्धांतावर सत्याग्रही संस्कृतीचा आधार आहे. एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्रावर अथवा एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी अत्यंत निकराचा लढा करीत असताही या बंधुभावनेच्या अंतिम सिद्धांतावर सत्याग्रहीची दृढ श्रद्धा असते. मानवी अंतःकरणातील न्यायबुद्धी व प्रेमबुद्धी म्हणजेच सत्य आणि अहिंसा याहून परमेश्वराचे श्रेष्ठ स्वरूप दुसरे कोणतेही नाही. ज्यांचा सत्यावर व प्रेमावर विश्वास आहे आणि सत्यसंशोधन व सत्यसंस्थापन यासाठी करावा लागणारा त्याग व भोगावे लागणारे क्लेश सहन करण्याची ज्यांची तयारी आहे ते आपणास सेश्वरवादी म्हणवोत किंवा निरीश्वरवादी म्हणवोत, ते बुद्धाप्रमाणे शून्यवादी असोत किंवा श्रीशंकराचार्यांप्रमाणे क्षर सृष्टीच्या बुडाशी अक्षर असे एक अव्यक्त निर्गुण तत्त्व आहे असे म्हणोत, ते खिस्ताचे अनुयायी असोत किंवा महंमदाचे अनुयायी असोत, त्यांना सत्याग्रही बनता येईल. सत्याग्रहीला आत्मविद्या लागते, पण त्या आत्मविद्येत गूढ किंवा विवादात्मक असे काही नाही. आत्मा हा रथी आहे, बुद्धी ही सारथी आहे, इंद्रिये हे घोडे आहेत आणि मन हा त्यांचा लगाम आहे, एवढे अध्यात्मशास्त्र त्यास पुरे होते. बुद्धिरूप सारथी विषयोपभोगाने झिंगून जाऊ नये, त्याच्या हाताचा मनोनिग्रहाचा लगाम ढिला पडू नये आणि विषयोपभोगांच्या पाठीमागे लागून इंद्रियरूपी घोडे मोकाट सुटू नयेत एवढेच हे अध्यात्मशास्त्र आहे. बाह्य सृष्टीवर प्रभुत्व स्थापन करणे आणि समाजाच्या भौतिक सुखांचा प्रश्न सोडविणे हा व्यवहार करण्यास जशी भौतिक विद्येची आवश्यकता आहे, तशीच अंतःसृष्टीवर प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या व्यवहारास आत्मविद्येची आवश्यकता आहे. सत्याग्रही आत्मविद्या विवादासाठी नसून व्यवहारासाठी आहे. ग्रंथप्रामाण्य ही तिची कसोटी नसून अनुभवप्रामाण्य ही तिची अंतिम कसोटी आहे. केवळ भौतिक विद्येची उपासना करणारे लोक अंधःकारात पडतात आणि केवळ आत्मिक विद्येची उपासना करणारे त्याहूनही घोर अंधःकारात पडतात असे ईशोपनिषदाने म्हटले आहे. याचा अनुभव आधुनिक युरोपच्या इतिहासावरून आणि गेल्या दोन-तीनशे वर्षांच्या भारतीय इतिहासावरून जगाला आलेला आहे. आधुनिक भारताने त्यांची अत्यंत अनिष्ट फळे भरपूर चाखलेली आहेत. तेव्हा यापुढे तो भौतिक विद्या किंवा आत्मिक विद्या यांपैकी कोणाकडेही दुर्लक्ष करील, असे वाटत नाही.

अनियंत्रित परकीय राजसत्तेतून स्वकीय लोकसत्तेत आधुनिक भारताचा प्रवेश झालेला आहे. यापुढे थोड्याच काळात ज्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या आश्रयाने त्याला लोकसत्तेची प्रस्थापना करता आली, त्याच्याच आश्रयाने तो समाजसत्तेचीही प्रस्थापना करील. पण समाजसत्ता हाही भारताचा अंतिम संदेश नव्हे. भारताचा अंतिम संदेश आत्मसत्ता हा आहे. या आत्मसत्तेची प्रस्थापना होऊन मानवसमाजाला दंडधारी राजकीय संस्थांची

मुळीच गरज उरली नाही, म्हणजेच खरी एकवर्ग समाजरचना स्थापन होणार आहे. आधुनिक काळातील एकवर्ग-समाजाचे ध्येय आणि प्राचीन ब्राह्मण्याचे ध्येय यात फारसे अंतर नाही व सत्ययुगात केवळ एकच ब्राह्मणवर्ग होता, त्याचप्रमाणे पुन्हा समाजाला अशी एकवर्गी अवस्था प्राप्त व्हावी, हीच मानवसमाजाची पूर्णावस्थेची कल्पना भारताच्या अंतःकरणात समाजवाद आत्मसात केल्यानंतर निर्माण होईल. ...

*[आधुनिक भारत, (१९३८) १९६२;
पुनर्मुद्रण १९९४, कॉंटिनेंटल्, पुणे पृ. ५६२ ते ६०४]*

■ ■ ■

# परिशिष्ट पहिले

## आचार्यांनी लेखन केलेल्या नियतकालिकांचे संपादक

या संग्रहात आचार्यांचे जे लेख समाविष्ट केले आहेत ते प्रथम ज्या नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले त्या नियतकालिकांचे त्या-त्या वेळचे संपादक कोण होते व ती नियतकालिके कोठून प्रसिद्ध होत होती याचा तपशील या परिशिष्टात दिला आहे :

१. **अखंड भारत :** (साप्ताहिक) भाई माधवराव बागल, कोल्हापूर. या साप्ताहिकाचे सहसंपादक इमामुद्दीन शेख हे होते; तर आचार्य जावडेकर आणि वि. स. खांडेकर यांचा 'सहाय्यक' असा उल्लेख अंकाच्या जाहिरातीत असे.

२. **चिन्मयजगत् :** (मासिक) त्र्यं. र. देवगिरीकर, पुणे.

३. **नवभारत :** (मासिक) संचालक : शंकरराव देव, वाई. याच्या संपादकमंडळावर आरंभी आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, हरि कृष्ण मोहनी आणि वि. म. बेडेकर यांची नावे होती. १९४८ पासून वि. म. बेडेकर यांचा कार्यकारी संपादक म्हणून उल्लेख केला गेल्याचे दिसते. १९५१ पासून संपादक मंडळात प्रा. गोवर्धन पारीख यांचा समावेश झाला.

४. **पारिजात :** (मासिक) रघुनाथ ज. सामंत (कुमार 'रघुवीर'), मुंबई.



H-335-22

५. रचना : (द्वैमासिक) केशव गोरे, वि. न. साने, मधु लिमये व प्र. श्री. गोरे. याच्या आरंभीच्या अंकात संपादक म्हणून ना. ग. गोरे, एस्. एम्. जोशी, विनायकराव कुलकर्णी, केशव गोरे, वि. न. साने व मधु लिमये यांची नावे होती.

६. लोकमित्र : (मासिक) द. गो. सडेकर, खानापूर (बेळगाव).

७. लोकशिक्षण : (मासिक) ग. गं. जांभेकर, पुणे.

८. सत्यकथा : (मासिक) वि. पु. भागवत, मुंबई.

९. सह्याद्रि : (मासिक) संचालक : न. चिं. केळकर, संपादक धोंडो वासुदेव विद्वांस, पुणे.

१०. साधना : (साप्ताहिक) साने गुरुजी, पु. ह. पटवर्धन व आचार्य जावडेकर, पुणे.

# परिशिष्ट दुसरे

## आचार्यांनी उल्लेखिलेली पुस्तके

या लेखसंग्रहात आचार्यांनी ज्या पुस्तकांचे उल्लेख केले आहेत किंवा संदर्भ दिले आहेत त्यांची शीर्षके व प्रकाशनविषयक इतर तपशील खालीलप्रमाणे :


1. Bose N. K., *Selections From Gandhi, Navjivan*, Ahmedabad, 1950.
2. Hook Sidney, *Towards the Understanding of Karl Marx*, Victor Golanc, London, 1933.
3. Lenin V. I. *Materialism and Empirio Criticism*, Foreign Language Publishing House, 1947.
4. Lindsay A. D. *Karl Marx's Capital*, OuP, London, 1925.
5. List F. *The National System of Political Economy*, Tr. Sampson Lloyd, Longmans Green & Co., London, 1904.
6. Mashruwalla Kishorilal *Gandhi and Marx*, *Navjivan*, Ahmedabad, 1951.
7. Prabhu R K. and U. R. Rao, *The Mind of Mahatma Gandhi*, *Navjivan*, Ahmedabad, 1945.

८. राजवाडे, वि. का. (संपा.) *राधामाधवविलासचंपू*, चित्रशाळा, पुणे, १९२२.

९. *विनोबा*, *स्थितप्रज्ञ दर्शन*, ग्रामसेवा मंडळ, वर्धा, १९४६.

१०. *विनोबा*, *ईशावास्य-वृत्ति*, ग्रामसेवा मंडळ, वर्धा, १९४७.

# सूची

( प्रस्तुत सूचीत **विषय नोंदी ठळक ठशात** असून नियतकालिके व पुस्तके यांच्या नोंदी एकेरी अवतरण चिन्हात आहेत. अक्षरी पृष्ठक्रमांक प्रस्तावनेतील पृष्ठांचे आहेत. )


'अखंड भारत' (साप्ताहिक) :— सतरा, १२८, ३३७

**अद्वैतवाद** :— २८५–८६

**अध्यात्मवाद** :— ४, ६, २१, २६–२८, ११३–१४, १५२, १६२–६४, १८६–८७, २५७–५८, २८४–८६, २९३, ३३४

*कम्युनिझम* २४–२६

'अन टु धिस लास्ट' :— सोळा

'अनासक्तियोग' :— ३, ४, ५

**अनियंत्रित कामगारशाही** :— सत्तावीस–अठ्ठावीस, ७२–७३, १०८–११०, २४२–४४, २६२–६३

**अराज्यवाद** :— १०६–११५, २२४, २४४, २६२

**अर्थशास्त्र** :— ४०–४२, ७८–८३, ३१७–२०, *अयोजित* ३६–३९; *समाजवादी* १०२–१०३, २३८–४०, *आणि सामाजिक नियंत्रण* ४२–४४

'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र' :— सोळा

**असहकार** :— ११९–२३, २९९

**असंग्रह** :— ८०–८३, १३६–३७, १४६, २०९, २४३, २५४–५५

**अस्तेय** :— ७८–८०, ८२–८३, १३६, २३७, २५५

**अहिंसा** :— ४–६, ७, ९७–९९, १०६–१०७, १४१–४२, १४८, १५७, १६९, २०६, २०९, २१२, २२६, २३१, २३३, २३५, २७३–७४

आगरकर गोपाळ गणेश :— बारा, चौदा, २, ७
आचार्य जावडेकर :— पहा : जावडेकर
आझाद (मौ.) अबुल कलम :— १४८
आत्मप्रामाण्य :— १६९–७१
आत्मबल :— ६, ११४, ११७–१८, १२६–२७, १३२, १४२–४३, १४५, २०८, २२०, २४५–४६, ३३२
आत्मराज्य :— १०७, ११०–११, १२७, १३२–३३, १५१, १७७, १९४, २२४–२५, २३१–३२, २४२, २४४–४५, २९३, २९७
आदर्शवाद आणि वास्तववाद :— २६४–६५
'आधुनिक भारत' :— सतरा, अठरा, एकवीस, पस्तीस, बेचाळीस, अठ्ठेचाळीस, पन्नास, चोपन्न, ५८, २९८, ३३५
'आधुनिक राज्यमीमांसा' :— सात, सतरा, एकवीस, तेवीस, चौतीस, त्रेपन्न, २२५
आयर्विन लॉर्ड :— ३०२
आंबेडकर (डॉ.) बाबासाहेब :— चोपन्न
'ईशावास्यवृत्ति' :— १८१, २८५, ३३९
एकनाथ :— ११९, ३२७
'एशिया' (मासिक) :— सोळा
एंगल्स :— २६, ८४, ३१०
ओवेन रॉबर्ट :— २४९
ऑलिव्हिअर लॉर्ड :— सोळा
'ऋषितुल्य जावडेकर' :— आठ, नऊ, अठरा, छत्तीस

कम्युनिझम :— ११–१६, १७, २७, ३२, *व अध्यात्मवाद* २४–२६, *व नास्तिकवाद* १६–१८, *भारतीय संस्कृती आणि* २०–२४, *हिंदुस्थान आणि* १८–२४
कम्युनिस्ट पक्ष :— ४५–४६, २९८–३०५
'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' :— ८४, ८५, ८६–९०
'कलेक्टेड वर्क्स ऑफ मार्क्स अँड एंगल्स' :— २६, ३१०
कानेटकर (प्रा.) मा. वि. :— १९९
कायदेभंग :— ११९–२०, १२२ २३, २९९
'कार्ल मार्क्स व त्याचे कार्य' :— सत्तावीस

'कार्ल मार्क्सेस कॅपिटल' :— ३३९
कांट :— ७
कुमारिलभट्ट :— ३२७, ३३२
'कुराण' :— २८१
कृपलानी (आचार्य) जे. बी. :— १८३, १९५
केळकर न. चिं. :— वीस, ३३८
'कॅपिटल' :— २६, ३२४
कॉम्ट :— १७
काँग्रेस पक्ष :— ११५, १८३, १९६–९७, २७६
काँग्रेस सोशॅलिस्ट पक्ष :— ४८–५०
क्रोपोटकिन :— १०६, १०८, १७८, २६२, ३१७–२०
क्रॉमवेल :— १११, २६१
क्वेकर पंथ :— ५

खांडेकर वि. स. :— ३३७
खिस्त (येशू) :—१११, ११९, १२५, १२६, १२७, १४९, १५६, १८३, २४५, ३१६

गफारखान खान अब्दुल :— १४८
गांधी (महात्मा) :— सात, दहा, अकरा ते पंधरा, तीस ते बत्तीस, एकोणचाळीस ते बेचाळीस, सेहेचाळीस, एकोणपन्नास, ३-६, ७, ९, १०, २३, ३१, ३३, ४५, ४६, ४८, ४९, ५४, ५९, ७६, ८२, ९३, ९४, ९५, ९७, ९९, १००, १०४, १०६, १०७, १०८, ११०, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११७, ११९, १२१, १२२, १२३, १२५, १२६, १२७, १३१, १३२, १३४, १३५, १३७, १३९, १४०, १४१, १४२, १४४, १४७, १४८, १५१, १५७, १५९, १६०, १६१, १६४, १६६, १६७, १६८, १६९, १७०, १७२, १७४, १७९, १८०, १८२, १८४, १८५, १८६, १९०, १९२, १९४, १९५, २०४–२०६, २०८–२१३, २१६, २१७, २२१, २२६–२८, २३२, २३३, २३५, २३६, २४१, २४२, २४४, २५१, २५२, २५४, २५६, २५९, २६१–७२, २७४, २७६, २७८, २७९, २८०, २८२, २८३, २९१–३००, ३०२–३०५, ३१६–१८, ३२२, ३२८
'गांधी अँड मार्क्स' :— पंचवीस, ३३९

'गांधीवाद' :— सात, पंधरा, सतरा, एकवीस
**गांधीवाद :**— ४६, १००, ११२–१४, १५६–६० १६९–७४, २३३–४६, २४७, २५१, २५८–६६, २७६–८० २९१–९५, *आणि मार्क्सवाद* ३०६–३०९, *मार्क्सवादाशी समन्वय* ५०, ७७, २५६–५७, २८२, *समाजवादाशी समन्वय* १७८
'गांधीवाद : समाजवाद' :— एकेचाळीस, २४६
'गीता' :— चौदा, ३, ४, ५, २२, ११७–१८, १६३, २८१, ३२६, ३२७
'गीतारहस्य' :— २, ३, ४
गोखले गोपाळ कृष्ण :— ४५, ९४, ९५, ३०२
गोरे केशव :— ३३८
गोरे ना. ग. :— ३३८
गोरे प्र. श्री. :— ३३८
गौतम बुद्ध :— २२, १११, ११९, १२५, १२६, १२७, १४९, १५६, १८०, २०८, ३२७, ३२८, ३३२

घोष अरविंद :— ५९
घोष प्रफुल्लचंद्र :— १९५

चर्चिल विन्स्टन :— ९४
चार्वाक :— ३२६
'चित्रमयजगत्' (मासिक) :— सोळा, बेचाळीस, त्रेचाळीस, ५०, ३३७

जयप्रकाश नारायण :— ९३, ९४, ९५, ९६, ११२, १४४, १७५, १७७, १८२, १८३, १९०, १९४, १९५, १९७, २०४, २०५, २०९, २२०, २५५, २८४, २८७, ३०४, ३०५, ३२२
जादामूल्य सिद्धांत :— ६८–६९
जावडेकर (आचार्य) शंकर दत्तात्रय :— सात ते पंचावन्न, ११, १८, २६, २७, २९, ४५, ५१, ९६, १११, ११५, १२९, १३४, १६७, १८३, १९९, २०४, २०८, २९८, ३०९, ३३७, ३३८, *अल्पचरित्र* सात–नऊ, *आणि समकालीन विचार प्रवाह* दहा–अकरा, *आधुनिक संस्कृतीचे मूल्यमापन* एकोणचाळीस–चाळीस, *गांधीवाद* तीस–चौतीस, *चिद्वादाचा प्रभाव* एकावन्न, त्रेपन्न, *जीवनपट* छप्पन्न, *टीकाकार* अठ्ठेचाळीस–एकोणपन्नास, *परंपरेशी विधायक संवाद* एकोणपन्नास–एकावन्न, *भूदान* पस्तीस–सदतीस, *मार्क्सवादाची मांडणी* चोवीस–अठ्ठावीस,

*पतितवर्ग* पंचेचाळीस–सत्तेचाळीस, *लेखनाचे स्वरूप* पंधरा–एकवीस, *लोकशाही समाजवाद* त्रेचाळीस–पंचेचाळीस, *वर्गविग्रह* सत्तेचाळीस, *वर्ण आणि जाती* बावन्न–चोपन्न, *विचारांची जडणघडण* अकरा–चौदा, *विश्वस्त कल्पना* पस्तीस, *शबल सत्याग्रह* अडतीस, *शुद्ध सत्याग्रह* सदतीस–अडतीस, *सत्याग्रही समाजवाद* एकेचाळीस–त्रेचाळीस, *स्टॅलिनचे मूल्यमापन* अठ्ठावीस-एकोणतीस

जांभेकर, ग. गं. :— ३३८

'जीवनरहस्य' :— सात, पंधरा, सतरा, एकवीस, १३४, १४०, १४६, १५५

जोशी, एस. एम. :— ३३८

जोशी, य. गो. :— १३४

जोशी, वा. म. :— ८

टागोर रवींद्रनाथ :— ३

टिळक (लो.) बाळ गंगाधर :— दहा, बारा, तेरा, चौदा, तीस, एकतीस, २, ३, [illegible] ९, २५, ४५, ५१, ५९, ९४, ९५, १६१, ३०२, ३०४, ३०५

'टोवर्डस अंडरस्टँडिंग गांधी' :— एकोणपन्नास

'टोवर्डस दी अंडरस्टँडिंग ऑफ कार्ल मार्क्स' :— ३०९, ३३९

टॉलस्टॉय :— ३, ६-७, १०६, १०७, ११२, १२६, १६६, २४४, २४५, २६२, २९१, ३०६, ३१६, ३१७, ३२९

डार्विन :— २९४

डांगे (कॉ.) श्रीपाद अमृत :— ४५

तुकाराम :— ११९, ३२७

'थेसिस ऑन फायरबाख' :— २४९

'द माईंड ऑफ महात्मा गांधी' :— २५१, ३३९

'द नॅशनल सिस्टीम ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' :— ३३९

'द व्हील ऑफ हिस्टरी' :— ३२

देव (आचार्य) नरेंद्र :— ९४

देव शंकरराव :— एकोणीस, वीस, ३३७

देवगिरीकर त्र्यं. र. :— ३३७

'धम्मपद' :— २८१
धर्म :— १६–१७, १३९, १४७–४९, २८१, ३०४
धर्मभावना :— १६८–७१, १९२, २१०–११, ३०९, व *क्रांतिवृत्ती* ३०५–३०६
धर्माधिकारी भाऊ :— एक्केचाळीस, २४६

'नवभारत' (मासिक) :— नऊ, सोळा, अठरा, एकोणीस, वीस, एकतीस चौतीस, पस्तीस, बेचाळीस, सेहेंचाळीस, सत्तेचाळीस, अठ्ठेचाळीस, एकोणपन्नास, बावन्न, त्रेपन्न, ९५, १६१, १८८, १९३, १९८, १९९, २०३, २३२, २५६, २६४, २७३, २८२, ३३७
नवरोजी दादाभाई :— ४५, १६१, ३०२
'नवशक्ति' (दैनिक) :— नऊ, छप्पन्न
नीत्शे :— पंधरा, ७, १५४
नेपोलियन :— ३१७
नेहरू (पंडित) जवाहरलाल :— ४७, ४८, ४९, ५२, ५९, ७७, ९२, ९४, ९५, ९६, १४४, १५९, १९०, २२१, ३२२

पटवर्धन पु. ह. :— ३३८
पटेल (सरदार) वल्लभभाई :— ४७
पंडित (प्रा.) नलिनी :— तेहेतीस
'पारिजात' (मासिक) :— ३९, ४०, ४४, ३३७
पारीख गोवर्धन :— ३३७
'पुरोगामी साहित्य' :— सोळा
पोतदार दत्तो वामन :— अठरा
प्रजासमाजवादी पक्ष :— तीस, ११५, १९५, १९६, १९७, २८३, २९९, ३००
प्रभू आर. के. :— २५१, ३३९
'प्रसाद' (मासिक) :— १३४
प्लेटो :— १६६

फडके ना. सी. :— सोळा
फायरबाख :— २४९
फुले (म.) जोतिराव :— चोपन्न

फॅसिझम :— ७४–७५, ७६, ७७, १३८
फॉक्स जॉर्ज :— १२६

बर्कनहेड लॉर्ड :— ४७
बाकुनिन :— १०६, १७८, २६२
बागल (भाई) माधवराव :— ३३७
'बायबल' :— २८१
बेडेकर दि. के. :— अठ्ठेचाळीस, एकोणपन्नास, पन्नास
बेडेकर वि. म. :— ३३७
बोस एन्. के. :— २९५, ३३९
बोस सुभाषचंद्र :— ४७

भागवत वि. पु. :— ३३८
भागवत (आचार्य) स. ज. :— ३३८
भावे (आचार्य) विनोबा :— एकोणीस, पंचवीस, पस्तीस, छत्तीस, सदतीस, एकावन्न, ९६, ११२, १७५, १७७, १७८, १७९, १८१–८५, १८९, १९०, १९१, १९३–९९, २०४–२०७, २०९, २१२, २४७, २४८, २४९, २५७, २८५, ३०५, ३३९
भांडवलशाही :—७९, ८२–८३, ८५–८७, १३०, १३४, १३५–३७, १३८, ३१२
भूदान :— पस्तीस-सदतीस, ११५, १७६-७७, १८२–८३, १८५–८६, १८९, १९१, १९३, १९४, १९९–२०३, २०४, २०५–२०७, ३०८
भौतिकवाद :— ६, ६२–६३, *यांत्रिक* ८, ६०, २४९, *विरोधविकासी* पंचवीस, ७, ८, २४८–५०, *स्वयंविकासी* ६०-६१, २८९–९०

'मटेरिॲलिझम अँड एम्पिरिओ क्रिटीसिझम' :— ३३९
'मनोहर' (मासिक) :—बारा, तेरा, चौदा, अठ्ठेचाळीस
मश्रुवाला किशोरीलाल :— पंचवीस, २४७, २५१, ३३९
मसानी मिनू :— ४८
महमद पैगंबर :— ५, १२५, १४९
महाजनी ह. रा. :—अठ्ठेचाळीस, एकोणपन्नास
'महात्मा गांधींचे दर्शन' :— सतरा, एकवीस
महावीर :—१०८, २०८, ३२७

मार्क्स कार्ल :— बारा, चौदा, पंचवीस, सत्तावीस, बेचाळीस, ६, ७, ९, २६, ४०, ४२, ५८, ६४, ६५, ६६, ६७–६८, ७१, ७४, ८३–८५, ८७, ८९, ९०, ९१, १६६, १७८, २३५, २३६, २४१, २४७, २४९, २५३, २५६, २६१, २६३, २६४, २६७–७२, २७४, २८२, २८३, २८५, २८७, २८८, २८९, २९०, २९१, २९३–९५, २९६, २९७, २९८, ३०४, ३०५, ३०६, ३०९, ३१०, ३१७, ३१८, ३२४, ३२९

मार्क्सवाद :— ६–९, ४६, ५६–७७, १०२, २४७, २८८–९०, ३०३, *आणि अराज्यवाद* २६२, *आणि इतिहासमीमांसा* ७, २६९–७०, *आणि नियतिवाद* २४७–४९, *आणि हिंदी राजकारण* २९८–३०२, *निःशस्त्र क्रांती व* ३०९–१०, *मार्क्सवादातील उणिवा* ९९–१०१, २५७–५८

मावळंकर (प्रा.) ना. अ. :— १९९

मिल जॉन स्टुअर्ट : — १७

मुसोलिनी :— ३९, ८५, १३८, ३२१

मुंडले, वा. दा. :— सत्तावीस, बावन्न

मूर (सर) टॉमस :— १०४

मेहता अशोक :— ९६, १७८

मेहता (सर) फेरोजशहा :— ९४

मॅक्डोनाल्ड रॅम्से :— ७६, ३२२

मॅझिनी :— ६, १११

मोरोपंत :— १०

यतिवर्ग :— एकोणचाळीस, पंचेचाळीस–सत्तेचाळीस, ५, १२५–२६, २०६, २४०

'यंग इंडिया' (साप्ताहिक) :— ३, २७०, २९४

'युटोपिया' :— १०४

'रचना' (द्वैमासिक) :— १०३, ३३८

रशियन राज्यक्रांती :— ११–१६, १०५–१०६

रसेल :— २५, २६

रस्किन :— सोळा, १३५

'राजनीतिशास्त्रपरिचय' :— आठ, सतरा, एकवीस, ३

राजवाडे (इतिहासाचार्य) वि. का. :— ३७, ३२७, ३२९

'राधामाधवविलासचंपू' :— ३२७, ३३९
रानडे (न्यायमूर्ती) म. गो. :— ३०२, ३१८
रामकृष्ण परमहंस :— १८०
रामतीर्थ स्वामी :— २३
राव यू. आर. :— २५१, ३३९
राष्ट्रवाद :— ५१–५३, १३०–३१
राष्ट्रसभा :— १९–२०, ४५–५०, ९२–९३, १२५, १२७–२८, १४१, १६०–६१
रीडींग लॉर्ड :— ३०२
रूसो :— १५३, १५४, २६१
रॉय मानवेंद्रनाथ :— ४९, ५३, २९८
रॉय (राजा) राममोहन :— १८०, २१३

लाला लजपतराय :— ४५
लिनलिथगो लॉर्ड :— ३०२
लिमये मधु :— ३३८
लिमये माधव :— आठ, नऊ, छत्तीस
लिस्ट फ्रेडरिक :— ४९, ३१७, ३१८, ३२०, ३३९
लिंडसे ए. डी. :— ३३९
लेनिन :— २६, ४५, ७४, ७५, १०६, १११, ११२, १७८, १९०, २३५, २४४, २६१, २६३, २६४, २८७, ३१०, ३१६, ३३९
'लोकमित्र' (मासिक) :— सोळा, ११७, १२४, ३३८
'लोकशक्ति' (दैनिक) :— नऊ, सतरा, छप्पन्न
'लोकशाही' :— सतरा, एकवीस
लोकशाही :— १४३, २६६–६७
लोकशाही समाजवाद :— त्रेचाळीस–पंचेचाळीस, १४०, १६०, १८९–९०, १९४–९५, २४१–४२, २८२, २९१, २९७, २९९
'लोकशिक्षण' (मासिक) :— सोळा, वीस, एकोणचाळीस, बेचाळीस, चव्वेचाळीस, ५, ११, १७, २४, २८, ३४, ३३८
'लो. टिळक व म. गांधी' :— सात, एकवीस, एकतीस
लोहिया राममनोहर :— बत्तीस, ९६–१०२, १७८

**वर्गविग्रह** :— सत्तेचाळीस, ५३–५५, ६४–६६, ८०–८१, ८६, ८७, ९९, १४६, १६७, १९१, २३७, २३८, २७२–७३, २७६, ३००–३०१, ३१०–१२, *आणि भारतीय संस्कृती* ३२३–२८, *आणि युरोपिय संस्कृती* ३२०–२२, *आणि सत्याग्रह* ५३–५४, ९९, २७७–८०, ३१२–१६

**वर्गहीन समाजरचना** :— १९१, २५०–५१, २७१, ३०८

**वर्णव्यवस्था** : — बावन्न-चोपन्न, १४, २२, ६५, ७२, ९९, ११३, १६५–६६, २१०, २२०–२२, २२९, २५२, ३२५-२८

वसिष्ठ :— ३२६

'वाल्मिकी आश्रमातील प्रवचने' :— बत्तीस, तेहेतीस, चौतीस, ८३, २२८

**विकेंद्रीकरण** :— २२५, २३८, २३९, २६१, ३१७–१९

विक्लिफ जॉन :— १०४

विद्वांस धोंडो वासुदेव :— ३३८

**विरोधविकासवाद** :— ६३-६४, २८६ ८७, २९१

'विविधज्ञानविस्तार' (मासिक) :— सतरा

विवेकानंद (स्वामी) :— ५९, १८०, १८६

**विश्वस्त सिद्धांत** :— पस्तीस, २१६, २३९–४०, २५२–५३, २५८-६१

विश्वामित्र : — ३२६

वेडरबर्न :— ३०२

**वेदान्त** :— १२, १८१, २१०, २१२

वॉशिंग्टन जॉर्ज :— ३०१

व्हॉल्टेअर :— १५३

शंकराचार्य :— ८, १७९, १८०, २१२, २८५, २८६, २८७, ३२७, ३३२

'शास्त्रीय समाजवाद' :— एकवीस, तेहेतीस, ७७

**शास्त्रीय समाजवाद** :— ११, ५६-७७

शिदोरे न. वा. :— ४०, ४१, ४२, ४३, ४४

शेख इमामुद्दीन :— ३३७

शेजवलकर त्र्यं. शं. :— त्रेपन्न

श्रीकृष्ण :— ५, २२, १११, ११७, १२५, १४९, १८०, ३२६, ३२८

सडेकर द. गो. :— ३३८
सत्य :— १४८, १५०-५१, १६९, २२६, २३३-३५
'सत्यकथा' (मासिक) : — बारा, तेरा, सतरा, १०, १२९, १३३, ३३८
सत्याग्रह :— सदतीस, अडतीस, ४, ६, ९, ७५, ९९, १०४-१०५, ११७-२४, १२६-२७, १३०-३३, १३९-४०, १४५, १५१-५३, १६८, १७०-७२, १८४, १८७, १८९, १९२, १९५, २०९-१२, २१६-१८, २२१-२४, २२६, २४१, २४५, २८२, २९२-९३, २९७, *आणि समाजवाद* १७३-७४, २१५-२५
**सत्याग्रही समाजवाद** :—एकवीस, एकेचाळीस, त्रेचाळीस, ५९, ७६, ७७, १२८, १६७, १८८, १९४, २२५-३२, २३६, २३८, २४६
**सनदशीर राजकारण** :— ६, २२०, २६३
**समाजवाद** : — ६-७, ९, ५२-५३, ६६-६७, १०२-१०३, १७८, २१७, २२६
**समाजवादी पक्ष** :— ९२-९३, ९६
**समाजसत्तावाद** :— १३, १७, २१, ३१-३४
सरदेसाई (कॉ.) एस्. जी. : — ११, २४, २५, २७, २८
**सर्वोदय** :— २०६, २०८-१२
'सह्याद्रि' (मासिक) : — सतरा, एकोणतीस, ५५, ३३८
'साधना' :— ३
'साधना' (साप्ताहिक) :— नऊ, चौदा, सोळा, सतरा, अठरा, वीस, तीस, बत्तीस, तेहेतीस, अडोतीस, अठ्ठेचाळीस, एकोणपन्नास, पन्नास, ९६, ११०, ११५, १६७, १७४, १८१, १९३, २०७, २८७, २९३, २९७, ३३८
साने गुरुजी : — ३३८
साने वि. न. :— ३३८
सामंत रघुनाथ ज. :— ३३७
सावरकर वि. दा. :— वीस
'सिलेक्शन्स फ्रॉम गांधी' :— २९५, ३३९
'सोशॅलिस्ट' (साप्ताहिक) :— ४५
स्टॅलिन :— अठ्ठावीस-एकोणतीस, ४८, १९०, २८७
'स्थितप्रज्ञदर्शन' :— २५७, ३३९
स्पिनोझा : — २८६

स्पेन्सर :— ७, ८, १७
स्मिथ ॲडॅम :— ३१७

'हरिजन (साप्ताहिक) :— २२६, २४७, २६६
हिटलर :— ३९, ८५, १३८, ३१९, ३२१
'हिंद स्वराज' :— एकोणचाळीस
'हिंदु मुसलमान ऐक्य' :— सतरा, एकवीस
हूक सिडने :— ३०९, ३३९
हेगेल : — ६, ६४, २८५, २८६, २८७, २८९, २९०, २९१
हॉब्सन जे. ए. :— १२
ह्यूम ॲलन : — ३०२

ज्ञानेश्वर :— २२
'ज्ञानेश्वरी' : — २२, ३२६

■ ■ ■